SANT SHIROMANI DAS RAJARAM VIRACHITA

|| SHRI CHIDAMBAR CHARITRA GATHA ||



Recd on 6th July 2001.
by courier. From
Shri Gokak & Benurkar
Chikkodi Belgaum
Rs 250/-

|| SHRI CHIDAMBAR CHARITRA GATHA ||



PURNABRAHMA
SHRI CHIDAMBAR MAHASWAMI



DAS RAJARAM VIRCHIT
MOOL ABHANG GATHA
BABULGAON GANGA



SANT SHIROMANI DAS RAJARAM

चिदंबर दास राजाराम विरचित
श्री चिदंबरेश्वर चरीत्रगाथा

प्रकाशक	:-	''श्री चिदंबर वाङ्मय संरक्षक संशोधक प्रसार मंडळ मुचंडी, ता. बेळगांव-५९००१०. दुरध्वनी : ०८३१-५३२६३
प्रकाशन तिथी	:-	श्री शके १९२२ चैत्र शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) दि. ५ एप्रिल २०००
प्रथमावृत्ती	:-	प्रति ५००
संपर्क	:-	श्री. डी. एम. गोकाक (करवीर) ओतारी गल्ली, चिकोडी, जि. बेळमांव. दुरध्वनी : ०८३३८ - ७३४१५
मुद्रक	:-	श्री. एल्. एम्. शानभाग 'श्री आर्ट प्रिंटर्स, ३२, क्रॉस नं. ३, भाग्यनगर, बेळगांव. दुरध्वनी : ०८३१-४८०९८६
सेवा शुल्क	:-	रूपये १२५ फक्त.

डॉ.सौ.कुमुद गोसावी एम.ए.पी.एच.डी.
औरंगाबाद ४३१ ००१ महाराष्ट्र राज्य

महाव्दारी

संतकार्याला-सत्कार्याला प्रादेशिक सीमा नसतात. संत तर विश्वकल्याणासाठी अवघे आयुष्य वेचतात. त्यांच्या पावन प्रेरणा आज संगणक युगातही अनेक सुहृदांना चैतन्य प्रेरणा देऊन कार्यरत करुन जातात. याची साक्ष मुचंडी बेळगांव येथील 'श्री चिदंबर वाङ्मय संरक्षक, संशोधक, प्रसार मंडळाने ' केलेल्या कार्यातून मिळते.

विविध ठिकाणांहून एकत्र आलेले काही सत्कर्मी श्री चिदंबर स्वामींच्या भक्तीने प्रेरीत होतात. हुबळीच्या पूं मार्तंड दिक्षीतांसारख्या सत्पुरुषांच्या कृपाशीर्वादाने हे मंडळ स्थापन करतात, चिक्कोडीचे कांहीं भक्त या मंडळाच्या मार्गदर्शनाने मराठवाड्यातील गंगा बाबूळगावाला जातात. तेथील संत राजाराम महाराज यांच्या अभंग गाथ्यांच्या रक्षणासाठी स्टील कपाट निर्माण, श्री चिदंबर राजाराम भक्त निवास निर्माण, रस्ता,पूल आदी सोयी निर्माण कार्याला वाहून घेतात अन् नेटाने ते कार्य पूर्णत्वाकडे नेतात हे सारेच माणसाला विस्मयचकित करणारे, कोड्यात टाकणारे, मात्र अत्यंत कौतुकास्पद ठरणारे असे लक्षणीय, अनुकरणीय महान कार्य म्हणायला हवे.

श्री कृष्णाने व्दापारयुगात आपल्या माता-पित्याना दिलेल्या वचनानुसार कलियुगात शके १६८० मध्ये कार्तिक वद्य षष्ठीला बेळगाव जिल्हयातील मुरगोड गावी चिदंबर स्वरुपात अवतार घेतला, अशी चिदंबर भक्तांची धारणा आहे. श्री चिदंबरांचे भक्त राजाराम या गुरु शिष्यांचा भक्त संप्रदाय महाराष्ट्र अन् कर्नाटक राज्यांत विखुरलेला आहे.

गंगा बाबुळगांव या औरंगाबाद जिल्ह्यातील गावी एका रजपूत घराण्यांत जन्मलेल्या राजाराम यांनी शिव चिदंबर भक्तीत रंगून जाऊन केलेल्या उदंड अभंग रचनांचे हस्तलिखित बाड बेळगांव जिल्ह्यातील मुचंडी गावी राहणार्या रामचंद्र वामनराव कुलकर्णी यांच्या संग्रही असावे व मंडळानी श्री क्षेत्र बाबुळगांव येथुन गाथा संरक्षण कार्यास आणलेल्या संग्रहातून त्यांची सुकन्या राजश्री हिला दैवी प्रेरणा लाभून तिने मराठी अभाषिक असतानाही त्या बाडातील अभंगांचे अगदी अस्खलितपणाने वाचन करावे, लेखन करावे ! याला आज एकविसाव्या शतकातील शास्त्रज्ञांनी काय म्हणावे? हा प्रश्नच.

कु. राजश्री रामचंद्र कुलकर्णी या शालेय शिक्षण घेणार्या किशोरीला मी हत्तरगीला श्री कृष्ण जन्माष्टमी सोहळ्यात हरि मंदिरात पू. श्री एकनाथदादा आणि सौ सुमित्रावहिनी यांच्या उपस्थितीत भेटले तेंव्हा तिने मला सोबत आणलेल्या अभंगाच्या बाडातून मी सांगितलेला अभंग मराठीतून अचूक वाचून दाखवला. मात्र माझ्याशी ती मराठीतून एकही शब्द बोलू शकली नाही. त्या जुन्या अवघड भाषेतील चिदंबरस्वामी चरीत्रात्मक अभंगवाचनाची तिला लाभलेली देणगी ही दैवी असल्याचे तिच्या मुखावरील सात्विक तेज, तिचे अत्यंत भावपूर्ण डोळे सांगून जातात. अन्य साक्षीची गरजच उरत नाही. संपूर्ण कन्नड भाषिक परिवारात राहणार्या राजश्रीला संगणकाचे ज्ञान नसताना देखील ती या कार्यासाठी लीलया संगणकाचा वापरही करते असे समजल्यावर तर या ईश्वररीलीलेचे खूपच नवल वाटले ! तिच्या आणि श्री चिदंबर वाङ्मय, संरक्षक, संशोधक, प्रसार मंडळातील निष्काम भक्तसेवेनेच संत राजाराम महाराजांच्या अभंग चरित्र गाथेच्या प्रथम ग्रंथ प्रकाशनाचा योग येत आहे.

मराठी सारस्वतात अभंग एक वाङ्मय प्रकार म्हणून गेल्या सात शतकांपासून सर्वार्थाने अभंग झालेला दिसून येतो. तसेच तो ग्रामीण आणि नागर समाजाच्या परिचित आहे. तो तालगेय असल्याने अधिक लोकप्रियही आहे, धावत्या चालीवर गाऊन अनेक नामवंत गायकांनी तो गाऊन-आळवून जनसामान्यांपर्यंत पोचवलाही आहे.

लोकसंवाद साधतांना भजन,कीर्तन,प्रवचन अशा प्रभावी माध्यमांचा उपयोग करुन घेतांना संतवाणीने तर अभंगाला विशेषत्वाने आळवले, जनसामान्यांच्या जिभेवर रेंगाळत ठेवले, त्यामुळे आजही मौखिक परंपरेने या वाङ्मयलेण्याचे जतन होतांना आढळून येते.

संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या मांदियाळीतील संत नामदेव, गोरोबाकाका, सेना न्हावी,सावता माळी, चोखामेळा,जनाबाई,मुक्ताबाई आदि संतानी रचलेल्या अभंगानी आषाढी, कार्तिकी एकादशीला जाणार्या वारकर्यांच्या मुखांनी अवघी पंढरी दुमदुमून सोडली. तेराव्या शतकापासून प्रामुख्याने वारकरी संप्रदायाने समाजाच्या तळा-गाळातील संतांची अभंग वाणीही लोकांच्या अंतरी रुजवली. म्हणून तर

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।
जनार्दनी एकनाथ । खांब दिला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।

असे संत बहिणाबाईनी म्हटले आहे. भागवतधर्म मंदिराचा पाया संत ज्ञानदेवांनी घातला तर त्याला बळकट करण्याचें महान कार्य व पुढे सोळाव्या शतकात 'ज्ञानाचा एका ' म्हणून मान्यता पावलेल्या संत एकनाथांनी केले. अन् संत तुकोबानी त्यावर कळस चढवला.

श्री शके १६९० मध्ये फाल्गुन वद्य व्दितीयेला कृष्णावतारी उध्दव विठ्ठलावतारानी 'नामदेव' व नंतर 'तुकाराम' असणार्या भक्तांने 'राजाराम' या नावाने जन्म घेतला, तो मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यात वैजापूर तालुक्यातील गोदाकाठी वसलेल्या गंगा बाबुळगावी, एका दुर्गम, दुर्लक्षित, अविकसित खेडेगावी. जिथे श्री शिव चिदंबर महाराज त्यांच्या पत्नीव्दय सावित्री आणि सरस्वती अन् भक्त श्रेष्ठ हनुमान यांच्या अप्रतीम सुंदर मूर्ती आहेत अन् चिदंबरदास संत राजाराम यांनी संत तुकारामा- प्रमाणे रचलेले सुमारे दीडलाखाच्या अधिक १ लाख ५१ हजार ४९१ ओवीबध्द अभंग आहेत त्यांतील एका अभंगात ते म्हणतात,

आधी होतो तुकाराम ।
आता झालो राजाराम ।।

संत राजाराम महाराज यांची ही अभंगसाक्ष अत्यंत अर्थपूर्ण आहे. कारण अभंगातून असे 'जीवीचे गुज' अनेक संतानी सांगून ठेवलेले आहे. म्हणून तर अभंग हा आप्तेष्टा-सारखा वाटतो.

समाज, मग तो कोणत्याही भागातील, कोणत्याही भाषेतील, असो. त्याला दिशा देण्याचे महान कार्य अभंग रचनेने आजवर केलेले आहे म्हणून आपण आजही आपल्या लेखनातून, व्याख्यानातून अभंग अनेकवार आठवतो, आळवतो, त्याची अनेक संदर्भातून साक्षही देतो. 'अभंगवाणी तुकयाची' असे म्हणत वाणीचा उचित गौरवही करतो. त्यासाठी तर चिदंबर वाङ्मयप्रसार मंडळाला संतश्रेष्ठ राजाराम महाराज यांच्या मौलिक अभंग गाथांच्या संरक्षणाचा ध्यास घ्यावासा वाटला, त्यांतूनच प्रस्तुत ग्रंथ प्रकाशनाची प्रेरणा त्यांना लाभली अन् ईशकृपेने त्यांच्या हिमालयाएवढ्या उंच अन् विशाल आकांक्षांची पूर्ती होण्याचा अमृतयोग त्यांना याचि देही याचि डोळा बघायला मिळत आहे, ही देखील समाजाला मिळणारी एक उदंड प्रेरणाच आहे.

'सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी' असा या चिदंबर राजाराम भक्तांच्या अंतरीचा भाव, त्यांत त्यांच्यातील काहींना स्वप्नदृष्टान्तातून लाभलेल्या कार्यप्रेरणा आणि कर्नाटक राज्यातील-शासकीय सेवेत असणार्या सद्भक्तांच्या ह्रदयीचा श्रध्दाभक्तिभाव किती मोठे सामर्थ्य पणाला लावून संकल्पसिध्दी करु शकतो, याची कलियुगातील ही प्रचीतीही अनेकांना प्रेरक ठरावी अशीच आहे.

संतशिरोमणी राजारामांनी रचलेल्या लाखाहून अधिक अभंगांचे मराठीतून कानडी भाषिकांनी पुनर्लेखन कार्य करुन घेणे, त्याचे मराठी अर्थ न बदलता कानडी लिपीमध्ये पुनर्लेखन कार्य करुन घेणे, शिवाय संगणक डिस्क तयार करणे, मूळ ग्रंथाचे प्रत्येक पान लॅमिनेशन करवून बायडिंग करविणे अशा अत्यंत यथार्थ उद्देशाने कार्यपूर्ती करणे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखे कठीण कार्य. आणि त्यांत सर्वसामान्य आर्थिक परिस्थितीतील मूठभर लोकांनी केवळ सद्भाव बळावर ते प्रत्यक्ष पार पाडणे त्याहून कठीण. परंतु 'सत्य संकल्पाचा दाता नारायण' म्हणतात ते खरे.

'दोन पिढ्यांपूर्वी गंगा बाबुळगावाहून बाहेर गेलेले राजाराम विरचित अभंग गाथांची काही बाडे, कागदपत्रे श्री रामचंद्र कुलकर्णी यांच्याकडे परत येणे, चिक्कोडी भक्तसमुहाने गंगाबाबुळगावी भक्तनिवास निर्माणनिधीतील रकमेतून उरलेला निधि या अभंगाच्या जतन कार्याला देणे, कु राजेश्रीची दैवी साथ लाभणे या सार्या घटना म्हणजे शिव चिदंबर स्वामींच्या, श्री दास राजारामांच्या दैवी लीलांची, अनुपम सामर्थ्यांची अत्यंत बोलकी साक्षच म्हणायला हवी, रसिक वाचक ती ध्यानी घेतीलच.

श्री संत राजाराम महाराज यांच्या चरित्र अभंग गाथा प्रकाशन प्रवासाचा शुभारंभ होताना, हा जगन्नाथाचा रथ असंख्य चिदंबर, राजाराम भक्तांच्या बळावर पढत पुढती जाताना प्रस्तावनेच्या निमित्ताने का होईना माझा हात त्या रथाला लागतोय ही स्वामींचीच अन् पू. एकनाथ महाराजांची कृपा. हे भाग्य ज्यांच्यामुळे लाभले त्या चिदंबर राजाराम भक्तांची मी ऋणी राहण्यातच आनंद मानते. त्यांना शुभेच्छा देते.

ता: ७-२-२०००

डॉ.सौ. कुमुद गोसावी.
औरंगाबाद महाराष्ट्र राज्य

।। श्री शिव चिदंबरेश्वर प्रसन्नोऽस्तु ।।

श्री चिदंबर वाङ्मय संरक्षक, संशोधक प्रसार मंडळ. मुचंडी ताः बेळगांव

: संस्थेचे मनोगत :

विश्वातील दृश्यादृश्य गोष्टींच्या निर्मितीमागे कोणता तरी 'ईश्वरी संकेत'च असतोच विशिष्ट कार्यघटनेच्या योग्य त्या वेळीच त्यांची निर्मिती होते. या उक्तीनुसारच आज जवळ जवळ दोन शतकापेक्षा अधिक अवधीपर्यंत अज्ञात, हवे तेवढे लक्ष न पुरविले गेलेले परंतु दिव्य असे संत शिरोमणी, चिदंबर महास्वामींचे परमभक्त श्री राजाराम महाराज विरचित, श्री चिदंबर महास्वामींचे अवतारकार्य, चरित्र, लीला या संदर्भातील अभंग गाथांच्या प्रगटीकरणाची योग्य वेळ असल्याने त्यांच्या प्रगटीकरणाच्या हेतुस्तव आमच्या या 'श्री चिदंबर वाङ्मय संरक्षक, संशोधक, प्रसार मंडळाचा' उदय झाला. हा देखील एक दिव्य 'ईश्वरी संकेत'च म्हटल्यास कांही वावगे ठरणार नाहीं.

कोणत्याही निर्मितीमागे कोणतीतरी 'प्रेरक शक्ती' असतेच. त्याचप्रमाणें आमच्या या उपरोल्लेखित मंडळाच्या निर्मितीमागे 'श्री चिदंबर सेवा समिती चिक्कोडी' ही प्रेरकशक्ती ठरली, हे आग्रहाने सांगावे लागेल. तसेंच या संस्थेच्या कार्यप्रवृत्तीचा मुळ पाया म्हणजे चिदंबर महास्वामींचे संतभक्त श्री सांब हणमशेट (सांब मामा) यांच्या-कडील त्यानी स्वतः नक्कल केलेले, कांही मूळ गाथा व इतर कांहीं चिदंबरवाङ्मय महास्वामींच्या प्रेरणेने उपलब्ध होउन, श्री साबमामांचे समकालीन चिदंबर संतभक्त श्री (मुचंडी मामा) यांचे नातु श्री रामचंद्र वामनराव कुलकर्णी मुचंडी यांना झालेल्या स्वामी दृष्टांतानुसार त्यांच्यापर्यंत येउन पोहोंचले. ईश्वरी प्रेरणेने व पुर्व पुण्याईने सहज उपलब्ध झालेल्या या दुर्लभ साहित्याच्या बाबतीतील श्री चिदंबर सेवा समिती चिक्कोडीशी झालेल्या विचार-विनिमयानुसार या साहित्याचे संरक्षण, प्रसार या कल्पनेच्या उदयातुन आमच्या या श्री चिदंबर वाङ्मय, संरक्षक, संशोधक, प्रसार मंडळाचा जन्म झाला. या संस्थेचे नामकरण राष्ट्रपती पदक विजेते संस्कृत पंडित वेदमुर्ती परम पूज्य श्री अरविंद दिक्षीत ईनामदार यांच्या शुभाशिर्वादाने झाले आहे. या उपक्रमाची इतक्या निकडीची गरज भासणेस, श्री चिदंबर सेवा समिती चिक्कोडीच्या सभासदानीं प्रत्यक्ष पाहिलेली या संत शिरोमणी राजाराम विरचित अभंग गाथा वाङ्मयाची दयनीय परिस्थिती कारणीभुत ठरली. त्या श्रीक्षेत्राची (बाभुळगांव गंगा) दुर्गमता, ह्या क्षेत्री येणार्या भाविक भक्तांच्या निवासाची भासणारी अनानुकुलता, इत्यादी गोष्टी प्रत्यक्ष पाहुन, आपण या बाबातीत कांहींतरी केले पाहिजे हा विचार प्रकर्षाने मनास्थित झाल्यानें, त्या दिशेने वाङ्मय संरक्षणासाठी सन् १९९१ मध्ये दोन 'स्टील कपाटे', श्री क्षेत्री येणेस सुलभतेच्या दृष्टीने तालुका स्थळ वैजापुर ते श्री क्षेत्र असा पक्का मार्ग, त्या मध्ये येणारे पूल, श्री क्षेत्री येणार्या भक्तांच्या निवासासाठी सन् १९९४-९५ ठश्री चिदंबर राजाराम भक्त निवासठ नामक सिमेंट कॉंक्रीटच्या भक्त निवासाची निर्मिती एवढ्या अवाढव्य कार्यास प्रारंभ करुन महास्वामी कृपेने यशस्वीरित्या पुर्णत्वास नेले.

अशा प्रत्यक्षानुभवी 'श्री चिदंबर सेवा समिती' चिक्कोडीच्या अमुल्य सहकार्याने व प्रत्यक्ष सहभागानें आमच्या या नवजात संस्थेच्या कार्यास प्रेरणा मिळून संस्था कार्यरत झाली व कार्य खूपच प्रगतीपथावर आहे.

या सस्थेचे कार्य सद्भक्तांच्या भरीव आर्थिक तसेंच संस्थेस आवश्यक असणार्या इतर वस्तुरुप सहकार्यानें चालले आहे. या संस्थेच्या कार्यामध्यें थोडकी उणीव भासू लागली, ती म्हणजे, या जुन्या मराठी भाषेमध्ये असणार्या, आकलनास कठीण अशा अंभगांचे, सांप्रत पिढीतील सद्भक्ताना सहज आकलन होईल अशा तर्हेने, पुनर्लेखन करणार्या व्यक्तींची व ही उणीव देखील प्रत्यक्ष श्री चिदंबर महास्वामींच्या प्रेरणेने दूर झाली.

हे ठासून सांगण्याचे कारण म्हणजे, आम्हां लोकांचा सहजासहजी विश्वास बसणार नाहीं अशी प्रत्यक्ष घडलेली घटना. हे सर्व पुर्वपुण्याईनेंच साधू शकते. हेच उदाहरण सध्या आपल्या नजरेसमोर आहे. विश्वास ठेवणे भाग पडते.

सद्भक्त संत श्री मुचंडी मामा यांचे नातु, श्री रामचंद्र वामनराव कुलकर्णी मुचंडी यांची किशोरी कु राजश्री रामचंद्र कुलकर्णी, वय वर्ष १७ शिक्षण S.S.L.C. पयैत कन्नड मातृभाषी, मराठी भाषेचा थोडासाही गंध नसलेली अशी. तिला आलिकडेच एक अद्भुत अशी 'ईश्वरी देणगी' प्राप्त झालेली आहे. ही थोडक्या प्रयत्नांती अस्खलितपणे या अभंगगाथांची मराठी भाषा वाचू शकते, लिहु शकते. या खेरीज इतर काहीं मराठी वाङ्मय ती जाणु शकत नाहीं. तसेंच कॉम्प्युटरज्ञान व कॉम्प्युटरमशीन याचे आजिबात ज्ञान नसणारी अशी ही 'राजश्री' सुलभतेने कॉंपुटर हाताळु शकते. अभंगांचे पुनर्लेखित मराठी हस्तलिखित कॉम्प्युटरमध्ये समाविष्ट करू शकते.

या अद्भुत घटनेस 'ईश्वरी देणगी' शिवाय अन्य कोणती संज्ञा देता येईल? ही सर्व ईश्वरीवरदहस्त घराण्याची पुर्वपुण्याईच. या घटनेमुळे संस्थेची फार मोठी उणीव दूर झालेली आहे. आमच्या या संस्थेच्या कार्यास महान विभुतींचे शुभशीर्वाद लाभले आहेत. उदा. श्री चिदंबर मूलमहाक्षेत्र मूलमाहापीठ केंगेरीचे पीठाधिकारी प.पु. ब्रम्हश्री श्री शंकर दिक्षीत दिवाकर दिक्षीत ईनामदार, तसेच समस्त दिक्षीत वंशज, सावंतवाडी येथील प्रख्यात सराफ व्यवसायी नाथपथी असीम दत्तभक्त, श्री. प्रभाकर. आर.मसुरकर, तसेच अन्य वयोवृध्द, तपोवृध्द व ज्ञानवृध्द अशा व्यक्ती. यांच्या सारख्यांच्या आशिर्वादांच्या सामर्थ्यानें आमच्या संस्थेचे स्वीकृत कार्य सुकरतेनें चालले आहे. आजपर्यंत गाथांचे पुनर्लेखन व कॉंप्युटर प्रतीचे कार्य खूपच प्रगतीपथावर आहे. आणि त्यांतील चरित्र अभग गाथेचे प्रकाशनाचे भाग्य आमच्या संस्थेस लाभत आहे. हे संस्थेस अत्यंत आभिमानास्पद असे आहे. तसेच गाथांचे मूळ स्थान {बाभुळगांव गांगा} येथील काही गाथा संस्थेचे कार्य पूर्ण जाणून घेउन संस्थेच्या स्वीकृत कार्यासाठीं लभ्य झालेल्या आहेत व तसेच येथुन अन्यत्र गेलेल्या कांही गाथा परत मिळवण्यात संस्था यशस्वी झालेली आहे.या सर्व मूळ गाथांचे पुनर्लेखन, मूळ गाथेच्या प्रत्येक पानाचे लॅमिनेशन, पुनर्बांधणी करुन या मूळ गाथा अभंग क्रमांक १३०१७२ मध्ये उल्लेख केल्यानुसार गाथांच्या मूलग्रामी म्हणजेच 'श्री क्षेत्र बाभुळगांव गंगा' येथे सुरक्षितपणे नेऊन ठेवण्याचा संस्थेचा उद्देश आहे. या आमच्या संस्थेच्या कार्यामध्यें. संत शिरोमणी श्री राजाराम महाराजांचे वंशज श्री परदेसी बंधु यांचे अत्यंत अमोल असे सहकार्य लाभले आहे.

असा हा आमचा मंडळ कार्यरुपी जगन्नाथाचा रथ ज्ञात अज्ञात अशा असंख्य हातानीं ओढला जाऊन कार्यपूर्तीच्या दिशेने वाटचाल करुन ध्येयपूर्तीप्रत येऊन पोहोंचला आहे.

आमच्या मंडळाच्या या चरित्र अभंग गाथेच्या प्रकाशन कार्याच्या ध्येयपूर्तीच्या वाटचालीत उपरोल्लेखित सद्भक्त व अन्य मंडळाच्या हितैषी सद्भक्तांच्या मंडळास लाभलेल्या बहुमोल सहकार्या बद्दल मंडळ या समस्त सद्भक्तांचे आभारी आहे.व त्यांच्या या अनुपमेय सहकार्याबद्दल समस्त सद्भक्ताप्रती कृतज्ञता व्यक्त करणें हे मंडळाचे आद्यकर्तव्य आहे.

श्री चिदंबर महास्वामी चरणीं मंडळाची हीच प्रार्थना कीं या समस्त ज्ञात अज्ञात सद्भक्त मंडळीच्या कुटुंबावर महास्वामींची सदैव कृपादृष्टी राहून वंशपरंपरागत स्वामि भक्ती वाढीस लागून समस्त सद्भक्त मंडळीचे महास्वामी कृपाशीर्षादानें आयुरारोग्यैश्वर्यादि सकल समृध्दि प्राप्त होऊन उत्तरोत्तर उत्कर्ष होऊन सर्वतोपरी कल्याण व्हावे.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।।
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ।।

।।शुभं-भवंतु।।

N. C. DESAI
'BALAKRISHNA' 82 SILVER TOWN
Gokul Road HUBLI-580030 ✆ 33322

माझे मनोगत

'चिदंबर नाम घ्यावे पुढें पाऊल टाकावें'

प्रत्येकाच्या जीवनात कधी कधी तरी योग घडून येतो त्या प्रमाणे माझ्या जीवनात योगायोगातील एक घटना घडून आली. श्री चिदंबर वाङ्मय संरक्षक,संशोधक, प्रसार मंडळाची माहिती वर्तमानपत्रातून मी वाचली. त्यांची भेट व्हावी ही इच्छा केली. त्याप्रमाणे लौकरच त्यांची भेटही घडून आली. हा एक योगच होय. मला चिदंबर वाङ्मय अभ्यास करण्याची इच्छा होती. गेल्या कांहीं वर्षात थोडेफार वाङ्मय अभ्यास करण्यास मिळाले होते. या मागील अभ्यासामुळे इच्छा थोर झाली की, १५१४९१ अभंग आहेत ते सर्व एक वेळ तरी दृष्टीखालून घालावे ही इच्छा पुरी करण्याचे वचन मला मंडळाच्या सभासदानी दिले. मंडळाचे कार्य असे की, मूळ गाथा जुन्या जीर्ण होत आहेत. तेव्हां प्रत्येक पानाचे लॅमिनेशनव्दारा संरक्षण करावे. तसे कार्य वेगाने चालू आहे. लॅमिनेशन केलेल्या गाथा मला अभ्यासासाठी मिळत आहेत. मंडळाच्या सौजन्याने माझी इच्छा पुरी होत आहे. मंडळानी चिदंबर चरित्रगाथा प्रसिध्द करण्याचे ठरवून त्या प्रमाणे कार्य सुरु आहे तरी ते कार्य त्यांच्या हातून सर्वतोपरी उत्तम रितीने पार पाडले जावे म्हणून, मी श्री चिदंबरेश्वर गुरु माऊली पांडुरंग महाराजांचे चरणी प्रार्थना करुन निवेदन संपवितो.

दिनांकः १२-२-२०००

पांडुरंग गिंडे
१२१० सराफगल्ली शहापूर
बेळगांव ५९० ००३

कृतज्ञता

श्री चिदंबर वाड्मय संरक्षक,संशोधक, प्रसार मंडळाचे स्वीकृत कार्य हे फक्त मंडळाद्वारेंच खूपच प्रगतिपथावर मार्गक्रमणा करीत आहे असे नसून मंडळाच्या कार्यात अन्य अनेक, चिदंबर महास्वामीभक्त तसेंच मंडळाच्या कार्याबद्दल मनःपूर्वक आस्था बाळगणार्या, व्यक्तींच्या अमोल अशा सहकार्याचा सिंहाचा वाटा आहे. अशांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे मंडळाचे आद्यकर्तव्य ठरते.

श्री गिरीश वाघ B.Sc., L.L.M प्रोफेसर आर.एल्.लॉ कॉलेज बेळगांव यांचा अग्रक्रमाने उल्लेख करावाच लागेल. मंडळाच्या सभासदाइतक्या आस्थेनेंच मंडळाच्या कार्यामध्ये लक्ष घालून स्वामी सेवा या ध्येयाने प्रेरित होउन, मंडळास अनभिज्ञ असे सर्वस्वी इंग्लीश भाषेवर कार्यरत आसणार्या कॉम्प्युटरवर मराठी भाषेतील अभंग कसे संग्रहीत करावेत. हा प्रारंभीचा बहुमोल सल्ला व प्रत्यक्ष कर्यातील सहभाग, तसेंच कॉम्प्युटरच्या बाबतीत वारंवार येणार्या अनेक अडचणीचे वेळी योग्य मार्गदर्शन. या गाथांची कन्नड भाषेतील प्रत तयार करण्याच्या मंडळाच्या इच्छेची पूर्तता, प्रत्यक्ष प्रिटींगच्या पूर्वीच्या 'लेजर प्रिंट' पर्यंतचे आवश्यक ते सहकार्य व प्रत्यक्ष सहभागी होउन मंडळास उपकृत करुन ठेवले आहे. आणि तेही कोणतीही अपेक्षा न बाळगता विनामूल्य असे. या त्यांच्या मंडळाच्या कार्यातील सहकार्य व सहभागा बद्दल मंडल त्यांचे सदैव ऋणी राहील. श्री चिदंबर महास्वामींची क्रपादृष्टी सदैव त्यांच्या कुटुंबावर राहून उत्तरोत्तर त्यांची वैभवसंपन्नता वृध्दिंगत व्हावी हीच मंडळाची सदिच्छा व स्वामी चरणी प्रार्थना.

डॉ.सौ. कुमुदताई गोसावी एम ए पी एच.डी औरंगाबाद महाराष्ट्र राज्य यांच्या सांरख्या सार्या वाङ्मय प्रकारातील गाढ व्यासंगी,विदुषीने पूर्व परिचय नसताना देखील, हत्तरगी येथील श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळयामध्यील अल्प भेटीमध्ये मंडळाच्या कार्याची माहिती, ईश्वरी संकेत व मंडळाची इच्छा हे सर्व जाणून घेऊन स्वयं-प्रेरणेने 'महाद्वारी' शीर्षकानें मंडळाची 'हिमालया एवढी उंच आकांक्षा' मंडळाचे कार्य म्हणजे जंणू 'शिवधनुष्य पेलण्यासारखें' अशा शब्दांत मंडळाच्या कार्याचा मोठा गौरव करुन, असंख्य हातानीं ओढल्या जाणार्या 'जगन्नाथाच्या रथाचें प्रतिक' ठरवून 'महाद्वारी' या प्रस्तावनेच्या संदर्भात विनयानें आपलाही हात या जगन्नाथाच्या रथाला लागतोय हें महाभाग्यच असा उल्लेख करुन मंडळाच्या स्वीकृत कार्यास अधिक प्रोत्साहित केले आहे.

श्री चिदंबर व्ही. जोशी बेंगळूर यांनी मंडळाच्या कार्याची दखल घेउन,मंडळाच्या विनंतीवरुन कार्यास्तव उदार अतःकरणानें आपल्या कडील एक कॉंप्यूटर देउन मंडळास उपकृत करुने ठेवले आहे.

तसेच श्री नारायण शामराव बेन्नूरकर (I.C.I.C.I) मुंबई यांनी देखील मंडळाचे कार्य व निकडीची गरज जाणून घेउन स्वयंप्रेरणेने आपल्याकडिल एक कॉंप्यूटर,प्रिंटर,कॉंप्यूटर टेबल,रोटेटींग ऑफिस चेअर व इतर आवश्यक कांही सामुग्री मंडळ कार्यास देऊन भरीव सहकार्य केले आहे. या त्यांच्या सहकार्याने संस्थेचे कार्य आधिक सुकर बनून जलद गतीने प्रगतीपथ क्रमीत आहे.

श्री किसन फकिरा चौगुले बुक बांइडर कडोलकर गल्ली बेळगांव यानीं मूळ गाथांच्या लॅमिनेटेड पानास कांहींही धक्का न लावता कोणताही शब्द बाइंडींग मध्ये लपला जाणार नाही अशा कत्पकतेने गाथांचे आकर्षक रित्या विनामुल्य बाइंडींग करुन देऊन मंडळाच्या कार्यात आपलाही सहभाग दर्शविला आहे. हेच कार्य श्री सुरज प्रिंटर्स बेळगांगयानीं पुढे चालू ठेवून मंडळास सहकार्य दिले आहे.

श्री एल्. एम् शानभाग, श्री प्रिंटर्सचे मालक, भाग्यनगर बेळगांव यानीं अल्पावधींतच गाथा प्रतीच्या सुबक अश्या ऑफसेट प्रिंटींग प्रती तयार करुन दिल्याने गाथा प्रकाशनाचें कामीं त्यांचे मोलाचे सहकार्य मंडळास लाभले आहे.

श्री पांडुरंग गिंडे, सराफ गल्ली शहापूर व श्री सांबा कलघटगी बेळगांव यांचे नातू परिवाराने आपल्याकडील मूळ अभंग गाथा मंडळाच्या वाङ्मय प्रसार कार्यास उदार अतःकरणानें देउन मंखळास ऋणी करुन ठेवले आहे. तसेंच मंडळाच्या कार्याची प्रेरणा व स्फूर्तिस्थान म्हणुन श्री सांब हणमशेट (सांब मामा) यांच्या नातु परिवाराकडील, श्री सांब मामानी जिवापाड जतन करुन,ठेवलेल्या कांही मूळ अभंग गाथा व त्यानीं नक्कल करुन ठेवलेले अभंग वाङ्मय व इतर कांही वाङ्मय साहीत्य महास्वामी प्रेरणेनेंच प्राप्त होऊन त्यांतूनच मंडळ उदयास आले.

श्री प्रमोद जहागीरदार (पडगानूर ता सिंदगी) यानीं कॉंप्यूटर सॉफ्टवेअर कार्यात वारंवार येणार्या अडीअडचणी तत्परतेनें स्वतः जातीनें येवुन विनामूल्य निवारण करुन मंडळास आपल्या कॉंप्यूटर ज्ञानाचा पुरेपूर लाभ मिळवून दिला.

श्री राकेश व राहुल कवीश्वर या बंधुव्दयानी मंडळाच्या कार्याची गरज जाणून मंडळाच्या कार्यासाठी गरजेनुसार उदार अतःकरणाने आपल्याकडील कॉंप्युटर देऊन, गाथांच्या झेराक्स प्रती तयार करण्याच्या विचाराऐवजी इंग्लीश भाषेच्या कॉंप्यूटरवर मराठी अभंग संग्रहीत करण्याच्या किमयेची पुर्णपणें कल्पना देऊन वारंवार बहुमुल्य असा सल्ला देऊन, मंडळाच्या गाथा प्रकाशनाच्या कार्यास हातभार लावला आहे.

तसेंच श्री चिदंबर सेवा समिती चिक्कोडी यांच्या श्री क्षेत्र बाबुळगांव गंगा येथील कार्यामध्ये गावातील प्रतिष्टित व्यक्ती व ग्रामस्थ यांचे अजोड असे सहकार्य लाभले आहे. यास्तव उभय संस्था वैजापूरचे श्री ठोमरे काका, इतर ग्रामस्थ श्री क्षेत्र बाभुळगांव गंगा व श्री परदेसी बंधु यांचे सदैव ऋणी आहेत. तसेंच आमच्या या संस्थेच्या कार्यास लाभलेल्या आर्थिक तसेच अन्य अत्यावश्यक साधनसामग्रीच्या स्वरुपांतील सहकार्यास्तव संस्था सद्भक्तांची आभारी आहे.

सदरी मूळ गाथांच्या पुनर्लेखन कामी मूळ गाथातील प्राचीन मराठी भाषेतील शब्द जसेच्या तसे {त्यातील काना, मात्रा, ह्रस्व, दीर्घ व शब्द रचनेत कांहीही बदल न करता} लिहिले असल्याने अर्वाचीन मराठी भाषेच्या दृष्टीनें विसंगत वाटण्याची शक्यता आहे. हा लेखन दोष नव्हे हे कृपया ध्यानी घ्यावे. हस्त लिखितांच्या पुनर्तपासणी नंतरच्या मुद्रणप्रतीमध्ये जे कांही हस्तदोष, नजर दोषाने चूका आढळून आल्यास तो दोषारोप मूळ गाथेचा नसून आम्हा संस्थेच्या अज्ञ सभासदाचा, हे कृपया ध्यानी असू द्यावे. तसेच या गाथा मुद्रणाचे सारे श्रेय संत शिरोमणी श्री राजाराम महाराज यांचेप्रती.

करिता समस्त सद्भक्त मंडळीनी याची नोंद घेउन, संस्थेस शुभाशीष देउन, कार्यास आधिक प्रोत्साहित करावे हीच मंडळाची अपेक्षा. मंडळाची ही अपेक्षा समस्त भक्तमंडळीकडुन पूर्ण फलद्रुप होउन संस्था अधिक जोमानें कार्यप्रवृत्त होईल. हे नम्रतेने नमूद करुन संस्थेचे हे कार्य श्री चिदंबर स्वामींचे चरणी समर्पण करीत आहोत.

चिदंबर महास्वामी कृपाभुकाषी
श्री चिदंबर वाङ्मय संरक्षक, संशोधक,प्रसार मंडळ मुचंडी ताः बेळगांव
कार्यकारी मंडळाचे सदस्य

श्री.डी.एम्.गोकाक {करवीर}
कार्याध्यक्ष आणि संयोजक

श्री.बि.एस्. कुलकर्णी
(अध्यक्ष)

श्री आर्.व्ही.कुलकर्णी
(उपादध्यक्ष)

श्री.पी.एस्.बेन्नूरकर
(सेक्रेटरी)

श्री.सी.व्ही.जोशी
(निर्देशक)

श्री.नीलकंठ दिक्षीत
(निर्देशक)

डॉ. सी. एम्. कुलकर्णी
(निर्देशक)

सौ.कांचन.पी.बेन्नूरकर
(निर्देशक)

श्री.के.सी.कवीश्वर
(निर्देशक)

।। श्री शिव चिदंबर प्रसन्न ।।

चरित्रअभंगानुक्रम

।। औदुंबरनिवासी भक्ताभिमानी ।।

।। राजाधिराज श्री शिव चिदंबरेश्वर महाराज की जय ।।

।। श्री शिव चिदंबर प्रसन्न ।।

स्वामीदरुषणासी येताक्षणी जाण । करीती सन्मान बहुत स्वामी ।।१।।
चीदंबर सांगे थोर थोरालागी । ब्राम्हण तो योगी तपस्वी हा ।।२।।
घेवोनी दरुषण येत ब्रीर्हाडासी । पंच्याग्नी तपासी आचरावे ।।३।।
दास म्हणे बैसे सीतकाळी पाण्यात । राहे प्रजन्यात च्यातुर्मासी ।।४।।

१२७१७६

ऐसे तप करी ब्राम्हण तो थोर । होता साक्षाकार देवीचा तो ।।१।।
द्रष्टांती ते देवी बोलतसे ज्यासी । मानस पुजेसी बैसे नीत्य ।।२।।
सन्मुख ते देवी बैसवोनी जाण । पुजी तो ब्राम्हण येक्याभावे ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । स्वामी चीदंबर प्रगटे तेथे ।।४।।

१२७१७७

बैसे तो ब्राम्हण नीत्य पुजेलागी । चीदंबर वेगी जाय तेथे ।।१।।
बैसोनीया वीप्र देवी पुजीतसे । लाते सारीतसे स्वामी तीसी ।।२।।
लात मारोनीया देवी येकी कडे । स्वामी बैसे पुढे ब्राम्हणाच्या ।।३।।
दास म्हणे वीप्र नवल करी चीती । बळे हेची मुर्ती प्रगटती ।।४।।

१२७१७८

चीदंबर नीत्य ब्राम्हणाचे पुढे । बैसे येकीकडे करोनी देवी ।।१।।
गुंडी हाती धरोनी भस्म ते लावोनी । दीव्य तेजे करोनी प्रगट तेथे ।।२।।
लात मारोनीया देवी येकीकडे । आपण बैसे पुढे ब्राम्हणाच्या ।।३।।
दास म्हणे देवी जोडोनीया कर । उभी राहे दुर धाके करुनी ।।४।।

१२७१७९

नवल ब्राम्हणासी वाटतसे थोर । नीत्य चीदंबर येतो कैसा ।।१।।
उपासना देवी पुजीतो मी चीती । मांडीली फजीती देवीची हे ।।२।।
काय करु माझा न चले उपाये । नीत्य येतो पाहे चीदंबर ।।३।।
दास म्हणे वीप्र लाजोनीया मना । गेली उपासना माझी म्हणे ।।४।।

१२७१८०

वीप्र म्हणे कैसा करु मी वीच्यार । बळे चीदंबर प्रगटतसे ।।१।।
देवी देवालागी त्रैलोक्यासी धणी । प्रगट हा जनी चीदंबर ।।२।।
सत्य आवतार कलयुगी जाण । स्वामी ब्रम्हपुर्ण चीदंबर ।।३।।
दास म्हणे चीती नीश्चय कळला । ब्राम्हण तो आला दरुषणासी ।।४।।

१२७१८१

ब्राम्हणाचे नाव हणुमंत आवधानी । दरुषणा लागोनी नीत्य यावे ।।१।।
चीदंबरा पुढे उभाराहोनी जाण । साष्टांग नमोन स्तवन करी ।।२।।
चीदंबर स्वामी स्तुती करीती त्याची । नीष्टा ब्राम्हणाची बहुत आसे ।।३।।
ग़स म्हणे स्वामी सांगती सर्वासी । ब्राम्हण तपासी आचरे बहुत ।।४।।
१२७१८२

ब्राम्हण तो म्हणे कैचे माझे तप । देवाचा तु बाप प्रगट होसी ।।१।।
बळे देवीलागी मारोनीया लात । सन्मुख बैसत पुढे माझ्या ।।२।।
सर्वाच्या देखता उघड बोलतसे । चीदंबरा कैसे कौतुक हे ।।३।।
दास म्हणे वीप्र प्रगट ईश्वरा । सगुण चीदंबरा जालासी तु ।।४।।
१२७१८३

हासोनीया बोले चीदंबर त्यासी । आधटीत बोलसी कैसे हेची ।।१।।
सर्वाचे देखता नवल सांगे वीप्र । सत्ता सर्वावर स्वामी तुझी ।।२।।
उपासना कैसी सांगे करु आता । बोले तु भगवंता चीदंबरा ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती तयासी । द्रष्टांती तुजसी कळेत मात ।।४।।
१२७१८४

ते रात्री द्रष्टांत जाला वीप्रालागी । चीदंबर वेगी येवोनी सांगे ।।१।।
त्रैलोक्याचा धणी मीच आसे येक । देवादीका देख धाक माझा ।।२।।
का रे आझोनीया भ्रांती हे तुजसी । कैसा नोळखसी मज आझोनी ।।३।।
दास म्हणे वीप्र जाला सग्ददीत । होसी मुर्तीमंत चीदंबरा ।।४।।

१२७१८५

येवोनीया ऐसे सांगे प्राथकाळी । उभे स्वामी जवळ मंडळीत ।।१।।
बळे चीदंबरा लावीले भक्तीसी । मज पतीतासी उत्धरीले ।।२।।
देवोनी नीरोप स्वामीनी तयासी । लावीला भक्तीसी ब्राम्हण तो ।।३।।
दास म्हणे ऐसा लीला आवतार । स्वामी चीदंबर कलयुगी ।।४।।

१२७१८६

चरीत्र ५

पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चीदंबर ।।१।।
नाना लीला करीतसे । मुर्खा भ्रांती पडतसे ।।२।।
सावकार दुरदेसी । आला स्वामी दरुषणासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । महारोग होता त्यास ।।४।।

१२७१८७

सावकार द्रव्यवान । रोगे पीडीलासे जाण ।।१।।
शरीर जाले आसे क्षीण । सीणला वैद्य वाणी करोन ।।२।।
नाना केले ते उपाये । परी रोग तो न जाये ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कीर्ती ऐकीली ते फार ।।४।।

१२७१८८

आला स्वामीचे दरुषणा । कुटंबसहीत तो जाणा ।।१।।
करी वीनंती स्वामीसी । रोगे पीडीलो देह्यासी ।।२।।
क्रपा करी चीदंबरा । स्वामी देयेच्या सागरा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती तयास ।।४।।

१२७१८९

नीत्य जावोनीया जाणा । करी स्वामीसी प्रार्थना ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । माझी आज्ञा आयकसी ।।२।।
तरीच बरा होसी आता । सोडी सोडी बा आहंता ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया सांगती नीर्धार ।।४।।

१२७१९०

म्हणे सावकार स्वामी । आज्ञा करा मज तुम्ही ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । भीक्षा मागोनी खायासी ।।२।।
माधोकरी सात दीवस । सांगीतले उभयतास ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आज्ञा न माने तयास ।।४।।

१२७१९१

म्हणे मी थोर सावकार । लोकामाजी मान्य थोर ।।१।।
हे तो न घडे मज जाण । सांग ब्राम्हणभोजन ।।२।।
दहा सहस्त्र भोजन । सांगा स्वामी तीतुके करीन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी न करी उत्तर ।।४।।

१२७१९२

वीनवी सावकार जाण । सांगा स्वामी क्रपा करुण ।।१।।
लक्ष भोजन करीन । भीक्षा न मागवे जाण ।।२।।
नायकती चीदंबर । म्हणती आपा तुम्ही थोर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दील्हा नीरोप तयास ।।४।।

१२७१९३

तुज मान्य जाले जरी । तरी मागे माधोकरी ।।१।।
नाही तरी जावे घरा । आज्ञा दील्ही सावकारा ।।२।।
नीरोप घेवोनीया जाण । धरी गेला तो ब्राम्हण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न ये वीश्वास तयास ।।४।।

१२७१९४

घरी जावोनीया जाण । बहुत करवी आनुष्टान ।।१।।
देवी जाग्रत ते होती । गेला तया गावाप्रती ।।२।।
देवीपासी राहे जाण । नीत्य ब्राम्हणभोजन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । धर्म करी बहुतास ।।४।।

१२७१९५

शेंभर ब्राम्हण ते जाणा । बैसवीले अनुष्टाना ।।१।।
आडीच वर्षे त्यासी जाले । लक्ष भोजन करवीले ।।२।।
राहीला तो देवीपासी । देवी स्वप्नी सांगे त्यासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । देवी सांगे ब्राम्हणास ।।४।।

१२७१९६

स्वाप्नी येवोनीया जाणा । देवी सांगे त्या ब्राम्हणा ।।१।।
अनुष्टान बहुत केले । आडीच वर्षे तुज जाले ।।२।।
नाना करी तु उपाये । परी रोग तो न जाये ।।३।।
दास म्हणे चीदंबर । देवी सांगती नीर्धार ।।४।।

१२७१९७

देवी म्हणे ब्राम्हणासी । जावे चीदंबरापासी ।।१।।
आसे त्रैलोक्याचा धणी । त्याची आगाध करणी ।।२।।
आज्ञा उलंधोनी जाण । येथे करीसी आनुष्टान ।।३।।
म्हणे चीदंबर दास । देवी सांगे त्या वीप्रास ।।४।।

१२७१९८

चीदंबरे आज्ञा केली । भीक्षा तुज सांगीतली ।।१।।
त्याचे आज्ञावीण जाण । न हाले वृक्षाचे ते पान ।।२।।
त्याची आज्ञा उलंघन । कैसा बरा होसी जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जावे म्हणे दरुषणास ।।४।।

१२७१९९

प्रस्तावोनी तो ब्राम्हण । व्यर्थ गेले आनुष्टान ।।१।।
पुन्हा आला स्वामीपासी । लोटांगण चरणासी ।।२।।
म्हणे स्वामी चीदंबरा । आपराधी मी तो खरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया न बोले उत्तर ।।४।।

१२७२००

आक्रंदोनी सावकार । पडे स्वामीचे समोर ।।१।।
देवी देव बहुत केले । आयुष्य माझे व्रथा गेले ।।२।।
सर्व देवाचा तु धणी । देवी सांगे मज स्वप्नी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करुणा आली ते स्वामीस ।।४।।

१२७२०१

वीप्र स्वामीलागी म्हणे । आज्ञा मजसी करणे ।।१।।
लज्या सर्वही सोडोन । माधोकरी मी मागीन ।।२।।
मग स्वामी बोले त्यासी । थोर सावकार होसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करी हासोन उत्तर ।।४।।

१२७२०२

आज्ञा ऐकतो म्हणोनी । वीप्र येतो लोटांगणी ।।१।।
स्त्री पुरुष उभयतास । माधोकरी येक्वीस दीवस ।।२।।
स्वामीराये सांगीतली । दोघे भीक्षीसी नीघाली ।।३।।
सात दीवस नायकीले । येक्वीस दीवस लावीले ।।४।।
म्हणे चीदंबर दास । गळीत आभीमान त्यास ।।५।।

१२७२०३

माधोकरी मगु जाता । थोर त्याचे ते मान्यता ।।१।।
बहुत धालीताती आन्न । पंगती घेतसे ब्राम्हण ।।२।।
ऐसे जाले दोन दीवस । स्वामी पुसती तयास ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सांगे वीप्र तो स्वामीस ।।४।।

१२७२०४

स्वामी म्हणती तयासी । पोट भरते भीक्षेसी ।।१।।
म्हणे सावकार जाण । पंगती घेतो मी ब्राम्हण ।।२।।
स्वामी म्हणती तया जाण । घेउ नये ते ब्राम्हण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र बोले तो स्वामीस ।।४।।

१२७२०५

बहुत आन्न तो घालीती । काय करु तयाप्रती ।।१।।
वीप्र सांगे स्वामीलागी । स्वामी म्हणती जावे वेगी ।।२।।
तेची दीवसे जाता जाण । कोन्ही न घाली त्या आन्न ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पोटा पुरते उभयतास ।।४।।

१२७२०६

ऐसी कळा ईश्वराची । खातरजमा सावकाराची ।।१।।
म्हणे देता देववीता । चीदंबर येक आता ।।२।।
धरोनी नीश्चय आंतरी । येकवीस दीवस भीक्षाकरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आरोग्य जाला सावकार ।।४।।

१२७२०७

येक्वीस दीवस जाल्यावरी । वीनंती स्वामीलागी करी ।।१।।
शुत्ध जाली माझी काया । धन्य चीदंबरराया ।।२।।
नीरोप देवोनी स्वामीनी । गेला आनंदेकरुनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२७२०८

चरीत्र ६

ब्राम्हण तो येक समुद्र बेटावरी । होती ते चाकरी फीरंग्याची ।।१।।
चाकरी करीता होता कारभार । पेच आंगावर आला त्यासी ।।२।।
आन्याई म्हणोनी घातीला कैदेत । तेथे आठवीत चीदंबरा ।।३।।
दास म्हणे धावा करीतो बंदात । कैसे करु म्हणत चीदंबरा ।।४।।

१२७२०९

कलयुगी जाला पुर्ण आवतार । स्वामी चीदंबर श्रीष्टीवरी ।।१।।
पडीलो बंदीशाळे कैदीत ईश्वरा । मज चीदंबरा सोडवावे ।।२।।
सत्य आवतार तुझा वीश्वंभरा । पावे चीदंबरा ऐशा वेळे ।।३।।
दास म्हणे धावा करीतो ब्राम्हण । जात आसे प्राण रक्षी आता ।।४।।

१२९२१०

कैद फीरंग्याची आसे आनीवार । देती गळावर तत्क्षणी ।।१।।
आठा रोजा यासी चौकसी करोन । टाकावा मारोन ऐसी म्हणती ।।२।।
तोवरी ठेवीला कोंडोनीया जाण । पडीला नीरषण बंदीशाळी ।।३।।
दास म्हणे आठवी चीदंबरालागी । स्वामीराया वेगी सोडवावे ।।४।।

१२७२११

प्राण गेल्यावीण न सोडीती जाण । आन्याई मी पुर्ण आसे त्याचा ।।१।।
सुटका नव्हे आता कदाकाळी जीवा । नीश्चयेसी देवा कळो आले ।।२।।
चीदंबरा होसी आवतार सत्य । येथे आपुले क्रत्य दावी वेगी ।।३।।
दास म्हणे येथे वाचवीता कोण । नाही तुजवीण चीदंबरा ।।४।।

१२७२१२

धावा करी वीप्र बंदीशाळेआत । होता ममईत बंदीखानी ।।१।।
चीदंबरावीण नसे दुजे ध्यान । संकट दारुण धावे स्वामी ।।२।।
ऐसेया संकटी पावे चीदंबरा । उपाय ईश्वरा सांगे काही ।।३।।
दास म्हणे जाला द्रष्टांत वीप्रासी । चीदंबर यासी सांगीतसे ।।४।।

१२७२१३

येवोनी द्रीष्टांती सांगे चीदंबर । नीघोनी सत्वर यावे वेगी ।।१।।
स्वप्नी बोले वीप्र आसे चौकी पहारा । कैसा मी ईश्वरा नीघोनी येउ ।।२।।
नग्न तलवारी उभे पाहारेकरी । द्रीष्टी पडता जरी प्राण घेती ।।३।।
दास म्हणे त्यासी सांगे चीदंबर । नीघोवे बाहेर आज्ञा माझी ।।४।।

१२७२१४

कोन्ही न पुसती यावे बा नीघोनी । चमत्कार नयनी पाहे आता ।।१।।
द्रीष्टांती हे आज्ञा ऐकोनी ब्राम्हण । व्दार काढी जाण कोठडीचे ।।२।।
कुलपा बाहेरी हात न लावीता । कुलुप न काढीता गळोनी पडे ।।३।।
दास म्हणे वीप्र नीघाला बाहेर । नाम चीदंबर जपे मुखी ।।४।।

१२७२१५

आसेनी चौकी पाहारा न पाहाती कोन्ही । वीप्र तो नीघोनी सुखे येतो ।।१।।
आला समुद्रतीरी बैसे जहाजावरी । तेथे कैद भारी फीरंग्याची ।।२।।
न पुसती कोन्ही तया वीप्रालागी । उतरोनी वेगी ऐलीकडे ।।३।।
दास म्हणे आला समुद्र उतरोनी । चीदंबर करणी आघटीत ।।४।।

१२७२१६

आला दरुषनासी चीदंबरापासी । आनंद वीप्रासी बहुत मनी ।।१।।
आनंदेकरोनी जातो लोटांगणी । म्हणे धन्य करणी चीदंबरा ।।२।।
चीदंबरे त्यासी जवळी बोलावोन । पुसे वर्तमान आदीअंत ।।३।।
सांगे तो ब्राम्हण ऐके यात्राजन । आश्चर्य करोन ऐकताती ।।४।।
धन्य चीदंबरा म्हणती लहानथोर । कलयुगी आवतार दास म्हणे ।।५।।

१२७२१७

कैद फीरंग्याची आसे आनीवार । देती गळावर तत्क्षणी ।।१।।
आठा रोजा यासी चौकसी करोन । टाकावा मारोन ऐसी म्हणती ।।२।।
तोवरी ठेवीला कोंडोनीया जाण । पडीला नीरषण बंदीशाळी ।।३।।
दास म्हणे आठवी चीदंबरालागी । स्वामीराया वेगी सोडवावे ।।४।।

१२७२११

प्राण गेल्यावीण न सोडीती जाण । आन्याई मी पुर्ण आसे त्याचा ।।१।।
सुटका नव्हे आता कदाकाळी जीवा । नीश्चयेसी देवा कळो आले ।।२।।
चीदंबरा होसी आवतार सत्य । येथे आपुले क्रत्य दावी वेगी ।।३।।
दास म्हणे येथे वाचवीता कोण । नाही तुजवीण चीदंबरा ।।४।।

१२७२१२

धावा करी वीप्र बंदीशाळेआत । होता ममईत बंदीखानी ।।१।।
चीदंबरावीण नसे दुजे ध्यान । संकट दारुण धावे स्वामी ।।२।।
ऐसेया संकटी पावे चीदंबरा । उपाय ईश्वरा सांगे काही ।।३।।
दास म्हणे जाला द्रष्टांत वीप्रासी । चीदंबर यासी सांगीतसे ।।४।।

१२७२१३

येवोनी द्रीष्टांती सांगे चीदंबर । नीघोनी सत्वर यावे वेगी ।।१।।
स्वप्नी बोले वीप्र आसे चौकी पहारा । कैसा मी ईश्वरा नीघोनी येउ ।।२।।
नग्न तलवारी उभे पाहारेकरी । द्रीष्टी पडता जरी प्राण घेती ।।३।।
दास म्हणे त्यासी सांगे चीदंबर । नीघोवे बाहेर आज्ञा माझी ।।४।।

१२७२१४

कोन्ही न पुसती यावे बा नीघोनी । चमत्कार नयनी पाहे आता ।।१।।
द्रीष्टांती हे आज्ञा ऐकोनी ब्राम्हण । व्दार काढी जाण कोठडीचे ।।२।।
कुलपा बाहेरी हात न लावीता । कुलुप न काढीता गळोनी पडे ।।३।।
दास म्हणे वीप्र नीघाला बाहेर । नाम चीदंबर जपे मुखी ।।४।।

१२७२१५

आसेनी चौकी पाहारा न पाहाती कोन्ही । वीप्र तो नीघोनी सुखे येतो ।।१।।
आला समुद्रतीरी बैसे जहाजावरी । तेथे कैद भारी फीरंग्याची ।।२।।
न पुसती कोन्ही तया वीप्रालागी । उतरोनी वेगी ऐलीकडे ।।३।।
दास म्हणे आला समुद्र उतरोनी । चीदंबर करणी आघटीत ।।४।।

१२७२१६

आला दरुषनासी चीदंबरापासी । आनंद वीप्रासी बहुत मनी ।।१।।
आनंदेकरोनी जातो लोटांगणी । म्हणे धन्य करणी चीदंबरा ।।२।।
चीदंबरे त्यासी जवळी बोलावोन । पुसे वर्तमान आदीअंत ।।३।।
सांगे तो ब्राम्हण ऐके यात्राजन । आश्चर्य करोन ऐकताती ।।४।।
धन्य चीदंबरा म्हणती लहानथोर । कलयुगी आवतार दास म्हणे ।।५।।
१२७२१७

हर्ष तो ब्राम्हंण म्हणे स्वामीराजा । वाचवीला माझा प्राण तुम्ही ।।१।।
आघटीत कळा दावोनी ईश्वरा । आणीले चीदंबरा पायापासी ।।२।।
न सोडी मी चरण राहीन पायापासी । सेवा आहीर्नीसी करोनी आता ।।३।।
दास म्हणे तया बोले चीदंबर । नीरोप सत्वर देतो तुज ।।४।।
१२७२१८

घाबरोनी वीप्र म्हणे स्वामीराजा । वाचवीला माझा प्राण तुम्ही ।।१।।
कोणीकडे आता नीरोप तो देता । मज वोळखता प्राण घेती ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी जावे त्या ठायासी । भेटावे धण्यासी आपुलीया ।।३।।
म्हणे तो ब्राम्हण पहाता घेती प्राण । आलो तुज शरण रक्षी दासा ।।४।।
१२७२१९

म्हणे स्वामीलागी कैद फीरंग्याची । माझीया प्राणाची गती काय ।।१।।
आधीच आन्याई आलो त्यात पळोन । घेतील ते प्राण पाहाता मज ।।२।।
चीदंबर म्हणे नीरोप मी देता। काळाची ते सत्ता न चले तुज ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती नीर्धार । आणीले येथवर कैसे तुज ।।४।।

१२७२२०

नीरोप मी देतो भेटोनी धण्यासी । यावे दरुषणासी फीरोनीया ।।१।।
तुझ देखताची फीरंगी ते जाण । वंदीती चरण तुझे मग ।।२।।
हर्षयुक्त करोनी आन्याय बक्षीस । तुज चाकरीसी ढेवीताती ।।३।।
दास म्हणे ऐसे ऐकोनी वचन । नीघे तो ब्राम्हण आज्ञेवरुनी ।।४।।

१२७२२१

जावोनीया तेथे भेटता धण्यासी । आश्चर्य मनासी वाटे त्याच्या ।।१।।
पुसीला व्रत्तांत सांगे आदीअंत । आश्चर्य करीत फीरंगी तो ।।२।।
धण्य चीदंबरा कळा आघटीत । टोपी तो काढीत वीप्रापुढे ।।३।।
दास म्हणे त्यासी सन्माने करोनी । घेतला ठेवोनी वीप्र जवळी ।।४।।

१२७२२२

पहील्या पेक्षा काम सांगीतले आधीक । देवोनीया देख वस्त्र तया ।।१।।
राहोनीया येक वर्षभरी जाण । नीरोप मागोन येता जाला ।।२।।
आला दरुषणासी फीरोनी ब्राम्हण । आंबे डालीभरोन गोव्याचे ते ।।३।।
दास म्हणे वीप्र चीदंबर चरणी । येतो लोटांगणी आनंदेसी ।।४।।

१२७२२३

चीदंबर त्यासी पुसती वर्तमान । सांगे तो ब्राम्हण आनंदेसी ।।१।।
धन्य चीदंबर कलयुगी आवतारा । पतीत उत्धारा स्वामीराया ।।२।।
आंबे ते घेवोनी वाटीले ब्राम्हणा । स्वामी म्हणती जाणा भक्त त्यासी ।।३।।
दास म्हणे ऐसा क्रपेचा सागर । स्वामी चीदंबरा लीला दावी ।।४।।

१२७२२४

ठेवोनी वीप्रासी आठ दीवस जाण । आनंदे करोनी नीरोप देती ।।१।।
धन्य चीदंबर पुर्ण आवतार । कळा हे वीचीत्र दावी जना ।।२।।
वीप्र आनंदेसी नीरोप घेवोनी । चींती ध्यानीमनी चीदंबर ।।३।।
दास म्हणे जवळी आम्ही त्या समयासी । नीरोप वीप्रासी दील्हा देवे ।।४।।

१२७२२५

चरीत्र ७

चीदंबर आवतार । दावी नाना चमत्कार ।।१।।
न कळे मानव मुढासी । उघड सांगे द्रीष्टांतासी ।।२।।
देवी देव तो नीर्मीता । सर्वावरी त्याची सत्ता ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी वीश्वंभर ।।४।।

१२७२२६

ब्राम्हण आसे तो भावीक । गाव सावनुर देख ।।१।।
नाव तमाणा नाईक । त्यासी दावीले कौतुक ।।२।।
वर्षाभरा दरुषणासी । येत आसे स्वामीपासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । येलम्मा कुळस्वामी त्यास ।।४।।

१२७२२७

न जाये यात्रेसी तो कदा । स्वामी सांगे त्यासी सदा ।।१।।
न करी कुळधर्म आपुला । यावे स्वामी दरुषणाला ।।२।।
स्वामी सांगी तयासी । न ये त्याचीया चीतासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय तयास ।।४।।

१२७२२८

येक्या आठा ते दीवसी । कोड जाला सर्वांगासी ।।१।।
आंग सर्व शुभ्र जाले । म्हणे मरण यावे भले ।।२।।
तोंड काय दाउ आता । लाज वाटे म्हणे चीत्ता ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आला स्वामी दरुषणास ।।४।।
१२७२२९

वीप्र म्हणे स्वामीराया । कुष्टे व्यापीलीसे काया ।।१।।
दोन च्यार दीवस जाले । स्वामी द्रीष्टीने पाहीले ।।२।।
परी न पुसती त्यासी । काय जाले शरीरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्र वीनवी वारंवार ।।४।।
१२७२३०

म्हणे चीदंबरराया । कैसी न ये माझी दया ।।१।।
माहायात्रे नीरोप देई । गावी मुख न दाखवी ।।२।।
चीदंबर म्हणे त्यासी । जावे आपुल्या घरासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आणीक न सांगती त्यास ।।४।।
१२७२३१

बोलवीले नीरोपासी । जावे म्हणती गावासी ।।१।।
वीप्र वीनवी स्वामीसी । पुढे गती माझी कैसी ।।२।।
स्वामी म्हणती जावे घरी । सांगेन तेथे गेल्यावरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे द्रीष्टांती वीचार ।।४।।

१२७२३२

नीरोप घेवोनी आला घरी । वीप्र मनी चींता करी ।।१।।
रात्री स्वामीनी येवोनी । त्यासी सांगीतले स्वप्नी ।।२।।
जावे यल्लमा देवीसी । पाच वार त्या यात्रेसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे कुळधर्म वीच्यार ।।४।।

१२७२३३

जावे पाच मंगळवार । नीट होते बा शरीर ।।१।।
ऐसे स्वप्नी चीदंबर । सांगीतले त्या प्रखर ।।२।।
वीप्र जाय यात्रेलागी । आठा दीवसे लागवेगी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पाच वार जाले त्यास ।।४।।

१२७२३४

शुत्ध जाली त्याची काया । चीती नवल त्याचीया ।।१।।
म्हणे काय चमत्कार । काया नीट वर्चेवर ।।२।।
चीदंबरी ऐसी कळा । करवी देवीचा सोहळा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । स्थापी देव लहानथोर ।।४।।

१२७२३५

कळा आपुली दावणे । येवोनी द्रीष्टांती सांगणे ।।१।।
सत्य करी स्वप्नालागी । आवतार कलयुगी ।।२।।
लीला दावी नानापरी । सांगे द्रीष्टांतामाझारी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२७२३६

चरीत्र ८

तैलंग देशीचा ब्राम्हण तो जाणा । होती उपासना नरसीव्हाची ।।१।।
नरसीव्ह मंत्राचे सामर्थे ते आंगी । छळी बहुतालागी न गणी कोन्हा ।।२।।
सामर्थे कोणाचे न चले त्याज पुढे । करीतसे वेडे मनुश्यासी ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । सामर्थे आभीमान बहुत आंगी ।।४।।

१२७२३७

नरसीव्ह मंत्राचे सामर्थे बहुत । बुत्धीभ्राउष करीत मनुश्यासी ।।१।।
वेडे खुळे करोनी टाकी मनुश्यासी । धाक त्या सर्वासी आसे त्याचा ।।२।।
आभीमान आंगी बहुत वीप्रालागी । चीदंबर जगी प्रगटला ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । कीर्ती आयकोन खवळे चीती ।।४।।

१२७२३८

श्रीष्टीवरी म्हणती जाला आवतार । स्वामी चीदंबर कलयुगी ।।१।।
कैसा आवतार पाहीन म्हणे वीप्र । क्रोधी आसे फार ब्राम्हण तो ।।२।।
जाणे ते पुण्यासी श्रीमंताचेपासी । कार्य ब्राम्हणासी आसे काही ।।३।।
दास म्हणे नीघे वीप्रतो वाटेसी । वीच्यार चीतासी करीतसे ।।४।।

१२७२३९

चीदंबर कैसा आसे आवतार । कीर्ती आसे फार जगामाझी ।।१।।
जावे त्याच्या गावावरुणी याची वेळे । आभीमानबळे क्रोध आंगी ।।२।।
चीदंबरापासी जोवोनीया जाण । कैसे देवपण पाहु त्याचे ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । येतो मार्गेकरोन मुरगोडासी ।।४।।

१२७२४०

ब्राम्हण चीतासी करीतो वीच्यार । काय चीदंबर मजपुढे ।।१।।
क्षणेमाजी खुळ लावीन मी जाण । माझे पुढे कोण ठरु सखे ।।२।।
नरसीव्ह मंत्राचे सामर्थे पै थोर । गरीब चीदंबर काय करु ।।३।।
दास म्हणे ऐसा वीप्र आभीमानी । वीच्यार तो मनी करुत चाले ।।४।।

१२७२४१

मुरगोडामाझारी स्वामी ते घरासी । सांगे जवळील्यासी मात ऐसी ।।१।।
महाक्रोधी आसे तैलंग ब्राम्हण । उपासना जाण नरसीव्हाचे ।।२।।
येतो भेटीलागी ब्राम्हण तो वेगी । त्यासी परवानसी सांगोनी ठेवा ।।३।।
दास म्हणे ऐसे सांगे चीदंबर । रक्षक ते व्दार सांगा त्यासी ।।४।।

१२७२४२

माहाव्दारी कोन्ही येईल ब्राम्हण । आंगरखा घालोन रुईभरा ।।१।।
काळे चीट आसे त्याचे आंगराख्यासी । येईल व्दारासी बोलु नये ।।२।।
येउ द्यावा सुखे वीप्र तो वाड्यात । तामसी बहुत क्रोध आंगी ।।३।।
दास म्हणे ऐसे सांगे चीदंबर । गावाचे बाहेर वीप्र आसे ।।४।।

१२७२४३

बोलत बैसले स्वामी जवळील्यासी । वीप्र ब्दारापासी आला जाण ।।१।।
ब्दारा आत येता स्वामी आले समोर । नरसीव्ह आवतार धरोनी उभे ।।२।।
देखता ब्राम्हण आपुली उपासना । नरसीव्ह तो जाणा पुढे उभा ।।३।।
दास म्हणे जाला वीप्र गर्वहात । लोटांगण येत स्वामीलागी ।।४।।

१२७२४४

माझी उपासना नव्हती मज ठावी । स्वप्नी जाली नाही भेटी ऐसी ।।१।।
प्रगट ते भेटी जाली नरसीव्हाची । ईच्छा हे मनाची पुरली माझी ।।२।।
घाली नमस्कार वीप्र वारंवार । जाला चीदंबर नरसीव्ह तो ।।३।।
दास म्हणे वीप्र साष्टांग नमीत । चीदंबर म्हणत उठे त्यासी ।।४।।

१२७२४५

कंप ब्राम्हणासी सुटलासे आंगी । उठोनीया वेगी हात जोडी ।।१।।
मुखे न बोलवे स्तवन करीत । आश्रु ते वाहात नेत्रामाजी ।।२।।
आपराधी आपराधी म्हणे चीदंबरा । क्षमा मज करा आन्याय तो ।।३।।
दास म्हणे वीप्र जाला सग्ददीत । आंग रोमांचीत घर्म दाटे ।।४।।

१२७२४६

धन्य चीदंबरा कलयुगी आवतारा । नरसीव्ह तो खरा दैवत माझे ।।१।।
गरीब ब्राम्हण म्हणे चीदंबर । वीप्रलागी म्हणे थोर तुम्ही ।।२।।
करोनी सन्मान ढेवीला ब्राम्हण । पंगतीसी भोजन करवीले ।।३।।
दास म्हणे वीप्र आज्ञा मागतसे । स्वामी म्हणतसे जावे घरा ।।४।।
१२७२४७

वीप्र म्हणतसे न जाय पुण्यासी । देखीले तुम्हासी स्वामी आता ।।१।।
नसे गरज आता राव ते रंकासी । द्रीष्टी देखीलासी चीदंबरा ।।२।।
आज्ञा जे कराल तेची मान्य आता । सांगे भगवंता वचन काही ।।३।।
दास म्हणे वीप्र जाला आज्ञाधार । बोले चीदंबर त्यासी तेव्हा ।।४।।
१२७२४८

वीप्रालागी स्वामी नीरोप ते देती । जावे घराप्रती म्हणती आता ।।१।।
घरी जाता तुझे सर्व कार्य होते । पुण्याची आगत्य काय तुज ।।२।।
चीदंबरे क्रपा करोनीया जाण । धाली लोटांगण ब्राम्हण तो ।।३।।
दास म्हणे जाय आनंदे घरासी । चीदंबरे त्यासी क्रपा केली ।।४।।
१२७२४९

चरीत्र ९

चीदंबरे धाकुटपणी । लीला दावीली स्वामीनी ।।१।।
पीता मल्हार दीक्षीत । स्वामी त्यांची सेवा करीत ।।२।।
देव पुजेचे साहीत्य । आंगे करोनीया देत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पीत्रुसेवेसी सादर ।।४।।

१२७२५०

चार पाच वेळा श्नान । नीच काम ते करोन ।।१।।
करी अस्वाची चाकरी । श्नानालागी पाणी सारी ।।२।।
पुजा घेतो त्रैलोक्याची । सेवा करीतो पीत्याची ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी वीश्वंभर ।।४।।

१२७२५१

फेडावया भक्तीरुण । सेवा करीतसे जाण ।।१।।
उतराई कैसे व्हावे । पुत्र होवोनीया यावे ।।२।।
उछ नीच सेवा करोनी । राहे देवपण लोपोनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तये वेळे चमत्कार ।।४।।

१२७२५२

पीता दीक्षीत मल्हार । पुजे गंधाचा ईश्वर ।।१।।
नीत्य प्रार्थीव करावे । गंध उगाळोनी द्यावे ।।२।।
पीता बैसे पुजा करीत । आपण व्दार ते रक्षीत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पीता तपस्वी तो थोर ।।४।।

१२७२५३

पुजा करीतेवेळ कोन्ही । शब्द न पडावा कानी ।।१।।
व्दारी बैसले ते जाण । शुद्र आला तीकडोन ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । गुप्त रुप सांगे मजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी पुसती तयास ।।४।।

१२७२५४

शुद्रालागी चीदंबर । पुसे जावोनीया दुर ।।१।।
सांगे आलासे कठोन । तेणे पत्र दील्हे जाण ।।२।।
पत्र होते मनोळीचे । येणे जाणे हाकीमाचे ।।३।।
दास म्हणे चीदंबर चरणी । पत्र वाचीले स्वामीनी ।।४।।

१२७२५५

नाम बाळाजी तो पंत । होता दीक्षीताचा भक्त ।।१।।
तोणे लीहीलो पत्रांतरी । त्याचे घरी जालो चोरी ।।२।।
देवावरीलो दागीनो । नेलो होतो तो चोराने ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पत्र वाचि सवीस्तर ।।४।।

१२७२५६

दीक्षीताचे नावे पत्र । दील्हे स्वामीने उत्तर ।।१।।
न्हाणीमाजी दगडा खाली । वस्तभाव ते ठेवीली ।।२।।
दगड काढोनीया जाण । द्यावे दागीने मोजोन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पत्र लीहीले प्रखर ।।४।।

१२७२५७

मनुश्य वाटेसी लावीले । तेणे पत्र पोहोचावीले ।।१।।
हाकीम मनोळीचा जाण । पत्र पाहे ते वाचोन ।।२।।
पत्र वाचीताची जाण । हर्षयुक्त जाले मन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दगड काढी त्या वेळेस ।।४।।

१२७२५८

दगड मोरीतील काढी । द्रीष्टी पाहीली गाठोडी ।।१।।
तेची पाहाता सोडुन । द्रव्य त्यात सर्व जाण ।।२।।
वस्तभाव ते देवाची । होते च्यार हाजाराची ।।३।।
दास म्हणे चीदंबर । हर्ष तयालागी थोर ।।४।।
१२७२५९

करी वीच्यार चीतासी । धन्य म्हणे दीक्षीतासी ।।१।।
प्रखर पत्री ते लीहीले । तैसे द्रव्य सापडले ।।२।।
तेची वेळी स्वारी करोन । आला द्रव्य घेवोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सांष्टांग नमी दीक्षीतास ।।४।।
१२७२६०

हाकीम म्हणे दीक्षीतासी । कळा न कळे कोणासी ।।१।।
धन्य सामर्थ आपुले । पत्री प्रखर लीहीले ।।२।।
द्रव्य माझे सापडले । नीमे स्वामीसी आर्पीले ।।३।।
दास म्हणे चीदंबर । ठेवी गाढोडे समोर ।।४।।
१२७२६१

दीक्षीत म्हणती तयासी । ठावे नाही हे मजसी ।।१।।
पत्र केव्हा तुझे आले । उत्तर कोन्ही त्याते दील्हे ।।२।।
तेणे पत्र दे दावीले । पाहा कोन्हाचे लीहीले ।।३।।
दास म्हणे दीक्षीताने । पत्र वाचवीले जाण ।।४।।

१२७२६२

जवळी वैदीक ब्राम्हण । होता जोतीसी नीपुण ।।१।।
तेणे पाहीले आक्षरे । पत्र लीहीले चीदंबरे ।।२।।
पीता बोलवोनी वेगी । पुसे चीदंबरालागी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे भीउन उत्तर ।।४।।

१२७२६३

स्वामी बोलती पीत्यासी । तुम्ही देव ते पुजेसी ।।१।।
नये बोलता ते वेळे । उत्तर लीहीले वेगळे ।।२।।
मनुश्य त्वरा करी फार । म्हणोनी दील्हे म्या उत्तर ।।३।।
दास म्हणे भय करुन । बोले चीदंबर जाण ।।४।।

१२७२६४

स्वामी बोलता वेळेसी । वाटे नवल सर्वासी ।।१।।
पुसे दीक्षीत स्वामीसी । वेगी प्रगट का होसी ।।२।।
म्हणे जोतीसी ब्राम्हण । तुज कैसे कळले जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । गणीत आले ते उत्तर ।।४।।
१२७२६५

पीता हासतो चीत्तात । चीदंबर लीला करीत ।।१।।
वैदीक म्हणे दावी गणीत । पाटी मांडोन ढेवीत ।।२।।
चीदंबर लीहता जाला । म्हणे वीसर पडीला ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नवल वाटे वैदीकास ।।४।।
१२७२६६

दीक्षीत बोले हाकीमासी । न्यावे द्रव्य ते घरासी ।।१।।
आम्हा कवडी न लगे । द्रव्य न्यावे म्हणती वेगे ।।२।।
हाकीम करीतो प्रार्थना । माझा उपाय चालेना ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दील्हा नीरोप तयास ।।४।।
१२७२६७

पीता म्हणे चीदंबरा । लीलाधारी तु ईश्वरा ।।१।।
लीला आता दाउ नये । माझे मागे प्रगट व्हावे ।।२।।
चीदंबर जोडी कर । आज्ञा म्हणोनी उत्तर ।।३।।
दास चीदंबर चरणी । लीला आघटीत करणी ।।४।। १२७२६८

चरीत्र १०

पुणे प्रांती ब्राम्हण होता तो भावीक । भेटी नाही देख स्वामीची ते ।।१।।
भेटी व्हावी म्हणोनी ईच्छा बहुत मनी । सोबती वाचोनी राहीलासे ।।२।।
न देखीला देश कर्नाटक दुर । जावे बरोबर सोबतीने ।।३।।
दास म्हणे भाषन न कळे म्हणोन । म्हणे देश कठीण कर्नाटक ।।४।।

१२७२६९

कधी चीदंबर देईल मज भेटी । उदासीन पोटी ब्राम्हण तो ।।१।।
सीवरात्री यात्रा नीघे गोकर्णासी । नीघे सोबतीसी बरोबरी ।।२।।
संगतीच्या जना बोले तो ब्राम्हण । स्वामी भेटी घेउनी जाउ आधी ।।३।।
मुरगोडा वरोनी चला म्हणे त्यासी । न ये संगतीसी कोन्ही त्याच्या ।।४।।
चीदंबर दास म्हणे वीप्र क्षीण । सोबती वाचोन झुरे चीती ।।५।।

१२७२७०

संगतीचे लोक म्हणती तयासी । मार्ग गोकर्णासी नीट हाची ।।१।।
गोकर्णयात्रा करोन येतेवेळे जाण । स्वामीचे दर्षण करुउ तुज ।।२।।
वीप्र म्हणे चीती न चले उपाय । करावे ते काय संगतीसी ।।३।।
दास म्हणे चीती वीप्र उदासीन । सीवरात्री दर्षण व्हावे स्वामी ।।४।।

१२७२७१

सगुण आवतार कलयुगी ईश्वर । स्वामी चीदंबर प्रगट जगी ।।१।।
सांडोनी तयासी जावे गोकर्णासी । भ्रांती या जनासी लागलीसे ।।२।।
बरे देवा झाले तुझीया चीतासी । मज पतीतासी भेटी कैची ।।३।।
चीदंबर दास म्हणे वीप्र मनी । क्षीत तो मानोनी यात्रे संगे ।।४।।

१२७२७२

मुर्तीमंत सीव आसे चीदंबर । सीवरात्री ईश्वर न भेटला ।।१।।
सोबतीचे मुळे जावे गोकर्णासी । न पडे द्रीष्टीसी चीदंबर ।।२।।
बरे चीदंबरा ईच्छा तुझी ऐसी । भेटी तु न देसी सीवरात्रासी ।।३।।
दास म्हणे ईच्या राहीलीसे मनी । चीदंबर धणी क्रपाळ तो ।।४।।

१२७२७३

उदास चीतासी आला गोकर्णासी । जाय दर्षणासी श्नान करोनी ।।१।।
यात्रा बहुत दाटी समुद्रतीरासी । वीप्र तो मार्गासी देउळाच्या ।।२।।
पुजेची सामोग्री जवळी घेवोनी । जातो वेगे करुनी ब्राम्हण तो ।।३।।
दास म्हणे तेथे चीदंबर भेटी । जाय वीप्रासाठी क्रपाळ तो ।।४।।

१२७२७४

शुभ्र भस्म आंगी धोत्र शुभ्रकाठी । दीव्य रुप द्रीष्टी चीदंबर ।।१।।
गुंडी धरोनी हाती पुजेची सामोग्री । आला वीप्र समोरी चीदंबर ।।२।।
म्हणे ब्राम्हणासी कोठोनी आलासी । वीप्र तो स्वामीसी बोलतसे ।।३।।
दास म्हणे वीप्र सांगे पुणे देसी । बोलत स्वामीसी चाले वेगे ।।४।।

१२७२७५

चीदंबर म्हणे तया वीप्रालागी । उभा राहे वेगी न चल पुढे ।।१।।
भेटी जाली आपुले जाउ बरोबरी । गोकर्ण ईश्वर पुजेलागी ।।२।।

वि.सु. अभंग नंबर १२७२७६ मधील तिसरे व चवथे चरण उपलब्ध नांहीत. तसेच चरीत्र ११ मधील उर्वरीत अभंग व अभंग सख्या १२७२७७ ते १२७५७८ पर्यंतचे अभंग उपलब्ध नसल्याने प्राकाशित प्रतीमध्ये समाविष्ट केले गेले नाहीत.

कळा दावी चीदंबर । स्वामी क्रपेचा सागर ।।१।।
ब्राम्हण कुटुंबसहीत । स्वामी दरषनासी येत ।।२।।
ठेउनी घेतले तयासी । नीत्य वीनवी स्वामीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोल म्हणतो ईश्वर ।।४।।

१२७५७९

वीप्र म्हणतो स्वामीसी । माझी वीनंती पायासी ।।१।।
जाणे आसे वेंकोबासी । जवळी नसे बा खर्चासी ।।२।।
करुणा येउ दे ईश्वरा । स्वामीराया चीदंबरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्रालागी देई धीर ।।४।।

१२७५८०

स्वामी म्हणती वीप्रालागी । नीरोप देतो तुज वेगी ।।१।।
देतो खर्ची ते वाटेसी । चींता न करी मानसी ।।२।।
हर्ष होता ब्राम्हणासी । सांगे आपुल्या कांतेसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी करणी ईश्वर ।।४।।

१२७५८१

वीप्र बोलावीला जाण । त्यासी करीती भाषण ।।१।।
दीवस चांगला पाहुन । तुज बोलावीले जाण ।।२।।
देतो नीरोप तुजसी । सुखे जावे त्वा गीरीसी ।।३।।
म्हणे चीदंबरा दास । जाला आनंद वीप्रास ।।४।।

१२७५८२

वीप्र आनंदला जाण । खर्ची देती मज लागुन ।।१।।
चीदंबरे बोलावीले । वीप्रा खर्चालागी दील्हे ।।२।।
देती हाती रुपय दोन । वीप्र नवल करी जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न ये वीप्रासी वीश्वास ।।४।।

१२७५८३

वीप्र म्हणे आपुल्या मनी । खर्च जाला दीवस दोनी ।।१।।
नीत्य रुपया येक जाणा । खर्च न होय तयाना ।।२।।
जातो दोन मजली जाण । मागे येतो मी फीरोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बहुत कल्पना वीप्रास ।।४।।

१२७५८४

म्हणे स्वामीसी ब्राम्हण । रुपय दील्हे तुम्ही दोन ।।१।।
नीत्य लागतसे येक । यात्रा कैसी होय देख ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । खर्च पुरेल तुजसी ।।३।।
चीदंबर दास म्हणे । सुखे यात्रा करुनी येणे ।।४।।

१२७५८५

वचनी धरोनी वीश्वास । वीप्र नीघाला यात्रेस ।।१।।
दोन रुपय जवळी । चीत तयाचे तळमळी ।।२।।
खर्च केला आसे येक । दुसरे दीवसी पाहे देख ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय तयास ।।४।।

१२७५८६

दुसरे दीवसी पाहुजाता । दोन रुपये लागे हाता ।।१।।
करी नवल चीतासी । चीदंबरी कळा ऐसी ।।२।।
रुपये जैसे तैसे जाण । येक रुपय घे काढुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नीत्य येकची खर्चास ।।४।।

१२७५८७

यात्रा करी आनंदेसी । गेला वेंकटेशापासी ।।१।।
राहे आट दीवस । मागे नीरोप देवास ।।२।।
नीरोप घेवोनीया जाण । आला यात्रातो करुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आनंद वीप्रालागी थोर ।।४।।

१२७५८८

स्वामी पुसती तयासी । यात्रा करोनी आलासी ।।१।।
वीप्र म्हणे आनंदेसी । स्वामी यात्रा तु करवीसी ।।२।।
स्वामी पुसती तयासी । रुपय आहे तुजपासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र सांगतो स्वामीस ।।४।।

१२७५८९

चीदंबरा स्वामीराया । करीसी आनाथासी दया ।।१।।
काय सांगु ते महीमान । जाणे आंतरीचे खुण ।।२।।
येक रुपया तो जान । पुजा करुन ठेवीन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । रुपया नसे गाटोडीस ।।४।।

१२७५९०

रुपया जाला आसे गुप्त । स्वामीलागी तो सांगत ।।१।।
नवल जाले आसे येक । जगा दावीत कौतुक ।।२।।
पुर्णब्रम्ह आवतार । स्वामी माझा चीदंबर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२७५९१

पाहु जाता तया ठाई । मात तैसेची ते पाही ।।१।।
नये रुपया हातास । तैसे गुप्त केले त्यास ।।२।।
तया बोले चीदंबर । यात्रा जाली तुज थोर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला धावी हा ईश्वर ।।४।।

१२७५९२

चरीत्र ३२

वीचीत्र ते कळा दावी चीदंबर । नेणती गौव्हार मानव ते ।।१।।
आड्रेचा व्यव्हार आहे बा जयासी । प्रत्यय तयासी उघड होती ।।२।।
दुरदेसी दोघे ब्राम्हण ते आले । स्वामीसी वीनवीले उभयतानी ।।३।।
चीदंबर दास म्हणे ते ब्राम्हण । रोजगार जाण धुंडीताती ।।४।।

१२७५९३

चीदंबरालागी वीनंती करीती । बहुत वीपती प्रपंच्याची ।।१।।
चीदंबरराया त्रासलासे जीव । येउ द्यावी कीव काही आमुची ।।२।।
नसे रोजगार जावे तरी कोठे । भाग्य बहुत खोठे आमुचे देवा ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । आज्ञेचा नीर्धार पाहीजे तो ।।४।।

१२७५९४

स्वामी म्हणती त्यासी आज्ञा ज्या वेळेसी । आनंदे ते वेळेसी नीघावे बा ।।१।।
ऐकती उभयता बरे म्हणती स्वामी । आज्ञा द्याल तुम्ही जाउ तेव्हा ।।२।।
सांगोनीया ऐसे ठेवीले स्वामीनी । मुहुर्त पाहुनी नीरोप देतो ।।३।।
चीदंबर दास म्हणे ते ब्राम्हण । घेवोनी दर्षण जाती नीत्य ।।४।।

१२७५९५

येके दीवसी स्वामी सहज बैसलेती । वीप्र दोघे येती दरुषणासी ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी जोवे बा पुण्यासी । लागतो दोघासी रोजगार ।।२।।
याची वेळे जावे म्हणती तयासी । खोगीर घोड्यासी ठेउनी यावे ।।३।।
चीदंबर दास म्हणे ते ब्राम्हण । तयार होवोन येती वेगी ।।४।।

१२७५९६

क्रपा करुनी स्वामी येकां बोलवीले । तांदुळ घातले पदरी त्याच्या।।१।।
याच वेळे आपा बैसे घोड्यावरी । जावे झडकरी पुण्यासी त्वा ।।२।।
आनंद बहुत मानोनी चींतात । साष्टांग नमीत वीप्र तेव्हा ।।३।।
दास म्हणे स्वामी आनंदे बोलती । यावे भटीप्रती वैभवेसी ।।४।।

१२७५९७

दुसरा वीप्र देख आसे कल्पनीक । बोलतसे देख स्वामीपुढे ।।१।।
नसे तो मुहुर्त आसे वीतीपात । स्वामीपुढे मात पुसु लागे ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी वीतीपात वैध्रती । बैसवीले आसती दोहीकडे ।।३।।
घटका मुहूर्ताची देतो मी नीरोप । दावीतो प्रताप दास म्हणे ।।४।।

१२७५९८

मान्य ते येकासी नीश्चय चीतासी । उदय भाग्यासी स्वामीक्रपे ।।१।।
आनंदे करोनी साष्टांग नमोनी । नीघे त्वरेकरुनी त्याची वेळे ।।२।।
बैसे घोड्यावर नीघेतो झडकर । नाम चीदंबर आटवीतो ।।३।।
दास म्हणे क्रपा आली देवाजीसी । वैभव तयासी प्राप्त करी ।।४।।

१२७५९९

दुजा वीप्र देख संशय तयासी । न जाय ते दीवसी राहीलासे ।।१।।
दुसरे दीवसी म्हणे चांगले मुहुर्त । प्राथःकाळी जात उठोनीया ।।२।।
वाटे जात जाण संशय धरोन । घेतला लुटोन चोरानी तो ।।३।।
दास म्हणे दावी कळा चीदंबर । नायके गौव्हार आज्ञा कधी ।।४।।

१२७६००

आज्ञा जो ऐकोन गेला जो ब्राम्हण । जाला त्या प्रसन्न चीदंबर ।।१।।
जाताची पुण्यासी लागे रोजगार । क्रपा जाली थोर श्रीमंताची ।।२।।
लक्ष रुपयाची दील्हे मामलत । बैसोनी पालखीत आला वेगी ।।३।।
दास म्हणे ऐसा प्रताप ईश्वर । दावी चीदंबर तत्क्षणी ।।४।।

१२७६०१

तीकडोनी येता सीबीकेसी बैसोनी । स्वार तो घेवोनी बरोबर ।।१।।
दीढ महीना आला रोजगार करोन । जातो लोटांगण स्वामीपुढे ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी आपा थोर दैव । घेवोनी वैभव आला वेगी ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतो वीनंती । सर्व कळा हाती तुमच्या देवा ।।४।।

१२७६०२

वीप्र म्हणतसे कैचे भाग्य थोर । क्रपा मजवर केली स्वामी ।।१।।
तुमच्या क्रपेने नीदैवासी दैव । बळे ते वैभव पाटीलागी ।।२।।
पुर्णब्रम्ह स्वामी आवतार खरा । कलयुगी ईश्वरा प्रगट तु ।।३।।
दास म्हणे ऐसी लीला चीदंबर । दावीतो आपर नीत्यनवी ।।४।।

१२७६०३

चरीत्र ३३

चीदंबरा क्रपाघना । स्वामी पतीतपावना ।।१।।
आज्ञा आयकता कोन्ही । प्रत्यय होता तत्क्षणी ।।२।।
आज्ञा नायकता जाण । बळे येत आसे वीन्घ ।।३।।
म्हणे चीदंबर दास । प्रत्यय ऐसे बहुतास ।।४।।

१२७६०४

थोडी आज्ञा आयकती । काही कल्पना धरीती ।।१।।
बहुत जाउनी थोड्यावरी । प्रत्यय येतो बहुतापरी ।।२।।
क्षत्री आवरंगाबादेसी । आला स्वामी दरुषनासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया दावी चमत्कार ।।४।।

१२७६०५

राजपुत आला दरुषनासी । स्वामी नवलगुंदासी ।।१।।
भेटी न होय तयासी । यात्रा बहुत त्या गावासी ।।२।।
राहीलासे दुकानात । नीत्य बैसतो सेतात ।।३।।
म्हणे चीदंबर दास । त्यासी जाले दोन मास ।।४।।

१२७६०६

जाउनी बैसे वावरात । दुरुनी पाहात स्वामीसी ।।१।।
ईछा बहुत चीतात । आला आसे खराबीत ।।२।।
नाव लौकीक तो भारी । पहीली आसे सावकारी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पैका थकला कुळास ।।४।।

१२७६०७

नाव लौकीक पदरी । राहाणे आसे ते शहरी ।।१।।
लाज वाटती चीत्तासी । म्हणोनी आला स्वामीपासी ।।२।।
लज्या रक्षी वीश्वंभरा । स्वामीराया चीदंबरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । स्वामी उभे बुरजावर ।।४।।

१२७६०८

दोन तीन कारकुन । आसती पदरी ते जाण ।।१।।
आसे लौकीक तो थोर । चीत्ती लाज वाटे फार ।।२।।
जाउनी बैसे तो येकांती । करी स्वामीसी वीनंती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करुणा आली देवाजीस ।।४।।

१२७६०९

यात्रा दाटी आसे फार । स्वामी उभे बुरजावर ।।१।।
त्यासी पाहीले दुरोन । सेतामाजी लोटांगण ।।२।।
कारकुन बोलावीला । स्वामी सांगती तयाला ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगुनी धाडी त्या सत्वर ।।४।।

१२७६१०

कारकुन पाटवीले । त्यासी सांगुन धाडीले ।।१।।
दाळ दील्हे पडीभर । जावे घरासी सत्वर ।।२।।
दाळ होती हरभर्याची । बांधोनी गाटोडी तयाची ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न्यावे म्हणती हे घरास ।।४।।

१२९६११

आज्ञा ऐकावी जाण । येणे होतसे कल्याण ।।१।।
बरे म्हणोनीया जाण । जाय बीराडी उठोन ।।२।।
कारकुन सोबतीसी । दाळी दील्ही त्याजपासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । घरी पाटवी सत्वर ।।४।।

१२७६१२

सांगे कारकुनालागी । घरा जावे तुम्ही वेगी ।।१।।
आवरंगाबाद ते शहरी । दाळ द्यावे आमुचे घरी ।।२।।
आज्ञा दील्ही हो स्वामीन । मी तो न जाय येथोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दाळ धाडीली घरास ।।४।।

१२७६१३

बळे राहीलासे जाण । आज्ञा करी उलंघन ।।१।।
दीवस जाले ते शन्मास । परी न जाय घरास ।।२।।
बोलावीले ते स्वामीने । म्हणती घरी वेगी जाणे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे बहुत प्रकार ।।४।।

१२७६१४

वीनवीतो स्वामीलागी । घरी जाउ कैसॆ वॆगी ।।१।।
पैसा फसला चहुकडे । मन जाले आसॆ वॆडॆ ।।२।।
आमल आसॆ आवींदाचा । भ्रम बहुत आमुचा ।।३।।
दास म्हणॆ चीदंबर । पैका मागते सरकार ।।४।।

१२७६१५

स्वामी म्हणती तयासी । होतो सन्मान तुजसी ।।१।।
वसुल होत आसॆ पैका । पत्र यॆती तुज दॆखा ।।२।।
वीनंती स्वामीसी तो करी । जाईन पत्र आल्यावरी ।।३।।
म्हणॆ चीदंबर दास । आणीक राहॆ दोन मास ।।४।।

१२७६१६

पत्र आली घरीहुन । आणीक आला कारकुन ।।१।।
सर्व सांगॆ वर्तमान । पुन्हा भरीलॆ दुकान ।।२।।
हाकीम बळॆ बोलावीत । कुळॆ वसुल करोनी दॆत ।।३।।
म्हणॆ चीदंबर दास । चला म्हणती घरास ।।४।।

१२७६१७

जाला आनंद तयासी । पुसो आला तो स्वामीसी ।।१।।
क्रपा केली स्वामीराजा । पैका वसुल जाला माझा ।।२।।
आला आसे कारकुन । पैका भरले दुकान ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया सांगती उत्तर ।।४।।

१२७६१८

पुर्वी नाही आयकीले । बरे हेची आता जाले ।।१।।
दाळ दील्हे होती जाण । जरी तु जातासी घेउन ।।२।।
त्याचे द्रव्य बहुत होते । काय सांगावे तुम्हाते ।।३।।
दास म्हणे चीदंबर । हासोनी सांगती उत्तर ।।४।।

१२७६१९

आता जावे म्हणती आपा । ईश्वर करीतसे क्रपा ।।१।।
होते पहील्याप्रमाणे । वेगी घरी आता जाणे ।।२।।
आज्ञा मागोनी स्वामीसी । गेला आनंदे घरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । भावासारीखा ईश्वर ।।४।।

१२७६२०

चरीत्र ३४

वीप्र आला येक स्वामी दरुषणासी । वीनंती पायासी करीतसे ।।१।।
कलयुगी आवतार चीदंबरराया । करी मज दया आनाथासी ।।२।।
नाही ते संतती देई पुत्रदान । ईंछा पुरवी जाण माझी देवा ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । द्रष्टांती वीच्यार सांगेन मी ।।४।।

१२७६२१

द्रष्टांत पडता कोन्हा सांगु नये । आर्थ कदा नये दुजयासी ।।१।।
द्रष्टांत पडता कोन्हा सांगु जाता । वाईट म्हणता प्रत्यय न ये ।।२।।
ऐसे सांगुनीया आज्ञा दील्हे त्यासी । वीप्र तो घरासी गेला जाण ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । घरी जाता स्वप्न जाले त्यासी ।।४।।

१२७६२२

राहीला तो गर्भ वीप्र कांतेलागी । दीवस मास वेगी भरत आले ।।१।।
प्रसुत होताची कन्या जाली जाणा । आला तो दरुषणा फीरोनीया ।।२।।
सांगे स्वामीलागी सर्व वर्तमान । नाही पुत्रदान दील्हे मज ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर त्यासी । स्वप्न त्या कोनासी सांगीतले ।।४।।

१२७६२३

स्वामी म्हणती सांग स्वप्न कैसे जाले । कोन्हा सांगीतले प्रथम त्वा ।।१।।
वीप्र सांगे स्वप्नी येउन ब्राम्हण । रुपया येक जाण दील्हा हाती ।।२।।
उठोनी प्राथःकाळी द्रीष्टांत सांगता । वाईट म्हणता जाला येक ।।३।।
दास म्हणे बोले त्यासी चीदंबर । वाईट म्हणता थोर चुकी आसे ।।४।।

१२७६२४

द्रष्टांत दुसर्यासी सांगु जाता जाण । आर्थ न कळोन बोलतसे ।।१।।
आर्थ तो चांगला पुत्र होता जाण । वाईट म्हणता कोण कन्या जाली ।।२।।
बरे आता तरी न सांगे कोणासी । सांगावे सुज्ञासी जाणत्यासी ।।३।।
दास म्हणे ऐसे बोले चीदंबर । पुत्र हा नीर्धार होतो तुज ।।४।।

१२७६२५

ठेउनी चार दीवस आज्ञा दील्हे त्यासी । गेला तो घरासी वीप्र जाण ।।१।।
आणीक येक वर्षा पुत्र जाला त्यासी । आला दरुषणासी स्वामीचीया ।।२।।
हर्षयुक्त सांगे पुत्र जाला म्हणोन । शर्करा आणोन ठेवी पुढे ।।३।।
दास म्हणे ऐसी लीला वीश्वंभर । दावी चीदंबर नानापरी ।।४।।

१२७६२६

द्रष्टांताचा भाव न कळता आर्थ । वाईट म्हणोनी व्यर्थ गमावीती ।।१।।
कल्पनीक नर नोळखे देवासी । भ्रम पुढील्यासी घालीतसे ।।२।।
यासाठी आज्ञाना सांगु नये कधी । द्रष्टांता आवधी होती आधीक ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर सत्य । द्रीष्टांत आसत्य कदा नोहे ।।४।।

१२७६२७

वीश्वास सांडीती द्रीष्टांत ते नेणती । प्रारब्दाचे गती पुढे ठाके ।।१।।
वीश्वास धरीता स्वामीच्या द्रीष्टांता । आघटीत सत्ता असे ज्याची ।।२।
सतामात्रे करुनी स्थीर हे मेदीनी । प्रारब्ध काहाणी काय तेथे ।।३।।
दास म्हणे धणी आसे त्रैलोक्यासी । उघड द्रीष्टीसी चीदंबर ।।४।।

१२७६२८

आसे ब्रम्हपुर्ण आवतार सगुण । दीक्षीत ब्राम्हण कलयुगी ।।१।।
ज्याचे सत्ता मात्रे वर्ते चराचर । द्रीष्टीसी गोचर जाला तोची ।।२।।
करी समाधान आनाथ दीनाचे । नाम घेता वाचे उधरी तु ।।३।।
दास म्हणे धन्य जन्मा आले प्राणी । चीदंबर नयनी देखीयला ।।४।।

१२७६२९

आवतार कलयुगी पुर्णब्रम्ह स्वामी । देखीला तो आम्ही चीदंबर ।।१।।
नोळखती कोन्ही संसारीक जन । कल्पना घेवोन बुडताती ।।२।।
नींदीती दुर्जन भोगीती पतन । भावीक हे जन उधरती ।।३।।
दास म्हणे आसे क्रपेच्या सागर । पावन चीदंबर पतीतासी ।।४।।

१२७६३०

आघटीत कळा दावी तु करोन । पतीतपावन स्वामी माझा ।।१।।
दावी चमत्कार पदोपदी जाण । नेणती आज्ञान मुढमती ।।२।।
भाव धरीती कोन्ही फुका नरनारी । प्रत्यय नानापरी दावी त्यासी ।।३।।
दास म्हणे आसे क्रपेचा सागर । सगुण चीदंबर कलयुगी ।।४।।

१२७६३१

चरीत्र ३५

लीला दावीतो आनंत । चीदंबर क्रपावंत ।।१।।
दक्षीणदेसीचा ब्राम्हण । आला दर्षणालागोन ।।२।।
नाम गोपाळ तो भट । आसे भक्तराज श्रेष्ट ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाचा नसे त्या वीप्रास ।।४।।

१२७६३२

आला स्वामी दरुषणासी । भक्ती प्रीय ईश्वरासी ।।१।।
आसे कुटुंब सहीत । शुक्लव्रीती तो मागत ।।२।।
भीक्षा मागे येकवीस घर । ब्राम्हणाचे हे नीर्धार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पंगती आल्या ब्राम्हणास ।।४।।

१२७६३३

राहे यात्रेबरोबरी । क्रपा स्वामीची त्यावरी ।।१।।
लीला दावी चीदंबर । पावन भक्तीचा नीर्धार ।।२।।
वाचा दील्ही वीप्रालागी । चीदंबरे तया वेगी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाला आनंद वीप्रास ।।४।।

१२७६३४

काही दीवस स्वामीपासी । वीप्र राहे आनंदेसी ।।१।।
वस्त्र भुषणे तयासी । सुवर्ण वस्त कुटुंबासी ।।२।।
वीप्रकांता आनंदेसी । क्रपा स्वामीची तीजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नीरोप देती उभयतास ।।४।।

१२७६३५

स्वामी म्हणती वीप्रासी । तुम्ही राहावे हुबळीसी ।।१।।
आज्ञा म्हणे तो ब्राम्हण । दील्हा नीरोप तो जाण ।।२।।
क्रपा करोनी चीदंबर । दावी लीला वीश्वंभर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । द्राक्ष दील्हे त्या वीप्रास ।।४।।

१२७६३६

लीला दावी चीदंबर । उघड द्रीष्टीसी गोचर ।।१।।
द्राक्ष दील्हे आसे येक । तया वीप्रालागी देख ।।२।।
आसे ब्राम्हण भावीक । द्राक्ष पुजीतसे देख ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया दावी चमत्कार ।।४।।

१२७६३७

ब्राम्हण भक्त तो नीर्धारी । भक्तीभावे पुजा करी ।।१।।
द्राक्षाचा तो जाला बाण । वरी टेवीलीसे खुण ।।२।।
मसुरे प्रामाण ते खुन । बाणावरी द्राक्ष जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । साक्ष टेवी बाणावर ।।४।।

१२७६३८

वीप्र न सांगे कोणासी । गुप्त पुजी आनंदेसी ।।१।।
आणापा तो पांचलग । आसे सेजारी सवेग ।।२।।
वीप्र सराफ व्यापारी । चीदंबर भक्ती करी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वप्न जाले बा तयास ।।४।।

१२७६३९

भक्तराज तो ब्राम्हण । देई राहावया स्थान ।।१।।
सांगे द्रीष्टांती ईश्वर । वीप्र न धरी मनावर ।।२।।
त्याचे कांतेलागी जाण । स्वामी सांगे रागेभरुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे द्रष्टांती प्रखर ।।४।।

१२७६४०

स्वामी सांगती नीक्षुण । खोली दील्ही त्या भाड्यान ।।१।।
काढी खोलीतुन गुळ । वीप्रालागी देई स्थळ ।।२।।
भक्तराज तो ब्राम्हण । जाला द्राक्षाचा तो बाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे द्रीष्टांती प्रखर ।।४।।

१२७६४१

प्राथःकाळी तो उठोन । पुसे ब्राम्हणासी खुन ।।१।।
तुज जाला आसे बाण । मज दावी वेगी खुण ।।२।।
वीप्रे दावीतसे बाण । वरी दीसे द्राक्ष खुण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्र नवल करी थोर ।।४।।

१२७६४२

मसुरीचे दाळी जैसे । बाणावरी द्राक्ष दीसे ।।१।।
तया बोट लावी जाण । द्राक्ष फुटले ते जाण ।।२।।
खास पडली त्या ठाई । बाणावरी दीसी पाही ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी वीश्वंभर ।।४।।

१२७६४३

स्वामी सांगे वीप्रालागी । संपुष्ट करुनी देई वेगी ।।१।।
पांच रुपयाभार केले । संपुष्ट आणोनीया दील्हे ।।२।।
ठाव दील्हा त्या खोलीत । ब्राम्हण राहीलासे स्वस्त ।।३।।
बारा वर्ष जाले त्यासी । दील्हे नीरोप वीप्रासी ।।४।।
दास म्हणे भेटी जाला । आम्ही दीष्टीने देखीला ।।५।।

१२७६४४

दील्हा नीरोप तयासी । वीप्र गेला आपुल्या देसी ।।१।।
लीला दावीतसे ऐसी । चीदंबर या जगासी ।।२।।
कलयुगी आवतार । करी पतीत उत्धार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जन पाहाती द्रीष्टीस ।।४।।

१२७६४५

चरीत्र ३६

चीदंबरापासी आला दरुषणासी । वीप्र पुणे देसी राहत होता ।।१।।
पुत्र तो थोराचा बाधा समंधाचा । खर्च तो द्रव्याचा बहुत केला ।।२।।
येकुलता येक आसे द्रव्यवान । माता ते घेवोन आली त्यासी ।।३।।
दास म्हणे आसे चीदंबर धणी । आगाध करणी प्रगट दावी ।।४।।

१२७६४६

कलयुगी आवतार स्वामी चीदंबर । कळला त्या नीर्धार नीश्चयेसी ।।१।।
मातेलागी पुत्र दावीतो लीहुन । चीदंबरावीण तारी कोण ।।२।।
पंचवीस वरुषाचे वय आसे त्याचे । बोलता ते वाचे नये त्यासी ।।३।।
दास म्हणे वाच्या नव्हती बहुत दीवस । मातेच्या जीवास कष्ट बहु ।।४।।

१२७६४७

बाळपणी वाच्या होती बा तयास । बारा वर्ष त्यास वय होते ।।१।।
त्या वेळे लग्न केले ते मातेने । मुल होते शाहाणे लीहीणार बा ।।२।।
त्यापासोनी पुढे नसे देह्यावर । वाचेचा उच्चार नव्हे तोही ।।३।।
चीदंबर दास म्हणे त्याची माता । पुत्र येकुलता झुरे मनी ।।४।।

१२७६४८

येकुलता येक वेड ते लागले । मुके पीसे जाले बारा वर्ष ।।१।।
बहुत उपाय केले नानापरी । माता चींता करी रात्रदीवस ।।२।।
सरला उपाय केले देवधर्म । खोटे माझे कर्म म्हणे माता ।।३।।
दास म्हणे जाला नीश्चय तीयेसी । चीदंबर यासी क्रपा करील ।।४।।

१२७६४९

चीदंबरावीण देव दुजा नेणे । माता त्याची म्हणे नीश्चयेसी ।।१।।
पुत्रालागी घेउनी आली दरुषणासी । द्रढ नीश्चयेसी राहीली ते ।।२।।
चीदंबर क्रपा करील पुत्रासी । तरीच गावासी जाईन म्हणे ।।३।।
चीदंबर दास म्हणे भक्ती थोर । करोनी नीर्धार राहीलीसे ।।४।।

१२७६५०

दरुषणासी येता चीदंबरापासी । कळले स्वामीसी वर्तमान ।।१।।
येउ नेदी कदा दरुषणा लागोन । पाहावया जाण नीश्चय तो ।।२।।
येताची गावांत राहे आट दीवस । माहाव्दारी त्यास येउ नेदी ।।३।।
चीदंबर दास म्हणे भक्ती थोर । प्रदक्षणा दुर करीत आसे ।।४।।

१२७६५१

प्रदक्षणा करी वाड्यासी दुरोनी । जवळी त्यासी कोन्ही येउ नेदी ।।१।।
नीश्चय धरोनी प्रदक्षणा करी । नाम ते आंतरी जपे सदा ।।२।।
चीदंबरावीण दुजे न घे नाम । भावतो नीशीम द्रढ केला ।।३।।
दास म्हणे त्यासी बोलती बहुत । प्रदक्षणा करीत नीत्यनेम ।।४।।

१२७६५२

स्वामी रागे येती वीप्रासी बहुत । प्रदक्षणा करीत मना करी ।।१।।
व्दारपाळ त्यासी बोलत बहुत । नानापरी देत सीव्यागाळी ।।२।।
परी तो न सोडी प्रदक्षणा कधी । नीश्चयेसी बुधी द्रढभाव ।।३।।
दास म्हणे ऐसे जाले वर्ष येक । चीदंबर देख क्रपा करी ।।४।।

१२७६५३

वर्ष येका त्यासी जवळी बोलावीलॆ । पुसो त्या लागलॆ स्वामी त्यासी ।।१।।
सोडी मुकॆपण करावॆ भाषण । नाम तुझॆ कोण सांगॆ मज ।।२।।
हात जोडोनीया वीप्र उभा राहॆ । क्रपाद्रीष्टी पाहॆ चीदंबर ।।३।।
दास म्हणॆ स्वामी पुसती त्यासी नाम । त्याची वॆळॆ भ्रम गॆला त्याचा ।।४।।

१२७६५४

चीदंबर म्हणॆ बोलावॆ तॆ नीट । बोलॆ घडघडाट स्वामीपुढे ।।१।।
साष्टांग नमोनी सांगॆ नाव गाव । म्हणॆ स्वामी दैव उघडीलॆ ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी वॆडा की शाहाणा । म्हणॆ मी शाहाणा स्वामीक्रपॆ ।।३।।
दास म्हणॆ हर्षयुक्त त्याची माता । धन्य भगवंता पावलासी ।।४।।

१२७६५५

त्याच वॆळॆ साखर आणी पाच मण । वाटी हर्ष करुन माहाव्दारी ।।१।।
ब्राम्हण भोजन सहश्रावधी करुन । दक्षणा दॆवोन ब्राम्हणासी ।।२।।
घॆवोनी नीरोप गॆलातो पुण्यासी । लीला दावी ऐसी चीदंबर ।।३।।
गर्लहोसूरासी स्वामी त्या वॆळॆसी । पाहीलॆ द्रीष्टीसी दास म्हणॆ ।।४।।

१२७६५६

चरीत्र ३७

आसे वैष्णव ब्राम्हण । मोगलाचा कारकुन ।।१।।
राहाणे हैदराबादेसी । पुत्र नव्हाता तयासी ।।२।।
कांता त्याची भक्तीवान । करी चीदंबरध्यान ।।३।।
दास म्हणे चीदंबर । स्वामी भक्तीप्रीयकर ।।४।।

१२७६५७

कांता वैष्णवाची जाण । नव्हते स्वामीचे दरुषण ।।१।।
कीर्ती आयकोन बहुत । जाला आवतार कलीत ।।२।।
ऐके नाना चमत्कार । ब्राम्हण सांगताती फार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पुत्रईछा त्या बाईस ।।४।।

१२७६५८

करी चीत्तात वीच्यार । जाला कलयुगी आवतार ।।१।।
कधी घडवील दरुषण । चीती झुरतसे जाण ।।२।।
भ्रतार आसे खळ बहुत । नींदा स्वामीची करीत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न ये सांगता बाईस ।।४।।

१२७६५९

काय करु म्हणे देवा । चीदंबरा बा केशवा ।।१।।
चीती द्रढभाव धरुन । पुगीफळ पुजी जाण ।।२।।
गंध आक्षता तुळसी । चीदंबर नामे पुजा ऐसी ।।३।।
पुजा करोनीया जाणा । नीत्य करी प्रदक्षणा ।।४।।
दास म्हणे चीदंबर । सर्वगत वीश्वंभर ।।५।।

१२७६६०

धुप दीप पंच्यारती । नैवेद्य कापुर आरती ।।१।।
वीप्रकांता भावधरी । नीत्य प्रदक्षणा करी ।।२।।
घरी बैसोनीया जाण । पुजा करी भावे करुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नसे देखीले स्वामीस ।।४।।

१२७६६१

ऐकोनी स्वरुप वर्णन । नीत्य करीतसे ध्यान ।।१।।
म्हणे पावे चीदंबरा । पुत्र देई वीश्वंभरा ।।२।।
दावी प्रत्यय मजसी । नाही देखीले तुजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२७६६२

वैष्णव भ्रतार तीयेचा । शुधभाव नसे त्याचा ।।१।।
नीत्य जावे कचेरीत । मोगलाई दरबारात ।।२।।
येके दीवसी आकस्मात । वेगी आला तो घरात ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कांता देखीली पुजेस ।।४।।

१२७६६३

करीत होती प्रदक्षणा । पुसे भ्रतार तो जाण ।।१।।
कासयाची पुजा करीसी । सत्य सांगे तु मजसी ।।२।।
कांता सांगे त्या भ्रतारा । पुजीते मी चीदंबरा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । क्रोध आला वैष्णवास ।।४।।

१२७६६४

ऐकोनी स्त्रीयेचे वचन । आला क्रोध त्या दारुण ।।१।।
वेगी करोनी भोजन । बाहेर बैसलासे जाण ।।२।।
वैभव ते संपती । जवळी मंडळी ते होती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बहुत नींदीतो स्वामीस ।।४।।

१२७६६५

बोलवोनी कांतेलागी । आणी सुपारी ते वेगी ।।१।।
सुपारीचे पुजा करीसी । वेगी दावी ते मजसी ।।२।।
कांता भीवोनीया जाण । दील्ही सुपारी आणोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । खळ घाली आडकीत्यास ।।४।।

१२७६६६

वैष्णव खळ दुराचारी । बळे फोडी तो सुपारी ।।१।।
बळे घाली आडकीत्यासी । परी न फुटे तयासी ।।२।।
सर्व मंडळीने जाण । बळ पाहीले करोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । परी नुमजे खळास ।।४।।

१२७६६७

घालोनी आडखीत्यासी जाण । बळ करीती दोघे जाण ।।१।।
तरी न फुटे ते जाण । बरे पाहाती न्याहाळुन ।।२।।
शाळीग्राम जाला आसे । आर्धी सुपारी ते दीसे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नवल वाटले सर्वास ।।४।।

१२७६६८

वासुदेव मुर्ती जाण । शाळीग्राम जाला पुर्ण ।।१।।
आर्धी सुपारी ते जाण । तया राहीली लागुन ।।२।।
तेही न नीघे तयासी । भयभीत तो मानसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । वैष्णव कापे थरथरा ।।४।।

१२७६६९

भयाभीत वीप्र जाण । तोंडावरी घे मारुन ।।१।।
त्राहे त्राहे चीदंबरा । खळ दुर्जन मी खरा ।।२।।
बहुत आन्याय म्या केला । रक्षी रक्षी तु मजला ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पुजा करीत सावकास ।।४।।

१२७६७०

कांतेलागी जोडी कर । धन्य म्हणे चीदंबर ।।१।।
घडला आन्याय मजसी । करी प्रार्थना देवासी ।।२।।
कांता म्हणे भ्रतारासी । चला स्वामी दरुषणासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वैष्णव आला दरुषणास ।।४।।

१२७६७१

कांता घेवोनी बरोबर । आसे समुदाय थोर ।।१।।
कुशेगल्याच्या कील्यास । स्वामी होते त्या वेळेस ।।२।।
डेरे दांडे ते देवोन । बाहेर उतरला जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । चीती भय बहुत त्यास ।।४।।

१२७६७२

कैसा जाउ दर्षणासी । स्वामी येतील क्रोधासी ।।१।।
जाले संकट बहुत । चीती जाला भयभीत ।।२।।
स्वामीपासी कारकुन । थोरथोराचे ते जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया भेटले सत्वर ।।४।।

१२७६७३

आज्ञा स्वामीचे घेउन । त्यासी बोलावीले जाण ।।१।।
म्हणती पतीतपान । चीदंबर तो सगुण ।।२।।
आणीले स्वामीपासी जाण । जात आसे लोटांगण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी उठवीती तयास ।।४।।

१२७६७४

कंप सुटलासे जाण । उभा कर तो जोडोन ।।१।।
नेत्री वाहतसे नीर । म्हणे आन्याई मी थोर ।।२।।
आपराध क्षमा करा । स्वामीराया चीदंबरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया बुझावी सत्वर ।।४।।

१२७६७५

करी प्रार्थना स्वामीसी । पतीतपावन तु होसी ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । नसे आन्याय तुजसी ।।२।।
सांगे काय तरी जाले । तेणे सर्व नीवेदीले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी म्हणती लटीके त्यास ।।४।।

१२७६७६

समुदाय थोरथोर । यात्रा सभोवती फार ।।१।।
स्वामी म्हणती त्या जाण । लटीके सर्व वर्तमान ।।२।।
सुपारी ते फोडु जात । कैसा शाळीग्राम होत ।।३।।
नाही ऐकीले ते कोटे । स्वामी म्हणती सर्व खोटे ।।४।।
म्हणे चीदंबर दास । वैष्णव दावी तो सर्वास ।।५।।

१२७६७७

नवल करीती लहान थोर । लीला स्वामीची आपार ।।१।।
स्वामी म्हणती त्या जाण । कांता तुझी भक्ती पुर्ण ।।२।।
पुढे येवोनीया बाई । लोटांगण स्वामीपाई ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी प्रसन्न तीयेस ।।४।।

१२७६७८

स्वामी म्हणती तीयेसी । ईछेसारीखे पावसी ।।१।।
गेले नीरोप घेवोन । जाले पुत्र ते संतान ।।२।।
पुन्हा आले दरुषणासी । संगे घेवोनी पुत्रासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे आपार ।।४।।

१२७६७९

चरीत्र ३८

स्वामी दरुषणासी यात्रा बहुत येती । धणगरी ते होती व्रध येक ।।१।।
आली दरुषणासी सीरटीमाझारी । पाहे डोळेभरी चीदंबरा ।।२।।
म्हणे ते म्हातारी नीवाले हे मन । चीदंबरा चरण देखताची ।।३।।
दास म्हणे जाले देह्याचे सार्थक । म्हातारी ते देख उधरली ।।४।।

१२७६८०

घरी येकुलती कन्या आसे येक । वर्तमान देख कळले तीसी ।।१।।
आली धावोनीया चीदंबरापासी । भेटवी मजसी माता माझी ।।२।।
रडे आक्रंदोनी मज नाही कोन्ही । ब्रम्हांडभुवनी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे तीसी बोले चीदंबर । बुझावी ईश्वर नानापरी ।।४।।

१२७६८१

भोळी भक्ती तीची आवडे ईश्वरासी । चीदंबरा कैसी नेली माता ।।१।।
तुझ्या दरुषणासी आली माझी माता । कैसी भगवंता मारीली त्वा ।।२।।
दर्षण घेउनी येती ते घरासी । नीमीत्य तुजसी नव्हते देवा ।।३।।
दास म्हणे तीसी बोले चीदंबर । ईश्वरी हे सुत्र आसे बाई ।।४।।

१२७६८२

नायेके धणगरीणी माता आणोनी देई । नाहीतरी घेई प्राण माझा ।।१।।
नीत्य उठोनीया रडे आक्रोंदोनी । न घे आन्न पाणी कदाकाळी ।।२।।
तीन दीवस जाले स्वामी तेथे येती । समाधान करीती बहुतापरी ।।३।।
दास म्हणे कदा नायके ते जाण । माता देई आणुन चीदंबरा ।।४।।

१२७६८३

दया आली तेव्हा स्वामीलागी जाणा । भाकीती करुणा बहुत म्हणोनी ।।१।।
चीदंबर बोले आणुनी देतो माता । भेटी उभयता करुनी देतो ।।२।।
परी नीद्रा नघे आजीचे रात्रीसी । भेटती तुजसी माता तुझी ।।३।।
दास म्हणे ऐसे बोले चीदंबर । यात्रा लाहान थोर ऐकताती ।।४।।

१२७६८४

भेटी जाल्यावरी नीद्रा घेसी जरी । नीमीत्य मजवरी नाही मग ।।१।।
ऐकोनीया ऐसे आनंद तीजसी । भेटती मजसी माता माझी ।।२।।
संध्याकाळ जाली दीप ते लावोनी । आनंदे करुनी वाट पाहे ।।३।।
दास म्हणे आसे नीश्चय चीतासी । आवडी देवाजीसी भोलीभक्ती ।।४।।

१२७६८५

धणगरी ते आसे कुरुप बहुत । येक्या त्या नेत्रात वडस आसे ।।१।।
भाव तो प्रेमळ आवडे देवाजीसी । चीदंबर तीसी प्रत्यय दावी ।।२।।
रात्री तीची माता दील्ही ते आणोन । माय लेकी जाण भेटताती ।।३।।
भेटी जाल्यावरी आनंद आंतरी । दासा क्रपा करी चीदंबरा ।।४।।

१२७६८६

माय लेकी जाणा आनंदे बैसीती । सुख दुःखा गोष्टी कन्या सांगे ।।१।।
भेटीलागी जाला आसे येक मास । आनंदे दोघीस न समाये ।।२।।
चीदंबरे केली आसे भेटी जाण । आवतार सगुण परब्रम्ह ।।३।।
दास म्हणे करीती उभयता भोजन । मायलेकी जाण येक्याठाई ।।४।।

१२७६८७

बाटेव्या बांधुन आणीलो ते घरुन । धाली ते रांदुन मातेलागी ।।१।।
आनंदे उभयता करोनी भोजन । करीती शयन मायलेकी ।।२।।
हर्षयुक्त करोन बोलताती जाण । नीद्रा ते लागुन गेली तेव्हा ।।३।।
चीदंबर दास म्हणे उगवे दीवस । न पडे द्रीष्टीस माता तेव्हा ।।४।।

१२७६८८

आनंद तो जाला आसे धणगरणीसी । आली दरुषणासी स्वामीपासी ।।१।।
म्हणे देवराया भेटवीली माता । नीद्रा भगवंता आली मज ।।२।।
आन्याय मजकडे नाही शब्द तुम्हा । ईछा पुरषोत्तमा पुरवीली ।।३।।
दास म्हणे दावी कळा चीदंबर । लीला आवतार कलयुगी ।।४।।

१२७६८९

नीरोप देतेवेळे रडते धणगरणी । मज नाही कोम्ही चीदंबरा ।।१।।
स्वामी बोलताती मीच तुझी माता । बोलवणा आता करीतो मी ।।२।।
चोळी लुगडी येक नेसवोनी जाण । करीतो बोलवण चीदंबर ।।३।।
दास म्हणे आसे जगाची हे माता । चीदंबर पीता त्रैलोक्याचा ।।४।।

१२७६९०

स्वामी लीहोनी देती गावोगावी जाण । द्यावी बोळवण रुपया येक ।।१।।
तांदुळ च्यार सेर रुपया तो येक । गावोगावी देख लीहोन देती ।।२।।
स्वामीची ते कन्या म्हणती जनलोक । बोळवण देख करीती हर्ष ।।३।।
दास म्हणे ऐसा चीदंबर धणी । आघटीत करणी करुनी दावी ।।४।।

१२७६९१

चरीत्र ३९

येक दीवसी चीदंबर । सहज नीघाले बाहेर ।।१।।
ब्राम्हण गलीतुन जाता । मेले वत्स द्रीष्टी पडता ।।२।।
बाहेर टाकीले वोढोनी । जाता पाहीले स्वामीनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करुणावंत हा ईश्वर ।।४।।

१२७६९२

ब्राम्हण मेळा बरोबर । स्वामी आले त्यासमोर ।।१।।
वत्स पडीले वाटेसी । स्वामी म्हणती उटवा यासी ।।२।।
वीप्र सांगती स्वामीसी । प्राण नसे या वत्सासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । लटीके म्हणती स्वामीत्यास ।।४।।

१२७६९३

जीव आसे वत्सालागी । स्वामी म्हणती उटवा वेगी ।।१।।
घरीच्या धण्यासी पुसीले । तेणे येवोनी सांगीतले ।।२।।
मरोनी जाले दोन दीवस । स्वामीराया या वत्सास ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जीव आहे म्हणती यास ।।४।।

१२७६९४

दाटी ब्राम्हणाचा मेळ । स्वामी आले वत्साजवळ ।।१।।
क्रपाद्रीष्टी न्याहाळोण । स्वामी पाहाती त्यासी जाण ।।२।।
आला वत्सालागी प्राण । पाहे डोळे उघडोन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उठवा म्हणती सत्वर ।।४।।

१२७६९५

हात लाउ वीप्र गेलो । वत्स उभे ते राहीले ।।१।।
आश्चर्य वाटलो सर्वासी । कळा ईश्वराची ऐसी ।।२।।
मुर्तीमंत हा ईश्वर । सगुण जाला चीदंबर ।।३।।
दास म्हणे आघटीत । लीला आपुली दावीत ।।४।।

१२७६९६

परी न कळो मानवासी । भ्रांती रुप अज्ञानासी ।।१।।
आवीद्येक कलीजन । माहावीकल्पी दुर्जन ।।२।।
नानारीती चमत्कार । पाहाती द्रीष्टीनो समोर ।।३।।
म्हणो चीदंबर दास । नसो मानवा वीश्वास ।।४।।

१२७६९७

नीत्य नवो चमत्कार । दावीतसो चीदंबर ।।१।।
परी नोणती ईश्वर । आवीद्येक नारीनर ।।२।।
येत प्राक्तन तो आड । हीन दैव नुमजो मुढ ।।३।।
म्हणो चीदंबर दास । राक्षस भुमी या दोशास ।।४।।

१२७६९८

नानापरीचे सांगणे । नीत्य पाहाती द्रीष्टीने ।।१।।
तरी नुमजे या जना । पापी वीकल्पी दुर्जना ।।२।।
स्वामी पतीतपावन । जाला आवतार सगुण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बळे करीतो उत्धार ।।४।।

१२७६९९

यात्रा येती दुरदेसी । होती प्रत्यय सर्वासी ।।१।।
दुरदेसी या जनासी । भावभक्ती आसे त्यासी ।।२।।
जवळील्यासी भ्राती थोर । भ्रम धालीतो ईश्वर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कीती सांगावे जनास ।।४।।

१२७७००

बळे सांगु जाता जाण । आधीक धरी आभीमान ।।१।।
नींदा आधीकची करी । पापे बुडे दुराचारी ।।२।।
कोठवरी ते सांगावे । कळवळोनी जीवेभावे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन आवतार ।।४।।

१२७७०१

पुर्णब्रम्ह स्वामीराव । नेणे काही भावाभाव ।।१।।
आसे पतीतपावन । जाला आवतार सगुण ।।२।।
दीन जनालागी तारी । दया मातेचीया परी ।।३।।
म्हणे दास चीदंबर । उपमा न साजे ईतर ।।४।। १२७७०२

चरीत्र ४०

चीदंबर दावी नीत्य चमत्कार । कलयुगी आवतार स्वामी माझा ।।१।।
स्वामी संचारासी बाहीर नीघती । प्रत्यय दावीती गावोगावी ।।२।।
मुरगोडा पासुन पंचे कोशावर । गाव देशनुर सन्नीध ते ।।३।।
त्याची गावी गेले स्वामी मुकामासी ।पाणी त्या गावासी नव्हते जाण ।।४।।
चीदंबर दास म्हणे येक वीहीर । यात्रा मीळती फार तये गावी ।।५।।
१२७७०३

गावा बाहेर होता वोहोळ तो जाण । ब्रम्हहत्या करुण कोरडाची ।।१।।
पन्नास ते वर्ष जाले आसती जाण । पाणी ते आटोन वोहोळाचे ।।२।।
ब्रम्हहत्या जाली आसे तया स्थळी । प्रजन्न ते काळी पाणी नसे ।।३।।
चीदंबर दास म्हणे यात्रा दाटी । पाणीयाची तुटी बहुत तेथे ।।४।। १२७७०४

चीदंबरापासी सांगती येवोनी । गावीची ते कोन्ही आधीकारी ।।१।।
यात्रादाटी फार संकट पाण्याचे । करणे स्वामीचे आघटीत ।।२।।
प्राथकाळी यात्रा मीळली दर्षणा । दीड प्रहर जाण दीवस आला ।।३।।
दास म्हणे यात्रा मीळाली समोर । नीघे चीदंबर गुप्तरूपे ।।४।।

१२७७०५

यात्रेलागी भास स्वामी या वाड्यात । गावाबाहेर जात चीदंबर ।।१।।
शुद्राची ते कांता राखण सेतापासी । स्वामीराय तीसी वीच्यारीती ।।२।।
पाणी सांगे बाई कोटे या वोहोळासी । बोले ते स्वामीसी वेडा म्हणे ।।३।।
दास म्हणे तीसी बोले चीदंबर । त्रुशा आसे थोर मजलागी ।।४।।

१२७७०६

शुद्रकांता म्हणे वेडा हा ब्राम्हण । स्वामीपासी जाण पाणी मागे ।।१।।
गावामाजी आले स्वामी चीदंबर । पाणी ते सत्वर देतील तुज ।।२।।
हासोनीया स्वामी वोहोळाकडे जाती । पाणी आहे म्हणती वोहोळामाजी ।।३।।
दास म्हणे जाय चीदंबर तेथे । वाळु आपुले हाते उकरीती ।।४।।

१२७७०७

स्वामीरायें तेथे उकरीला झीरा । लागला तो झरा पाणी तेथे ।।१।।
वाहु लागी पाणी नीर्मळ ते जळ । पावन बा स्थळ करुनी दील्ही ।।२।।
पाद प्रक्षाळण स्वामी करीताती । ब्रम्हहत्या पळती उठाउटी ।।३।।
दास म्हणे तेथे हातपाय धुउनी । गुंडी ते भरोनी घेतलीसे ।।४।।

१२७७०८

हाती गुंडी भरुन स्वामी त्वरा करुन । चालताती जाण वाटेलागी ।।१।।
शुद्रकांता पुसे मीळाले का पाणी । स्वामी म्हणती भरुनी गुंडी आणीली ।।२।।
शुद्रकांता धावे वोहोळ पाहु जाय । पाणी वाहाताहे वोहोळ भरोनी ।।३।।
दास म्हणे आले चीदंबर वेगी । दर्षण यात्रेलागी देत आसे ।।४।।

१२७७०९

शुद्रकांता आली सांगे हर्षकरुन । वोहळ पाणी भरुन जात आसे ।।१।।
गावाच्या लोकासी यात्रा ते जनासी । आश्चर्य सर्वासी वाटले ते ।।२।।
सांगे शुद्रकांता ब्राम्हण आला येक । पाणी मज देख पुसीले ते ।।३।।
चीदंबर दास म्हणती लोक तीसी । ब्राम्हण आम्हासी दावी तोची ।।४।।

१२७७१०

आता ईतुक्यात आला गुंडी भरुनी । पाहाती नयनी चहुकडे ।।१।।
देखीले स्वामीसी ते वेळे द्रीष्टीने । म्हणे पाणी येणे भरुनी आणीले ।।२।।
वोळखोनी जाण आली स्वामीपुढे । स्वामीराया वेडे म्हणीतले ।।३।।
चीदंबर दास म्हणे शुद्रकांता । आन्याय आनंता घडली मज ।।४।।

१२७७११

आन्याई म्हणोनी जाती लोटांगणी । बोलीले टाकोनी स्वामी तुम्हा ।।१।।
क्षमा करी देवा आन्याय ते माझे । नोळखीले तुझे स्वरुप ते ।।२।।
सर्वालागी स्वामी म्हणताती जाण । गेलो मी कोटोन पाहाता तुम्ही ।।३।।
चीदंबर दास म्हणती यात्राजनी । आघटीत करणी स्वामी तुमची ।।४।।

१२७७१२

गावीचे आधीकारी आले लाहानथोर । क्रत उपकार केला स्वामी ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी भागीरथी आली । पाहीजे पुजीली पर्वणी हो ।।२।।
स्वयंपाक मीष्टान्न करोनी घरोघरी । नैवेद्य झडकरी न्यावा तेथे ।।३।।
नैवेद्य देवोनी करावे भोजन । नदीतीरी जाण आनंद तो ।।४।।
दास म्हणे लीलाधारी चीदंबर । दावी चमत्कार आनंत हे ।।५।। १२७७१३

चरीत्र ४०

बाहेर नीघाले ते स्वामी । गेले छवीचे मुकामी ।।१।।
यात्रा मीळे दुरदेसी । पानी नाही त्या वीहीरीसी ।।२।।
यात्रा गावकरी येती । करीती स्वामीसी वीनंती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे सर्वासी उत्तर ।।४।।

१२७७१४

स्वामी पुसती यात्रेसी । वोहोळ आसे या गावासी ।।१।।
म्हणती गाव यात्राजनी । नसे वोहोळासी पाणी ।।२।।
तेथे जाउनी चीदंबर । यात्रा आसे बरोबर ।।३।।
दास म्हणे हे कौतुक । स्वामी दावीतसे देख ।।४।।

१२७७१५

म्हणे उकरा वोहोळासी । पाणी लागतसे यासी ।।१।।
तेथ उकरीता जाण । पाणी चालले वाहोन ।।२।।
गावामाजी होती वीहीर । राहे पाणी तीतुके स्थीर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । खर्च वीहीरीचे पाण्यास ।।४।।

१२७७१६

पाणी बहुत खर्च जाले । वीहीरी तीतकेची भरले ।।१।।
गावकरी म्हणती जाण । वीहीर आटतसे जाण ।।२।।
आता पाणी ते न सरे । नवल केले चीदंबरे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाटे नवल सर्वास ।।४।।

१२७७१७

स्वामी राहती काही दीवस । तया गावी ते शण्मास ।।१।।
पाणी तैसेची वोहोळासी । वाटे नवल यात्रेसी ।।२।।
जाल्यावरी ते शणमास । स्वामी म्हणती यात्रेस ।।३।।
जाणे दुसर्या गावासी । पाणी नसे या वोहोळासी ।।४।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावीतो ईश्वर ।।५।।

१२७७१९

पाणी वीहीरीसी जे भरे । कदाकाळी ते न सरे ।।१।।
गावकरी लाहानथोर । वीनवीती वारंवार ।।२।।
होती पाण्याची दुर्भीक्ष । स्वामी दावीयेली साक्ष ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पाणी देतसे ईश्वर ।।४।।

१२७७१९

गावकरी वीनवीती । स्वामी दावीली प्रचीती ।।१।।
दरवर्ष पाण्यालागी । कोसावरी जाणे वेगी ।।२।।
क्रपा केली या गावासी । पाणी न आटे वीहरीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दया आली ते स्वामीस ।।४।।

१२७७२०

क्रपा केली स्वामीराया । आली आनाथाची दया ।।१।।
क्रपांवत माय होसी । पाणी केले या गावासी ।।२।।
धन्य स्वामी चीदंबरा । कलयुगी तु आवतारा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आनंद जाला त्या गावास ।।४।।

१२७७२१

क्रपा करोनी ईश्वरा । तारीयेली चीदंबरा ।।१।।
भेटी देई आम्हा वेगी । आवतार कलयुगी ।।२।।
तारी तारी पतीतासी । पावन आवतार होसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करीतो सर्वाचा उधार ।।४।।

१२७७२२

क्रपावंत दुजा कोन्ही । कदा नसे त्रीभुवनी ।।१।।
स्वामी पतीतपावना । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।२।।
आवतार मुगटमणी । तुची येक त्रीभुवनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । होसी आनंत आपार ।।४।।

१२७७२३

चीदंबर म्हणे त्यास । भक्ती बहुत तुम्हास ।।१।।
तुमच्या भक्तीसी ईश्वर । प्रत्यय दावीतसे थोर ।।२।।
थोर भक्त तुम्ही जाण । मी तो गरीब ब्राम्हण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुर्णब्रम्ह आवतार ।।४।।

१२७७२४

चरीत्र ४२

कुंदगोळामाझारी स्वामी चीदंबर । भेटीसी वानर आले तेथे ।।१।।
लाहान थोर जाण आले दोन सहश्र । दर्षणासी थोर समुदायेसी ।।२।।
आले ते गावात भय वाटे सर्वासी । स्त्री बाळे पुरुषासी आदी करुनी ।।३।।
चीदंबर दास म्हणे यात्रा दाटी । भयभीत पोटी होउनी ठेले ।।४।।

१२७७२५

म्हणती यात्राजन कोटोनी आलो वीन्ध । स्वामीचे दर्षण होय कैसे ।।१।।
वानर आपार भरलेती गांवात । न फीरे गल्लीत पुरुष कोन्ही ।।२।।
यात्रा कोन्ही कोन्ही येताती जपुन । वीनवीती जाण स्वामीलागी ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती यात्रेसी । नीर्भय मानसी आसु द्यावे ।।४।।

१२७७२६

चीदंबरी लीला आसे आघटीत । वर्तोनी दावीत उघड जनी ।।१।।
यात्रा दर्षणासी येवोनी पुसती । भय वाटे चीती सर्वाचीया ।।२।।
वानर बहुत मीळाले आसती । यावे कोणे रीती दरुषणासी ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर त्यासी । भय हे चीतासी न धरा कोन्ही ।।४।।

१२७७२७

वानर आलेती दर्षणासी जाण । न करीती वीघ्न कोन्हालागी ।।१।।
भक्तराज थोर आहेती वानर । गार्हाणे उत्तर सांगु आले ।।२।।
येवोनी वानर बैसले पंगतीसी । सभा कचेरीसी तयापरी ।।३।।
दास म्हणे पुसे चीदंबर त्यासी । आला दरुषणासी नीमीत्य काये ।।४।।

१२७७२८

हात जोडोनीया वानर बैसले । कायै ते बोलीले न कळे कोन्हा ।।१।।
वाटे जनालागी करीती कीजवीज । आंतरीचे गुज स्वामी जाणे ।।२।।
चीदंबर त्यासी उत्तर करीती । देतो बंदोबस्त करुनीया ।।३।।
दास म्हणे यात्रा पाहाती सर्वजन । न कळे भाषण उभयताचे ।।४।।

१२७७२९

स्वामीरायालागी पुसती थोरथोर । न कळे वीच्यार स्वामी याचा ।।१।।
चीदंबर सांगे शास्त्री पंडीतासी । आले फीर्यादेसी वानर हो ।।२।।
ईनामाचे सेत बहुत दीवसाचे । बंद केले यांचे हाकीमाने ।।३।।
चीदंबर दास म्हणे हे गाहाणे । फीर्यादीसी येणे स्वामीकडे ।।४।।

१२७७३०

चीदंबर बोले वानरासी मात । आसावे बा स्वास्त च्यार दीवस ।।१।।
स्वामीराया तेव्हा आज्ञा ते करोनी । आणवी दोन मण हरभरे ते ।।२।।
आणीताची क्षणी ठेवीले त्यापुढे । भक्षीती नीवाडे बैसोनीया ।।३।।
चीदंबर दास म्हणे हा प्रताप । स्वामी मायबाप त्रैलोक्याचा ।।४।।

१२७७३१

पुठाणे भाजोनी आणवीले काही । मांडीयले पाही त्याजपुढे ।।१।।
भक्षोनीया तेणे जाती पाण्यावरी । क्षुधा त्रशाहारी चीदंबर ।।२।।
दोन दीवस ऐसे ठेवोनी घेतले । बोलाउ धाडीले पाटीलासी ।।३।।
ज्याचे गावी होते सेत ईनामाचे । पाटील तेथीचे बोलावीले ।।४।।
चीदंबर दास म्हणे दर्षणासी । आले समुदायेसी गावकरी ।।५।।

१२७७३२

पाटील कुलकर्णी देसाई चौगुले । सर्व बोलावीले कारभारी ।।१।।
गाव च्यार येत सर्व ते मीळोनी । येती लोटांगणी स्वामीपुढे ।।२।।
हात जोडोनीया करीती वीनंती । स्वामीलागी म्हणती आज्ञा काये ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर त्यासी । आले फीर्यादेसी वानरशेना ।।४।।

१२७७३३

रामाचे हे दुत तुम्हासी ठाउक । जाळीयेली देख लांका येणे ।।१।।
यातील येकाने वीध्वंसीली लंका । गावा तुमचा देखा काय तेथे ।।२।।
ईनामाचे सेत कैसे बंद केले । पुर्वीपासोनी आले चालत जे ।।३।।
चीदंबर दास म्हणे यात्राजन । सर्व वर्तमान ऐकताती ।।४।।

१२७७३४

गांवकरी म्हणती शेत हाकीमाने । लावीले पैकाने दुसर्‍यासी ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी सर्वही मीळोन । हाकीमासी जाण पैका द्यावा ।।२।।
सर्व मीळोनीया सेत ते पेरोन । द्यावे पीकवोन याचे यासी ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणती तयासी । कल्याण तुम्हासी आसे यात ।।४।।
१२७७३५

बहुत दीवसांचा ईनाम तो यासी । सांगा हाकीमासी उमजोनी ।।१।।
गावकरी म्हणती आज्ञा स्वामीराजा । सेत माहाराजा देतो याचे ।।२।।
नीरोप देवोनी वानरासी जाण । जावे बा मीळोन संगे याचे ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणती गावीच्यासी । समजावोनी यासी न्यावे वेगी ।।४।।
१२७७३६

हात जोडोनीया करावी वीनंती । देतो तुम्हाप्रती सेत तुमचे ।।१।।
करवीली वीनंती स्वामीनी या रीती । यात्रा ते पाहाती लहानथोर ।।२।।
करोनी नमन नीघाले ते जाण । वानर ते शैन्य जाते जाले ।।३।।
दास म्हणे ऐसी लीला आघटीत । उघड दावीत चीदंबर ।।४।।
१२७७३७

चरीत्र ४३

चीदंबर दावी कळा । स्वामी ब्रम्हीचा पुतळा ।।१।।
दया समान सर्वासी । आनंत कोटीया जीवासी ।।२।।
स्वामी पतीतपावन । बोले मधुर वचन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दयाक्षमेचा सागर ।।४।।

१२७७३८

कुंदगोळीच्या कील्यासी । स्वामी होते संचारासी ।।१।।
मीश्रीकोट्यासी ते जाण । होता भावीक ब्राम्हण ।।२।।
चीदंबरावीण काही । त्यासी प्रीय नव्हते पाही ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी त्याजवर ।।४।।

१२७७३९

देशपांडे तो तेथीचा । पुत्र भावीक तयाचा ।।१।।
स्वामीआज्ञेवरुन जाण । करी दान धर्म यज्ञ ।।२।।
क्रपा स्वामीचे ते फार । देखुन आज्ञेचा नीर्धार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे भक्त प्रीयकर ।।४।।

१२७७४०

पुत्र आसे तो भावीक । त्याचा पीता दुष्ट देख ।।१।।
आसे म्हातारा तो जाण । बहुता प्रकारे दुर्जन ।।२।।
नाना आनाच्यार करुन । घातपात बहुत जाण ।।३।।
चीदंबर दास म्हणे । स्वामी न देती दर्षण ।।४।।

१२७७४१

पुत्र येता दर्षणासी । बहुत प्रीय तो स्वामीसी ।।१।।
पीता येतो बरोबर । व्रधा घालीती बाहेर ।।२।।
दर्षण न देती व्रधासी । क्रपा त्याचीया पुत्रासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । भावासारीखा ईश्वर ।।४।।

१२७७४२

जैसा भाव आसे ज्यासी । चीदंबर तैसा त्यासी ।।१।।
क्रपा देशपांड्यावरी । स्वामीलागी नेतो घरी ।।२।।
करी वीनंती स्वामीसी । यावे माझीया घरासी ।।३।।
दास म्हणे स्वामी त्यासी । म्हणती आज्ञा आयकसी ।।४।।

१२७७४३

आज्ञा ऐकतो ईश्वरा । स्वामी यावे माझ्या घरा ।।१।।
आज्ञा कराल बा जैसी । वर्तणुक करीन तैसी ।।२।।
स्वामी म्हणती येतो घरी । घाली पीत्यासी बाहेरी ।।३।।
जोवरी राहीन मी जाण । तोवरी जावे त्याणे नीघोन ।।४।।
दास म्हणे चीदंबर । सांगे वीप्रासी प्रखर ।।५।।

१२७७४४

देशपांडे आज्ञेवरुनी । घाली पीत्यासी दवडोनी ।।१।।
पाहोनी तयाचा नीर्धार । क्रपा करी चीदंबर ।।२।।
व्रधा हातीचे ते काही । घरामाजी तु न ठेवी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे भक्तासी नीर्धार ।।४।।

१२७७४५

सेत जमीन ते काही । लावी दसर्यासी पाही ।।१।।
पाप द्रव्य त्याचे जाण । मी तो न घेई ते आन्न ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । तुझे हातीचे दे मजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पाहे भक्तीचा नीर्धार ।।४।।

१२७४४६

नवे सेत मळेकरी । त्यात पीकतसे भारी ।।१।।
आटरा धान्य घरी जाण । जाला वीप्र तो सधन ।।२।।
भातपीक तो घरासी । स्वामी देववी दुसर्यासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करवी आज्ञेचा नीर्धार ।।४।।

१२७७४७

दील्ही संतती संपती । सुखी केले त्याजप्रती ।।१।।
परी पीत्यासी दर्षण । स्वामी न देती ते जाण ।।२।।
बहुत वीनवीले स्वामीसी । दील्हे दर्षण ब्रधासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन आवतार ।।४।।

१२७७४८

चरीत्र ४४

कुंदगोळाहुनी मीश्रीकोट्यालागी । जात आसे वेगी चीदंबर ।।१।।
यज्ञ केला होता तेथे ब्राम्हणाने । स्वामीराया जाणे आसे वेगी ।।२।।
मार्ग करुनी तेथे जात चीदंबर । खील्लार ते थोर आरण्यात ।।३।।
दास म्हणे वाटेवरी मेंढ्या जाण । चरती फीरोन चहुकडे ।।४।।

१२७७४९

खील्लार ते दोन्ही दोही बाजुलागी । जाता न ये वेगी मधुन ते ।।१।।
घोडे उभे करुनी पाहाती चहुकडे । खील्लार न पडे द्रीष्टीसी तो ।।२।।
हाकारीतो त्यासी ब्राम्हण बरोबरी । धणगार तो दुरी गेला आसे ।।३।।
दास म्हणे तेथे उभा चीदंबर । दावी चमत्कार तया वेळी ।।४।।

१२७७५०

कैसे जावे म्हणती वाट नसे जवळी । गुप्त तयावेळी खील्लार ते ।।१।।
स्वामीराये मार्गे आनंद करुन । जात आसे जाण यात्रेसहीत ।।२।।
मीश्रीकोट्यालगी यज्ञ तो करोन । आले ते फीरोन कुंदगोळासी ।।३।।
दास म्हणे तीकडे खील्लार धुंडीती । धनगर फीरती राणोमाळ ।।४।।

१२७७५१

आट दीवस जाण खील्लार धुंडती । परी तयाप्रती न सापडे ।।१।।
येकायेकी म्हणती कैसे जाले यासी । गेले ते आकासी पाताळी ते ।।२।।
सहश्रावदी मेढ्या क्षनामाजी गुप्त । फीरलो शोधीत आट दीवस ।।३।।
होवोनी बेजार करीती वीच्यार । गेला चीदंबर याची मार्ग ।।४।।
दास म्हणे आले स्वामीचे दर्षणा । येउ दे करुणा म्हणती स्वामी ।।५।।

१२७७५२

धणगर येवोनी करीती वीनंती । लोटांगणी जाती स्वामीपुढे ।।१।। शोध जाला
चीदंबरराया तारावे आम्हासी । आपाराधाच्या रासी आम्हाकडे ।।२।।
खील्लार धण्याचे आसे ते सरकारी । आली प्राणावरी आमुचीया ।।३।।
दास म्हणे आली स्वामीसी करुणा । घनगरासी जाण पुसताती ।।४।।

१२७७५३

कोण्या दीवसी तुमचे चुकले खील्लार । पुसे चीदंबर हासोनीया ।।१।।
धणगर म्हणती जाले आट दीवस । गेला ते वाटेस स्वामी तुम्ही ।।२।।
त्या दीवसापासोनी न पडले द्रीष्टी । आन्याय ते पोटी घाला आमुचे ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर त्यासी । बहुत तुम्हासी हाकारीले ।।४।।

१२७७५४

आयकोनी हाका न ये तुमच्या मना । आन्याय तो जाणा कोणाकडे ।।१।।
घेवोनीया आले नाही बरोबर । मेंढ्या तुमच्या फार काय जाले ।।२।।
खील्लार म्हणती जातीचे धणगार । आन्याई आपार स्वामी तुमचे ।।३।।
दास म्हणे बोले हासोनी ईश्वर । भोळे ते धणगर भक्त माझे ।।४।।

१२७७५५

म्हणती त्यासी स्वामी जावे आता तुम्ही । शोध करोनी आम्ही पाठवीतो ।।१।।
धणगर म्हणती आम्ही कोटे जावे । बहुत करुणाभावे वीनवीती ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी जावे त्या ठायासी । मेंढ्या त्या तुम्हासी सापडती ।।३।।
दास म्हणे ऐसे बोले चीदंबर । जाती ते धणगर तया ठाई ।।४।।

१२७७५६

मेंढ्या चरताती त्याची जागावरी । हर्षतो आंतरी धणगरासी ।।१।।
पाहीले द्रीष्टीसी खील्लार ते जाण । न गेली यातुन येक मेंढी ।।२।।
धन्य चीदंबरा कळा हे आपार । दील्हे त्या खील्लार आमुचे आम्हा ।।३।।
दास म्हणे फीरोनी आले स्वामीपासी । साखर यात्रेसी वाटीताती ।।४।।

१२७७५७

हर्ष करुनी येती लोटांगणी जाण । आवतार पुर्ण स्वामीराया ।।१।।
धन्य मायबापा कळा आघटीत । मेंढ्या त्या जाग्यात होत्या कैशा ।।२।।
धनगर म्हणती ईश्वर तु खरा । स्वामी चीदंबरा प्रगट जगी ।।३।।
दास म्हणे ऐसी लीला वीश्वंभर । दावी चीदंबर नीत्य नवी ।।४।।

१२७७५८

येती लोटांगणी धनगर ते जाण । आवतार सगुण स्वामीराया ।।१।।
आपार हे कळा न कळे कोणासी । दावीले द्रीष्टीसी उघड आम्हा ।।२।।
सगुण आवतार प्रगट ईश्वर । स्वामी चीदंबर कलयुगी ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माये । कोमळ ह्रदये तुमचे देवा ।।४।।

१२७७५९

चरीत्र ४४

स्वामी होते धारवाडासी । दावी प्रत्यय सर्वासी ।।१।।
यात्रा जन भवताले । थोर थोर ते बैसले ।।२।।
शास्त्र सपंन्न पंडीत । वैदीक थोर ते ग्रहस्त ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बैसे आनंदे ईश्वर ।।४।।

१२७६६०

येकायेकी उभे राहाती । स्वामी सर्वासी म्हणती ।।१।।
माहाथोर ते समर्थ । भेटी येतसे दैवत ।।२।।
कोमारस्वामी सारीखे जाण । स्वामी येताती चालोन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उभा राहे तो ईश्वर ।।४।।

१२७६६१

पुढे चालोनीया जाती । यात्रा द्रीष्टीने पाहाती ।।१।।
धोत्रे आंग बस्त्र शोभा । उभा चैतन्याचा गाभा ।।२।।
दीव्य वीभुती ते भाळी । तेज दीशे चेंद्रमौळी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उभा सगुण ईश्वर ।।४।।

१२७७६२

भेटी येतसे दैवत । स्वामी सर्वासी सांगत ।।१।।
यात्राजन ते पाहाती । स्वामी आश्चर्य सांगती ।।२।।
नवल वाटे यात्राजनी । सर्व पाहाती नयनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी तो ईश्वर ।।४।।

१२७७६३

थोर उंच तो पुरुष । दीशे सन्यासी तो वेश ।।१।।
थोर खडावा चरणी । येता देखीला तीकडोनी ।।२।।
भागवी शाटी आंगावरी । दीव्य तेज ते शरीरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । चालोनी जातसे समोर ।।४।।

१२७७६४

आजानुबाहु पुरुष थोर । आला स्वामीचे समोर ।।१।।
नमस्कार करजोडोनी । करीती उभयता दोन्ही ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । क्षणभर बैसावे स्थळासी ।।३।।
पाट मांडोनी ठेवीला । स्वामी बोलावी तयाला ।।४।।
दास म्हणे चीदंबर । आग्रह करीताती फार ।।५।।

१२७७६५

रुषी म्हणे तो स्वामीसी । द्यावी आज्ञा हे मजसी ।।१।।
तुम्हा देखताची जाण । जाले माझे समाधान ।।२।।
आता बैसणे कासया । आज्ञा द्यावी स्वामीराया ।।३।।
चीदंबरा दास म्हणे । बळे बैसवीले जाणे ।।४।।

१२७७६६

खडावासहीत पाटावरी । आज्ञा मान्य तोही करी ।।१।।
पाय जोडोनी समान । बैसे नीमष तो जाण ।।२।।
वेगी उठोनी स्वामीसी । नमन करी सभ्दावेसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । देती नीरोप सत्वर ।।४।।

१२७७६७

पुढे जाता पाउले च्यार । स्वामी जवळी थोर थोर ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । माहा समर्थ हे रुषी ।।२।।
करा आग्रह पुडी । घरा नेउनी स्वामीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पाटी लावी थोर थोर ।।४।।

१२७७६८

धावोनी गेले वेगी पुढे । कोटे द्रीष्टी तो न पडे ।।१।।
पाहातात चहुकडे । येथोनी गेला कोणीकडे ।।२।।
वेडे होवोनी पाहाती । बहुता परी ते शोधीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाटे नवल सर्वास ।।४।।

१२७७६९

द्रीष्टी पुढे कोठे गेले । याची ठाई गुप्त जाले ।।१।।
करीती स्वामीसी वीनंती । द्रीष्टी न पडे आम्हासी ।।२।।
त्यासी म्हणे चीदंबर । समर्थ आसती ते थोर ।।३।।
दास म्हणे वीश्वंभर । दावी लीला चीदंबर ।।४।।

१२७७७०

थोर थोर ते दैवत । स्वामी दर्षणासी येत ।।१।।
आसे धणी त्रैलोक्यासी । चीदंबर या सर्वासी ।।२।।
नेणताती मंदमती । प्रत्यय पाहाती नानारीती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कलयुगी आवतार ।।४।।

१२७७७१

चरीत्र ४६

कुसीगलामाजी होते चीदंबर । दावी चमत्कार यात्रेलागी ।।१।।
पुर्णब्रम्ह जाला कलयुगी आवतार । देव थोर थोर भेटी येती ।।२।।
प्रत्यय पाहोनी भेटीलागी येती । वीनंती ती करीती ईछा जैसी ।।३।।
चीदंबर दास म्हणे वीश्वंभर । कळा हे आपार दावीतसे ।।४।।

१२७७७२

माहाथोर क्षेत्र तुंगभद्रातीरी । ईश्वर तो करी लीला तेथे ।।१।।
तया क्षेत्रालागी बहुत होती साक्ष । हांपी वीरुपाक्ष पंत नामा ज्याची ।।२।।
वेशासहीत वीप्र घेतला पींडीत । वीरुपाक्षपंत नाम ज्याचे ।।३।।
चीदंबर दास आद्यापी ते साक्ष । हांपी वीरुपाक्ष नाम तेची ।।४।।

१२७७७३

तोची ईश्वर येत दरुषणालागुनी । आसे जया स्थानी चीदंबर ।।१।।
सगुण ब्रम्ह स्वामी चीदंबर जाण । द्यावया दरुषण वीरुपाक्षा ।।२।।
स्वरुप धरीले माहासर्प थोर । द्रीष्टी चीदंबर पाहावया ।।३।।
दास म्हणे आला फणीसर्प थोर । पाहाती नारीनर यात्राजन ।।४।।

१२७७७४

नीट वाट धरुन येतसे चालुन । फणी उभारून ठाई ठाई ।।१।।
पाहाती सर्वजन आला तो चालोन । देउळात जाण मारुतीच्या ।।२।।
थोर आजगर वेटाळे घालुन । फणी उभारुन बैसलासे ।।३।।
चीदंबर दास म्हणे यात्राजन । सांगती येउन स्वामीलागी ।।४।।

१२७७७५

यात्रासहीत दाटी स्वामी चीदंबर । येतसे सत्वर पाहावया ।।१।।
फणी उभारोनी पाहातसे द्रीष्टी । चीदंबर भेटी येती म्हणोनी ।।२।।
स्वामी आले म्हणुन येती यात्राजन । पाहाती थोर लाहन लीला द्रीष्टी ।।३।।
दास म्हणे करी आज्ञा चीदंबर । आणावे सत्वर दुध पुजा ।।४।।

१२७७७६

हरीद्रा ते कुंकु आणवी धुपदीप । आसे मायबाप चीदंबर ।।१।।
सर्वही जीवाचे जाणे तो आंतर । आसे चीदंबर वीश्वपती ।।२।।
पुजा ते करोन दुध वाटीभर । ठेवी त्यासमोर सर्पापुढे ।।३।।
चीदंबर म्हणे दुध प्यावे वेगी । दावी प्रत्यय जगी दासालागी ।।४।।

१२७७७७

फणीवर सर्प पाहे स्वामीकडे । सांगते नीवाडे उघड स्वामी ।।१।।
समर्थ आपण हांपी वीरुपाक्ष । दावावया साक्ष आला येथे ।।२।।
आनंदे करोनी राहावे दोन दीवस । दुध फराळास घ्यावे स्वामी ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो फणीवर । दुध वाटीभर पीवोनी बैसे ।।४।।

१२७७७८

पाहाती यात्राजन सर्व नारीनर । उघड चीदंबर लीला दावी ।।१।।
दुसरे दीवसी स्वामी पुजेचा संभार । घेउनी चीदंबर येती आंगे ।।२।।
दुसरे दीवसी पुजा केली याची रीती । द्रीष्टीने पाहाती यात्राजन ।।३।।
दास म्हणे स्वामी जगाचा जनक । दावीतो कौतुक चीदंबर ।।४।।

१२७७७९

तीन रात्री राहाणे लागे देवापासी । आज्ञा चौथे दीवसी मागतसे ।।१।।
न कळे कोनासी ईश्वराची कळा । पाहाताती डोळा यात्राजन ।।२।।
घेवोनी नीरोप नीघता जाला सर्प । पाहाता स्वरुप वीक्राळ तो ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर धणी । भीउ नये कोन्ही दैवत हे ।।४।।

१२२२८०

वाटेसी चालता पाहाती लाहानथोर । जाला फणीवर गुप्त तेथे ।।१।।
सर्वयात्रा पाहाती उघड द्रीष्टीसी । न कळे कळा कैसी ईश्वराची ।।२।।
चीदंबर स्वामी सांगती सर्वासी । आले दरुषणासी वीरुपाक्ष ।।३।।
दास म्हणे ऐसा चीदंबर धणी । दर्षणा लागोनी देव येती ।।४।।

१२७७८१

प्रगट आवतार जाला कलीयुगी । चीदंबर जगी लीला दावी ।।१।।
न कळे आज्ञाना वीकल्पी नरासी । गुळाची खरासी गोडी काय ।।२।।
पतीतपावन जाला आवतार । करीतो उधार सर्वालागी ।।३।।
दास म्हणे सगुण ब्रम्ह चीदंबर । कलीयुगी आवतार स्वामी माझा ।।४।।

१२७७८२

चरीत्र ४७

पुर्णब्रम्ह आवतार । स्वामी माझा चीदंबर ।।१।।
लीला दावी तो आपार । भेटी येती हरीहार ।।२।।
जाला सगुण आवतार । करीतो बहुताचा उधार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीत पावन आवतार ।।४।।

१२७७८३

शुभ्रमणी भेटी येती । उघड यात्रा ते पाहाती ।।१।।
स्वामी म्हणती भीउ नये । शुभ्रमणी येती पाहे ।।२।।
थोर होवोनी आजगर । वाटे येती फणीवर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । यात्रा दाटी ते समोर ।।४।।

१२७७८४

शुभ्रमणी येत आसे । यात्रा सर्व पाहातसे ।।१।।
आला स्वामीचे जवळ । बैसे घालोनी वेटाळ ।।२।।
करुनी स्वामीसी नमन । बैसे फणी उभारोन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी करी नमस्कार ।।४।।

१२७७८५

दुध साखर आणवीती । वाटी भरोनी ठेवीती ।।१।।
शुभ्रमणी पीत आसे । यात्रा दाटी पाहातसे ।।२।।
दुध पीवोनीया जाण । स्वामी करीती भाषण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी म्हणती आला दुर ।।४।।

१२७७८६

काय ईछा ते मानसी । स्वामी पुसती तयासी ।।१।।
सांगे स्वामीचे कानासी । भाष न कळे कोणासी ।।२।।
स्वामी करीती उतर । सुटका करील ईश्वर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोले उघड प्रखर ।।४।।

१२७७८७

बैसे आनंदे करुन । स्वामी बरोबरी जाण ।।१।।
यात्रा पाहातसे दाटी । नवल देखीयले द्रीष्टी ।।२।।
धन्य म्हणती चीदंबरा । कौतुक दावीसी ईश्वरा ।।३।।
चीदंबरा दास म्हणे । आघटीत लीला हे दावणे ।।४।।

१२७७८८

मागे नीरोप स्वामीसी । शुभ्रमणी त्या वेळेसी ।।१।।
स्वामी म्हणती जाले उष्ण । जावे सकाळी उठोन ।।२।।
वीनवीतो शुभ्रमणी । आज्ञा द्यावी याचीक्षणी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया सांगती उतर ।।४।।

१२७७८९

स्वामी म्हणती तयासी । वगीयावे बा स्थळासी ।।१।।
भक्तराज तुम्ही थोर । शुभ्रमणी तु ईश्वर ।।२।।
आज्ञा घेवोनीया जाण । करी स्वामीसी नमन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया जोडीताती कर ।।४।।

१२७७९०

वेगी नीघे शुभ्रमणी । यात्रा पाहाती नयनी ।।१।।
गावाबाहीर जाउन । यात्रा पाहाती दुरोन ।।२।।
तेथे जाउनी गुप्त जाले । नवल सर्वासी वाटले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । येवोनी सांगती स्वामीस ।।४।।

१२७७९१

बाहीर जावोनी गुप्त जाले । स्वामीलागी नीवेदीले ।।१।।
स्वामी म्हणती शुभ्रमणी । आले दर्षणालागोनी ।।२।।
तया कोणते कठीण । जाता न लगे येक क्षण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती सर्वास ।।४।।

१२७७९२

दावी आघटीत कळा । स्वामी ब्रम्हीचा पुतळा ।।१।।
आवतार जाला सगुण । चीदंबर ब्रम्हपुर्ण ।।२।।
आसे पतीतपावन । दीन जनाचे जीवन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करीतो जगाचा उधार ।।४।।

१२७७९३

चरीत्र ४८

चीदंबर दावी लीला हे आपार । नेणती गौव्हार मानव ते ।।१।।
सहजस्तीती दावी आपुली हे कळा । ब्रम्हीचा पुतळा स्वामी माझा ।।२।।
येके दीवसी बोले कारकुन जाण । स्वंयपाकी उटोन गेला घरी ।।३।।
दास म्हणे नाही समाधान त्यासी । चीदंबरापासी सांगताती ।।४।।

१२७७९४

स्वामी बोलावीती मल्लापा ब्राम्हण । स्वयंपाक तु जाण करी आधी ।।१।।
बोलॆ तो स्वामीसी नयॆ मज काही । स्वयंपाक तो पाही करु कैसा ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी जावॆ स्वंयपाकासी । नीमीत्य तुजसी करणॆ मज ।।३।।
दास म्हणॆ ऐसॆ बोलॆ चीदंबर । हासोनी उत्तर वीप्र करी ।।४।।

१२७७९५

स्वामीराया तुम्ही स्वयंपाक करीता । करणॆ लागॆ आता मज सर्व ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी पाहावा प्रत्यय । बोलसी तु काय वायाची हो ।।२।।
बरॆ म्हणोनीया गॆला तो ब्राम्हण । स्वयंपाक करुन दावीतसॆ ।।३।।
चीदंबर दास म्हणॆ तो स्वयंपाक । जाला आसॆ दॆख त्वरा करुनी ।।४।।

१२७७९६

न कळॆ ब्राम्हण कैसा जाला पाक । नवल तो दॆख करीतसॆ ।।१।।
म्हणॆ तो चीतात न कळॆ मज कळा । आठवी वॆळोवॆळा मनामाजी ।।२।।
दुसरॆ दीवसी जाणा करीता स्वयंपाक । हाट धरोनी दॆख पाहातसॆ ।।३।।
दास म्हणॆ दावी प्रत्यय ईश्वर । उघड चीदंबर लीला दावी ।।४।।

१२७७९७

करोनीया कडबु धातीले हंड्यात । प्रचीत पाहत बळेकरोनी ।।१।।
नीमीत्यासी ठेवी चुल्हीवर जाणा । न लगता क्षण उतरीले ।।२।।
ठेवी भमीवरी हांडा उतरोनी । सीजताती जाण कडबु त्यात ।।३।।
दास म्हणे त्यासी न लावीता आगनी । वाफ ते येवोनी उतु येतो ।।४।।

१२७७९८

नवल करी वीप्र आपुल्या चीतात । कैसे सीजत आगनीवीण ।।१।।
उघड दावी कळा चीदंबर नयनी । आगनी ते वाचोनी सीजताती ।।२।।
आश्चर्य तो करी आपुल्या चीतात । नवल आघटीत डोळा दीसे ।।३।।
दास म्हणे पुसे स्वामी तयालागी । स्वंयपाक तो वेगी जाला कैसे ।।४।।

१२७७९९

सांगे स्वामीलागी ब्राम्हण तो जाण । पाहीला दाटोन प्रत्यय तो ।।१।।
सत्य स्वामीराया करीसी तु स्वयंपाक । दावीले कवतुक चीदंबरा ।।२।।
आघटीत कळा तुझे वीस्वपती । मानवासी भ्रांती घालीसी का ।।३।।
दास म्हणे वीप्र लोटांगण जाय । आनाथाची माय चीदंबर ।।४।।

१२७८००

चीदंबरराया दावीसी कवतुक । नेणे ब्रम्हादीक आंत तुझा ।।१।।
क्रपा करोनीया सामर्थ्य दावीसी । बाहेर काढीसी बळे करुनी ।।२।।
व्हावे बा प्रगट वेगी ईश्वंभरा । आनाथासी करा दया आता ।।३।।
दास म्हणे कीती पाहावीसी वाट । आनाथासी भेट देई आता ।।४।।

१२७८०१

प्रगट हे लीला करी आता वेगी । आवतार जगी कळवी तुझा ।।१।।
कोठवरी आंत घ्यावा बा आनंता । प्रगट भगवंता व्हावे वेगी ।।२।।
करीतो प्रार्थना क्रपेच्या नीधाना । आवतार सगुणा रुप दावी ।।३।।
दास म्हणे होसी क्रपावंत धणी । आघटीत करणी चीदंबरा ।।४।।

१२७८०२

नींदीती दुर्जन करु पाहाती घात । नानापरी मात ऐकतसे ।।१।।
कैसे तुम्हा वाटे चीदंबरा आता । प्रगट भगवंता व्हावे वेगी ।।२।।
नको वेळ करु स्वामी ईश्वंभरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।३।।
दास म्हणे तुम्हा करणे हे आगत्य । आवतारक्रत्य चीदंबरा ।।४।।

१२७८०३

आवतार करणी दावी बा नयनी । गांजीलॆ द्रष्टानी बहुत आता ।।१।।
प्रगट होवोनी संव्हारी द्रुष्टासी । आवतार श्रीष्टीसी कळवी तुझा ।।२।।
यॆउ दॆ करुणा मज पतीताची । पावन ब्रीदाची लज्या रक्षी ।।३।।
दास म्हणॆ होसी माय चीदंबरा । सांगणॆ ईश्वरा तुम्हा काय ।।४।।

१२७८०४

चरीत्र ४९

लीला दावी चीदंबर । ज्यासी नसॆ आंतपार ।।१।।
आंत न कळॆ दॆवासी । कळा आघटीत ऐसी ।।२।।
उघड दावीतसॆ लीला । आंत न कळॆ कोणाला ।।३।।
दास म्हणॆ चीदंबरा । पुर्णब्रम्ह आवतारा ।।४।।

१२७८०५

क्रपा करोनीया जाण । बळॆ होतसॆ प्रसन्न ।।१।।
ब्राम्हण यॆक दुरदॆसी । आला स्वामीचॆ भॆटीसी ।।२।।
आसॆ दरीद्रॆ पीडीला । ब्राम्हण भक्तराज भला ।।३।।
म्हणॆ चीदंबर दास । वीप्र आला कुंदगोळास ।।४।।

१२७८०६

दाटी यात्रेची बहुत । थोर थोर दुरी राहात ।।१।।
कोण पुसे गरीबासी । दर्षण दुर्लभ तयासी ।।२।।
चींद्या पागोटा डोईसी । जवळी नसे खर्चायासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बहुत भक्ती बा तयास ।।४।।

१२७८०७

बैसे गावाचे बाहेर । यात्रादाटी आसे फार ।।१।।
स्वामी स्मरण करोन । बोलावीला कारकुन ।।२।।
वीप्र आलासे पुण्याचा । शोध करावा तयाचा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया आणवी सत्वर ।।४।।

१२७८०८

स्वामी पुसती तयासी । जेवीला की उपवासी ।।१।।
वीप्र म्हणे भोजन जाले । बळे चोरोनीया बोले ।।२।।
स्वामी म्हणती तयास । दोन दीवसाचा उपवास ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती तयास ।।४।।

१२७८०९

दोन भक्षील्या खारका । तीन दीवस जाले देखा ।।१।।
घरी घेवोनीया गेले । तया श्नान करवीले ।।२।।
धहीभात आणउन । तया घातले भोजन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । काय ईछा म्हणती त्यास ।।४।।

१२७८१०

लजीत होउन न बोले । म्हणे दरीद्रे व्यापीले ।।१।।
स्वामी म्हणती ईछा हेची । ईछा धरीली दासीची ।।२।।
चींता न करी मानसी । देतो नीरोप तुजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दील्हे तांदुळ तयास ।।४।।

१२७८११

दील्हा रुपया तयासी । वेगी जावे म्हणती त्यासी ।।१।।
बहुत आनंदे करुन । स्वामी करीती भाषन ।।२।।
दील्हे तांदुळ तुजसी । चींता न करी मानसी ।।३।।
दील्ही बांधोनी गाटोडी । घरी जावोनीया सोडी ।।४।।
म्हणे चीदंबर दास । दील्हा रुपया खर्चास ।।५।।

१२७८१२

दील्हे तांदुळ बांधुन । वाट सर्च रुपया जाण ।।१।।
भाग्य आले उदयासी । सुखे जावे बा घरासी ।।२।।
दील्हे द्रव्य हे तुजसी । चींता न करी मानसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आम्ही होतो त्या वेळेस ।।४।।

१२७८१३

वीप्र आनंदे करुन । गेला नीरोप घेउन ।।१।।
जाले तांदुळाचे सोने । ऐसे आघटीत करणे ।।२।।
लीलाधारी वीश्वंभर । स्वामी माझा चीदंबर ।।३।।
दास म्हणे दावी कळा । आसे ब्रम्हीचा पुतळा ।।४।।

१२७८१४

लीलाधारी चीदंबर । कलयुगी आवतार ।।१।।
रंकाचा तो राव करी । लीला दावी नानापरी ।।२।।
ऐसा पतीतपावन । आवतार ब्रम्हपुर्ण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । नीववी सर्वाचे आंतर।।४।।

१२७८१५
चरीत्र ५०

यज्ञाच्या कथा

चीदंबरा तुझी आघटीत कळा । दावीयेले डोळा उघड जनी ।।१।।
कलीमाजी यज्ञ करुनी दावीसी । प्रताप कळवीसी आपुला तु ।।२।।
येज्ञामाजी वीन्ध करीताती बहुत । दावीसी प्रचीत सर्वालागी ।।३।।
दास म्हणे कीती सांगावा वीस्तार । नसे अंतपार सामर्थ्यासी ।।४।।

१२७८१६

ब्राम्हण तो आला यज्ञामाजी जाण । चोरी तो आपण करीतसे ।।१।।
पाहोनीया संधी तेणे येके दीवसी । चोरी करायासी प्रवर्तला ।।२।।
तुपाचे तपेले होते तुप भरुन । घेतले उचलोन डोईवरी ।।३।।
चीदंबरा दास म्हणे तो ब्राम्हण । यात्रेबाहीर जाणा जाता झाला ।।४।।

१२७८१७

घागर भरोनी तुप आसे डोईवरी । तपेल्यामाझारी घातलेसे ।।१।।
यात्रा उतरली गेला तो बाहेरी । गुप्त मार्ग धरी वेगी चाले ।।२।।
जाता तो वाटेने डोळ्यासी न दीसे । जाला आंध पीसे क्षनामाजी ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । वीप्र तो आंधळा होउनी फीरे ।।४।।

१२७८१८

मन जाले वेडे फीरे चहुकडे । न दीसे रोकडे प्रत्यय हा ।।१।।
उभा राहोनीया करीतो रुदन । हाकारीतो जाण यात्रेलागी ।।२।।
मीळाले भवताले यात्रजन लोक । पुसताती देख तयालागी ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतो रुदन । न्यावे म्हणे जाण स्वामीपासी ।।४।।

१२७८१९

आन्याई आपराधी आसे मी बहुत । न बोलवे मात आणीक त्यासी ।।१।।
न्यावे स्वामीपासी करीतो प्रार्थना । ऐका वीज्ञापना माझी कोन्ही ।।२।।
न्यावे स्वामीपासी मजलागी जाण । सर्व वर्तमान कळेल तेथे ।।३।।
दास म्हणे यात्रा मीळाले ते जन । नेती हाती धरुन स्वामीपासी ।।४।।

१२७८२०

डोईवरी आसे तुपाचे तपेले । जन भवताले यात्रा दाटी ।।१।।
स्वामी आले तेथे पुसती तयासी । काय म्हणोनी ऐसी गती जाली ।।२।।
न दीसे डोळ्यासी आन्याय तो काय । सत्य स्वामीपाय जाणताती ।।३।।
दास म्हणे सांगे वीप्र स्वामीपासी । आन्यायाची रासी आसे तुमचा ।।४।।

१२७८२१

तुपाचे तपेले नेत होतो आता । चोरोनी भगवंता येथोनीया ।।१।।
यात्रेबाहीर जाता नेत्र आंध जाले । वाट ते न चले काय करु ।।२।।
सीक्षा मज जाली स्वामीराया फार । आन्याई आपार आसे बहुत ।।३।।
दास म्हणे वीप्र जोडोनीया हात । लोटांगणी जात स्वामीपुढे ।।४।।

१२७८२२

घागरभर तुप तपेल्यासहीत । उतरोनी ठेवीत स्वामीपुढे ।।१।।
सीक्षा जाली फार आन्याई आपार । दावी डोळेभर रुप आता ।।२।।
आन्यायाची रासी क्षमा तु करीसी । मज पतीतासी तारी आता ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतो वीनंती । स्वामी त्यासी म्हणती स्थीर व्हावे ।।४।।

१२७८२३

चीदंबर म्हणे तया ब्राम्हणासी । रक्षन यागासी यज्ञेश्वर ।।१।।
करोनी प्रार्थना मागावे तयासी । नेत्र बा तुजसी देईल तो ।।२।।
रडोनीया वीप्र करी तो वीनंती । कळा तुमचे हाती सर्व आसे ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर त्यासी । ईश्वर तुजसी नेत्र देतो ।।४।।

१२७८२४

करुनी प्रार्थना बोलो तो ब्राम्हण । नोत्र योती जाण कधी देवा ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी दीसोल नोत्रासी । उतावोळ ऐसी करु नयो ।।२।।
करोनी प्रार्थना घोतो मी मागुन । आटा दीवस जाण नोत्र योती ।।३।।
दास म्हणो लीला दावी चीदंबर । पाहाती लाहान थोर नरनारी ।।४।।

१२७८२५

आट दीवसा नोत्र आलो ब्राम्हणासी । धाक तो चोरासी पडो तोथे ।।१।।
यज्ञ समारंभ आनंद आपार । धाक सर्वावर आसो ज्याचा ।।२।।
चीदंबर धणी आसो त्रैलोक्यासी । कळा दावी ऐसी नानापरी ।।३।।
दास म्हणो धाक दोवा राक्षसासी । चीदंबर ऐसी कळा दावी ।।४।।

१२७८२६

चरीत्र ५१

यज्ञ समारंभ थोर । करीतसो चीदंबर ।।१।।
दोवादीक सर्व योती । गुप्त प्रगट दीसती ।।२।।
दावी लीला चीदंबर । आला राक्षस तो थोर ।।३।।
दास म्हणो चीदंबर । कळा दावी तो ईश्वर ।।४।।

१२७८२७

आला थोर तो राक्षस । वीन्घ करावे यज्ञास ।।१।।
आला परीक्षा पाहावया । आपली लोपोनीया काया ।।२।।
कोन्ही नोळखे तयासी । स्वामी आले त्याजपासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया वर्णीतसे थोर ।।४।।

१२७८२८

क्रपा करोनी आपण । आला यज्ञालागी जाण ।।१।।
बहुत केला उपकार । आपण दयावंत फार ।।२।।
गळीत जाला अभीमान । आला राक्षस शरण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी आवतार ।।४।।

१२७८२९

राक्षस वीनवी स्वामीसी । भयभीत तो मानसी ।।१।।
ज्याचा धाक त्रैलोक्यासी । तोची देखीला द्रीष्टीसी ।।२।।
देवा राक्षसासी धाक । तोची सगुण जाला देख ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया म्हणतसे थोर ।।४।।

१२७८३०

राक्षस येतो लोटांगणी । उभा कर तो जोडोनी ।।१।।
धाके कापे थरथरा । क्रपा करी चीदंबरा ।।२।।
महीमा न कळता जाण । आलो येथे मी चोरुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । थोर भय राक्षसास ।।४।।

१२७८३१

करी वीनंती स्वामीसी । आलो शरण पायासी ।।१।।
शरणांगता रक्षी आता । द्यावा नीरोप आनंता ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । तुम्ही आलेती यज्ञासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी राहे म्हणती स्थीर ।।४।।

१२७८३२

पाहावया यज्ञ समारंभ । आता जालासे प्रारंभ ।।१।।
यज्ञ जाल्यावरी जाण । जावे नीरोप घेउन ।।२।।
नीत्य नैवेद्य प्रसाद । द्यावा भाग्य हे आगाध ।।३।।
म्हणे चीदंबर दास । ठेउनी घेती राक्षसास ।।४।।

१२७८३३

थोर दगड रोवीला । तेथे स्थळ राक्षसाला ।।१।।
रक्षण करावे यज्ञासी । राहावे म्हणती चौकीसी ।।२।।
आसे तुमचा भरवसा । बलवान तुमचा ठसा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाला संतोष दैत्यास ।।४।।

१२७८३४

दगड रोवोनी टेवती । सर्व द्रीष्टीसी पाहाती ।।१।।
नीत्य च्यार पाईली आन्न । तया घालीती भोजन ।।२।।
नाना पक्वान्न जे होती । हारे बरोनी आणीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । त्रप्त केले राक्षसास ।।४।।

१२७८३५

यात्रा मीळालीसे दाटी । सर्व पाहातात़ी द्रीष्टी ।।१।।
यज्ञालागी बहुत जन । लक्षावत मीळती जाण ।।२।।
सर्व पाहाती कौतुक । येथे येती देवादीक ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी आवतार ।।४।।

१२७८३६

यज्ञ समारंभ थोर । नाना होती चमत्कार ।।१।।
आंत न कळे कोनासी । चीदंबरी कळा ऐसी ।।२।।
देवादीक जेथे येती । त्रप्त होउनीया जाती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुर्णब्रम्ह आवतार ।।४।।

१२७८३७

चरीत्र ५२

चीदंबर करी यज्ञ माहाथोर । मीळाले आपार यात्रा दाटी ।।१।।
साहीत्य यज्ञासी कोनीकडुन येत । न लागे तो आंत थोरथोरा ।।२।।
खरीदी करोनी दावी संपादनी । चीदंबर धणी सुत्रधारी ।।३।।
दास म्हणे दावी कौतुक जगासी । न कळे आज्ञानासी काय कीजे ।।४।।

१२७८३८

दावीतो कौतुक बळे चीदंबर । न लगे आंतपार साहीत्याचा ।।१।।
आणवीती बहुत गोण्या तांदुळाच्या । सांगे खरीदीच्या आणवीतो ।।२।।
खरीदीच्या येती गोण्या जीतुक्या काही । लीहोनीया पाही चीट्या येती ।।३।।
दास म्हणे दावी कौतुक ईश्वर । प्रगट चीदंबर लीला करी ।।४।।

१२७८३९

येके दीवसी होता उभा तो ब्राम्हण । स्वामी आले जाण त्याजपासी ।।१।।
सदासीवपंत नाम आसे जाण । दावीताती खुण स्वामी त्यासी ।।२।।
उभ राहे म्हणती गोण्या येथे येती । लीहोनीया पावती द्यावी त्यासी ।।३।।
दास म्हणे दावी कळा चीदंबर । आल्या गोण्या फार येकदाची ।।४।।

१२७८४०

उभा आसे जाण तेथे कारकुन । पाहे तो द्रीष्टीने कौतुक ते ।।१।।
गोण्या येती बहुत तांदुळाच्या जाण । देताती लोटुन गुप्तरुपे ।।२।।
पुसे तो ब्राम्हण गोण्या कोटील । न बोलती बोल मुखेंकरुनी ।।३।।
दास म्हणे गोण्या लोटोनीया जाती । दावी तो प्रचीती चीदंबर ।।४।।

१२७८४१

बळे कारकुन पुसे बैलक्यासी । सांगावे मजसी कोटील तुम्ही ।।१।।
म्हणती ते वाणी काय तुम्ही पुसता । ठाउक हे वार्ता नसे आम्हा ।।२।।
मागुन येत आसे पुसावे तयासी । जाणे हे आम्हासी त्वराकरुनी ।।३।।
चीदंबर दास म्हणे बळे येती । गोण्या लोटुन जाती वेगेकरुनी ।।४।।

१२७८४२

बळे पुसतसे कारकुन त्यासी । मोजोनी तुम्हासी पत्र देतो ।।१।।
कासयासी आम्हा व्हावे ते पावती । मागोनीया येती पुसा त्यासी ।।२।।
मागोन आणीक येती गोण्या बहुत । लोटोनीया जात तेही तैसे ।।३।।
दास म्हणे कळा आसे आघटीत । उघड दावीत चीदंबर ।।४।।

१२७८४३

संध्याकाळ जाला उभा कारकुन । न पुसे ते जाण कोन्ही त्यासी ।।१।।
मुकाट्याची गोण्या लोटोनीया जाती । गोण्या हे राहाती तैस्या तेथे ।।२।।
आश्चर्य करीतो कारकुन चीती । चीदंबर क्रती न कळे कोन्हा ।।३।।
दास म्हणे आला स्वामीपासी जाण । सांगे वर्तमान सर्व तेथे ।।४।।

१२७८४४

स्वामी पुसताती गोण्या मोजीयल्या । लीहोनी घेतल्या सांगे कीती ।।१।।
कारकुन बोले लीहोनीया घ्यावे । बळे ते पुसावे न बोलती ।।२।।
लोटोनीया गोण्या जाताती माघारी । गोण्या भुमीवरी तैस्याची त्या ।।३।।
चवथे चरण भाग एक आणी दोन नाहीत

१२७८४५

हासोनीया बोले त्यासी चीदंबर । आणीतो ईश्वर न कळे कैसे ।।१।।
आश्चर्य तो करी ब्राम्हण चीतासी । आघटीत ऐसी कळा आसे ।।२।।
नोळखती कोन्ही चीदंबरालागी । आवतार जगी उघड आसे ।।३।।
दास म्हणे ऐसी लीला दावी नीत्य । आवतारक्रत्य दावी जगा ।।४।।

१२७८४६

नानापरी ऐसी साहीत्ये बहुत । चहुकडोनी येत तुप गुळ ।।१।।
तुपाच्या घागरी चहुकडोनी येती । ठेवोनीया जाती मनुश्य ते ।।२।।
न कळे कोणासी कोठीले ते कोण । ऐसे नीत्य जाण येत आसे ।।३।।
दास म्हणे येती तुपाच्या घागरी । नेती करोनी चोरी आंध होती ।।४।।

१२७८४७

चीदंबर दावी कळा आघटीत । नेणवेची मात देवादीका ।।१।।
तेथे मानवाचा पाड तरी कीती । भ्रांत नोळखती चीदंबरा ।।२।।
आपार हे कळा दावी वीश्वंभर । प्रगट चीदंबर कलयुगी ।।३।।
दास म्हणे ऐसा पतीत पावन । कलयुगी सगुण चीदंबर ।।४।।

१२७८४८

चरीत्र ५३

यज्ञ करीतो चीदंबर । दावी नाना चमत्कार ।।१।।
आंत न कळे कोणासी । भ्रांती पडे मानवासी ।।२।।
देशोदेश वर्चेवरी । येती तुपाच्या घागरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी लीला हे ईश्वर ।।४।।

१२८८४९

नानापरीचे साहीत्य । न कळे कोटोनीया येत ।।१।।
गुप्तरुपे देव आणीती । मानवासी पडे भ्रांती ।।२।।
द्रीष्टी पाहाती प्रत्यये । परी भ्रांती ते न जाये ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२७८५०

हीशोबाचा न लगे आंत । कोटीमाजी ते साहीत्य ।।१।।
कारकुन हीशोब लीहीती । स्वामी मना ते करीती ।।२।।
हीशोब तो लीहुनये । क्रत्य ईश्वराचे आहे ।।३।।
जेष्टपुत्र दीवाकर । त्याचे हाते कारभार ।।४।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी सांगतसे फार ।।५।।

१२७८५१

स्वामी सांगती पुत्रासी । हीशोब कासया लीहीवीसी ।।१।।
करणी आसे ईश्वराची । आंत न लगे कोनाची ।।२।।
लीहीती दाहा कारकुन । वाया कासयासी सीण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । अंत न कळे कोणास ।।४।।

१२७८५२

स्वामी म्हणती पुत्रासी । दावी हीशोब मजसी ।।१।।
हीशोब लीहीलाशे कीती । दावी कींचीत झडती ।।२।।
फोडणीसी मोहोर्या कीती । खर्च जाल्या त्या आसती ।।३।।
फोडणीचा खर्च दावी । बहुत पुसणे ते काई ।।४।।
म्हणे चीदंबर दास । दावी हीशोब स्वामीस ।।५।।

१२७८५३

जमा दावी मोहोर्याची । कीती पडल्या त्या खर्ची ।।१।।
कारकुन बोलावीती । हीशोब फोडनीचा घेती ।।२।।
जमा आल्या मोहोर्या कीती । सांगे तयाची झडती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२७८५४

हीशोब पाहाती कारकुन । जमा आठ गोण्या जाण ।।१।।
सत्रा गोण्या खर्च जाल्या । आठ सीलकेसी राहील्या ।।२।।
स्वामी म्हणती पुत्रासी । कैसा खर्च लीहीवीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावीतो ईश्वर ।।४।।

१२७८५५

स्वामी म्हणती सर्वास । दाहा कारकुन त्यासी ।।१।।
होशोब न कळे फोडणीचा । बंदोवस्त हा लीहीण्याचा ।।२।।
व्यर्थ श्रम कास यात । दत्पर टाकावे पाण्यात ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी वीश्वंभर ।।४।।

१२७८५६

गर्वहत कारकुन । करणी ईश्वराची जाण ।।१।।
आष्ट सीधी त्या राबती । कैसे लागे ते झडती ।।२।।
चीदंबर सगुण मुर्ती । जाला आवतार क्षीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाटे नवल सर्वास ।।४।।

१२७८५७

येक येक पदार्थासी । सीत्थी पुरवी ती दासी ।।१।।
कैसा कळे याचा आंत । मुर्तीमंत हा भगवंत ।।२।।
रीत्थी सीत्थी ज्याच्या दासी । तोची प्रवर्ते यज्ञासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी वीश्वंभर ।।४।।

१२७८५८

कोठवरी ते वर्णन । वेदादीका जेथे सीण ।।१।।
मुर्तीमंत सगुण जाण । चीदंबर ब्रम्हपुर्ण ।।२।।
दावी लीला वीश्वालागी । आवतार कलयुगी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । ज्यासी नसे आंतपार ।।४।।

१२७८५९

चरीत्र ५४

यज्ञालागी आले थोर थोर कोन्ही । आहंभाव मनी बहुत त्यासी ।।१।।
पटवर्धन थोर फौज बरोबर । रखवाली सरदार यज्ञालागी ।।२।।
म्हणती स्वामीलागी चोर रक्षु आम्ही । चींता त्याची तुम्ही न करावी ।।३।।
दास म्हणे दावी त्यासी चमत्कार । स्वामी चीदंबर लीलाधारी ।।४।।

१२७८६०

करणे देवाजीसी दावीतो प्रत्यये । आभीमान न साहे कदाकाळी ।।१।।
पटवर्धन आसे सरदार तो थोर । खाशी घोडी चोर घेउनी गेला ।।२।।
गळीत आभीमान होवोनीया जाण । लज्जीत आभीमान बहुत त्यासी ।।३।।
दास म्हणे ऐसे करणे ईश्वराचे । रखवाली यज्ञाचे गर्वहात ।।४।।

१२७८६१

लज्जीत होवोनी बहुत आपुल्या मनी । दरुषणा लागोनी न जाय तो ।।१।।
बोलावोनी स्वामी पुसती तयासी । घोडी गेली कैसी सांग मज ।।२।।
चौकसी तुमची बहुत रखवाली । खासी घोडी गेली नवल हेची ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर धणी । पठवर्धन मनी लज्जीत तो ।।४।।

१२७८६२

होउनी गर्वहात स्वामीसी बोलत । आभीमान बहुत होता आम्हा ।।१।।
न साहे तुम्हासी स्वामी चीदंबरा । कलयुगी ईश्वरा प्रगट तु ।।२।।
रक्षणे तुम्हासी आसे सत्य जाण । यज्ञ ते वाहान यज्ञांग तु ।।३।।
चीदंबर दास म्हणे हे कवतुक । ऐकोनीया देख हासे देव ।।४।।

१२७८६३

बोले चीदंबर हासोनी उतर । मनी चींतातुर होउ नये ।।१।।
आणेनीया देतो घोडी मी तुमची । चींता हे मनाची सोडी बापा ।।२।।
रक्षण करणे आसे ईश्वरासी । रक्षील यज्ञासी आंगे तोची ।।३।।
दास म्हणे ऐसे बोले चीदंबर । नीवाले आंतर ऐकताची ।।४।।

१२७८६४

न लगे तो शोध कोणासी घोडीचा । प्रयत्न सर्वाचा राहीलासे ।।१।।
करीती वीनंती स्वामीलागी जाण । राहीला प्रयत्न न लगे शोध ।।२।।
ऐकोनीया स्वामी सांगती तयासी । चींता घोडीवीसी करु नये ।।३।।
दास म्हणे दावी कळा चीदंबर । जाणे तो आंतर सर्वाचीतो ।।४।।

१२७८६५

बैसलेती सर्व थोरथोर लोक । सरदार आणीक सभादाटी ।।१।।
चीदंबर पाहे सर्व यात्रालागी । बोलवीला वेगी ब्राम्हण तो ।।२।।
चोराचा नाईक होता तो देख । बोलवीला येक तोची पुढे ।।३।।
दास म्हणे कापे देख थरथरा । वीनवी चीदंबरा कर जोडोनी ।।४।।

१२७८६६

बोलवीता जाण जवळी स्वामीने । भयभीत तेणे कंप आंगी ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी आपा थोर तुम्ही । आश्रये तो आम्ही केला तुमचा ।।२।।
रक्षण तुम्हासी यात्रा ते फौजेचे । भय ते चोराचे होउ नये ।।३।।
दास म्हणे ऐसे बोले चीदंबर । जाला त्यासी धीर चीती जाण ।।४।।

१२७८६७

वीनंती स्वामीसी करीतो ब्राम्हण । चोरी जाल्या जाण पुसा मज ।।१।।
आणेनीया देतो घोडी याची क्षणी । क्रपा मज करोनी आभय द्यावे ।।२।।
स्वामी त्यासी म्हणती नीर्भय आसावे । रक्षण करावे यात्रेलागी ।।३।।
दास म्हणे ऐसे बोले चीदंबर । घाली नमस्कार ब्राम्हण तो ।।४।।

१२७८६८

सांगोनीया तेणे आपुल्या भ्रुत्यासी । घोडी त्या वेळेसी आणवीली ।।१।।
पाहोनीया घोडी हर्ष पटवर्धन । गळीत आभीमान जाला सर्व ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी सुखे नीद्रा घ्यावी । चींता न करावी चोराची ते ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । प्रगट चीदंबर उघड जनी ।।४।।

१२७८६९

आश्चर्य वाटले थोर थोरालागी । आवतार जगी चीदंबर ।।१।।
ईश्वरी हे क्रपा न कळे कोणासी । चालवी यज्ञासी समारंभ ।।२।।
नानारीती ऐसे दावी चमत्कार । प्रगट चीदंबर लीला करी ।।३।।
दास म्हणे ऐसा पुर्ण आवतार । स्वामी चीदंबर कलयुगी ।।४।।

१२७८७०

चरीत्र ५५

पुर्णब्रम्ह चीदंबर । दावी रुप यज्ञेश्वर ।।१।।
कीती पाहावीसी वाट । देई आनाथासी भेट ।।२।।
यज्ञ करीते वेळे जाण । जाला बहुतासी प्रसन्न ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावीली ईश्वर ।।४।।

१२७८७१

सावकार येक जाण । होता आज्ञेचे प्रमाण ।।१।।
यज्ञालागी खर्च जाणे । बहुत केला आसे तेणे ।।२।।
नव्हते पुत्र ते संतान । दत्तक घेतलासे जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करीतो ईश्वर ।।४।।

१२७८७२

सावकार कांता दोन्ही । वीनवीती कर जोडोनी ।।१।।
चोवीस वर्ष म्हणे जाले । नाही संतान देखीले ।।२।।
घरी आसे लक्षपती । नाही पोटीचे संतती ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कळा दावीसी ईश्वरा ।।४।।

१२७८७३

वीप्रकांता वीनवीती । नीत्य पतीसी सांगती ।।१।।
करा वीनंती स्वामीसी । द्यावी संतती मजसी ।।२।।
सावकार म्हणे तीसी । वेड लागले तुजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कांता वीनवी भ्रतारास ।।४।।

१२७८७४

कांतेलागी बोले पती । काय भ्रांती तुजप्रती ।।१।।
वर्षे आसे पंचवीस । न्हाण येउनी तुम्हास ।।२।।
दत्तक पुत्र घेतलासी । आता पाटी का पुरवीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । शब्द ठेवीती दैवास ।।४।।

१२७८७५

साउकार स्वामीपासी । राहातसे दीवसनीसी ।।१।।
येके दीवसी यझेशाळे । स्वामी बोलवीती बळे ।।२।।
जाला प्रसन्न तुजसी । काय ईछीत मनासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी म्हणती सावकारास ।।४।।

१२७८७६

बहुत शेवा तु करीसी । देतो ईछीले तुजसी ।।१।।
वीनवीतो सावकार । स्वामी जाणता आंतर ।।२।।
काय बोलोनी दावणे । वौंषव्रीधी वाढवणे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी म्हणती तयास ।।४।।

१२७८७७

ईछा आसे पुत्रावीसी । चींता न करी मानसी ।।१।।
येक दोन तीन तुजसी । देतो पुत्र संततीसी ।।२।।
येक पुत्र मागसी । देतो चौघे मी तुजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी प्रसन्न वीप्रास ।।४।।

१२७८७८

स्वामी आनंदे बोलती । तया सावकाराप्रती ।।१।।
कडे रवांदे वागवीसी । हाती धरोनी चालसी ।।२।।
पोरे वोढतील तुजसी । तोंही पाहीन द्रीष्टीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।।

१२७८७९

त्याचवर्षी त्यासी जाण । जाले पुत्र ते संतान ।।१।।
दुसरे वर्ष जाला दुसरा । तीसरे वर्ष तो तीसरा ।।२।।
कन्या जाल्या तीधीजणी । दावी प्रत्यय नयनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी वीश्वंभर ।।४।।

१२७८८०

येक दीवसी स्वामीपासी । मुले बाळे भोजनासी ।।१।।
जवळी बैसे सावकार । तया वोढीताती पोर ।।२।।
स्वामी बोलवोनी जाण । करीती वीनोद आपण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी लीला हे ईश्वर ।।४।।

१२७८८१

चरीत्र ५६

करणी आघटीत तुझी चीदंबरा । ब्रम्हादी हारीहारा नेणवेची ।।१।।
पुर्णब्रम्ह जाला कलयुगी आवतार । कळवी हे प्रखर श्रीष्टीलागी ।।२।।
येज्ञ तु करीसी यथासांग जाण । प्रत्यय दाउन नानापरी ।।३।।
दास म्हणे स्वामी वीश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका चीदंबरा ।।४।।

१२७८८२

यज्ञ केला ऐसा कलयुगी जाणे । दुजा नाही कोणे आयकीला ।।१।।
येके पंगती जाण पंचेवीस सहश्र । ब्राम्हण ते थोर बैसताती ।।२।।
ईतर यातीचा लेखा कोण करी । आंत बा नीर्धारी न लगे त्याचा ।।३।।
दास म्हणे येक पदार्थ तो पाही । नुन्य पडे काही नायेकीला ।।४।।

१२७८८३

शाख भाजी जाण वाढपे वाढीती । नाही म्हणे चीती वीच्यारीती ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी पदार्थ का नाही । जावोनीया पाही स्वयपाकात ।।२।।
पाहु जाता तेथे हारे ते भरीले । नवल त्यासी जाले त्याची वेळे ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । उघड पाहाती डोळा लहानथोर ।।४।।

१२७८८४

पाहोनी द्रीष्टीसी सर्व थोरलाहान । परी भ्रांती जाण जायेची ।।१।।
न कळे कैसे जाले चीत्ती वीच्यारीती । भरोनी ठेवीती हारे कोण ।।२।।
वीस्मय चीतासी करोनीया जाण । म्हणती पाहु खुण उदईक हो ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । प्रगट चीदंबर त्याची वेळे ।।४।।

१२७८८५

सहश्रावधी वीप्र बैसले पंगतीसी । तुप त्या वेळेसी आणवीले ।।१।।
तुपाची घागर आसे येक जाण । स्वामी बोलाउन सांगताती ।।२।।
येकची घागर पुरे तुप जाण । सहश्रावधी भोजन होईल यात ।।३।।
दास म्हणे ऐसे बोले चीदंबर । नवल कीती थोर ब्राम्हण ते ।।४।।

१२७५८६

येकची घागर कैसे पुरे यासी । घागर शंभरासी लागतसे ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी ठेवोनी घागर । न्यावे वर्चेवर तुप आता ।।२।।
वोतोनीया तुप आर्धी ते धागर । आर्धी त्या भीतर राहु द्यावी ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । लाहान थोर डोळा पाहाताती ।।४।।

१२७८८७

सहश्रावधी पंगती करोनी भोजन । घागरीत जाण तुप तैसे ।।१।।
वाढीले बहुतासी जीतुके खाती कोन्ही । उष्टे द्रोण भरोनी टाकीताती ।।२।।
तुप खर्च जाले आर्धा ते घागर । लीला चीदंबर दावी ऐसे ।।३।।
दास म्हणे आसे कलयुगी आवतार । लीला हे आपार दावीतसे ।।४।।

१२७८८८

वाढपे ब्राम्हण वाढोनीया जाण । जाती ते घेउन तुप मागे ।।१।।
तेव्हा त्याचे चीत्ता आश्चर्य वाटती । हारे भरुन आत राहीले ते ।।२।।
त्या वरोनी आम्हा जाली आसे भ्रांती । दावी ते प्रचीती चीदंबर ।।३।।
दास म्हणे ऐसा आवतार सगुण । कलयुगी जाण चीदंबर ।।४।।

१२७८८९१

आनंत आपार दावीतसे कळा । ब्राम्हीचा पुतळा चीदंबर ।।१।।
न कळे ज्याचा आंत ईंद्रादी देवासी । देखीला द्रीष्टीसी तोची देव ।।२।।
कळा हे आगाध वर्णी तरी कोण । वेदादीक मौण जाले जेथे ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माये । चीदंबर पाये दावी आता ।।४।।

१२७८९०

आझेवरुनी स्वामी करीता वर्तनुक । दावीसी कौतुक नानापरी ।।१।।
कळा हे वीचीत्र करोनी दावीसी । न कळे कोणासी आंत तुझा ।।२।।
पतीतपावन जालासी आवतार । करुणा हे आपार तुज देवा ।।३।।
दास म्हणे होसी करुणेचा राणा । यावे बा चीद्‌घना चीदंबरा ।।४।।

१२७८९१

करुणावंत धणी तुची त्रीभुवनी । आगाध करणी तुझी देवा ।।१।।
कोठवरी आंत घेसी बा आनंता । न करीसी चींता काय म्हणोनी ।।२।।
नव्हे हे उचीत तुम्हासी ईश्वरा । आंत चीदंबरा घ्यावा कीती ।।३।।
दास म्हणे होसी पतीतपावन । ब्रीद करी जतन स्वामीराया ।।४।।

१२७८९२

चरीत्र ५७

यज्ञ समारंभ करणे । तुझी कळा कोण जाणे ।।१।।
चीदंबरा वीश्वपती । तुझा धाक त्रीजगती ।।२।।
नाना चमत्कार करीसी । कळा आपुली दावीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कलयुगी आवतार ।।४।।

१२७८९३

दळणावळी दाणे दळीती । नसे चौकसी त्याप्रती ।।१।।
स्वामी म्हणती सर्वासी । धाक आसो द्या चीतासी ।।२।।
देवाचे हे कार्य जाण । यज्ञेश्वर तो रक्षण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे सर्वासी उत्तर ।।४।।

१२७८९४

ऐसे स्वामी सांगताती । सर्व भक्तीने वर्तती ।।१।।
दळणवाली येक जाण । ठेवी दाणे ते चोरुन ।।२।।
दाणे घेउनी चालीली । आंघ होउनी उभा ठेली ।।३।।
म्हणे चीदंबर दास । शोक जाला त्या स्त्रीयेस ।।४।।

१२७८९५

डोळा न दीसे ते काही । स्वामीपासी आणती पाही ।।१।।
स्वामीपुढे लोटांगण । म्हणे आन्याई मी जाण ।।२।।
दाणे चोरोनी घेतले । ते गुणे आंघ जाले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी प्रार्थना स्वामीस ।।४।।

१२७८९५

रडे पडे स्वामीपुढे । म्हणे पाप माझे गाढे ।।१।।
आसे पतीत मी खरी । स्वामीराया क्रपाकरी ।।२।।
देई नेत्र दीनालागी । पतीतपावन तु जगी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । स्वामी क्रपेच्या सागरा ।।४।।

१२७८९६

स्वामीराया करुणाकरा । नेत्र देई चीदंबरा ।।१।।
द्रीष्टी देई मज प्रती । दळणेवाली वीनवीती ।।२।।
आली करुणा स्वामीसी । पुढे ऐसे न करीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीनवीती ते स्वामीस ।।४।।

१२७८९७

करुणावंत स्वामीराजा । आसे लौकीक हा तुझा ।।१।।
सीक्षा जाली मज आता । चोरी न करी मी आता ।।२।।
त्राहे त्राहे बा आनंता । चीदंबरा क्रपावंता ।।३।।
म्हणे चीदंबर दास । क्रपा आली ईश्वरास ।।४।।

१२७८९८

चीदंबर बोले जाण । चोरी न करी येधुन ।।१।।
देतो नेत्र मी तुजसी । भय न धरी चींतासी ।।२।।
सांगे शफत वाहुन । चोरी न करी येधुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी वीश्वंभर ।।४।।

१२७८९९

चीदंबरक्रपेकरुनी । नेत्र आले त्याची क्षणी ।।१।।
वाटे नवल सर्वासी । ईश्वराची कळा ऐसी ।।२।।
चीदंबर आवतार । दावी लीला हे आपार ।।३।।
दास म्हणे वीश्वंभरा । सगुण रुप चीदंबरा ।।४।।

१२७९००

करुणा येउ दे दीनाची । माय होसी आनाथाची ।।१।।
होसी पतीतपावन । ब्रीद करी बा जतन ।।२।।
तुम्हा सांगणे ते कीती । जगा दावी बा प्रचीती ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२७९०१

करुणावंत माय होसी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
बळे काढीले बाहीरी । आता वेळ कीतीतरी ।।२।।
आंत घ्यावा कोटवरी । दावी रुप डोळेभरी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । ब्रीद जतन ते करा ।।४।।

१२७९०२

करुणावंत तुची धणी । मज येक त्रीभुवनी ।।१।।
आनाथाची माय होसी । स्वामी वेळ का लावीसी ।।२।।
वाट पाहातो दीवसनीसी । करुणावंत माय होसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । वेगी प्रगटे ईश्वरा ।।४।।

१२७९०३

चरीत्र ५८

चीदंबरा करी दया आनाथासी । क्रपावंत होसी मायबापा ।।१।।
येउ दे करुणा मज पतीताची । पावन ब्रीदाची लज्या रक्षी ।।२।।
पाहातो मी वाट च्यातकाचे परी । काढीले बाहेरी चीदंबरा ।।३।।
श्रीष्टीवरी झेंडा लागे तुझा कैसा । प्रत्यय जगादीशा दावी वेगी ।।४।।
दास म्हणे नलगे सांगणे ईश्वरा । परी चीदंबरा त्वरा करी ।।५।। १२७९०४

नाना प्रकारीची दावीली लीला । भ्रम तो जगाला घालोनीया ।।१।।
दावीला प्रताप यज्ञामाजी बहुत । न कळे त्याचा आंत देवादीका ।।२।।
नाना प्रकारीचे प्रत्यय दावीसी । यज्ञ करवीसी शुलभ जगी ।।३।।
दास म्हणे काय वर्णु मी तारक । जेथे वेदादीक मौनावले ।।४।।

१२७९०५

यज्ञामाजी येती यात्रा ते आपार । घेसी समाच्यार सर्वत्राचा ।।१।।
जे जे काही लागे ज्यासी ज्या वेळेसी । तेची पुरवी त्यासी चीदंबरा ।।२।।
नाना रुप धरोनी घेणे समाच्यार । करणी हे आपार तुझी देवा ।।३।।
दास म्हणे कीती सांगावा वीस्तार । वर्णीता फणीवर सीणलासे ।।४।।

१२७९०६

ब्राम्हणाची रुपे धरोनीया जाण । पदार्थ आपण पुरवी आंगे ।।१।।
कोठे नुन्य देवा पडु ते न देसी । कळा हे दावीसी चीदंबरा ।।२।।
भोजनाचे वेळे पंगती येक दुर । साठी ते सहश्र पात्र बैसे ।।३।।
दास म्हणे त्यासी पदार्थ पुरवीसी । कळा तु दावीसी चीदंबरा ।।४।।

१२७९०७

कोसींबीरी सहीत पडो नेंदी उणे । सर्वासी वाढणे येक वेळे ।।१।।
तुप पोळी भात क्षीरी नानापरी । वाढणार तरी कैसे वाढे ।।२।।
प्रगट होवोनी वाढीतो सर्वासी । आंत हा कोणासी कळो नेंदी ।।३।।
दास म्हणे पंगती बैसे दुरवरी । पुरवणी करी चीदंबरा ।।४।।

१२७९०८

श्रीमंत आलेती फौज लक्षावधी । न पडे आवधी भोजनाची ।।१।।
फौज नाना याती वेगळल्या पंगती । दुर ते बैसती सेतो सेती ।।२।।
आवींध आंती जे वडार सहीत । पंगती बैसवीत ठाई ठाई ।।३।।
दास म्हणे जे जे पदार्थ मागती । पुरवी तयाप्रती चीदंबरा ।।४।।

१२७९०९

जीतुक्या पंगतीच्ये जे जे कारभारी । तेची रुप धरी चीदंबरा ।।१।।
कळो नेंदी कोन्हा भ्रम घाली जना । कारकुन जाणा आंगे होय ।।२।।
लोकाच्या चीत्तात आमुचे कारकुन । तैसे रुप जाण धरी देव ।।३।।
दास म्हणे दावी कळा चीदंबरा । भ्रम धाली थोर त्याची वेळे ।।४।।

१२७९१०

नाना जाती रुपे धरोनीया जाण । आंगे तो आपण वाढीतसे ।।१।।
न कळे तो आंत द्रीष्टीसी देखोनी । बैसवी भोजनी येक वेळ ।।२।।
भोजन जाल्यावरी आश्चर्य करीती । वाढीले याप्रती सांगा कोन्ही ।।३।।
दास म्हणे कळा दावी चीदंबर । समारंभ थोर यज्ञ करी ।।४।।

१२७९११

नाना हीन याती पंगती त्या बैसती । आन्न ते ठेवीती चोरोनीया ।।१।।
गाटोडे बांधोनी ठेवीताती जाणे । पडो नेदी उणे चीदंबर ।।२।।
जेथील ते जेथ पुरवी पदार्थ । न सरे पात्रात बांधु कीती ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबरे लीला । प्रताप कोनाला कळो नेदी ।।४।।

१२७९१२

तुपाची ती भांडी भरोनीया घेती । राहीले सांडीती भुमीवरी ।।१।।
परी न सरे तुप उभे वाढणार । धरी चीदंबर रुप तेची ।।२।।
नसे आंत पार दावीतसे कळा । ब्रम्हीचा पुतळा चीदंबर ।।३।।
दास म्हणे कोन्हा कळो नेदी आंत । प्रगट भगवंत लीला करी ।।४।।

१२७९१३

आपार हे कळा दावी चीदंबर । प्रगट आवतार कलयुगी ।।१।।
करुणावंत धणी पतीतपावन । आवतार सगुण स्वामी माझा ।।२।।
क्षणेमाझी करी रंकाचा तो राव । देवा आधी देव चीदंबर ।।३।।
दास म्हणे आसे ब्रम्हांडनायक । सगुण जाला देख चीदंबर ।।४।।

१२७९१४

चरीत्र ५७

चीदंबरा करुणाकरा । दावी चरण ईश्वरा ।।१।।
होसी पतीतपावन । ब्रीद करावे जतन ।।२।।
कीती लावीसी तु वेळ । माझी नीवारी तळमळ ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२७९१५

करुणावंत तुची धणी । मज येक त्रीभुवनी ।।१।।
तुजवीण चीदंबरा । नेणे देव मी दुसरा ।।२।।
ब्रम्हा वीष्णु सीव देख । तुझ्या आज्ञेचे पाईक ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कलयुगी आवतारा ।।४।।

१२७९१६

नीत्य करीतो प्रार्थना । माझी येउ दे करुणा ।।१।।
क्रपावंत माये होसी । काये जाले माझेवीसी ।।२।।
कीती वाट पाहावीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । बटा न लावी ब्रीदास ।।४।।

१२७९१७

क्षणेमाजी चीदंबरा । करीसी ब्रम्हांड उभारा ।।१।।
तुम्हा कोणते कठीण । मज द्यावया दर्षण ।।२।।
वाट पाहातो नीसीदीनी । प्राण उरला नयनी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । करुणा येउ दे ईश्वरा ।।४।।

१२७९१८

धावे पावे वेगी आता । चीदंबरा प्राणनाथा ।।१।।
तुजवीण प्रीय काही । मी तो नेणे लोकीतीही ।।२।।
माझे जाणसी आंतर । कीती देउ परीहार ।।३।।
दास म्हणे करुणापती । चीदंबरा ये श्रीपती ।।४।।

१२७९१९

वीनवीतो वारंवार । वाट पाहु कोठवर ।।१।।
कीती वेळ तु लावीसी । तुज दया न ये कैसी ।।२।।
वेळ न करी सर्वथा । ब्रीद जाईल आनंता ।।३।।
दास म्हणे करुणाघना । चीदंबरा ये चीद्‌घना ।।४।।

१२७९२०

जन कलीचे दुर्धर । प्रगट करी आवतार ।।१।।
तुजवीण प्राणनाथा । चैन न पडे सर्वथा ।।२।।
करुणा भाकु कोठवरी । चीदंबरा ये झडकरी ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२७९२१

यज्ञ कथा समाप्त

लीलाधारी आवतार । कलयुगी चीदंबर ।।१।।
ब्राम्हण आला दुरदेसी । स्वामी नवलगुंदासी ।।२।।
वीप्र करीतो प्रार्थना । दरीद्रे पीडीलो मी जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया सांगतो उत्तर ।।४।।

१२७९२२

मी तो गरीब ब्राम्हण । द्रव्य आणावे कोठुन ।।१।।
वीप्र म्हणे स्वामीलागी । तुमचा आवतार जगी ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । आज्ञेप्रमाणे वर्तसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया सांगती नीर्धार ।।४।।

१२७९२३

वीप्र म्हणे स्वामीलागी । द्यावा नीरोप तो वेगी ।।१।।
दाळ आणवी शेरभर । दील्हा नीरोप सत्वर ।।२।।
घरी जावोनी सोडावी । आज्ञा माझी आयकावी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगे ब्राम्हणास ।।४।।

१२७९२४

दील्हा नीरोप वीप्रासी । नसे वाट ते खर्चासी ।।१।।
भीक्षा मागोनीया खावे । नीश्चय धरोनी आसावे ।।२।।
न धरी संशय चीत्तासी । वेगी जावे त्या घरासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाला नीश्चय वीप्रास ।।४।।

१२७९२५

गेला ब्राम्हण घरासी । सोडोनी पाहे गाटोडीसी ।।१।।
होती हरभर्याची दाळ । जाले होन ते तत्काळ ।।२।।
धन्य म्हणे चीदंबरा । पुर्णब्रम्ह आवतारा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२७९२६

चरीत्र ६०

चीदंबरा होसी करुणेची माता । तुझे हाती सत्ता सर्व आसे ।।१।।
रक्षी ब्रीदावळी करुणेच्या सागरा । वेळ चीदंबरा लाउ नये ।।२।।
करीतो प्रार्थना क्रपेच्या नीधाना । आवतार सगुणा प्रगट व्हावे ।।३।।
दास म्हणे दावी सगुण तुझे रुप । नीवारी भवताप मायबापा ।।४।।

१२७९२७

यावे दीनानाथा पावे आनाथासी । दया तुज कैसी न ये माझी ।।१।।
काहो चीदंबरा वेळ का लावीसी । हासती तुजला जन सर्व ।।२।।
मज पामरासी काय आपमान । ब्रीद ते जतन करी आपुले ।।३।।
दास म्हणे कीती जन हासवीसी । चीदंबरा कैसी दया नये ।।४।।

१२७९२८

काय जाले तुझ्या सामर्थ्यासी आता । वेळ भगवंता लावीसी का ।।१।।
तुजवीण कोण करील सांभाळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।२।।
नीष्टुर का जाला ऐसीया वेळेसी । दया तुज कैसी न ये आता ।।३।।
काहो चीदंबरा सांडीयेला दास । बट्टा हा ब्रीदास लावीसी का ।।४।।

१२७९२९

क्षणेमाजी करीसी श्रीष्टीची रचना । आघटीत जाणा कळा तुझी ।।१।।
याची वेळे काय जाले माझेवीसी । ब्रीद गमावीसी कैसे देवा ।।२।।
कोठवरी आता आंत घेसी देवा । रक्षी सदासीवा दीनालागी ।।३।।
चीदंबरा दास तुजवीण उदास । पुरवावी आस आनाथाची ।।४।।

१२७९३०

नाही मज कोन्ही जीवलग तुजवीण । वोवाळीला प्राण तुजवरुनी ।।१।।
आंतरीची खुण ठावे तुज देवा । बोलोनी माहादेवा दाउ कीती ।।२।।
काय तुझ्या चीती करणे आसे आता । तेची भगवंता करी वेगी ।।३।।
दास म्हणे दावी चरण सकुमार । नीववी आंतर चीदंबरा ।।४।।

१२७९३१

आज्ञेवीण तुझ्या न हालेची पान । पाहाताती जन द्रीष्टीपुढे ।।१।।
व्याघ्र सर्पादीक ग्वाही देता जाण । राहती बैसोन त्याची ठाया ।।२।।
प्रगट द्रीष्टीसी पाहाती यात्राजन । दावीसी बोलुन स्वमुखे त्या ।।३।।
दास म्हणे आम्ही पाहीले द्रीष्टीसी । याची वेळे कैसी गती जाली ।।४।।

१२७९३२

कुंदगोळमाझारी होते चीदंबर । यात्रादाटी फार मीळताती ।।१।।
नाना चमत्कार दावीले त्या वेळे । पाहाती सकळ यात्राजन ।।२।।
पटवर्धन होते कुटुंबसहीत । त्याचे वाडीयात सर्प आला ।।३।।
दास म्हणे सर्प थोर आजगर । होती नारीनर भयभीत ते।।४।।

१२७९३३

पुढीले चौकात बैसला तो सर्प । थोर त्याचा दर्प सर्वालागी ।।१।।
मारू नये कोन्ही आज्ञा हे स्वामीची । वाट ते येण्याची बंध जाली ।।२।।
पटवर्धन सांगे स्वामीलागी तेव्हा । सर्प जातो केव्हा स्वामीराया ।।३।।
दास म्हणे न ये नीद्रा ते कोणासी । सांगे स्वामीपासी वर्तमान ।।४।।

१२७९३४

स्वामी म्हणती सर्प जाईल नीघोनी । परी तो बैसोनी तेथ आसे ।।१।।
तीन दीवस जाले सर्प तो न जाये । बैसला तो ठाय न सोडीची ।।२।।
सांगती स्वामीसी येवोनी वर्तमान । न हालेची जाण सर्प कोटे ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । वाट द्यावी थोर सर्प दुःखी ।।४।।

१२७१३५

उपासी तयाने रहावे कीती दीवस । करुणा हे तुम्हास न ये कैसी ।।१।।
न कळेची आर्थ स्वामी बोलील्याचा । वीनवीती वाचा नानापरी ।।२।।
पटवर्धन करी वीनंती स्वामीसी । न कळे मजसी काय म्हणता ।।३।।
दास म्हणे करी वीनंती पायासी । वाट आम्ही कैसी द्यावी त्यासी ।।४।।

१२७१३६

चीदंबर म्हणती पुसा कुटुंबासी । व्दाही ते सर्पासी दील्ही कोणी ।।१।।
व्दाही सोडवोनी भुंजगासी जाण । जाईल नीघोन त्याची वेळे ।।२।।
देवोनीया व्दाही बैसवीले त्यासी । आन्याय कोणासी सांगा तरी ।।३।।
दास म्हणे सांगे स्वामी हे उत्तर । नीघोनी सत्वर येती घरी ।।४।।

१२७१३७

पटवर्धन पुसे आपुल्या कुटुंबसी । व्दाही त्या सर्पासी दील्ही काये ।।१।।
सांगे त्याची कांता व्दाही दील्ही आसे । स्मरण ते नसे मज काही ।।२।।
मोकळे त्या व्दाही केली त्या वेळेसी । वाट भुजंगासी जाली तेव्हा ।।३।।
दास म्हणे गेला सर्प त्या वेळेसी । पाहाती द्रीष्टीसी लाहानथोर ।।४।।

१२७९३८

येवोनी वर्तमान सांगती स्वामीसी । सत्ता तुमची ऐसी आघटीत ।।१।।
ईश्वर आवतार प्रगट चीदंबर । करीती नीर्धार आपुले ठाई ।।२।।
पाहुनी चमत्कार त्याची वेळे जाण । भ्रांतीमाजी मन स्वयेची ते ।।३।।
दास म्हणे कळा तुझी चीदंबरा । भ्रम नारीनरा घालीसी तु ।।४।।

१२७९३९

तुझी क्रपा होय चीदंबरा जेव्हा । भ्रम जाय तेव्हा मानवाचा ।।१।।
आघटीत माया तुझी देवराया । आनाथासी दया करी आता ।।२।।
पतीतपावन नाम साजे तुम्हा । स्वामी पुर्णब्रम्हा प्रगट व्हावे ।।३।।
दास म्हणे दावी प्रगट ते कळा । ब्रम्हीचा पुतळा सगुण देवा ।।४।।

१२७९४०

चरीत्र ६१

चीदंबर लीला करी । प्रत्यय दावी नानापरी ।।१।।
पुरश्चरण केंगेरीसी । स्वामी करी श्रावणमासी ।।२।।
नीत्य येतसे प्रजन्ये । आरण्यामाजी ते राहाणे ।।३।।
दासा जवळी बोलवीले । रात्री चौकीसी ठेवीले ।।४।।

१२७९४१

कुलुपे लावोनीया रात्री । कील्ल्या देती माझे हाती ।।१।।
रक्षण वैसावे रात्रीसी । बहुत करावी चौकसी ।।२।।
आज्ञा करीताती स्वामी । रात्री रक्षणे बा तुम्ही ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुरे येकांती वीच्यार ।।४।।

१२७९४२

चीदंबर माता जाण । नये सांगता वर्णन ।।१।।
नये उपमा मातेसी । क्रपावंत माय ऐसी ।।२।।
बहुत मोहे करुण जाण । करी चीत समाधान ।।३।।
च्यारी प्रहर रात्रीसी । चौकी वैसवी दासासी ।।४।।

१२७९४३

नीद्रा घेता कामा नये । च्यारी प्रहर ज्याग्रत राहे ।।१।।
दीवसा नीद्रा घ्यावी म्हणत । रात्री बैसावे ज्याग्रत ।।२।।
दुजे नसे संगतीसी । बैसे म्हणती येकल्यासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी मजवर ।।४।।

१२७९४४

लोक म्हणती स्वामीसी । रात्री द्यावे संगतीसी ।।१।।
च्यारी प्रहर ज्यागणे । कैसे होय येकल्याने ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । नसे सोबती याजसी ।।३।।
येकटाची पुरे जाण । दास रात्री हा रक्षण ।।४।।

१२७९४५

उटोनी वैसता रात्रीसी । नीद्रा येतसे मजसी ।।१।।
मध्यरात्री होता जाण । पडे नीद्रा ते येउन ।।२।।
स्वामी म्हणती जवळील्यासी । नीद्रा येतसे याजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रत्यय ईश्वर ।।४।।

१२७९४६

चीदंबर जवळी येत । क्रपाप्रसादे बोलत ।।१।।
बोलतसे क्रपामोहे । म्हणे भ्रांत राहु नये ।।२।।
क्रपा प्रसादाची बोली । नीद्रा त्याची वेळे गेली ।।३।।
प्रत्यय दावी चमत्कार । दासालागी चीदंबर ।।४।।

१२७९४७

च्यारी प्रहर रात्री जाण । नीत्य राहावे बैसोन ।।१।।
लोक म्हणती यासी दुखणे । होई आठ दीवसी जाण ।।२।।
दावी प्रत्यय ईश्वर । स्वामी माझा चीदंबर ।।३।।
नीद्रा न येत दासासी । तीन मास येकसरसी ।।४।।

१२७९४८

बारा घटका रात्री जाण । येक वेळ ते भोजन ।।१।।
रात्री राहावे बैसोन । परी नव्हे ते आजीर्ण ।।२।।
वाटे नवल सर्वासी । नीद्रा न ये कैसी यासी ।।३।।
करणे स्वामीसी आघटीत । टेवी दासासी ज्याग्रत ।।४।।

१२७९४९

स्वामी सांगती लोकासी । थोर ज्याग्रती बा यासी ।।१।।
पाट न लावी भुमीसी । राहे बैसोनी ब्दारासी ।।२।।
कळा आपुली दावोनी । नीमीत्य सांगतसे जनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी वीश्वंभर ।।४।।

१२७९५०

नीत्य बैसता ब्दारासी । येणे लागे ते स्वामीसी ।।१।।
नेत्र लावोनी भजन करी । स्वामी उभे ते समोरी ।।२।।
बहुत प्रीतीने बोलती । ब्दार उघडी म्हणती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । नाना सांगती वीच्यार ।।४।।

१२७९५१

चरीत्र ८२

चीदंबर दावी लीला नानापरी । चमत्कार करी नीत्य नवा ।।१।।
नीत्य पडतसे प्रजन्य बहुत । पुरश्चरण होत मैदानात ।।२।।
नीत्य रात्री जाण पडतसे प्रजन्य । प्राःतकाळी होणे आनुष्टान ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । रक्षी वेळोवेळा प्रजन्य तो ।।४।।

१२७९५२

दीवस उगवता चुलीभरुनी पाणी । काढीती उपसोनी स्वयपाकी तो ।।१।।
काष्टे स्वयंपाकासी त्यासी हीरवापाला । लावीती चुलीला वींधनाते ।।२।।
त्यावरी स्वयंपाक येथासांग होये । नवल करीती पाहे लाहानथोर ।।३।।
चीदंबर दावी प्रत्यय द्रीष्टीसी । भ्रांती मानवासी दास म्हणे ।।४।।

१२७९५३

ब्राम्हण बैसती पंगतीसी ते जाण । येतसे प्रजन्य चहुकडोन ।।१।।
आंगावरी ठेंभ पडताक्षणी जाण । हार हार म्हणोनी गर्जताती ।।२।।
देवपुजेमाजी स्वामी ते आसती । आयकोनी येती बहेरी ते ।।३।।
दास म्हणे प्रजन्य येता चहुकडोन । पाहे द्रीष्टीभरुन चीदंबर ।।४।।

१२७९५४

चीदंबर पाहे आकाश ते जाण । पडतसे उन तेची क्षणी ।।१।।
स्वस्त भोजन करा म्हणे ब्राम्हणासी । वीप्र आनंदेसी जेवीताती ।।२।।
नवल करीती सर्व लाहानथोर । प्रगट चीदंबर लीला दावी ।।३।।
दास म्हणे ऐसा उघड आवतार । स्वामी चीदंबर प्रगट जगी ।।४।।

१२७९५५

भोजन करोनी उठती ब्राम्हण । येतसे प्रजन्य त्या उपरी ।।१।।
पात्र काढीताची पाणी वाहुनी जाय । आनायासे होय स्थळशुची ।।२।।
प्रजन्य तो पडे ऐसा उपेगासी । मागील्या पंक्तीसी उघडतसे ।।३।।
दास म्हणे ऐसा चीदंबर धणी । आगाध करणी डोळा दावी ।।४।।

१२७९५६

दोन मास ऐसा पडे तो प्रजन्य । परी न घडे नुन्य कोणे ठाई ।।१।।
राहोट्या चांदण्या देखोनीया जाण । राहाती ब्राम्हण रात्री तेथे ।।२।।
बारा घटी रात्री चुली पेटवोनी । धालीताती श्नान ब्राम्हणासी ।।३।।
दास म्हणे करीती आनुष्टान । मैदानात जाण बैसोनीया ।।४।।

१२७९५७

तास दीवस राहाता वीप्राचे भोजन । मागील पंगती जाण रात्री बैसे ।।१।।
पडावा प्रर्जन्य नीत्य तो रात्रीसी । ब्राम्हण राहुटीसी जातावेळे ।।२।।
मंत्र पुष्पाजुळी करोनीया जाती । रात्री त्यासी होसी प्रहर येक ।।३।।
दास म्हणे ऐसा प्रताप ईश्वरी । आरण्याभीतरी आनुष्टान ।।४।।

१२७९५८

चीदंबरा दावी प्रत्यय उघड । कठीण सौघड करुनी दावी ।।१।।
औदुंबराखाली ब्राम्हण आनुष्टान । शतावधी जाण बैसताती ।।२।।
त्यावरी हो नीघती सर्प थोर दोन । भयभीत जाण वीप्र होती ।।३।।
दास म्हणे त्यासी सांगे चीदंबर । भयभीत आंतर करु नये ।।४।।

१२७९५९

नीर्भय आसावे जप करीता जाण । पाहाती आनुष्टान सर्प तुमचे ।।१।।
औदुंबरावरी बैसुनी पाहाती । खाली ते न येती कदाकाळी ।।२।।
सात दीवस ऐसे सर्प होती जाण । गुप्त ते होउन गेले मग ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर मात । आसती दैवत सर्प जाण ।।४।।

१२७९६०

आश्चर्य करीती वीप्र मनामाजी । चीदंबर सहजी लीला दावी ।।१।।
नेणे कोन्ही आंत ब्रम्हादीक याचा । बोलतसे वाचा प्रगट तोची ।।२।।
कलयुगी आवतार पुर्ण चीदंबर । दावी तो वीचीत्र कळा ऐसी ।।३।।
दास म्हणे पतीतपावन । आवतार सगुण चीदंबर ।।४।।

१२७९६१

प्रगट हे लीला दावीतसे नीत्य । आवतारक्रत्य स्वामी माझा ।।१।।
नेणती आज्ञानी भ्रम मानवासी । प्रत्यय सर्वासी दावीतसे ।।२।।
करीतसे लीला आघटीत ईश्वर । स्वामी चीदंबर प्रगट जनी ।।३।।
दास म्हणे आसे आनाथाचा नाथ । स्वामी सर्वगत चीदंबर ।।४।।

१२७९६२

चरीत्र ६३

सत्ता जयाची आघटीत । देवादीका वर्तवीत ।।१।।
सता ज्याची सर्वावरी । आज्ञा वंदीताती सीरी ।।२।।
चेंद्र सुर्य सत्ये करुन । आस्त उदय तो जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सत्ता जयाची आपार ।।४।।

१२७९६३

प्रहर रात्री होता जाण । होते सर्वाचे भोजन ।।१।।
पुरश्चरण आनुष्टान । नीत्य करीती ब्राम्हण ।।२।।
बारा घटीका रात्री ते जाणा । करीती उष्ण पाणी श्नाना ।।३।।
चीदंबरा दास म्हणे । नीत्य ऐसे हे वर्तणे ।।४।।

१२७९६४

येकें दीवसी प्रयोजन । जाले बहुत तें जाण ।।१।।
क्षुद्र दैवत सर्वास । भुत प्रेत तें राक्षस ।।२।।
त्रुत्प सर्वासी करणें । आन्न सर्वालागी देणें ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सर्वालागी हा ईश्वर ।।४।।

१२७९६५

बारा घटीका रात्री जाण । त्यासी पाटवीती आन्न ।।१।।
सर्वालागी बळीहारण । स्वामी देत आसें आन्न ।।२।।
थोर थोर हारेंभरोन । आन्न नाना ते पक्कान्न ।।३।।
चीदंबर दास म्हणें । रात्री पाटवीती जाण ।।४।।

१२७९६६

कोर्या पाड्याभरुनी दोन । च्यार पायली ते आन्न ।।१।।
कोरें वस्त्र तें झाकुन । रुपया खुर्दा तें बांधोन ।।२।।
आरण्यांत कोसावर । पाटवीती चीदंबर ।।३।।
कलयुगी आवतार । दास म्हणे हा ईश्वर ।।४।।

१२७९६७

हारे भरोनी आन्नाचे । डोईवरी ब्राम्हणाचे ।।१।।
रात्र आंधारी बहुत । मशाल बरोबरी घेत ।।२।।
शस्त्र देवोनी माझे हाती । बरोबरी पाटवीती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२७९६८

दुरी आरण्यांत जावे । आन्न तेथे हे ठेवावे ।।१।।
फीरोनी येतावेळे जाण । पाहु नये ते परतोन ।।२।।
ऐसे सांगोनी आपण । आम्हा पाटवीले जाण ।।३।।
चीदंबर दास म्हणे । म्हणती गावांत राहाणे ।।४।।

१२७९६९

तीकडोनी आल्यावरी जाण । लागे करावे ते श्नान ।।१।।
श्नान करोनी गावात । येउ नये केंगेरीत ।।२।।
मशालीचा तो प्यादा येक । दोघे ब्राम्हण ते देख ।।३।।
चीदंबर दास म्हणे । येकटे केंगेरीत येणे ।।४।।

१२७९७०

हात पाय धोवोनी यावे । तुम्ही श्नान न करावे ।।१।।
मज बोलावीलो आत । ईतर धाडीयले गावात ।।२।।
चीदंबर ऐशापरी । आनाथासी क्रपा करी ।।३।।
दास म्हणे वीश्वंभर । कलयुगी आवतार ।।४।।

१२७९७१

च्यार पायलीचे आन्न । होते ठेवीले नेउन ।।१।।
मद्य रात्रीसी ते जाण । देवत दाटी ते मीळोन ।।२।।
प्राथःकाळी पाहु जात । द्रीष्टी न पडे ते सीत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।४।।

१२७९७२

भुत प्रेत ते राक्षस । आन्न देत या सर्वास ।।१।।
ऐशापरी आन्न शांती । जीव जेंतू सर्वापती ।।२।।
आसे दयाळ दीनाचा । रक्षी लौकीक ब्रीदाचा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुर्णब्रम्ह हा आवतार ।।४।।

१२७९७३

चरीत्र ६४

पुरश्चरण होता समुदाय तो थोर । करी चीदंबर प्रगट लीला ।।१।।
ज्याचे सत्येवीण न हालेची पान । आवतार सगुण स्वामी माझा ।।२।।
ज्याचे सत्य करुन चेंद्र सुर्य चाले । उघड दावीले द्रीष्टीसी ते ।।३।।
दास म्हणे स्वामी माझा ब्रम्हपुर्ण । आवतार सगुण कलयुगी तो ।।४।।

१२९९७४

आस्त उदय जाण ज्याचे आज्ञावरुन । तोची जाला सगुण चीदंबर ।।१।।
ब्राम्हणभोजन होता येके दीवसी । कष्ट हे सर्वासी जाले बहुत ।।२।।
मागीले पंगतीसी मध्यरात्र गेली । नीद्रा नाही आली दीवस दोन ।।३।।
दास म्हणे कष्ट बहुत वीप्रालागी । नसे नीद्रेलागी आवसर तो ।।४।।

१२७९७५

बारा घटीका रात्री मागील ते जाण । लागे ते उटणे त्या वेळेसी ।।१।।
नीद्रा ते लागली च्यारी घटीका जाण । खटपटे ब्राम्हण सीणले ते ।।२।।
क्रपाद्रीष्टी पाहाता जाय त्याचा सीण । बळ हे चौगुण कष्टालागी ।।३।।
चीदंबर दास म्हणे लीला दावी । स्वामी नीत्य नवी चीदंबर ।।४।।

१२७९७६

पाच घटका रात्र राहीलीसे जाण । स्वामी ते उटोन बाहीर आले ।।१।।
सर्वालागी पुसती रात्र आसे कीती । पाच घटका म्हणती लाहान थोर ।।२।।
घटकायंत्र जवळी थोर कीमतीचे । पाहुन गणीत त्याचे सांगताती ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणती रात्र फार । कुर्कुट करी थोर शब्द जाण ।।४।।

१२७९७७

जवळी थोर थोर ब्राम्हण सरदार । म्हणती रात्र फार नसे आता ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी सांगावे गणीत । पाच घटका आंत म्हणती सर्व ।।२।।
मंडळीसहीत बाहेर उभे स्वामी । त्या वेळेसी आम्ही जवळी जाण ।।३।।
दास म्हणे लीला दावी चीदंबर । रात्र दोन प्रहर वाढवीली ।।४।।

१२७९७८

घटका घेउनी जवळी उभे आसती जाण । पुसताती खुण स्वामी त्यासी ।।१।।
उभे राहीलोसे कीती वेळ आता । घटका पाहु जाता भरल्या पाच ।।२।।
आणीक रात्री कीती त्यासी पुसताती । पाच घटका म्हणती दीसताती ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । आसती कोठवर पाच घटका ।।४।।

१२७९७९

स्वामी म्हणती रात्र आसे आझोनी बहुत । नवल करीत जवळीले ते ।।१।।
जावे फीरोनीया नीद्रा करा म्हणती । स्वामी मजप्रती सांगीतले ।।२।।
दक्षण व्दाराहुनी जावे पुर्वव्दारी । स्वामी ते भीतरी गेले फीरोन ।।३।।
दास म्हणे जावोनी नीजती लाहानथोर । नीद्रा येक प्रहर जाली त्याची ।।४।।
१२७९८०

प्रहर येक जाला स्वामी उटोनी आले । सर्व बोलावीले लहानथोर ।।१।।
कीती रात्र आहे तयासी पुसती । पाच घटका म्हणती तैसेची हो ।।२।।
थोर थोर म्हणती लीला ईश्वराची । प्राप्ती हे सुर्याची उगवे कैसा ।।३।।
दास म्हणे स्वामी लीला दावीतसे । उदय आसे आझेवरुनी ।।४।।
१२७९८१

प्रगट दावीत लीला हे द्रीष्टीसी । वाढवीली नीसी दोन प्रहर ।।१।।
आश्चर्य करीती शात्रज्ञ पंडीत । लीला आघटीत चीदंबरा ।।२।।
आस्त उदय होय जयाचे सत्तेने । देखीला द्रीष्टीने तोची स्वामी ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । सगुण हा आवतार कलयुगी ।।४।।
१२७९८२

दावीले हे लीला आपार द्रीष्टीसी । कळवीली श्रीष्टीसी लहानथोर ।।१।।
परी मानवासी भ्रांती आसे बहुत । कल्पना वीपरीत नुमजे काही ।।२।।
सत्य आवतार जाला चीदंबर । न कळे नीर्धार भ्रांतालागी ।।३।।
दास म्हणे आसे पतीतपावन । आवतार सगुण चीदंबर ।।४।।

१२७९८३

क्रपेची हे माता पावे दीनालागी । आवतार कलयुगी स्वामी माझा ।।१।।
पुर्ण आवतार नाम चीदंबर । कळवीले प्रखर मजलागी ।।२।।
दावील प्रत्यय जगालागी सत्य । आवतारक्रत्य करणे आसे ।।३।।
दास म्हणे बहुत बोलणे ते काय । आनाथाची माय चीदंबरा ।।४।।

१२७९८४

चरीत्र ६५

चीदंबर आवतार । दावी नाना चमत्कार ।।१।।
संध्याकाळी पुष्पांजळी । करीती ब्राम्हण मंडळी ।।२।।
दोन तीनशे ब्राम्हण । मंत्रपुष्पालागी जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । नीत्य आनंद गजर ।।४।।

१२७९८५

सामगायन ते मंत्र । प्रहर जात आसे रात्र ।।१।।
माहाव्दारा पुढे जाण । दील्ह्या राहुट्या दाटीन ।।२।।
रात्र आंधार पर्जन्य । वीप्र जाती त्वराकरुण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तेथे दावी चमत्कार ।।४।।

१२७९८६

रात्री आंधाराचे वेळी । वाटेवरी थोर ईंगळी ।।१।।
आर्धा नारेळा प्रमाण । थोर वींगळी वींचु जाण ।।२।।
नांगी आंगुष्टा प्रमाण । थोर पसरीली जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । रक्षण करीतो ईश्वर ।।४।।

१२७९८७

मधे उमर्‍याचे आत । वींगळि बैसे आंधारात ।।१।।
दाटी ब्राम्हणाची बहुत । रगडा माहाव्दारी होत ।।२।।
येकावरी येक पाही । उभे राहाती तयाठाई ।।३।।
जागा नसे रीता काही । ईंगळी बैसली त्या ठाई ।।४।।
दास म्हणे चीदंबर । वीघ्न करीतसे दुर ।।५।।

१२७९८८

ब्राम्हण दाटी नीवारण । लागे घटका प्रमाण ।।१।।
प्रकाष तो मशालीचा । व्दारी मेळा ब्राम्हणाचा ।।२।।
ब्राम्हण सर्व गेल्यावरी । उभी मशाल ते व्दारी ।।३।।
चीदंबर दास म्हणे । वींगळी पाहीली द्रीष्टीने ।।४।।

१२७९८९

माहा आरीष्ट ते थोर । कोन्ही न जाय समोर ।।१।।
दौंष करीता जातो प्राण । ऐसे म्हणती सर्व जन ।।२।।
चीदंबर क्रपाकरुन । वाचवीले ते ब्राम्हण ।।३।।
चीदंबर दास म्हणे । सर्व स्वामीचे सत्तेने ।।४।।

१२७९९०

ईंगळी पाहताक्षणी जाण । आणी मीळाले ब्राम्हण ।।१।।
म्हणती आरीष्ट मारावे । स्वामीलागे ते पुसावे ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । कदा मारु नये यासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती सर्वास ।।४।।

१२७९९१

दीवाकरआपा जाण । आणवी तपेले आंतुन ।।१।।
त्यात वींगळी घालुन । वरी ठेवीले झाकुन ।।२।।
दुर नेले आरण्यात । तेथे सोडोनीया देत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नवल वाटले सर्वास ।।४।।

१२७९९२

वीप्र स्वामीसी वीनवीत । कळा तुमची आघटीत ।।१।।
स्वामी म्हणती सर्वासी । ईश्वर रक्षी तो तुम्हासी ।।२।।
थोर थोर ते ब्राम्हण । स्वामीलागी म्हणती जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्र म्हणती हा ईश्वर ।।४।।

१२७९९३

वाटे नवल सर्वासी । धाक वींचु त्या सर्पासी ।।१।।
द्रीष्टी पाहाती लाहानथोर । कळा दावी चीदंबर ।।२।।
ऐसे जाण केंगेरीसी । नीत्य प्रत्यय सर्वासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । नीत्य दावी.चमत्कार ।।४।।

१२७९९४

चीदंबर आवतार । कलयुगी वीश्वंभर ।।१।।
नीत्य दावीतसे क्रत्य । म्हणती आवतार सत्य ।।२।।
आसे पतीतपावन । दीनालागी रक्षी जाण ।।३।।
दास म्हणे वीश्वंभर । सगुण जाला चीदंबर ।।४।।

१२७९९५

चरीत्र ६६

चीदंबरा दावी प्रत्यय जगासी । भ्रांती मानवासी उमजेना ।।१।।
मानव ते बुत्धी करीती देवापुढे । कापटे ते वेडे धरुनी येती ।।२।।
सर्वाचे ह्रदय जाणे तो ईश्वर । नेणती गव्हार हीनबुत्धी ।।३।।
दास म्हणे येती दरुषणासी कोन्ही । आपुले बुत्धीकरुनी भेटु म्हणती ।।४।।

१२७९९६

केंगेरीमाजारी होते चीदंबर । आनुष्टान थोर करीतावेळे ।।१।।
यात्रा दाटी बहुत होती मुरगोडात । स्वामी केंगेरीत तयेवेळी ।।२।।
दोन मास तेथ बंदी दरुषणाची । दाटी हे यात्रेची गावामाजी ।।३।।
दास म्हणे यात्रा मीळोनीया जाण । दरुषण कठीण म्हणती येथे ।।४।।

१२७९९७

दोघे चौघे आसामी मीळोनी बैसती । वीच्यार करीती कपट्याचा ।।१।।
कैसेही करुनी घेउ म्हणती भेटी । करीताती गोष्टी आपुले ठाई ।।२।।
त्यामाजी तो येक शुद्र बोलतसे । पैज घालीतसे दरुषणाची ।।३।।
दास म्हणे जाणे आंतर ईश्वर । साक्ष चीदंबर सर्वाठाई ।।४।।

१२७९९८

शुद्र तो नीघोनी रात्री वेळे आला । चोरोनी बैसला येकीकडे ।।१।।
रात्र ते आंधारी आसे श्रावणमास । न कळे कोणास आत आला ।।२।।
केंगेरी आवारा आसे बहुत थोर । जावोनीया चोर येकीकडे ।।३।।
दास म्हणे होत गंजी गवताची । संधी हे चोराची तयाठायी ।।४।।

१२७९९९

उगाळे गवताचे पडले होते बहुत । त्यामाजी बैसत दडोनीया ।।१।।
प्राःथकाळी स्वामी बाहीर नीघतावेळे । भेटी तयावेळे घेउ म्हणे ।।२।।
गुप्तरुपे करुनी घरीन चरण । बैसला चोरुन याजसाटी ।।३।।
दास म्हणे रात्र गेली दोन प्रहर । दरवाजे मामुर जाले तेथे ।।४।।

१२८०००

चहु दरवाजाच्या कील्या आणूनी देती । चौकी मजप्रती होती तेव्हा ।।१।।
कील्या आणोनीया देती माझेहाती । मग नीद्रे जाती मंडळी ते ।।२।।
तेची वेळे स्वामी बोलावी तयासी । करोनी चौकसी कुलुपे दील्हे ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर त्यासी । आला या ठायासी शुद्र कोन्ही ।।४।।

१२८००१

कापटे करोन बैसला चोरुन । म्हणे धरीन चरण स्वामीचे ते ।।१।।
येवोनी बैसला आसे आवारात । वीटाळ तो करीन म्हणोनीया ।।२।।
सीवेल मजलागी शोध करा वेगी । न कळे तुम्हालागी कैसे आता ।।३।।
दास म्हणे सांगे स्वामी त्या सर्वासी । करोनी चौकसी पाहा वेगी ।।४।।

१२८००२

मशाल लावोनी धुंडीताती जाण । न लागे टीकान कोटे त्याचा ।।१।।
नाही म्हणोनी येती तीनीवेळा फीरोनी । चौकसी करोनी पाहीले ते ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी गवत कोपरयासी । उपसोनी तयासी पाहीली ते ।।३।।
दास म्हणे सांगे पुर्ण चीदंबर । प्रगट ईश्वर सर्वसाक्षी ।।४।।

१२८००३

ब्राम्हण जावोनी पाहाती गवत आत । बैसलासे शुद्र गुप्त तेथे ।।१।।
धरोनी मारीती चहुकडोनीया । स्वामी येवोनीया सांगताती ।।२।।
न मारावे त्यासी आला दरुषणासी । काढोनी वेगेसी बाहीरी तो ।।३।।
दास म्हणे जाला शुद्र भयभीत । आहंभाव गळीत आनायास ।।४।।

१२८००४

जावोनीया सांगे गावात यात्रेसी । कापटे मजसी फळा आले ।।१।।
आन्याई आपाराधी पतीत मी आसे । वाचवीले कैसे चीदंबरे ।।२।।
पावन आवतार सत्य कलयुगी । आवतार जगी नीश्चयेसी ।।३।।
दास म्हणे करीती नवल यात्रालोक । दावीले कौतुक स्वामीराया ।।४।।

१२८००५

सर्वाचे ह्रदई आसे साक्षभुत । आंतर जाणत मुंगीयेचे ।।१।।
पीपलीक ब्रम्हा सर्व आदी करुन । साक्षभुत जाण सर्वाठाई ।।२।।
नये लपवीता कुडे त्याज पुढे । मानव ते वेडे भ्रांती रुप ।।३।।
दास म्हणे धणी पतीतपावन । आवतार सगुण चीदंबर ।।४।।

१२८००६

चरीत्र ६७

कॆंगॊरीसी चीदंबर । दावी नीत्य चमत्कार ।।१।।
माहा शास्त्री तॆ पंडीत । आसॆ समुदाय बहुत ।।२।।
उघड पाहाती प्रचीती । भ्रांती न जाय तॆ चीत्ती ।।३।।
दास म्हणॆ चीदंबर । दावी लीला हे ईश्वर ।।४।।

१२८००७

नीत्य रात्र समई जाणा । दॆव यॆताती दरुषणा ।।१।।
प्रगट पाहाती नयनी । परी नोळखती कोन्ही ।।२।।
ब्राम्हण वॆसॆ दॆव यॆती । सर्व द्रीष्टीनॆ पाहाती ।।३।।
दास म्हणॆ चीदंबर । पुर्णब्रम्ह आवतार ।।४।।

१२८००८

नीत्य दावीतसॆ कळा । होतो आनंद सोहोळा ।।१।।
बरोवरी वीप्रमॆळा । सर्व पाहाताती डोळा ।।२।।
म्हणती आनंत ह्या कळा । उघड ब्रम्हीचा पुतळा ।।३।।
दास म्हणॆ चीदंबर । कलयुगी आवतार ।।४।।

१२८००९

ब्राम्हण समुदाय बहुत । त्यात येताती दैवत ।।१।।
उघड येती दरुषणासी । न कळे माईक जनासी ।।२।।
उघड सांगताती गोष्टी । वीप्र पाहाताती द्रीष्टी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कळा दावी हे ईश्वर ।।४।।

१२८०१०

नीत्य करीती प्रार्थना । आर्थ कोणासी कळेना ।।१।।
आसे ईश्वर हा सत्य । दावी आवतारक्रत्य ।।२।।
जैसी जयाची भावना । तैसा त्यासी होय जाणा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । नीववी सर्वाचे आंतर ।।४।।

१२८०११

जैसी ज्याची उपासना । तैसे रुप दावी जाणा ।।१।।
आवडी माझीया चीतासी । पुरवी चीदंबर तैसी ।।२।।
मज वाटले चीतासी । देवा प्रत्यय दावीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी पुरवावी आस ।।४।।

१२८०१२

होतो चौकीवर जाण । करीत बैसलोसे ध्यान ।।१।।
तेव्हा वाटले चीतासी । वीनवीले म्या स्वामीसी ।।२।।
भेटी द्यावी या वेळेसी । क्रपावंत माय होसी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२८०१३

वाट पाहात बैसलो । उटोनी उभा ते राहीलो ।।१।।
प्रकाश चांदणे पडीले । स्वामी तीकडोनी आले ।।२।।
पींपळाचे छायेहुनी । आले पुढे ते चालोनी ।।३।।
भाळी दीव्य ते वीभुती । गुंडी घेतलीसे हाती ।।४।।
दास म्हणे चीदंबर । आला माझीया समोर ।।५।।

१२८०१४

उभा कर मी जोडुन । स्वामी चालीले जवळुन ।।१।।
आंब्याची या व्रक्षातळी । जाय स्वामी चेंद्रमौळी ।।२।।
उभा वाट मी पाहात । स्वामी जाले तेथे गुप्त ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी कळा हे ईश्वर ।।४।।

१२८०१५

वाट पाहातो उभा जाण । स्वामी येतील तीकडोन ।।१।।
न कळे बैसले लघवीसी । भ्रांती माझीया चीत्तासी ।।२।।
उभा वाढवेळ जाण । स्वामी न येती आझोन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । प्रगट दावी चमत्कार ।।४।।

१२८०१६

आंब्याचीया व्रक्षाखाले । तेथे जाउनी पाहीले ।।१।।
स्वामी नव्हते त्या ठायासी । नवल वाटले चीतासी ।।२।।
आला शास्त्री तो पंडीत । त्यासी सांगीतली मात ।।३।।
वीप्र म्हणे तो दासासी । प्रत्यय दावीला तुम्हासी ।।४।।

१२८००१७

प्राथःकाळी स्वामी जाण । पुसती मज वर्तमान ।।१।।
द्रीष्टांत जाला तुज काये । पुसे आनाथाची माये ।।२।।
वीनवीले म्या स्वामीसी । प्रगट भेटी दील्हे मजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुसताती सवीस्तार ।।४।।

१२८०१८

जाले सर्व सांगीतले । स्वामीरायें आयकीलें ।।१।।
शास्त्री काय म्हणतसें । स्वामी पुसताती ऐसें ।।२।।
भेटी दील्ही तुम्हा जाण । ऐसें बोलीला ब्राम्हण ।।३।।
दासालागी स्वामी म्हणें । गुप्त चीती हे ठेवणें ।।४।।

१२८०१९

ऐसा वीश्वाचा जनक । दावी भक्तासी कौतुक ।।१।।
भक्तकाज तो कैवारी । मनोरथ पुर्ण करी ।।२।।
आसें पतीतपावन । चीदंबर ब्रम्हपुर्ण ।।३।।
दास दीनाच्या कैवारा । प्रगट होसी चीदंबरा ।।४।।

१२८०२०

चरीत्र ६८

जाले आनुष्टान नीरोप ब्राम्हणा । देताती दक्षणा स्वामी त्यासी ।।१।।
जेष्ट पुत्र आसें दीवाकर जाण । रुपयें आणुन देत आसे ।।२।।
ब्राम्हणाचे नावनीसी याद करुन । दक्षणा नेमुन देत आसे ।।३।।
दास म्हणें दावी कळा चीदंबर । आसें तो उदार त्रैलोक्याचा ।।४।।

१२८०२१

जैसा ज्याचा आसे आधीकार आंगी । दक्षणा त्यालागी देती तैसी ।।१।।
ईश्वराचे देणे आसे आपरमीत । करीती परीमीत मानव ते ।।२।।
शेदोनशे रुपये आणोनीया देत । दक्षणा ते होत सहश्रावधी ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । द्रीष्टीसी गोचर पाहाती जन ।।४।।

१२८०२२

सर्वाचे देखता स्वामी बाहीर येती । उघड बोलती क्रपा करुनी ।।१।।
हाती नसे काही लोक द्रीष्टी पाहाती । क्षणामाजी देती मुठी भरोनी ।।२।।
दक्षणा तो पैका रुपया आथवा होन । देती मुठी भरोन सहज स्वामी ।।३।।
दास म्हणे करणी आसे आघटीत । उघड दावीत चीदंबर ।।४।।

१२८०२३

नीरोप देता वेळे दुरदेसी कोन्ही । देती मुष्टी भरुनी गुप्तरुपे ।।१।।
करीती संपादनी कमरेवरी हात । खोवीले दावीत कनोटेसी ।।२।।
लागेल तीतुके काढोनीया घेती । ब्राम्हणासी देती दक्षणा ते ।।३।।
दास म्हणे दावी नीत्य चमत्कार । प्रगट चीदंबर यात्रेलागी ।।४।।

१२८०२४

यात्रा हे मीळती लाहानथोर जन । प्रत्यय दावी जाण सर्वालागी ।।१।।
नीत्य चमत्कार दावी चीदंबर । कलयुगी आवतार स्वामी माझा ।।२।।
आसे आंतर साक्ष सर्वाचे ह्रदई । बोलोनीया दावी आंतरीचे ।।३।।
दास म्हणे सांगे आंतरीचे गुज । स्वामी माहाराज चीदंबर ।।४।।

१२८०२५

नये लपवीता तया पुढे काही । साक्ष तो ह्रदई चीदंबर ।।१।।
आदी आंत जाणे सर्व वर्तमान । लपवी ऐसा कोण तयापुढे ।।२।।
न कळे मानवा करीती संपादनी । कापटे घरोनी स्वामीपुढे ।।३।।
चीदंबर दावी उघड बोलुन । दास म्हणे जाण वीश्वसाक्षी ।।४।।

१२८०२६

मानव आज्ञान कापटे करीती । भाव धरुणी येती दांभीक ते ।।१।।
ज्याचा जैसा भाव तैसा त्यासी देव । नेणती मानव भ्रांतीरुप ।।२।।
पतीतपावन आसे चीदंबर । बळे म्हणे थोर तयालागी ।।३।।
दास म्हणे दावी सामर्थ्य आपुले । पाहीजे रक्षीले आनाथासी ।।४।।

१२८०२७

नानापरी देव बुझावी मानव । बळे भक्तीभाव लावी त्यासी ।।१।।
पतीतपावन चाली दावीतसे । नींदकासी कैसे बळे बोधी ।।२।।
दुष्ट बुत्धी करुनी दुर मानवाची । भक्ती हे पायाची लावी बळे ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । प्रगट चीदंबर कलयुगी ।।४।।

१२८०२८

नानापरी येती कोन्ही वेषधारी । समाधान करी तयाची ते ।।१।।
न गणी तो कोणी उंचनीच जाण । देवासी समान राव रंक ।।२।।
भक्ती प्रीयकर आसे चीदंबर । जातसे समोर रंकालागी ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । ज्यासी लाहन थोर सारीखेची ।।४।।

१२८०२९

संपत्तीचे लोक हो का कोन्ही राव । तयासी ते माव दावीतसे ।।१।।
न घे त्याचे भेटी येती दरुषणासी । स्वप्नी हे तयासी नेदी भेटी ।।२।।
आंहभाव दुर जाय संपत्तीचा । तेव्हा दरुषणाचा घडे योग ।।३।।
दास म्हणे भावे येती शरणांगत । चीदंबर करीत क्रपा त्यासी ।।४।।

१२८०३०

सांडोनी आभीमान मद संपत्तीचा । भाव चरणाचा द्रढ धरी ।।१।।
चीदंबर त्यासी प्रत्यय दावीत । पावन करीत क्षणामाजी ।।२।।
पतीतपावन आसे आवतार । करीतो उत्धार आनाथाचा ।।३।।
दास म्हणे ऐसी उघड दावी कळा । ब्रम्हीचा पुतळा चीदंबर ।।४।।

१२८०३१

चरीत्र ६९

श्रावण भाद्रपद मासी । आनुष्टान कॆंगॊरीसी ।।१।।
जालेवरी आनुष्टान । आस्वीन मास तेथे जाण ।।२।।
नीत्य ब्राम्हण भोजन । घरीची मंडळी ते जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । यात्रा येती दरुषणास ।।४।।

१२८०३२

दीवाकर आपा म्हणत । स्वामी चलावे गावात ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । गावी जावे दीपावळीसी ।।२।।
आस्वीन मास कॆंगॊरीसी । स्वस्त राहावे या ठायासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी लीला वीश्वंभर ।।४।।

१२८०३३

आंगे दावीत राहणी । रुषी मार्ग आचरोनी ।।१।।
सहीत्य आणवी ते जाण । वर्चेवरी गावातुन ।।२।।
येके दीवसी ते साहीत्य । उणे मंडळी बहुत ।।३।।
चीदंबर दास म्हणे । कळा स्वामीसी दावणे ।।४।।

१२८०३४

चीदंबर आवतार । दावी नीत्य चमत्कार ।।१।।
आवतार ब्रम्हपुर्ण । म्हणे मी गरीब ब्राम्हण ।।२।।
दावी वर्तणुक करुन । स्वामी ब्रम्ह ते सगुण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी रहणी हे आपार ।।४।।

१२८०३५

स्वामी बाहीर नीघती । जाउ म्हणे भाजीप्रती ।।१।।
आंगे जावोनी सेतात । भाजी आंबाड्याची घेत ।।२।।
पाच पन्नास ब्राम्हण । भाजी वेचीताती जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी कौतुक भक्तास ।।४।।

१२८०३६

भाजी बांधोनी पदरी । घेउनी येती खांद्यावरी ।।१।।
रीत्धीसीत्धी ज्याच्या दासी । भाजी घेउनी ये घरासी ।।२।।
उणे होते साहीत्यासी । जाले पहील्या पंगतीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । मागे मंडळी ते फार ।।४।।

१२८०३७

शालीवाहन शके १७४४ चीत्रभान संवस्तर भाद्रपद वद्य दशमी रेवती नक्षत्र त्रीतय घटका

कळा दावी चीदंबर । कलयुगी आवतार ।।१।।
मागील मंडळीसी जाण । भाजी आणीतो भगवान ।।२।।
पाठ्या रीत्या कोटी आंत । पीट भरे त्या सर्वात ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रत्यय ईश्वर ।।४।।

१२८०३८

वरी करी संपादनी । बोले चीदंबर धणी ।।१।।
पीट आता आणवीले । पाठ्या भरोनी ठेवीले ।।२।।
नवल करीती ब्राम्हण । आता भाजी आणीली जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८०३९

स्वामी पुसती मंडळीसी । कीती राहीले उपवासी ।।१।।
दाहावीस समुदायेसी । आसे पाटील उपवासी ।।२।।
ऐसे सांगतो ब्राम्हण । स्वामीलागी उघडोन ।।३।।
दासलागी बोलाउन । स्वामी सांगे मोहे करुन ।।४।।

१२८०४०

वेळ जाला भोजनासी । पीट दील्हे स्वंयपाकासी ।।१।।
हर्ष माझे चीती जाण । दील्हे ब्रम्हीचे ते आन्न ।।२।।
ईश्वरक्रत्य ते दावोन । आम्हा घातीले भोजन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आंत नसे या भाग्यास ।।४।।

१२८०४१

स्वामी आनाथाची माय । जैसी वत्सालागी गाये ।।१।।
प्रेम पान्हा पाजीतसे । मोहे करुनी धावतसे ।।२।।
आसे त्रैलोक्याचा धणी । दावी आगाध करणी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२८०४२

आस्वीन तो मासी वीजया दशमी जाणा । सीमा उंलघना नीघती स्वामी ।।१।।
पालखी देवाची नीशाण ते जाण । मंडळी ब्राम्हण बरोबरी ।।२।।
सर्व लाहनथोर नाना याती नर । नीघती बाहीर सीलंधणा ।।३।।
दास म्हणे मज ठेवीती रक्षण । चीदंबर जाण कैंगेरीसी ।।४।।

१२८०४३

सीमा उलंघणा करोनीया आले । चीदंबर बोले सर्वालागी ।।१।।
येवोनी मजसी पुसती द्रीष्टांत । सांगीतले मात स्वामीलागी ।।२।।
द्रीष्टांत पुसोनी म्हणती मजसी । जाले की तुजसी समाधान ।।३।।
दासालागी म्हणे धणी चीदंबर । नीश्चय नीर्धार आसो द्यावा ।।४।।

१२८०४४

त्यावरी हो पुढे दीपवाळीसण । धाली मंगळश्नान वीप्रालागी ।।१।।
कंगेरी सोडोनी गेले मुरगोडासी । तेथे ब्राम्हणासी पक्वान्न ते ।।२।।
ब्राम्हणभोजन होय आनंदेसी । बोलावीले मजसी गावामाजी ।।३।।
चीदंबर म्हणे दासालागी जाण । नीद्रा सुखेकरुन ध्यावे आता ।।४।।

१२८०४५

तीनमास नीद्रा नव्हाती मजसी । वीनवीले स्वामीसी तयावेळे ।।१।।
रात्री नीद्रा मज नसे स्वामीराया । बैसोनीया ठाया व्दारी तुमच्या ।।२।।
चीदंबर म्हणे नीद्रा ध्यावी जाण । सरले आनुष्टान आरण्यात ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणती आलो गावी । ज्यागर तो पाही कासयासी ।।४।।

१२८०४६

वीनवीले स्वामीसी नीद्रा न ये मजसी । जाणे कासयासी स्थळालागी ।।१।।
देशपांड्यालागी स्वामी बोलावीती । स्थळ याजप्रती द्यावे म्हणती ।।२।।
पाटवीले मज त्याचीया घरासी । नीवांत स्थळासी सोप्यावरी ।।३।।
चीदंबर दावी कळा दास म्हणे । बळे नीद्रा येणे बैसो नेदी ।।४।।

१२८०४७

तीन मास नीद्रा येवो नेदी मज । दावीयली गुज स्वामीराये ।।१।।
नीद्रा घ्यावी म्हणती बळे झोप येत । भजन करीत बैसलो मी ।।२।।
केव्हा नीद्रा आली न कळता जाण । बैसलो उटोन सुर्योदई ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । प्रगट चीदंबर लीला करी ।।४।।

१२८०४८

नीरोप गावासी स्वामी देउ म्हणती । द्रढ बोध करीती नीत्य नवा ।।१।।
तीनवार स्वामी नीत्य बोलावीती । नीश्चय करवीती द्रढ मज ।।२।।
ईतर ब्राम्हण येती नीरोपासी । जाणे बडोद्यासी वीनवीती ।।३।।
दास म्हणे तयालागी चीदंबर । सांगती उतर उघड हे ।।४।।

१२८०४९

वीप्र म्हणतसे स्वामीलागी आता । खर्ची भगवंता नसे मज ।।१।।
शुद्राची ते भीक्षा न घे कदा आन्न । वाटेने भोजन कैसे करु ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी राजारामासंगे । बंदोबस्त आंगे करील तुमचा ।।३।।
दास म्हणे ऐसे सांगती वीप्रासी । नवल सर्वासी वाटे तेची ।।४।।

१२८०५०

चीदंबर बोले मजलागी जाणा । घालावे भोजना ब्राम्हणासी ।।१।।
त्या उपरी तुम्ही करावे भोजन । सांगताती खुण भवीश्याची ।।२।।
ब्राम्हणासी जाणे आसे बडोद्यासी । जाणे ते आम्हासी नागपुरी ।।३।।
दास म्हणे कळा दावी चीदंबर । भ्रांती पडे थोर जनालागी ।।४।।

१२८०५१

वस्त्र ते भुषण देवोनी मजसी । गुर्लहोसुरासी घेउनी आले ।।१।।
तेथे आल्यावरी नीरोप तो दील्हा । दील्हे ते खर्चाला तेरा पैसे ।।२।।
येक्या महीन्याची वाट नागपुर । आज्ञा ते सत्वर देती स्वामी ।।३।।
दासालागी म्हणे चीदंबर धणी । वेगी यावे फीरोनी मजपासी ।।४।।

१२८०५२

तेरा पैशावरी कुटुंब घेवोनी । आलो ते फीरोनी स्वामीपासी ।।१।।
चीदंबर दावी कळा उघड ऐसी । तरी या मनासी भ्रांती पडे ।।२।।
उघड आवतार कळा दावीतसे । प्रचीती येतसे सर्वालागी ।।३।।
दास म्हणे ऐसा प्रताप आपार । दावी चीदंबर यात्रेलागी ।।४।।

१२८०५३

चरीत्र ७१

चीदंबर नाम घेता । नसे वीन्घाची ते वार्ता ।।१।।
प्रचीत माझी या मनासी । लीला दावीली द्रीष्टीसी ।।२।।
वाटे येता वेळे जाण । नाना नीवारीतो वीघ्न ।।३।।
दास म्हणे चीदंबर । रक्षण करीतो ईश्वर ।।४।।

१२८०५४

कुटुंब आणीता वाटेसी । नसे संगती मजसी ।।१।।
जाणे आसे दुरदेसी । दोन मास ते वाटेसी ।।२।।
स्त्रीया दोघीजण संगे । पादच्यारी चाले आंगे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वाटे सांभाळी ईश्वर ।।४।।

१२८०५५

गाव उज्याड वाटेत । आरण्य वाढले गवत ।।१।।
वाटे मार्गी ते चालता । व्याघ्र आला आवचीता ।।२।।
व्याघ्र देखोनी नयनी । कांता घाबरली मनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रत्यय ईश्वर ।।४।।

१२८०५६

व्याघ्र चाले बरोबरी । आंतर हात धोंड्यावरी ।।१।।
डावे बाजुसी चालत । आला जवळी बहुत ।।२।।
नाम घेता चीदंबर । व्याघ्र होत आसे दुर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । व्याघ्र चाले संगतीस ।।४।।

१२८०५७

दाहा बीघे सेतातुन । व्याघ्र चाले संगतीन ।।१।।
चीदंबर नामे करुन । गेला व्याघ्र तो पळोन ।।२।।
दाहा मनुश्य संगतीसी । करीती आश्चर्य चीतासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८०५८

येता मुकामासी जाण । चीदंबर करीतो रक्षण ।।१।।
चुलत बंधु संगतीने । आसे आवीश्वासी जाण ।।२।।
प्रत्यय जाल्यावरी त्यासी । धन्य म्हणे देवाजीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी नाना चमत्कार ।।४।।

१२८०५९

भगीनी बंधु दोघे जाण । गावी राहीले ते जाण ।।१।।
पुढे नीघालो यात्रेसी । चीदंबराचे भेटीसी ।।२।।
गोदातीराहुनी जाण । नसे सोवत वाटेन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दोघे स्त्रीया बरोबर ।।४।।

१२८०६०

घाटाजवळी येता क्षणी । नाही सोबतीसी कोन्ही ।।१।।
योजन येक गाव दुरी । मध्ये डोंमगराची बारी ।।२।।
पाचपन्नास मीळोन । लोकी जाती त्या वाटेन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नसे सोबत आम्हास ।।४।।

१२८०६१

दीवस आला माध्यानेसी । तेथे डोंगर बारीसी ।।१।।
वाखा जाला तो स्त्रीयेसी। पोट शुळ उठे तीसी ।।२।।
नीजवीले आरण्यांत । व्रक्षासेजारी झाडीत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । मोकाम केला त्या ठायास ।।४।।

१२८०६२

येवोनी चोराचा नायक । जवळी बैसला तो देख ।।१।।
कोटे जाता पुसे मजसी । जातो चीदंबरापासी ।।२।।
ऐकोनी चीदंबर नाम । चोरालागी भक्तीप्रेम ।।३।।
दास म्हणे चीदंबर । चोर सांगे सवीस्तार ।।४।।

१२८०६३

आमुचे चोरकर्म जाण । तुम्हा करीतो रक्षण ।।१।।
आला प्रर्जन्य त्या ठाई । चोरे बोलावीले पाही ।।२।।
नेले खोल दऱ्या आंत । बैसवीले झोफडीत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । चोर करीतो आदर ।।४।।

१२८०६४

करु लागे तो भजन । रात्र गुजरली जाण ।।१।।
प्राथःकाळ सुर्योदई । चोर बारी ते चढवी ।।२।।
दोन कोस बरोबर । रक्षण येत आसे चोर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । लागे तस्कर पायास ।।४।।

१२८०६५

सत्ता ऐसी चीदंबरी । मारी तेची लोभ करी ।।१।।
लीला दावी चीदंबर । नाम घेता उतरी पार ।।२।।
कलयुगी आवतार । कळा आनंत आपार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । साहे दीनासी ईश्वर ।।४।।

१२८०६६

कलयुगी आवतार जाला चीदंबर । नीत्य चमत्कार दावीतसे ।।१।।
नाना देशोदेशी यात्रा येत आसे । आंतर जाणतसे सर्वाचे तो ।।२।।
जैसी ज्याची ईछा तेची पुरवावी । प्रत्यय तो दावी नीत्य नवा ।।३।।
दास म्हणे आसे ब्रम्ह नीर्वीकार । सगुण आवतार चीदंबर ।।४।।

१२८०६७

यात्रा देशोदेशी येती दरुषणासी । भोजन तयासी ईछीत ते ।।१।।
नाना प्रकारीचे ईछा मनुशासी । भोजन तयासी तेची देती ।।२।।
आंतरीचा साक्षी आसे सर्वाभुती । दावीत प्रचीती यात्रेलागी ।।३।।
दास म्हणे यात्रा येती देशोदेशी । प्रत्यय सर्वासी दावीतसे ।।४।।

१२८०६८

नागपुरीहुनी यात्रा आली आसे । दर्शण सायासे जाले त्यासी ।।१।।
चाळीस हे यात्रा स्त्रीया ते ब्राम्हण । मीळोनीया जाण दर्षणासी ।।२।।
ईछा वेगळाली धरोनी चीत्तात । प्रचीत पाहात स्वामीचे ते ।।३।।
दास म्हणे आले स्वामीचे दरुषणा । सांगे त्या भोजना चीदंबर ।।४।।

१२८०६९

देशपांड्यालागी बोलावोनी जाण । सांगताती खुण स्वामी त्यासी ।।१।।
चाळीस जनाचे सांगती जे ठाई । भोजनासी पाही चीदंबर ।।२।।
ईछा त्याचे मनी भोजनाची जैसी । स्वामी सांगे तैसी वेगळाले ।।३।।
दास म्हणे आम्ही जवळी त्या वेळेसी । होतो मुरगोडासी चीदंबर ।।४।।

१२८०७०

बोलावोनी वीप्र स्वामी सांगताती । ईछा त्याची होती तेची आंगे ।।१।।
तुपपोळी भाज्या मोजोनीया जाण । पदार्थ नेमोन सांगताती ।।२।।
त्याचीया मनात मोजोनी पदार्थ । तीतुकेची सांगत चीदंबर ।।३।।
दास म्हणे आसे साक्षी आंतरासी । कटीण तयासी काय याची ।।४।।

१२८०७१

दोघी चौघी बाया गंगाभागीरथी । त्याचे चीती होती वासना ते ।।१।।
दुसर्या वीप्राघरी तयाचे भोजन । स्वामी बोलाउन सांगताती ।।२।।
जैसी त्याचे त्याचे चीती जे वासना । मातोश्री ते जाणा चौघीजणी ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलाउनी त्यासी । पदार्थ वीप्रासी सांगताती ।।४।।

१२८०७२

भाकर जोंधळ्याची भाजी आंबाड्याची । दाटते कणीची करा म्हणती ।।१।।
लसुण सोलुनी पसाभरी जाण । तेल ते घालोन आर्धा शेर ।।२।।
हीरव्या मीर्चा त्यासी सगळाल्या जाण । घालावे भोजन पोटभरी ।।३।।
सांगे चीदंबर ऐकती त्या बाया । म्हणती स्वामीराया आंतर साक्षी ।।४।।
दास म्हणे ऐसे दावीतसे लीला । आश्चर्य यात्रेला वाटे मनी ।।५।।

१२८०७३

जाती लोटांगणी स्त्रीया ते ब्राम्हण । कापटे धरोन आलो म्हणती ।।१।।
वीच्यारोनी चीती पदार्थ नेमीले । पाहीजे घातीले स्वामीने ते ।।२।।
तरी सत्य म्हणु साक्षी आंतरीचा । नीश्चय आमुचा ऐसा होता ।।३।।
दास म्हणे बोले त्यासी चीदंबर । आसे तो ईश्वर आंतरसाक्षी ।।४।।

१२८०७४

पतीत आन्याई वीप्र म्हणती जाणा । पतीतपावना क्षमा करी ।।१।।
नसे भावशुध्द आलो छळावया । जाउ नेदी वाया स्वामी आता ।।२।।
क्षमा करोनीया पाहीजे रक्षीले । म्हणवी तो आपुले दास आता ।।३।।
चीदंबर म्हणे गरीब मी ब्राम्हण । दास म्हणे शरण वीप्र येती ।।४।।

१२८०७५

कलयुगी आवतार स्वामी चीदंबर । गर्जतात थोर वीप्र ऐसे ।।१।।
स्वामी मना करीती वीप्रालागी फार । आनंदे गजर नाम घेती ।।२।।
आमुच्या उत्धारा लागी आवतार । सगुण चीदंबर जाला म्हणती ।।३।।
दास म्हणे ऐसी लीला नीत्य नवी । चीदंबर दावी यात्रेलागी ।।४।।
१२८०७६

धाडीले भोजन वीप्र ते गावात । भोजन करोनी येत केंगेरीसी ।।१।।
येताची वाटेने बोलताती जाण । घ्यावे ते ठेवोन च्यार दीवस ।।२।।
आले स्वामीपासी आज्ञा त्यासी करीती । च्यार दीवस म्हणती राहा सुखे ।।३।।
आठा दीवस त्यासी घेतले ठेवोन । नीरोप ते जाण दील्हा मग ।।४।।
दास म्हणे बोले चीदंबर त्यासी । आनंदे घरासी जावे सुखे ।।५।। १२८०७७

ईछा जे जे होती वीप्राचीया चीती । सांगे तयारीती चीदंबर ।।१।।
आनंद तो जाला वीप्रलागी बहुत । पुरवीला हेत म्हणती स्वामी ।।२।।
आनंदे करोनी गेले ते घरासी । चीदंबरे त्यासी क्रपा केली ।।३।।
दास म्हणे आसे वीश्वाचा जनक । दावी ते कौतुक चीदंबर ।।४।।
१२८०७८

चरीत्र ७३

येक वेळ गोसाव्याचा । मेळा आला हरीव्दाराचा ।।१।।
तपस्वी तो थोर थोर । पाहु म्हणती चीदंबर ।।२।।
आधी भेटु चीदंबरा । मग जाउ रामेश्वरा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । येती गोसावी यात्रेस ।।४।।

१२८०७९

नंगे गोसावी ते थोर । जटाभार सीरावर ।।१।।
चीदंबर आवतार । म्हणती ऐकतसे फार ।।२।।
कैसा आंतर तो साक्षी । प्रत्यय दावील आम्हासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आभीमान गोसाव्यास ।।४।।

१२८०८०

मेळा आसे शतमान । मठ पंज्याबात जाण ।।१।।
चीती वीच्यार करोन । आले दरुषणासी जाण ।।२।।
सत्य आसेल चीदंबर । भोजेन तुप ते साखर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पाहु म्हणती स्वामीस ।।४।।

१२८०८१

बहुत आयकीली कीर्ती । पाहू चीदंबर मुर्ती ।।१।।
म्हणती सीव आवतार । आसेल सत्य हा ईश्वर ।।२।।
आमुचे जाणेल आंतर । ईछा पुरवील सत्वर ।।३।।
तरीच सत्य आवतार । दास म्हणे हा वीच्यार ।।४।।

१२८०८२

करीती वीच्यार चीतासी । खर्च देईल वाटेसी ।।१।।
ईछा पुरवोनी जाण । तुप साखर भोजन ।।२।।
तरीच सत्य चीदंबर । आंतर साक्ष हा ईश्वर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आले प्रत्यय पाहावयास ।।४।।

१२८०८३

आला गोसाव्याचा मेळा । मोकाम मारुती देउळा ।।१।।
प्राथःकाळचे समई । उतरले तया ठाई ।।२।।
पालराहुट्या देउन । सरंजाम थोर जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नीघती स्वामी दरुषणास ।।४।।

१२८०८४

मेळा गोसाव्याच्या मुर्ती । पुढे सींग वाजवीती ।।१।।
आले माहाव्दारी जाणा । यात्रा दाटी ते दरुषणा ।।२।।
गोसावी ते माहाव्दारी । स्वामी आले ते बाहेरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आंत बोलावी सत्वर ।।४।।

१२८०८५

बहुत करोनी आदर । तया वीच्यारीती फार ।।१।।
म्हणती भक्तराज थोर । पाहु जाता रामेश्वर ।।२।।
मी तो गरीब ब्राम्हण । कण्या भाकरी भोजन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी बोलती तयास ।।४।।

१२८०८६

दीवस आला माध्यानेसी । बैसवीले ते पंगतीसी ।।१।।
आर्धी आर्धी ते भाकर । वाढवीली पात्रावर ।।२।।
तुप आणवी जोडीभर । पाच मण ते साखर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उभे राहीले समोर ।।४।।

१२८०८७

पात्रे भरोनी साखर । तुप वाढी तांब्याभर ।।१।।
ब्राम्हण फीरती पंगतीसी । बळे पुसती सर्वासी ।।२।।
गोसावी ते त्रप्त होती । तांबे भरुनी तुप घेती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । साखर राहे पात्रावर ।।४।।

१२८०८८

तुप्त गोसावी ते जाण । घेती कान ते पीळोन ।।१।।
धन्य म्हणती चीदंबर । कलयुगी हा ईश्वर ।।२।।
भेटी जाली या सीवासी । आमुचे भाग्य उदयासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । लोटांगणी ते स्वामीस ।।४।।

१२८०८९

धन्य म्हणती चीदंबरा । कलयुगी आवतारा ।।१।।
द्रीष्टी देखीलासी आता । स्वामी कैलासीच्या नाथा ।।२।।
आनंत जन्मी पुण्य केले । चरण स्वामीचे देखीले ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी म्हणती तुम्ही थोर ।।४।।

१२८०९०

देती नीरोप तयासी । रुपय शेंबर खर्चासी ।।१।।
आश्रुपात गोसाव्यासी । आंतर साक्षी सत्य होसी ।।२।।
ईछा ईतुके धरोन । परीक्षा पाहावी म्हणोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । उघड प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८०९१

चरीत्र ७४

कुंदगोळ ग्रामासी होते चीदंबर । यात्रादाटी फार आसे तेथे ।।१।।
हुनुमप कलकर्णी हळीहाळकर । भाक्तराज थोर आसे तोची ।।२।।
त्याचीया कन्नेचे लग्न ते नीधाले । स्वामीसी वीनवीले बहुतारीती ।।३।।
दास म्हणे भक्त आग्रह करीतसे । लग्नालागी कैसे न ये स्वामी ।।४।।

१२८०९२

म्हणे तो स्वामीसी तुम्ही आल्यावीण । न करी मी लग्न कदा काळी ।।१।।
स्वामी म्हणते त्यासी येतो नीश्चयेसी । लग्न ते समयासी जाण बापा ।।२।।
जाउनीया घरी समारंभ करी । लग्न दीवस च्यारी राहीलेसे ।।३।।
दास म्हणे वाट पाहातो नीकट । करीती बोभाट लोक नाना ।।४।।

१२८०९३

येवोनी सांगती स्वामी कैसे येती । तुम्हा समजुती केली आसे ।।१।।
सर्वासी म्हणती येतो तुमचे घरी । आनंदेसी करी लग्न तेथे ।।२।।
स्वामीची ते चाली ऐसे आसे पाही । नीश्चयेसी काही येणे नसे ।।३।।
दास म्हणे यात्रा कलीचे हे जन । घालीताती जाण भ्रम त्यासी ।।४।।
१२८०९४

बोले भक्तराज स्वामी आल्यावीण । राहील हे लग्न सत्य जाणा ।।१।।
बैसवेले आसे देव ते प्रतीष्टा । करीताती चेष्टा हासोनी जन ।।२।।
नीश्चय तयाचा आसे येक जाण । स्वामीसी घेउन येईन मी ।।३।।
चीदंबर दास म्हणे लग्नदीवसी । सर्य मध्यानेसी आला आसे ।।४।।
१२८०९५

लग्नतीथी दीवसी सुर्य माध्यानेसी । चींता हे सर्वासी जाली तेव्हा ।।१।।
लग्नतीथी आजी जाले दोन प्रहर । कैसे चीदंबर येती आता ।।२।।
भक्तराज करी प्रार्थना चीत्तात । ब्रीद करी सत्य चीदंबर ।।३।।
दास म्हणे पावे भक्तसंकटासी । प्रगट त्या वेळेसी चीदंबर ।।४।।
१२८०९६

नसे कोन्हा ठावे यात्रा जनालागी । स्वामी आले वेगी न कळे कैसे ।।१।।
यात्रा दाटी फार कुंधगोळ ग्रामासी । नीरोप यात्रेसी देती स्वामी ।।२।।
पाहाती लाहानथोर आसती त्या ठाई । येथे कैसे पाही प्रगटले ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । भक्तप्रीयकर स्वामी माझा ।।४।।

१२८०९७

यात्रा जनालागी नसे ठावे काही । कुंदगोळासी पाही स्वामी म्हणती ।।१।।
तेथे यात्रेमाजी पाहोनीया आले । स्वामी ते बैसले लग्नामाजी ।।२।।
लग्न मंटपात बैसले ते स्वामी । येक म्हणती आम्ही पाहीले ते ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । प्रगट ईश्वर लग्न समई ।।४।।

१२८०९८

लग्न ते लावोनी आक्षता टाकीली । मागुनी घेतली दक्षीणा ते ।।१।।
चौघा बरोबरी मंडळी वैदीक । दक्षीणा ते देख ध्यावी तैसी ।।२।।
लज्जीत भक्तराज आपुल्या मनासी । दक्षीणा स्वामीसी काये देउ ।।४।।
दास म्हणे चीती करी तो वीच्यार । दक्षणा ते फार द्यावी काही ।।५।।

१२८०९९

ईतर यात्रा थोर आणीती लक्षावत । पैसा तो न घेत स्वामी त्याचा ।।१।।
लक्षावत रुपपे टेवीताती पुढे । स्वामी त्याजकडे न पाहाती ।।२।।
तेची मजपासी मागती दक्षणा । आश्चर्य ते मना वाटे बहुत ।।३।।
दास म्हणे भक्त वीच्यार करीत । होन घेउनी येत पुढे काही ।।४।।

१२८१००

मुष्टीमाजी होन धरोनीया जाण । उभा कर जोडोण वीनवीतो ।।१।।
तन मन धन सर्वस्व दक्षणा । स्वामी पुढे जाणा समर्पीली ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी भीक्षुक वैदीक । सर्वासरीसी देख मज देई ।।३।।
दास म्हणे दील्ही दक्षणा ते आसे । च्यारी च्यारी पैसे सर्वालागी ।।४।।

१२८१०१

चीदंबर म्हणती देई च्यार पैसे । आधीक मी कैसे घेउ बापा ।।१।।
घेवोनी ते पैसे च्यारी ते दक्षणा । बांदीयले जाणा पदरी ते ।।२।।
भक्तीभावे करुनी करवीले भोजन । स्वामी क्रपा करुन बोले त्यासी ।।३।।
दास म्हणे आसे भक्त प्रीयकर । म्हणे चीदंबर त्रुप्त जाले ।।४।।

१२८१०२

चरीत्र ७५

हनुमपाचे घरी लग्न । स्वामी आलेती जाउन ।।१।।
त्याचे कुटुंबाची बहीण । घरात वडील ते जाण ।।२।।
बहुत आग्रह तीयेसी । भागीरथी चे श्नानासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । घरी राहावे म्हणती स्थीर ।।४।।

१२८१०३

साल आसे कन्यागती । क्रष्णे आली भागीरथी ।।१।।
भागीरथीचे श्नानासी । लोक जाती ते क्रष्णेसी ।।२।।
बाई वीनवी बहुत । आज्ञा स्वामीसी मागत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आज्ञा न देती तीयेस ।।४।।

१२८१०४

वीप्र कांतेलागी जाण । घरी सांगती उमजोन ।।१।।
भागीरथी ज्याचे चरणी । तोची देखीला नयनी ।।२।।
चीदंबर क्रपा करुनी । सांगे त्रैलोक्याचा धणी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बहुत भ्रांती त्या बाईस ।।४।।

१२८१०५

स्वामीलागी नीत्य जाणा । येउनी करीती प्रार्थना ।।१।।
स्वामीराया क्रपा करुन । करवी भागीरथी श्नान ।।२।।
स्वामी म्हणती तीयेसी । श्नान करवीतो तुजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोले क्रपेचे उत्तर ।।४।।

१२८१०६

भागीरथी या गावासी । आणवीतो तुजपासी ।।१।।
हर्ष बाईच्या चीत्तासी । श्नान घडावे मजसी ।।२।।
ईतुके ईछा पुरवावी । आणीक न मागे मी काही ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्र कांता वीनवी फार ।।४।।

१२८१०७

स्वामी म्हणती तीयेसी । चींता करु नये मानसी ।।१।।
आज रात्री तुज जाण । होते भागीरथी श्नान ।।२।।
नवल वाटे वीप्र कांते । कैसे श्नान मज होते ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न ये भरवसा तीयेस ।।४।।

१२८१०८

रात्री देउन द्रीष्टांत । स्वामी दावीती प्रचीत ।।१।।
रात्री मागे येक प्रहर । प्रत्यय दावी चीदंबर ।।२।।
वीप्र कांतेसी द्रीष्टांत । करुनी दावी ते सत्य ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उघड दावी चमत्कार ।।४।।

१२८१०९

वीप्र कांतेसी द्रीष्टांत । उघड दावीती प्रचीत ।।१।।
पडे द्रीष्टी भागीरथी । यात्रा बहुत तेथे होती ।।२।।
गेली बाई ते श्नानासी । उभे स्वामी ते तीरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । यात्रा दाटी आसे फार ।।४।।

१२८११०

वीप्रकांतेलागी जाण । स्वामी म्हणती करी श्नान ।।१।।
जाय भागीरथी आत । उभे आसे ते गंगेत ।।२।।
स्वामी संकल्प सांगती । पाणी हाती घ्यावे म्हणती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । श्नान करवीले तीयेस ।।४।।

१२८१११

स्वामी संकल्प सांगती । पाणी घेउनी उभी हाती ।।१।।
दील्हे आज्ञा ते श्नानासी । बुडी मारीली गंगेसी ।।२।।
श्नान करुनी बाहीर येत । नेसावया ते धुंडीत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र कांता ज्याग्रतीस ।।४।।

१२८११२

ज्याग्रत ज्याल्यावरी जाण । उभी आसे श्नान करुन ।।१।।
वोले वस्त्र ते आंगासी । मागे लुगडे बहीणीसी ।।२।।
म्हणे स्वामी द्रष्टांतासी । श्नान करवीले मजसी ।।३।।
भागीरथी श्नान केले । आंगी वस्त्र आसे वोले ।।४।।
दास म्हणे चीदंबर । वीप्र कांते नवल थोर ।।५।।

१२८११३

दुसरे दीवसी स्वामीपासी । हर्ष सांगती स्वप्नासी ।।१।।
क्रपा केली स्वामीराजा । हेत पुरवीला माझा ।।२।।
भागीरथी जाले श्नान । तुम्ही संकल्प सांगुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करीती वीनोद ते थोर ।।४।।

१२८११४

श्नान कैसो तुज जालो । वस्त्र पीळोनी पाहीलो ।।१।।
उदक भागीरथी जाण । देखीलो ज्याग्रती होउन ।।२।।
वस्त्र पीळोनी पाहीलो । तीर्थ भागीरथी प्यालो ।।३।।
म्हणो चीदंबर दास । सत्य करी द्रीष्टांतास ।।४।।

१२८११५

चरीत्र ७६

चीदंबर दावी प्रत्यय नानापरी । भ्रांती हे आंतरी मानवासी ।।१।।
प्रत्यय पाहाती आश्वर्य करीती । ईश्वर म्हणती तया वोळे ।।२।।
सवोची वीसरती नीश्चय नसो चीती । फळ तो भोगीती सुष्टदुष्ट ।।३।।
दास म्हणो स्वामी क्रपोचा सागर । करीतो उत्धार पतीताचा ।।४।।

१२८११६

प्रत्यय पाहोनी वीप्रकांता मनी । भागीरथी नयनी देखीयोली ।।१।।
प्रत्यक्ष स्वामीनी संकल्प सांगुन । करवीलो श्नान भागीरथी ।।२।।
वोलो वस्त्र आंगी जालो तो ज्याग्रत । आश्चर्य करीत मनामाजी ।।३।।
दास म्हणो दावी प्रत्यय ईश्वर । परी भ्रांती थोर स्त्रीयाज्याती ।।४।।

१२८११७

त्यावरी दो महीना यात्रा क्रष्णोलागी । जात आसे वेगी कन्यागती ।।१।।
वीप्रकांता म्हणे जाते मी क्रष्णेसी । नायके तीयेसी भ्रांतीरुप ।।२।।
नीघे लागवेगे यात्रे बरोबरी । जाणे क्रष्णा तीरी आठ दीवसा ।।३।।
चीदंबर दास म्हणे हे मानव । आवीद्यक जीव भ्रांत जाणा ।।४।।

१२८११८

प्रत्यय पाहाती आश्चर्य करीती । लोकासी सांगती बहुतापरी ।।१।।
परी भ्रांती मनी न होय नीश्चय । भोगीती आपाय नानापरी ।।२।।
पाहोनी देवासी प्रत्यय चीत्तासी । तरी आभाग्यासी कल्पना ते ।।३।।
चीदंबर दास कलीचे हे जन । वीकल्पी दुर्जन काय कीजे ।।४।।

१२८११९

वीप्रकांता नीघे क्रीष्णा श्नानालागी । जातो लागवेगी कन्यागती ।।१।।
वाटे जाता जाण नसे समाधान । चीती आनुमान मागील तो ।।२।।
प्रत्यय पाहु स्वामीचा तो जाण । आज्ञा उलंघन करुन आले ।।३।।
चीदंबर दास म्हणे भ्रांती चीती । भोगीती फजीती हातभाग्य ।।४।।

१२८१२०

यात्रा समागमे गेले कृष्णातीरी । येके कोसावरी राहीलेती ।।१।।
प्राथःकाळी उठत आंगी सीतज्वर । प्रर्जन्य वायुथोर झडझडाट ।।२।।
सुटलासे वारा न दीसे मनुश्य । जाली ते बाईस रजश्वला ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । म्हणे चीदंबर क्षोभलासे ।।४।।

१२८१२१

यात्रा नीघोनी गेली क्रष्णेच्या श्नानासी । बाई उपवासी पडे तेथे ।।१।।
न राहीली कोन्ही यात्रा ते गावीची । फजीती बाईची सीतज्वर ।।२।।
रडे पडे म्हणे पापी च्यांडाळीन । आज्ञा उल्लंघन करुनी आले ।।३।।
चीदंबर दास म्हणे त्राहे जाली । रुदन येकली करीत बैसे ।।४।।

१२८१२२

गावीचे ते लोक स्त्रीया आणी जन । पुसती येवोन वीप्रकांते ।।१।।
ऐकोनी व्रतांत हासताती लोक । दावीले कौतुक चीदंबर ।।२।।
म्हणताती लोक येथे का राहीली । यात्रा नीघोनी गेली पुढे सर्व ।।३।।
चीदंबर दास म्हणती स्त्रीया जन । आभांगी पापीन राहीलीसे ।।४।।

१२८१२३

म्हणती तीयेसी गावीचे ते लोक । कोसावरी देख क्रीष्णा आसे ।।१।।
येथे तरी काये म्हणोनी राहीलीसे । मजल जाली आसे म्हणे फार ।।२।।
जाले वीटाळसी आले सीतज्वर । करी चीदंबर राग ऐसा ।।३।।
दास म्हणे करीता आज्ञा उलंघन । कैचे तीर्थश्नान दुःख भोगी ।।४।।

१२८१२४

जाले तीन रात्री क्षेत्री ते राहुन । यात्रा आले फीरुन जाउ लागे ।।१।।
सोबतीच्या जना करीती प्रार्थना । येउ द्या करुणा माझी कोन्ही ।।२।।
तीर्थ यात्रा मज न घडली जाण । कैसे ही करुन घरी न्यावे ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय तीयेसी । न कळे कोणासी चीदंबर ।।३।।

१२८१२५

करीती वीनंती चीदंबराप्रती । होसी क्रपामुर्ती मायबापा ।।१।।
आन्याई मी खरी न्यावे आता घरी । पडीले वनांतरी मुकले सर्वा ।।२।।
चीदंबर आसे पतीतपावन । मीळोनी यात्रा जन आणीती घरी ।।३।।
दास म्हणे आसे क्रपेचा सागर । प्रगट चीदंबर लीला दावी ।।४।।

१२८१२६

चीदंबर पावन जगी । रक्षीतसे दीनालागी ।।१।।
करुणावंत ऐसा धणी । दुजा नसे त्रीभुवनी ।।२।।
बाळालागी जैसी माये । तैसे रक्षीतसे पाहे ।।३।।
चीदंबर दास शरण । उपमा माथेसी ते गौण ।।४।।

१२८१२७

चीदंबरपासी जाण । सावकार तो ब्राम्हण ।।१।।
नाम गोवींद नाईक । गाव सावनुर देख ।।२।।
येक पुत्र त्यासी देख । नाम बींधपा नाईक ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नसे पुरुषत्व तयास ।।४।।

१२८१२८

आला स्वामी दरुषणासी । सावकार धनरासी ।।१।।
करी वीनंती स्वामीसी । वौषव्रधी करी मजसी ।।२।।
दुःख मज बहुत जाण । जाणे स्वामीचे चरण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया पुसे सवीस्तर ।।४।।

१२८१२९

दुःख काय ते तुजसी । स्वामी पुसती तयासी ।।१।।
वंषालागी तु झुरसी । हेची दुःख बा तुजसी ।।२।।
आंतर जाणसी ईश्वरा । स्वामीराया चीदंबरा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सांगावया लज्या त्यास ।।४।।

१२८१३०

सांगे सांगे स्वामी म्हणती । म्हणे लाज वाटे चीत्ती ।।१।।
कोण पुसे संतानासी । नसे पुरुषत्व मजसी ।।२।।
स्वामी म्हणताती जाण । ऐसे करु नये भाषण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी वीप्रावर ।।४।।

१२८१३१

जाले तयासी प्रसन्न । तुज देतो मी संतान ।।१।।
येक पुत्र देतो जाण । स्वामी जालेती प्रसन्न ।।२।।
वाटे नवल वीप्रासी । माझी गती तरी ऐसी ।।३।।
कैसा देती तरी वर । दास म्हणे चीदंबर ।।४।।

१२८१३२

लाजोनीया वीप्र चीत्ती । करी स्वामीसी वीनंती ।।१।।
माझे आंतर जाणसी । चीदंबरा रुषीकेसी ।।२।।
न लगे सांगणे ईश्वरा । स्वामीराया चीदंबरा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करुणा आली ईश्वरास ।।४।।

१२८१३३

बोले चीदंबर जाण । तुज जालो मी प्रसन्न ।।१।।
चींता न करी मनासी । दील्हे पुरुषत्व तुजसी ।।२।।
पुत्र होतो येक जाण । जावे नीरोप घेउन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दील्हा ब्राम्हणासी वर ।।४।।

१२८१३४

क्रपा करोनीया वीप्रासी । दील्हा नीरोप घरासी ।।१।।
घरी गोल्यावरी जाण । नीट जाला तो ब्राम्हण ।।२।।
वाटे आनंद चीतासी । चीदंबरा क्रपा करीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाला आनंद वीप्रास ।।४।।

१२८१३५

वीप्र जन्म नपुसक । दील्हे पुरुषत्व ते देख ।।१।।
दील्हा त्यासी येक पुत्र । कळा स्वामीची वीचीत्र ।।२।।
धन्य म्हणे चीदंबरा । कलयुगी आवतारा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पार नसे आनंदास ।।४।।

१२८१३६

पुर्ण ब्रम्ह हा ईश्वर । कलयुगी चीदंबर ।।१।।
दावी प्रताप बहुत । ब्रम्हादीक ते तटस्त ।।२।।
आक्षर ब्रम्हाचे पुसुन । दावी सामर्थ्य आपण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तीही देवाचा ईश्वर ।।४।।

१२८१३७

चरीत्र ७८

चीदंबर आसे क्रपेचा सागर । कलयुगी आवतार स्वामी माझा ।।१।।
नीत्य नवे दावी नाना चमत्कार । नसे आंतपार कळा ऐसी ।।२।।
कुळस्वामीपासी गेले हीपरगीसी । नसे खर्चायासी जवळी काही ।।३।।
दास म्हणे दावी कळा वीश्वंभर । स्वामी चीदंबर प्रगट हा ।।४।।

१२८१३८

गावीच्या हाकीमाचे कर्ज आसे देणे । रुपये दीले तेणे च्यारी सहश्र ।।१।।
यात्रा समुदाय आसे बरोबर । पुजेचा संभार कुळस्वामीसी ।।२।।
नीत्य होत आसे ब्राम्हणभोजन । थोर संतर्पण देवापासी ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । आला कर्जदार रुपये मागु ।।४।।

१२८१३९

दोन सहश्र त्यासी पावती ते जाली । बाकीते राहीली दोन सहश्र ।।१।।
आला मागावया रुपये स्वामीपासी । स्वामी म्हणती त्यासी बैसे आपा ।।२।।
तेणे आपुले हाते कांबळा झाडोन । ठाकीले आसन स्वामीलागी ।।३।।
दास म्हणे बैसे स्वामीसी बोलत । कौतुक दावीत चीदंबर ।।४।।

१२८१४०

बोले चीदंबर तया ब्राम्हणासी । देतो मी तुम्हासी रुपय आता ।।१।।
कांबळा आथरीला त्या खाली रुपये । घेवोनीया जाय वेगी आता ।।२।।
म्हणे तो स्वामीस कांबळा तो जाण । आथरीला झाडुन म्याची आता ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती तयासी । जावोनी द्रीष्टीसी पाहे तेथे ।।४।।

१२८१४१

कमावीसीदार पाहातो उटोनी । कांबळा उचलोनी आपुले हाते ।।१।।
त्याखाली रुपय ठेवले ते जाण । पाहाता मोजुन दोन सहश्र ।।२।।
गाटोडी बांधोनी घेतली पदरी । आश्चर्य तो करी मनामाजी ।।३।।
दास म्हणे दावी कळा चीदंबर । कमावीसीदार लोटांगणी ।।४।।

१२८१४२

धन्य चीदंबरा कळा हे आपार । न कळे आंतपार देवादीका ।।१।।
प्रगट द्रीष्टीसी दावीले कौतुक । स्वामीराया देख मजलागी ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी न सांगे कोणासी । गरीब ब्राम्हणासी काय कळे ।।३।।
दास म्हणे ऐसी घालोनीया भ्रांती । बोले तयाप्रती चीदंबर ।।४।।

१२८१४३

वीप्र लोटांगणी जाय वारंवार । वाहे प्रेम नीर नेत्रीहुन ।।१।।
श्वेद कंप आंग रोमांच ते जाण । येतसे भरोन कंट त्याचा ।।२।।
न बोले मुखे उभा कर जोडोनी । द्रीष्टीते ठेवोनी चरणावरी ।।३।।
दास म्हणे आला वीप्र सदगदीत । त्यासी वुझावीत चीदंबर ।।४।।

१२८१४४

न सांगे कोणासी कलीचे हे जन । स्वामी त्यासी जाण सांगताती ।।१।।
भक्तराज थोर प्रत्यय तुजसी । पाहीले द्रीष्टीसी कौवतुक त्वा ।।२।।
गरीब ब्राम्हण बोले चीदंबर । राखीतो ईश्वर पत माजी ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर ऐसे । परी भ्रांती नसे वीप्रालागी ।।४।।

१२८१४५

प्रगट हे कळा दावीली ईश्वरा । स्वामी चीदंबरा मजलागी ।।१।।
बळे स्वामीराया न घाली भ्रांती । देई मज भक्ती पाई तुझे ।।२।।
पतीतपावन होसी आवतार । देई नीरंतर भक्तीप्रेमा ।।३।।
दास म्हणे ऐसा वीनवी वीप्र जाणा । येउ दे करुणा चीदंबरा ।।४।।

१२८१४६

देई मज भक्ती चीदंबरराया । जाउ नेदी वाया आनाथासी ।।१।।
दावीसी प्रत्यय उघड नयनी । नोळखती जनी मंदभाग्य ।।२।।
न घाली तु भ्रम चीदंबरा आता । आवरी भगवंता माया तुझी ।।३।।
दास म्हणे होसी क्रपावंत धणी । आनथजननी चीदंबरा ।।४।।

१२८१४७

दावीसी कौतुक उघड जनासी । भ्रांती हे तयासी पहीसी तु ।।१।।
काडी काढी भ्रांती स्वामी क्रपामुर्ती । वर्णवी बा कीर्ती नीत्य नवी ।।२।।
आनाथाची माय होसी देवराया । येउ दे माझी दया चीदंबरा ।।३।।
दास म्हणे आता देई मज भेट । व्हावे बा प्रगट चीदंबरा ।।४।।

१२८१४८

चरीत्र ७९

चीदंबर हीपरगीसी । होते खंडेरायापासी ।।१।।
नीत्य ब्राम्हणभोजन । सहश्रावधी होते जाण ।।२।।
उणे न पडे ते काही । सारखीच सर्वाठाई ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सर्वासारीखा वीच्यार ।।४।।

१२८१४९

उणे पडताची जाण । येवोनी सांगती गाऱ्हाणे ।।१।।
स्वामी सांगती तयासी । पदार्थ पाहावया ठायासी ।।२।।
पाहु जाता ते ब्राम्हण । आसे पदार्थ भरोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाटे आश्चर्य सर्वास ।।४।।

१२८१५०

कैसी ईश्वराची कळा । नीत्य पाहातताती डोळा ।।१।।
न कळे होत आसे कैसे । पाहाता पदार्थ न दीसे ।।२।।
स्वामीलागी सांगु जाता । घरी पदार्थ आईता ।।३।।
म्हणे चीदंबरदास । प्रत्यय लाहन थोरास ।।४।।

१२८१५१

पापड आथवा कोसंबीरी । उणे न पडती तीळभरी ।।१।।
सत्ता ईश्वराची ऐसी । नीत्य पाहाती द्रीष्टीसी ।।२।।
द्रीष्टी पाहोनी प्रत्यये । परी भ्रांती ते न जाये ।।३।।
दास म्हणे चीदंबर । भ्रम घाली जनावर ।।४।।

१२८१५२

जन आवीद्य माईक । नीत्य पाहाती कौतुक ।।१।।
परी न कळे ईश्वर । जवळी आसे चीदंबर ।।२।।
सत्ता दावीतो आपुली । जनालागी भ्रम घाली ।।३।।
मुर्तीमंत हा ईश्वर । सगुण ब्रम्ह चीदंबर ।।४।।
ऐसा नीश्चय न होये । कळा ईश्वराची पाहे ।।५।।
म्हणे चीदंबर दास । सुत्रधारी हा जीवास ।।६।।

१२८१५३

येके दीवसी समुदाये । बहुत यात्रा आली पाहे ।।१।।
साहीत्य सहश्र भोजन । पाच सहश्र मीळे जाण ।।२।।
जाले सर्वाचे भोजन । मागे थोडे उरले आन्न ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करीती वीनंती स्वामीस ।।४।।

१२८१५४

स्वामीलागी सांगताती । मागे राहीलीसे पंगती ।।१।।
थोडे उरलेसे आन्न । मंडळी पाच शत जाण ।।२।।
स्वामी पुसती तयासी । आन्न पुरेल कीतीकासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । म्हणती पुरेल शंभरास ।।४।।

१२८१५५

पाच साहासे ब्राम्हण । मागे राहीले ते जाण ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । आन्न पुरेल बहुतासी ।।३।।
पंगती बैसावे जाण । आन्न पाहाती द्रीष्टीन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । प्रगट दावी चमत्कार ।।४।।

१२८१५६

आमटी भात पोळीपासी । उभे केले ब्राम्हणासी ।।१।।
वस्त्र झाकुनी आन्नावर । काढुनी द्यावी वरचेवर ।।२।।
ब्राम्हण काढोनीया देती । बाहीर वाढपे वाढीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । भोजन जाले त्या पंगतीस ।।४।।

१२८१५७

ब्राम्हण शुद्र ते मीळोन । सहश्र जाले ते भोजन ।।१।।
आन्न तैसेची उरले । स्वामीलागी पुसु आले ।।२।।
करीती वीनंती स्वामीसी । आन्न आसे स्वयपाकासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र सांगती स्वामीस ।।४।।

१२८१५८

स्वामी म्हणती वीप्रालागी । गावचे बोलवावे वेगी ।।१।।
सर्व गाव बोलवीत । च्यारी वर्ण ते सहीत ।।२।।
आन्न वाटीले सर्वासी । परी न सरे ठायासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।४।।

१२८१५९

येउनी करीती वीनंती । वीप्र स्वामीसी सांगती ।।१।।
आन्न न सरे तेथुन । जाले गावाचे भोजन ।।२।।
अती शुद्रालागी दील्हे । आन्न तैसेची राहीले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । उघड लीला सर्वत्रास ।।४।। १२८१६०

स्वामीलागी म्हणती जाण । कदा न सरे हे आन्न ।।१।।
पुढे आज्ञा आसे काय । होत आला आर्णोदय ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । आत बोलवा शुद्रासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । केले वोवळे आन्नास ।।४।। १२८१६१

तेव्हा सरले ते आन्न । शुद्र आंत येता जाण ।।१।।
जाती आन्न ते घेउन । केले सडा समर्जन ।।२।।
दुसरे दीवसी तो स्वयपाक । तेची वेळे चालु देख ।।३।।
नीत्य होते संतर्पण । जेथे ईश्वर आपण ।।४।।
नुन्य कैसे पडे तरी । रीत्धी सीत्धी त्या कामारी ।।५।।
दास म्हणे चीदंबर । सगुणब्रम्ह वीश्वंभर ।।६।।

१२८१६२

चरीत्र ८०

चीदंबरा क्रपा करी दीनावर । दावीतो आपार लीला द्रीष्टी ।।१।।
वेंकपा नाईक वीप्र हुबळीकर । दया त्याजवर बहुत आसे ।।२।।
बाळपणी त्यासी स्वामी बोलावीती । घेवोनी बैसती आपुल्या पुढे ।।३।।
दास म्हणे आहेसी क्रपेची तु माता । चीदंबरा कर्ता त्रैलोक्याचा ।।४।।

१२८१६३

क्रपा करुनी पुसे सर्व वर्तमान । बोलती लाहन बाळासंगे ।।१।।
स्वामी पुसती काय तुझ्या चीती । देतो तुजप्रती ईछीले ते ।।२।।
बाळ म्हणे आसे मातुळाची क्रपा । तैसी मज क्रपा आसो द्यावी ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । क्रपा तुजवर आसे माझी ।।४।।

१२८१६४

नीश्चय भरवसा आसो द्यावा चीत्ती । सुख तुजप्रती देतो बापा ।।१।।
न करी तु चींती काही तीळभरी । ईश्वर तुजवरी क्रपा करीतो ।।२।।
नीश्चय आंतरी राहोनीया जाण । करावे स्मरण नाम चीत्ती ।।३।।
दास म्हणे ऐसा चीदंबर धणी । न म्हणती कोन्ही लाहान थोर ।।४।।

१२८१६५

त्यावरी वेंकपा जाला आसे थोर । ठेवी सावकार आपनाजवळी ।।१।।
रोजगार धंदा लागला बहुत । जाले आसे प्राप्त द्रव्य काही ।।२।।
त्यावरी मनांत ईछा येक आसे । दावी म्हणतसे प्रत्यय देवा ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यत तयासी । येती द्रीष्टांतास चीदंबर ।।४।।

१२८१६६

येउनी द्रीष्टांती बोले चीदंबर । पुजावा ईश्वर मनोभावे ।।१।।
बोले तो स्वप्नात कैसी करु पुजा । पुरवी हेत माझा चीदंबरा ।।२।।
आपुले हातीचा देई येक बाण । तेणे समाधान होय माझे ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय चीदंबर । स्वप्नी चमत्कार उघड दावी ।।४।।

१२८१६७

वीप्रालागी म्हणे देतो तुज बाण । करावे पुजन येक्याभावे ।।१।।
बाण काढोनीया देत त्याचे हाती । ब्राम्हण ज्याग्रती जाला तेव्हा ।।२।।
ज्याग्रत होताची बैसला उटोन । हातामाजी बाण प्रगट दीसे ।।३।।
दास म्हणे करी क्रपा चीदंबरा । स्वप्नीचा वीच्यार सत्य दावी ।।४।।

१२८१६८

हर्ष ब्राम्हणासी हातासी ईश्वर । म्हणे चमत्कार आघटीत ।।१।।
हाती आसे बाण पाहु म्हणे शकुन । गेला तो घेउन बाजारांत ।।२।।
बुध्दी मानवाची सराफाची जात । बाण वाट्यांत घालुनी बैसे ।।३।।
दास म्हणे जाला लाभ तो द्रव्याचा । वीश्वास तयाचा बैसे तेव्हा ।।४।।

१२८१६९

कल्पना चीत्तासी धरोनीया जाण । मानव आज्ञान हीनबुध्दी ।।१।।
म्हणे बाट्यात आसो द्यावा बाण । करावे पुजन नये चीती ।।२।।
घालोनी पीसवीत बांधोनी ठेवीत । घेवोनीया जात बाजारासी ।।३।।
दास म्हणे ऐसे हीन बुध्दी मानव । काय करी देव चीदंबर ।।४।।

१२८१७०

आला दरुषणासी चीदंबरापासी । वर्तमान त्यासी पुसवी देवा ।।१।।
म्हणे तो ब्राम्हण स्वप्नी तुम्ही आला । बाण मज दील्हा हातामाजी ।।२।।
ज्याग्रत पाहाता प्रगट तो बाण । मुष्टीत घेवोन बैसलोसे ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । दावी तो ईश्वर मजलागी ।।४।।

१२८१७१

बाण आणोनीया दील्हा स्वामीपासी । लावीती नेत्रासी चीदंबर ।।१।।
म्हणती ब्राम्हणासी पुजा करीत जावी । संभाळोनी ठेवी बहुत यासी ।।२।।
ठेवोनी देव्हारा पुजा करीत जावे । आला तुज्या दैव बाण हाता ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर बहुत । पुजा यथास्थीत करी आता ।।४।।

१२८१७२

नीरोप देवोनी घरी पाटवीती । सांभाळी म्हणती पुजा आता ।।१।।
आज्ञा घेवोनीया आला तो घरासी । पुजी ईश्वरासी मनोभावे ।।२।।
करोनी यकादश आभीषेक जाण । ब्राम्हणभोजन करीतसे ।।३।।
दास म्हणे करी ईश्वरपुजत । चीदंबर जाण प्रसन्न होय ।।४।।

१२८१७३

पुजीता देव्हारा भाग्य उदयले । मीळु ते लागले द्रव्य जाण ।।१।।
क्रपा ईश्वराची द्रव्य मीळतसे । नीमीत्य होत आसे उदीमते ।।२।।
न करी प्रसत्न बळे लाभ होय । ईश्वराची होय क्रपा ऐसी ।।३।।
दावी चमत्कार उघड चीदंबर । स्वप्नीचा वीच्यार सत्य करी ।।४।।
दास म्हणे आसे आनाथाची माये । कोमळ ह्रदय देवाजीचे ।।५।।

१२८१७४

चरीत्र ८१

चीदंबरस्वामीपासी । आला शुद्र दरुषणासी ।।१।।
आसे बहुत भावीक । साष्टांग नमीतसे देख ।।२।।
स्वामी उठवीती तयासी । काय म्हणती तु मागसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी तयावर ।।४।।

१२८१७५

स्वामी म्हणती शुद्रालागी । जावे घरासी त्वा वेगी ।।१।।
काय मागणे तुजसी । तेची देतो या वेळेसी ।।२।।
शुद्र आसे जमीदार । वीनवीतो वारंवार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुसती कुटुंबवीच्यार ।।४।।

१२८१७६

जमीदार म्हणतसे । बहुत कुटुंब ते आसे ।।१।।
चौघे पुत्र चौघे सुना । कन्या जावाई तो जाण ।।२।।
दरीद्रे व्यापीलेसे फार । स्वामीराया करी दुर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया गौरवीती थोर ।।४।।

१२८१७७

स्वामी होवोनी प्रसन्न । तया बोलती वचन ।।१।।
करी सेत मळे फार । पीक येईल आपार ।।२।।
मळ्यामाजी उस लावी । तेथे गुर्हाळ चालवी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी तयावर ।।४।।

१२८१७८

सीधा देवोनीया जाण । स्वामी बोले आभयदान ।।१।।
नीरोपाचे वेळे त्यासी । बोलवीले येकांतासी ।।२।।
पैसा दील्हा त्यासी येक । बांधोनी ठेवी म्हणती देख ।।३।।
म्हणे चीदंबर दास । हर्ष बहुत जाला त्यास ।।४।।

१२८२७९

करुनी साष्टांग नमन । नीरोप घेतलासे जाण ।।१।।
आला आनंदे घरासी । गुह्य सांगे कुटुंबासी ।।२।।
जाला आनंद सर्वासी । देव पावला आम्हासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे पावन आवतार ।।४।।

१२८१८०

पैसा ठेवीला बांधोन । द्रव्य मीळु लागे जाण ।।१।।
सेतमळे करीता जाण । पीक येतसे चौगुण ।।२।।
येक्या वर्षामाजी जाण । जमीदार तो सधन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । भाग्य आले उदयास ।।४।।

१२८१८१

म्हणती गावाचे ते लोक । जन्मा दरीद्री हा देख ।।१।।
आता जालासे सधन । येक्या वर्षामाजी जाण ।।२।।
चीदंबर तो प्रसन्न । दैव उदयले जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । ईश्वर पावला तयास ।।४।।

१२८१८२

कोन्ही पुसती तयासी । कैसे भाग्य आले तुजसी ।।१।।
सांगतसे सवीस्तर । प्रसन्न जाला चीदंबर ।।२।।
मी तो पतीतची जाण । स्वामी जाला तो पावन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कीर्ती सांगतो जनास ।।४।।

१२८१८३

पतीतपावन आवतार । श्रीष्टीवरी चीदंबर ।।१।।
मी तो पतीताची रासी । जाला प्रसन्न मजसी ।।२।।
मज ऐसा दुजा कोन्ही । पापी नसे त्रीभुवनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पावन जाला तो ईश्वर ।।४।।

१२८१८४

ज्याची कीर्ती त्रीभुवनी । आला ब्रीद तो बांधोनी ।।१।।
तारीयले मज दीना । माझी आली त्या करुणा ।।२।।
आसे आनाथजननी । स्वामी देखीला नयनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुर्ण ब्रम्ह हा आवतार ।।४।।

१२८१८५

चरीत्र ८२

चीदंबरापासी आला सीवभक्त । आसे तो वीरक्त भावीक बा ।।१।।
करोनीया श्नान पुजा ते मानस । वीश्व ते नाथास पुजीतसे ।।२।।
कासी वीश्वनाथापासी ते जाउन । पुजा करी जाण यथासांग ।।३।।
दास म्हणे त्याचा आसे नीत्य नेम । नीवारी तो भ्रम चीदंबर ।।४।।

१२८१८६

चीदंबरापासी धरीतसे भाव । मनी पुजी देव वीश्वनाथा ।।१।।
चीदंबर त्यासी दावी चमत्कार । उपासना थोर ज्याची जैसी ।।२।।
ज्याचा जैसा भाव तैसा होय देव । माझा स्वामीराव चीदंबरा ।।३।।
दास म्हणे दावी रुप उपासना । सर्वगत जाणा चीदंबर ।।४।।

१२८१८७

आला दरुषणासी भक्तराज जाण । उभा कर जोडुन माहाव्दारी ।।१।।
चीत्ती भावीतसे चीदंबर भेटी । न पडे त्या द्रीष्टी स्वामी माझा ।।२।।
चीत्ती म्हणतसे पाहीन चीदंबर । यात्रा दाटी फार मीळालीसे ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । पाहातसे डोळा भक्तराज ।।४।।

१२८१८८

न पडे द्रीष्टीसी चीदंबरमुर्ती । यात्रे ते सांगती उभा देव ।।१।।
आले म्हणती स्वामी उभे ते खांबासी । न पडे द्रीष्टीसी बा कोणाच्या ।।२।।
म्हणे स्वामीराया देई बा दर्षण । आलो तुज शरण चीदंबरा ।।३।।
दास म्हणे आसे वीश्वचाजनका । दावीतो कौतुक चीदंबर ।।४।।

१२८१८९

उभा आसे व्दारी पाहे डोळे भरी । चीदंबर धरी सीवरुप ।।१।।
कासी वीश्वनाथ पुजीतो मनांत । तैसाची दीसत चीदंबर ।।२।।
आश्चर्य तो करी आपुल्या मनासी । पडे बा द्रीष्टीसी वीश्वेश्वर ।।३।।
दास म्हणे द्रीष्टी पाहे वीश्वनाथ । होय सग्ददीत कंट त्याचा ।।४।।

१२८१९०

उभा कर जोडोनी आश्रुपात नयनी । रोमांचे होवोनी कापतसे ।।१।।
कंट आला भरोनी घाम शरीरासी । पाहे तो द्रीष्टीसी वीश्वनाथ ।।२।।
दीसे लींगाकार शाळींके सहीत । वरी धवधवीत पुजावेल ।।३।।
दास म्हणे ऐसे पाहोनी द्रीष्टीसी । नवल चीतासी करीतसे ।।४।।

१२८१९१

माझी उपासना दावीयेली मज । शरण आलो तुज चीदंबरा ।।१।।
करीतो मानसपुजा तेची रुप धरीले । भ्रम नीवारीले चीदंबरा ।।२।।
कासी वीश्वनाथ स्यतः सीत्ध तुम्ही । भेद धरीतो आम्ही मुढ जन ।।३।।
दास म्हणे भ्रम नीवारला मनी । दावी रुप नयनी चीदंबरा ।।४।।

१२८१९२

चीदंबर रुप दावील बा केव्हा । समाधान तेव्हा मनासी ते ।।१।।
होवोनी उदास बहुत चीत्तास । हाक मारी त्यास चीदंबरा ।।२।।
पाहाता चीदंबर द्रीष्टी पुढे जाण । नीवाले हे मन हर्ष जाला ।।३।।
दास म्हणे दावी कळा चीदंबर । आसे वीश्वंभर स्वामी माझा ।।४।।

१२८१९३

जावोनीया पुढे साष्टांग नमन । उभा कर जोडोन भक्तराज ।।१।।
पाहे चीदंबर क्रपाद्रीष्टी त्यासी । जावे बा घरासी म्हणतसे ।।२।।
आज्ञा घेवोनीया येत आसे घरा । आठवी चीदंबरा वारंवार ।।३।।
दास म्हणे ऐसे लावीले भक्तीसी । प्रत्यय बहुतासी दावीतसे ।।४।।

१२९१९४

नीवारला भ्रम त्याचीया चीत्ताचा । ठाव कल्पनेचा मोडीयला ।।१।।
आनंत देवाचा देव चीदंबर । आसे हा ईश्वर त्रैलोक्यासी ।।२।।
ब्रम्हांड नीर्मीता येक चीदंबर । नीवाले आंतर पाहाता देव ।।३।।
दास म्हणे करी पुजा तो आंतरी । लक्ष चीदंबरी धरोनीया ।।४।।

१२८१९५

नीवारीली सर्व चीताची कल्पना । नीश्चय तो मना द्रढ जाला ।।१।।
मानसपुजा करी आठवी चीदंबर । नीवाले आंतर पुजीताची ।।२।।
चीदंबर त्यासी दावीतो प्रत्ययॆ । बैसवी नीश्चयॆ बळॆ करुनी ।।३।।
दास म्हणे स्वामी त्रैलोक्याचा धणी । ब्रम्हांड भुवनी चीदंबर ।।४।।

१२८१९६

चरीत्र ८३

पुर्णब्रम्ह चीदंबर । कलयुगी आवतार ।।१।।
दावी नाना चमत्कार । ज्यासी नसॊ पारावार ।।२।।
क्रपाद्रीष्टी पाहाता जाण । करी पाशाणाचॆ रत्न ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसॆ क्रपेचा सागर ।।४।।

१२८१९७

चीदंबर क्रपावंत । करी राईचा पर्वत ।।१।।
दावी सामर्थ्ये आपुलॆ । तेथे कोणाचॆ न चालॆ ।।२।।
होय जयासी क्रपाळ । हात जोडी त्यासी काळ ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावीतो आपार ।।४।।

१२८१९८

नीपाणीकर देसाई आपा । यावरी स्वामीची ते क्रपा ।।१।।
स्वामी प्रसन्न तयासी । आले भाग्य उदयासी ।।२।।
क्रपा जाली ते आपार । वर देता चीदंबर ।।३।।
दास म्हणे स्वामीराव । दावी आपुले वैभव ।।४।।
१२८१९९

आपा सद्भावे करोन । आठवी चीदंबर चरण ।।१।।
क्रपा करी चीदंबर । देतो आक्षई तो वर ।।२।।
भाव चीदंबर चरणी । रीत्धी सीत्धी वाहीती पाणी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । व्हावा नीश्चय चीतास ।।४।।
१२८२००

नाम घेवोनी चीदंबर । होय घोड्यावरी स्वार ।।१।।
यश येती आचुंबीत । स्वामी दावीतो सामर्थ्य ।।२।।
क्रपा करी चीदंबर । होय मनुश्य कुबेर ।।३।।
आसे धणी त्रैलोक्याचा । दास कींकर तयाचा ।।४।।
१२८२०१

आपा स्वामी दर्षणासी । आले कुंदगोळ ग्रामासी ।।१।।
पाच सहश्र बरोबर । आसे फौजेचा तो भार ।।२।।
प्रसादासी बोलवीत । स्वामी त्यासी फौजेसहीत ।।३।।
येके पंगतीसी ते जाण । पाच सहश्र भोजन ।।४।।
दास म्हणे चीदंबर । तेथे दावी चमत्कार ।।५।।

१२८२०२

होते ब्राम्हणभोजन । सहीत्य सहश्राचे जाण ।।१।।
पाच सहश्र पंगतीसी । नुन्य न पडे कोणासी ।।२।।
कोसंबीरी भज्यासहीत । स्वामी तयासी पुरवीत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे कलयुगी ईश्वर ।।४।।

१२८२०३

उणे पडता साहीत्य । ब्राम्हण येवोनी सांगत ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । जावोनी पाहावे ठायासी ।।२।।
पदार्थ जे जे मागे कोन्ही । जाती वीप्र ते वाढोनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावीतो आपार ।।४।।

१२९२०४

शाकभाजी सरली म्हणती । पाट्या झाडोनीया येती ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । साहीत्य भरले स्वयपाकासी ।।२।।
वीप्र जावोनी पाहाती । हारे भरोनी आसती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । उघड प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८२०५

तुप सरले सांगो येती । जावोनी पाहा स्वामी म्हणती ।।१।।
रीत्या जाल्या त्या घागरी । भरोनी येती वरचेवरी ।।२।।
करीती आश्चर्य ब्राम्हण । तुप भरीले ते कोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कळा न कळे कोणास ।।४।।

१२८२०६

पंगती जेवोनी उठती । मागील्यासी बोलावीती ।।१।।
देती वाटोनीया जाण । परी न सरे ते आन्न ।।२।।
न कळे ईश्वराची कळा । वाटे नवल सकळा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी लीला हे आपार ।।४।।

१२८२०७

चरीत्र ८४

चीदंबरा दावी कळा हे आपुली । घालोनीया भुली मानवासी ।।१।।
पाहोनी द्रीष्टीसी न कळे कोणासी । कळा दावी ऐसी चीदंबरा ।।२।।
पतीतपावन आसे आवतार । सगुण चीदंबर कलयुगी ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय तो नीत्य । आवतारक्रत्य प्रगट दावी ।।४।।

१२८२०८

नीरोप आपासी देतेवेळे जाणा । क्रपा आसे पुर्ण उघड दावी ।।१।।
पाचते सहश्र फौज आसे जाण । नीरोप आपण देती स्वामी ।।२।।
दोन वंजळी देती सुपाऱ्या त्या जाण । घेतसे ब्राम्हण पदरी तो ।।३।।
दास म्हणे लोक येती नीरोपासी । सुपारी तयासी देववीती ।।४।।

१२८२०९

फौजेचा तो धणी आपा सरदार । सांगती वीच्यार स्वामी त्यासी ।।१।।
आपुल्या हाती तुम्ही सुपारी लोकासी । येती नीरोपासी द्यावी त्यासी ।।२।।
देवोनी सर्वासी सुपारी ते जाण । राहीली उरोन जीतुकी होती ।।३।।
दास म्हणे देती आपाचे पदरात । क्रपा करी बहुत चीदंबर ।।४।।

१२८२१०

नीरोपाचे वेळे लोक मुजऱ्यासी । उभे दो बाजुसी दुरवरी ।।१।।
तयाची ते मागे जाय चीदंबर । मेळा बरोबर ब्राम्हणाचा ।।२।।
चीदंबर चाले आनंदे करुन । करीती भाषण लोकासंगे ।।३।।
दास म्हणे बोले प्रीतीने ईश्वर । रुपये आण फार मीळवोनी ।।४।।
१२८२११

घोड्यावरी स्वार उभे दो बाजुसी । स्वामी म्हणती त्यासी उतरु नये ।।१।।
चाले पादचारी चीदंबर जाण । पतीतपावन स्वामी माझा ।।२।।
जाय कोसभर चालोनीया पाई । बोळवीती पाही फौजेसहीत ।।३।।
दास म्हणे ऐसा लडीवाळ भक्ताचा । धणी त्रैलोक्याचा चीदंबर ।।४।।
१२८२१२

भक्ताचे घरीचे आसे दास दासी । क्रपा हे तयासी करीतसे ।।१।।
पतीतपावन दावीतसे रहणी । पाहाती नयनी लाहानथोर ।।२।।
नाटकशाळा जाती बैसोन गाडीत । तयासी बोलत चीदंबर ।।३।।
बाई बरे आहा म्हणती तयासी । दास पतीतासी पावन हा ।।४।।
१२८२१३

सर्वाचे सेवटी स्वामी पुढे जाती । उभे ते ठाकती पाळीवरी ।।१।।
तळ्याची ते पाळ वाट कुरणातुन । आनव्हणी जाण स्वामी तेथे ।।२।।
जोडा नसे पाई माध्यान समयी । उष्ण आसे पाही तया वेळे ।।३।।
दास म्हणे वेगी सांगोनी धाडीती । स्वामी बोलावीती आपालागी ।।४।।

१२८२१४

बैसोनीया यावे आंबारीत जाण । स्वामी ते सांगोन पाठवीती ।।१।।
आंबारीत बैसे देसाई सरदार । फौज बरोबर चालतसे ।।२।।
पुत्राऐसी क्रपा करोनी तयासी । पाहे आनंदेसी चीदंबर ।।३।।
दास म्हणे केले आपुल्या क्रपेने । बोले आवडीने चीदंबर ।।४।।

१२८२१५

जवळी येता जाण आंबारीसहीत । आपा वीनवीत स्वामीलागी ।।१।।
सांगे कारकुन वीनंती येउन । खाली उतरोन येतो म्हणती ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी खाली उतरु नये । नमस्कार पाहे वरोनीच करी ।।३।।
दास म्हणे नमी आपा आंबारीत । क्रपाद्रीष्टी पाहात चीदंबर ।।४।।

१२८२१६

वरदहस्त करोनी देती नीरोपासी । पाहाती फौजेसी द्रीष्टीभरोनी ।।१।।
पाय तो ठेवीला आसे ज्या ठायासी । स्वामी पाहे त्यासी न हालवी ।।२।।
द्रढ ते पाउल न हालवी जाण । दावीतसे खुण चीदंबर ।।३।।
दास म्हणे आम्ही जवळी उभे जाण । पाहीले द्रीष्टीने कौतुक हे ।।४।।

१२८२१७

आणीक भक्तराज जवळी होते जाण । वोळखोनी खुण बोलताती ।।१।।
माथ्याखाली जाय फौज आवघे जाण । न दीसे द्रीष्टीने तोवरी उभे ।।२।।
हालवीला पाये चाले त्या वेळेसी । आश्चर्य बहुतासी वाटले ते ।।३।।
दास म्हणे क्रपा करी चीदंबर । दावी चमत्कार उघड द्रीष्टी ।।४।।

१२८२१८

चरीत्र ८५

ब्राम्हण गरीब तो येक । आसे भक्त तो भावीक ।।१।।
तीन संमंध तयासी । नीत्य वीनवी स्वामीसी ।।२।।
होतो उपद्रव फार । चीदंबरा करी दुर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे द्रीष्टांती वीच्यार ।।४।।

१२८२१९

ब्राम्हण दुःख भोगी बहुत । रात्री समंध तो येत ।।१।।
नीद्रेमाजी उचलीती । नेवोनी बाहीर टाकीती ।।२।।
सर्व पाहाती जन लोक । होय वीप्रालागी दुःख ।।३।।
म्हणे चीदंबर दास । तीन ब्रम्हहत्या त्यास ।।४।।

१२८२२०

ज्याग्रत जाल्यावरी जाण । आठवी चीदंबर चरण ।।१।।
तेव्हा नसे बाधा काही । उपद्रव त्यासी पाही ।।२।।
रात्री नीद्रेमाजी जाण । नीत्य टाकीती उचलोन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । होता आम्हासी सेजार ।।४।।

१२८२२१

कुंदगोळ ते ग्रामासी । वीप्र होता देउळासी ।।१।।
ईश्वराचे देउळात । होती मंडळी बहुत ।।२।।
नीत्य पाहाती द्रीष्टीने । येवोनी सांगती गाऱ्हाणे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दया आली ते स्वामीस ।।४।।

१२८२२२

स्वामी म्हणती वीप्रासी । तीन ब्रम्हहत्या तुजसी ।।१।।
करी ब्राम्हणभोजन । थोर करी संतर्पण ।।२।।
वीप्र म्हणे मी दरीद्री । कैसे करू आता तरी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न मीळे वीप्रा खावयास ।।४।।

१२८२२३

वीप्र करी आगांतुकी । आन्न वस्त्रावीण दुःखी ।।१।।
कैसे घडे संतर्पण । हासती जवळील जन ।।२।।
वीप्र म्हणतो तयासी । भोग आसे या दैवासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२८२२४

करुणा आली ईश्वरासी । क्रपा करी ब्राम्हणासी ।।१।।
सांगे चीदंबर धणी । स्वप्नी वीप्राचे येवोनी ।।२।।
बारा घाली तु ब्राम्हण । ब्रम्हहत्या जाती जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । स्वामी क्रपेचा सागर ।।४।।

१२८२२५

प्राथःकाळी तो उठोन । ब्राम्हण सांगतसे स्वप्न ।।१।।
चीदंबर स्वामी आले । मज स्वप्नी सांगीतले ।।२।।
बारा घाली तु ब्राम्हण । समंध जाती तुझे जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नये वीश्वास कोणास ।।४।।

१२८२२६

जवळील ते ब्राम्हण । वीप्रालागी म्हणती जाण ।।१।।
आम्हा देखता तु जाण । सांगे स्वामीलागी स्वप्न ।।२।।
ऐकोनी स्वामीचे वचन । साहीत्य करु चौघे जण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । येवोनी सांगती आम्हास ।।४।।

१२८२२७

प्राथःकाळी चीदंबर । स्वामी नीघाले बाहेर ।।१।।
दाटी यात्रेची बहुत । वीप्र स्वामीसी पुसत ।।२।।
स्वामी सांगताती पाहे । वारंवार सांगु काये ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे वीप्रासी प्रखर ।।४।।

१२८२२८

रात्री सांगीतले जाण । काय पुससी येउन ।।१।।
वीप्र ऐकोनी वचन । सत्य म्हणती त्यासी जाण ।।२।।
बारा ब्राम्हणभोजन । दुसरे दीवसी केले जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । समंध केले त्याचे दुर ।।४।।

१२८२२९

जाली ब्रम्हहत्या दुर । यात्रा पाहाती लाहानथोर ।।१।।
वीप्र सांगे सर्वालागी । स्वामी आवतार जगी ।।२।।
सुखी केले मज जाण । जाय आनंदे करुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दील्हा नीरोप वीप्रास ।।४।।

१२८२३०

चरीत्र ८६

ब्राम्हण तो येक आला दरुषणासी । कुंदगोळ ग्रामासी स्वामी होते ।।१।।
दुर देसी वीप्र करीत आनुष्टान । ज्याग्रत ते स्थान वीनायक ।।२।।
सीत्धीवीनायक गणपतीपासी । ब्राम्हण तपस्वी बैसलासे ।।३।।
दास म्हणे स्वप्न जाले बा तयासी । चीदंबरापासी जावे तुम्ही ।।४।।

१२८८२३१

पुरवील ईछा तुझी चीदंबर । जावे त्वा सत्वर वेगी तेथे ।।१।।
द्रीष्टांती तो सांगे वीप्रासी गणपती । नीरोप तुजप्रती दील्हा हाची ।।२।।
आता करु नये येथे आनुष्टान । स्वामीलागी स्वप्न सांगे ऐसे ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । आला आसे जाण स्वामी पासी ।।४।।

१२८२३२

घेवोनी दरुषण सांगे वर्तमान । पुसताती खुण स्वामी त्यासी ।।१।।
काय तुम्हा स्वप्नी सांगीतले आसे । अनुष्टान कैसे राहावीले ।।२।।
ब्राम्हण तो सांगे द्रीष्टांत स्वामीसी । चीदंबरापासी जावे म्हणोनी ।।३।।
दास म्हणे वीप्र सांगे वर्तमान । गुप्त राहे जाण स्वामी म्हणती ।।४।।

१२८२३३

ब्राम्हणासी सांगे चीदंबर जाण । आज्ञा मी देईन जावे तेव्हा ।।१।।
ब्राम्हण येवोनी राहे देउळासी । रामलींगापासी काही दीवस ।।२।।
नीत्य उठोनीया जाय दरुषणासी । भोजन पंगतीसी करीतसे ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । नीरोप सत्वर देतो वेगी ।।४।।

१२८२३४

महीना येक त्यासी ठेवोनी घेतले । गुप्त बोलावीले येके दीवसी ।।१।।
रात्री बोलाउन सांगती तयासी । वस्तु तुजपासी देतो येक ।।२।।
आणोनी संबळी तांदुळ घातले । बांधोनीया दील्हे आपुले हाते ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती तयासी । कदा हे वाटेसी सोडु नये ।।४।।

१२८२३५

घरी जावोनीया सोडी हे संबळी । वस्तु हे सांबाळी दील्ही तुज ।।१।।
आज्ञा उलंघुन जरी तु सोडीसी । नीमीत्य मजसी नाही मग ।।२।।
सांगु नये कोन्हा न जाय सोडुन । आग्रह तो जाण करीता कोन्ही ।।३।।
दास म्हणे वीप्र आज्ञा म्हणतसे । स्वामी सांगतसे वारंवार ।।४।।

१२८२३६

वारंवार स्वामी सांगती नीक्षुन । नीरोप देउन रात्रीसी ते ।।१।।
घेउन नीरोप आला आपल्या बीर्हाडासी । सांगे मंडळीसी वर्तमान ।।२।।
आग्रह करोनी पुसती तयासी । सांगे आम्हपासी सर्व काही ।।३।।
दास म्हणे वीप्र म्हणतसे ऐसे । आज्ञा नाही कैसे सांगु तुम्हा ।।४।।

१२८२३७

ईष्टादी ब्राम्हण आग्रह करीती त्यासी । सांगे तु आम्हासी सवीस्तार ।।१।।
आज्ञा नाही कैसे सांगु वीप्र म्हणे । संगतीचे गुणे प्रीती बहुत ।।२।।
कीर्ती हे स्वामीची सांगावया काये । तुजसी आपाय नसे यात ।।३।।
दास म्हणे वीप्र पडोनी भीडेसी । सांगे तयापासी सवीस्तर ।।४।।

१२८२३८

संबळी हे दील्ही स्वामीनी मजसी । सोडी हे घरासी सांगीतले ।।१।।
दावी म्हणती आम्हा काय आसे यांत । पडीलीसे भ्रांत वीप्रालागी ।।२।।
म्हणे तो तांदुळ दील्हे तो बांधुन । दावी उघडुन आम्हासी ते ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । दावी उघडुन संबळी ते ।।४।।

१२८२३९

उघडोनी दावीत वीप्र ब्राम्हणासी । पाहाती द्रीष्टीसी सर्व तेथ ।।१।।
देवाच्या ते मुर्ती होत्या संबळीत । आश्चर्य करीत वीप्र तेव्हा ।।२।।
ब्राम्हण तो म्हणे तांदुळ बांधीले । द्रीष्टीने पाहीले जवळी होतो ।।३।।
दास म्हणे वीप्र नवल करीती । कैशा जाल्या मुर्ती तांदुळच्या ।।४।।

१२८२४०

पंचरसी मुर्ती जाल्या आसती तीन । पाहाती द्रीष्टीने ब्राम्हण तो ।।१।।
धन्य चीदंबरा आगाध हे कळा । दावीयेले डोळा नवल ऐसे ।।२।।
आज्ञा उलंघन केली आसे तेणे । न कळे होते जाणे काय पुढे ।।३।।
दास म्हणे वीप्र चीत्ती संकोचीत । करील स्वहीत चीदंबर ।।४।।

१२८२४१

चरीत्र ८७

चीदंबर सुत्रधारी । नानारुप आंगी धरी ।।१।।
रुपे जयाची आपार । ज्यासी नसे आंतपार ।।२।।
प्रगट दावीतसे रुप । आंगे धरोनी स्वरुप ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । स्वामी आनंत आपारा ।।४।।

१२८२४२

येके दीवसी लीला करी । चीदंबर सुत्रधारी ।।१।।
स्वामी यज्ञशाळे आत । नीत्य नीद्रा ते करीत ।।२।।
कांता बोंभाट करीती । स्वामी खोलीसी न येती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कळा दावीतो ईश्वर ।।४।।

१२८२४३

भगीनी सांगती स्वामीसी । माझी वीनंती परीयेसी ।।१।।
जावे आंतरग्रहासी । वहीनी भांडती मजसी ।।२।।
जावे आपुले सेजेसी । स्वामी बरे म्हणती तीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । गेले आपुले सेजेवर ।।४।।

१२८२४४

वडील कांता सरस्वती । वाट पाहात ते होती ।।१।।
भगीनी स्वामीची तीयेसी । सांगे नीरोप वहीनीसी ।।२।।
स्वामी गेले सेजेवरी । वेगी जाउनी सेवा करी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । माता जातसे खोलीस ।।४।।

१२८२४५

सरस्वती आदीमाय खोलीत ठेउ जाता पाये ।।१।।
उभी खोलीचे व्दारात । स्वामीलागी न्याहाळीत ।।२।।
स्वामी नीजले सेजेसी । फणीसर्प दीसे तीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पाच फण्या त्या नागास ।।४।।

१२८२४६

पाच फण्या उभारोनी । नाग खेळतो आंथरुणी ।।१।।
पाहाता माता सरस्वती । हाक फोडोनी पळती ।।२।।
जाली आसे भयभीत । सर्व आंग ते कापत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी तो ईश्वर ।।४।।

१२८२४७

घर्म सुटला आंगासी । न ये बोलता वाचेसी ।।१।।
जवळी आली शेष भगीनी । पुसे काय जाले वहीनी ।।२।।
म्हणे स्वामी ते सेजेसी । नाग खेळे आंथुरणासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । माता न जाये खोलीस ।।४।।

१२८२४८

भगीनी पाहु ये खोलीसी । नाग न दीसे तीयेसी ।।१।।
करी वीनोद वहीनीसी । काय भ्रांती जाले तुजसी ।।२।।
स्वामी नीजले सेजेवरी । भय न धरी आंतरी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । माता पाहाती खोलीस ।।४।।

१२८२४९

खोलीमाजी पाहु जाये । नाग सर्प खेळताहे ।।१।।
भयभीत ते होउनी । आणीक येतसे पळोनी ।।२।।
हासे स्वामीची भगीणी । काहो येसी तु पळोनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी कौतुक ईश्वर ।।४।।

१२८२५०

माता बोले धीर धरुन । स्वामीलागी ते दुरुन ।।१।।
म्हणे स्वामीसी ते जाण । नाग जाले तो आपण ।।२।।
तरी कोण ते कटीण । तुज व्हावया नागीण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोले हासोनी ईश्वर ।।४।।

१२८२५१

स्वामीरायेनी शब्द दीले । तरी का भय तुज जाले ।।१।।
मी तो नीजलो सेजेसी । हात उभा स्वभावेसी ।।२।।
पाची फण्या बोटे दीसती । तुज जाली आसे भ्रांती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२८२५२

चरीत्र ८८

चीदंबर लीला दावीतो वीचीत्र । कांता ह्या पवीत्र दोघी जाण ।।१।।
वडील ते कांता सरस्वतीबाई । सवीत्री जाणवी धाकटी ते ।।२।।
सावीत्री मंदीरा येती चीदंबर । व्देश करी फार सरस्वती ।।३।।
दास म्हणे लीलाधारी हा ईश्वर । दावी चीदंबर कौतुक ते ।।४।।

१२८२५३

येके दीवसी आले सावीत्री मंदीरा । लीला चीदंबरा करणे बळे ।।१।।
येवोनी बैसले मंचकी ईश्वर । आनंद तो थोर सावीत्रीसी ।।२।।
आनंदात वीड्या करोनीया देती । आली सरस्वती तया वेळी ।।३।।
देखोनी आनंद क्रोध आला चीती । लावोनीया घेती ब्दार तेव्हा ।।४।।
दास म्हणे कुलुप बाहेरोनी । ठेवीले कोंडोनी स्वामीलागी ।।५।।

१२८२५४

लावोनी कुलुप गेली आपुल्या घरा । म्हणे म्या ईश्वरा कोंडीयले ।।१।।
कोंडीले खोलीत उभयतासी जाण । पाहे ते दुरुन कौतुक ते ।।२।।
कैसे येती आता बाहेर ईश्वर । हर्ष मानी थोर आपुले चीत्ती ।।३।।
दास म्हणे करी वीनोद ते वरी । राग तो आंतरी म्हणोनीया ।।४।।

१२८२५५

सांगे सर्वालागी मंदीरात जाण । ठेवीले कोंडोन चीदंबर ।।१।।
सर्वालागी सांगे रात्र गेली प्रहर । आले मी सत्वर कोंडोनीया ।।२।।
कील्लीचा तो हात ठेवी आपणा जवळी । बहुत सांभाळी वारंवार ।।३।।
दास म्हणे मानी आनंद चीत्तासी । न उघडे व्दारासी म्हणे आता ।।४।।

१२८२५६

श्नान संध्या होम बंध मी करीन । सावीत्री धरोन बैसोना का ।।१।।
येक दोन दीवस कोंडोन ठेवीन । फजीती करीन म्हणे आता ।।२।।
हासतील जन पाहीन कौतुक । चीतासी हारीक मानी बहुत ।।३।।
दास म्हणे लीला दावी चीदंबर । गर्व परीहार करील सहज ।।४।।

१२८२५७

कळले स्वामीसी कुलुप लावीले । कौतुक मानीले मनामाजी ।।१।।
सावीत्री ते बाई चीती संकोचीत । होवोनी लज्जीत बोलतसे ।।२।।
मांडीली फजीती कैसी तरी आता । प्राथःकाळी जाता कैसे स्वामी ।।३।।
दास म्हणे बोले हासोनी चीदंबर । उघडावया व्दार कटीण काय ।।४।।

१२८२५८

आनंदे करोनी बोलती ईश्वर । स्वामी चीदंबर लीलाधारी ।।१।।
कासायासी चींता ब्दाराची करीसी । चाळी त्रैलोक्यासी सत्तामाझी ।।२।।
आसे सुत्रधारी ब्रम्हांडभीतरी । कोणीकडे तरी ब्दार तेथे ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर धणी । सावीत्रीचे मनी आनंद तो ।।४।।

१२८२५९

आनंदे करोनी रात्र क्रमीयेली । मागीली राहीली घटका च्यार ।।१।।
ज्याग्रत ते करी सावीत्री स्वामीसी । उठावे वेगीसी स्नानालागी ।।२।।
स्वामी चीदंबर ज्याग्रत ते जाले । उटोनी बैसले पलंगावरी ।।३।।
दास म्हणे स्वामी त्रैलोक्याचा धणी । दावी तो करणी सहजस्तीती ।।४।।

१२८२६०

उठोनी चीदंबर ब्दारापासी आले । ब्दार उघडीले सहज स्तीती ।।१।।
सावीत्री ते नवल करीती चीत्तासी । कोणे या ब्दारासी उघडीले ।।२।।
ईश्वराची कळा पाहीली द्रीष्टीने । हासे आनंदाने आपुले चीती ।।३।।
दास म्हणे स्वामी आलेती बाहेर । नवल करीती थोर वाड्यामधे ।।४।।

१२८२६१

श्नान ते करोनी होमशाळी आंत । बैसले नीवांत स्वामी तेथे ।।१।।
रात्री ते राहीली आसे घटीका येक । आर्णोदय देख होत आला ।।२।।
येवोनी सरस्वती स्वामीसी पाहाती । जावोनी सांभाळीती कील्ली तेव्हा ।।३।।
दास म्हणे करी नवल चीत्तासी । कोणे या व्दारासी उघडीले ।।४।।

१२८२६२

होवोनी लज्जीत आपुल्या चीत्तासी । कळले स्वामीसी तया वेळे ।।१।।
स्वामी म्हणताती उपाय त्वा केला । गर्व हारवीला ईश्वराने ।।२।।
कासयासी व्यर्थ लज्जीत चीत्तासी । लागली पायासी सरस्वती ।।३।।
दास म्हणे लीला दावीतो कौतुक । नीत्य नवे देख चीदंबर ।।४।।

१२८२६३

चरीत्र ८९

पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चीदंबर ।।१।।
क्षमा शांतीचा आगर । रहणी दावी हे प्रखर ।।२।।
दावी वर्तणुक करुन । पाहाती थोर ते लाहान ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी वीश्वंभर ।।४।।

१२८२६४

दावी कौतुक आपुले । स्त्रीया भांडणा लावीले ।।१।।
कांता दोघी जण जाण । आसती आबोला धरोन ।।२।।
येक येकीसी भाषण । कदा न करीती ते जाण ।।३।।
वेगळाले खोली आंत । राहती येकाची वाड्यात ।।४।।
दास म्हणे चीदंबर । घ्यावा लागे समाच्यार ।।५।।

१२८२६५

लहान बाईचे घरोन । आला येक तो ब्राम्हण ।।१।।
आला पात्र तो घेउन । दुध मागावया जाण ।।२।।
स्वामी यज्ञशाळी आंत । होते मंडळी सहीत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जवळी शास्त्री थोर थोर ।।४।।

१२८२६६

आला ब्राम्हण दुधासी । स्वामी देववीती त्यासी ।।१।।
दुध दील्हे तांब्याभरुन । गेला ब्राम्हण घेउन ।।२।।
घरात कळले वर्तमान । थोर बाईलागी जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । क्रोध फार तो बाईस ।।४।।

१२८२६७

आली धाउन रागाने । म्हणे दुध दील्हे कोणे ।।१।।
बोले ब्राम्हण तो जाण । देवीवीले ते स्वामीने ।।२।।
दुध आसे घागरभर । तप्त होते आगनीवर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सभाद बरोबर ।।४।।

१२८२६८

ब्राम्हण होते भावताले । मध्ये स्वामी ते बैसले ।।१।।
शास्त्री होते थोर थोर । करीती पंडीत वीच्यार ।।२।।
समारंभ बहुत जाण । करीती आनंदे भाषण ।।३।।
दास म्हणे बहुत जाण । शांती वर्णीताती थोर ।।४।।

१२८२६९

ब्राम्हण शांती ते वर्णीती । शब्द आर्थ ते करीती ।।१।।
स्वामी वर्तणुक करीती । उघड प्रत्यय दावीती ।।२।।
शांती कैसे तरी आसती । स्वामी तयासी पुसती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । प्रगट दावीती तयास ।।४।।

१२८२७०

बाई राग ते भरोन । आले दुधापासी जाण ।।१।।
कैसे दुध दील्हे तीसी । सर्व देते ज्याचे त्यासी ।।२।।
तप्त दुधाचे तपेले । वस्त्र लावोनी धरीले ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आणोनी वोती स्वामीवर ।।४।।

१२८२७१

तप्त दुध आसे फार । आंतुनी नीघतसे धुर ।।१।।
सगळे वोती डोईवर । सतत लावोनीया धार ।।२।।
स्वामी बैसले नीवांत । आनंदे करोनी बोलत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । घागर दुध आंगावर ।।४।।

१२८२७२

वाफा नीघती आंगासी । स्वामी बोलती वीप्रासी ।।१।।
धन्य धन्य ईची भक्ती । सुख जाले मज प्रती ।।२।।
आभीषेक ऐसा कोन्ही । मज केला नाही जनी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नवल वाटे सर्वत्रास ।।४।।

१२८२७३

आभीषेक बहुत करीती । थोडे दुध ते घालीती ।।१।।
दुध घागरीभरोनी । मज न घाली ते कोन्ही ।।२।।
आज जाले समाधान । नीखळ दुधाचे ते श्नान ।।३।।
दास म्हणे चीदंबर । शांती दावीती प्रखर ।।४।।

१२८२७४

शास्त्री पंडीत मीळोनी । नवल करीताती मनी ।।१।।
रुप शांतीचे दावीले । नाही देखीले ऐकीले ।।२।।
शांती सुखाचा आगर । पुर्णब्रम्ह आवतार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।४।।

१२८२७५

चरीत्र ९०

चीदंबरालागी वीनवीती कांता । स्वामी क्रपावंता ईछा पुरवी ।।१।।
बहुत प्रताप आपुला वाढवीला । लाभ काई जाला आम्हासी तो ।।२।।
यासाटी प्रार्थना करीतो ईश्वरा । जाणोनी आंतरा क्रपा करुनी ।।३।।
दास म्हणे स्वामी दावीती प्रचीती । काय तुम्हाप्रती ईछा आसे ।।४।।

१२८२७६

वीनवीती कांता स्वामीरायालागी । वस्त्रभाव वेगी देई मज ।।१।।
डागीनाची ईछा राहीलीसे चीती । पुरवी श्रीपती चीदंबर ।।२।।
वस्तभाव बहुत जडावडागीने । मुक्ताहार देणे मजलागी ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलती हासोनी । कोण ते भुषण यात आसे ।।४।।

१२८२७७

सरस्वती माता वीनवीती ईश्वरा । कीर्ती दीगंतरा जाली तुमची ।।१।।
बद्रीकाआश्रम कासी रामेश्वर । म्हणती आवतार तुम्हालागी ।।२।।
आवतार श्रेष्ट कीर्ती श्रीष्टीवरी । नाही आम्हावरी वस्तभाव ।।३।।
दास म्हणे स्वामी ऐकोनीया जाण । नसावे भुषण सुवर्ण हे ।।४।।

१२८२७८

लज्या कैसी नये मनासी ते आता । डागीने मागता काय म्हणोनी ।।१।।
कासया भुषण आंगावरी जाण । वैभव भुषण शांती लेणे ।।२।।
काय आंगावरी डागीने घालोनी । लागतसे आगनी जयापरी ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलती उत्तर । दुःखाचा वेव्हार वस्तभाव ।।४।।

१२८२७९

आंगावरी बहुत डागीने घातीले । सुख नाही जाले तेणे काही ।।१।।
आंगापासी तो अगनी लावोनीया जाण । कोणते भुषण लीणेवरी ।।२।।
काय शोभा तरी वस्त आंगावरी । सुख तीळभरी नसे तेची ।।३।।
दास म्हणे दावी बोलोन ईश्वर । प्रगट चीदंबर लीला करी ।।४।।

१२८२८०

वीनवीती कांता स्वामीरायालागी । भुषण हे जगी काय तुमचे ।।१।।
तुम्हासी हे कीर्ती जग वोळखती । कोण आम्हाप्रती पुसे तरी ।।२।।
न कळे कोणासी स्वामीचे हे कांता । लाज तुमच्या चीता न वाटे ते ।।३।।
दास म्हणे बोले वडील ते कांता । बरे भगवंता भुषण हे ।।४।।

१२८२८१

ऐकोनी स्वामीने स्त्रीयेचे भाषण । प्रत्यय तो जाण दावीताती ।।१।।
कीती तुम्हा वस्त पाहीजे म्हणती । आणोनी तुजप्रती देतो आता ।।२।।
पाहे चमत्कार वस्त देतो फार । घाली आंगावर याचीक्षणी ।।३।।
दास म्हणे ऐसे ऐकोनी उत्तर । आनंद नीर्भर बाईलागी ।।४।।

१२८२८२

स्वामी म्हणती जावे खोलीमाजी जाण । संदुक भरोन ठेवीलासे ।।१।।
ठेवीला संदुक जडाव डागीने । मुक्तहार लेणे नानापरी ।।२।।
आंगासी ते सुख काई त्या लेण्याचे । सुख ते आंगीचे नाही जरी ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । उघडीले व्दार खोलीचे ते ।।४।।

१२८२८३

सरस्वती माता जाय खोली आंत । संदुका पाहाता उघडोनी ।।१।।
नानापरी वस्त डागीने जडाव । घालीती वैभव आंगावरी ।।२।।
लेवोनी डागीने आंगभरी जाण । लागलासे अगन आंगी जैसा ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । भुषण ते थोर आंगी लेणे ।।४।।

१२८२८४

सरस्वती माता तळमळी जाण । लागलासे आगन आंगी माझ्या ।।१।।
डागीने घालीता लागलासे आग्नी । फोड आंग भरोनी येते जाले ।।२।।
तळमळी जीव न पडे चईन । काढी आंगा वरुन वस्तभाव ।।३।।
दास म्हणे करी प्रार्थना स्वामीसी । आग्नी हे आंगासी वीझवी आता ।।४।।

१२८२८५

स्वामी म्हणती वस्ता न घाली येथोन । ध्यावे ते मागोनी देवा ऐसे ।।१।।
न मागे कदापी वस्तभाव तुम्हा । आगनी पुरुषोतमा नीववी हा ।।२।।
ऐसे म्हणता आग्नी जाला तो सीतळ । राहीली तळमळ तेची क्षणी ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । करोनी नीराळा आकर्ता जो ।।४।।

१२८२८६

चरीत्र ९१

सगुण ब्रम्ह चीदंबर । शांती सुखाचे आगर ।।१।।
उघड दावी वर्तणुक । नीत्य नवे हे कौतुक ।।२।।
पाहाताती लाहानथोर । लीला दावी हे आपार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वर्तणुक हे जगास ।।४।।

१२८२८७

येके दीवसी आली यात्रा । दावी कौतुक सर्वत्रा ।।१।।
भक्तराज माहाथोर । ब्राम्हण आला मातबर ।।२।।
तेणे मागुनी घेतले । होन देवासी आणीले ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावीतो ईश्वर ।।४।।

१२८२८८

ब्राम्हण आला दरुषणासी । करी वीनंती स्वामीसी ।।१।।
मज संकट पडीलें । स्वामी मागुन घेतलें ।।२।।
तुम्ही मजसी रक्षीलें । वीन्घ माझी नीवारीलें ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया पुसती वीच्यार ।।४।।

१२८२८९

कार्य तुझे सर्व जालें । काय मागोनी घेतलें ।।१।।
वीप्र बोलें तो स्वामीसी । द्रव्य आणीलें पायासी ।।२।।
गीरपाव होन आणीलें । स्वामीपुढे ते ठेवीलें ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी न घेती तयास ।।४।।

१२८२९०

स्वामी म्हणती वीप्रासी । होन न्यावें हे घरासी ।।१।।
करी ब्राम्हणभोजन । वाटे दक्षणा हे जाण ।।२।।
वीप्र करीतो वीनंती । मागुनी घेतलें या रीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र लागे तो पायास ।।४।।

१२८२९१

माझा संकल्प हा जैसा । स्वामी हेत पुरवी तैसा ।।१।।
हेत पुरवी ईश्वरा । स्वामी क्रपेच्या सागरा ।।२।।
स्वामी प्राण प्रीयकरा । माझी वीनंती आवधारा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बरे म्हणती स्वामी त्यास ।।४।।

१२८२९२

वीप्र वीनवी वारंवार । स्वामी भक्त प्रीयकर ।।१।।
तुझी ईछा जैसी आसे । द्रव्य ठेवी म्हणती तैसे ।।२।।
तेणे भरोनी वोंजळी । ठेवीयेले जरणाजवळी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्रमेळा बरोबर ।।४।।

१२८२९३

स्वामीचीया चरणापासी । केली द्रव्याची ते रासी ।।१।।
स्वामी सांगे वैदीकासी । लुटुन घ्यावे या द्रव्यासी ।।२।।
स्वामी कांतेलागी जाण । कळले तेची वर्तमान ।।३।।
दास म्हणे माता आली । उडी द्रव्यावरी घाली ।।४।।

१२८२९४

ब्राम्हण घेउ जाता होन्न । पडे द्रव्यावरी जाण ।।१।।
स्वामी सांगती वीप्रासी । वेगी घ्यावे या द्रव्यासी ।।२।।
हात घालोनी सर्व घेती । द्रव्य नेले हातोहाती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न लगे मातेच्या हातास ।।४।।

१२८२९५

स्वामी पाहाती हासोन । हाती न लगे येक होन्न ।।१।।
चौघा बरोबर जाण । मज न दील्हा येक होन ।।२।।
म्हणोनी येवोनी रागासी । मारी चापट स्वामीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । हासोनी उभे होती दुर ।।४।।

१२८२९६

आपण मारोनी स्वामीसी । करी रुदन भींतीसी ।।१।।
आला पुत्र तो धावोन । स्वामीलागी पुसे जाण ।।२।।
मातेलागी काय जाले । स्वामी म्हणती म्या मारीले ।।३।।
म्हणोनी करीती रुदन । स्वामी सांगती हासोन ।।४।।
दास म्हणे हे कौतुक । स्वामी शांती दावी देख ।।५।।

१२८२९७

चीदंबरा दावी कळा । सर्व पाहातातीी डोळा ।।१।।
येके दीवसी वडील पुत्र । नाम त्याचे दीवाकर ।।२।।
म्हणे स्वामीलागी जाण । जाली कर्जाची आडचण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी सांगती वीच्यार ।।४।।

१२८२९८

चरीत्र ९२

करीतो वीनंती वडील कुमर । देणे जाले फार स्वामीराया ।।१।।
स्वामी म्हणती बरे फीटेल ते देणे । चींता हे करणे कासयासी ।।२।।
महीना दोन महीने चालीले लोटीत । जाली उचापत वाणीयाची ।।३।।
दास म्हणे करी वीनंती कुमर । अंत कोठवर घेता स्वामी ।।४।।

१२८२९९

येक दोन वेळा वीनंती करुन । पाहीली ते जाण बहुता रीती ।।१।।
नायकती स्वामी राग तो पुत्रासी । आडोन येके दीवसी बैसलासे ।।२।।
मागीले प्रहरी स्वामीचे ते श्नान । बसला येउन कुमर व्दारी ।।३।।
दास म्हणे बोले नीक्षुण स्वामीसी । धरणे तुम्हापासी घेतले म्या ।।४।।

१२८३००

दोन सहश्र रुपय देणे वाणीयासी । वाईदा तयासी बहुत केला ।।१।।
नायकतो वाणी बैसलो म्हणोनी । घेतल्यावाचोनी न उटे आता ।।२।।
दोन सहश्र रुपये द्यावे ते मोजुन । तेव्हा करा श्नान स्वामीराया ।।३।।
दास म्हणे बोले स्वामी ते हासोन । करो देई श्नान मज वेगी ।।४।।

१२८३०१

होमशाळेमाजी जाणे लागे वेगी । कैसे तुजलागी न कळे तरी ।।१।।
नायेके कुमर पुत्र दीवाकर । रुपये दोन सहश्र द्यावे म्हणोनी ।।२।।
स्वामी म्हणती बाहेर येउ दे मजसी । रुपये तुजसी देउ कैसे ।।३।।
खोली माजी काय ठेवीले रुपये । ठावे नसे काय तुज आता ।।४।।
दास म्हणे पुत्रा पाहे तो छळोन । रुपय द्यावे जाण आधी म्हणोनी ।।५।।

१२८३०२

स्वामी म्हणती काय वीनोद करीसी । आंत काय घेसी दीवाकरा ।।१।।
नायके तो म्हणे घेतले धरणे । रुपय मज देणे याची वेळे ।।२।।
स्वामी म्हणती बाहीर देतो मी येउन । नायके तो जाण कदाकाळी ।।३।।
दास म्हणे स्वामी राहीले नीजोन । बैसलासी जाण पुत्र व्दारी ।।४।।

१२८३०३

नीजले ते स्वामी दीवस आला प्रहर । न उघडी व्दार बाहीरोनी ।।१।।
स्वामी म्हणताती व्दार काढी दीव्या । बैसलासी वाया काय म्हणोनी ।।२।।
म्हणे स्वामीलागी रुपय दिल्ह्यावीण । न उघडी जाण व्दार स्वामी ।।३।।
दास म्हणे स्वामी ऐकोनी उत्तर । उघडी म्हणती व्दार रुपय घेई ।।४।।
१२८३०४

व्दार उघडीले स्वामी ते उटीले । बाहीर ते आले झडकरी ।।१।।
वीनवीतो पुत्र कोटे सांगा रुपय । स्वामी म्हणती पाहे आंथरुणी ते ।।२।।
आंथरुण उचलोनी पाहातसे जाण । ठेवीले मोजुन दोन सहश्र ।।३।।
दास म्हणे पुत्र रुपय घेवोनी । सद्‌गद होवोनी चरणी लागे ।।४।।
१२८३०५

म्हणे स्वामीराया रुपय केव्हा आणीले । मोजोनी ठेवीले कैसे आता ।।१।।
काय म्हणोनीया वेळ तो लावीला । प्रहर येक जाला दीवस स्वामी ।।२।।
छळीले तुम्हासी आन्याई मी खरा । स्वामी चीदंबरा क्रपानीधी ।।३।।
दास म्हणे जाला लज्जीत चीत्तासी । आंत तो पुत्रासी न कळे जाणा ।।४।।
१२८३०६

स्वामी म्हणती त्यासी रुपय हे रात्रीसी । आणवीले तुजसी देणे म्हणोनी ।।१।।
कासयासी भ्रम घालीता ईश्वरा । ब्रम्हादी हरीहारा न कळे अंत ।।२।।
कळा हे वीचीत्र करोनी दावीसी । भ्रम तो आम्हासी घालोनीया ।।३।।
दास म्हणे भ्रम करी नीवारण । पुत्र येतो शरण स्वामीलागी ।।४।।

१२८३०७

क्रपाद्रीष्टी पाहे चीदंबरा मज । शरण आलो तुज पुत्र म्हणा ।।१।।
न कळे आम्हासी आज्ञानी जीवासी । भ्रम तु घालीसी वरोनी देवा ।।२।।
नीवारी हा भ्रम चीदंबरराया । पुत्र म्हणे दया करी आता ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर त्यासी । ऐसे का बोलसी दीवाकरा ।।४।।

१२८३०८

चरीत्र ९३

चीदंबर कळा दावी । यात्रे माजी नीत्य नवी ।।१।।
रुपय दील्हे पुत्रालागी । नवल जाले सर्वालागी ।।२।।
चीत्ती धरोनी आधार । करी वीनंती कुमर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे तयासी प्रखर ।।४।।

१२८३०९

पुत्र करीतो वीनंती । खर्च लागे यात्रेप्रती ।।१।।
खर्च आणु मी कोटुन । यात्रा सांभाळ आपण ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । खर्च न मागे तुजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती वाण्यास ।।४।।

१२८३१०

उचापत वाण्यापासी । सीधे देववी यात्रेसी ।।१।।
महीना दोन महीने जाले । रुपय आकल्पीत आले ।।२।।
घेती नवस मागुन । रुपय देती ते आणुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । रुपय देती त्या वाण्यास ।।४।।

१२८३११

पुत्रालागी वर्तमान । रुपय देववीले जाण ।।१।।
येती रुपये कोटुन । पुसे स्वामीसी येउन ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । मागुनी घेती ईश्वरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुत्र नवल करी थोर ।।४।।

१२८३१२

रुपय आणीती जे कोन्ही । पुसे तयासी जावोनी ।।१।।
कैसे मागोनी घेतले । चीदंबरे कार्य केले ।।२।।
ऐकोनीया वर्तमान । सांगे स्वामीसी येउन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती पुत्रास ।।४।।

१२८३१३

पुत्र वीनवी स्वामीसी । तुम्ही पावता नवसासी ।।१।।
रुपय येती तीकडोन । देता वाणीयासी जाण ।।२।।
खर्च लागे प्रपंच्यासी । रुपय द्यावे ते मजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे तयासी उत्तर ।।४।।

१२८३१४

खर्च यात्रेचा बहुत । म्हणोनी घेतो उचापत ।।१।।
तुज संकट ते होते । कैसे तरी हे चालते ।।२।।
पुत्र करीतो वीनंती । नवस द्यावे मजप्रती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कळा दावी तो ईश्वर ।।४।।

१२८३१५

पुत्र करीतो वीच्यार । बंदोबस्त करी थोर ।।१।।
नवसाचे रुपय येती । परभारात घेववीती ।।२।।
उचापतीकडे काही । पैसा जाउ दील्हा नाही ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती वाण्यास ।।४।।

१२८३१६

वाणीयासी चीदंबर । करी परभारा वीच्यार ।।१।।
हीसेब आणी तु लीहुन । रुपय देतो तुझे जाण ।।२।।
हीशोब करोनीया वाणी । आला वही ते घेउनी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी बोलावी तयास ।।४।।

१२८३१७

बोलावोनी वाणीयासी । रुपय घाली पदरासी ।।१।।
हीसेब न पाहाता जाण । दील्हे दोनसे ते होन ।।२।।
वाणी म्हणे स्वामीलागी । हीसेब पाहातो वेगी ।।३।।
हीसेब जाला बरोबर । दास म्हणे चीदंबर ।।४।।

१२८३१८

हीसेब केला वाणीयाने । नफा दील्हा तो सोडुन ।।१।।
स्वामीलागी येउनी बोले । रुपय शंभर उरले ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । नफा दील्हा तो तुजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । नीत्य दावी चमत्कार ।।४।।

१२८३१९

चरीत्र ९४

चीदंबर दावी कळा हे वीचीत्र । आनुपम्य पवीत्र न कळे कोन्हा ।।१।।
जेष्ट पुत्र गेला स्वारी संच्यारासी । पाटीच्या बंधुसी कारभार ।।२।।
प्रपंचे यात्रेसी आल्या गेल्या आन्न । होणे संतर्पण वर्चेवरी ।।३।।
दास म्हणे जैसी स्वामी आज्ञा करीती । वर्तणे त्यारीती पुत्रालागी ।।४।।

१२८३२०

खर्च आसे बहुत न लगे कोन्हा आंत । स्वामीसी पुसत पुत्र तेव्हा ।।१।।
खर्च नसे जवळी करावे ते काय । सांगावा उपाय स्वामीराया ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी करी उसणवारी । यात्रा आसे भारी खर्च बहुत ।।३।।
दास म्हणे बोले पुत्र तो उत्तर । घ्यावे कोठवर उसणवारी ।।४।।

१२८३२१

न चाले उपाय माझा स्वामीराया । करी मज दया पुत्र म्हणे ।।१।।
चीदंबर म्हणे देतो मी खर्चासी । चींता का करीसी वायाची तु ।।२।।
पाच पुतळ्या दील्हा पुत्रालागी जाण । यात्रेलागी आन्न सीधे द्यावी ।।३।।
दास म्हणे कळा दावी चीदंबर । वीनवीतो कुमर खर्चालागी ।।४।।

१२८३२२

चीदंबर दावी आपुली हे कळा । पाहाताती डोळा लाहान थोर ।।१।।
पुत्रासी ते जाण दील्हया पुतळ्या पांच । लागेल तो खर्च करी यात ।।२।।
ऐकोनीया पुत्र हासे आपुल्या मनी । होतो येक्याक्षणी खर्च याचा ।।३।।
दास म्हणे स्वामी करीती उत्तर । ठेवी तु सत्वर बांधोनीया ।।४।।

१२८३२३

चीदंबर आज्ञा सांगती ज्या रीती । तैसे यथास्थीती बांधुनी ठेवी ।।१।।
फडताळाचे आंत ठेवील्या बांधुन । काढीतसे जाण वर्चेवरी ।।२।।
नीत्य उटोनीया खर्च करीतसे । द्रव्य राहातसे जैसे तैसे ।।३।।
दास म्हणे कळा दावी चीदंबर । नलगे आंतपार देवादीका ।।४।।

१२८३२४

नीत्य उठोनीया खर्च यात्रेलागी । आणताती वेगी सोडोनीया ।।१।।
पुतळ्या बाटव्यात आसती त्या पाच । नव्हे कदा वेच तयालागी ।।२।।
पाच सहश्र पुतळ्या खर्च जाला आसे । पाच राहाती तैसे बाटव्यात ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । आनंद आपार कळा ज्याची ।।४।।

१२८३२५

समुदाय थोर ब्राम्हण भोजन । करी तो संतर्पण नीत्य नवे ।।१।।
सहश्रावधा देती दक्षणा वीप्रासी । पाच पुतळ्यासी वेच नसे ।।२।।
कुमर पाहाती परीक्षा दाटुन । करीताती जाण खर्च बहुत ।।३।।
दास म्हणे लीलाधारी चीदंबर । दावी तो ईश्वर प्रताप हा ।।४।।

१२८३२६

नाना प्रकारीचे खर्च ते करीती । गोप्रदान देती ब्राम्हणासी ।।१।।
त्यावरी दक्षणा शंभर सवासे । करीताती ऐसे खर्च बळे ।।२।।
तरी वेच नव्हे पाच पुसळ्यासी । कळा दावी ऐसे चीदंबर ।।३।।
दास म्हणे आसे ब्रम्हीचा पुतळा । आनंद सोहळा नीत्य जेथे ।।४।।

१२८३२७

ऐसा खर्च करीती वर्ष जाण येक । परी पुतळ्या देख तैश्याची त्या ।।१।।
वर्ष येक जाले आला वडील कुमर । करोनी संच्यार द्रव्य आणी ।।२।।
लक्षावंत रुपय सुवर्ण ढीगारा । पाहा चीदंबरा म्हणतसे ।।३।।
दास म्हणे तीकडे न पाहे फीरोन । चीदंबर जाण कदाकाळी ।।४।।

१२८३२८

सांगे दुसरे दीवसी स्वामी पुत्रालागी । पाच पुतळ्या वेगी आणोन दावी ।।१।।
न आणी कुमर पुतळ्या स्वामीपासी । कल्पना चीत्तासी धरोनी राहे ।।२।।
पाहु आता मग पुतळ्या पीसवी आंत । जाल्या आसती गुप्त न दीसती ।।३।।
दास म्हणे करीती आश्चर्य चीत्तासी । कल्पना फळासी आली म्हणती ।।४।।

१२८३२९

चीदंबर म्हणे पुतळ्या न दावीसी । आनृत्य बोलसी काय म्हणोनी ।।१।।
नाही म्हणीतीले तैसे फळा आले । आमुचे काय गेले याजमद्ये ।।२।।
ईश्वराचे पुढे कापटे न चाले । ह्रदयस्त बोले साक्षभुत ।।३।।
दास म्हणे ऐसा प्रत्यय ईश्वर । दावी चीदंबर पुत्रालागी ।।४।।

१२८३३०

चरीत्र ९५

चीदंबरा वीश्वपती । तुझी आगाध हे कीर्ती ।।१।।
नीत्य नवे चमत्कार । यात्रा मीळती आपार ।।२।।
कोन्ही संकटी पडती । नवस मागोनीया घेती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पावे त्वरीत तयास ।।४।।

१२८३३१

नवस मागोनीया घेती । दावी तयासी प्रचीती ।।१।।
हैदराबादीचा ब्राम्हण । तेणे घेतले मागुन ।।२।।
त्याचे कार्य जाले आसे । मग नवस वीसरलासे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । मागे द्रीष्टांती तयास ।।४।।

१२८३३२

वीप्र ज्याग्रत होवोन । म्हणे आन्याई मी जाण ।।१।।
मागोनी स्वामी घेतले । वर्ष साहा त्यासी जाले ।।२।।
स्वामी रागास येउन । मज दील्हे आसे स्वप्न ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्र जाला चींतातुर ।।४।।

१२८३३३

जावे स्वामीच्या दरुषणा । नवस घेवोनीया जाणा ।।१।।
ऐसा करीतो वीच्यार । दीवस लागले ते फार ।।२।।
स्वामी आलेती रागास । सीतज्वर आला त्यास ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्र भयभीत थोर ।।४।।

१२८३३४

करी वीनंती स्वामीसी । उद्या नीघतो यात्रेसी ।।१।।
आरोग्य करी माझी काया । स्वामी चीदंबरराया ।।२।।
आसे आन्याई मी जाण । चीदंबरा तु पावन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आली करुणा स्वामीस ।।४।।

१२८३३५

जाला आराम तयासी । वेगी नीघाला यात्रेसी ।।१।।
पाच होन नवस देख । संगे घेतला से येक ।।२।।
खर्च वाटेचा करुन । आला स्वामीपासी जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी बोलावी तयास ।।४।।

१२८३३६

वीप्र घाली नमस्कार । उभा स्वामीचे समोर ।।१।।
आर्धा होन खर्च केला । आर्धा स्वामीसी आणीला ।।२।।
आडीच रुपय दोन होन । आला पदरी बांधुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया पुसती वीच्यार ।।४।।

१२८३३७

चीदंबर वीप्रालागी । रागे भरोनी पुसे वेगी ।।१।।
मागोनी घेतल्या उपर । जाले कार्य ते सत्वर ।।२।।
कैसा मज वीसरलासी । काय आणीले गाठोडीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र सोडी गाठोडीस ।।४।।

१२८३३८

अडीच रुपय दोन होन । स्वामी पुढे ठेवी जाण ।।१।।
स्वामी येउन रागास । पाच होन वीसरलास ।।२।।
वीप्र म्हणे आणोनी देतो । राहीले पुढे ते आणीतो ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया बोलती नीष्टुर ।।४।।

१२८३३९

स्वामी बोलती वीप्रास । येक वेळ घेईन तुजसी ।।१।।
दोन होन फीरोनी दील्हे । आडीच रुपय ते घेतले ।।२।।
व्याज चक्रवळी करुन । तुजपासी मी घेईन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । रुपय दील्हे ते वाण्यास ।।४।।

१२८३४०

वीप्र कापे थरथर । उभा स्वामीचे समोर ।।१।।
सीधा देवोनीया जाण । त्याचे केले समाधान ।।२।।
स्वामी म्हणती गावी जावे । होन घेवोनीया यावे ।।३।।
माझे मज द्यावयासी । दीवसगत का लावीसी ।।४।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।५।।

१२८३४१

चरीत्र ९६

चीदंबर करी लीला श्रीष्टीवर । दावी चमत्कार ठाई ठाई ।।१।।
ऐकोनीया कीर्ती भाव जे धरीती । दावीतो प्रचीती तयासी त्या ।।२।।
मागुनी कोन्ही घेती नवस देवासी । संकटी तयासी पावतसे ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । कलयुगी आवतार प्रगट दावी ।।४।।

१२८३४२

सावकार येक होता दुरदेसी । दक्षण ते देसी राहातसे ।।१।।
संकट तयासी पडताती जाण । करी आठवण ईश्वराची ।।२।।
कलयुगी आवतार जाला चीदंबर । केलासे नीर्धार द्रढभावे ।।३।।
दास म्हणे पावे त्यासी चीदंबर । करीतसे दुर वीघ्न त्याचे ।।४।।

१२८३४३

सावकार थोर हुंड्या करीतसे । जागोजागी आसे दुकान ते ।।१।।
लक्ष रुपयाचे बैसले दुकान । आले वर्तमान दुरोनीया ।।२।।
सावकार चीत्ती होवोनीया क्षीण । आठवीतो जाण चीदंबर ।।३।।
दास म्हणे तेणे मागोनी घेतले । पत्र पाटवीले लीहोनीया ।।४।।

१२८३४४

लक्ष रुपय माझे वसुल होता जाण । वाटणी देईन दशम देवा ।।१।।
पत्र पाठवीले दुकानदारासी । होते दुरदेसी दुकान ते ।।२।।
लीही गुमास्तासी नीक्षुण ते जाणे । खाते हे लीहीणे वाटणीचे ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । चाले कारभार दुकानाचा ।।४।।

१२८३४५

तद्देसी तो राजा कर्ज त्याजकडे । लीहीले नीवाडे घ्यावे म्हणोनी ।।१।।
कर्ज मागावया भय नसे काही । पाठीसी तो पाहे चीदंबर ।।२।।
लीहोनीया पत्र पाठवीले ऐसे । रुपय जाले आसे वसुल त्याचे ।।३।।
दास म्हणे जाले दाहा सहश्र रुपये । वाटणीचे पाहे देवाजीचे ।।४।।

१२८३४६

सावकाराकडे दाहा सहश्र जाणे । देवाजीचे घेणे राहीले ते ।।१।।
तयासी द्रीष्टांती सांगे चीदंबर । देई दाहा सहश्र रुपय माझे ।।२।।
सावकार करी वीच्यार चीत्तासी । हुंडी देवाजीसी पाठवावी ।।३।।
दास म्हणे करी वीच्यार चीत्तासी । बहुत दीवस त्यासी जाले असती ।।४।।

१२८३४७

सावकारालागी द्रीष्टांत सांगत । स्वामी सर्वगत चीदंबर ।।१।।
करणे आसे यज्ञ पुढीलीया वर्षी । तांदुळ तयासी घेउनी ठेवी ।।२।।
करणे आसे यज्ञ गोंडनगरासी । पाठवी वेळेसी तांदुळ ते ।।३।।
चीदंबर सांगे स्वप्नी हे तयासी । दास म्हणे त्यासी वीसर पडे ।।४।।

१२८३४८

यज्ञ जाल्यावरी कळले वर्तमान । जाले ते स्मरण सावकार ।।१।।
नाही समयासी तांदुळ धाडीले । रुपय पाठवीले पाहीजेती ।।२।।
हुंडी करोनीया पाच सहश्राची । वाटणी देवाची पाटवी तो ।।३।।
दास म्हणे आले पत्र ते घेउन । हुंडीसहीत जाण कारकुन ।।४।।

१२८३४९

करीती वीनंती स्वामीसी येउन.। पत्र ते वाचून दाखवीती ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी घेणे दाहा सहश्र । काहो पाच सहश्र पाठवीले ।।२।।
म्हणे कारकुन स्वामीलागी जाण । पावती करीन पुढीले वर्षी ।।३।।
दास म्हणे बोले त्यासी चीदंबर । खोळंबा तो थोर यज्ञामाजी ।।४।।

१२८३५०

वर्षभर आदी होते सांगीतले । माझे नायकीले कैसे तेणे ।।१।।
माघार घेवोनी जावे हे रुपये । येक वेळ पाहे घेईन मी ।।२।।
भीउन कारकुन करी तो प्रार्थना । परत हुंडी जाण तोटा होतो ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । तोटा आंगावर सोसीन मी ।।४।।

१२८३५१

परत हुंडी करुनी दील्ही ते स्वामीनी । पदरीचे देणे रुपय तोटा ।।१।।
तीनसे रुपय हुंडावण दील्ही । हुंडी पाटवीली माघारी ते ।।२।।
घेवोनी सावकार रुपय दाहा सहश्र । आणी वर्चेवर स्वामीपासी ।।३।।
कळले वर्तमान यात्रेलागी जाण । रुपय घेउन आला तेव्हा ।।४।।
जाय लोटांगणी आन्याई म्हणोनी । स्वामी क्षमा करोनी आपंगावे ।।५।।
दावीला प्रत्यय आघटीत मज । लक्षाचे हे काज जाले माझे ।।६।।
दास आली दया ते स्वामीसी । बोलावीती त्यासी जवळी तेव्हा ।।७।। १२८३५२

न सांगता कोन्हा दील्हे तुज स्वप्न । प्रत्यय पाहुन वीसरलासी ।।१।।
बरे आता तरी सावध होउन । वाटनी लीहुन ठेवी माझी ।।२।।
जाल तो आनंद सावकारालागी । नीरोप दील्हा वेगी त्याचीवेळे ।।३।।
दास म्हणे लीलाधारी वीश्वंभर । दावी चीदंबर प्रत्यय तो ।।४।। १२८३५३

चरीत्र ९७

चीदंबर वीश्वपती । जाला आवतार क्षीती ।।१।।
नीत्य नवा चमत्कार । दावी कलयुगी ईश्वर ।।२।।
पडे भ्रांती मानवासी । नीत्य पाहुनी द्रीष्टीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।। १२८३५४

उचापत दुकानासी । चीदंबर सांगे वाणीयासी ।।१।।
यात्रा येतसे बहुत । आम्हा द्यावे उचापत ।।२।।
महीन्या येक चालवावे । रुपया घेउनीया जावे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कळा दावी तो वीचीत्र ।।४।।

१२८३५५

लक्षावत यात्रा येती । सीधे द्यावे तयाप्रती ।।१।।
वाणी हीशोब करुन । महीनाभरा येती जाण ।।२।।
हीशोब करुन रात्रीसी । येती स्वामी दरुषणासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी दावी चमत्कार ।।४।।

१२८३५६

वाणी दरुषणासी येती । कर जोडोनी उभे राहाती ।।१।।
स्वामी सहज उभे आसती । गुंडी घेवोनीया हाती ।।२।।
वाणी उभे ते समोरी । होन घालीती पदरी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । हीसेब न पुसे तयास ।।४।।

१२८३५७

रुपय देणे वाणीयासी । स्वामी घालती पदरासी ।।१।।
जाउनी आपुल्या घरी । हीशोब पाहाती वहीवरी ।।२।।
लीहील्या प्रमाणे पावती । होती ज्याची त्याजप्रती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रत्यय ईश्वर ।।४।।

१२८३५८

आवघे मीळोनीया वाणी । वीच्यार करीती बैसोनी ।।१।।
नफा घेउ नये काही । हीसेब लीहोनीया ठेवी ।।२।।
फीरोनी स्वामीपासी येती । वाणी वीनंती करीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती तयास ।।४।।

१२८३५९

आधीक रुपय स्वामीनी । दील्हे वाणीया लागोनी ।।१।।
वाणी म्हणती स्वामीसी । आधीक रुपय कासयासी ।।२।।
नफा सोडोनीया जाण । कैसे बोलता येउन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । प्रत्यय जाला वाणीयास ।।४।।

१२८३६०

नवल करीती चीत्तासी । स्वामी कळा दावी [illegible] ।
आसे आंतर तो साक्षी । चीदंबर सर्वपक्षी [illegible]
मुंगी ब्रम्हयाचे ह्रदई । साक्ष आसे सर्वाटी [illegible] ।
म्हणे चीदंबर दास । भ्रांती पडे मानवास [illegible] ।

१२८३६१

न कळे ईश्वराची कळा । उघड पाहाताती डोळा ।।१।।
माया ईश्वराची कटीण । भ्रांती पडतसे जाण ।।२।।
वर्तवीतो चराचर । तोची द्रीष्टीसी गोचर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुर्णब्रम्ह आवतार ।।४।।

१२८३६२

चीदंबर करुणाघन । आवतार तु सगुण ।।१।।
क्षमावंत जैसी माये । जाणे सर्वांचे ह्रदये ।।२।।
मनोभावे ध्यान करीती । तया दावीतो प्रचीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । उडी घाली संकटास ।।४।।

१२८३६३

करुणावंत तुची धणी । मज येक त्रीभुवनी ।।१।।
पतीतपावन आवतार । माझे नीववी आंतर ।।२।।
तुजवीण प्रीयकर । मी तो नेणे बा ईतर ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । आवतार प्रगट करा ।।४।।

१२८३६४

चरीत्र ९८

चीदंबर दावी कळा आघटीत । आसे सर्वगत स्वामी माझा ।।१।।
ज्याचीया सत्येने जग वर्ततसे । व्यापक जो आसे चराचरी ।।२।।
तोची कलयुगी सगुण आवतार । दावी चमत्कार नानापरी ।।३।।
दास म्हणे यात्रा मीळतसे दाटी । पाहाताती द्रीष्टी प्रत्यय ते ।।४।।

१२८३६५

वीप्र दुरदेसी आला दरुषणासी । गाव पुण्यापासी जुन्नर ते ।।१।।
तेथील कुलकर्णी आला स्वामीपासी । ये पजलेसी स्वामी होते ।।२।।
तेथे भोजनासी वीप्रा घरी गेलो । वीष ब घातीले ते ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । प्रगट चीद करी ।।४।।

१२८३६६

देशस्त ब्राम्हण जाय भोजनासी । कराड्यानी त्यासी वीष दील्हे ।।१।।
भोजन करोनी आला बीराडासी । होय कासावीसी च्यारी प्रहर ।।२।।
च्यारी प्रहर रात्र ब्राम्हण तळमळी । होतो त्या जवळी आणीक दोघे ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतसे धावा । धावे पावे देवा चीदंबरा ।।४।।

१२८३६७

प्राथःकाळी त्यासी जाले आसे स्वप्न । येवोनी ब्राम्हण द्रीष्टांतासी ।।१।।
वीषबाधा जाली आसे बा तुजसी । भोजना गेलासी काय म्हणोनी ।।२।।
सांगीतले होते काय तुजलागी । दरुषणासी वेगी यावे म्हणोनी ।।३।।
दास म्हणे सांगे द्रीष्टांत ब्राम्हण । ज्याग्रत होवोन वीप्रालागी ।।३।।

१२८३६८

संगतीचे जन सांगती तयासी । जावे स्वामीपासी वेगी आता ।।१।।
तळमळी ब्राम्हण जाउ पाहे प्राण । लागलासे अगन देह्यामाजी ।।२।।
आंगारा लावोनी करीतो प्रार्थना । पावे मज दीना चीदंबरा ।।३।।
दास म्हणे वीप्र नीघोनी वेगेसी । आला स्वामीपासी कुंदगोळासी ।।४।।

१२८३६९

येवोनी ब्राम्हण करीतो रुदन । माहाव्दारी जाण पडीला आसे ।।१।।
यात्रा जन सर्व द्रीष्टीने पाहाती । कैसे आता गती होईल यासी ।।२।।
मीळती भवताले ब्राम्हण यात्राजन । तळमळी प्राण व्याकुळ तो ।।३।।
दास म्हणे आम्ही देखीले द्रष्टीने कौतुक स्वामीने दावीयले ।।४।।

१२८३७०

वीप्र दुकानात नीजेला येउन । सांगतसे जाण गावासी बा ।।१।।
आमुचे प्रांतीचा आसे दुरदेसी । गाव जुन्नेरासी घर त्याचे ।।२।।
देखीता वोळखी नीघे परस्परा । आठवी चीदंबरा येक्याभावे ।।३।।
दास म्हणे करी प्रार्थना ब्राम्हण । जाला आसे सगुण चीदंबर ।।४।।

१२८३७१

भाकीतो करुणा चीदंबरालागी । पावे मज वेगी ऐशा वेळे ।।१।।
वाचवावा प्राण स्वामी चीदंबरा । ब्रीद जतन करा आपुले बा ।।२।।
नसे माझे कोन्ही आसे मी वीदेसी । रक्षी आनाथासी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे नीत्य करीतो प्रार्थना । आली त्याची करुणा चीदंबरा ।।४।।

१२८३७२

दीवसोदीवस होत आराम देह्यासी । भरवसा चीतासी जाला आसे ।।१।।
आगन होत आसे बहुत देह्यासी । सीतळ तयासी वाटे मग ।।२।।
करीतो प्रार्थना येवोनी स्वामीसी । स्वामी म्हणती त्यासी भीउ नये ।।३।।
दास म्हणे आसे पतीतपावन । वाचवीला प्राण ब्राम्हणाचा ।।४।।

१२८३७३

करुणावंत धणी आघटीत करणी । दील्ही चुकवोनी वीषबाधा ।।१।।
क्रपाद्रीष्टी पाहाता उतरे भवरोग । वीषाचा तो रोग काय तेथे ।।२।।
वीषाचे आमृत करोनीया दावी । प्राण तो वाचवी ब्राम्हणाचा ।।३।।
दास म्हणे ऐसा क्रपेचा सागर । प्रगट चीदंबर कलयुगी ।।४।।

१२८३७४

आनंत आपार आसे ज्याची कळा । ब्रम्हीचा पुतळा चीदंबर ।।१।।
नीत्य नवे दावी चमत्कार जगी । आवतार कलयुगी स्वामी माझा ।।२।।
दावीले प्रत्यय आनंत जेगासी । न कळे मानवासी आवीद्येच्या ।।३।।
दास म्हणे करी लीला चीदंबर । दावी चमत्कार उघड जगी ।।४।।

१२८३७५

चरीत्र ९९

नीत्य दावी चमत्कार । स्वामी माझा चीदंबर ।।१।।
जाणे दीनाचा कळवळा । ज्याच्या आनंत ह्या कळा ।।२।।
नीत्य नवी लीला दावी । समंध बाधा हे सोडवी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुर्णब्रम्ह आवतार ।।४।।

१२८३७६

ब्राम्हण शेणवी तो जाण । आला दर्शणालागोन ।।१।।
आसे बाधा समंधाची । मान कापतसे त्याची ।।२।।
कंफ बहुत मानेसी । कदा न राहे क्षणेसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आला स्वामी दर्षणासी ।।४।।

१२८३७७

आसे घर ते गोव्यास । कंप आसे बहुत दीवस ।।१।।
आष्टोप्रासर हाले मान । न राहे कदा येक क्षण ।।२।।
मनुश्य भवताले जाण । मीळताती थोरलाहान ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाटे मौज जनास ।।४।।

१२८३७८

पाहाती भवताले जन । कैसे कापताती मान ।।१।।
दीसी चीन्ह ते प्रकार । पाहाताती नारीनर ।।२।।
न कळे ईश्वराची करणी । भय वाटतसे मनी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी बोलावी तयास ।।४।।

१२८३७९

शेणवी बोलवीला जाण । त्यासी पुसती वर्तमान ।।१।।
काय जाले म्हणती त्यासी । कीती दीवस जाले यासी ।।२।।
लोटांगण स्वामीलागी । भावे धालीतसे वेगी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी वीनंती स्वामीस ।।४।।

१२८३८०

म्हणे स्वामीराया जाण । बारा वर्ष कापे मान ।।१।।
ब्रम्हहत्या मजसी । बहुत दुःख हे जीवासी ।।२।।
सोडवीता तुजवीण । नसे तीही लोकी जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे तयासी उत्तर ।।४।।

१२८३८१

आसो समंधाची बाधा । तुझी चुकेल आपदा ।।१।।
राहावे येथ जाण । नीत्य करावे भजन ।।२।।
होईल आरोग्य शरीर । चीती आसो द्यावा धीर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे भक्त प्रीयकर ।।४।।

१२८३८२

राहीला तो स्वामीपासी । वेगी आले प्रत्ययासी ।।१।।
आज्ञा ऐकावी म्हणोन । तुज पडेल बा स्वप्न ।।२।।
तेची आज्ञा माझी देख । तैसी करी वर्तणुक ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आला प्रत्यय तयास ।।४।।

१२८३८३

थोडा थोडा कंप आसे । स्वामी स्वप्नी सांगतसे ।।१।।
जावे वेगी त्वा घरासी । वेगी करुन शुध्द होसी ।।२।।
कदा नायके तो जाण । म्हणे येथ मी राहीन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती तयास ।।४।।

१२८३८४

आज्ञा ऐके माझी आता । येथे न राहे सर्वथा ।।१।।
बळे करोन राहीला । पुन्हा कंप तो सुटला ।।२।।
त्राहे त्राहे म्हणतसे । स्वामीलागी प्रार्थीतसे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया न बोले उत्तर ।।४।।

१२८३८५

वेगी श्नान करुन । आला स्वामीपासी जाण ।।१।।
आज्ञा मागोनीया गेला । आला प्रत्यय तयाला ।।२।।
गेली बाधा समंधाची । आघटीत करणी स्वामीची ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कलयुगी तु आवतारा ।।४।।

१२८३८६

चरीत्र १००

स्वामी दरुषणासी आला येक वैश्य। तैलंग तो देश आसे त्याचा ।।१।।
आला स्वामीपासी कुंदगोळ ग्रामासी । क्रपा करोनी त्यासी बोलताती ।।२।।
याती हो तयाची लींगाईत जाण । करवीले भोजन त्याचे घरी ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । आज्ञा दील्यावर जावे घरा ।।४।।

१२८३८७

लींगायीत वाणी राहे आठ दीवस । जाय नीरोपास स्वामीकडे ।।१।।
नीत्य उठोनीया नीरोप मागत । राहावे नीवांत स्वामी म्हणती ।।२।।
नये त्याच्या मना जाला उदासीन । जाईन नीधोन बळे म्हणे ।।३।।
दास म्हणे त्यासी दावी चमत्कार । उघड चीदंबर यात्रेमाजी ।।४।।

१२८३८८

बहुत प्रकारे सांगीतले त्यासी । नीरोप घरासी घेउनी जावे ।।१।।
आज उद्या तुज नीरोप देउनी । आनंद करुनी पाठवीतो ।।२।।
नायके तो कदा करीतसे त्वरा । जातो म्हणे घरा वेगी आता ।।३।।
दास म्हणे आम्ही सांगीतले त्यासी । नायके मुर्खासी काय कीजे ।।४।।

१२८३८९

यात्रेमाजी जन सर्व ते सांगती । नायके तो गती कर्माची हे ।।१।।
घर त्याचे दुरी वाट महीन्याची । चींता हे घराची वाहातसे ।।२।।
आसे थोर ग्रहस्त खर्च बरोबर । मार्ग आसे दुर घेउनी आला ।।३।।
चीदंबर दास म्हणे उमजेना । सांगता ऐकेना कोणाचे तो ।।४।।

१२८३९०

न घेता नीरोप गेला तो उठोन । प्राथःकाळी जाण न पुसता ।।१।।
गेला येक मजल जावोनी राहीला । बैसावया त्याला बैल होता ।।२।।
चाकर वीश्वासी आसे तो घरीचा । भरवसा त्याचा बहुत आसे ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो कौतुक । दावीतसे देख स्वामी त्यासी ।।४।।

१२८३९१

पनास रुपयाचा बैल येक आसे । रुपय ठेवीतसे मनुश्याजवळी ।।१।।
पन्नास रुपय खर्ची हे वाटेसी । मनुश्याचेपासी ठेवीले ते ।।२।।
वीश्वासुक जाण आसे घर हे गावात । वीकल्प चीत्तात आला त्यासी ।।३।।
दास म्हणे कळा दावी चीदंबर । गेला तो चाकर पळोनीया ।।४।।

१२८३९२

बैलावरी जाण मुट ते ठेउन । कंटाळ घालुन जाता जाला ।।१।।
प्राथःकाळी जाण उठला तो वाणी । न दीसती दोन्ही बैल मनुश्य ।।२।।
वस्तभाव सहीत कंटाळ भरोन । तांब्या नसे जाण पाणी प्याया ।।३।।
दास म्हणे आला फीरोनी माघारा । भेटी चीदंबरा न घडेची ।।४।।

१२८३९३

येक दोन दीवस पडीले उपवास । हासताती त्यास यात्राजन ।।१।।
रडे पडे म्हणे घडीला प्रस्तावा । कैसे केले देवा चीदंबरा ।।२।।
तीसरे दीवसी भेटी जाली ते स्वामीसी । स्वामी पुसे त्यासी वर्तमान ।।३।।
दास म्हणे जाला लज्जीत तो मनी । नीरोपावाचोनी गेलो म्हणोनी ।।४।।

१२८३९४

हासोनीया स्वामी बोलती तयासी । चींता हे मनासी करु नये ।।१।।
लींगाईत वाणी त्याचीया जातीचा । केला भोजनाचा बंदोबस्त ।।२।।
सांगीतले त्यासी आठ दीवस यासी । घाली भोजनासी यथास्तीत ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर जाण । नीरोप देउन पाठवीतो ।।४।।

१२८३९५

जाले आठ दीवस बैसला येउन । माहाव्दारी जाण वाणी तेव्हा ।।१।।
करी स्वामीलागी वीनंती बहुत । कैसी माझी गत स्वामीराया ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी चींता तु न करी । पाटवीतो घरी सुखे तुज ।।३।।
दास म्हणे त्याचे चीत स्थीर नसे । स्वामी सांगतसे बाहुतापरी ।।४।।

१२८३९६

देउनीया खर्ची रुपय तयासी । दील्हा बैसायासी बैल येक ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी जावे बा घरासी । कल्याण तुजसी होत आसे ।।२।।
दावीतसे कळा नीत्य हे कौतुक । वीश्वाचा जनक स्वामी माझा ।।३।।
दास म्हणे स्वामी क्रपेचा सागर । प्रगट चीदंबर लीलादावी ।।४।।

१२८३९७

चरीत्र १०१

चीदंबरावीण काही । मज प्रीय दुजे नाही ।।१।।
ध्यान करीती आंतरी । आसोनीया देशांतरी ।।२।।
तया दावीतो प्रचीती । ऐसा आवतार क्षीती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आघटीत दावी चमत्कार ।।४।।

१२८३९८

ध्यान करीती येकांती । भेटी देतो त्याजप्रती ।।१।।
भक्तराज कोन्ही येक । तया दावीतो कौतुक ।।२।।
आसे जातीचा तो साळी । बोले स्वप्नी चेंद्रमौळी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया सांगतो नीर्धार ।।४।।

१२८३९९

सांगे द्रष्टांती येउन । चीदंबर त्यासी जाण ।।१।।
हत्ती घोडे उंट जाण । म्रीतीकेचे ठेवी करुन ।।२।।
आज्ञा केली स्वामीराया । नीत्य करीतसे पाहे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । साळी ठेवी कुंभारास ।।४।।

१२८४००

चाकरी ठेवीले कुंभार । हत्ती घोडे करी फार ।।१।।
वाळउन बा तयासी । खोली भरलीसे ऐसी ।।२।।
आणीक करीतसे जाण । दुजी ठेवीली भरोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती तयास ।।४।।

१२८४०१

नीत्य आल्या ब्राम्हणासी । सीधा देतसे तयासी ।।१।।
चीदंबर नामे करुन । पाणी सोडीतसे जाण ।।२।।
आल्या गेल्या द्यावे आन्न । कीर्ती वाढवीली जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आंत न कळे कोन्हास ।।४।।

१२८४०२

सांगे चीदंबर त्यासी । नीत्य येउनी स्वप्नासी ।।१।।
आज्ञा माझी हे चालवी । नीत्य म्रीतीका आणवी ।।२।।
हत्ती घोडे करीत जाये । नेम आपुला राहु नये ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे द्रीष्टांती वीच्यार ।।४।।

१२८४०३

कळा न कळे कोणासी । करणी ईश्वराची ऐसी ।।१।।
आणीक येक दुरदेसी । त्याजलागी आज्ञा ऐसी ।।२।।
हत्ती घोडे करी जाण । वरी स्वार बैसवोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । लोक पुसती तयास ।।४।।

१२८४०४

वर्तमाण ते ऐकोनी । बोलवीले फीरंग्यानी ।।१।।
तया पुसती वीच्यार । हत्ती घोडा करीसी फार ।।२।।
साळी सांगतो उत्तर । आसे आज्ञेचा नीर्धार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । न कळे कोन्हा आंतपार ।।४।।

१२८४०५

साळी आसे भक्तराज । न कळे देवाचे हे काज ।।१।।
सांगे द्रीष्टांती वीच्यार । जनालागी भ्रम थोर ।।२।।
ईंगरेज पुसती तयासी । आसे आज्ञा हे आम्हासी ।।३।।
दास म्हणे ऐसे सांगे । घोडे करी नीत्य आंगे ।।४।।

१२८४०६

म्हणे फीरंगी तयास । आज्ञा कोणाची तुम्हास ।।१।।
साळी करीतो उत्तर । आज्ञा सांगे चीदंबर ।।२।।
करणे लागे ऐसे नीत्य । नकळे ईश्वराचे क्रीत्य ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाटे नवल सर्वास ।।४।।

१२८४०७

ऐकोनी फीरंगी उत्तर । आधीक न बोलवे फार ।।१।।
कळा ऐसी ईश्वराची । प्रात्प काय मानवाची ।।२।।
आज्ञेवीण कदा जाण । न हाले व्रक्षाचे ते पान ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कलयुगी आवतार ।।४।।

१२८४०८

चरीत्र १०२

चीदंबरा होसी क्रपेची तु माता । तुझे हाती सत्ता सर्व आसे ।।१।।
कोठवरी आंत घेसी बा आझोनी । दावी रुप नयनी मायबापा ।।२।।
सांभाळी सांभाळी ब्रीद वीश्वंभरा । वेळ चीदंबरा लाउ नये ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माये । माझेवीसी काय जाले तुज ।।४।।

१२८४०९

आनाथ दुर्बळ गरीब ब्राम्हण । भेटीलागी जाण आला तुझ्या ।।१।।
तयालागी देसी सेर तु जोंधळे । होसी क्रपाबळे साहे त्यासी ।।२।।
वीप्र दर्षणासी आला स्वामीपासी । मरे उपवासी घरीदारी ।।३।।
दास म्हणे बहुत नीष्टा स्वामीपासी । सगुण द्रीष्टीसी भेटी म्हणोनी ।।४।।

१२८४१०

आला स्वामी जवळी घेवोनी नारेळ । जाला आसे वेळ माध्यान तो ।।१।।
यात्रा गेली सर्व आपुलाल्या ठाई । उभा आसे पाही ब्दारी वीप्र ।।२।।
कळले स्वामीलागी आंतरीचे गुज । आनाथाचे काज करी देवा ।।३।।
दास म्हणे लीला आघटीत करी । जाला श्रीष्टीवरी आवतार हा ।।४।।

१२८४११

कळवळोनी स्वामी आलेती बाहीर । क्रपेचा सागर दयार्णव ।।१।।
उभा आसे वीप्र कर जोडोनी जाण । प्रेमभरे नयन भरलेती ।।२।।
प्रेमजळे करुनी आश्रुपात नयनी । येतसे दाटोनी कंठ त्याचा ।।३।।
दास म्हणे द्रीष्टी पाहाता चीदंबर । घाली नमस्कार साष्टांग तो ।।४।।

१२८४१२

उठी उठी आपा बोले स्वामी त्यासी । कळवळोनी जैसी माता धावे ।।१।।
उठे तो ब्राम्हण उभा कर जोडोन । सुटलासे जाण कंप आंगी ।।२।।
बोले चीदंबर क्रपाभरे करुनी । काय ईच्छा मनी सांगे मज ।।३।।
दास म्हणे स्वामी क्रपेची हे माता । त्रैलोक्याची सत्ता ज्याचे हाती ।।४।।

१२८४१३

पुसे व्रीप्रालागी चीदंबर धणी । बोले मुखेकरुनी वचन काही ।।१।।
काय तुझ्या चीत्ती आसेल वासना । पुरवीन जाणा याची क्षणी ।।२।।
बोले तो ब्राम्हण जाणसी आंतरा । क्रपेच्या सागरा स्वामीराया ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलावोनी घेती । भोजन ते पंगती करवीले ।।४।।

१२८४१४

न कळता कोन्हा वीप्र बोलावीला । नीरोप तुजाला देतो म्हणती ।।१।।
आज्ञा म्हणोनीया वीप्र उभा जवळी । स्वरुप न्याहाळी स्वामीचे ते ।।२।।
दीसे दीव्यरुप स्वामी तयावेळे । आणवीले जोंधळे सेर येक ।।३।।
दास म्हणे स्वामी आपुल्या हाते देती । गाटोडी बांधीती वीप्राकडुनी ।।४।।

१२८४१५

चीदंबर बोले बहुत क्रपाकरुनी । आनंद तो मनी ब्राम्हणासी ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी गाट सोडुनये । घेवोनीया जाय घरी ऐसे ।।२।।
न करी तु चींता बापा तीळभर । खाय जन्मावर बैसोनीया ।।३।।
दास म्हणे क्रपा केली वीप्रालागी । चीदंबर जगी आवतार हा ।।४।।

१२८४१६

गुप्तरुपे जावे न सांगे कोणासी । जावे बा घरासी याचेवेळे ।।१।।
साष्टांग नमन करीतो ब्राम्हण । नीरोप घेउन जाता जाला ।।२।।
आनंद तो मनी न बोलवे वाचा । आनुभव त्याचा त्यासी ठावा ।।३।।
दास म्हणे करी चीदंबर ध्यान । पोहचला येउन घरासी तो ।।४।।

१२८४१७

वीप्र आला घरा आठवी चीदंबरा । गाटोडी देव्हारा नेवोनी ठेवी ।।१।।
सांगे कुटुंबासी सर्व वर्तमान । जाला तो प्रसन्न चीदंबर ।।२।।
आनंदे करोनी गाटोडी सोडीती । जोंधळ्याची मोती जाले तेव्हा ।।३।।
दास म्हणे हर्ष न माय चीत्तासी । परब्रम्ह होसी चीदंबर ।।४।।

१२८४१८

आनंदे नीर्भर वीप्र बहुत चीत्ता । कळो नेदी वार्ता बाहेर कोन्हा ।।१।।
धन्य चीदंबर कलयुगी आवतार । आनंदे नीर्भर भजन करी ।।२।।
चीदंबरावीण नेणे प्रीय काही । त्रैलोक्यात नाही देव ऐसा ।।३।।
दास म्हणे स्वामी आवतार कलयुगी । चमत्कार जगी दावी नाना ।।४।।

१२८४१९

चरीत्र १०३

चीदंबर वीश्वपती । ज्याची आगाध हे कीर्ती ।।१।।
पुर्णब्रम्ह सगुण जाला । अंत न कळे कोणाला ।।२।।
भ्रांती आसे हे सर्वासी । थोर शास्त्री पंडीतासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाणे सर्वाचे आंतर ।।४।।

१२८४२०

घरी दारी भ्रांती जाण । बहुत सोयॆरे सज्जन ।।१।।
स्त्रीया पुत्र आदी करुन । आप्तवीसी सर्वजाण ।।२।।
भ्रांतीरुप तॆ वर्तती । चीदंबरा नोळखती ।।३।।
दास म्हणॆ ब्रम्हपुर्ण । जाला आवतार सगुण ।।४।।

१२८४२१

ब्राम्हण पंडीत तो थोर । नाम त्याचॆ योगॆश्वर ।।१।।
तैलंग दॆसीचा ब्राम्हण । मंत्रवीद्यामाजी नीपुण ।।२।।
आला स्वामी दरुषणासी । द्रव्य आशा बहुत त्यासी ।।३।।
दास म्हणॆ चीदंबर । आसॆ कापटॆ आंतर ।।४।।

१२८४२२

राहीला तो स्वामीपासी । प्रीय जाला तो पुत्रासी ।।१।।
मंत्रप्रयोग सीकती । द्रव्य दील्हॆ त्याजप्रती ।।२।।
खोटी वीद्यॆचा संग्रहॆ । स्वामीलागी तॆ न साहॆ ।।३।।
म्हणॆ चीदंबर दास । राहीला तो यॆक वरुष ।।४।।

१२८४२३

वीद्या सीकवीली पुत्रासी । त्याणी द्रव्य दील्हे यासी ।।१।।
स्वामीलागी न सांगती । त्यासी ताकीत करीती ।।२।।
पाच सहश्र रुपये । माहावस्त्रे दील्हे पाहे ।।३।।
म्हणे चिदंबर दास । कापटे करीती देवास ।।४।।

१२८४२४

कापट्ये करुनी ब्राम्हण । नीरोपासी आला जाण ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । काय मीळाले तुम्हासी ।।२।।
करी उत्तर ब्राम्हण । येथे देते तरी कोण ।।३।।
दास म्हणे चिदंबर । तटु करवीती तयार ।।४।।

१२८४२५

दाहा रुपय खर्चासी । येक तटु दील्हे त्यासी ।।१।।
स्वामी बोलती हासोनी । ब्राम्हण आसे सत्यवचनी ।।२।।
दील्हा नीरोप तयासी । वेगी यावे म्हणती त्यासी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । नीघे वीप्र त्या वेळेस ।।४।।

१२८४२६

वीप्र जातसे वाटेन । आठ दीवस जाले जाण ।।१।।
हार्षयुक्त बहुत चीती । द्रव्य मीळाले मजप्रती ।।२।।
नाही कळविले स्वामीसी । बहुत केली म्या चौकसी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । हार्ष मानीला चीतास ।।४।।

१२८४२७

आकस्मात ते वाटेसी । गाट पडली पेंढार्यासी ।।१।।
धाउनी आले आंगावरी । वीप्र घाबरे आंतरी ।।२।।
तयालागी ते पुसती । खोटी बुधी याचे चीत्ती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । हीन ऐसा पापी नर ।।४।।

१२८४२८

आवीदं पुसती तयासी । सांग कोठुनी आलासी ।।१।।
करी आपुले शाहानपण । म्हणे आलो पुण्याहुन ।।२।।
त्यासी लुटुन घेतले । शस्त्र उपसुनी आले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । तेव्हा आठवी देवास ।।४।।

१२८४२९

दील्हे सोडुनी तयासी । तदु होता याजपासी ।।१।।
तोही सोडुनीया दील्हा । प्राण त्याचा वाचवीला ।।२।।
चीदंबरा बरे केले । माझे मज फळा आले ।।३।।
आला फीरुनीया जाण । लजीत जाले आसे मन ।।४।।
दास म्हणे चिदंबर । उघड दावी चमत्कार ।।५।।

१२८४३०

चरीत्र १०४

चीदंबरराया दावीसी कौतुक । नीत्य नवी देख यात्रेमाजी ।।१।।
थोर थोर येती दरुषणासी जाण । समुदाय ब्राम्हण बरोबरी ।।२।।
यात्रा दाटी फार येती दरुषणासी । गोचर तयासी प्रसाद तो ।।३।।
दास म्हणे दावी सहज चमत्कार । लीला आवतार स्वामी माझा ।।४।।

१२८४३१

येके दीवसी यात्रा मीळालीसे दाटी । भोजन सेवटी साईंकाळी ।।१।।
येक दोन तीन पंगतीत भोजन । राहीली ते जाण मागे काही ।।२।।
पटवर्धन होते आपुल्या समुदायेसी । भोजन पंगतीसी सेवटील्या ।।३।।
दास म्हणे दावी लीला हे ईश्वर । स्वामी चीदंबर प्रगट तो ।।४।।

१२८४३२

पटवर्धन होते मागील्या पंगतीसी । कारकुन त्यासी येउनी सांगे ।।१।।
आन्न थोडे आसे जेवणार बहुत । आणावे साहीत्य स्वईपाकासी ।।२।।
राहीलासे भात हांडाभर येक । जेवणार देख पाचशे ते ।।३।।
दास म्हणे तेथे करीती वीच्यार । स्वामी चीदंबर आले वेगी ।।४।।

१२८४३३

स्वामी म्हणती त्यासी बैसावे भोजना । करीतो प्रार्थना पटवर्धन ।।१।।
म्हणे स्वामीलागे वीलंब तो आसे । मागे राहीलीसे मंडळी ते ।।२।।
साहीत्य घालणे लागे स्वयपाकात । यासाटी वीनवीत स्वामीराया ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर त्यासी । साहीत्य पाकासी घालु नये ।।४।।

१२८४३४

भोजन मंडळी सांगा कीती आसे । राहीले पाचसे म्हणती मागे ।।१।।
आणीक देणे घेणे शुद्र मंडळीसी । वीनंती पायासी याचीलागी ।।२।।
तीनसे मंडळी आसे कारकुन । स्वयपाक ते जाण कैसा पुरे ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणती तयासी । भाकरी पाकासी मोजुनी पाहे ।।४।।

१२८४३५

मंडळी सहीत उभे चीदंबर । लीला वीश्वंभर दावीतसॆ ।।१।।
मोजीतो भाकरी जाउनी कारकुन । सांगॆ तो यॆउन साठ म्हणोनी ।।२।।
नीट मोजुनी यावॆ स्वामी तॆ सांगती । जाय तॆ मागुती मोजावया ।।३।।
दास म्हणॆ सांगॆ आसती शंभर । दावी चीदंबर लीला तॆथॆ ।।४।।

१२८४३६

न कळॆ हीसॆव सांगती वीप्रासी । पाटवा दुसर्यासी म्हणोनीया ।।१।।
मोजु जाता आणीक सांगती सवासॆ । भ्रांती पडतसॆ सर्वालागी ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी शाहाणा थोर । कोन्ही यॆईल मोजोनी नीट तोची ।।३।।
दास म्हणॆ वीप्र पाटवीला आणीक । यॆउनी सांगॆ दॆख दोनशत ।।४।।

१२८४३७

सांगताती स्वामी कैसॆ कारकुन । न मीळॆची जाण यॆक यॆका ।।१।।
कैसॆ लीहीणॆ करीती पागा कोठीवरी । न यॆती भाकरी मोजावया ।।२।।
हासती लाहानथोर जोडोनीया कर । दैवती प्रकार म्हणती स्वामी ।।३।।
दास म्हणॆ उघड लीला दावी ऐसी । न कळॆ कोणासी चीदंबर ।।४।।

१२८४३८

स्वामी म्हणती तेव्हा बैसावाव्या पंगती । भोजन यथास्तीती करावे ते ।।१।।
करीती भोजन सर्व लाहान थोर । स्वयपाकात फार आन्न उरले ।।२।।
पाचसे ब्राम्हण होवोनी भोजन । शुद्रादीक जाण सर्व जाले ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती तयासी । करावी चौकसी उरले कीती ।।४।।

१२८४३९

मोजु जाती पुन्हा साठ त्या भाकरी । भात हांडाभरी जैसे तैसे ।।१।।
आन्न होते पहीले तीतुकेची राहीले । आश्चर्य वाटले मंडळीसी ।।२।।
न कळे हे कळा ईश्वराची कैसी । प्रत्यय सर्वासी नीत्य दावी ।।३।।
दास म्हणे येउनी सांगती स्वामीसी । आन्न स्वयपाकासी न सरेची ।।४।।

१२८४४०

चीदंबर सांगे वीप्रालागी जाण । बाहीर ठेउन द्यावे सर्व ।।१।।
आणोनीया आन्न बाहीर ठेवीले । शुद्र बोलावीले घ्यावे म्हणोनी ।।२।।
शुद्र हात लावी तेव्हा आन्न सरत । प्रत्यय दावीत स्वामी ऐसी ।।३।।
दास म्हणे स्वामी ब्रम्हीचा पुतळा । उघड दावी कळा चीदंबर ।।४।।

१२८४४१

चरीत्र १०५

चीदंबर आवतार । कलयुगी हा ईश्वर ।।१।।
दावी प्रत्यय हे नाना । तरी मानवा उमजेना ।।२।।
आसे कलीचे हे जन । माहा वीकल्पी दुर्जन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । माया त्याची हे दुर्धर ।।४।।

१२८४४२

नीत्य दावीतसे कळा । यात्राजन पाहाती डोळा ।।१।।
तरी भ्रांती मानवासी । ईश्वराची कळा ऐसी ।।२।।
नीत्य नवी चमत्कार । दावीतसे चीदंबर ।।३।।
दास म्हणे वीश्वपती । दावी आवतारख्याती ।।४।।

१२८४४३

नीत्य ब्राम्हण भोजन । यात्रा येती बहुत जन ।।१।।
मनुश्य गणीत प्रत्यये । स्वामी दावीतसे पाहे ।।२।।
स्त्रीया पुरुष भक्तजन । भावीकासी तो प्रसन्न ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन आवतार ।।४।।

१२८४४४

खळ वीकल्पी दुर्जन । येती कापटे धरुन ।।१।।
दावी प्रत्यय तयासी । वरी दावी तो भक्तीसी ।।२।।
ब्रीद आलासे बांधुन । स्वामी पतीतपावन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । क्रपा सारखी सर्वास ।।४।।

१२८४४५

येके दीवसी प्रयोजन । थोर होत आसे जाण ।।१।।
पंगती बैसल्या उपरी । आले स्वामी ते बाहेरी ।।२।।
म्हणती तुप आसे कीती । कोठीवाल्यासी पुसती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । तुप नसे ते कोठीस ।।४।।

१२८४४६

येउनी सांगे तो स्वामीसी । जाला खोळंबा वेळेसी ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । ठावे नव्हते का तुजसी ।।२।।
कर जोडी कोठीवाला । म्हणे आन्याय तो जाला ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी वीनंती स्वामीस ।।४।।

१२८४४७

म्हणे स्वामीराया जाण । तुम्ही पतीतपावन ।।१।।
सर्व जाणता आंतर । नलगे सांगणे वीस्तार ।।२।।
तुप होते आणवीले । नाही समयासी आले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आली करुणा स्वामीस ।।४।।

१२८४४८

स्वामी म्हणती वीप्रासी । चींता न करी मनासी ।।१।।
तुप आहे तरी कीती । आणुनी दावी मजप्रती ।।२।।
तेणे आणीले घागर । लावी तपेल्यात धार ।।३।।
म्हणे दास चीदंबर । तुप होते च्यार सेर ।।४।।

१२८४४९

चौ सेराचे तपेले । भरुनी स्वामीसी दावीले ।।१।।
स्वामी म्हणताती जाण । आर्धे काढावे यातुन ।।२।।
आर्धे तुप काढीत जावे । भांडे येथेची ठेवावे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पंगत बैसले हाजार ।।४।।

१२८४५०

खंडापा तो कारभारी । प्रीती स्वामीची त्यावरी ।।१।।
आसे लडीवाळ भक्त । येवोनी स्वामीसी बोलत ।।२।।
तुप आसे च्यार सेर । पहीली पंगती हे हाजार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी प्रार्थना स्वामीस ।।४।।

१२८४५१

खंडपा तो शुक्लव्रीती । करी स्वामीसी वीनंती ।।१।।
होसी क्रपेची तु मुर्ती । आता न करी फजीती ।।२।।
पंगत होईल दोन सहस्त्र । पाहीजे वीस ते घागर ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । लज्या रक्षीसी ईश्वरा ।।४।।

१२८४५२

स्वामी म्हणती तयासी । भय न धरी चीत्तासी ।।१।।
धडपणे का बोलसी । नाही वीश्वास तुजसी ।।२।।
हासोनी बोले तो खंडापा । बरे स्वामी मायबापा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाला भरवसा चीत्तास ।।४।।

१२८४५३

आर्धे तुप घेउनी हाती । गेला वाढवया पंगती ।।१।।
स्वामी सांगती तयासी । तुप वाढावे सर्वासी ।।२।।
लागेल तीतके वाढावे । सौंशय काही घेउ नये ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।४।।

१२८४५४

तुप वाढीले सर्वासी । जेउनी राहीले पात्रासी ।।१।।
वाढी मना आले तैसे । तुप राहे जैसे तैसे ।।२।।
न सरे ते कदाकाळी । लीला दावी चेंद्रमौळी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला करी हा ईश्वर ।।४।।

१२८४५५

चरीत्र १०६

चीदंबर करी क्रपा दीनावरी । घ्याती जे आंतरी सर्वकाळ ।।१।।
आनाथाचा नाथ आसे सर्वगत । जाणे ह्रदयस्त आनायासे ।।२।।
प्रत्यय सर्वासी दावीतसे जाण । येती भक्तीकरुन कोन्ही तया ।।३।।
दास म्हणे दावी प्रताप ईश्वर । स्वामी चीदंबर कलयुगी ।।४।।

१२८४५६

ब्राम्हण तो यक आला दर्षणासी । उपासना त्यासी गणपतीची ।।१।।
चीदंबरापासी येवोनीया जाण । करीतसे ध्यान येकाग्र तो ।।२।।
येता दरुषणासी स्वामी बोलावीती । आसे क्रपामुर्ती म्हणती तया ।।३।।
दास म्हणे जवळी घेतला ठेउन । पंगती भोजन नीत्य त्यासी ।।४।।

१२८४५७

जाला मास येक पुसती चीदंबर । नीरोप सत्वर देतो आता ।।१।।
बोले तो ब्राम्हण आज्ञा स्वामीराया । करी मज दया आनाथासी ।।२।।
ईछा बहुत माझी गणपतीपुजनी । आवडी हे मनी ठावे तुम्हा ।।३।।
दास म्हणे जाणे आंतरीचा भाव । माझा स्वामीराव चीदंबर ।।४।।

१२८४५८

नीरोपाचे वेळे बोलावीले जाण । सन्मुख ब्राम्हण बैसवीला ।।१।।
घेवोनीया कुंकु सुपारी हातात । ब्राम्हणासी देत चीदंबर ।।२।।
करीती स्मरण गणपतीचे जाण । करावे पुजन म्हणती त्यासी ।।३।।
आनंदे करुण हर्ष वीप्रालागी । प्रसन्न मजलागी चीदंबर ।।४।।
दास म्हणे चाले आनंदेकरुन । गणपती स्मरण करीतसे ।।५।।

१२८४५९

दोन मजलीवरी जावोनीया जाण । पाहोनीया स्थान रम्य येक ।।१।।
चीत्ती तो वीच्यारी मज दील्ही सुपारी । पुजा हे नीर्धारी करणे आज ।।२।।
पंच्यामृत श्नान करवीन देवासी । बोलावी वीप्रासी संगतीच्या ।।३।।
दास म्हणे सांगे ब्राम्हण वीच्यार । संगतीचे नर ऐकताती ।।४।।

१२८४६०

मंगळवारी आली संकष्टी चतुर्थी । म्हणोनीया प्रार्थी ब्राम्हणासी ।।१।।
संकष्टीचे व्रत आसे बा मजसी । आभीषेक देवासी करणे लागे ।।२।।
ब्राम्हण म्हणती पुजेसी गणपती । तुजपासी मुर्ती आसे काय ।।३।।
चीदंबर दास म्हणे वीप्र बोले । स्वामीराया दील्हे पुगीफळ ।।४।।

१२८४६१

चीदंबरे मज सांगीतले जाण । गणपती पुजन करीत जावे ।।१।।
त्यावरोनी पुजा करीतो गणपतीची । स्वामीचे हातीचे सुपारी हे ।।२।।
करोनीया श्नान आले ते ब्राम्हण । बैसलेती जाण पुजेलागी ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । प्रगट चीदंबर तयेवेळी ।।४।।

१२८४६२

ब्राम्हण पुजेसी बैसलेती देख । करीती आभीषेक येकादशनी ।।१।।
ठेवोनी सुपारी करीती आभीषेक । चीदंबरे देख दील्ही जे का ।।२।।
चीदंबर दावी प्रतापसामर्थ । ब्राम्हणाचा आर्थ पुरवीती ।।३।।
दास म्हणे पुजा होती मंत्रघोष । नवल वीषेश दीसे तेथे ।।४।।

१२८४६३

पुजा होतसे आभीषेक धार । दीसे मोरेश्वर सुपारीचा ।।१।।
दीसतो गणपती ब्राम्हण म्हणती । ठेवीली ते हाती सुपारी हे ।।२।।
होतसे गणपती तयेवेळी जाण । सुपारीची खुण दीसे वरी ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । पाहाताती डोळा ब्राम्हण ते ।।४।।

१२८४६४

येकादशनी होता सीत्धी वीनायक । जाला आसे देख मोरेश्वर ।।१।।
करीताती थोर नवल ब्राम्हण । आघटीत जाण कळा म्हणती ।।२।।
पुर्णब्रम्ह स्वामी सगुण चीदंबर । कलयुगी आवतार जाला आसे ।।३।।
दास म्हणे लीला करी स्वामीराव । नवल स्वभाव आवताराचा ।।४।।

१२८४६५

कळले वर्तमान गावमाजी जाण । मीळाले हे जन यात्रादाटी ।।१।।
पाहाती द्रीष्टीसी सीत्धीवीनायक । दावी हे कौतुक चीदंबर ।।२।।
धन्य चीदंबरा म्हणती लाहान थोर । कलयुगी आवतार ईश्वर हा ।।३।।
दास म्हणे स्वामी माझा ब्रम्हपुर्ण । द्रीष्टीसी सगुण चीदंबर ।।४।।

१२८४६६

चरीत्र १०७

चीदंबर कळा दावी । स्वामी माझा नीत्य नवी ।।१।।
पुर्णब्रम्ह आवतार । वर्तवीतो चराचर ।।२।।
चीदंबर सर्वाभुती । सर्वकळा त्याचे हाती ।।३।।
दास म्हणे स्वामीराव । सर्व देवाचा तो देव ।।४।।

१२८४६७

सर्व करीती त्याचे ध्यान । पंचभुत आदीकरुन ।।१।।
भक्त ब्याघ्र सीव्ह सर्प । सर्वालागी त्याचा दर्प ।।२।।
चीदंबरासी भजती । कोन्ही दर्षणासी येती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सर्वाभुती हा ईश्वर ।।४।।

१२८४६८

स्वामी होतो केंगेरीसी । नवल दावी यके दीवसी ।।१।।
होतो खोलीमाजी देख । जवळी सीश्य आसे येक ।।२।।
नाम त्याचे दीनकर । आसे सेवेसी सादर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी दावी चमत्कार ।।४।।

१२८४६९

नीत्य सेवा तो करीत । झाडुनी बीछ्याना टाकीत ।।१।।
येकेदीवस त्या रात्रीसी । सर्प आला दरुषणासी ।।२।।
दीनकरा नसे ठावे । तेणे जवळी नीजावे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सेवा करी तो रात्रीस ।।४।।

१२८४७०

सेवा करोनी नीजला । न कळे सर्प केवा आला ।।१।।
येउनी लागे तो चरणासी । बैसे स्वामी पायापासी ।।२।।
रात्री आसे पायावरी । कळा न कळे ईश्वरी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८४७१

प्राथःकाळी स्वामी जाण । पाच घटीका रात्रीपुर्ण ।।१।।
तेव्हा उठोनी बैसती । सीशालागी उठवीती ।।२।।
उठोनी बैसे दीनकर । स्वामीपुढे तो समोर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी वीश्वंभर ।।४।।

१२८४७२

स्वामी उठोनीया जाण । आले बाहीरी नीघोन ।।१।।
सीश्य उठोनी ते वेळे । उचली बीछ्याना कांबळे ।।२।।
माहासर्प थोर येक । तेथे बैसलासे देख ।।३।।
म्हणे चीदंबर दास । भय वाटे त्या वीप्रास ।४।।

१२८४७३

पाहे कांबळा उचलोन । नाग फणी उभारोन ।।१।।
बोले आनंदे करुन । वीप्र पाहातो दुरुन ।।२।।
सांगे स्वामीसी येउन । थोर नाग सर्प जाण ।।३।।
चीदंबर म्हणे त्यास । भय न धरी चीत्तास ।।४।।
दास म्हणे स्वामीराव । सहज बोलती स्वभाव ।।५।।

१२८४७४

स्वामी म्हणती सीशासी । नाग आला दरुषणासी ।।१।।
आसे भक्तराज थोर । माहासर्प फणीवर ।।२।।
वीप्र सांगे वर्तमान । होता बीछान्यात जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नवल वाटे त्या वीप्रास ।।४।।

१२८४७५

सांगे स्वामीलागी जाण । होता आथुरुणी नीजोन ।।१।।
स्वामी नीजले त्याजवर । कैसे तरी च्यारी प्रहर ।।२।।
स्वामी म्हणती सेजेसी । आसेल न कळे मजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।४।।

१२८४७६

स्वामी म्हणती सीशालागी । बाहेर यावे तुवा वेगी ।।१।।
सर्प जाईल नीघोन । तेव्हा उचली आंथरुण ।।२।।
क्षणेमाजी पाहाता जाण । सर्प गेला नीघोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कळा न कळे कोणास ।।४।।

१२८४७७

चरीत्र १०८

चीदंबर करी लीला हे आपार । कलयुगी आवतार प्रगट हा ।।१।।
आंतर जाणत सर्व या जीवाचे । बोलोनीया वाचे दावीतसे ।।२।।
आनाथाचा नाथ स्वामी सर्वगत । प्रत्यय दावीत नानापरी ।।३।।
दास म्हणे आसे क्रपेचा सागर । स्वामी चीदंबर ब्रम्हपुर्ण ।।४।।

१२८४७८

मीश्रीकोट्यामाजी होते चीदंबर । यात्रा बरोबर सहश्रावधी ।।१।।
यात्रेची हे दाटी आपार मीळती । सीधे तयाप्रती देती स्वामी ।।२।।
रामचेंद्रपंत तेथील फडणीस । कल्पना तयास बहुत जाली ।।३।।
दास म्हणे करी चींता तो बहुत । न लगे म्हणे अंत खर्चासी या ।।४।।

१२८४७९

फडणीस कल्पना करी आपुल्या चीती । यात्रा बहुत येती नीत्य नवी ।।१।।
खर्चयासी लागे येतसे कोठुन । स्वामी न घे जाण प्रतीग्रही ।।२।।
न घेता कोणाचे द्रव्य कोठुन येते । पुसावे स्वामीते म्हणे चीती ।।३।।
दास म्हणे करी आंतरी वीच्यार । जाणे चीदंबर ह्रदयस्त ।।४।।

१२८४८०

येके दीवसी आला उठोनी ब्राम्हण । पुसावया जाण स्वामीलागी ।।१।।
यात्रादाटी बहुत जालीया नीवांत । वीप्र तो येकांत बोलु म्हणे ।।२।।
स्वामी उभे होते आंतल्या चौकात । बळे बोलावीत फडणीसासी ।।३।।
दास म्हणे वीप्र येवोनीया जाण । साष्टांग नमन करीतसे ।।४।।

१२८४८१

उभा कर जोडुन फडणीस ब्राम्हण । स्वामी पुसती जाण बळे त्यासी ।।१।।
खर्च तो आम्हासी लागतसे फार । तुजलागी थोर काळजी ते ।।२।।
बहुत चींता करीसी आमुच्या खर्चाची । भ्रांती हे चीताची गेली नाही ।।३।।
दास म्हणे वीप्र जाला भयाभीत । कंप तो सुटला सर्वांगासी ।।४।।

१२८४८२

सुटलासे कंप घर्म तो आंगासी । बोले स्वामी त्यासी म्हणती वेगी ।।१।।
चीती म्हणसी बहुत पुसावे म्हणोनी । काय तुझ्या मनी सांगे आता ।।२।।
वीप्र बोले स्वामी कल्पना चीतासी । खर्च या यात्रेसी कोठोनी येतो ।।३।।
दास म्हणे बोले चीत्ती संकोचीत । होउनी भयभीत स्वामीपुढे ।।४।।

१२८४८३

स्वामी म्हणती त्यासी का रे भ्रांती तुज । खर्चालागी मज उणे काये ।।१।।
पाहती भींतीकडे सांगती वीप्रासी । वोतील मजसी भींती रुपया ।।२।।
द्रव्यासी ते काय उणे आम्हालागी । सुवर्ण हे जगी मृत्तीकेचे ।।३।।
दास म्हणे बोले आवेष ईश्वर । स्वामी चीदंबर प्रगट जगी ।।४।।

१२८४८४

म्रीत्तीका पाशाण सुवर्ण हे जाण । भ्रांती हे कोठुन तुजलागी ।।१।।
हाती गुंडी होती ठेवीली भुमीसी । उचली तयासी म्हणताती ।।२।।
घाबरे ब्राम्हण भय वाटे चीत्ती । कैसी माझी गती होईल आता ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणती तयासी । भय ते चीत्तासी धरु नये ।।४।।

१२८४८५

बळे वीप्रालागी जवळी बोलाउन । पाहे उचलुन गुंडी हाती ।।१।।
पालथी ते गुंडी होत भुमीवरी । स्वामी म्हणती करी नीट आता ।।२।।
हात लावी वीप्र गुंडी ते न हाले । बळ बहुत केले ब्राम्हणाने ।।३।।
दास म्हणे धरी दोनी हातेकरुण । न हाले ते जाण गुंडी त्यासी ।।४।।

१२८४८६

नवल वीप्रासी वाटतसे चीती । न कळे कैसी गती ईश्वराची ।।१।।
होउनी गर्वहात घाली दंडवत । कळा आघटीत म्हणे स्वामी ।।२।।
आन्याई आपाराधी क्षमा करा मज । शरण आलो तुज स्वामीराया ।।३।।
दास म्हणे करी प्रार्थना स्वामीसी । रक्षी आनाथासी चीदंबर ।।४।।

१२८४८७

लीला वीश्वंभर दावीतो आपार । प्रगट चीदंबर सर्वालागी ।।१।।
आनंत आपार आसे ज्याची कळा । ब्रम्हीचा पुतळा स्वामी माझा ।।२।।
धन्य भाग्य आसे स्वामी सगुण जनी । पाहाती नयनी लाहानथोर ।।३।।
दास म्हणे कोण कळा वर्णी तरी । जेथे वेदच्यारी मौनावले ।।४।।

१२८४८८

चरीत्र १०९

छेबीमाजी चीदंबर । यात्रा दाटी बरोबर ।।१।।
वैष्ण ब्राम्हण तो येक । माहापंडीत तो देख ।।२।।
आला स्वामी दरुषणासी । सीतज्वर होते त्यासी ।।३।।
चीदंबर दास म्हणे आघटीत देवाचे करणे ।।४।।

१२८४८९

करी वीनंती ब्राम्हण । स्वामीलागी बहुत जाण ।।१।।
सीतज्वराने पीडीले । बहुत प्रयत्न ते केले ।।२।।
करुणा येउ दे ईश्वरा । शरण आलो चीदंबरा ।।३।।
दास म्हणे वीप्र वीनवी । नीत्य येवोनीया पाही ।।४।।

१२८४९०

स्वामीराया करुणापती । माझी परीसावी वीनंती ।।१।।
बहुत क्षीण जाली काया । आरोग्य करी स्वामीराया ।।२।।
होसी पतीतपावन । तुज आलो मी शरण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे वीप्रासी उत्तर ।।४।।

१२८४९१

वीप्र वीनवीतो फार । बोले त्यासी चीदंबर ।।१।।
आज्ञा ऐकसी तु जरी । देव परीहार करी ।।२।।
वीप्र म्हणे स्वामीलागी । आज्ञा करावी ते वेगी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नीत्य वीनवी स्वामीस ।।४।।

१२८४९२

स्वामी म्हणती वीप्रासी । थोर पंडीत तु होसी ।।१।।
राज्यमान्य तुम्ही थोर । तुम्हा कल्पना ते फार ।।२।।
संशय न धरीता काही । आज्ञा ऐकावी ते पाही ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे वीप्रासी प्रखर ।।४।।

१२८४९३

सीतज्वर आसे फार । देहे जालासे जर्जर ।।१।।
पथे करीसी तु फार । लागे ऐकणे वीच्यार ।।२।।
कुपथे सांगतो मी तुज । जेणे होय तुझे काज ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगे ब्राम्हणास ।।४।।

१२८४९४

वीप्र म्हणे स्वामीलागी । काहीतरी सांगा वेगी ।।१।।
स्वामी सांगताती जाण । ऐसे करावे भोजन ।।२।।
तेल भाजी आंबाड्याची । भाकर ते सजगुर्याची ।।३।।
दास म्हणे चीदंबर । खावे म्हणती पोटभर ।।४।।

१२८४९५

भाजी आंबाड्याची फार । घ्यावे तेल आदसेर ।।१।।
सुखी करावे भोजन । तीन दीवस ऐसे जाण ।।२।।
जवळील ते ऐकती । बहुत नवल करीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । संशय नसे ब्राम्हणास ।।४।।

१२८४९६

तेल भाजी भाकर जाण । नीत्य करीतो भोजन ।।१।।
तीन दीवस ऐसे केले । सीतज्वर त्याचे गेले ।।२।।
जाला आरोग्य ब्राम्हण । पाहाती सर्व यात्राजन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सत्ता दावी हे ईश्वर ।।४।।

१२८४९७

बळे कुपथे सांगोनी । प्रत्यय दावीतसे जनी ।।१।।
सत्ता दावीतो ईश्वर । वर्तवीतो चराचर ।।२।।
आज्ञेवीण काही जाण । वायु न हालेची त्रण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सुत्रधारी हा ईश्वर ।।४।।

१२८४९८

ईश्वराची कळा ऐसी । परी न कळे मानवासी ।।१।।
भ्रांती रुप ते आज्ञानी । बहुत वीकल्प ते मनी ।।२।।
ईश्वराची माया ऐसी । आड कर्म येते त्यासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बळे करीतो उत्धार ।।४।।

१२८४९९

चरीत्र ११०

चीदंबर दावी कळा नानापरी । आनाथासी तारी क्रपा करुनी ।।१।।
आडीले नीर्वाणी धावा करीता कोन्ही । पावे त्वरा करुनी चीदंबर ।।२।।
तैलंग ब्राम्हण जाये तीर्थालागी । आज्ञा मागे वेगी स्वामीपासी ।।३।।
दास म्हणे होता भक्तराज पुर्ण । स्वामी क्रपा करुन नीरोप देती ।।४।।

१२८५००

घेवोनी नीरोप गेला तीर्थालागी । क्षेत्रोक्षेत्री वेगी जात आसे ।।१।।
नीत्य ध्यानी मनी आठवी चीदंबर । गेला रामेश्वर पाहावया ।।२।।
यात्रा रामेश्वराची येतसे फीरोन । नव्हते समाधान ब्राम्हणासी ।।३।।
दास म्हणे धावा करीतो ब्राम्हण । करी संरक्षण चीदंबर ।।४।।

१२८५०१ A

ब्राम्हण दुःखीत पडीला दुरदेसी । संरक्षण त्यासी करी कोण ।।१।।
जवळी सेवेसी सीष्य येक जाण । घोडे सांभाळुन राहातसे ।।२।।
आणीक नाही कोन्ही मनुश्य जवळी । वीप्र तळमळी दुःखेकरुनी ।।३।।
दास म्हणे धावा करीतो ब्राम्हण । रक्षी म्हणे प्राण चीदंबरा ।।४।।

१२८५०१ B

द्रीष्टांती येवोनी स्वामी सांगे त्यासी । जावे त्वा घरासी वेगी आता ।।१।।
नायेके ब्राम्हण यात्रा दक्षण देसी । करोनी घरासी जाईन म्हणे ।।२।।
येक दोन मजल पुढे गेला आणीक । नायके तो देख आज्ञा काही ।।३।।
दास म्हणे देश वाट महीन्याची । सरली ते खर्ची जवळी होती ।।४।।

१२८५०२

ब्राम्हण पंडीत भक्तराज थोर । नाम चीदंबर जपे सदा ।।१।।
शागीर्द जवळी होता तो सेवीसी । पळोनी स्वदेसी गेला आपुल्या ।।२।।
नाही जवळी कोन्ही येकला ब्राम्हण । घोडे येक जाण जवळी होते ।।३।।
दास म्हणे वीप्र वाट पाहातसे । सीश गेला आसे म्हणे कोठे ।।४।।

१२८५०३

पाहातसे वाट संध्याकाळवरी । पाणी तांब्याभरी न दे कोन्ही ।।१।।
पडीले संकट वीप्रासी बहुत । धावे बा त्वरीत म्हणे देवा ।।२।।
पावे चीदंबरा मज दीनालागी । रक्षी आता वेगी ब्रीद तुझे ।।३।।
दास म्हणे करुणावंत चीदंबर । पावे त्या सत्वर वीप्रालागी ।।४।।

१२८५०४

चीदंबर पावे तया ब्राम्हणासी । आला त्या रात्रीसी जवळी त्याच्या ।।१।।
वीप्र त्यासी पुसे आलासी कोठुनी । नाही मज कोन्ही म्हणे ऐसे ।।२।।
आन्न वस्त्र जरी द्याल मजलागी । सेवा करीन वेगी सर्व तुमची ।।३।।
दास म्हणे दावी कळा चीदंबर । भक्त प्रीयकर स्वामी माझा ।।४।।

१२८५०५

नीत्य उटोनीया सेवा करीतसे । धोत्रे धुत आसे आंगे देव ।।१।।
घोड्याची खटपट करीतसे वेगी । पाठ पुसे आंगे चीदंबर ।।२।।
खर्ची नसे जवळी देतसे काढुन । भीक्षा ते मागुन आणीतो म्हणे ।।३।।
दास म्हणे आंगे स्वयपाक करुन । वाढीतसे जाण ब्राम्हणासी ।।४।।

१२८५०६

सहा महीने सेवा करी रात्रंदीवस । वोळखी तयास न दे कदा ।।१।।
पंडीत ब्राम्हण वीच्यारीत गाव । सांगतसे नाव दुरदेसी ।।२।।
नाम सांगीतले आपुले वीश्वंभर । सेवा चीदंबर करीतसे ।।३।।
दास म्हणे नीट जाला तो ब्राम्हण । पोहोचावीला जाण घरासी तो ।।४।।

१२८५०७

ब्राम्हण तो सुखी होता घरी जाण । आठवी तो गुण बहुत याचे ।।१।।
काहीतरी द्रव्य द्यावे रोजमुरा । म्हणे चीदंबर पैका न घेई ।।२।।
बहुत सेवा केली माझी तुवा जाण । वाचवीला प्राण आरण्यात ।।३।।
भीक्षा मागोनीया घालीतसे आन्न । करावे वर्णन कोठवरी ।।४।।
दास म्हणे मागे नीरोप ईश्वर । जातो म्हणे दुर देश माझा ।।५।।

१२८५०८

कोणे देसी पुसे घर तुमचे आसे । कर्नाटक देश सांगे ऐसे ।।१।।
न घे काही पैसा वस्त्र पात्र जाण । सेवा करुनी रुण फेडीतसे ।।२।।
बोलेनीया ऐसे गुप्त जाला आसे । नवल करीतसे ब्राम्हण तो ।।३।।
दास म्हणे लीला दावी आघटीत । स्वामी सर्वगत चीदंबर ।।४।।

१२८५०९

ब्राम्हणासी तेव्हा न पडे चईन । म्हणे मी पाहीन चीदंबर ।।१।।
साहा महीन्या उपर आला दरुषणासी । चीदंबरापासी ब्राम्हण तो ।।२।।
चीदंबर त्यासी पुसतसे जाण । सेवा केली कोण साहा महीने ।।३।।
दास म्हणे वीप्र जाला सग्द्दीत । बोलोनी दावी मात चीदंबर ।।४।।

१२८५१०

चरीत्र १११

प्रताप दावी चीदंबर । जाला कलयुगी आवतार ।।१।।
क्रपाकरी दीनावरी । पाहे नीश्चय आंतरी ।।२।।
यात्रा मीळती आपार । देणे नीरोप सत्वर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८५११

पुणे देसीचा ब्राम्हण । आला दरुषणासी जाण ।।१।।
च्यारी मास जवळी जाण । बळे घेतला ठेउन ।।२।।
नीरोप देते वेळी जाण । स्वामी सांगती आपण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रताप ईश्वर ।।४।।

१२८५१२

मुहुर्त पाहोनी चांगला । देतो नीरोप तुजला ।।१।।
स्वामी सांगती तयासी । वीप्र आसे दुरदेसी ।।२।।
कार्य याचे बहुत होणे । लागे मुहुर्त पाहाणे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी लीला हे ईश्वर ।।४।।

१२८५१३

नीत्य येवोनी ब्राम्हण । करी साष्टांग नमन ।।१।।
स्वामीराया क्रपाकरी । कुटुंब बहुत पदरी ।।२।।
वीश्वकुटुंबी ईश्वर । चींता करीसी का फार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । देती नीरोप सत्वर ।।४।।

१२८५१४

मुहुर्त पाहाती उत्तम । यात्रेलागी थोर श्रम ।।१।।
न कळे ईश्वरी कौतुक । कळा दावीतसे देख ।।२।।
बोलावीले नीरोपासी । आमावाशा तेची दीवसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाटे नवल सर्वास ।।४।।

१२८५१५

हासताती यात्रा जन । जे का वीकल्पी दुर्जन ।।१।।
म्हणती मुहुर्त चांगला । आमावशासी पाहीला ।।२।।
नीरोप देती आजी जाण । सांगा नवल तरी कोण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी सांमर्थे सर्वास ।।४।।

१२८५१६

बोलवीले वीप्रालागी । स्वामीराये तेव्हा वेगी ।।१।।
होता भावीक ब्राम्हण । म्हणे आज्ञाची प्रमाण ।।२।।
आला तयार होउन । करी साष्टांग नमन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी सांगती वीच्यार ।।४।।

१२८५१७

स्वामी बोलताती जाण । ऐकताती यात्राजन ।।१।।
वीकल्प न धरी चीत्तास । जन म्हणती आवस ।।२।।
नीश्चय धरावा चीत्तात । ईश्वर कार्य तुझे करीत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । शुभकार्य होय अवश्य ।।४।।

१२८५१८

करणे आसे ईश्वराचे । होय अमृत वीषाचे ।।१।।
परी पाहीजे नीश्चय । ईश्वर होत आसे साहे ।।२।।
अमृतसीधी योग जाण । देतो घटीका पाहुन ।।३।।
दास म्हणे जन वेडे । आमवशा कोणीकडे ।।४।।

१२८५१९

आमवशा वैध्रतीसी । बैसवीले म्या दोहीसी ।।१।।
वेळ चांगला पाहुन । दील्हा नीरोप तो जाण ।।२।।
स्वामी बोलोनीया जाणा । उघड सांगती ब्राम्हणा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुर्णब्रम्ह आवतार ।।४।।

१२८५२०

दील्हा नीरोप वीप्रासी । गेला आपुल्या गावासी ।।१।।
गेला त्याचे दुसरे दीवसी । आले बोलावणे त्यासी ।।२।।
बोलावीले श्रीमंताने । मुलुके बैसवावे ठाणे ।।३।।
दील्हे फौज वैभव । केला रंकाचा तो राव ।।४।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी वीश्वंभर ।।५।।

१२८५२१

बाहीर नीघाले स्वामी ते स्वारीसी । आले हुकेरीसी चीदंबर ।।१।।
नारायणबाबा हरीदास तो नाना । गाव त्याचा जाणा मंगसुळी ते ।।२।।
होते ते गावात पांडुरंग स्थान । दरुषणासी जाण आला तेथे ।।३।।
दास म्हणे करीता देवासी दंडवत । आले आकस्मात चीदंबर ।।४।।

१२८५२२

पांडुरंगालागी नमस्कार करी । हात पाटीवरी ठेवी स्वामी ।।१।।
पुसती तयासी हरीदास तु होसी । कीर्तन करीसी आनंदे तु ।।२।।
गबरु तु चांगला आसीर्वाद दील्हा । अनुग्रह त्याला केला ऐसे ।।३।।
दास म्हणे जाला प्रसन्न ईश्वर । प्रगट चीदंबर सगुणब्रम्ह ।।४।।

१२८५२३

त्यावरी वीप्रासी भक्ती ते लागोन। करीतसे कीर्तन क्रपाबळे ।।१।।
आनाथाचा नाथ स्वामी चीदंबर । क्रपा दीनावर करीतसे ।।२।।
त्यावरी हो स्वामी आले हीपरगीसी । खंडेरायापासी कुळस्वामी तो ।।३।।
दास म्हणे तेथे जाता वाटेवर । दरुषनासी फार यात्रा दाटी ।।४।।

१२८५२४

पुर्वजाची म्हणती वतनाचे गाव । गोठे त्याचे नांव म्हणताती ।।१।।
ते गावी आले स्वामी चीदंबर । यात्रा बरोबर दाटी बहुत ।।२।।
तेथे दरुषणासी आले हरीदास । प्रसाद सर्वास पंगती लाभ ।।३।।
दास म्हणे जाले भोजन सर्वाचे । आनंत जन्मीचे पुण्यफळ ।।४।।

१२८५२५

येती लाहानथोर स्वामीचे दरुषणा । चीदंबर जाणा बोलतसे ।।१।।
गरीब ब्राम्हण आसे मी मानव । घालीतसे भाव मायाभ्रम ।।२।।
प्रगट बोलोनी दावीतसे कळा । ब्रम्हीचा पुतळा स्वामी माझा ।।३।।
दास म्हणे प्रगट कलयुगी आवतार । स्वामी चीदंबर श्रीष्टीवरी ।।४।।

१२८५२६

हरीदास तो नाना जवळी आला आसे । स्वामी करीतसे क्रपा त्यासी ।।१।।
स्वमुखे सांगती श्लोक बा तयासी । प्रत्यय द्रीष्टीसी उघड दावी ।।२।।
श्लोकाचा तो भाव सांगतसे ऐका । सगुण ब्रम्ह देखा बोलतसे ।।३।।
दास म्हणे श्लोक लीहोनी ठेवीला । पाहीजे तयाला पाहावा तो ।।४।।

१२८५२७

श्लोकाचा तो भाव परब्रम्हमुर्ती । स्वमुखे श्रीपती बोले ऐसे ।।१।।
चीद्ब्रम्ह स्वरुपी व्रीती मीळवावी । बहुतापरी जीवी नाम धरी ।।२।।
वीषई वीरक्ती दया क्षमा चीती । वर्णवी बा कीर्ती सब्दस्तुती ।।३।।
दास म्हणे सांगे स्वमुखे ईश्वर । प्रगट चीदंबर सगुण जाला ।।४।।

१२८५२८

कलयुगी आवतार पतीतजना तारी । धरीला आवनीवरी आवतार हा ।।१।।
प्रगट चीदंबर जाला सगुणब्रम्ह । बोलोनीया वर्म दावीतसे ।।२।।
धरावा आंतरी द्रढभाव चीत्ती । चीदंबरमुर्ती घ्यात जावी ।।३।।
दास म्हणे ऐसा स्वमुखे बोलोन । चुकवी जन्ममरण चीदंबर ।।४।।

१२८५२९

कलयुगी बहुत जाला आनाच्यार । बुडती पामर जन सर्व ।।१।।
यालागी आवतार धरी चीदंबर । पतीत उत्धार करीतसे ।।२।।
दर्षणस्परषणे नीववीतो मन । उत्धरीतो जाण पशुपक्षी ।।३।।
दास म्हणे करी आनंदे भाषण । ऐकताची जन उत्धरती ।।४।।

१२८५३०

शब्द पडता कानी पाहाता नयनी । पशुपक्षी कोन्ही होका याती ।।१।।
उत्धार तयाचा होत आसे जाण । स्वामी ब्रम्हपुर्ण सगुण जाला ।।२।।
उघड बोलुन दावीतसे जना । न कळे आज्ञाना काय कीजे ।।३।।
दास म्हणे धन्य भाग्य उदयासी । देखीला द्रीष्टीसी चीदंबर ।।४।।

१२८५३१

श्रीष्टीवरी भक्त आसती बहुत । प्रसन्न त्या होत चीदंबर ।।१।।
कोण जाणे आंत कळा ईश्वराची । प्रचीती जयाची त्यासची ठावी ।।२।।
श्रीष्टीवरी ऐसा आवतार कोन्ही । नायकीला कानी दुजा ऐसा ।।३।।
दास म्हणे पुर्णब्रम्ह चीदंबर । भाग्य आसे थोर देखती जे ।।४।।

१२८५३२

चरीत्र ११३

चीदंबरा करुणाघना । स्वामी पतीतपावना ।।१।।
कलयुगी आवतार । करीतो दीनाचा उत्धार ।।२।।
दावी प्रत्यय सर्वासी । आंत न कळे कोणासी ।।३।।
म्हाणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८५३३

भक्त आसती ठाई ठाई । त्यासी प्रत्यय तो दावी ।।१।।
आसे दयाळ हे माता । कदा नुपेक्षी सर्वथा ।।२।।
दावी प्रत्यय भक्तासी । उघड सर्वाचे द्रीष्टीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२८५३४

नारायण हरीदास । तेणे पाहीले द्रीष्टीस ।।१।।
सांगीतले आम्हा देखा । सीश्य कासीबा साळंखा ।।२।।
तोही होता त्याजवळी । पांडुरंगाचे देवळी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । भाक्ती लावी देशोदेश ।।४।।

१२८५३५

स्वामी गेले हीपरगीसी । खंडेराव कुळस्वामीसी ।।१।।
वाटे जाता गोठेगाव । तेथ नरसीव्ह देव ।।२।।
पुजा करी चीदंबर । यात्रा दाटी बरोबर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । धर्मस्थापना आवतार ।।४।।

१२८५३६

पुजा करी नरसीव्हाची । जवळी दाटी ब्राम्हणाची ।।१।।
पुजा करी चीदंबर । आणवी पुजेचा संभार ।।२।।
धोत्र जोड त्या देवासी । न मीळे खेडीया गावासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बोलावीले सींपीयास ।।४।।

१२८५३७

दोन पंच्या त्याजपासी । रुपय दोन सांगे त्यासी ।।१।।
सांगे माहाग बहुत । जवळी क्रष्णाजीपंत ।।२।।
तेणे लावीला माघारा । सींपी गेला आपुल्या घरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तेथे दावी चमत्कार ।।४।।

१२८५३८

स्वामी पुजीती देवासी । पुजा करीती शोडसी ।।१।।
धोत्र जोडा त्या वेळेसी । कोठे न मीळे देवासी ।।२।।
कारकुन बोलावीला । स्वामी पुसती तयाला ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न मीळे म्हणे तो स्वामीस ।।४।।

१२८५३९

स्वामी म्हणती तयासी । जोडा तुझीया काखेसी ।।१।।
तोची देई आता वेगी । आम्हा देव पुजेलागी ।।२।।
पाहे धोत्र तो झाडुन । जोडा पडीला बगलेतुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । नवल करीती लाहान थोर ।।४।।

१२८५४०

कारकुन नवल करी । चोरी आली मजवरी ।।१।।
जोडा कोटुनी पडीला । न कळे हा मी आणीला ।।२।।
भ्रम पडीला तयासी । ईश्वराची कळा ऐसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सर्व पाहाती द्रीष्टीस ।।४।।

१२८५४१

नीत्य दावी चमत्कार । पाहाताती नारीनर ।।१।।
सगुणब्रम्ह चीदंबर । कलयुगी आवतार ।।२।।
भाग्य जयाचे आपार । जेणे देखीला ईश्वर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन आवतार ।।४।।

१२८५४२

नीत्यनवी दावी कळा । स्वामी ब्रम्हीचा पुतळा ।।१।।
द्रीष्टी पाहाती सर्वजन । नारीनर थोर जाण ।।२।।
कळा दावी नानापरी । ब्रम्हांडाचा सुत्रधारी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला द्रीष्टीसी गोचर ।।४।।

१२८५४३

चरीत्र ११४

चीदंबर दावी वीचीत्र हे कळा । पाहाताती डोळा यात्राजन ।।१।।
वेंकोबाची यात्रा जात आसे जाण । नीरोप घेवोन स्वामीचा तो ।।२।।
माणको तो पंत आसे स्वामी भक्त । कुटुंबसहीत आला तेथे ।।३।।
दास म्हणे जाणे त्यासी यात्रेलागी । नीरोप देती वेगी चिदंबर ।।४।।

१२८५४४

यात्रा उतरली गावाचे सेजारी । लागलासे भारी पर्जन्य तो ।।१।।
प्राथःकाळी स्वामी येउनीया तेथे । सांगती सर्वाते नीघावेगी ।।२।।
ठेवीती खोगीरे धोड्यावरी जाण । येतसे प्रर्जन्य तये वेळी ।।३।।
दास म्हणे स्वामी नीधाले वेगेसी । तयारी यात्रेसी करा म्हणती ।।४।।

१२८५४५

प्रर्जन्य लागला आसे तो बहुत । संषय करीत यात्राजन ।।१।।
येउनीया स्वामी उभे प्रर्जन्यात । उघडे आकस्मात पाउस तो ।।२।।
नवल करीती जन कवतुक दावीले । नीरोपासी आले पुढे सर्व ।।३।।
दास म्हणे नीघे पालखी देवाची । दाटी ते यात्रेची बहुत आसे ।।४।।

१२८५४६

बोलावीला वीप्र कुटुंबासहीत । स्वामी नीरोप देत तयेवेळी ।।१।।
तांदुळ नारेळ देउनीया त्यासी । नीरोप सर्वासी देते जाले ।।२।।
स्वामी उभे तेंथे पाहाती सर्वजन । आंगावरी जाण शालजोडी ।।३।।
दास म्हणे दावी कवतुक ईश्वर । पाहाती लाहानथोर यात्राजन ।।४।।

१२८५४७

बोलवीले जवळी ब्राम्हणासी जाण । सांगती नमन स्वामी त्यासी ।।१।।
वेंकटेशालागी मुंडुप वाहावे । सांगती स्वभावे स्वामी ऐसी ।।२।।
मोकळे ते हात सर्वानी पाहीले । मुष्टी भरुनी दील्हे द्रव्य त्यासी ।।३।।
सुवर्ण दक्षणा वाहावी देवासी । स्वामी बोले त्यासी दास म्हणे ।।४।।

१२८५४८

पाहाती यात्राजन आश्चर्य करीती । वीप्र जाला चीती सग्द्दीत ॥१॥
द्रव्याची गाटोडी बांधीली पदरी । आश्चर्य तो करी मनामाजी ॥२॥
सर्वाचे देखता न कळे ते हाती । मुष्टी बांधुनी देती द्रव्य कैसे ॥३॥
दास म्हणे दावी चीदंबर कळा । पाहाताती डोळा यात्रा जन ॥४॥

१२८५४९

द्रव्य दील्ही कीती त्याचीया पदरात । न कळे गणीत होते कीती ॥१॥
ईश्वराची कळा न कळे कोणासी । नवल द्रीष्टीसी दावीतसे ॥२॥
जाती बोळवीत चीदंबर जाण । यात्रा थोरलाहान बरोबरी ॥३॥
दास म्हणे स्वामी उभे ते सेतात । प्रर्जन्य बहुत आला तेथे ॥४॥

१२८५५०

देवाची पालखी उभी करोनी तेथे । नीवारीती हाते प्रर्जन्यासी ॥१॥
दोही बाजोनीया पडे तो प्रर्जन्य । मार्ग दील्हा जाण यात्रेलागी ॥२॥
दावोनी कौतुक स्वामी मागे येती । आले स्थळाप्रती आपुलीया ॥३॥
दास म्हणे ऐसे वीचीत्र हे लीला । दावीतो सर्वाला चीदंबर ॥४॥

१२८५५१

वीश्वाचा जनक दावीतो कौतुक । नीत्यनवी देख लीला ऐसी ।।१।।
पाहाती जनलोक सकळ द्रीष्टीसी । आश्चर्य चीतासी करीताती ।।२।।
परी पडे भ्रम जैसा तैसा जाण । मानव आज्ञान माईकासी ।।३।।
दास म्हणे स्वामी वीश्वंभर सगुण । जाला आसे जाण चीदंबर ।।४।।

१२८५५२

नीश्चय न होय आज्ञान जीवासी । भ्रांती मानवासी पडे वेगी ।।१।।
आवीद्यक जीव ईश्वराची माय । देवादीका जया भ्रम येती ।।२।।
दावील स्वरुप आपुले चीदंबर । करीता नीर्धार होय जीवा ।।३।।
दास म्हणे सत्ताधारी चीदंबर । करवी नीर्धार तोची येक ।।४।।

१२८५५३

क्रपेचा सागर आसे चीदंबर । पतीत उत्धार करीतसे ।।१।।
पतीतपावन धरीला आवतार । करवी नीर्धार तोची येक ।।२।।
आसे सुत्रधारी त्रैलोक्याचा धणी । आघटीत करणी आसे ज्याची ।।३।।
दास म्हणे दावी लीला जनालागी । आवतार जगी स्वामी माझा ।।४।।

१२८५५४

चरीत्र ११५

चीदंबर क्रपावंत । आनाथाचे कार्य करीत ।।१।।
सीरटीसी चीदंबर । होती यात्रा बरोबर ।।२।।
नीत्य येती दरुषणासी । दावी प्रत्यय तयासी ।।३।।
परब्रम्ह परीपुर्ण । दास म्हणे जाला सगुण ।।४।।

१२८५५५

आला गुजराती ब्राम्हण । कीर्ती स्वामीची ऐकुन ।।१।।
आला दुर देसीहुन । ईछा कामानीक धरुन ।।२।।
सांगे स्वामीलागी जाण । बहुत जाला आसे रीण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी वीनंती स्वामीस ।।४।।

१२८५५६

गुजराती तो ब्राम्हण । म्हणे स्वामीलागी जाण ।।१।।
पुर्णब्रम्ह सनातन । जाला आवतार सगुण ।।२।।
दरीद्र पीडीलोसे भारी । ईछा माझी पुर्ण करी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया सांगती उत्तर ।।४।।

१२८५५७

स्वामी म्हणती वीप्रा जाण । मी तो गरीब ब्राम्हण ॥१॥
द्रव्य देउ तुज कोठुन । बोलॆ गुजराती ब्राम्हण ॥२॥
च्यारी सहश्र ते होन्न । मज पाहीजॆ तॆ जाण ॥३॥
आवतार पुर्णब्रम्ह । दास म्हणॆ कळलॆ वर्म ॥४॥
१२८५५८

वीप्र म्हणॆ स्वामीलागी । आवतार कलयुगी ॥१॥
मायाभ्रम तु घालीसी । हे तो कळवीलॆ मजसी ॥२॥
होन घॆतल्यावाचुन । कदा न जाय मी जाण ॥३॥
म्हणॆ चीदंबर दास । वीप्र आला नीघ्रयास ॥४॥
१२८५५९

आन्नपाणी तो सोडुन । करीत बैसॆ आनुष्टान ॥१॥
चीदंबर ध्यान करी । राहीलासॆ नीराहारी ॥२॥
नीत्य यॆउनीया जाण । जाय दर्षण घॆउन ॥३॥
दास म्हणॆ चीदंबर । तया सांगतसॆ फार ॥४॥
१२८५६०

सहा महीने जाले पुर्ण । वीप्र करी अनुष्टान ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । आज्ञा देतो तुजसी ।।२।।
नीरोप देते वेळे जाण । वेगी जावे त्वा नीघोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आज्ञा म्हणे तो स्वामीस ।।४।।

१२८५६१

वीप्र म्हणे तो स्वामीसी । क्रपावंत माय होसी ।।१।।
माझे कार्य जाल्यावरी । मी तो जाईन झडकरी ।।२।।
स्वामी बोलवीती तयासी । देतो नीरोप तुजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । क्रपा आली ते स्वामीस ।।४।।

१२८५६२

मुहुर्त पाहोनी चांगला । वीप्रालागी बोलावीले ।।१।।
हरभर्याचे दाळ आणीली । आदसेर त्यासी दील्ही ।।२।।
त्याचे घालीता पदरी । होन जाले ते आवसरी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाला आनंद वीप्रास ।।४।।

१२८५६३

स्वामी म्हणती तयासी । हे तो न सांगे कोणासी ।।१।।
गुप्तरुपे नीघोनी जावे । भक्ती करी येक्याभावे ।।२।।
आल्या ब्राम्हणासी आन्न । देत जावे भक्ती करुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दील्हा नीरोप वीप्रास ।।४।।

१२८५६४

वीप्र नीघे आनंदेसी । गेला आपुल्या घरासी ।।१।।
कळा ईश्वराची जाण । आवतार तो सगुण ।।२।।
वीप्र आनंदेसी घरी । चीदंबर ध्यान करी ।।३।।
धन्य म्हणे चीदंबरा । दासाचीया प्रीयकरा ।।४।।

१२८५६५

चरीत्र ११६

चीदंबर आसे धणी त्रैलोक्यासी । आवतार श्रीष्टीसी सगुण जाला ।।१।।
रक्षी दीनालागी दया बहुत पोटी । पाहे क्रपा द्रीष्टी मायबापा ।।२।।
घेउ नये अंत मज आनाथाचा । लौकीक ब्रीदाचा रक्षी आता ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माय । कोमळ ह्रदय तुझे देवा ।।४।।

१२८५६६

यावे सर्वेश्वरा दीनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा रुप दावी ।।१।।
भाकीतो करुणा क्रपेच्या नीधाना । पुरवी वासना मायबापा ।।२।।
करीतो कोन्ही धावा आडील्या नीर्वाणी । रक्षीसी जावोनी तयालागी ।।३।।
दास म्हणे होसी जननी जनक । दावीसी कौतुक चीदंबरा ।।४।।

१२८५६७

ब्राम्हण तो आला येक दरुषणासी । होता दुरदेसी कोकणस्त ।।१।।
घाटाखाली गाव समुद्रतीरासी । आला स्वामीपासी यात्रेलागी ।।२।।
दरीद्रे पीडीला वीनवी स्वामीला । रक्षी तु मजला चीदंबरा ।।३।।
दास म्हणे बोले त्यासी चीदंबर । रक्षीतो ईश्वर तुजलागी ।।४।।

१२८५६८

बोले तो ब्राम्हण सगुण चीदंबर । तुजवीण ईश्वर दुजा नेणे ।।१।।
कुटुंब बहुत आसे ते पदरी । आनाथासी करी दया आता ।।२।।
रक्षी मजलागी चीदंबरा वेगी । आवतार जगी प्रगट तुझा ।।३।।
दास म्हणे करी वीनंती देवासी । चीदंबर त्यासी नीरोप देती ।।४।।

१२८५६९

बोलावीला वीप्र नीरोपासी देवे । बोलती स्वभावे चीदंबर ।।१।।
देतो बा नीरोप जावे बा घरासी । ईश्वर तुजसी रक्षी आता ।।२।।
येतो बरोबर तुझीया घरासी । पुजा आहीर्नीसी करीत जावे ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर जाण । जालो मी प्रसन्न तुजलागी ।।४।।

१२८५७०

नीरोपाचे वेळे बोले चीदंबर । देतो मी ईश्वर तुजपासी ।।१।।
घेवोनी नारेळ घातीला पदरी । प्रेमेभावे करी पुजा याची ।।२।।
देतो आन्न वस्त्र तुजलागी बहुत । ईश्वर साक्षात तुज जवळी ।।३।।
दास म्हणे ऐसे बोलोनी वीप्रासी । चीदंबर त्यासी क्रपा करी ।।४।।

१२८५७१

नीघे तो ब्राम्हण जाय मार्गेकरुन । रात्री जाले स्वप्न तयालागी ।।१।।
दील्हा आसे तुज नारेळ तो जाण । जाला आसे बाण त्याचा देख ।।२।।
करावी स्थापना ईश्वराची आता । बांधी घरी आता देउळ तु ।।३।।
दास म्हणे ऐसा द्रीष्टांती वीच्यार । सांगे चीदंबर वीप्रलागी ।।४।।

१२८५७२

प्राथःकाळी वीप्र ज्याग्रत होउनी । वीच्यारी तो मनी द्रीष्टांत हा ।।१।।
आज्ञा केली म्हणे स्वामीराये ऐसी । पाहे नारेळासी सोडुन तो ।।२।।
नारेळाचा जाला आसे शुध बाण । आश्चर्य ब्राम्हण करी तेव्हा ।।३।।
दास म्हणे वर्णी चीदंबर कीर्ती । स्वप्नीची प्रचीती ज्याग्रतीसी ।।४।।

१२८५७३

वीप्र म्हणे चीती जाताची घरासी । स्थापना ते कैसी होय आता ।।१।।
करणी ईश्वराची जाता तो घरासी । घाटावरी त्यासी द्रव्य मीळे ।।२।।
दोन सहश्र रुपय मीळाले ते जाण । गेला तो नीघोन घरासी बा ।।३।।
दास म्हणे वीप्र हर्षयुक्त करुन । जाला तो प्रसन्न चीदंबर ।।४।।

१२८५७४

घरी जाताक्षणी देउळ बांधीले । तेथे स्थापीयले ईश्वरासी ।।१।।
चीदंबरेश्वर नाम त्याचे जाण । पुजीतो ब्राम्हण आनंदेसी ।।२।।
ऐकोनीया कीर्ती बहुत येती । बहुताची होती कार्ये तेथे ।।३।।
दास म्हणे कळा प्रगट दावीत । स्वामी मुर्तीमंत चीदंबर ।।४।।

१२८५७५

वीप्र जाला सुखी नांदे कुटुंबासी । आन्न धान्य त्यासी प्रात्प बहुत ।।१।।
आला दरुषणासी चीदंबरापासी । सांगे आनंदेसी वर्तमान ।।२।।
ऐकोनीया यात्रा नवल करीती । आगाध हे कीर्ती चीदंबरा ।।३।।
दास म्हणे करी लीला हे आपार । स्वामी तो उदार चीदंबर ।।४।।

१२८५७६

चरीत्र ११७

चीदंबरा क्रपावंता । दीनालागी त्वा रक्षीता ।।१।।
कळा दावीसी आनंत । देवादीका नलगे अंत ।।२।।
स्वप्नामाजी तु सांगसी । उघड प्रत्यय दावीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । पतीतपावन ईश्वरा ।।४।।

१२८५७७

ब्राम्हण कोकणस्त जाण । आला दर्षणालागुन ।।१।।
घर त्याचे नासीकासी । आला कुंदगोळ ग्रामासी ।।२।।
बहुत व्रध तो ब्राम्हण । त्यासी पुत्र दोघेजण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कुटुंबेसी आला वीप्र ।।४।।

१२८५७८

वीप्र कुटुंबासहीत । कांता त्याची शाहाणी बहुत ।।१।।
करी पतीत आचरण । स्वामी पतीतपावन ।।२।।
क्रपा करोनीया जाण । तीसी घेतलो ठेउन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन आवतार ।।४।।

१२८५७९

वीप्र ठेवीला जवळी । कुटुंब सहीत मंडळी ।।१।।
वीप्र व्रध तो ब्राम्हण । त्यासी मोक्ष दील्हा जाण ।।२।।
कांता पुत्र दोघा जाण । जवळी घेतले ठेवोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बळे क्रपा करी त्यास ।।४।।

१२८५८०

वीप्र कांता ते स्वामीसी । मागे नीरोप घरासी ।।१।।
स्वामी सांगती तीयेसी । येथे राहावे सुखेसी ।।२।।
दुःख न करी पतीचे । लगन करीतो पुत्राचे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी बुझावी तीयेस ।।४।।

१२८५८१

बळे म्हणती स्वामीसी । मी तो जाईन घरासी ।।१।।
नायकता बळे जाण । करी आज्ञा उलंघन ।।२।।
करी साहीत्य आपण । कोन्हा कळो नेदी जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावीतसे चमत्कार ।।४।।

१२८५८२

वीप्रकांतेलागी जाण । स्वामी द्रीष्टांती येउन ।।१।।
तोंडावरी ते मारीले । म्हणे साहीत्य का केले ।।२।।
आले ज्याग्रतीसी जाण । तोंड गेले ते सुजोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाली लज्जीत मनास ।।४।।

१२८५८३

सांगे स्वप्न जवळील्यासी । स्वप्नी मारीले मजसी ।।१।।
तोंड सुजले बहुत । दुःख मजलागी होत ।।२।।
तेची वेळे तीयेलागी । स्वामी बोलावीती वेगी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कदा नये ते समोर ।।४।।

१२८५८४

सागुंनी स्वामीसी धाडीत । मी तो आन्याई बहुत ।।१।।
पावन तु क्रपावंत । क्षमा करी मज आता ।।२।।
कदा न जाय घरासी । सीक्षा दावीली मजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । भक्ती लावी पतीतास ।।४।।

१२८५८५

करी वीनंती स्वामीसी । दावी प्रत्यय मजसी ।।१।।
लगन करावे पुत्राचे । व्हावे आभय देवाचे ।।२।।
रात्री द्रीष्टांती येउन । स्वामी जाले ते प्रसन्न ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उघड दावी चमत्कार ।।४।।

१२८५८६

स्वामी स्वप्नामाजी आले । मंगळसुंत्र कुंकु दील्हे ।।१।।
होते पुत्राचे ते लगन । मंगळसुत्र बांधी जाण ।।२।।
ज्याग्रत होउन पाहाती । मंगळसुत्र कुंकु हाती ।।३।।
स्वप्न सत्य हे करीत । लीला दावी आघटीत ।।४।।

१२८५८७

चरीत्र ११८

कन्यागतालागी स्वामी क्रीष्णातीरी । आले बरोबरी यात्रा दाटी ।।१।।
कुटुंबसहीत होते चीदंबर । यात्रा दाहा सहश्र बरोबरी ।।२।।
येती दर्षणासी यात्रा ते बहुत । प्रत्यय दावीत सर्वालागी ।।३।।
दास म्हणे कळा दावी नानापरी । आनाथाचे करी कार्य बहुत ।।४।।

१२८५८८

देशपांड्या येक आला दरुषणासी । पीता लष्कारासी धरुनी नेला ।।१।।
पैका मागे बहुत नेला तो दरुन । टाकीले मारुन बहुत ऐसे ।।२।।
वीप्रकांता करी वीनंती स्वामीसी । जाले ते पतीसी आक्रा महीने ।।३।।
दास म्हणे त्यासी सांगे चीदंबर । ऐका ते उत्तर सांगतसे ।।४।।

१२८५८९

स्वामी म्हणती जाणा जावे क्रीष्णाश्नाना । करावी प्रार्थना क्रीष्णेलागी ।।१।।
मागोनीया घ्यावा नवस तो जाण । ब्राम्हणभोजन येथाशक्ती ।।२।।
चीदंबर दावी आपुले कौतुक । कळो नेदी देख जनालागी ।।३।।
दास म्हणे दावी उघड चमत्कार । कलयुगी आवतार स्वामी माझा ।।४।।

१२८५९०

करोनी प्रार्थना सांगीतल्या रीती । आणुनी देतो पती स्वामी म्हणे ।।१।।
वीप्रकांता गेली श्नानालागी जाण । घेतले मागुन क्रीष्णेलागी ।।२।।
हाकारोनी थोर मागोनीया घेती । सांगीतले रीती स्वामीनी जे ।।३।।
दास म्हणे आले आपुल्या बीराडासी । सांगती सर्वासी मात ऐसी ।।४।।

१२८५९१

पठाणीची गर्दी बहुत ते जाण । टाकीले मारुन जमीदार ।।१।।
द्रव्य दील्यावरी सुटका ते जाण । नाहीतरी मरण न चुकेची ।।२।।
तेथे चमत्कार दावी चीदंबर । नीरोप सत्वर दील्हा तेणे ।।३।।
दास म्हणे आला सुखरुप घरासी । नवल बहुतासी आश्चर्य ते ।।४।।

१२८५९२

येवोनीया सांगे घरीच्या कुटुंबासी । न कळे कळा कैसी देवाजीची ।।१।।
द्रव्य दील्यावीण न वाचला कोन्ही । देखीले नयनी बहुतासी ।।२।।
आम्हालागी बळे बोलावोनी जाण । नीरोप देउन वाटे लावी ।।३।।
दास म्हणे दावी कौतुक ईश्वर । प्रगट चीदंबर सर्वालागी ।।४।।

१२८५९३

सुत्रधारी आसे धणी चीदंबर । सर्व चराचर वर्तवीतो ।।१।।
सत्येवीण त्याचे न हाले ते पान । बोलवीतो जाण सर्वालागी ।।२।।
उघड दावीतसे कळा जानालागी । मागे यगायुगी नायकीले ।।३।।
दास म्हणे करी लीला चीदंबर । सर्व चराचर वर्तवीता ।।४।।

१२८५९४

प्रगट हे सत्ता दावीतसे जाण । पाहाती थोर लाहान नरनारी ।।१।।
लक्षावत यात्रा आसे येत जात । प्रत्यय दावीत सर्वालागी ।।२।।
नीत्य नवी लीला करी चीदंबर । नलगे अंतपार देवादीका ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय द्रीष्टीसी । आवतार श्रीष्टीसी चीदंबर ।।४।।

१२८५९५

दर्षणासी येती लाहानथोर कोन्ही । ईछा पुरवोनी नीरोप त्या ।।१।।
भुत भवीश सर्व दावीतो वर्तोनी । पाहती नयनी यात्राजन ।।२।।
महर्गता थोर पुढे आसे होणे । खातसे फुटाणे भाजोनीया ।।३।।
दास म्हणे दुसरे दीवसी चीदंबर । मीष्टान्न ते थोर यात्रेलागी ।।४।।

१२८५९६

तेची वर्षी पडीला दुष्काळ पै थोर । बहुत सव्हार जाला जनी ।।१।।
स्वामीकडे कोन्ही आली यात्रा जाण । वाचवीले प्राण ईश्वराने ।।२।।
ईश्वराची कळा न कळे कोणासी । आवतार श्रीष्टीसी चीदंबर ।।३।।
दास म्हणे स्वामी पतीतपावन । चीदंबर सगुण कलयुगी ।।४।।

१२८५९७

आलेती ब्राम्हण लक्षावत जाण । आणीक च्यारीवर्ण यात्रा दाटी ।।१।।
देतो म्हणे आन्न सर्व जीवालागी । तेची कीर्ती जगी प्रगटली ।।२।।
ईछा पुरवीत जैसा ज्याचा भाव । स्वामी सगुण देव चीदंबर ।।३।।
दास म्हणे धन्य भाग्याचे ते जन । देखीले चरण ईश्वराचे ।।४।।

१२८५९८

चरीत्र ११९

स्वामी होते क्रीष्णातीरी । यात्रा मीळाली ते भारी ।।१।।
सांगोल्याचा तो ब्राम्हण । देशपांड्या होता जाण ।।२।।
आवघ्या कुटुंबासहीत । स्वामी दर्षणासी येत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आला स्वामीचे समोर ।।४।।

१२८५९९

स्वामी म्हणती वीप्रासी । घ्यावा प्रसाद पंगतीसी ।।१।।
आवघ्या कुटुंबासी जाण । यावे भोजनालागुन ।।२।।
आज्ञा म्हणे त्या वेळेसी । आला आपुल्या बीराडासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नसे भक्ती त्या वीप्रास ।।४।।

१२८६००

ब्राम्हण आसे जमीदार । रजोगुणी वीप्र थोर ।।१।।
म्हणे जावे प्रसादासी । तीसरा प्रहर होईल त्यासी ।।२।।
भात करोनीया खावे । मग भोजनासी जावे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । देव दावी प्रत्यय त्यास ।।४।।

१२८६०१

कुटुंबासी म्हणती कोन्ही । जाणे प्रसादालागुनी ।।१।।
आम्ही न करु भोजन । लहानथोर येथे जाण ।।२।।
वीप्र म्हणे आम्हापुरता । भात करोनी द्यावा आता ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उघड दावी चमत्कार ।।४।।

१२८६०२

तांदुळ घॆवोनी आदसॊर । वीप्र म्हणॆ मी सकुमार ।।१।।
भुक न नीघे मजसी । भात करुन द्या वॆगीसी ।।२।।
भात करुनी वरचॆवर । तॊथॆ होईल तीन प्रहर ।।३।।
दास म्हणॆ चीदंबर । भात टॆवी चुलीवर ।।४।।

१२८६०३

वीप्र श्नान करुणी जाण । बैसॆ सोवळा होउन ।।१।।
जाळ लावी तपॆलासी । भात न सीजॆ ठायासी ।।२।।
म्हणॆ तांदुळ आदसॊर । मोळ्या जाळी दोनच्यार ।।३।।
चीदंबर दास म्हणॆ । भात न सीजॆ तो जाण ।।४।।

१२८६०४

नवल करीतो ब्राम्हण । भात हीरवाची जाण ।।१।।
यजमानासी ब्राम्हण । सांगॆ स्वयपाकी यॆउन ।।२।।
भात न सीजॆ मजसी । काय उपाय तयासी ।।३।।
म्हणॆ चीदंबर दास । रागॆ सांगॆ ब्राम्हणास ।।४।।

१२८६०५

रागे भरे स्वयपाक्यासी । भात न सीजे म्हणसी ।।१।।
बोलसी का मुर्खपणे । काय भाताचे सीजणे ।।२।।
कैसा न सीजे तो जाण । आधीक लावणे सर्पण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । मुर्ख बुधी वीप्रास ।।४।।

१२८६०६

मोळ्या लावी वरचेवर । जाळ लावीतसे थोर ।।१।।
चवदा मोळ्या ते जाळुन । भात हीरवाची जाण ।।२।।
जाला आसे तीसरा प्रहर । नवल करीती लाहान थोर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । प्रत्यय वाटला सर्वास ।।४।।

१२८६०७

वीप्र लाजोनीया मनी । म्हणे स्वामी करणी ।।१।।
आले बोलावया जाणा । वेगी चलावे भोजना ।।२।।
आला स्वामी सन्नीधान । स्वामी बोलती हासुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करी वीनोद तो थोर ।।४।।

१२८६०८

स्वामी म्हणती वीप्रासी । वेळ जाला स्वयपाकासी ।।१।।
तुम्ही सकुमार पाहे । भात खाउनी आला काये ।।२।।
वीप्र लाजुनीया फार । म्हणे मी आन्याई आपार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला धारी हा ईश्वर ।।४।।

१२८६०९

चरीत्र १२०

कन्यागतालागी क्रीष्णातीरी जाणा । गेले होते श्नाना चीदंबर ।।१।।
यात्रा दाटी फार आसे बरोबर । देती वरचेवर नीरोप त्यासी ।।२।।
नाना प्रकारीचे पुसावया जन । येत आसे जाण यात्रेलागी ।।३।।
दास म्हणे धणी चीदंबर सत्य । आवतार क्रत्य दावीतसे ।।४।।

१२८६१०

येका गावी होत्या दोघी वीप्रकांता । करीतात चींता भ्राताराची ।।१।।
येकीचा भ्रतार दोन वर्ष गेला । पुसावे स्वामीला चींता करी ।।२।।
येकीचा भ्रतार बारा वर्ष गेला । नींदीती तीजला वीप्र बहुत ।।३।।
दास म्हणे दोघी पुसावे स्वामीसी । चीदंबरापासी आल्या जाण ।।४।।

१२८६११

नींदीती बहुत जन ते येकीसी । केस का ठेवीसी म्हणोनीया ।।१।।
मीळोनीया गावीचे ब्राम्हण ते जाण । करावे वपन क्रीष्णातीरी ।।२।।
पुसोनी स्वामीसी कार्य हे करावे । दुजी ते स्वभावे बरोबरी ।।३।।
चीदंबर दास म्हणे स्वामीपासी । आले दरुषणासी मीळोनीया ।।४।।

१२८६१२

आले ते ब्राम्हण संगे वीप्रकांता । पुसावया वार्ता स्वामीलागी ।।१।।
पुसती स्वामीसी ब्राम्हण मीळोन । वीप्रकांता घेउन संगे जाण ।।२।।
गेला पती ईचा वर्ष जाले बारा । आज्ञा चीदंबरा द्यावी ईसी ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती तयासी । यावे नैवेद्यासी सांगतो मी ।।४।।

१२८६१३

यावे तीसर्या प्रहरा भोजनालागोनी । यात्रा हे मीळोनी सर्व तुम्ही ।।१।।
सर्वत्र मीळोनी आले भोजनासी । बैसले पंगतीसी यात्रादाटी ।।२।।
बारा वर्ष गेला होता जीचा पती । बैसली ते पंगती वीप्रकांता ।।३।।
दास म्हणे तेथे आले चीदंबर । यात्रा लाहान थोर पंगतीमाजी ।।४।।

१२८६१४

चीदंबर आलेॆ वीप्रकांतेॊपासी । कुंकु दील्हे तीसी लावावया ।।१।।
गावीची तेॊ वीप्र नवल करीती । स्वामी कैसी देॊती कुंकु तीसी ।।२।।
स्वामी म्हणती बाई कुंकु हे लावोनी । बैसावेॊ भोजनी दंपतेॊसी ।।३।।
दास म्हणेॊ यात्रा पाहाती सर्वजन । म्हणती नवल कोण स्वामी बोलेॊ ।।४।।

१२८६१५

बारावर्ष गेॊला होता तीचा पती । तोही तया पंगती आला आसेॊ ।।१।।
हात जोडोनीया बोलेॊ वीप्रकांता । स्वामी माझा भ्राता दंपत्य कोठे ।।२।।
स्वामी म्हणती बाई आला तुझा पती । बैसला त्या पंगती वोळखावा ।।३।।
दास म्हणेॊ स्वामी बोलवीती त्यासी । आला दरुषणासी वीप्र तेॊव्हा ।।४।।

१२८६१६

वोळखावेॊ कांता आपुली तेॊ जाण । वीनोद करुन हासती स्वामी ।।१।।
वीप्रकांता पाहे पतीलागी जाण । लज्जीत हासोन चरणी लागेॊ ।।२।।
वीप्र म्हणे स्वामी बरावर्ष जाली । भेटी बळेॊ केॊली भगवंता ।।३।।
दास म्हणेॊ दोघेॊ बैसवीलेॊ पंगती । आगाध हे कीर्ती वर्णीताती ।।४।।

१२८६१७

दोन वर्ष जाली होती ज्या वीप्रासी । त्याचीया कांतेसी सांगीतले ।।१।।
होते बरोबरी गावीचे ब्राम्हण । स्वामी त्यालागोन सांगताती ।।२।।
वपन करावे म्हणती ईचे आता । येईल तुमच्या चीता करा तैसे ।।३।।
दास म्हणे वीप्र आश्चर्य ते चीत्ती । चीदंबरा गती न कळे तुझी ।।४।।

१२८६१८

बारा वर्ष गेला होता तीचा पती । भेट तीजप्रती करुनी दील्ही ।।१।।
आनंदे राहीली पतीसहीत जाण । आठ वर्षे पुर्ण जाले तेथे ।।२।।
उभयता दोघे येती नीरोपासी । जावे ते गावासी म्हणती स्वामी ।।३।।
चीदंबर त्यासी आनंदे करुन । आज्ञा देती जाण दास म्हणे ।।४।।

१२८६१९

नीरोप घेउनी गेले आनंदेसी । चीदंबरे त्यासी क्रपा केली ।।१।।
आवतार लीला दावी चीदंबर । पाहाती लाहान थोर यात्राजन ।।२।।
धन्य चीदंबरा कळा आघटीत । करोनी दावीत वीचीत्र हे ।।३।।
दास म्हणे स्वामी आवतार पुर्ण । कलयुगी सगुण चीदंबर ।।४।।

१२८६२०

चरीत्र १२१

कन्यागती यात्रा दाटी । स्वामी होतो क्रष्णातटी ।।१।।
होतो कुटुंबसहीत । तया दावीती प्रचीत ।।२।।
कळा नाटकी ईश्वर । स्वामी माझा चीदंबर ।।३।।
दास म्हणे लीलाधारी । माया घाली जगावरी ।।४।।

१२८६२१

नीत्य दावीतो कौतुक । पाहाती यात्रा जन लोक ।।१।।
यात्रेमाजी नाना जन । उंचनीच थोरलाहान ।।२।।
सर्वालागी हे प्रचीत । दवीतसे मुर्तीमंत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । नीत्य दावी चमत्कार ।।४।।

१२८६२२

कळा करी नानापरी । चीदंबर लीलाधारी ।।१।।
लीला दावी अंग प्रती । आसे सर्वासी प्रचीती ।।२।।
परी जनासी हे भ्रांती । नीश्चय न होय तो चीत्ती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । माया याची हे दुर्धर ।।४।।

१२८६२३

दुर्धट मायेचा स्वभाव । कदा बैसो नेदी भाव ।।१।।
क्रपा करील हा देव । तरी बैसेल सद्भाव ।।२।।
कळा सर्व याचे हाती । बळे घालीतसे भ्रांती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सुत्रधारी हा ईश्वर ।।४।।

१२८६२४

देशोदेशीचे हे जन । येती दरुषणासी जाण ।।१।।
परी न कळे घरीत्यासी । कळा दावीतसे कैसी ।।२।।
म्हणे चीदंबर जाण । यात्रा दाटी माझे जन ।।३।।
दास म्हणे वीश्वपती । कळा दावी नानारीती ।।४।।

१२८६२५

कुटुंब घरीचे जीतुके । भ्रांतीमाजी हे तीतुके ।।१।।
कांता पुत्र ते सोयरे । भ्रांतीमाजी आसती सारे ।।२।।
कांता म्हणे माझापती । पुत्र पीताची मानीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । भ्रांती पडे या सर्वास ।।४।।

१२८६२६

वडील कांता हे स्वामीची । कटीण मर्जी बहुत तीची ।।१।।
रात्री होतो राहुटीत । सोज पलंग करीत ।।२।।
हाती धरुनी स्वामीप्रती । सोजेवरी बैसवीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी न बोले तीयोस ।।४।।

१२८६२७

बळे स्वामीलागी नेता । सोज द्रीष्टी पाहु जाता ।।१।।
तेथे बैसला भुजंग । पाहुनी कापतसे आंग ।।२।।
बळे माघाराते जाण । म्हणे कैसे आले वीन्घ ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी कौतुक ईश्वर ।।४।।

१२८६२८

म्हणे स्वामीलागी जाण । तुमची कळा जाणे कोण ।।१।।
स्वामीराया चीदंबरा । कळा नाटकी तु खरा ।।२।।
नाना दावीसी कौतुक । कळा तुझी आसे देख ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोले हासोनी ईश्वर ।।४।।

१२८६२९

स्वामी म्हणती कांतेसी । माझी गोष्टी नायकसी ।।१।।
होतो प्रत्यय तुजसी । परी भ्रांती तु धरीसी ।।२।।
सांगावे ते कोठवरी । आलो यात्रा क्रीष्णातीरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी सर्वेश्वर ।।४।।

१२८६३०

कांता नमस्कारी चरण । म्हणे दुर करा वीन्घ ।।१।।
स्वामी म्हणती पाहे बरे । नाम घेता वीन्घ सरे ।।२।।
पाहु जाता सेजेवरी । तेथे नसे सर्प तरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । यात्रेमाझी नवल थोर ।।४।।

१२८६३१

चरीत्र १२२

ब्राम्हण तो येक चीदंबरभक्त । माता ते वीरक्त बहुत त्याची ।।१।।
ब्राम्हणासी येत नीत्य सीतज्वर । गाव सावनुर आसे त्याचे ।।२।।
मास दोनमास येत सीतज्वर । नीघाला सत्वर दरुषणासी ।।३।।
दास म्हणे द्रीष्टी पाहीन चीदंबर । नीववीले आंतर येणे माझे ।।४।।

१२८६३२

ब्राम्हण तो देख सीतज्वरे करुन । जाला आसे क्षीण बहुत देहे ।।१।।
त्यावर हो जाला त्यासी माथेशुळ । होतसे व्याकुळ तेणे बहुत ।।२।।
न पडे चईन तळमळी बहुत । उपाय करीता नानापरी ।।३।।
दास म्हणे जाला नीश्चय तो येक । क्रपा करील देख चीदंबर ।।४।।

१२८६३३

नीघे दरुषणासी येतसे वाटेने । नीत्य आठवी जाणे चीदंबर ।।१।।
चीदंबरापासी आला मुरगोडासी । होते कॆंगेरीसी स्वामीराव ।।२।।
यात्रा दाटी बहुत दरुषणा लागुन । नव्हे वेगी जाण दरुषण ते ।।३।।
दास म्हणे स्वामी यादी लीहीवीती । वाचुन दावीती कारकुन ।।४।।

१२८६३४

यात्रा दाटी फार न होय दर्षण । बाहीर नीघोन येती स्वामी ।।१।।
वीच्यारोनी सर्व वर्तमान घरीचे । करीती यात्रेचे समाधान ।।२।।
सीधे देवोनीया नीरोप देताती । भोजनासी येती राहीले ते ।।३।।
दास म्हणे ऐसा वीश्वाचा जनक । दावीतो कौतुक चीदंबर ।।४।।

१२८६३५

आला तो ब्राम्हण सीतज्वर ज्यासी । माथेशुळ त्यासी बहुत होता ।।१।।
न पाहाता कोणी आला केंगेरीसी । अश्वथपारासी नीजेला तो ।।२।।
सीतज्वरेकरुन होतसे तळमळ । जाला माथेशुळ अधीक तेव्हा ।।३।।
दास म्हणे बहुत जाला कासावीस । आला आसे दीवस दोन प्रहर ।।४।।

१२८६३६

दीवस माध्यानेसी वीप्र कासावीसी । प्राण जाय ऐसी वेळ आली ।।१।।
ब्राम्हण ते सर्व गेले श्नानालागी । बोलवीती वेगी भोजनासी ।।२।।
वीप्र पडीलासे व्याकुळ तो प्राण । न बोले वचन काही येक ।।३।।
दास म्हणे आले चीदंबर तेथे । वीप्र होता जेथे तळमळीत ।।४।।

१२८६३७

येवोनीया स्वामी उभे वीप्राजवळी । जीव तळमळी ब्राम्हणाचा ।।१।।
सीतज्वर आंगी माथेशुळ भारी । नसे देह्यावरी काही येक ।।२।।
जवळी उभे स्वामी न कळती त्यासी । जीव कासावीसी आचेतन ।।३।।
दास म्हणे ऐसे देखोनी वीप्रासी । करुणा ईश्वरासी आली त्याची ।।४।।

१२८६३८

जवळी वीश्वंभर उभा चीदंबर । बोलवी उत्तर ब्राम्हणासी ।।१।।
कोण नीजेलासी येथे काय म्हणोनी । त्रोलोक्याचा धणी वीच्यारी तो ।।२।।
वीप्र नाम सांगे बाळपा म्हणोन । जातो माझा प्राण स्वामीराया ।।३।।
दास म्हणे बोले वीप्र कासावीसी । बुझावी तयासी चीदंबर ।।४।।

१२८६३९

म्हणे स्वामीलागी जातो आता प्राण । दावीले चरण स्वामीराया ।।१।।
न वाचे मी आता दुःख बहुत आसे । मस्तक जातसे फुटोनीया ।।२।।
करुणा चीदंबरा आली त्या वीप्राची । उत्तर क्रपेची बोले स्वामी ।।३।।
दास म्हणे बोले त्रैलोक्याचा नाथ । जवळी पाहात यात्रा जन ।।४।।

१२८६४०

स्वामी म्हणती त्यासी ऐसे बोलु नये । श्नान करुनी यावे भोजनासी ।।१।।
म्रीतीका घेउनी घाली तु कानात । यावे बा धावत श्नान करुनी ।।२।।
वीप्र कानामाजी घालीतो म्रीतीका । समाधान देखा त्याची वेळे ।।३।।
दास म्हणे बैसे उठोन झडकरी । चरण नमस्कारी साष्टांग तो ।।४।।

१२८६४१

उठोनीया जाय आनंदे श्नानासी । भोजन पंगतीसी करी सुखे ।।१।।
नवल करीती जवळील जन । स्वामीराया प्राण वाचवीला ।।२।।
आवतार चरीत्र दावी चीदंबर । पाहाती नारीनर यात्रा दाटी ।।३।।
दास म्हणे ऐसा त्रैलोक्याचा राणा । चीदंबर जाणा सगुण ब्रम्ह ।।४।।

१२८६४२

चरीत्र १२३

लीला दावी चीदंबर । कलयुगी आवतार ।।१।।
नागेंद्रगडाचा ब्राम्हण । नसे पोटी ते संतान ।।२।।
चींताग्रहस्त बहुत चीत्ती । न कळे ईश्वराची गती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्र करी तो वीच्यार ।।४।।

१२८६४३

काय प्रारब्धाची गती । वौषद्रीधी कैसी होती ।।१।।
कांता करीतसे चींता । पावे मज भगवंता ।।२।।
करी पतीसी वीनंती । उपाय करावे ते कीती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सदा चीत्ती ते उदास ।।४।।

१२८६४४

वीप्र करी तो वीच्यार । म्हणे देव कोण थोर ।।१।।
कलयुगी आवतार । जाला म्हणती चीदंबर ।।२।।
जावे त्याचीया दर्षणा । करावी स्वामीसी प्रार्थना ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्रा लागलासे ध्यास ।।४।।

१२८६४५

पुसे कांतेलागी जाण । पाहावे स्वामीचे चरण ।।१।।
कार्य बहुताचे होती । वाढे वांजेची संतती ।।२।।
आयकोनी बहुत कीर्ती । म्हणे जावे स्वामीप्रती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र नीघे दरुषणास ।।४।।

१२८६४६

वाटे येतसे ब्राम्हण । चीती वीच्यारी तो जाण ।।१।।
यात्रा बहुतची दाटी । कैसी होईल माझी भेटी ।।२।।
चीदंबर आवतार । माझे जाणेल आंतर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आला स्वामीचे गावास ।।४।।

१२८६४७

वीप्र आला दरुषणासी । स्वामी बोलावीती त्यासी ।।१।।
घाली साष्टांग नमन । उभा कर तो जोडुन ।।२।।
स्वामी म्हणती वीप्रासी । काय मागणे तुजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आले भाग्य उदयास ।।४।।

१२८६४८

स्वामी म्हणती ब्राम्हणा । काय ईछा तुझ्या मना ।।१।।
वीप्र करीतो वीनंती । नसे पोटी ते संतती ।।२।।
वौंषव्रीधी करी आता । चीदंबरा प्राणनाथा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्रा सांगती उत्तर ।।४।।

१२८६४९

स्वामी पुसती वीप्रासी । तुझ्या घरी आहे तुळसी ।।१।।
वीप्र म्हणे जन्माहुन । दारी नसे व्रंदावन ।।२।।
स्वामी म्हणताती जाण । आता करी व्रंदावन ।।३।।
वरी लावावी तुळस । म्हणे चीदंबर दास ।।४।।

१२८६५०

स्वामी म्हणती वीप्रासी । घरी लावावी तुळसी ।।१।।
कुळस्वामी तुझा जाण । तेथ करावी स्थापन ।।२।।
पुजा करी येक्याभावे । पुत्र होईल जाणावे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आज्ञा म्हणे तो स्वामीस ।।४।।

१२८६५१

होईल पुत्र ते संतती । नांव ठेवी त्याजप्रती ।।१।।
नाम कुळ ते स्वामीचे । तेची ठेवावे पुत्राचे ।।२।।
श्रीशैल्य नाम जाण । ठेवी पुत्राते लागुन ।।३।।
वौंषव्रीधी होती फार । दास म्हणे चीदंबर ।।४।।

१२८६५२

आज्ञेप्रामाणे ब्राम्हण । करी वर्तणुक जाण ।।१।।
तीघे पुत्र जाले त्यासी । कन्या येक ते कुळासी ।।२।।
वीप्र म्हणे चीदंबरा । धन्य स्वामी परात्परा ।।३।।
करी चीदंबर ध्यान । वीप्र पाहु आला चरण ।।४।।
ईछा पुरवीली ईश्वरा । दासाचीया प्रीयकरा ।।५।।

१२८६५३

चीदंबरा दावी प्रत्यय सर्वासी । भ्रांती मानवासी उमजेना ।।१।।
नीत्य नवी स्वामी दावीतसे कळा । पाहाताती डोळा लहानथोर ।।२।।
घरीचे दारीचे पाहाती सर्वजन । चुकवी नाना वीन्ध चीदंबर ।।३।।
दास म्हणे दावी उघड प्रत्यय । चीदंबर माय आनथासी ।।४।।

१२८६५४

गुर्लहोसुरात होते चीदंबर । लीला हे आपार दावीतसे ।।१।।
नीत्य नवी येती यात्रा बहुत । दाटी भक्तालागी भेटी आनंदेसी ।।२।।
नुतन ते गाव वस्ती ब्राम्हपुरी । कीर्ती दुरवरी फाकली ते ।।३।।
दास म्हणे येती तेथे थोर थोर । बांदीताती घर वाडे नवे ।।४।।

१२८६५५

बळे येवोनीया आज्ञा ते मागती । चरणपासी वस्ती राहाणे होये ।।१।।
घर बांदोनीया येती राहावया । भाग्य ते उदया आले म्हणती ।।२।।
करीती वीनंती बळे ते स्वामीसी । जागा चरणापासी द्यावी आम्हा ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणती तयासी । घरे आनंदेसी बांधावे ते ।।४।।

१२८६५६

करीती प्रार्थना यात्रेचे हे जन । उघडीले प्राक्तन म्हणती आता ।।१।।
मृत्यलोकी जागा दील्ही चरणापासी । आखंड कैलासी वस्ती पुढे ।।२।।
पुर्वजासहीत राहाणे कैलासी । जागा चरणापासी देता येथे ।।३।।
दास म्हणे ज्याचे गुर्लहोसुरी । कैलास हे पुरी त्यासी बा ।।४।।

१२८६५७

गर्लहोसुरी घर करीती जतन । कैलास वतन पुर्वजाचे ।।१।।
राहाणे ज्याचे जाले स्वामी चरणापासी । कैलास मीरासी आक्षई ते ।।२।।
चरणाची आस्त चुकती भवपाश । पद आवीनाष आक्षई ते ।।३।।
दास म्हणे धणी कैवारी नांदत । स्वामी सर्वगत चीदंबर ।।४।।

१२८६५८

आवतार जाला मुरगोडपुरासी । राहाती कुटुंबासी स्वामी तेथे ।।१।।
पुत्र सुना नाती येथेची राहाती । स्वामी बहुतारीती गुर्लहोसुरी ।।२।।
येके दीवसी स्वामी उठोनी आकस्मात । मुरगोडासी येत न कळे कोन्हा ।।३।।
दास म्हणे वडील पुत्र दीवाकर । बांधीयले थोर वाडा तेणे ।।४।।

१२८६५९

जेस्टते पुत्रासी कन्या दोघीजणी । रमाका लाहानी दो वर्षाची ।।१।।
शेषवा बहीण होती माडीवर । तीचे कडीवर कन्या होती ।।२।।
दो वर्षाची कन्या खाली उतरोन । खेळतसे जाण माडीवर ।।३।।
तेची वेळे स्वामी आले गावीहुन । सोप्यात येउन उभे राहाती ।।४।।
दास म्हणे दावी प्रत्यये ईश्वर । आले चीदंबर धावोनीया ।।५।।

१२८६६०

स्वामी उभे होते क्षण नाही जाली । बाळ पडे खाली माडीवरुनी ।।१।।
दो वर्षाचे बाळ पडले माडीवरुन । फरसबंदी जाण जौकामाजी ।।२।।
पडता कन्या खाली जाली आचेतन । घेतले स्वामीन कडेवरी ।।३।।
दास म्हणे जाली येकची आरोळी । भवताली मंडळी होती जाण ।।४।।

१२८६६१

मीळाले मनुश्य जाले ते चकीत । धावोनीया येत येमुनाबाई ।।१।।
वडील ते सुन तीची कन्या आसे । धावोनी येतसे स्वामीपुढे ।।२।।
स्वामी म्हणती तीसी चींता करु नये । कडीवरी आहे बाळ माझ्या ।।३।।
दास म्हणे माता बाळाकडे पाहे । बाळ हासताहे आनंदेसी ।।४।।

१२८६६२

नवल करी माता कैसे हे वाचले । स्वामीनी दावीले कौतुक हा ।।१।।
स्वामी म्हणती बाई याचीलागी जाण । आलो मी घावोन बाळासाठी ।।२।।
सांभाळी हे बाळ चुकवीला काळ । करीतो सांभाळ ईश्वर हा ।।३।।
दास म्हणे नवल करतसे सुन । ईश्वर आपण तुम्हीच स्वामी ।।४।।

१२८६६३

भ्रांती आम्हालागी बहुत ईश्वरा । स्वामी चीदंबरा दुर करी ।।१।।
ईश्वर साक्षात सगुण आम्हापासी । भ्रांती हे मनासी काढी देवा ।।२।।
क्षणभरी चीत्ती होतसे वीवेक । पाहोनी कौतुक स्वामीराया ।।३।।
दास म्हणे स्वामी पुर्ण आवतार । सगुण चीदंबर लीला दावी ।।४।।

१२८६६४

चरीत्र १२५

चीदंबर आवतार । कळी आनंत आपार ।।१।।
उघड दावीतसे डोळा । प्रत्यय येतसे सकळा ।।२।।
तरी भ्रांती हे मनासी । न कळे जीव आज्ञानासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । परब्रम्ह आवतार ।।४।।

१२८६६५

यात्रा येती देशोदेसी । दावी प्रत्यय सर्वासी ।।१।।
ब्राम्हण आला दरुषणासी । यात्रेलागी कुटुंबासी ।।२।।
काही दीवस स्वामीपासी । नीत्य येत दरुषणासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । भेटे सगुण हा ईश्वर ।।४।।

१२८६६६

वीप्र आला माहाव्दारी । कुटुंबासी बरोबरी ।।१।।
सर्वालागी बोलावीले । चीदंबर बाहीर आले ।।२।।
चौकामाजी स्वामी जाण । उभे भींतीसी येउन ।।३।।
वीप्रमेळा बहुत जाण । दाटी दर्षणालागुन ।।४।।
दास म्हणे चीदंबर । उभा राहीला ईश्वर ।।५।।

१२८६६७

स्त्रीया पुरुष ब्राम्हण । उभे साष्टांग नमोन ।।१।।
वीप्र उभा तो खांबासी । पडीला मुर्च्छा आली त्यासी ।।२।।
भोवंड येता खाली पडीला । वीप्र आचेतन जाला ।।३।।
दास म्हणे चीदंबर । यात्रा करवी बाहीर ।।४।।

१२८६६८

वीप्रकांता आक्रंदती । स्वामी तीसी बुझावीती ।।१।।
ब्राम्हण तडफडोनी जाण । गेला प्राण तो नीघोन ।।२।।
चीदंबर त्वरा करी । यात्रा घातली बाहेरी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । मनुश्य न राहे चौकास ।।४।।

१२८६६९

येक शेणवी ब्राम्हण । तेथे राहीला लपोन ।।१।।
कडी घातली व्दारासी । वाट न फुटे तयासी ।।२।।
पाहे शेनवी लपोन । चीत्ती भयभीत जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पाहे कौतुक द्रीष्टीस ।।४।।

१२८६७०

व्दारे घातली आवघी । चौकामाजी कोन्ही नाही ।।१।।
आतील चौकामाजी जाण । व्दार घेतले वोडुन ।।२।।
घरीचे राहीले घरांत । कोन्ही न दीसी चौकात ।।३।।
दास म्हणे जवळी आले । वीप्रापासी उभे ठेले ।।४।।

१२८६७१

कांता वीप्राची जवळ । शोकें करी तळमळ ।।१।।
स्वामी म्हणती तीयेंसी । बाई काय जालें यासी ।।२।।
दास म्हणे चीदंबरा । दावी कौतुक ईश्वर ।।३।।
१२८६७२

वीप्रकांतेलागी म्हणती । सावध करी तुझा पती ।।१।।
गुंडी स्वामीचे हातात । पाणी घातलें मुखात ।।२।।
वीप्रकांतेसी सांगती । पाणी लावी नेत्राप्रती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी हाका मारी त्यास ।।४।।
१२८६७३

नेत्र उघडी ब्राम्हण । स्वामी हाकारीता जाण ।।१।।
स्वामी म्हणती वीप्रास । आपा उठोनीया बैस ।।२।।
सावध होवोनी ब्राम्हण । वंदी स्वामीचे चरण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी कौतुक ईश्वर ।।४।।
१२८६७४

वीप्र उटोनी उभा केला । बळे पुढे बोलावीला ।।१।।
वीप्रकांता जवळी होती । स्वामी म्हणती धरी हाती ।।२।।
हाती धरोनी तीयेने । दील्हा नीरोप स्वामीने ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आली घेउनी बीर्हाडास ।।४।।

१२८६७५

व्दार उघडील्यावरी । यात्रा उभी ते बाहेरी ।।१।।
आंतील व्दार उघडीले । पाणीक्यासी बोलावीले ।।२।।
वीप्र पडीला होता जेथे । जागा सारवीली तेथे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२८६७६

होता शेणवी लपुन । तेणे पाहीले द्रीष्टीने ।।१।।
कळले सर्वही यात्रेसी । उठवीले ब्राम्हणासी ।।२।।
दोघा चौघानी देखीले । कौतुक स्वामीनी दावीले ।।३।।
वीप्रकांता सांगे जाण । पती उठवीला स्वामीन ।।४।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।५।।

१२८६७७

चरीत्र १२६

चीदंबर दावी कळा नानापरी । नीववी आंतरी ध्यान करीता ।।१।।
वैदीक ब्राम्हण दंपत्य तो जाण । घेतला ठेउन स्वामीरायें ।।२।।
भक्तराज थोर पंडीत तो ज्ञानी । पतीव्रता जनी कांता त्याची ।।३।।
दास म्हणे नीत्य आनुष्टान करीत । होता कोंकणस्त ब्राम्हण तो ।।४।।
१२८६७८

वीप्र भक्तराज सात्वीक पै थोर । आच्यार वीच्यार बहुत त्याचा ।।१।।
स्त्री पुरष दोघे शुध सत्वभक्ती । क्रपा त्यासी करीती बहुत स्वामी ।।२।।
पंचेरत्न गीता नीत्य पारायण । वीत्पन्न ब्राम्हण समर्थ तो ।।३।।
दास म्हणे नीष्टा चीदंबर चरणी । भाव आंतकरणी शुत्ध ज्याचा ।।४।।
१२८६७९

सत्तरी बर्षाचा ब्राम्हण तो जाण । साठी वर्ष जाण कांतेलागी ।।१।।
शुत्ध आचरण पतीव्रता धर्म । चीदंबर वर्म जाणे त्याचे ।।२।।
नीत्य दर्षणासी येती स्वामीपासी । स्वामी क्रपा त्यासी करीती फार ।।३।।
दास म्हणे देती सीधा उभयतासी । होते स्वामीपासी बारा वर्ष ।।४।।
१२८६८०

व्रध तो ब्राम्हण जर्जर बहुत । सीतज्वर येत शन्मास त्या ।।१।।
आवस्ता कठीण जाली येके दीवसी । जीव कासावीसी होउ लागे ।।२।।
मास दोन मास न चाले ते आन्न । कंठी उरला प्राण व्याकुळ तो ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । कांतेलागी खुण सांगतसे ।।४।।

१२८९८१

वीप्र कांतेलागी सांगे गुह्य गोष्टी । आवस्था सेवटी समय आला ।।१।।
जन्मपत्रीकेची खुणे ते पाहुन । वर्ष जाली पुर्ण आयुष्याची ।।२।।
कांता म्हणे मज येणे बरोबर । ठावा तो नीर्धार स्वामी तुम्हा ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । समय उरला जाण प्रहर येक ।।४।।

१२८६८२

सांगे कांतेलागी जावे दर्षणासी । नीरोप स्वामीसी घेउनी यावे ।।१।।
पोथ्या जवळी होय गीता पंचरत्न । देव पांच्यायतन घेउन यावे ।।२।।
ठेवी स्वामीपासी देतील ब्राम्हणासी । बरोबरी येसी आज्ञा माझी ।।३।।
चीदंबर दास म्हणे तो ब्राम्हण । सांगे वर्तमान कांतेलागी ।।४।।

१२८६८३

म्हणे कांतेलागी वेगी जावे जाण । साष्टांग नमन सांगे माझे ।।१।।
बोलोनीया ऐसे जाला आचेतन । वाचा खुंटुन राहीलीसे ।।२।।
स्वास बंद जाला झाकोनी ठेवीला । नीधे दर्षणाला वीप्रकांता ।।३।।
चीदंबर दास म्हणे वीप्रकांता । पोथ्या घेउनी हाता आली ।।४।।

१२८६८४

ठेउनी स्वामीपुढे पोथ्या पाचांईतन । साष्टांग नमन करीतसे ।।१।।
सांगे स्वामीलागी सर्व वर्तमान । नीरोप तो जाण द्यावा वेगी ।।२।।
कन्या पुत्र नसे मज ते संतान । घेते सहगमन पतीसंगे ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर जाण । ठेवीले आणुन कुंकु पुढे ।।४।।

१२८६८५

बोले चीदंबर वीप्रकांतेलागी । पोथ्या देव वेगी घेउनी जावे ।।१।।
गणेश भटालागी सांगे वर्तमान । आसे बा कल्याण तुज आता ।।२।।
पतीव्रता बाई होसी तु बहुत । राहावे सेवेत भ्राताराच्या ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर जाण । घाली भात करुन वेगी जाण ।।४।।

१२८६८६

कुंकु लावोनीया स्वामीसी नमीत । वीप्रकांता येत घरासी ।।१।।
पाहे पतीलागी वस्त्र ते काढुन । डोळे उघडुन वीप्र पाहे ।।२।।
म्हणे कांतेलागी लागलीसे भुक । भात करी देख वेगी आता ।।३।।
हर्षयुक्त कांता भात वेगी करी । भोजन पोटभरी केले तेणे ।।४।।
दास म्हणे पुसे कांतेलागी जाण । काय ते स्वामीन सांगीतले ।।५।।

१२८६८७

सांगे आनंदेसी कांता वर्तमान । जाले ते प्रसन्न चीदंबर ।।१।।
बारा वर्ष जाण राहाणे आसे पुर्ण । सांगीतली खुण स्वामीनी ते ।।२।।
वीप्र म्हणे पुर्णब्रम्ह आवतार । कळा चीदंबर दावी आपुली ।।३।।
वीप्र जाला नीट आला आठा दीवसी । स्वामी चरणापासी भेठावया ।।४।।
दास म्हणे ऐसा आनंत आपार । सगुण चीदंबर देखीयला ।।५।।

१२८६८८

चरीत्र १२७

चीदंबर आवतार । दावी बोलुन प्रखर ।।१।।
आज्ञा ऐकताची जाण । तया होतसे प्रसन्न ।।२।।
लीहीले लेख तो चुकवी । ऐसे बोलोनीया दावी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सांगे आपुल्या भक्तास ।।४।।

१२८६८९

वीप्र भक्त होता जाण । केली आज्ञा उल्लंघन ।।१।।
त्यासी सांगीतले होते । पुत्रालागी आणी येथे ।।२।।
तेणे नायकीले जाण । त्याचा पुत्र गेला मरुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सांगे ब्राम्हण स्वामीस ।।४।।

१२८६९०

ब्राम्हण भक्तराज पुर्ण । सांगे स्वामीलागी जाण ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । नायकीले वीन्घ त्यासी ।।२।।
पुत्र येथे तो आणीता । तरी नीश्चये वाचता ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र बोले तो स्वामीस ।।४।।

१२८६९१

करी स्वामीसी वीनंती । जाल्या आयुष भरती ।।१।।
येथे आणोनी काय होते । कैसे बाळ तें वाचते ।।२।।
स्वामी धीक्कारीती त्यासी । धड्डा न कळे तुजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी बोलोनी प्रखर ।।४।।

१२८६९२

आवतार येता जाण । आलो ब्रम्ह्यासी पुसुन ।।१।।
तुझे लीहीले मोडीन । आपुली सता चालवीन ।।२।।
ब्रम्हा म्हणे हे करणे । परी आवतारा जाणे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । संकट होते ब्रम्हयास ।।४।।

१२८६९३

दावी भात्कासी प्रत्यय । दुसरे दीवसी स्वामी पाहे ।।१।।
भक्त आला येक जाण । आसे भावीक ब्राम्हण ।।२।।
त्याच्या पुत्रालागी जाण । बहुत नव्हते समाधान ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नीत्य वीनवी स्वामीस ।।४।।

१२८६९४

वीप्र करीतो प्रार्थना । स्वामी पतीतपावन ।।१।।
माझी येउ दे करुणा । स्वामी क्रपेच्या नीधाना ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । चींता न करी मानसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । क्रपा आपुल्या भक्तास ।।४।।

१२८६९५

बहुत मुल कष्टी जाण । सांगे स्वामीसी येउन ।।१।।
स्वामी म्हणती जावे घरी । नीश्चय आसो दे आंतरी ।।२।।
गेला घरासी ब्राम्हण । मुल बहुत आचेतन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आठवी स्वामीच्या पायास ।।४।।

१२८६९६

चींता करीतो ब्राम्हण । गेला पुत्राचा तो प्राण ।।१।।
सांगे स्वामीसी येउन । ऐसे जाले वर्तमान ।।२।।
स्वामी म्हणती जावे घरी । चीठी टाकीली माघारी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८६९७

आज्ञाधारक ब्राम्हण । करी साष्टांग नमन ।।१।।
चीदंबर बोले जाण । तुज दील्हे पुत्रदान ।।२।।
काळ फीरवीला माघारा । सुखे जावे आपुल्या घरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोले प्रगट ईश्वर ।।४।।

१२८६९७

वीप्र घरी येता जाण । पुत्र बैसला उठोन ।।१।।
जाला आनंद सर्वासी । धन्य चीदंबरा होसी ।।२।।
मुर्तीमंत आवतार । कळा तुझी हे आपार ।।३।।
आनंदे करुनी ब्राम्हण । स्वामीपुढे लोटांगण ।।४।।
पुर्णब्रम्ह आवतारा । स्वामीराया चीदंबरा ।।५।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन आवतार ।।६।।

१२८६९९

चरीत्र १२८

चीदंबर आसे क्रपेचा सागर । आनंत आपार कळा ज्याची ।।१।।
न कळे ज्याचा अंत ब्रम्हादीकालागी । आवतारा कलयुगी आला तोची ।।२।।
करीताची धावा पावे तो संकटी । भक्तालागी भेटी देत आसे ।।३।।
दास म्हणे आसे करुणेची माता । ब्रम्हांड नीर्मीता आनंत तो ।।४।।

१२८७००

आनंतब्रम्हांडी सत्ता ज्याची आसे । तोची रक्षीतसे सर्वालागी ।।१।।
सहजस्तीती राहाणे न कळे कोन्हा अंत । कळा हे आनंत दावीतसे ।।२।।
जाला सगुण मुर्ती कलयुगी ईश्वर । नाना चमत्कार दावी नीत्य ।।३।।
दास म्हणे त्याची कळा हे आपार । द्रीष्टीसी गोचर दावी जना ।।४।।

१२८७०१

यात्रेलागी आणवी बहुत उचापत । सीधे आसे देत सर्वलागी ।।१।।
महीना पंधरा दीवस होते उचापत । मागावया येत पैका वाणी ।।२।।
स्वामी त्यासी सांगे देतो मी आणोन । जवळी नसे जाण पैका काही ।।३।।
दास म्हणे दावी लीला चीदंबर । द्रीष्टीसी गोचर पाहाती जन ।।४।।

१२८७०२

जवळील ब्राम्हण बोलावीला जाण । त्यासी सांगे खुण जाग्याची ते ।।१।।
देव पुजेलागी बैसतसे जेथे । कोनायात तेथे पैका आसे ।।२।।
सेवेचा ब्राम्हण पाहु जाय तेथे । होन ते आईते ठेवीलेती ।।३।।
दास म्हणे आणी मुष्टी भरोनी होन । स्वामीपासी जाण देत आसे ।।४।।

१२८७०३

मोजोनीया देत वाणीयाचे हाती । जाली उचापती कीती म्हणती ।।१।।
हीसेब करोनी वाणी पाहु जाती । पैका दील्हा हाती तीतुकाची ।।२।।
आश्चर्य करीती नवल चीत्तासी । न कळे गती कैसी ईश्वराची ।।३।।
दास म्हणे स्वामी पुसे ब्राम्हणासी । पैका त्या ठायासी होता कीती ।।४।।

१२८७०४

बोले तो ब्राम्हण बहुत आसती होन । द्रव्याची ते जाण रासी आसे ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी दावी मजलागी । उठोनीया वेगी येती तेथे ।।२।।
वीप्रालागी म्हणती कोठे द्रव्य दावी । पाहु जाता काही न दीसे त्यासी ।।३।।
दास म्हणे करी नवल चीत्तासी । कोठे गेले रासी द्रव्याची ते ।।४।।

१२८७०५

वीप्र चीत्ती करी आश्चर्य ते जाण । न कळे महीमान स्वामीचे ते ।।१।।
प्राःतकाळी वीप्र म्हणे म्या झाडीले । द्रव्य न देखीले तया ठाई ।।२।।
त्यावरी स्वामीनी पाटवीले जाण । दावीयले होन त्याची ठाई ।।३।।
दास म्हणे लीला दावी वीश्वंभर । प्रगट चीदंबर सर्वालागी ।।४।।

१२८७०६

आनंत आपार दावीतसे कळा । ब्रम्हीचा पुतळा स्वामी माझा ।।१।।
पाहाती लाहानथोर द्रीष्टी नारीनर । प्रगट चीदंबर कळा दावी ।।२।।
माय आघटीत ईश्वराची जाण । भ्रांतीमाजी मन राहातसे ।।३।।
दास म्हणे करी तो क्रपा जयासी । प्रगट दीसे त्यासी चीदंबर ।।४।।

१२८७०७

वीश्वाचा जनक ब्रम्हांडनायक । दावीतो कौतुक भक्तालागी ।।१।।
करुणेची माता बाळालागी जैसी । क्रपा करी तैसी भक्तालागी ।।२।।
आनाथाची माय आसे चीदंबर । पतीत उत्धार करीतसे ।।३।।
दास म्हणे आसे क्रपावंत धणी । उघड नयनी सगुण देव ।।४।।

१२८७०८

आनाथाच्या नाथा स्वामी तु समर्था । चींतीलीया आर्था पुरवीता ।।१।।
चीदंबरराया न करी बा वेळ । लागली तळमळ बहुत आता ।।२।।
दील्हे आभयदान नानापरी देवा । वेळ सदासीवा लावीसी का ।।३।।
दास म्हणे होसी माता मजलागी । चीदंबरा वेगी पावे आता ।।४।।

१२८७०९

पांडुरंग भेटी करवोनी आपण । उत्तरेसी जाण चालवीले ।।१।।
परी चीदंबरा कीती अंत घेसी । चीत्ती लाजवीसी कोठवरी ।।२।।
ब्रीद करी जतन चीदंबरराया । येउ द्यावी दया आनाथाची ।।३।।
पांडुरंगापासी येवोनी आपण । भ्रांतीमाजी जन ठेवीयले ।।४।।
चीदंबर दावी प्रत्यय जनासी । दास पतीतासी पावन तु ।।५।।

१२८७१०

चरीत्र १२९

चीदंबरा क्रपाघना । दावी रुप तु सगुणा ।।१।।
होसी पतीतपावन । ब्रीद करावे जतन ।।२।।
आंत घेसी कोठवरी । दया येउ दे आंतरी ।।३।।
दासाचीया प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२८७११

आडलीया दीन कोन्ही । धावा करीता नीर्वाणी ।।१।।
त्यासी संकटी पावसी । ब्रीद आपुले रक्षीसी ।।२।।
मजवीसी कायजाले । पावन ब्रीद कोठे गेले ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । दया येउ दे ईश्वरा ।।४।।

१२८७१२

मी तो पतीत पामर । तुम्ही केला आंगीकार ।।१।।
आता का हो उपेक्षीसी । ब्रीदावळी राहे कैसी ।।२।।
बळे येवोनी स्वप्नासी । नाना प्रत्यय दावीसी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । काय जाले या वेळेस ।।४।।

१२८७१३

तुझी सत्ता आघटीत । देवादीका न कळे अंत ।।१।।
बळे मुर्ती तु करवीसी । माझा कैवारी म्हणवीसी ।।२।।
नाना देवोनी वचन । का हो जालासी कठीण ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । बट्टा न लावी ब्रीदास ।।४।।

१२८७१४

प्रीतीकेचे सोने करीसी । वेगी कीर्ती वाढवीसी ।।१।।
आपुले भक्त तु म्हणसी । तया मारीसी उपवासी ।।२।।
सामर्थे हे कोठे गेले । याची वेळे काय जाले ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । तुझे पाई माझी आस ।।४।।

१२८७१५

दीनालागी पावलासी । स्वप्नी प्रगट जालासी ।।१।।
तुझी आगाध हे कळा । द्रीष्टी दावीली सकळा ।।२।।
मागु जाता तुज कोन्ही । देसी स्वप्नी तु आणोनी ।।३।।
चीदंबर म्हणे दास । मज का केले उदास ।।४।।

१२८७१६

धावा केला दुरदेसी । संकट तुझीया भक्तासी ।।१।।
तेथे धाउनी गेलासी । भक्ता आपुल्या रक्षीसी ।।२।।
उघड बोलोनी दावीसी । सकळ लाहानथोरासी ।।३।।
चीदंबर दास म्हणे । कोठवरी हे सांगणे ।।४।।

१२८७१७

जवळी सेवेसी ब्राम्हण । त्याची कुटुंब आणुन ।।१।।
ठेवीयले आपणापासी । दील्हे घर ते राह्यासी ।।२।।
कांता त्याची गरोदर । प्रसुत काळी व्यथा फार ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कौतुक दावीसी ईश्वरा ।।४।।

१२८७१८

बाळांतीण वीप्रकांता । बहुत कठीण आवस्ता ।।१।।
वीप्र सांगे तो येउन । जाय बाईकोचा प्राण ।।२।।
आवस्ता कठीण ते जाली । बाजेखाली उतरली ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । सत्ता आघटीत ईश्वरा ।।४।।

१२८७१९

वीप्रकांता आचेतन । थंड जाले करजरण ।।१।।
रडे ब्राम्हण येउन । स्वामीपासी उभा जाण ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । चींता न करी मानसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कौतुक दावीसी ईश्वरा ।।४।।

१२८७२०

वीप्र म्हणे स्वामी जाण । कांता जाली आचेतन ।।१।।
चीदंबर म्हणे त्यासी । मागे फीरवीतो काळासी ।।२।।
चीठी टाकीले माघारा । सुखे जावे आपुल्या घरा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । गेला वीप्र तो घरास ।।४।।

१२८७२१

कांता सावध होवोनी । बैसे उठोनी आंथरुणी ।।१।।
धन्य म्हणे चीदंबरा । काळ फीरवीला माघारा ।।२।।
वीप्रकांता उठवीली । कळा आपुली दावीली ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आनंद वीप्रलागी थोर ।।४।।

१२८७२२

चरीत्र १३०

चीदंबरा होसी माय दीनालागी । आवतार कलयुगी प्रगट तुझा ।।१।।
येउ दे करुणा मज आनाथाची । लज्या हे ब्रीदाची रक्षी आता ।।२।।
नये वेळ करु कीती धीर धरु । आज्ञान लेकरु बाळ तुझे ।।३।।
दास म्हणे माता होसी तु आनंता । स्वामी क्रपावंता चीदंबरा ।।४।।
१२८७२३

यावे बा आनंता पावे मज आता । वेळ भगवंता लाउ नये ।।१।।
कंठी उरला प्राण करीतो स्मरण । जालासी कठीण काय म्हणोनी ।।२।।
कीती आंत घेसी वेळ का लावीसी । दया तुज कैसी न ये माझी ।।३।।
दास म्हणे कीती करवीसी धावा । देवाचीया देवा चीदंबरा ।।४।।
१२८७२४

करीतो वीनंती होसी क्रपामुर्ती । का हो दीनाप्रती उपेक्षीले ।।१।।
नाही मज कोन्ही जीवलग त्रीभुवनी । धावा करीतो मनी तुझा देवा ।।२।।
भाकीतो करुणा कंठी उरला प्राण । ब्रीद करी जतन चीदंबरा ।।३।।
दास म्हणे मज पतीतासी जाण । तुजवीण कोण चीदंबरा ।।४।।
१२८७२५

नाही नाही नाही आशा बा आणीक । तुजवीण देख चीदंबरा ।।१।।
यावे सर्वगता स्वामी क्रपावंता । नीवारी हे चींता चीदंबरा ।।२।।
नाही तुजवीण जीवलग कोन्ही । ब्रम्हांडभुवनी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे देई क्रपादान वेगी । प्रगट व्हावे जगी चीदंबरा ।।४।।

१२८७२६

ब्राम्हण तो आला येक स्वामीपासी । होता दुरदेसी मध्य जाणा ।।१।।
कंची बाळाच्यारी नाम त्याचे जाण । आला तो शरण स्वामीपासी ।।२।।
आवस्था कठीण बहुत कांतेसी । म्हणोनी स्वामीपासी पुसु आला ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतो वीनंती । चीदंबराप्रती करुणाभावे ।।४।।

१२८७२७

आवस्था कठीण बहुत कांतेसी । वीनंती पायासी करीतसे ।।१।।
नाना प्रकारीचे उपाय ते केले । यत्न ते न चले काही आता ।।२।।
करुणावंत धणी आवतार जनी । आलो मी धावोनी याजसाठी ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतो प्रार्थना । येउ दे करुणा चीदंबरा ।।४।।

१२८७२८

चीदंबर सांगे दुसर्या वैष्णवासी । न्यावे भोजनासी घरी आपुल्या ।।१।।
कण्या त्या भाकरी साठ मीरच्या वोल्या । पाहीजे वाढील्या याजलागी ।।२।।
साठी मीरच्यातुन उरली जरी येक । कामासी ते देख न ये माझ्या ।।३।।
बरे सांगे आज्ञा ते नीक्षुण । गेला वीप्र घेउन दास म्हणे ।।४।।

१२८७२९

सांगताती स्वामी बाळाच्यार्यालागी । साठ मीरच्या वेगी खावे आजी ।।१।।
येक मीरची जरी सांडीसील जाण । आज्ञा उलंघन होईल तेची ।।२।।
वीप्र म्हणे आज्ञा मान्य स्वामीराया । करीसी तु दया दीनालागी ।।३।।
दास म्हणे वीप्र गेला भोजनासी । मोजील्या पात्रासी साठ मीरच्या ।।४।।

१२८७३०

लाल मीरच्या वोल्या थोर थोर जाण । खातसे ब्राम्हण भोजनवेळे ।।१।।
होतसे तो प्राण वीप्राचा व्याकुळ । जालीसे तळमळ बहुत त्यासी ।।२।।
आज्ञा उलंघन होईल म्हणोन । न सांडीतो जाण मीरची येक ।।३।।
दास म्हणे धार लागली मुखासी । होउनी कासावीसी नीजेला तो ।।४।।

१२८७३१

च्यारी प्रहर रात्री तळमळ वीप्रासी । संकट प्राणासी वोडवले ।।१।।
प्राथःकाळी स्वामी आले तीकडोन । वीप्रालागी जाण बोलवीले ।।२।।
काय वर्तमान म्हणती चीदंबर । नीवाले आंतर ब्राम्हणाचे ।।३।।
दास म्हणे होता दरुषण स्वामीचे । नीवाले वीप्राचे आंतर ते ।।४।।

१२८७३२

जावे म्हणती घरा स्वामी वीप्रालागी । दही भात वेगी करवीला ।।१।।
घालोनी भोजन पाटवीला घरी । कांता जाली बरी त्याची वेळे ।।२।।
वीप्र म्हणे धन्य कौतुक ईश्वरा । नवल चीदंबरा दावीसी तु ।।३।।
दास म्हणे करी लीला चीदंबर । कळा हे आपार ईश्वराची ।।४।।

१२८७३३

चरीत्र १३१

चीदंबरा क्रपाघना । म्ाझी येउ दे करुणा ।।१।।
नीत्य करीतो प्रार्थना । यावे पतीतपावना ।।२।।
ऐके माझी वीज्ञापना । दावी रुप तु सगुणा ।।३।।
दासाचीया जीवप्राणा । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।४।।

१२८७३४

तुजवीण देव कोन्ही । दुजा नेणे त्रीभुवनी ।।१।।
वेगी येई बा धावोनी । चीदंबरा त्रीशुळपाणी ।।२।।
दावी रुप तु नयनी । तुझी आगाध करणी ।।३।।
दास येतो लोटांगणी । दावी आवतार करणी ।।४।।

१२८७३५

वेगी यावे बा श्रीधरा । स्वामी प्राण प्रीयकरा ।।१।।
जड जीवाच्या उधारा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।२।।
आनाथासी दया करा । कलयुगी आवतारा ।।३।।
दासाचीया प्राणेश्वरा । दावी रुप वीश्वंभरा ।।४।।

१२८७३६

वाट पाहु कोठवरी । दया येउ दे आंतरी ।।१।।
व्यापक तु चराचरी । दावी रुप डोळेभरी ।।२।।
दीन आनाथासी तारी । पावन ब्रीद जतन करी ।।३।।
दासालागी तु उत्धरी । आवतार प्रगट करी ।।४।।

१२८७३७

वेगी यावे क्रपावंता । चीदंबरा बा आनंता ।।१।।
नीवारी हे भवचींता । दीनालगी तु रक्षीता ।।२।।
सीण आला धावा करीता । वेळ लावीसी का आता ।।३।।
दासाचीया प्राणनाथा । चीदंबरा ये समर्था ।।४।।

१२८७३८

नीत्य करीतो वीनंती । दया येउ द्यावे चीती ।।१।।
तुझी वर्णवी बा कीर्ती । होसी करुणेची मुर्ती ।।२।।
तुजवीण दुजी प्रीती । मज नसे त्रीजगती ।।३।।
पावे दास दीनाप्रती । चीदंबरा बा श्रीपती ।।४।।

१२८७३९

वेगी यावे जगदीशा । माझी पुरवावी आशा ।।१।।
तुझे हाती सर्वासत्ता । चराचर वर्तवीता ।।२।।
शकुन पाहासी वाटे जाता । कागालागी तु फीरवीता ।।३।।
आपशकुनाचा शकुन । बळे फीरवीसी वीध्न ।।४।।
दास म्हणे सर्वेश्वरा । सगुण रुप चीदंबरा ।।५।।

१२८७४०

वीनवीतो वारंवार । माझे नीववी आंतर ।।१।।
यावे करुणेच्या राया । चीदंबरा प्राणप्रीया ।।२।।
नसे सामर्थ्यासी पार । होसी आनंत आपार ।।३।।
दासालागी भेटी देता । वेळ लावीसी का आता ।।४।।

१२७७४१

भक्तालागी चीदंबर । क्रपा करीतो आपार ।।१।।
चीदंबर दावी कळा । चमत्कार उघड डोळा ।।२।।
आला जवळी ब्राम्हण । स्वामी बोलती आपण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे भक्ती प्रीयकर ।।४।।

१२८७४२

धोत्र जोड आणवीला । बापणासी बोलावीला ।।१।।
तेणे धोत्र जोड दील्हा । नमी साष्टांग स्वामीला ।।२।।
स्वामी तयासी पुसत । धोत्र जोड्याची कीमत ।।३।।
मुद्दल सांगीतले तेणे । चीदंबर दास म्हणे ।।४।।

१२८७४३

गेला घरी भक्तराज । स्वामी करी त्याचे काज ।।१।।
वीप्र जवळी बोलाउन । स्वामी सांगतसे खुण ।।२।।
हालवोनी कमरेसी । काढुनी देत होन त्यासी ।।३।।
दास म्हणे बापणासी । होन पाठवीला त्यासी ।।४।।

१२८७४४

होन आणीतो ब्राम्हण । सांगे चमत्कार जाण ।।१।।
होन पाठवीला तुजसी । कळा दावीली मजसी ।।२।।
हात लावोनी कमरेसी । होन दील्हा मजपासी ।।३।।
होन ठेवीतो पुजेत । म्हणे कळा आघटीत ।।४।।
आसे भक्त प्रीयकर । दास म्हणे चीदंबर ।।५।।

१२८७४५

चरीत्र १३२

चीदंबरा होसी आनाथाची माये । कोमळ ह्रदये तुझे देवा ।।१।।
येउ दे करुणा मज पतीताची । पावन ब्रीदाची लज्या रक्षी ।।२।।
करीतो मी धावा सर्वकाळ देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।३।।
दास म्हणे माझी पुरवी वासना । आवतार सगुणा प्रगट व्हावे ।।४।।

१२८७४६

तुजवीण देव नेणे मी आणीक । आंतरीचे देख जाणसी तु ।।१।।
कोठवरी देवा देउ परीहार । अंत कोठवर घेसी आता ।।२।।
आंतरीचे गुज सर्व तुज ठावे । बोलोनी दावावे न लगे तुम्हा ।।३।।
दास म्हणे प्रीय नेणे तुजवीण । दावी बा चरण चीदंबरा ।।४।।

१२८७४७

चीत्ताची कल्पना पुरवीसी वासना । तुजवीण कोन्हा शरण जाउ ।।१।।
दील्हे आभयदान नीववीले मन । केले समाधान बहुतापरी ।।२।।
का हो चीदंबर आझोनी अंत घेसी । दया तुज कैसी नये माझी ।।३।।
दास म्हणे दावी आनाथासी पाय । तुची बाप माय चीदंबरा ।।४।।

१२८७४८

तैलंग ब्राम्हण आला स्वामीपासी । क्रपावंत त्यासी जाले स्वामी ।।१।।
चीदंबर पुसे ब्राम्हणालागुन । काय तुझे मन वांछीतसे ।।२।।
वीप्र बोले काही व्हावे संतर्पण । भीक्षा ते मागुन घालीतसे ।।३।।
दास म्हणे भीक्षा येत आसे थोडी । चीत्ती त्याची आवडी बहुत आसे ।।४।।

१२८७४९

वीप्राचे चीत्तात ब्राम्हणभोजन । व्हावे शतमान नीत्य तरी ।।१।।
म्हणे स्वामीलागी भीक्षा थोडी येत । मन हे लज्जीत होय तेणे ।।२।।
ब्राम्हण ते येती बहुत समयासी । बोलावया त्यासी लाजे चीत्ती ।।३।।
दास म्हणे वीप्र सांगे तो स्वामीसी । क्रपावंत त्यासी चीदंबर ।।४।।

१२८७५०

चीदंबर म्हणे तया ब्राम्हणासी । भोजन वीप्रासी घाली सुखे ।।१।।
आल्या समयासी जीतुके ब्राम्हण । घेत जावे जाण तीतुकेची ।।२।।
वीप्र म्हणे कैसे द्यावे ते ब्राम्हण । साहीत्य कोठुन आणावे ते ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर त्यासी । चींता ते मानसी करु नये ।।४।।

१२८७५१

स्वामीराये त्यासी होवोनी प्रसन्न । बींदीगी दील्ही जाण तांब्याचे ते ।।१।।
मागोनीया भीक्षा तांदुळ आणावे । भरोनी ठेवावे बींदीगीमाजी ।।२।।
आल्या ब्राम्हणासी घालावे भोजन । होवोनी प्रसन्न बोले स्वामी ।।३।।
दास म्हणे दील्ही बींदीगी ब्राम्हणासी । गेला बीराडासी घेवोनीया ।।४।।

१२८७५२

भीक्षेचे तांदुळ ठेवी त्या बींदीगी । भोजन घालीत ब्राम्हणासी ।।१।।
भीक्षा येत आसे दो चौ ब्राम्हणासी । पुढे आलीयासी सेपन्नास ।।२।।
वीप्र नवल करी आपुल्या चीत्तासी । सहीत्य सर्वासी पुरे कैसे ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । प्रगट चीदंबर लीला करी ।।४।।

१२८७५३

आल्या ब्राम्हणासी मीळते भोजन । येताती ब्राम्हण नीत्य नवी ।।१।।
न सरे ते भीक्षा ठेवीली बींदीगीत । पाहोनीया घेत लागे तीतुके ।।२।।
वीप्र वीच्यारीतो आपुलीया चीत्ती । ब्राम्हण जेवीती नीत्य बहुत ।।३।।
दास म्हणे आज्ञा नायकीले जरी । प्रत्यय वरचेवरी दावी देव ।।४।।

१२८७५४

वीपरीत कल्पना ब्राम्हणाचे मनी । तांदुळ वीकोनी पैका साची ।।१।।
चीदंबर त्यासी बोलावोनी जाण । पुसती वर्तमाण कैसे होते ।।२।।
वीप्र सांगे शतमान ब्राम्हण । होतसे भोजन स्वामीराया ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणती तयासी । बहुत कासयासी करावे ते ।।४।।

१२८७५५

ऐकोनी ब्राम्हण न मानी वचन । प्रत्यय तो जाण त्याची वेळे ।।१।।
दोघा चौघा लागी पुरे ते भोजन । बींदीगीत झाडुन पाहातसे ।।२।।
म्हणे चीदंबरा आन्याई मी खरा । करोनी वीकारा पैसा बांधी ।।३।।
दास म्हणे ऐसे दावीतो कौतुक । नानापरी देख चीदंबर ।।४।।

१२८७५६

चरीत्र १३३

सगुण ब्रम्ह आवतार । कलयुगी चीदंबर ।।१।।
व्यास बोलीले पुराणी । साक्ष घ्यावी ते पाहोनी ।।२।।
स्कंद पुराणी हे कथा । व्यास कथी भवीश्य वार्ता ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुर्णब्रम्ह आवतार ।।४।।

१२८७५७

चीदंबर माहात्म हे जाण । सोळा सहश्र ग्रंथ पुर्ण ।।१।।
व्यास मुखीचे वर्णन । बोले न वर्णवे म्हणुन ।।२।।
पुर्णब्रम्ह चीदाकाश । नीर्वीकार ते आवीनाष ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सगुण जाला तो ईश्वर ।।४।।

१२८७५८

चीदंबर क्षेत्र जाण । तेथे गेला तो ब्राम्हण ।।१।।
आसे ब्राम्हण वैदीक । माहापंडीत तो देख ।।२।।
तेथे करी अनुष्टान । म्हणे घडावे दर्शण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी प्रार्थना देवास ।।४।।

१२८७५९

चीदंबर ब्राम्हणासी । सांगे येउनी स्वप्नासी ।।१।।
आवतार सगुण जाला । ठावे नसे का तुजला ।।२।।
गर्लहोसुरासी जाण । आवतार मी सगुण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । न ये वीप्रासी वीश्वास ।।४।।

१२८७६०

नीत्य करी आनुष्टान । म्हणे दर्शण घेईन ।।१।।
आज्ञा नायके तो जाण । म्हणे जाले मज स्वप्न ।।२।।
काय स्वप्नीचा वीश्वास । समक्ष बोलावे देवास ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी बोलुन प्रखर ।।४।।

१२८७६१

चीदंबरापासी जाण । होता पुज्यारी ब्राम्हण ।।१।।
आले त्याचीया आंगासी । बोलवीले त्या वीप्रासी ।।२।।
चीदंबर बोले त्यासी । कारे येथे बैसलासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोले वीप्रासी नीष्टुर ।।४।।

१२८७६२

वीप्रालागी चीदंबर । सांगे येउनी बाहेर ।।१।।
पंडीत म्हणवीसी जाण । नाही गेले मुर्खपण ।।२।।
तुज सांगीतले स्वप्नी । राहीलासी का आझोनी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कंप सुटे ब्राम्हणास ।।४।।

१२८७६३

बोले चीदंबर त्यासी । नये वीश्वास तुजसी ।।१।।
भेट ईछसी चीत्तासी । जावे गर्लव्होसुरासी ।।२।।
सगुण धरीला आवतार । नाम माझे चीदंबर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सगुण भेटतो सर्वास ।।४।।

१२८७६४

बोले चीदंबर जाण । वेगी जावे त्वा नीघोन ।।१।।
अनुष्टान का करीसी । भेटी देतो मी सर्वासी ।।२।।
भाग्य ज्याचे उदयले । मज सगुण देखीले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाला आनंद वीप्रास ।।४।।

१२८७६५

जाला आनंद ब्राम्हणासी । आला नीघुनी स्वामीपासी ।।१।।
घाली साष्टांग नमन । सांगे सर्व वर्तमान ।।२।।
अष्टभाव प्रगटती । करी स्वामीसी वीनंती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । चीत्ती आनंद वीप्रास ।।४।।

१२८७६६

धन्य म्हणे चीदंबर । स्वामी भक्तप्रीयकर ।।१।।
जाला आनंद चीत्तासी । सगुण भेटला मजसी ।।२।।
स्वामी करीती समाधान । म्हणती भक्तराज पुर्ण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी वीप्रावर ।।४।।

१२८७६७

चरीत्र १३४

येके दीवसी स्वामी आले बाहेर । यात्रा बरोबर दाटी आसे ।।१।।
आला येक शुद्र दर्षणासी जाण । भावीक तो पुर्ण भक्तराज ।।२।।
स्वामी पुसताती क्रपा करुनी त्यासी । कैसा प्रंपच्यासी योग चाले ।।३।।
दास म्हणे सांगे शुद्र वर्तमान । कुटुंब ते जाण बहुत आसे ।।४।।

१२८७६८

चीदंबरराया कुटुंब हे थोर । प्रपंच वीच्यार सांगु काय ।।१।।
जाणसी ईश्वर सर्व आंतरीचे । बोलोनीया वाचे दाउ कीती ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी चींता करु नये । ईश्वर तो पाहे रक्षीतसे ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर धणी । आवतार करणी दावीतसे ।।४।।

१२८७६९

शुद्रालागी म्हणती राहे च्यार दीवस । नीरोप तुम्हास देतो वेगी ।।१।।
आज्ञा म्हणोनीया राहे दीवस च्यार । चींता करीत फार संसाराची ।।२।।
बोलावोनी स्वामी करीती समाधान । नीवांत हे मन आसो द्यावे ।।३।।
दास म्हणे करी शुद्र तो वीनंती । सर्व चरणाप्रती समर्पीले ।।४।।

१२८७७०

नीत्य उठोनीया येतो दर्षणासी । राहावे सेवेसी स्वामीपासी ।।१।।
स्वामी क्रपा करुनी बोलावीती त्यासी । ठेवीती ब्दारासी संरक्षण ।।२।।
आज्ञेवीण कोन्ही येउ नेदी आंत । यात्रा हे बहुत दाटी जाली ।।३।।
दास म्हणे आसे बहुत तो भला । वीनंती सर्वाला करीतसे ।।४।।

१२८७७१

यात्रा दाटी फार आसे माहाब्दारी । वीनंती नानापरी सर्वालागी ।।१।।
न दुखवी मन लाहानथोरचे । आर्जाव सर्वाचे करीतसे ।।२।।
ऐसे करीता जाला येक मास त्यासी । स्वामी नीरोपासी बोलावीती ।।३।।
दास म्हणे स्वामी करीताती स्तुती । बहुत याची भक्ती म्हणताती ।।४।।

१२८७७२

देवोनीया सीधा पैसे दील्हे च्यार । प्रपंच वीच्यार सुखे करी ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी करु नये चींता । क्रपा भगवंता आली आसे ।।२।।
करी सेतभात गाईमहीसी फार । मेंढ्याचे खील्लार बहुत करी ।।३।।
दास म्हणे बोले चीदंबर त्यासी । आल्या ब्राम्हणासी आन्न द्यावे ।।४।।

१२८७७३

आनंदे करुण नीरोप दील्हा जाण । पैसे ते पुजुन ठेवीतसे ।।१।।
घरी जावोनीया येक्या वर्ष आंत । भाग्य दील्हे बहुत ईश्वराने ।।२।।
गाई महीसी बैल सेत पीके भारी । गल्ला हा पदरी दाणा बहुत ।।३।।
दास म्हणे क्रपा करी चीदंबर । जाला मातवर शुद्र तोची ।।४।।

१२८७७४

आनंदे करुनी प्रपंच तो करी । आठवी आंतरी चीदंबरा ।।१।।
धन्य चीदंबरा आघटीत कळा । दावीयले डोळा कौतुक हे ।।२।।
चीदंबरावीण दुजा नेणे देव । करीत आर्जव सर्वाभुती ।।३।।
दास म्हणे आन्न आल्या ब्राम्हणासी । वीन्मुख कोणासी जाउ नेदी ।।४।।

१२८७७५

वर्षाभर यावे दर्षणालागुन । सांगे वर्तमान यात्रेलागी ।।१।।
चीदंबर ऐसा देव नसे कोन्ही । आघटीत करणी देवाजीची ।।२।।
दावीला प्रत्यय उघड मजसी । सांगे तो सर्वासी प्रेमभावे ।।३।।
दास म्हणे करी वीनंती स्वामीसी । मज पतीतासी पावन केले ।।४।।

१२८७७६

स्वामी म्हणती त्यासी भक्ती तुझी थोर । क्रपा तुजवर ईश्वराची ।।१।।
करी तो उत्तर भाग्य माझे थोर । सगुण ईश्वर द्रीष्टी पुढे ।।२।।
मज ठावा नसे ईश्वर तो दुजा । भेटी माहाराजा दील्ही तुम्ही ।।३।।
दास म्हणे ऐसा क्रपावंत धणी । आघटीत करणी करोनी दावी ।।४।।

१२८७७७

चीदंबरराया आघटीत करणी । दावीली नयनी उघड तुम्ही ।।१।।
नसे आंतपार कळा हे आपार । जालासे गोचर द्रीष्टी पुढे ।।२।।
नाना प्रकारीचे प्रत्यय दावीले । आता काहो केले कठीण मन ।।३।।
दास पतीताची करुणा कैसी न ये । तुची बापा माय चीदंबरा ।।४।।

१२८७७८

चरीत्र १३५

चीदंबरा वीश्वपती । ज्याची आगाध हे कीर्ती ।।१।।
वेद वर्णीता भागले । मौन्य धरोनी राहीले ।।२।।
तोची सगुण जाला देवा । दावी आपुले वैभवा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कलयुगी आवतार ।।४।।

१२८७७९

पुर्णब्रम्ह चीदंबर । दावी नाना चमत्कार ।।१।।
सत्य करीतो द्रीष्टांत । उघड बोलतसे मात ।।२।।
स्वप्न मीथ्या म्हणती जाण । सत्य करी तो आपण ।।३।।
दास म्हणे चीदंबर स्वप्न दावी श्रीष्टीवर ।।४।।

१२८७८०

श्रीष्टीवर दुरदेसी । ज्वाळामुखी देवी आसे ।।१।।
राजा तेथील तो जाण । त्यासी दील्हे तेथे स्वप्न ।।२।।
स्वप्नी सांगती वीच्यार । माझे नाम चीदंबर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । प्रत्यय दावीला राजास ।।४।।

१२८७८१

स्वप्नी प्रत्यय दावीला । आश्चर्य जाले ते राजाला ।।१।।
राजा नवल करीत । स्वप्नी येवोनी सांगत ।।२।।
सत्य करी स्वप्न खर । धन्य म्हणे चीदंबर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । लीला दावीली राजास ।।४।।

१२८७८२

वेध लागला राजासी । म्हणे पाहावे स्वामीसी ।।१।।
सगुण ब्रम्ह चीदंबर । कलयुगी श्रीष्टीवर ।।२।।
कधी पाहीन द्रीष्टीसी । वेध लागला चीत्तासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वप्नी भेटी त्या राजास ।।४।।

१२८७८३

स्वप्नी सांगती राजासी । भेटी दील्हे म्या तुजसी ।।१।।
चींता कासया करीसी । न लगे येणे दुरदेसी ।।२।।
राजा वीच्यारी ज्याग्रती । भेटी दील्ही मजप्रती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । राजा धरी वोळखीस ।।४।।

१२८७८४

स्वप्नी पाहीली जे मुर्ती । तैसे स्वामी का आहेती ।।१।।
म्हणोनी धाडी ब्राम्हणासी । कावडी पाठवी स्वामीसी ।।२।।
गंगोतरीच्या कावडी । वीप्र पाटवीली जोडी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । धाडी चौकडा स्वामीस ।।४।।

१२८७८५

नंदी ईश्वर रत्नाचा । करोनी पाटवी पाचाचा ।।१।।
मोती पाटवीली च्यार । कीमत त्याचे दाहा सहश्र ।।२।।
स्वप्नी बोलणे जे जाले । लीहोनी राजानी धाडीले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । लीहीली वीनंती स्वामीस ।।४।।

१२८७८६

कावडी घेवोनीया जाण । आले दोघे ते ब्राम्हण ।।१।।
वर्तमान सांगीतले । पत्र स्वामीसी दावीले ।।२।।
पत्र होते संस्कृत । पंडीत वाचुनीया पाहात ।।३।।
दास म्हणे चीदंबर । म्हणे राजा भक्तथोर ।।४।।

१२८७८७

ईश्वर नंदी तो रत्नाचा । थोर चौकडा मोत्याचा ।।१।।
द्रीष्टी स्वामीने पाहीले । पुन्हा माघारा धाडीले ।।२।।
भागीरथी वीप्रापासी । पाठवीली गोकर्णासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करी वीप्रासी आदर ।।४।।

१२८७८८

वस्त्रे भुषण खर्चासी । देवुनी दोघा ब्राम्हणासी ।।१।।
नव्हते लग्ण ज्याचे जाले । कुंकु तांदुळ त्या दील्हे ।।२।।
घरी सोडी गाठोडीसी । स्वामी सांगती वीप्रासी ।।३।।
लगन करुनीया घ्यावे । घरी आनंदे राहावे ।।४।।
म्हणे चीदंबर दास । जाला प्रसन्न वीप्रास ।।५।।

१२८७८९

चरीत्र १३६

आनंद नीरोप दीला तो वीप्रासी । संगती दोघासी लाउनी दीली ।।१।।
स्वामी म्हणती सांगा नीरोप राज्यासी । राज्य आनंदेसी करी आपुले ।।२।।
भक्तराज थोर राजा तो उदार । रत्नाचा ईश्वर पाठवीला ।।३।।
मोत्याचा चवकडा पाठवीला तुम्ही । पाहोनीया आम्ही सुखी जालो ।।४।।
दास म्हणे सांगे चीदंबर त्यासी । माघारा तुम्हासी पाठवीले ।।५।।

१२८७९०

राजासी सांगावे ईश्वर पुजेसी । चौकडा तुम्हासी भुषण हे ।।१।।
पत्री तुम्ही लीहीले पादुका पुजीसी । पाठवा मजसी म्हणोनीया ।।२।।
श्रुधभाव तुमचा पादुका हृदई । आसती आम्हाई पुजावया ।।३।।
दास म्हणे सांगे नीरोप ईश्वर । स्वामी चीदंबर स्वमुखे ते ।।४।।

१२८७९१

बोले चीदंबर सांगावे राज्यासी । येतो दर्षनासी लीहीले होते ।।१।।
राज्य तुमचे दुर सहस्त्र कोसावर । राज्य आवांतर वाटेसी ते ।।२।।
न यावे ते दुर रक्षीता ईश्वर । चीत्ती हा नीर्धार आसो द्यावा ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर धणी । ब्राम्हण श्रवणी ऐकतासी ।।४।।

१२८७९२

नलगे येणे दुर स्वामी सांगा म्हणती । भक्तीभाव चीत्ती द्रढ धरी ।।१।।
सन्नीध मी आहे राजा तुजपासी । येणे दुरदेसी काय म्हणुनी ।।२।।
मजवाचुनी ठाव रीता नसे जाण । तेथेची दर्षण देतो तुज ।।३।।
दास म्हणे ऐसे सांगे चीदंबर । स्वमुखे उत्तर ब्राम्हणासी ।।४।।

१२८७९३

तुझीया घरासी येतो नीश्चयेसी । सांगावे राजासी स्वामी म्हणती ।।१।।
संगती तुम्हासी दील्ली परीयंत । हे तो लौकीकात सांगतसे ।।२।।
तुमचे बरोबर आसे तो ईश्वर । नीर्भय अंतर आसो द्यावे ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर धणी । आनंद तो मनी वीप्रालागी ।।४।।

१२८७९४

वीप्र वीणवीतो स्वामीलागी जाण । करुनी द्यावे लग्न वेगी माझे ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी जाताची घरासी । वधु ते तुजसी बळे देती ।।२।।
बळे देती कन्या द्रव्य नाही म्हणसी । तांदुळ तुजसी दीले आसती ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर त्यासी । न सोडी वाटेसी गाठोडी ते ।।४।।

१२८७९५

घरी गेल्यावरी ठेवी देवापासी । पुजा ते दीवसी करी त्याची ।।१।।
पुजा करोनीया सोडावी गाठोडी । प्रात्प द्रव्य जोडी होती तुज ।।२।।
आनंद वीप्रासी बहुत चीत्तासी । घाली चरणापासी साष्टांग तो ।।३।।
दास म्हणे आज्ञा देती चीदंबरा । कुंकु वधुवरा लावा म्हणती ।।४।।

१२८७९६

कुंकुवाचे ते पुडी दील्ही आपुल्या हाते । सांगती वीप्राते सांबाळावे ।।१।।
लगनाचीया वेळे वधु वरालागी । कुंकु लागवेगी लावावे हे ।।२।।
आनंदे करोनी वीप्र दोघे जण । साष्टांग नमोन नीघते जाले ।।३।।
दास म्हणे बोले स्वामी चीदंबर । पाठवी उत्तर घरी गेल्या ।।४।।

१२८७९७

आज्ञा म्हणोनीया वीप्र दोघे जण । आनंदे करोन जाती वेगी ।।१।।
गेल्यावरी तेथे भेटी राजयासी । सांगे आनंदेसी वर्तमान ।।२।।
राजा आयकोनी आनंदे नीर्भर । करी नमस्कार वीप्रालागी ।।३।।
दास म्हणे राजा ब्राम्हणासी जाण । म्हणे भाग्य धन्य तुमचे आसे ।।४।।

१२८७९८

राजा वीप्रालागी नमीतसे भावे । म्हणे तुमच्या दैवे ईश्वर भेटी ।।१।।
मजसी सांगोनी धाडीले ईश्वर । सगुण चीदंबर कलयुगी ।।२।।
धन्य भाग्य ज्याचे देखती नयनी । आनंदे करुनी बोलताती ।।३।।
सगुण ईश्वर कलयुगा माझारी । धन्य नरनारी भेटी ज्यासी ।।४।।
दास म्हणे राजा प्रेमभरे करुनी । ब्राम्हणा लागोनी पुसतसे ।।५।।

१२८७९९

स्वामीचे ते मुर्ती कैसे आसे ध्यान । सांगती ब्राम्हण राजयासी ।।१।।
राजा म्हणे हेची स्वरुप म्या स्वप्नी । देखीले नयनी चीदंबर ।।२।।
भेटी दील्ही मज द्रष्टांती येउन । पावली ते खुण माझी मज ।।३।।
दास म्हणे राजा करी नीत्य ध्यान । चीदंबर चरण आठवोनी ।।४।।

१२८८००

चरीत्र १३७

चीदंबरा क्रपाघना । दावी रुप तु सगुणा ।।१।।
यावे जीवीच्या जीवना । स्वामी पतीतपावना ।।२।।
आंत पाहु नये आता । व्हावे प्रगट आनंता ।।३।।
दासाचीया प्राणेश्वरा । ब्रीद रक्षी चीदंबरा ।।४।।

१२८८०१

करुणावंत तुची धणी । कीर्ती तुझी त्रीभुवणी ।।१।।
वाट पाहावीसी कीती । दया येउ द्यावी चीती ।।२।।
होसी करुणेची माता । तुझे हाती सर्वसत्ता ।।३।।
दासाचीया प्राणनाथा । चीदंबरा ये समर्था ।।४।।

१२८८०२

चीदंबरा ऐसा कोन्ही । देव नसे त्रीभुवणी ।।१।।
दावी नाना चमत्कार । ज्यासी नसे आंतपार ।।२।।
करुणावंत जैसी माय । तैसी दया करीताहे ।।३।।
दास म्हणे नाम घेता । उडी घालीतो त्वरीता ।।४।।

१२८८०३

संकट पडीले दुरदेसी । येक्या गरीब वीप्रासी ।।१।।
ब्राम्हण कुटुंबसहीत । वेगी वाटेसी तो जात ।।२।।
मार्गी जता आरण्यात । आला प्रर्जन्य बहुत ।।३।।
दास म्हणे वीप्र जाण । आठवी चीदंबर चरण ।।४।।

१२८८०४

वीप्रकांता भक्तीवान । पती वीचक्षण जाण ।।१।।
करी भांडण कांतेसी । म्हणे माझे नायकसी ।।२।।
मना केले तुज बहुत । नीघु नये प्रर्जन्यात ।।३।।
दास म्हणे बरोबर । मुले बाळे लाहानथोर ।।४।।

१२८८०५

जासी बंधुच्या भेटीसी । दुखने बहुत आसे त्यासी ।।१।।
मुलालेकरासहीत । घात करीसी आरण्यात ।।२।।
प्रर्जन्य पडे चहकडुनी । पुढे वोहोळासी पाणी ।।३।।
दास म्हणेवीप्र कांता । चीदंबर तो रक्षीता ।।४।।

१२८८०६

धावा करी वीप्रकांता । चीदंबरा पावे आता ।।१।।
मुलेलेकुरासहीत । सापडलो आरण्यात ।।२।।
आता वाचवी तु प्राण । तुझे आठवीतो चरण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कौतुक दावी तो ईश्वर ।।४।।

१२८८०७

प्रर्ज्यन्य पडे चहुकडे । मधे चालती नीवाडे ।।१।।
मुला लेकुरा सहीत । वीप्र जाले आनंदात ।।२।।
थेंब न लागे आंगासी । पाणी वाहाते वाटेसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी कौतुक वीप्रास ।।४।।

१२८८०८

नाही देखीला ईश्वर । द्रीष्टी कधी चीदंबर ।।१।।
कीर्ती ऐकोनीया कानी । धावा करीती नीर्वाणी ।।२।।
पावलासी चीदंबरा । कळा आघटीत ईश्वरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रत्यय ईश्वर ।।४।।

१२८८०९

ब्राम्हण चाले आनंदेसी । धन्य म्हणे त्या कांतेसी ।।१।।
तुझा भावार्थ पै थोर । धावे संकटी ईश्वर ।।२।।
चीदंबर आवतार । सत्य असे श्रीष्टीवर ।।३।।
दास म्हणे ब्राम्हणासी । नीश्चय बैसे देवापासी ।।४।।

१२८८१०

पुडे जाता ते वाटेसी । पाणी होते वोहोळासी ।।१।।
तेथे जाता उन पडीले । पाणी उथरोनी गेले ।।२।।
वीप्र कुटुंबासहीत । सुखे पावला गावात ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे आपार ।।४।।

१२८८११

चरीत्र १३८

पुर्णब्रम्ह स्वामी कलयुगी आवतार । करीतो उत्धार पतीताचा ।।१।।
करुणावंत धणी दुजा ऐसा कोन्ही । पाहाता त्रीभुवनी उत्तम हा ।।२।।
तारी दीनालागी न पाहे गुणदोष । स्वामी जगदीश प्रगट हा ।।३।।
दास म्हणे दावी लीला हे आपार । न लगे आंतपार वेदादीका ।।४।।

१२८८१२

पंडीत जे ज्ञानी शास्त्री येती कोन्ही । आहंभाव धरुनी दर्षणासी ।।१।।
नानारीती चीत्ती कल्पना तयासी । बोलती स्वामीसी संपादनी ।।२।।
आंतरसाक्षी आसे स्वामी चीदंबर । भुक्तीने उत्तर बोलोनी दावी ।।३।।
न दुखवी मन बोलोनी दावी वाचे । जाणे आंतरीचे दास म्हणे ।।४।।

१२८८१३

पंढरीक्षेत्रीचा बडव्या ब्राम्हण । घेतले ठेउन जवळी त्यासी ।।१।।
घरीचे वर्तमान पुसती तयाचे । नामदेव त्याचे नाम आसे ।।२।।
बोलतो स्वामीसी कल्पना धरोन । सत्य हे वचन न सांगे तो ।।३।।
दास म्हणे स्वामी जाणे आंतरीचे । सांगती घरीचे गुप्तधन ।।४।।

१२८८१४

पुसती ब्राम्हणासी सत्य सांगे वचन । भक्तराज पुर्ण वीठलाचे ।।१।।
आसत्य वचन बोलु नये कदा । सुख ते संपदा देतो देव ।।२।।
तरी तो ब्राम्हण बोले थोडे जाण । स्वामी उगडोनी सांगताती ।।३।।
हृदईचा साक्षी आसे चीदंबर । नलगे आंतपार दास म्हणे ।।४।।

१२८८१५

नामदेवालागी बोलताती स्वामी । तुमचे घर आम्ही न देखीले ।।१।।
परी तुम्हालागी पुसतसे खुण । सांगती आपण सर्व स्वामी ।।२।।
वस्त्र ते प्रावर्ण पोशाकासहीत । आसती गाठोड्यात सांगती ते ।।३।।
दास म्हणे पंचपात्रसहीत । सर्वही सांगत चीदंबर ।।४।।

१२८८१६

तांब्या पंचपात्री ताट वाट्या जाण । रौपाचे मोजुन सांगताती ।।१।।
ब्राम्हण तो चीत्ती लजीत होउन । सत्य स्वामी जाण म्हणतसे ।।२।।
द्रव्याची ते ठेवी ठेवीले पुरोन । सांगती मोजुन तीतुके स्वामी ।।३।।
दास म्हणे जाणे सर्वाचे आंतर । वर्ते चराचर ज्याचे सत्ते ।।४।।

१२८८१७

जवळी आसोनी नेणती ते खुन । उघड बोलुन दावी स्वामी ।।१।।
नीत्य उठोनीया बोले ब्राम्हणासी । प्रत्यय तयासी वर्चेवरी ।।२।।
म्हणती ब्राम्हणासी यावे भोजनासी । प्रसाद पंक्तीसी घेत जावा ।।३।।
दास म्हणे करी दया आनाथासी । परी मानवासी उमजेना ।।४।।

१२८८१८

क्षेत्रस्त ब्राम्हण आसे रजोगुणी । फराळ करोनी नीत्य जाय ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी येता प्रसादासी । फराळ घरासी करीता काय ।।२।।
नाही म्हणोनीया वीप्र बोलतसे । चीत्ती लाजतसे आंतरी तो ।।३।।
दास म्हणे जाणे चीदंबर धणी । न दावी बोलुनी हासतसे ।।४।।

१२८८१९

येके दीवसी आला वीप्र तो पंक्तीसी । बैसवीले त्यासी स्वामी जवळी ।।१।।
बहुत वेळ जाला तुम्हा भोजनासी । आद्यापी उपवासी राहीला की ।।२।।
वीप्र तो न बोले लजीत आंतरी । सत्य ते वैखरी न वदवे ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलती तयासी । वीनोद वीप्रासी करोनीया ।।४।।

१२८८२०

स्वामी म्हणताती दसमी हे घवाची । भाजी ते वांग्याची गोड होती ।।१।।
लोणी आणी गुळ तीखट लोणचे । पदार्थ जीव्हेचे गोड जाले ।।२।।
दीड दसमी घेउनी फराळ तो केला । प्रहर दीवस आला होता तेव्हा ।।३।।
दास म्हणे स्वामी पुसती वीप्रासी । लज्जीत मानसी खाली पाहे ।।४।।

१२८८२१

बोले तो ब्राम्हण आन्यायी मी खरा । पावन चीदंबरा तुम्ही येक ।।१।।
आंतर जाणसी क्षमावंत माय । बोलुनीया काय दाउ आता ।।२।।
पतीतपावन आवतार कलयुगी । पांडुरंग जगी सगुण तुम्ही ।।३।।
दास म्हणे वीप्र घाली नमस्कार । स्वामी म्हणती थोर भक्त तुम्ही ।।४।।

१२८८२२

चरीत्र १३९

चीदंबरा करुणापती । तुझी आघाध हे कीर्ती ।।१।।
नीत्य दावीसी तु कळा । यात्रेमाजी ते सकळा ।।२।।
जीतुके येती दरुषणासी । प्रत्यय दावीसी तीतुक्यासी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । साक्ष सर्वाच्या आंतरा ।।४।।

१२८८२३

यात्रा येती दरुषणासी । ब्राम्हण बहुत पंगतीसी ।।१।।
ईतर शेणवी ब्राम्हण । पंगतीमाजी येती जाण ।।२।।
स्वामी यज्ञशाळे आंत । होते बैसले येकांत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे पंगतीचा वीच्यार ।।४।।

१२८८२४

पंगतीमाजी आमुके ठाई । बैसला आसे तो शेणवी ।।१।।
तयालागी उठवावे । मर्यादेने बैसवावे ।।२।।
सहश्रावधी ते पंगती । कोन्ही आला हीनयाती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी सांगती सर्वास ।।४।।

१२८८२५

पंगतीमाजी कोन्ही येती । पात्रे आधीक मांडीती ।।१।।
वाढोनी न्यावे म्हणती जाण । शुद्रालागी ते चोरुन ।।२।।
स्वामी सांगोन धाडीती । पात्र आधीक मांडीती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगुनी धाडी त्या उत्तर ।।४।।

१२८८२६

पात्र आधी मांडु नये । शुद्र येथे बोलवावे ।।१।।
मागील पंगती ते जाण । वाढुन शुद्रासी भोजण ।।२।।
आंतरसाक्षी हा ईश्वर । उघड बोले चीदंबर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । होती प्रत्यय सर्वास ।।४।।

१२८८२७

सहश्रावधी पंगती जाण । पुरुष स्त्रीयाचे भोजन ।।१।।
स्त्रीया रजश्वला कोन्ही । बळे येताती चोरोनी ।।२।।
स्वामी सांगती दुरोन । येथे रजश्वला जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । ब्राम्हण उठवीती तीयेस ।।४।।

१२८८२८

लज्जीत होती वीप्रकांता । आंतर जाणसी भगवंता ।।१।।
न चले कापटे या ठाई । लज्जीत होवोनी जाती पाही ।।२।।
नीत्य नवी लीला ऐसी । चीदंबर दावी तो यात्रेसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२८८२९

नाना कापटी ते येती । थोरपण मीरवीती ।।१।।
मद आंगी संपतीचा । पाहे प्रत्यय स्वामीचा ।।२।।
परात भरोनीया हाती । साखर वाटावया जाती ।।३।।
पीतांबर तो कासेसी । थोर आभीमान तयासी ।।४।।
म्हणे चीदंबर दास । जाय सेणवी पंगतीस ।।५।।

१२८८३०

साखर वाटे ब्राम्हणासी । थोर वैभव चीत्तासी ।।१।।
स्वामी पुसती वीप्रासी । कोण फीरतो पंगतीसी ।।२।।
वीप्र म्हणे थोर जाण । साखर वाटीतो ब्राम्हण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुसावे म्हणे तो ईश्वर ।।४।।

१२८८३१

वीप्र पुसती तयासी । साखर कोण तु वाटीसी ।।१।।
लज्जीत होवोनीया जाण । म्हणे मी शेणवी आपण ।।२।।
देती बाहेर काढुन । पाटी लागती ब्राम्हण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाणे सर्वांचे आंतर ।।४।।

१२८८३२

यात्रा येती दरुषणासी । लीहीती कारकुन त्यासी ।।१।।
यादी वाचोनी दावीती । स्वामी तयासी सांगती ।।२।।
यादी लीहीता ब्राम्हण । नसे ईतर कारण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय यात्रेस ।।४।।

१२८८३३

चरीत्र १४०

चीदंबर जाला कलयुगी आवतार । कळा हे आपार दावी जना ।।१।।
सगुणभेटी जाले आसे बा जयासी । प्रत्यय तयासी नवल काये ।।२।।
नसे भेटी जाली कीर्ती आयकीली । ऐकोनीया चाली वर्ते तैसा ।।३।।
दास म्हणे आसे दुरदेसी कोन्ही । आठवीता मनी पावे त्यासी ।।४।।

१२८८३४

उच्चनीच याती हो का जरी कोन्ही । अंतीज धरोनी चंडाळ ते ।।१।।
धावा करी येक अंतीज तो जाण । चीदंबर चरण आठवीतो ।।२।।
चीदंबरा होसी सगुण तु आवतार । याती माझी माहार काय करु ।।३।।
दास म्हणे ऐसा अंतीज तो जाण । करुणा भाकुन आठवीतो ।।४।।

१२८८२५

अंतीज तो म्हणे आपुल्या चीत्तासी । दर्पण मजरी कैसे होय ।।१।।
जवळी जाती कोन्ही जरी च्यारी वर्ण । कठीण दर्पण तयालागी ।।२।।
मज च्यांडाळासी कैसी होय भेठी । चीदंबर गोष्टी सांगे कैसा ।।३।।
दास म्हणे ऐसा प्रस्तावा चीत्तासी । जाला अंतीज्यासी बहुत खेद ।।४।।

१२८८३६

म्हणे चीदंबरा मज ऐशा माहारा । दर्षण ईश्वरा देसी कैसे ।।१।।
हीनयाती जन्मा आलो मी च्यांडाळ । होसी तु दयाळ मायबापा ।।२।।
स्वप्नी तरी भेठी देई चीदंबरा । आवतार तु खरा श्रीष्टीमाजी ।।३।।
दास म्हणे धावा करी तो आंतज । चीदंबरा मज पावे आता ।।४।।

१२८८३७

मागील्या आवतारी चोख्यामेळ्यालागी । पावलासी जगी स्वामीराया ।।१।।
प्रगट ते ख्याती दावीली बहुत । ब्राम्हण छळीत बहुत त्यासी ।।२।।
केले गर्वाहात चहु वर्णालागी । चोखामेळा जगी भक्त केला ।।३।।
दास म्हणे ऐसा द्रीष्टांत देतसे । धावा करीतसे अंतीज तो ।।४।।

१२८८३८

सत्य आवतार जरी चीदंबर । नीववील आंतर माझे आता ।।१।।
तळमळी अंतीज बहुत भक्ती करुणा । चीदंबरचरणा आठवोनी ।।२।।
लागलासे ध्यास बहुत माहारासी । करुणा स्वामीसी आली त्याची ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । स्वप्नी चीदंबर भेटे त्यासी ।।४।।

१२८८३९

बहुत तळमळी जाली आंतीजासी । जीव कासावीसी जाला आसे ।।१।।
आंक्रदोनी रडे नसे देहेभाव । आली त्याची कीव चीदंबरा ।।२।।
पतीतपावन आवतार कलयुगी । करुणावंत जगी मातेपरीस ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय माहारासी । समाधान त्यासी करीतसे ।।४।।

१२८८४०

येवोनी द्रीष्टांती प्रगट चीदंबर । उठवीला माहार हाकारोनी ।।१।।
म्हणे काय म्हणोनी धावा तु करीसी । ईछा ते तुजसी काये आसे ।।२।।
तुम्ही कोण सांगा म्हणे तो आंतीज । चीदंबर मज म्हणती सर्व ।।३।।
दास म्हणे दीव्य तेज स्वरुपाचे । नेत्र आंतीजाचे जाकीयले ।।४।।

१२८८४१

चीदंबर म्हणे आंतीजासी जाण । द्यावया दर्षण आलो तुज ।।१।।
काय बापा ईछा आसे तुज चीत्ती । देतो तुजप्रती सांगे आता ।।२।।
येवोनी आंतीज घाली चरणी मीठी । आनंद तो पोटी न समाये ।।३।।
दास म्हणे नयनी प्रेमाची जीवन । क्षाळीले चरण देवाजीचे ।।४।।

१२८८४२

आनंदेकरुन चीदंबर त्यासी । धरी ह्रदयासी आळींगोनी ।।१।।
दील्हे नीजसुख कुरवाळीले मुख । आद्रश्य ते देख जाले देव ।।२।।
आंतेज त्यावेळे ज्याग्रत होवोनी । आश्रुपात नयनी वाहातसे ।।३।।
दास म्हणे नाम चींती चीदंबर । नेणे तो ईतर प्रीय काही ।।४।।

१२८८४३

मीळतसे यात्रा आंतीजाचे घरी । भेटी वर्णच्यारी दर्षणासी ।।१।।
ईछीत कामना पुसो येती कोन्ही । प्रत्यय दावी जनी चीदंबर ।।२।।
कलयुगी आवतार कीर्ती हे आपार । वर्णु कोठवर पतीत मी ।।३।।
चीदंबरा दास नीच माहाराहुनी । येउ द्यावी मनी दया काही ।।४।।

१२८८४४

चरीत्र १४१

चीदंबरा करुणाघना । दावी रुप तु सगुणा ।।१।।
होसी पतीतपावन । ब्रीद करी बा जतन ।।२।।
नलगे सांगणे तुजसी । क्रपावंत माय होसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२८८४५

चीदंबर आवतार । करीतो पतीत उत्धार ।।१।।
चहु वर्णमाजी जाण । भक्त केले ते स्वामीन ।।२।।
आठरापगड यातीसी । दावी प्रत्यय सर्वासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे भक्तप्रीयकर ।।४।।

१२८८४६

धावा करीताची कोन्ही । येक्याभावे भक्ती करुनी ।।१।।
पावे तयाचे नीर्वाणी । कळा दावीतसे जनी ।।२।।
याती हो का भलते कोन्ही । च्यांडाळं का आवींद जनी ।।३।।
दास म्हणे पावे त्यासी । दावी प्रत्यय जगासी ।।४।।

१२८८४७

येक्या गावी मुसलमान । होता कुटुंबासी जाण ।।१।।
दरीद्र पीडा बहुत त्यासी । मुले लेकरे उपवासी ।।२।।
बहुत त्रासलासे जाणा । आला स्वामीच्या दर्षणा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी वीनंती स्वामीस ।।४।।

१२८८४८

आवींद आला दर्षणासी । स्वामी पुसती तयासी ।।१।।
काय ईछा धरुनी आला । सांगे सर्वही स्वामीला ।।२।।
दरीद्र पीडीलो बहुत । स्वामी तुम्ही क्रपावंत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आली करुणा स्वामीस ।।४।।

१२८८४९

स्वामी म्हणती तयासी । बहुत श्रम पावलासी ।।१।।
बहुत रोजगार केले । नाही सार्थक ते जाले ।।२।।
तरी सांगतो तुजसी । माझी आज्ञा आयकसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन आवतार ।।४।।

१२८८५०

करी आवींध प्रार्थना । स्वामी येउ दे करुणा ।।१।।
आज्ञा प्रमाण ते देख । स्वामी करीन वर्तणुक ।।२।।
सांगे चीदंबर त्यासी । देतो नीरोप तुजसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आले भाग्य उदयास ।।४।।

१२८८५१

आवींद बोलवोनी जाण । पदरी घातले ते आन्न ।।१।।
धान्य दील्हे पायलीभर । आज्ञा करी चीदंबर ।।२।।
सांगे घरासी त्वा जावे । सेत करोनी राहावे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी दीनावर ।।४।।

१२८८५२

घरी गेल्यावरी जाण । सेतकरी मुसलमान ।।१।।
मागोन घेतली चौथाई । आर्पीन स्वामीचे पाई ।।२।।
सेत बहुत पीकले । शेंभर गोणी दाणे जाले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आला स्वामी दर्षनास ।।४।।

१२८८५३

सांगे स्वामीलागी जाणे । आणीले चौताईचे दाणे ।।१।।
स्वामी सांगती तयासी । घेउनी जावे त्वा घरासी ।।२।।
घाली ब्राम्हणभोजन । तुज होतसे कल्याण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आवींदासी आनंद थोर ।।४।।

१२८८८५४

भक्ती करी मुसलमान । घाली ब्राम्हणभोजन ।।१।।
प्रतीवर्ष प्रयोजण । सहश्रावधी करी जाण ।।२।।
करी चीदंबरी ध्यान । स्वामी पतीतपावन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । भक्ती लावी आवींदास ।।४।।

१२८८५५

भक्ती करी मुसलमान । कीर्ती वाढलीसे जाण ।।१।।
नाम जपे चीदंबर । करी कीर्तन गजर ।।२।।
कलयुगी आवतार । जाला स्वामी चीदंबर ।।३।।
दास म्हणे भक्ती लावी । ईछा मनाची पुरवी ।।४।।

१२८८५६

चरीत्र १४२

चीदंबरा होसी कलयुगी आवतार । व्हावे बा सत्वर प्रगट आता ।।१।।
कोठवरी अंत घेसी बा आनंता । ब्रीद भगवंता जतन करी ।।२।।
करीतो मी धावा देवा नीसीदीनी । दया तुझे मनी न ये कैसी ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माये । चीदंबरा काय वेळ केला ।।४।।

१२८८५७

तुजवीण प्रीय नसे माझ्या जीवा । जाणसी तु देवा आंतरीचे ।।१।।
परीहार तरी देउ बा कीतीक । नसे ते वाळुक फोडुनी दाउ ।।२।।
कोठवरी तरी करुणा भाकवीसी । ब्रीदावळी कैसी राहे येणे ।।३।।
दास म्हणे बळे काढीले बाहीरी । वेळ कोठवरी चीदंबरा ।।४।।

१२८८५८

काय तुझ्या आंगी नसे सताबळ । लावीसी का वेळ मायबापा ।।१।।
नाना प्राकारीचे आभयदान दील्हे । बाहीर काढीले चीदंबरा ।।२।।
येवोनी देशावर हासवीसी जन । कीर्ती हे वर्णन कोणीकडे ।।३।।
दास म्हणे वेगी व्हावे बा प्रगट । चीदंबरा भेट देई मज ।।४।।

१२८८५९

येउ दे करुणा मज आनाथाची । माउली दीनाची म्हणवीसी ।।१।।
करावे जतन आपुले वचन । ब्रीदासी लांछन लागो नेदी ।।२।।
करुणावंत धणी तुची त्रीभुवनी । आघटीत करणी तुझी देवा ।।३।।
दास म्हणे मी तो पतीतची खरा । पावन चीदंबरा प्रगट व्हावे ।।४।।

१२८८६०

करीतसे धावा सर्वकाळ देवा । नयेची कणवा कैसा माझा ।।१।।
आडीले नीर्वाणी ब्राम्हण ते दोन्ही । सापडले वनी चोरालागी ।।२।।
चीदंबरा त्यासी रक्षीले त्या वेळे । झाकीयले डोळे माझेवीसी ।।३।।
दास म्हणे कीर्ती तुझी हे आपार । वर्णु मी पामर कोठवरी ।।४।।

१२८८६१

पांडुरंगापासी बडव्या तो ब्राम्हण । धर्मराज जाण नाम त्याचे ।।१।।
पांडुरंगे दील्हा द्रीष्टांत तयासी । जावे दरुषणासी स्वामीचीया ।।२।।
म्याची धरीलासे आवतार सगुण । नाम धरीले जाण चीदंबर ।।३।।
दास म्हणे वीप्र नीघे त्वाराकरुनी । लागवेगे करुनी येता जाला ।।४।।

१२८८६२

चीदंबरापासी येवोनीया जाण । घाली लोटांगण स्वामीपुढे ।।१।।
म्हणे चीदंबरा दावीले चरण । आवतार सगुण जालासी तु ।।२।।
पांडुरंगे मज सांगीतले स्वप्नी । आलो मी धावोनी याचीलागी ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलते तयासी । आला दुरदेसी काय म्हणोनी ।।४।।

१२८८६३

वीप्र म्हणे स्वामी पाहावे चरण । हेची ईछा धरुन आलो आसे ।।१।।
वीठले मजसी स्वप्नी सांगीतले । चरण देखीले आज्ञावरुनी ।।२।।
द्रव्य दारा सुत घरी आसे सुख । पांडुरंगे देख ठेवीयले ।।३।।
दास म्हणे बोले सत्यवाणी । प्रेमभावे करुनी सद्गदीत ।।४।।

१२८८६४

चीदंबरे वीप्र घेतला ठेवोन । दोन मास पुर्ण आपुले पासी ।।१।।
नाना चमत्कार पाहोनी द्रीष्टीसी । आनंद वीप्रासी बहुत जाणा ।।२।।
वस्त्र ते भुषणे देवोनी स्वामीनी । आनंदे करोनी नीरोप दील्हा ।।३।।
दास म्हणे वाटे येता तो ब्राम्हण । आरण्य ते वन झाडी लागे ।।४।।

१२८८६५

चुकोनीया वाट गेला आरण्यात । भेटी आकस्मात चोराची ते ।।१।।
चोराची ते जागा आसती लपोनी । गेला तये स्थानी ब्राम्हणातो ।।२।।
धोडे मनुश्य वीप्र कंटाळ त्यावरी । आसे आंगावरी शालजोडी ।।३।।
दास म्हणे वीप्र देखीला द्रीष्टीसी । आनंद चोरासी बहुत जाला ।।४।।

१२८८६६

पुसती तस्कर तया ब्राम्हणासी । कोठोनी आलासी आमुच्या ठाया ।।१।।
पाहोनी चोरासी घाबरे ब्राम्हण । कांपय ते मान शरीर जाले ।।२।।
कापे थरथरा बोले तो चोरासी । चीदंबरापासी गेलो होतो ।।३।।
दास म्हणे चोर पाहोनी हासती । ब्राम्हणाची गती कैसी जाली।।४।।

१२८८६७

बुधीदाता आसे चीदंबर धणी । ज्याचे आज्ञेवरुनी चराचर ।।१।।
सत्ताधारी आसे फीरवीली बुधी । चोरासी सद्‌बुधी त्याची वेळे ।।२।।
म्हणती वीप्रासी भय तु न धरी । नीवांत आंतरी राहे बापा ।।३।।
दास म्हणे धीर बळे देती चोर । कळा हे आपार चीदंबर ।।४।।

१२८८६८

चोर वीप्रालागी करीती सन्मान । आला वाट चुकुन आमुचे येथे ।।१।।
आवतार आसे प्रगट चीदंबर । आसुदे नीर्धार तुजसी ते ।।२।।
करोनी भोजन आमुच्या घरासी । उदईक तुम्हासी वाटे लाउ ।।३।।
दास म्हणे चोर करीती आदर । कळा चीदंबर दावी ऐसी ।।४।।

१२८८६९

ब्राम्हण तो म्हणे तया तस्करासी । क्रपा करोनी मजसी वाटे लावा ।।१।।
आंतःकर्ण माझे नव्हे येथे स्थीर । जाणता वीच्यार तुम्ही सर्व ।।२।।
भयभीत जाले बहुत माझे मन । वाटे लावा जाण याची वेळे ।।३।।
दास म्हणे चोर म्हणती वीप्रासी । लावीतो वाटेसी न करी चींता ।।४।।

१२८८७०

दोघे चोर तेणे देवोनी बरोबर । करुनी आदर थोर ब्राम्हणासी ।।१।।
झाडीपार करोनी लावीला वाटेसी । वीप्र आनंदेसी आला घरी ।।२।।
आला पंढरीसी सांगे वर्तमान । आवतार सगुण चीदंबर ।।३।।
दास म्हणे ऐसी लीला हे आपार । दावी चीदंबर नीत्यनवी ।।४।।

१२८८७१

चरीत्र १४३

चीदंबरा बा आनंता । व्हावे प्रगट तु आता ।।१।।
वेळ न करी सर्वथा । ब्रीद रक्षी प्राणनाथा ।।२।।
नलगे सांगणे तुम्हासी । क्रपावंत माय होसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । प्रगट आवतार करा ।।४।।

१२८८७२

ईछा नसे बा आणीक । तुजवीण दुजी देख ।।१।।
माझे आंतर जाणसी । नलगे सांगणे तुम्हासी ।।२।।
जीव जाला कासावीसी । बळे तुची बोलवीसी ।।३।।
पावे दास पतीतासी । चीदंबरा पावन होसी ।।४।।

१२८८७३

स्वामीराया चीदंबरा । वीश्वी तुची वीश्वंभरा ।।१।।
व्यापक तु चराचरा । कळा दावीसी ईश्वरा ।।२।।
प्रीयकर होसी माये । तुज सांगणे काये ।।३।।
दास म्हणे चीदंबरा यावे दीनाच्या कैवारा ।।४।।

१२८८७४

तुज प्रगट बा होणे । आवतारक्रत्य करणे ।।१।।
म्हणोनी बळे बोलवीसी । कळा आपुली दावीसी ।।२।।
आवतार कलयुगी । सत्य कळवीसी जगी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवीसी आस ।।४।।

१२८८७५

गुप्त भक्त बहुत केले । पाहीजे प्रगट दावीले ।।१।।
आठरापगड यातीसी । भक्त आपुले करीसी ।।२।।
स्वामीराया चीदंबरा । दावी प्रगट ईश्वरा ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । वेळ न करी ईश्वरा ।।४।।

१२८८७६

चीदंबरा क्रपाघन । जाला आवतार सगुण ।।१।।
करुनी दावी सत्य स्वप्न । कलयुगी उघड जाण ।।२।।
स्वप्न दावीतो दुरवरी । नाना देशोदेशांतरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कळा दावी तो आपार ।।४।।

१२८८७७

तैलंग देसी कुंभारासी । भक्ती लावीली तयासी ।।१।।
ध्यान करीतो कुंभार । नाम जपे चीदंबर ।।२।।
जाला प्रसन्न तयासी । नम्र आल्या ब्राम्हणासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वप्नी सांगे कुल्लाळास ।।४।।

१२८८७८

कुल्लाळासी चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।१।।
स्वप्नी सांगीतले त्यासी । आन्न द्यावे आलीयासी ।।२।।
करी प्रार्थना कुंभार । माझा दरीद्री वीच्यार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी बोलती तयास ।।४।।

१२८८७९

स्वप्नी म्हणती कुंभारासी । द्रव्य देतो मी तुजसी ।।१।।
तुर्त घेई सहश्र होन । करी ब्राम्हण भोजन ।।२।।
ज्याग्रत होताची तो जाण । दोन सहश्राचे होन्न ।।३।।
पाहे द्रीष्टीसी कुंभार । दास म्हणे चीदंबर ।।४।।

१२८८८०

धन्य म्हणे चीदंबरा । तुझी कळा हे ईश्वरा ।।१।।
स्वप्न सत्य करुनी देसी । पदार्थ दीसे ज्याग्रतीसी ।।२।।
मागे आवतार जाले । ऐसे नाही आयकीले ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी कळा श्रीष्टीवर ।।४।।

१२८८८१

लीला दावी हे आपार । भक्त केला तो कुंभार ।।१।।
आल्या ब्राम्हणासी आन्न । नीत्य करी संतर्पण ।।२।।
तुट नसे त्या द्रव्यासी । कळा दावीतसे ऐसी ।।३।।
मागे नाही आयकीले । तेची द्रीष्टीसी दावीले ।।४।।
चीदंबरा म्हणे दास । माझेवीसी का आळस ।।५।।

१२८८८२

चरीत्र १४४

चीदंबर तुझी कळा हे आपार । होसी परात्पर सगुण ब्रम्ह ।।१।।
सगुण आवतार जालासे कलयुगी । कीर्ती तुझी जगी प्रगट दीसे ।।२।।
लावीसी तु भक्ती आठरापगड याती । दावीसी प्रचीती सर्वालागी ।।३।।
दास म्हणे होसी माय आनाथासी । भक्ती हे कोष्ट्यासी लावीयेली ।।४।।

१२८८८३

तैलंग देशांत होता येक कोष्टी । न देखीला द्रीष्टी चीदंबरा ।।१।।
आयकोनीया कीर्ती भजन करी चीत्ती । चीदंबरप्राप्ती व्हावे म्हणे ।।२।।
पावे चीदंबरा मज आनाथासी । आसे दुरदेसी भेटी नाही ।।३।।
दास म्हणे करी प्रार्थना तो साळी । पावे चंद्रमौळी चीदंबरा ।।४।।

नीत्य उठोनीया करीतसे धावा । चीदंबर देवा चरण दावी ।।१।।
ऐकतो मी कीर्ती भेटी बहुतासी । स्वामीराया देसी प्रगट तु ।।२।।
येवोनीया स्वप्नी प्रगट सांगसी । द्रव्य तु खर्चासी देसी देवा ।।३।।
दास म्हणे ऐसी करुणा भाकीतसे । धावा करीतसे भक्त तुझा ।।४।।

१२८८८५

द्रीष्टांती जावोनी सांगे तयालागी । चीदंबर वेगी प्रगट तेथे ।।१।।
आइवरोनीया करी वर्तणुक । दावी तो कौतुक तुज काही ।।२।।
न करी तु चींता बा संसाराची । कळा ईश्वराची न कळे कोन्हा ।।३।।
दास म्हणे स्वप्नी बोले चीदंबर । नीववी आंतर भक्ताचे ते ।।४।।

१२८८८६

सांगे कोष्ट्यालागी गुह्य येक गोष्टी । आनुभव पोटी आसो द्यावा ।।१।।
आज्ञा तुज करीतो धरावा नीश्चय । आसावे नीर्भय मनामाजी ।।२।।
हाताखाली ठेवी दोन ते कुंभार । न सांगे वीच्यार दुजयासी ।।३।।
दास म्हणे स्वप्नी सांगे चीदंबर । करावे लष्कर म्रीतीकेचे ।।४।।

१२८८८७

हत्ती घोडे उंट सीपाई सरदार । करावे लष्कर नीत्य नवी ।।१।।
आल्या ब्राम्हणासी देत जावे आन्न । करावे चींता सर्वकाळ ।।२।।
चीदंबर नामी आसो द्यावी प्रीती । आवतारक्रती कळेल पुडे ।।३।।
दास म्हणे सांगे द्रीष्टांती वीच्यार । प्रगट चीदंबर लीला दावी ।।४।।

१२८८८८

करीतो प्रार्थना भक्तराज कोष्टी । स्वामीराये गोष्टी सांगीतले ।।१।।
प्रपंच वीच्यार खर्च लागे फार । न देती उधार पैसा कोन्ही ।।२।।
सांगे चीदंबर देतो तुज द्रव्य । सांडु नये धैर्य नीश्चयेसी ।।३।।
दास म्हणे ऐसे ऐकोनीया गोष्टी । आनंद तो पोटी भक्तालागी ।।४।।

१२८८८९

चीदंबर त्यासी येवोनी द्रीष्टांती । खर्चावया देती रुपय दोन ।।१।।
नीत्य उठोनीया करीत जावा खर्च । न घडे तो वेच तयालागी ।।२।।
आनंद चीत्तासी जाला कोष्ट्यालागी । चाकर ठेवी वेगी कुल्लळासी ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । आवतार लीला न कळे कोन्हा ।।४।।

१२८८९०

चाकर ठेवीले दोन ते कुंभार । चीकल तयार करी येक ।।१।।
श्नान करोनीया प्राथःकाळी येक । करीतसे देख हत्ती घोडे ।।२।।
स्वामीकडे येती वीप्र दर्षणासी । कौतुक द्रीष्टीसी पाहोनीया ।।३।।
दास म्हणे राहाती त्याचीया घरासी । आल्या ब्राम्हणासी देतो आन्न ।।४।।

१२८८९१

हाती घोडे करोनी ठेवी खोल्याभरोनी । पाहोनी येती नयनी सांगती ते ।।१।।
न कळे ते कळा ईश्वराची काय । बोलावया न ये कौतुक ते ।।२।।
पाहोनीया येती वीप्र यात्रेलागी । आवतार कलयुगी लीला दावी ।।३।।
दास म्हणे येथे आज्ञाची प्रमाण । तोची भक्त जाण नीश्चयेसी ।।४।।

१२८८९२

आवतार जगी जाला चीदंबर । लीला हे आपार दावीतसे ।।१।।
श्रीष्टीमाजी भक्त आसती बहुत । भेटी त्यासी देत चीदंबर ।।२।।
धन्य तेची भक्त नीश्चय जयासी । चीदंबर त्यासी क्रपा करी ।।३।।
दास म्हणे मी तो पतीतची खरा । पावन चीदंबरा प्रगट होई ।।४।।

१२८८९३

पुर्णब्रम्ह चीदंबर । कलयुगी आवतार ।।१।।
यात्रा आपार मीळती । ईछा धरोनीया येती ।।२।।
पुर्ण करी मनोरथ । स्वामीराजा हा समर्थ ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी लीला हे आपार ।।४।।

१२८८९४

पुत्र दंपत्य सहीत । स्वामी दरुषणासी येत ।।१।।
राहाणे तुंगभद्रा तीरी । लक्ष स्वामी पायावरी ।।२।।
त्यासी पुत्र आसे येक । जन्मताची मुका देख ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी कळा हे आपार ।।४।।

१२८८९५

करी वीनंती स्वामीसी । पुत्र माता आहीर्नीसी ।।१।।
बाळ येकुलते हे येक । नये बोलणे ते देख ।।२।।
स्वामी म्हणती तीयेसी । चींता न करी मनासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आली क्रपा ते स्वामीस ।।४।।

१२८८९६

स्वामी म्हणती तीयेसी । बाई आज्ञा आयकसी ।।१।।
यावे भोजन पंगतीसी । सार पाजी लेकरासी ।।२।।
त्यासी वर्ष सात आठ । मुल बोलील हे स्पष्ट ।।३।।
म्हणे चीदंबर दास । हर्ष जाला उभयतास ।।४।।

१२८८९७

येक दीवस भोजनासी । आले स्वामी प्रसादासी ।।१।।
यात्रा मीळाली बहुत । दर्षण नसे त्यासी होत ।।२।।
स्वामी सांगती तयासी । यावे सार न्यावयासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रत्यय ईश्वर ।।४।।

१२८८९८

नीत्य सार नेत जावे । बाळालागी ते पाजवावे ।।१।।
सात दीवस न्यावे सार । पुढे बोलेल प्रखर ।।२।।
सात दीवस सार नेले । मुल बोलु ते लागले ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२८८९९

कळा दावी चीदंबर । नीत्य नवी हे आपार ।।१।।
कलयुगी आवतार । सगुण जाला चीदंबर ।।२।।
जगा कळवी प्रखर । भ्रांती सांडुनीया दुर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बोलवीले त्या बाळास ।।४।।

१२८९००

मुक्यालागी दील्ही वाचा । आसे लौकीक ब्रीदाचा ।।१।।
ब्राम्हण दंपतेसी हीत । पुत्रालागी घेउनी येत ।।२।।
आला स्वामी पुढे जाण । घाली साष्टांग नमन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोले क्रपेचे उत्तर ।।४।।

१२८९०१

स्वामी म्हणती ब्राम्हणासी । जाला आनंद तुजसी ।।१।।
पुत्र येकुलता येक । वाचा आली त्यासी देख ।।२।।
आनंद जाला उभयतासी । पुत्र मातापीतायासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दील्हा नीरोप वीप्रास ।।४।।

१२८९०२

चीदंबरा करुणाकरा । यावे दीनाच्या कैवारा ।।१।।
चालवीले देशावरी । वाट पाहु कोठवरी ।।२।।
दया येउ दे आंतरी । चीदंबरा आझोनी तरी ।।३।।
दास म्हणे करुणेश्वरा । दया येउ दे ईश्वरा ।।४।।

१२८९०३

करुणा येउ दे ईश्वरा । स्वामीराया चीदंबरा ।।१।।
दया येउ दे दीनाची । लज्या रक्षी हे ब्रीदाची ।।२।।
जीव होतो कासावीसी । देवा कीती लाजवीसी ।।३।।
चीदंबरा दास म्हणे । नलगे स्वामीसी सांगणे ।।४।।

१२८९०४

चरीत्र १४६

आनंत आपार ज्याचे आसे कळा । ब्रम्हीचा पुतळा चीदंबरा ।।१।।
देशोदेशी यात्रा येती दरुषणासी । कामना चीत्तासी धरोनीया ।।२।।
तेची पुरवीत चीदंबर धणी । आवतार करणी दावीतसे ।।३।।
दास म्हणे नीत्य नवी लीला दावी । ईछा हे पुरवी चीदंबर ।।४।।

१२८९०५

ब्राम्हण तो आला येक दुरदेसी । सीतज्वर तयासी तीन वरुष ।।१।।
नानारीती करी वैद्याचा औषध । न चुके तो बाध शरीराचा ।।२।।
बहुता परी करी जप अनुष्टान । सीतज्वर जाण न जायेची ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतो उपाय । आधीकची होय पीडा त्यासी ।।४।।

१२८९०६

चीत्ती वीच्यारीत करु तरी काये । न चले उपाय रोगासी तो ।।१।।
कोठवरी भोग न कळे ईश्वरा । प्राण जायबरा वाटे चीत्ती ।।२।।
देव धर्म करीता सीणलोसे फार । कोणता वीच्यार करु म्हणे ।।३।।
दास म्हणे त्यासी भेटे येक वीप्र । पुसे तो वीच्यार तयालागी ।।४।।

१२८९०७

पुसे ब्राम्हणासी जाउ कोणे देसी । उपाय मजसी सांग काही ।।१।।
औषध ते मात्रा घेता जाला सीण । पैका खर्च करुन नागवलो ।।२।।
पथ्य करीता जाण शरीर जाले गळीत । कासावीसी होत जीव माझा ।।३।।
दास म्हणे वीप्र सांगतो तयासी । चीदंबरापासी जावे वेगी ।।४।।

१२८९०८

सगुण आवतार जाला चीदंबर । नीववी आंतर पाहाताची ।।१।।
जावे दरुषणासी आगत्य करोन । आरोग्य तो जाण होसी आता ।।२।।
म्हणे तो ब्राम्हण जातो दरुषणासी । क्रपा ते मजसी केली तुम्ही ।।३।।
दास म्हणे नीघे वीप्र तो वेगेसी । चीदंबरापासी आला आसे ।।४।।

१२८९०९

गेला दरुषणासी वीप्र स्वामीपासी । साष्टांग चरणासी नमन करी ।।१।।
बोलावीती स्वामी यावे ऐलीकडे । पुसती नीवाडे वर्तमान ।।२।।
सांगे स्वामीराया देहे जाले क्षीणं । सीतज्वर जाण तीन वर्ष ।।३।।
दास म्हणे सांगे चीदंबर त्यासी । यावे प्रसादेसी माध्यानी ते ।।४।।

१२८९१०

चीदंबर म्हणे तया वीप्रालागी । श्नान करोनी वेगी यावे आता ।।१।।
औषध उपाय नाम चीदंबर । घ्यावे पोटभर सार येथे ।।२।।
आंबट ते सार चींचेचे करीती । औषध तुजप्रती तेची येथे ।।३।।
दास म्हणे वीप्र आला भोजनासी । वाढीले तयासी सार बहुत ।।४।।

१२८९११

जाला होता सीण पथ्य करीता त्यासी । आंबट रोगीयासी प्रीय बहुत ।।१।।
सार ते चींचेचे घेतले यथेष्ट । भरोनीया पोट भोजन करी ।।२।।
तेची दीवसी गेलेती ज्वर तयाचे । सांगे आनंदाचे वर्तमान ।।३।।
दास म्हणे जाला आरोग्य ब्राम्हण । नवल करी जाण चीत्ती बहुत ।।४।।

१२८९१२

आश्चर्य चीत्तासी वीप्र करी फार । म्हणे चीदंबर आवतार हा ।।१।।
शतावधी रुपय खर्च केले जाण । आला आसे सीण पथ्य करीता ।।२।।
तीन वर्ष जाले पीडा हे भोगीता । स्वामी क्रपावंता नवल केले ।।३।।
दास म्हणे वीप्र येतो लोटांगणी । आवतार करणी चीदंबर ।।४।।

१२८९१३

धन्य चीदंबरा कलयुगी आवतारा । क्रपेच्या सागरा स्वामीराया ।।१।।
कुपथ्य जयासी तेची बा औषध । देउनीया बाध चुकवीसी ।।२।।
कळा हे वीचीत्र करोनी दावीसी । ठक मानवासी पाडोनीया ।।३।।
दास म्हणे दावी प्रचीती यात्रेसी । कळा हे कोन्हासी कळो नेदी ।।४।।

१२८९१४

चीदंबरराया आनाथाच्या नाथा । पावे मज आता वेगी देवा ।।१।।
घेउ नये अंत स्वामी क्रपावंता । ब्रीद भगवंता जतन करी ।।२।।
यावे प्राणनाथा न करी उसीर । यावे बा सत्वर ऐशा वेळे ।।३।।
दास म्हणे तुम्हा नलगे सांगणे । प्रगट बा होणे चीदंबर ।।४।।

१२८९१५

चरीत्र १४७

चीदंबरा क्रपाघना । यावे जीवीच्या जीवना ।।१।।
माझी पुरवी वासना । स्वामी यज्ञनारायणा ।।२।।
वाट पाहावीसी कीती । दया येउ द्यावी चीत्ती ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । ब्रीद रक्षी चीदंबरा ।।४।।

१२८९१६

वाट पाहु कोठवरी । दया येउ दे आंतरी ।।१।।
नीत्य भाकीतो करुणा । यावे क्रपेच्या नीधाना ।।२।।
नये वेळ करु आता । वेगी यावे प्राणनाथा ।।३।।
चीदंबर म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२८९१७

तुम्हा कोणतो कठीण । मज द्यावया दर्षण ।।१।।
सर्व आंग सत्ता बळ । काहो लावीयला वोळ ।।२।।
वाट पाहातो सर्वकाळ । माझी नीवारी तळमळ ।।३।।
चीदंबरा दास म्हणो । माझी करुणा योउ दोणो ।।४।।

१२८९१८

कीती वाट पाहावीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।१।।
मी तो पतीतची खरा । पावन ब्रीद जतन करा ।।२।।
वोगी यावो वीश्वंभरा । स्वामी प्राण प्रीयकरा ।।३।।
चीदंबरा दास म्हणो । ब्रीद जतन करणो ।।४।।

१२८९१९

जाला सगुण आवतार । कलयुगी चीदंबर ।।१।।
द्रीष्टी पाहाती लाहान थोर । नीत्य दावी चमत्कार ।।२।।
तुंगभद्रातीरी जाण । होता गरीब ब्राम्हण ।।३।।
दास म्हणो स्वामीपासी । वीप्र आला दरुषणासी ।।४।।

१२८९२०

आला भेटीसी ब्राम्हण । त्यासी पुत्र येक जाण ।।१।।
जन्मताची वाचा नाही । तेरा वर्ष जाले पाही ।।२।।
बहुत संकट वीप्रासी । मुंज न घडे पुत्रासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी दीनावर ।।४।।

१२८९२१

वीप्र जातो लोटांगणी । उभा कर तो जोडोनी ।।१।।
म्हणे पुत्र मज येक । वाचा नसे यासी देख ।।२।।
स्वामीराया क्रपा करुन । यासी करावे ब्राम्हण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२८९२२

बोलावीला तो ब्राम्हण । यावे पुत्रासी घेवोन ।।१।।
पुढे उभे त्यासी केले । स्वमुखे श्लोक सांगीतले ।।२।।
येक दोन वेळा जाण । राहे मौन्य तो धरुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । हात करीतसे वर ।।४।।

१२८९२३

रागे भरोनी बोलती । श्लोक बाळासी सांगती ।।१।।
क्षणेमाजी बोलवीती । यात्रा सर्वही पाहाती ।।२।।
शास्त्री पंडीत ते जाण । म्हणती आवतार सगुण ।।३।।
लीला दावीसी ईश्वरा । दास म्हणे चीदंबरा ।।४।।

१२८९२४

करुणावंत स्वामीराया । करीसी आनाथासी दया ।।१।।
माझेवीसी काय जाले । मन नीष्टुर का केले ।।२।।
वाट पाहातो नीसीदीनी । वेगी येई बा धावोनी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । बट्टा न लावी ब्रीदास ।।४।।

१२८९२५

क्रपावंत तुची धणी । मज येक त्रीभुवनी ।।१।।
क्रपा आभयदान दील्हे । माझे मन नीववीले ।।२।।
आसे भरवसा चीत्तासी । स्वामी वेळ का लावीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२८९२६

चरीत्र १४८

चीदंबरा होसी आनाथाची माये । कोमळ ह्रदय तुझे देवा ।।१।।
कीती स्वामीराया वाट पाहावीसी । दया तुज कैसी न ये माझी ।।२।।
नाही तुजवीण जीवलग कोन्ही । ब्रम्हांडभुवनी चीदंबर ।।३।।
दास म्हणे दावी रुप तुझे सगुण । नीववी हे मन चीदंबरा ।।४।।

१२८९२७

दावी सगुण रुप नीवारी भवताप । होसी मायबाप मजलागी ।।१।।
कोण तुजवीण कैवारी मजसी । झोप तुज कैसी आली देवा ।।२।।
व्हावे बा ज्याग्रत चीदंबरराया । क्षीण जाली काया तुजवीण ।।३।।
चीदंबरा दावी पाय दासालागी । आवतार जगी प्रगट करी ।।४।।

१२८९२८

येउ दे करुणा पतीतपावना । पावे मज दीना ऐशावेळे ।।१।।
कीरीतो मी धाना देवाचीया देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।२।।
नको वेळ करु कीती धीर धरु । आज्ञान लेकरु बाळ तुझे ।।३।।
दास म्हणे कीती होसी बा नीष्टुर । यावे बा सत्वर चीदंबरा ।।४।।

१२८९२९

याचे दीनानाथा पावे मज आता । तुझे हाती सत्ता सर्व आसे ।।१।।
नको करु वेळ दावी चरणकमळ । माता तु दयाळ म्हणवीसी ।।२।।
दीन तुझे रंक मागतसे भीक । आवतार कौतुक प्रगट करी ।।३।।
दास म्हणे दावी रुप तुझे सगुण । उत्धरावे दीन आनाथासी ।।४।।

१२८९३०

सांभाळी सांभाळी आपुली ब्रीदावळी । दावी चेंद्रमौळी रुप डोळा ।।१।।
नको नको वेळ करु देवराया । यावे प्राणप्रीया चीदंबरा ।।२।।
पतीत मी खरा आसे दुराच्यारी । घेतले पदरी मायबापा ।।३।।
दास म्हणे तुझी आगाध हे कळा । दखीयेला डोळा चीदंबर ।।४।।

१२८९३१

पतीत दुराच्यारी शुद्र आला येक । दर्षणासी देख स्वामीचीया ।।१।।
नीपाणकराचा आसे सीलेदार । घोडी दोनच्यार घरीचे आसे ।।२।।
तयासी घडले कर्म अनुचीत । नसे प्रायश्चीत त्यासी काही ।।३।।
दास म्हणे जाला जातीचे बाहीर । आला तो सत्वर स्वामीपासी ।।४।।

१२८९३२

येवोनीया पुढे घाली दंडवत । बळे आंक्रदत स्वामी पुढे ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी काय जाले तुज । न धरीता लाज सांगे मज ।।२।।
म्हणे तो ग्रहस्त आसे मी पतीत । कर्म अनुचीत घडले मज ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगे म्हणती त्यासी । बोले तो स्वामीसी उघड जनी ।।४।।

१२८९३३

अन्याई आपार जालो चीदंबरा । पतीतासी करा पावन आता ।।१।।
अन्याय सांगतो स्वामी चरणापासी । कर्म माहारणीसी घडले मज ।।२।।
ठेवोनी घेतली आसे ते घरात । करोनी घालीत स्वयपाक ते ।।३।।
दास म्हणे आला भ्रतार तीयेचा । हात माहारणीचा धरुनी वोढी ।।४।।

१२८९३४

म्हणे तो माहार बायको हे माझी । लाज गेली तुझी कैसे आता ।।१।।
हासोनीया स्वामी पुसती तयासी । होती तुजपासी कीती दीवस ।।२।।
ग्रहस्त तो म्हणे होती वर्ष येक । घेवोनी गेला देख भ्रतार तो ।।३।।
दास म्हणे त्यासी घातीले बाहीर । फौज आसे फार मऱ्हाढ्याची ।।४।।

१२८९३५

नसे प्रायश्चीत न घेती पंगतीसी । आलो स्वामीपासी तरावया ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी चींता तु न करी । जावे रामेश्वरी आज्ञा माझी ।।२।।
यावे तीर्थ करुनी घेतो मी पंगतीसी । आभयदान त्यासी दील्हे देवे ।।३।।
दास म्हणे करी वीनंती स्वामीसी । नसे मजपासी खर्चावया ।।४।।

१२८९३६

चीदंबरे त्यासी दील्हे रुपय दोन । यावे यात्रा करुण म्हणती स्वामी ।।१।।
घेवोनीया रुपय रामेश्वरा गेला । यात्रा करुनी आला ग्रहस्त तो ।।२।।
शण्मासाची यात्रा तीर्थवीधी जाण । रुपये जवळी दोन जैसे तैसे ।।३।।
चीदंबरापासी यात्रा करुनी आला । स्वामी पुसती त्याला पुरला खर्च ।।४।।
दास म्हणे दावी रुपय तो दोन । आलो यात्रा करुण स्वामीराया ।।५।।

१२८९३७

स्वामी ते म्हणती तीर्थ त्वा आणीले । पाहीजे ते दील्हे सर्वालागी ।।१।।
नीळकंटराव सींद्या बोलावीला । सांगती तयाला स्वामीराव ।।२।।
पंगतीसी पावन करावे याजसी । आज्ञा तो स्वामीसी म्हणतसे ।।३।।
दास म्हणे नेला आपुले बीराडासी । चीदंबर त्यासी सांगतसे ।।४।।

१२८९३८

आपा देसायासी नीरोप सांगावा । पंगतीसी हा घ्यावा आपुलीया ।।१।।
दोन रुपय दील्हे आसती म्या याजसी । यात्रा दुरदेसी करुनी आला ।।२।।
दोन रुपयाची साखर ते घ्यावी । हातावरी द्यावी सर्वाचीया ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगोनी धाडीती । पंगती ते घेती लाहानथोर ।।४।।

१२८९३९

पतीतपावन कलयुगी आवतार । लीला चीदंबर दावीतसे ।।१।।
दावोनी प्रत्यय केला तो पावन । उत्धरीले दीन क्रपाद्रीष्टी ।।२।।
क्रपेचा सागर स्वामी चीदंबर । दावी चरमत्कार नीत्य नवा ।।३।।
दास म्हणे स्वामी चीदंबरराया । प्रगट सखया दावीयले ।।४।।

१२८९४०

चरीत्र १४९

चीदंबरा वीश्वपती । तुझी आगाध हे कीर्ती ।।१।।
होसी प्रगट ईश्वरा । व्यापक तु चराचरा ।।२।।
आंतरसाक्षी सर्वजीवा । स्वामी देवाचीया देवा ।।३।।
दास म्हणे सर्वगता । चीदंबरा पावे आता ।।४।।

१२८९४१

नाना प्रकारीचे जन । मज करीती धळन ।।१।।
आवतार तु सगुण । का हो न येसी आझोन ।।२।।
सत्य मीथ्य तु जाणसी । जग पाटी का लावीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । का हो वेळ वीश्वंभरा ।।४।।

१२८९४२

आवतार ब्रम्हपुर्ण । कलयुगी तु सगुण ।।१।।
आज्ञाप्रमाणे मजसी । देवा बळे वर्तवीसी ।।२।।
जन पाटी का लावीसी । काय मौज पाहासी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२८९४३

तुजवीण प्रीय काही । मज नसे लोकी तीही ।।१।।
माझे जाणसी आंतर । कीती देउ परीहार ।।२।।
दुर्जन छळीताती पाहे । यासी दावी बा प्रत्यय ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । नलगे सांगणे तुम्हास ।।४।।

१२८९४४

सर्वाभुती तुची येक । दावी आपुले कौतुक ।।१।।
सगुणब्रम्ह होसी सत्य । दावी आवतार क्रत्य ।।२।।
नलगे सांगणे तुम्हासी । स्वामी बळे बोलवीसी ।।३।।
दास काष्टाचा पुतळा । चीदंबरा तुझी कळा ।।४।।

१२८९४५

सुत्रधारी तुची येक । आनंत ब्रम्हांडात देख ।।१।।
सर्वालागी वर्तवीसी । देउ नीमीत्य कोणासी ।।२।।
सर्व तुजसी करणे । बळे प्रगट बा होणे ।।३।।
नीमीत्यासी केला दास । नलगे सांगणे स्वामीस ।।४।।

१२८९४६

आंतर जाणसी सर्वाचे । जीव जंतु मुंगीयचे ।।१।।
दर्षणासी येक जाण । आली कापाटे दुर्जन ।।२।।
वीधवा नारी ते वीप्राची । होती थोर समर्थाची ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । आंतरसाक्ष तु ईश्वरा ।।४।।

१२८९४७

सोहळे करीतसे भारी । समुदाये बरोबरी ।।१।।
आली स्वामीच्या दरुषणा । सांगुनी धाडी कारकुन ।।२।।
स्वामी सांगती तयासी । नसे दर्षण तीजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाणे दुरीत वीच्यार ।।४।।

१२८९४८

स्वामी म्हणती तीजसी । जावे आपुल्या गावासी ।।१।।
जावोनी सांगती ब्राम्हण । तुम्हा न घडे दर्षण ।।२।।
नीग्रह केला तीणे बहुत । नाना प्रकारी नींदीत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सांगुनी पाठवी स्वामीस ।।४।।

१२८९४९

काय पाप माझे जाण । मज दाखवा बोलुन ।।१।।
स्वामी म्हणती तीयेसी । कर्म घडले च्यांडाळासी ।।२।।
आमुके ठाई घडले कर्म । बोलुनी दाखवीले वर्म ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कर्म घडले ते मांगास ।।४।।

१२८९५०

जाउनी सांगती ब्राम्हण । वीप्र कांतोलागी जाण ।।१।।
ऐकताची वर्तमान । बळे करीती रुदन ।।२।।
म्हणे मी तो च्यांडाळीन । तुम्ही पतीतपावन ।।३।।
माझा उत्धार तो करा । पुर्णब्रम्ह चीदंबरा ।।४।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।५।।

१२८९५१

आली करुणा स्वामीसी । सांगुनी धाडीती तीजसी ।।१।।
जावे फीरोनी आपुल्या घरी । नाम जपावे आंतरी ।।२।।
आनुताप जाल्यावर । तुझा होईल उत्धार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । गेली आपुल्या गावास ।।४।।

१२८९५२

आज्ञानी हे मुर्ख जन । करीती देवासी आभीमान ।।१।।
फळ आपुले भोगीती । वीचीत्र दैवाची हे गती ।।२।।
पाप आपुले नेणती । नींदा करोनी बहुती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन ईश्वर ।।४।।

१२८९५३

चरीत्र १५०

चीदंबरा होसी करुणेची माता । तुझे हाती सत्ता सर्व आसे ।।१।।
आनंत हे कळा तुझी वीश्वंभरा । द्रीष्टी चीदंबरा दावीसी तु ।।२।।
यात्रा येती बहुत लोक दुरदेसी । प्रत्यय दावीसी सर्वालागी ।।३।।
दास म्हणे तुझी कीर्ती वर्णी कोण । राहीला लाजोन सहश्रमुखी ।।४।।
१२८९५४

यात्रा दुरदेसी येती स्वामीपासी । प्रत्यय तयासी दावीतसे ।।१।।
भक्तराज येक आला दरुषणासी । आणीला स्वामीसी धोत्र जोडा ।।२।।
लींगाईत कोष्टी आसे तो यातीचा । नीश्चय तयाचा स्वामी पाई ।।३।।
दास म्हणे स्वामी न घेती कोणाचे । आंतर सर्वाचे जाणतसे ।।४।।
१२८९५५

लींगाईत म्हणे स्वामीलागी जाण । आणीला वीणोन धोत्रजोडा ।।१।।
स्वामी म्हणती त्यासी न घेई कोणाचे । न घे ब्राम्हणाचे काई तुझे ।।२।।
भक्तराज कोष्टी आला नीग्रहासी । देईन स्वामीसी धोत्रजोडा ।।३।।
दास म्हणे गेला बीर्हाडासी । त्यागीन प्राणासी म्हणतसे ।।४।।
१२८९५६

करी उपोषण न घे म्हणे आन्न । कळले वर्तमान स्वामीलागी ।।१।।
जाले उपोषण तीन कोष्ट्यालागी । बोलवीला वेगी स्वामीराये ।।२।।
घेतो धोत्रजोडा न करी तु चींता । भोजन करुनी आता यावे वेगी ।।३।।
दास म्हणे जाला आनंद तयासी । आला स्वामीपासी भोजन करुनी ।।४।।
१२८९५७

देई धोत्रजोडा स्वामी म्हणती त्यासी । भक्तराज होसी नीधरिसी ।।१।।
आनंदे करोनी स्वामी जोडा घेती । लावीती आंगासी त्या देखता ।।२।।
बोलावोन चौघे खरीदी करणार । पुसती वीच्यार तयालागी ।।३।।
दास म्हणे त्यानी कीमत सांगीतली । स्वामी त्यासी बोली बोलताती ।।४।।
१२८९५८

|

दहा वीस जोडे याचे कीमतीने । आणुनीया देणे या सारीके ।।१।।
हासोनीया सर्व करीती वीनंती । ठावे स्वामीप्रती सर्व आसे ।।२।।
स्वामीनी तयासी सोळा रुपय दील्हे । पाहीजे खर्चीले आज्ञा ऐसी ।।३।।
दास म्हणे येक जंगम बोलावीला । त्यासी सांगीतला वीच्यार हा ।।४।।
१२८९५९

सोळा रुपयात जंगम तो कीती । भोजन करीती सांगे म्हणती ।।१।।
पनास ते पात्र होईल म्हणतसे । स्वामी सांगतसे करी वेगी ।।२।।
कोष्टी भक्तराजे करवीला स्वयपाक । मीळाले ते देख शे दोनसे ।।३।।
दास म्हणे जंगम धाबरला जाण । न पुरे हे आन्न कैसे करु ।।४।।

१२८९६०

कोष्टी भक्तराज करीतो नीश्चय । आसावे नीर्भय स्वामी क्रपा ।।१।।
आणवीले दुध जागा सारवीली । पुजा तेथे केली दुधाची ते ।।२।।
नेवोनीया दुध घातीले खीरीत । भोजन करीत आले जीतके ।।३।।
तीनसे ते पात्र होवोनी भोजन । राहीलेसे आन्न दास म्हणे ।।४।।

१२८९६१

राहीलेसे आन्न स्वयापाक माझारी । देतो घरोघरी वाठोनी ते ।।१।।
आश्चर्य करीती सर्व लाहानथोर । म्हणे चीदंबर लीला दावी ।।२।।
आवतार सगुण जाला कलयुगी । लीला दावी जगी नीत्यनवी ।।३।।
दास म्हणे कळा आनंत आपार । दावी चीदंबर उघड जनी ।।४।।

१२८९६२

पतीतपावन कलयुगी आवतार । करीतो उत्धार आनाथाचा ।।१।।
आनाथाचा नाथ आसे क्रपावंत । लीला हे दावीत नीत्यनवी ।।२।।
करुणावंत धणी आगाध करणी । देखीला नयनी ईश्वर हा ।।३।।
दास म्हणे आसे करुणेची माता । उत्धरी तत्वता नाम घेता ।।४।।

१२८९६३

यावे ईश्वंभरा दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा स्वामीराया ।।१।।
येउ दे करुणा मज आनाथाची । लज्या हे ब्रीदाची रक्षी आता ।।२।।
नये वेळ करु चीदंबरराया । आवतार सखया प्रगट करी ।।३।।
दास म्हणे न लगे सांगणे तुम्हासी । वेळ का लावीसी चीदंबरा ।।४।।

१२८९६४

चरीत्र १५१

चीदंबरा करुणापती । दया येउ द्यावी चीत्ती ।।१।।
होसी आनाथाचा नाथ । वेगी येई बा धावत ।।२।।
तुजवीण प्रीयकरा । देव नेणे मी दुसरा ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । भेटी देई चीदंबरा ।।४।।

१२८९६५

कीती मार्ग पाहावीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।१।।
तुज ऐसा दुजा कोन्ही । देव नसे त्रीभुवनी ।।२।।
माझेवीसी जाले काये । तुज कैसी करुणा न ये ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । तुजवीण मी उदास ।।४।।

१२८९६६

दुरदेसी ब्राम्हण । आसे तैलंग तो जाण ।।१।।
आला स्वामी चरणापासी । ईछा धरुनी मानसी ।।२।।
म्हणे व्हावे माझे लग्न । वीप्र आसे द्रव्यहीन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी वीनंती स्वामीस ।।४।।

१२८९६७

स्वामीराया क्रपा करा । जाणे माझीया आंतरा ।।१।।
पत्र मज येक द्यावे । माझे लग्न करवावे ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । पत्र न दे मी कोणासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हा ईश्वर ।।४।।

१२८९६८

स्वामी म्हणती वीप्रासी । चिंता न करी मनासी ।।१।।
आज्ञेप्रमाणे वर्तावे । सांगे तीकडे त्वा जावे ।।२।।
पत्र मागणे ते काये । मनुश्य क्रती दीसताहे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उघड बोले तो ईश्वर ।।४।।

१२८९६९

अवीद्या रुपी ते मानव । न कळे बोलण्याचा भाव ।।१।।
बोले उघड ईश्वर । करुनी दावी चीदंबर ।।२।।
सांगे नाव ब्राम्हणासी । आसे वीप्राचा तो व्देसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नवल वाटे ब्राम्हणास ।।४।।

१२८९७०

ब्राम्हण म्हणतसे पाहे । माझा व्देष करीता हे ।।१।।
त्याजकडे पाठवीता । कैसे कार्य होईल आता ।।२।।
त्यासी म्हणे चीदंबर । कळा ईश्वराची थोर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । प्रत्यय दावीती तयास ।।४।।

१२८९७१

माझे आज्ञेवरुनी जावे । तुज शरण येतो भावे ।।१।।
क्रपा करुनी तुजसी । देतो द्रव्य ते लग्नासी ।।२।।
माझी आज्ञा हे प्रामाण । त्यासी बोलवीता कोण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय तयास ।।४।।

१२८९७२

आज्ञा घेउनी ब्राम्हण । नीघे त्वरीत तो जाण ।।१।।
गेला त्याचीया घरासी । तेणे देखीले वीप्रासी ।।२।।
धाउन आला तो समोर । डोई ठेवी पायावर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कळा दावी हे ईश्वर ।।४।।

१२८९७३

ब्राम्हण म्हणे तयालागी । स्वामी पाठवीती वेगी ।।१।।
आज्ञेवरुनीया जाण । जाले आपुले दरशण ।।२।।
म्हणे वीप्रालागी स्वामी । मज क्रपा केली तुम्ही ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बुधीदाता हा ईश्वर ।।४।।

१२८९७४

क्रपा करुनी तयासी । दील्हे रुपय लगनासी ।।१।।
पाचशत रुपय जाण । त्वरे दील्हे हुंडी करुन ।।२।।
वस्त्रे भुषणे देउन । वेगी पाठवीला जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कळा दावीसी ईश्वरा ।।४।।

१२८९७५

लगन करुनी वेगेसी । वीप्र आला स्वामीपासी ।।१।।
लीलाधारी वीश्वंभरा । वीप्र म्हणे चीदंबरा ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । समर्थ ब्राम्हण तु होसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वर्तवी ते चराचर ।।४।।

१२८९७६

चरीत्र १५२

चीदंबरराया पतीतपावना । येउ दे करुणा माझी देवा ।।१।।
कोठवरी अंत घेसी बा आनंता । ब्रीद भगवंता जतन करी ।।२।।
तळमळी बाळ नये कळवळा । पाहासी का डोळा कौतुक हे ।।३।।
दास म्हणे होसी माय आनाथासी । नीष्टुर जालासी कैसा आता ।।४।।

१२८९७७

कोठवरी धावा करवीसी देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।१।।
कलयुगी आवतार बाळालागी माये । याची वेळे काय जाले तुम्हा ।।२।।
करुणावंत धणी म्हणवीसी आता । को हो प्राणनाथा वेळ केला ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेचा सागर । यावे सत्वर चीदंबरा ।।४।।

१२८९७८

तुजवीण प्रीय नेणे मी आणीक । आंतरीचे देख जाणसी तु ।।१।।
तनमन धण आर्पीले पाई । तुजवीण नाही प्रीय जगी ।।२।।
घर दारा सुत समर्पीले तुज । ब्रीदाची हे लाज रक्षी आता ।।३।।
दास म्हणे कीती देउ परीहार । जाणसी आंतर चीदंबरा ।।४।।

१२८९७९

न देखवे दुःख पुढील्याचे मज । वीनवीले तुज चीदंबरा ।।१।।
केली हो प्रार्थना तुम्हा वीश्वपती । अंत घ्यावा कीती स्वामीराया ।।२।।
बळे चीदंबरा प्रसन्न जालासी । याची वेळे कैसी गती जाली ।।३।।
दास म्हणे कीती करुणा भाकवीसी । दया तुज कैसी न ये माझी ।।४।।

१२८९८०

येउ द्यावी दया चिदंबरराया । जाउ नेदी वाया धावा करीता ।।१।।
पतीतपावन नाम साजे तुम्हा । ब्रीद पुरुषोत्तमा जतन करी ।।२।।
पाहातो मी वाट च्यातकाचे परी । येउ दे आंतरी दया काही ।।३।।
दास म्हणे होसी माय दीनालागी । चिदंबरा वेगी यावे आता ।।४।।
१२८९८१

येउ दे करुणा क्रपेच्या नीधाना । पावे मज दीना ऐश्यावेळे ।।१।।
आडील्या नीर्वाणी धावा करीती कोन्ही । जासी बा धावोनी तयाठाई ।।२।।
काय जाले तुज माझेवीसी आता । वेळ प्राणनाथा लावीसी का ।।३।।
दास म्हणे दावी चरणकमळ । नीवारी तळमळ चीदंबरा ।।४।।
१२८९८२

भक्त तुझा कोन्ही पडता संकटी । चीदंबरा भेटी देसी त्यासी ।।१।।
करीतसे धावा वीप्र येक वनी । ब्राम्हण दुरोनी येत आसे ।।२।।
आरण्यात त्यासी न सापडे वाट । पुढे आसे घाट डोंगराचा ।।३।।
दास म्हणे तेथे वीप्र करी धावा । वाट दावी देवा चीदंबरा ।।४।।
१२८९८३

चोराचीये जागा न सापडे मार्ग । होतो उपसर्ग बहुता येथे ।।१।।
भाकीतो करुणा येकला ब्राम्हण । प्रगट जाले जाण स्वामी तेथे ।।२।।
धरीला तो वेष श्रुद्राचा त्या वेळे । बोलावीतो बळे ब्राम्हणासी ।।३।।
दास म्हणे त्यासी दावीतसे वाट । चढोनीया घाट नेलेवरी ।।४।।

१२८९८४

वीप्र पुसे तया कोठोनी आलासी । सांगे ब्राम्हणासी येथे आसतो ।।१।।
जावे तुम्ही वेगी याची मार्गेकरुनी । चिदंबर नयनी पाहावा तो ।।२।।
ऐसे सांगोनीया तेथे गुप्त जाला । पाहे भवताला ब्राम्हण तो ।।३।।
दास म्हणे आसे दयाळ दीनाचा । लौकीक ब्रीदाचा रक्षीतसे ।।४।।

१२८९८५

धुंडीत चालीला तयासी ब्राम्हण । न पडे तो जाण द्रीष्टी कदा ।।१।।
वीप्र म्हणे काय कवतुक ईश्वरे । दावीयले खरे नवल हेची ।।२।।
धन्य चीदंबरा न कळे तुझी कळा । दावीयले डोळा रुप मज ।।३।।
दास म्हणे वीप्र होवोनी सदगद । कळा हे आगाध म्हणे तुझी ।।४।।

१२८९८६

चीदंबरापासी येवोनी ब्राम्हण । जाय लोटांगण माहाव्दारी ।।१।।
येवोनीया स्वामी उठवीती तयासी । प्रत्यय स्वामीसी सांगतसे ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी भावीक तु होसी । ईश्वर तुजसी रक्षीतसे ।।३।।
दास म्हणे ऐसी दावीतसे कळा । ब्रम्हीचा पुतळा चीदंबर ।।४।।

१२८९८७

चरीत्र १५३

चीदंबरा स्वामीराया । करी आनाथासी दया ।।१।।
क्रपावंत माय होसी । काय जाले माझेवीसी ।।२।।
वाट पाहु कोठवरी । दया येउ दे आंतरी ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२८९८८

कीती करुणा भाकवीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।१।।
दया येउ दे दीनाची । लज्या रक्षी हे ब्रीदाची ।।२।।
करुणा भाकु कोठवरी । दया येउ दे आंतरी ।।३।।
दास म्हणे सर्वगता । दावी चरण आनंता ।।४।।

१२८९८९

सांभाळावे दीनालागी । कळवी आवतार जगी ।।१।।
वीनवीतो याजसाटी । दया येउ द्यावी पोटी ।।२।।
कोठवरी वाट पाहु । स्वामी अंत नये घेउ ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२८९९०

करुणावंत स्वामीराजा । हेत पुरवी तु माझा ।।१।।
आभयदाने सुखी केले । माझे मन नीववीले ।।२।।
आशा लागली आंतरी । दावी रुप डोळेभरी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । वेळ न करी ईश्वरा ।।४।।

१२८९९१

गंगातीरी प्रतीष्टान । आला तेथील ब्राम्हण ।।१।।
भजन करीतसे जाण । पाई चाळ ते बांधुन ।।२।।
हाती घेवोनीया वीणा । आला स्वामीचा दर्षणा ।।३।।
दास म्हणे वीप्र जाण । आसे भावीक तो पुर्ण ।।४।।

१२८९९२

वीतरागी ब्रम्हच्यारी । वाटे येतो झडकरी ।।१।।
दोन दीवस उपोषण । हीरवी भाजी खाय जाण ।।२।।
तीसरे दीवसी स्वामीपासी । आला वीप्र माध्यानेसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाणे सर्वांचे आंतर ।।४।।

१२८९९३

स्वामी पुसताती जाण । तुमचे जाले का भोजन ।।१।।
भावीकासी भाव चीत्ती । जाले म्हणे स्वामीप्रती ।।२।।
आंतर साक्षी चीदंबर । जाणे सर्वांचे आंतर ।।३।।
दास म्हणे स्वामीराज । जाणे आंतरीचे गुज ।।४।।

१२८९९४

म्हणे तया ब्राम्हणासी । लटीके भाषण करीसी ।।१।।
आज दोन दीवस जाण । तुज घडले उपोषण ।।२।।
भाजी खासी कुसब्याची । बरी लागली का रुची ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाणे सर्वांचे आंतर ।।४।।

१२८९९५

आंतर जाणे मुंगीयाचे । जीव जंतु ब्रम्हयाचे ।।१।।
नलगे सांगणे तयासी । क्रपावंत माय होसी ।।२।।
आमृतराय तो ब्राम्हण । भावे जाय लोटांगण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी वीनंती स्वामीस ।।४।।

१२८९९६

स्वामीराया चीदंबरा । माझे जाणसी आंतरा ।।१।।
आंतरीचे गुज ठावे । कीती बोलोनी दावावे ।।२।।
पुर्ण करी मनोरथ । स्वामी आलो शरणांगत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी वीप्रावर ।।४।।

१२८९९७

आवतार ब्रम्हपुर्ण । कलयुगी तु सगुण ।।१।।
क्रपाकरी दीनावरी । बळे घेतले पदरी ।।२।।
होसी पतीतपावन । माझे नीववी हे मन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।।

१२८९९८

चरीत्र १५४

चीदंबरा करी क्रपा दीनालागी । आवतार जगी प्रगट करी ।।१।।
करीतो प्रार्थना पावे मज दीना । येउ दे करुणा स्वामीराया ।।२।।
तुजवीण प्रीय नेणे तीहीलोकी । स्वामी आवलोकी क्रपाद्रष्टी ।।३।।
दास म्हणे दावी आनाथासी पाये । तुची बापमाये चीदंबर ।।४।।

१२८९९९

तुजवीण सीण वाटे माझ्या जीवा । जाणसी तु देवा आंतरीचे ।।१।।
आंतरीचा साक्षी होसी करुणाघना । पतीतपावना चीदंबरा ।।२।।
दावी नीजरुप नीवारी भवताप । आवतार प्रताप प्रगट करी ।।३।।
दास म्हणे तुम्हा न लगे सांगणे । प्रगट बा होणे करुणानीधी ।।४।।

१२९०००

यात्रा रामेश्वराची आली दरुषणासी । वीच्यार चीतासी करीताती ।।१।।
दुरदेसी वीप्र गंगातीरकर । करीती वीच्यार तीघेजण ।।२।।
स्वामी दरुषणासी उद्या जाउ म्हणती । पाहावी प्रचीती आंतर साक्षी ।।३।।
दास म्हणे तीघे तीन ते प्रकार । भोजन वीच्यार करीती मनी ।।४।।

१२९००१

येके तो ब्राम्हण ईछा करी मनी । पुरणा घालोनी मोदक व्हावे ।।१।।
पुर्णाची मोदक खाईन पोटभर । जाणे तो आंतर चीदंबर ।।२।।
दुजा तो ब्राम्हण गव्हाची ते खीर । खावी पोटभर ईछा करी ।।३।।
दास म्हणे तीसरा ब्राम्हण तो म्हणे । प्रसाद तो घेणे देतील तोची ।।४।।

१२९००२

वीच्यार करोनी वीप्र तीघेजण । स्वामीपासी जाण येते जाले ।।१।।
घेतले दरुषण उभे कर जोडुन । बोलावीले जाण भोजनासी ।।२।।
सहश्रावधी पंगती बैसली भोजना । चीदंबर जाणा आले तेथे ।।३।।
दास म्हणे स्वामी उभे वीप्रापासी । भोजन तीघासी करवीती ।।४।।

१२९००३

उभे चीदंबर सांगती वीच्यार । भोजन प्रकार तीघालागी ।।१।।
येका ब्राम्हणासी पुर्णाचे मोदक । वाढवीती देख तुपासंगे ।।२।।
आणीक पदार्थ दुयासी काही । न वाढावा पाही सांगताती ।।३।।
दास म्हणे स्वामी आंतर तो साक्षी । आसे सर्वापक्षी ह्रदयस्त ।।४।।

१२९००४

दुसरा ब्राम्हण होता ईछाधरुन । भोजन ते जाण क्षीर त्यासी ।।१।।
गव्हाची ते क्षीर वाढवीती फार । पदार्थ ईतर नको म्हणती ।।२।।
घ्रत त्याजवर वाढीले ते जाण । ईछेचे भोजन करा म्हणती ।।३।।
दास म्हणे वीप्र आश्चर्य करीत । आवतार सत्य चिदंबरा ।।४।।

१२९००५

तीसरा ब्राम्हण भावीक तो जाण । स्वामी क्रपा करुन त्यासी म्हणती ।।१।।
येथील प्रसाद सर्व जाला आसे । ईछा दुजी नसे तुम्हासी ते ।।२।।
भक्तराज तुम्ही करावे भोजन । पदार्थ घेउन सर्व तेही ।।३।।
दास म्हणे ऐसा चिदंबर धणी । आवतार करणी दावीतसे ।।४।।

१२९००६

ब्राम्हण ते तीघे आश्चर्य करीती । लोटांगणी जाती स्वामीपुढे ।।१।।
करीती प्रार्थना स्वामीलागी जाण । आवतार सगुण सत्य तुची ।।२।।
आंतरीचा साक्षी आणीले आनुभवा । देवाचीया देवा चिदंबरा ।।३।।
दास म्हणे वीप्र उभे कर जोडुन । करावे पावन आनाथासी ।।४।।

१२९००७

पतीतपावन नाम साजे तुम्हा । स्वामी पुरुषोतमा चीदंबरा ।।१।।
आपराध क्षमा करी वीस्वंभरा । सगुण चिदंबरा देखीलासी ।।२।।
तुज ऐसा ईस्वर दुजा नसे कोन्ही । देखीला नयनी भाग्योदय ।।३।।
दास म्हणे ऐसे वीप्र वीनवीती । आगाध हे कीर्ती चिदंबर ।।४।।

१२९००८

आनंदे करुनी बोले चिदंबर । भक्तराज थोर तुम्ही आपा ।।१।।
क्रपा तुम्हावरी करीतो ईस्वर । नीरोप सत्वर दील्हा त्यासी ।।२।।
आनंदे ब्राम्हण करीती वर्णन । आवतार धन्य म्हणती स्वामी ।।३।।
दास म्हणे ऐसा कलयुगी आवतार । प्रगट चिदंबर लीला दावी ।।४।।

१२९००९

चरीत्र १५५

चीदंबरा पुर्णब्रम्हा । दावी रुप पुरुषोतमा ।।१।।
तुझा आगाध महीमा । वेदादीका जाली सीमा ।।२।।
स्वामीराया पुर्णकामा । यावे जीवीच्या जीवना ।।३।।
दासाचीया प्रीयोतमा । प्रगट व्हावे पुर्णकामा ।।४।।

१२९०१०

नीज रुप दावी डोळा । चीदंबरा घननीळा ।।१।।
वेगी यावे वीश्वपाळा । दावी आवतार कळा ।।२।।
प्रार्थीतो मी वेळोवेळा । प्रगट व्हावे वीश्वपाळा ।।३।।
होसी दासाचा जीव्हाळा । चीदंबरा बा नीर्मळा ।।४।।

१२९०११

कळा तुझी आघटीत । वेदादीका न कळे मात ।।१।।
रात्री दावीसी द्रीष्टांत । येवोनी सांगसी स्वप्नांत ।।२।।
येता ज्याग्रत वेळेसी । उघड द्रीष्टीसी दावीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । येसी भक्ताच्या कैवारा ।।४।।

१२९०१२

कार्तीक वद्य तु शष्टीसी । आवतार प्रगट करीसी ।।१।।
यात्रा येती दरुषणासी । तया प्रत्यय दावीसी ।।२।।
कोष्टी आला दरुषणासी । नीश्चय तुझीया पायासी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कळा दावीसी ईश्वरा ।।४।।

१२९०१३

कोष्टी आसे भक्तराज । त्याचे केला तुम्ही काज ।।१।।
जवळी नसे खर्चायासी । संकट पडले तयासी ।।२।।
चीती आठवी चीदंबरा । काय करु मी ईश्वरा ।।३।।
दास म्हणे तो आंतरी । चीदंबर ध्यान करी ।।४।।

१२९०१४

चीदंबरा स्वामीराया । काय करु मी सखया ।।१।।
आलो तुझीया यात्रेसी । जवळी नसे ते खर्चासी ।।२।।
कोष्टी करीतो वीनंती । आले जवळी सांगाती ।।३।।
म्हणे चीदंबरा दास । स्वप्न जाले बा तयास ।।४।।

१२९०१५

रात्री नीजला देउळात । चींता करी तो मनात ।।१।।
ब्राम्हणाचे रुपेकरुन । स्वामी देती त्यासी स्वप्न ।।२।।
स्वप्नी सांगती तयासी । बळे चींता का वाहासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । स्वामी द्रीष्टांती वीच्यार ।।४।।

१२९०१६

स्वप्नी येवोनी चीदंबर । सांगे तयासी प्रखर ।।१।।
स्वरुप धरोनी वीप्राचे । दावी रुप हे तयाचे ।।२।।
येथे रुपय ठेवीले । त्यासी द्रीष्टीने दावीले ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी बांधीती पदरात ।।४।।

१२९०१७

ज्याग्रत होवोनीया जाण । सांगे जवळील्यासी स्वप्न ।।१।।
स्वप्नी येवोनी ब्राम्हण । रुपय दील्हे मज तीन ।।२।।
ते म्या बांधीले पदरासी । ऐसे सांगे सोबत्यासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । लागे गाठोडी हातास ।।४।।

१२९०१८

पदरी बांधीले गाठोडी । भक्तराज हाते सोडी ।।१।।
रुपय दोनशे वर्षाचे । नव्हे आजीचे कालीचे ।।२।।
आसे जुनाट तो सीक्का । सोडुनी दावीतसे लोका ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय जगास ।।४।।

१२९०१९

कलयुगी आवतार । लीला दावी चीदंबर ।।१।।
स्वप्न लटीके म्हणती । उघड दावीती प्रचीती ।।२।।
नीत्य नवी दावी कळा । जन पाहाताती डोळा ।।३।।
दास म्हणे वीश्वंभर । सगुण रुप चीदंबर ।।४।।

१२९०२०

चरीत्र १५६

चीदंबर धणी आसे त्रैलोक्यासी । दया आनाथासी करीतसे ।।१।।
दीनालागी माता ब्रम्हांड रक्षीता । ज्याचे हाती सत्ता सर्व आसे ।।२।।
सगुण रुप जाला स्वामी कलयुगी । आवतार जगी प्रगटला ।।३।।
दास म्हणे आसे दयाळ दीनाचा । कैवारी भक्ताचा स्वामी माझा ।।४।।

१२९०२१

येउ दे करुणा क्रपेच्या नीधाना । पावे मज दीना औशावेळे ।।१।।
करीतो प्रार्थना पुरवी वासना । आंतर सुजाना जाणसी तु ।।२।।
आभयदान दील्हे बाहेर काढीले । पाहीजे रक्षीले ऐशावेळे ।।३।।
दास म्हणे कीती लावीसी उसीर । यावे बा सत्वर चीदंबरा ।।४।।

१२९०२२

करीतो मी धावा सर्वकाळ देवा । येउ दे कणवा माझा काही ।।१।।
कीती वीनवावे तुम्हा पुरुशोतमा । वेळ सर्वोतमा लाउ नये ।।२।।
बोलुनीया कीती दाउ वीश्वपती । दया तुजप्रती न ये माझी ।।३।।
दास म्हणे होसी कैवारी मजसी । वेळ का लावीसी चीदंबरा ।।४।।

१२९०२३

तुजवीण कोण कैवारी मजसी । नीष्टुर जालासी काय म्हणुनी ।।१।।
तुजवीण नेणे दैवत आणीक । ब्रम्हांडात देख चीदंबरा ।।२।।
जालासी कठीण हासती दुर्जन । लागते लांछन ब्रीदासी हे ।।३।।
दास म्हणे तुम्हा सांगावे ते काय । होसी बापमाय चीदंबरा ।।४।।

१२९०२४

आनाथाचि माय होसी चिदंबरा । दिनाच्या कैवारा धावसी तु ।।१।।
पाहातो मि वाट च्यातकाचे परि । दया का आंतरि नये माझि ।।२।।
म्हणवितो बाळ तुझे देवराया । समर्पिली काया तुझे पाई ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेचा सागर । यावे बा सत्वर चिदंबरा ।।४।।

१२९०२५

येउ द्यावी दया मज आनाथाची । लज्या हे ब्रीदाची रक्षी देवा ।।१।।
आज्ञेवरुनी करणे लागे वर्तणुक । दावीसी कौतुक चीदंबरा ।।२।।
कलीचे हे जन वीकल्पी दुर्जन । करीता भाषण नये त्यासी ।।३।।
जैसा ज्याचा भाव तैसा त्यासी होसी । दास पतीतासी पावन तु ।।४।।
१२९०२६

नसे मज काही कारण जनासी । आंतर जाणसी चीदंबरा ।।१।।
नलगे परीहार देणे बा तुम्हासी । तुची वर्तवीसी बळे देवा ।।२।।
करणे तुजसी आवतार क्रत्य । वर्तवीसी सत्य तयापरी ।।३।।
दास म्हणे होसी ब्रम्हांड नीर्मीता । तुझे हाती सत्ता चीदंबरा ।।४।।
१२९०२७

दक्षण तो देसी तैलंग ब्राम्हण । भक्तराज पुर्ण होता जाणा ।।१।।
चीदंबरावीण नेणे तो दैवत । होतसे प्रचीत बहुतासी ।।२।।
फीरंग्याचे राज्य येती कारकुन । भक्तीसी ते जाण लागले ते ।।३।।
दास म्हणे कोन्ही नींदक दुर्जन । सांगे वर्तमान फीरंग्यासी ।।४।।
१२९०२८

फीरंग्याने त्यासी बोलाउनी जाण । म्हणती कारकुन भुलवीले ।।१।।
येवोनी रागासी कैचा भक्त म्हणे । तोफेसी बांधणे याची वेळे ।।२।।
भरोनीया तोफ बांधोनी तोंडासी । ईंग्रेज द्रीष्टीसी पाहातसे ।।३।।
दास म्हणे त्याचा चीदंबर धणी । पाहाती उडवोनी तोफ सर्व ।।४।।

१२९०२९

बांधोनीया त्यासी लावीयेले बत्ती । रंजक ते पीती तोफ तेणे ।।१।।
तीन वेळा तोफ पाहीली उडउन । काना वाटे जाण बार होय ।।२।।
आश्चर्य करोनी फीरंगी चीत्तासी । सोडवीले त्यासी तोफेहुनी ।।३।।
दास म्हणे त्यासी सोडीताची क्षणी । आवाज गर्जोनी उडे तोफ ।।४।।

१२९०३०

न लावीता बत्ती तोफ ते उडाली । फीरंगी तो घाली मीठी पाई ।।१।।
धन्य चीदंबर धन्य तुची भक्त । पाहीली प्रचीती नवल परी ।।२।।
करीतो प्रार्थना ईंग्रेज ब्राम्हणा । टोपी काढुन जाणा शरण येतो ।।३।।
चीदंबर भक्त नीघे तो ब्राम्हण । न घेती दर्षण कदा त्याचे ।।४।।
दास म्हणे लागे फीरंगे पाटीसी । देतो मी तुजसी मागसी ते ।।५।।

१२९०३१

बोले तो ब्राम्हण न घे मी दर्षण । तुजसी मागणे काय मज ।।१।।
धणी चीदंबर आसे त्रैलोक्यासी । तेणे का आम्हासी उपेक्षीले ।।२।।
त्याचे सत्यवीण न हालेची पान । जावे त्वा फीरोन मागे आता ।।३।।
दास म्हणे कळा दावी चीदंबर । कलयुगी आवतार स्वामी माझा ।।४।।

१२९०३२

चरीत्र १५७

वेगी यावे चीदंबरा । दीन जनाच्या कैवारा ।।१।।
वाट पाहातो नीसीदीनी । दया येउ द्यावी मनी ।।२।।
करुणावंत माय होसी । स्वामी वेळ का लावीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । प्रगट व्हावे प्राणेश्वरा ।।४।।

१२९०३३

करुणा येउ दे दीनाची । माय होसी आनाथाची ।।१।।
नीत्य करीतो मी धावा । पावे देवाचीया देवा ।।२।।
तुजवीण नाही कोन्ही । जीवलग त्रीभुवनी ।।३।।
दास म्हणे प्रीयकरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९०३४

दावी रुप सर्वोत्तमा । तुझा आगाध महीमा ।।१।।
यावे दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा ।।२।।
तुजवीण चीदंबरा । देव नेणे मी दुसरा ।।३।।
दासालागी पावे आता । स्वामीराया क्रपावंता ।।४।।

१२९०३५

दावी दावी रुप सगुण । माझे नीववी हे मन ।।१।।
होसी क्रपावंत धणी । तुची येक त्रीभुवनी ।।२।।
तुझे हाती सर्वसत्ता । वेळ लावीसी का आता ।।३।।
चीदंबर म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९०३६

पार नसे सामर्थ्यासी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
करुणावंत माझे आई । आनाथासी भेटी देई ।।२।।
सर्व कळा तुझे हाती । वेळ न करी श्रीपती ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । यावे दीनाच्या कैवारा ।।४।।

१२९०३७

धावे पावे वीश्वंभरा । स्वामीराया चिदंबरा ।।१।।
करुणावंत म्हणविसी । काय जाले माझेवीसी ।।२।।
तुजवीण स्वामीराजा । जीव झुरतसे माझा ।।३।।
दास म्हणे सर्वगता । चिदंबरा ये समर्था ।।४।।

१२९०३८

ब्राम्हण येक दुर देसी । आला स्वामी पायापासि ।।१।।
बहुत दरिद्रे पीडीला । करी विनंती स्वामिला ।।२।।
करुणा ये उदे ईश्वरा । सांग क्रपेच्या सागरा ।।३।।
दास म्हणे चिदंबर । क्रपा करी दिनावर ।।४।।

१२९०३९

चिदंबर क्रपावंत । निरोप वीप्रालागी देत ।।१।।
स्वामी बोले ब्राम्हणासी । बहुत दरीद्रे पिडीलासी ।।२।।
क्रपा करि तो ईश्वर । तांदुळ दिल्हे एकसेर ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । क्रपा करि विप्रावर ।।४।।

१२९०४०

ब्राम्हण आनंदेकरुन । आपुले घरी गेला जाण ।।१।।
तांदुळ नेवोनी ठेवीले । पुजा करोनी सोडीले ।।२।।
जाले आसे ते सुवर्ण । आनंद ब्राम्हणासी पुर्ण ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । लीला दावीसी ईश्वरा ।।४।।

१२९०४१

कलयुगी आवतार । प्रगट जाला चीदंबर ।।१।।
कळा दावी नानापरी । दुःख दारीद्र नीवारी ।।२।।
पुर्णब्रम्ह आवतार । सगुण स्वामी चीदंबर ।।३।।
दास म्हणे वीश्वपती । कळा दावी नानारीती ।।४।।

१२९०४२

चीदंबरा सर्वगता । दीनालागी पावे आता ।।१।।
तुजवीण प्राणेश्वरा । देव नेणे मी दुसरा ।।२।।
वाट पाहु कोठवरी । आभय दील्हे नानापरी ।।३।।
दास रंक तुझे व्दारी । दावी रुप डोळेभरी ।।४।।
१२९०४३

चरीत्र १५८

का हो चीदंबरा लावीयला वेळ । होसी तु दयाळ मायबाप ।।१।।
जीवीच्या जीवना पुरवी वासना । येउ दे करुणा माझी देवा ।।२।।
तुजवीण प्रीय नेणे मी आणीक । जाणसी तु देख आंतरीचे ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेची तु माता । चीदंबरा आता न करी वेळ ।।४।।

१२९०४४

यावे जीवलगा क्रपेच्या सागरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।१।।
दावी नीजरुप स्वामी क्रपावंता । नीवारी हे चींता भवदुःख ।।२।।
नको वेळ करु आनाथाचे आई । येवोनी ह्रदई राहे माझ्या ।।३।।
दास म्हणे व्हावे सगुण रुप पुढे । मन जाले वेडे तुजसाठी ।।४।।

१२९०४५

घेउ नये आंत स्वामी क्रपावंता । वेळ भगवंता लावीसी का ।।१।।
करणे तुजसी प्रगट आवतार । लावी उसीर काय म्हणोनी ।।२।।
क्षणभगुंर देह आयुष हे थोडे । दावी बा नीवाडे रुप वेगी ।।३।।
चीदंबरा दास दील्हे आभयदान । नीववी हे मन वेगी आता ।।४।।

१२९०४६

कोणते कठीण तुम्हासी ईश्वरा । भेटी चीदंबरा देता मज ।।१।।
का हो देवराया वीसरला मजसी । ब्रीदावळी कैसी राहे येणे ।।२।।
कोठवरी धावा करवीसी आता । बैसला आनंता कंठ माझा ।।३।।
चीदंबरा दास दावी रुप सगुण । उत्धरी हे जन क्रपाद्रीष्टी ।।४।।

१२९०४७

तैलंग ब्राम्हण चीदंबरापासी । आला दरुषणासी पुत्रसंगे ।।१।।
वीनवी स्वामीसी ब्राम्हण तो जाण । पुत्राचे हे लग्न करुणी द्यावे ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी न करावी चींता । कठीण भगवंता लगन काये ।।३।।
दास म्हणे वीप्र आशा धरुनी राहे । वर्ष जाले पाहे च्यार त्यासी ।।४।।

१२९०४८

च्यार वर्षे जाले वीप्रासी ते जाण । कैलासी नीघोन गेले स्वामी ।।१।।
वीप्र करी चींता काय करु आता । घात भगवंता केला माझा ।।२।।
लावोनीया आशा लगन राहावीले । ब्रीद गमावीले कैसे देवा ।।३।।
दास म्हणे नीघे वीप्र घरालागी । बांधोनीया वेगी कंबर तो ।।४।।

१२९०४९

स्वामीलागी पुत्र जेष्ट दीवाकर । येवोनी सत्वर पुसे त्यासी ।।१।।
दीवाकर आपा आसे सत्य धीर । सांगे तो वीच्यार ब्राम्हणासी ।।२।।
शण्मास राहावे देतो लग्न करुन । स्वामीचे वचन सत्य आसे ।।३।।
दास म्हणे भ्रांती ब्राम्हणासी जाण । बोले तो फीरोन रागे करुन ।।४।।

१२९०५०

प्रत्यक्ष ईश्वर स्वामी चीदंबर । तेणे वर्ष च्यार लावीयेले ।।१।।
सेवटी सांडुन गेले ते आम्हासी । काय तुम्हापासी राहोनी आता ।।२।।
भ्रांती रुप वीप्र गेले म्हणतसे । ईश्वरासी कैसे साजेल हे ।।३।।
दास म्हणे देव द्रश्य ते आद्रश्य । प्रगटावया नसे वेळ त्यासी ।।४।।

१२९०५१

ब्राम्हण तो नीघे गावाचे बाहेर । लीला चीदंबर दावीतसे ।।१।।
गाव त्याचे आसे वाटे पंधरा दीवस । प्रगट घरास जाले त्याच्या ।।२।।
चीदंबर जाय त्याचीया घरासी । वीप्र ते कांतेसी बोलावीले ।।३।।
दास म्हणे तीसी भेटी ते देउन । रुपया दीले जाण दोन सहश्र ।।४।।

१२९०५२

वीप्रकांता पुसे स्वामी तुम्ही कोण । चीदंबर जाण नाम सांगे ।।१।।
चीदंबरापासी भ्रतार तो माझा । गेला लग्न काजा पुत्राचीया ।।२।।
तेची तुम्ही काय पुसे वीप्राकांता । होसोनीया आता बोले स्वामी ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती तीयेसी । तोची मी यात्रेसी जातो आता ।।४।।

१२९०५३

येतसे मागुन तुझा तो भ्रतार । पुत्र बरोबर आसे त्याच्या ।।१।।
सांगावे तयासी ध्यावे लग्न करुन । गावांत हे जाण वधु आसे ।।२।।
मागावी ते कन्या देईल तुम्हासी । नीरोप पतीसी सांगे तुझ्या ।।३।।
दास म्हणे रुपय दोन सहश्र दील्हे । चीदंबर गेले तेथुनी पुढे ।।४।।

१२९०५४

आठा दीवसी आला ब्राम्हण तो जाण । पुत्रासी घेउन बरोबर ।।१।।
चींताक्रांत बैसे येवोनी घरात । म्हणे केला घात चीदंबरा ।।२।।
कांता येवोनीया सांगे वर्तमान । चीदंबरे जाण क्रपा केली ।।३।।
दास म्हणे वीप्र नवल तो करी । काय बोले नारी म्हणोनीया ।।४।।

१२९०५५

कैसे क्रपा केली पुसे तो कांतेसी । सांगे ती पतीसी वर्तमान ।।१।।
आठ दीवस जाले चीदंबर आले । रुपय मज दील्हे दोन सहश्र ।।२।।
सांगीतले मज नीरोप सांगणे । भ्रतारासी जाण आपुलीया ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलीले ते कैसे । कांता सांगतसे भ्रतारासी ।।४।।

१२९०५६

गांवातची वधु मागे वीप्रापासी । लग्न आनंदेसी करुनी घ्यावे ।।१।।
ठेवीले रुपय आणोनी पतीपुढे । ब्राम्हण ते वेडे होउनी पाहे ।।२।।
धन्य चीदंबरा नवल आघटीत । बोलीलो बहुत आन्याई मी ।।३।।
दास म्हणे वीप्र जाय लोटांगणी । सग्दद होवोनी आठवीतो ।।४।।

१२९०५७

करोनीया लग्न पुत्राचे ते जाण । आला तो ब्राम्हण मुरगोडासी ।।१।।
सांगे वर्तमान आंनदे करुन । जाय लोटांगण केंगेरीसी ।।२।।
धन्य चीदंबरा कलयुगी आवतारा । प्रगट वीश्वंभरा लीला केली ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । आनंद सोहळा नीत्य नवा ।।४।।

१२९०५८

चरीत्र १५९

करुणावंतो माझे आई । आनाथासी भेटी देई ।।१।।
जीव माझा कासावीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।२।।
दया येउ दे आंतरी । पावन ब्रीद जतन करी ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९०५९

यावे यावे करुणाघना । स्वामी जीवीच्या जीवना ।।१।।
दावी रुप तु सगुणा । चीदंबरा मनमोहना ।।२।।
होसी क्रपेची तु माता । वेळ लावीसी का आता ।।३।।
दास म्हणे सर्वगता । दावी चरण आनंता ।।४।।

१२९०६०

धावे पावे जीवलगा । चीदंबरा बा श्रीरंगा ।।१।।
वाट पाहु कोठवरी । दावी रुप डोळेभरी ।।२।।
करुणावंत म्हणवीसी । काय जाले माझेवीसी ।।३।।
दास म्हणे दावी चरण । चीदंबरा आलो शरण ।।४।।

१२९०६१

तुझवीण मी उदास । नसो दुजीयाची आस ।।१।।
माझे आंतर जाणसी । तुज दया न ये कैसी ।।२।।
कीती वाट पाहावीसी । कैसा कठीण जालासी ।।३।।
पावे दास पतीतासी । चीदंबरा पावन होसी ।।४।।

१२९०६२

तुझे हाती सर्वसत्ता । वेळ लावीसी का आता ।।१।।
करुणा येउ दे दीनाची । लज्जा रक्षी हे ब्रीदाची ।।२।।
करुणावंत तुची धणी । आनंत ब्रम्हांडभुवनी ।।३।।
दासा रुप दावी नयनी । चीदंबरा चक्रपाणी ।।४।।

१२९०६३

ईच्छा धरुनी कोन्ही येती । तेची देसी तयाप्रती ।।१।।
आंतरीचा साक्षी होसी । क्रपावंत माय होसी ।।२।।
ब्राम्हण येती दुरदेसी । चौघे जण सोबतीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाणे सर्वाचे आंतर ।।४।।

१२९०६४

दीप्र चेती दरुषणासी । ईच्छा धरीती मानसी ।।१।।
वाटे जाता दीच्यारीती । येक येकासी बोलती ।।२।।
येक बोले तो ब्राम्हण । कांदे भाकरी भोजन ।।३।।
म्हणे ईच्छा हे चीत्तास । चीदंबरा मागे दास ।।४।।

१२९०६५

कांदे भाकरी मीरची । ईच्छा आसे त्या वीप्रासी ।।१।।
खावे बैसोनी मळ्यांत । ऐसे वीच्यारी चीत्तात ।।२।।
दुसरे म्हणती तीघेजण । कोसंबीर पानक जाण ।।३।।
ईच्छा त्याचीया चीत्तास । म्हणे चीदंबर दास ।।४।।

१२९०६६

आले येका कोसावरी । चीदंबर त्वरा करी ।।१।।
मीरची कांदे त्या भाकरी । पाठवीली त्या समोरी ।।२।।
आला भाकरी घेउन । वाटे भेटे तो ब्राम्हण ।।३।।
येथे करावे भोजन । मग घ्यावे बा दर्षण ।।४।।
म्हणे चीदंबर दास । प्रत्यय दावीला वीप्रास ।।५।।

१२९०६७

ब्राम्हण करोनी भोजन । ईतर ते तीघेजण ।।१।।
पानक ते कोसंबीर । तया देती चीदंबर ।।२।।
पोट भरोनीया घ्यावे । मग दर्षणासी यावे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । नवल वाटे ब्राम्हणास ।।४।।

१२९०६८

वीप्र आले दरुषणासी । स्वामी बोलती तयासी ।।१।।
ब्राम्हण बहुत तुम्ही थोर । ईछा पुरवीतो ईश्वर ।।२।।
वीप्र जाती लोटांगणी । उभे कर ते जोडोनी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी आवतार ।।४।।

१२९०६९

चरीत्र १६०

चीदंबरराया येउ दे करुणा । क्रपेच्या नीधाना प्रगट व्हावे ।।१।।
क्रपावंत धणी तुची त्रीभुवनी । आवतार करणी करुनी दावी ।।२।।
करीतो मी धावा सर्वकाळ देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।३।।
दास म्हणे दावी सगुण तुझे रुप । नीवारी भवताप स्वामीराया ।।४।।

१२९०७०

यावे दीनानाथा पावे मज आनाथासी । दया तुज कैसी न ये माझी ।।१।।
तारी दीनालागी स्वामीराया वेगी । कीर्ती तुझी जगी वर्णवी बा ।।२।।
नये वेळ करु आनाथाच्या काजा । लौकीक हा तुझा रक्षी आता ।।३।।
दास म्हणे होसी दीनालागी माय । चीदंबरा पाय दावी वेगी ।।४।।

१२९०७१

पाहातसे वाट बैसोनी उपवासी । दया तुज कैसी न ये देवा ।।१।।
आभयदान दील्हे मन नीववीले । याच वेळे जाले काय तुम्हा ।।२।।
जालो उदासीन न पडे चईन । धावा करीता प्राण उरला कंठी ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेचा सागर । यावे बा सत्वर चीदंबरा ।।४।।

१२९०७२

कोण ते कठीण तुम्हासी ईश्वरा । भेटी चीदंबरा देता मज ।।१।।
पाहातो मी वाट ज्यात काचे परी । दया ते आंतरी नये कैसी ।।२।।
दावी नीजरुप सगुण सावळे । पुरवी डोहाळे मनीचे हे ।।३।।
दास म्हणे दावी चरण सकुमार । नीववी आंतर चीदंबर ।।४।।

१२७०७३

गरीब ब्राम्हण तैलंग देसीचा । लौकीक स्वामीचा ऐकुनि आला ।।१।।
येकुलता येक पुत्र बरोबर । घालि पायावर स्वामिचिया ।।२।।
देवी नीघोनिया जाला आसे आंध । पढावया वेद आणियला ।।३।।
दास म्हणे विप्र करितो वीनंती । चिदंबराप्रती करुणाभावे ।।४।।

१२७०७४

वीनवि स्वामिसि ब्राम्हण तो जाण । पुत्र हा अज्ञान जाला आसे ।।१।।
शोडष वर्षाचा जाला हा कुमर । न येताती आक्षर म्हणावया ।।२।।
म्हणोनि विनंती करितो पायासी । आक्षर पुत्रासी व्हावे काही ।।३।।
दास म्हणे स्वामि म्हणती वीप्रालागी । ब्राम्हण यालागी पढवावे ।।४।।

१२७०७५

करोनीया क्रपा आंध ब्राम्हणासी । नेत्र बा तयासी देते जाले ।।१।।
पढवीती ब्राम्हण आंध वीप्रालागी । आवतार जगी प्रगट हा ।।२।।
देवीने नीघोन नेत्र गेले जाणा । नेत्र त्या ब्राम्हणा देते जाले ।।३।।
देवीचा जो आंध नीट जाला कोन्ही । नायकीले कानी मात ऐसी ।।४।।
दास म्हणे कळा दावी चीदंबर । पाहाती लाहानथोर आश्चर्य हे ।।५।।

१२७०७६

म्हणतसे वेद आंध तो ब्राम्हण । कौतुक हे जाण उघड दावी ।।१।।
कलयुगी आवतार प्रगट चीदंबर । कळा हे आपार दावीतसे ।।२।।
पाहाती लाहान थोर आवतार चरीत्र । कळा हे वीचीत्र दावी स्वामी ।।३।।
दास म्हणे ऐसा आनंद सोहळा । दीनालागी डोळा दावीतसे ।।४।।

१२७०७७

करुणेची माता पावे दीनालागी । आवतार कलयुगी चीदंबरा ।।१।।
दीनाचा दयाळ करुणेची माता । ज्याचे हाती सत्ता सर्व आसे ।।२।।
प्रगट ईश्वर देखीला नयनी । धन्य तेची प्राणी श्रीष्टीवरी ।।३।।
दास म्हणे दावी उघड ते कळा । ब्रम्हीचा पुतळा चीदंबर ।।४।।

१२७०७८

यावे सर्वेश्वरा दीनाच्या कैवारा । कीती चीदंबरा वाट पाहु ।।१।।
सांभाळी सांभाळी आपुली ब्रीदावळी । यावे चेंद्रमौळी वेगी आता ।।२।।
करुणावंत माता वीश्वाचा जनक । दावीतो कौतुक नीत्य नवी ।।३।।
दास म्हणे काय जाले माझे वेळे । पुरवावे लळे चीदंबरा ।।४।।

१२७०७९

यावे दीनानाथा पावे आनाथासी । वाट पाहावीसी कोठवरी ।।१।।
शरीर जाले क्षीण कंठी उरला प्राण । दावी बा चरण चीदंबरा ।।२।।
रक्षी ब्रीद आता स्वामी प्राणनाथा । नुपेक्षी सर्वथा आनाथासी ।।३।।
दास म्हणे रक्षी ब्रीद वीश्वंभरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।४।।

१२७०८०

चरीत्र १६१

यावे यावे सर्वगता । चीदंबरा बा आनंता ।।१।।
रक्षी रक्षी दीनालागी । कळवी आवतार जगी ।।२।।
होसी पतीतपावन । ब्रीद करावे जतन ।।३।।
पावे दास आनाथासी । चिदंबरा या वेळेसी ।।४।।

१२९०८१

धावे पावे वेगी आता । चिदंबरा प्राणनाथा ।।१।।
तुजवीण कासावीसी । कधी चरण दावीसी ।।२।।
आभयदाने सुखी करीसी । स्वामी वेळ का लावीसी ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९०८२

मज न पडे चईन । तुजवीण उदासीन ।।१।।
कोठवरी आंत घेसी । कैसा नीष्टुर जालासी ।।२।।
यावे जीवीच्या जीवना । चीदंबरा मनमोहना ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९०८३

करुणावंत तुची माता । आनंत ब्रम्हंडनीर्मीता ।।१।।
वाट पाहातो नीसीदीनी । वेगी येई बा धावोनी ।।२।।
प्राण उरला नयनी । होसी क्रपेची जननी ।।३।।
दास येतो लोटांगणी । चिदंबरा ये धावोनी ।।४।।

१२९०८४

साक्ष आसे तो आंतरी । त्याजपुढे काय चोरी ।।१।।
चिदंबर क्रपावंत । शांती वर्तुनी दावीत ।।२।।
वरी न बोले तो काही । प्रत्यय दावीतसे पाही ।।३।।
म्हणे चिदंबर दास । दावी प्रत्यय सर्वास ।।४।।

१२९०८५

शंकर आपाचे लग्नात । यात्रा मीळाली बहुत ।।१।।
बहुत आसती कामगार । स्त्री पुरुष ईतर ।।२।।
करु जाता कोन्ही चोरी । प्रत्यय दावी परोपरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाणे सर्वाचे आंतार ।।४।।

१२९०८६

स्त्रीया दळनवाल्या बहुत । वाड्यामाजी सर्व येत ।।१।।
त्यात येक दळनवाली । तीणे चोरी आरंभीली ।।२।।
येक दोन वेळा जाण । नेले दाणे ते चोरुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वप्न दावीली तीयेस ।।४।।

१२९०८७

जाती स्त्रीयाची आनीवार । बहुत कापट्य आंतर ।।१।।
म्हणे उचका माझे मनी । तेची दीसतसे स्वप्नी ।।२।।
स्वप्न नये ते चित्तासी । चोरी करी दुसरे दीवसी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । उघड दावी चमत्कार ।।४।।

१२९०८८

दाणे घेतले चोरुन । जाउ पाहे त्वरा करुन ।।१।।
नेत्र दोन्ही आंध जाले । पुढे चालणे राहीले ।।२।।
चीत्ती घाबरुनी जाण । रडे पडे आंक्रदोन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्त्रीया पुसती तीयेस ।।४।।

१२९०८९

आक्रंदोनी रडे पडे जाता । मेळा मीळाला भोवता ।।१।।
म्हणे नेत्र माझे गेले । नाही स्वामीचे ऐकीले ।।२।।
जाले आन्यायाची रासी । मज न्यावे स्वामीपासी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । वेगी आले ते बाहेर ।।४।।

१२९०९०

स्वामी पुढे लोटांगण । म्हणे दोसी चांडाळीण ।।१।।
नेत्र देई बा मजसी । आले शरण तुजसी ।।२।।
आत्ता न करी मी चोरी । सीक्षा जाली जन्मवरी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । देती नेत्र वरचेवर ।।४।।

१२९०९१

चीदंबरराया येउ दे करुणा । पुरवी वासना मायबापा ।।१।।
तुजवीण प्रीय नेणे मी आणीक । जाणसी तु देख आंतरीचे ।।२।।
कोठवरी आंत घेसी बा आनंता । भेटी भगवंता देई मज ।।३।।
दास म्हणे देई आनाथासी भेटी । दया येउ दे पोटी चीदंबरा ।।४।।

१२९०९२

पतीतासी होसी पावन चीदंबरा । क्रपा वीश्वंभरा आघटीत ।।१।।
आपकारीयालागी करीसी तु उपकार । शांतीचे नीजघर साजे तुम्हा ।।२।।
स्वामीनी येवोनी पुसीले वीप्रासी । नैव्यद्य देवासी जाला म्हणे ।।३।।
दास म्हणे वीप्र म्हणे तो स्वामीसी । येवोनी ठायासी बैसा वेगी ।।४।।

१२९०९३

वाटीभरोनी तुप त्यात आर्ध वीख । कालवोनी देख आणीयेले ।।१।।
स्वयपाकी ब्राम्हण दील्हे त्याजपासी । नैवेद्य देवासी केला तेणे ।।२।।
स्वामीनी येवोनी पुसीले वीप्रासी । नैवेद्य देवासी जाला म्हणे ।।३।।
दास म्हणे वीप्र म्हणे तो स्वामीसी । येवोनी ठायासी बैसा वेगी ।।४।।

१२९०९४

येवोनी चीदंबर बैसे पात्रावर । बोलावी समोर वीप्रकांता ।।१।।
तुप हे चांगले आणोनी दील्हे । वीप्रकांता बोले कापटेनी ।।२।।
केले ते भोजन स्वामीराया । जाण वीष ते दारुण बाधा करी ।।३।।
दास म्हणे होते उतरले ज्या घरी । वीष तेची नारी घातीयले ।।४।।

१२९०९५

कळले वर्तमान सर्व यात्रेलागी । बोलावीले वेगी वीप्र कांता ।।१।।
धाबरोनी सांगे वीष मी घातीले । पाहीजे रक्षीले चीदंबरा ।।२।।
स्वामी म्हणती बाई भय तु न धरी । नीवांत आंतरीं राहे आता ।।३।।
दास म्हणे स्वामी पुसती हासोनी । वीष काय म्हणोन घातीयेले ।।४।।

१२००९६

सत्य सांगे म्हणती स्वामी त्या बाईसी । वीष तु घालीसी काय म्हणोनी ।।१।।
सांगे वीप्रकांता बहुत वीनवीले । नाही मज दील्हे पुत्रफळ ।।२।।
म्हणोनीया राग घरीयला पोटी । वीष म्या सेवटी घातीयले ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलताती जाण । देतो पुत्र जाण तुजलागी ।।४।।

१२९०९७

कैचे वीष बाधा होय ईश्वरासी । पाहाती द्रीष्टीसी यात्राजन ।।१।।
धन्य म्हणती स्वामी आगाध हे कळा । दावीयली डोळा चीदंबरा ।।२।।
नींदीती हे सर्व वीप्रकांतेलागी । क्रपावंत जगी स्वामी येक ।।३।।
दास म्हणे ऐसा पावन आवतार । नायकीला थोर युगायुगी ।।४।।

१२९०९८

मागीले आवतारी उत्धरीली पुतना । परी तीच्या प्राणा शोसीयले ।।१।।
तोची आवतार क्रपावंत जाण । होवोनी ब्राम्हण लीला दावी ।।२।।
वीष दील्हे जाण क्रपा करी तीसी । दील्हा पुत्र वौंसी चीदंबरे ।।३।।
दास म्हणे ऐसा मुगटमणी जाण । आवतार सगुण चीदंबर ।।४।।

१२९०९९

घात करु येती शेत्रु जे दुर्जन । होतसे प्रसन्न तयालागी ।।१।।
दया क्षमा शांती उघड दावीतसे । भक्ती लावीतसे दुर्जनासी ।।२।।
द्रुष्टबुत्धी नाष करोनीया जाण । लावी आचरण भक्तीपंथे ।।३।।
दास म्हणे ऐसा आवतार सगुण । नायकीला जाण कोण्या युगी ।।४।।

१२९१००

दयाळ दीनाचा उदार मनाचा । करी पतीताचा उत्धार बा ।।१।।
क्रपेची हे माता तारी दीनालागी । आवतार जगी प्रगट करी ।।२।।
क्रपावंत धणी येक त्रीभुवनी । देखीला नयनी चीदंबर ।।३।।
दास म्हणे आसे आनाथाची माय । दावीतसे पाय हाकारीता ।।४।।

१२९११०१

चीदंबर धणी आसे ब्रम्हांडासी । तारी पतीतासी नाम घेता ।।१।।
देखीला नयनी प्रगट चीदंबर । नीवाले आंतर तेणे माझे ।।२।।
वर्तवीतो जाण चराचरालागी । मौन्य वेदालागी जाले जेथे ।।३।।
दास म्हणे आसे क्रपेचा सागर । सगुण चीदंबर कलयुगी ।।४।।

१२९११०२

चरीत्र १६३

चीदंबरा क्रपाघना । दावी रुप तु सगुणा ।।१।।
वीनवीतो वारंवार । माझे नीववी आंतर ।।२।।
कोठवरी लाजवीसी । तुज दया न ये कैसी ।।३।।
पावे दास आनाथासी । चींदवरा या वेळेसी ।।४।।

१२९११०३

नीत्य करीतो वीनंती । दया येउ द्यावी चीत्ती ।।१।।
वाट पाहातो नीसीदीनी । वेगी येई बा धावोनी ।।२।।
करुणावंत म्हणवीसी । स्वामी वेळ का लावीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । प्रगट आवतार करा ।।४।।

१२९१०४

लीला दावीली आपार । ज्यासी नसे अंतपार ।।१।।
वेदादीक वेडावती । तेथे मश्यक मी कीती ।।२।।
बळे तुची बोलावीसी । कळा आपुली दावीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । लीलाधारी आवतारा ।।४।।

१२९१०५

लीला दावी नीत्य नवी । कोठवरी ते वर्णावी ।।१।।
वीप्र आला दरुषणासी । देती नीरोप तयासी ।।२।।
रामचेंद्र त्याचे नाव । आसे सावनुर गाव ।।३।।
दास म्हणे चीदंबर । देती नीरोप सत्वर ।।४।।

१२९१०६

खर्चावया देती ज्यासी । तेची चाले त्याचे देसी ।।१।।
वीप्र बोलाउनी जाण । तया पुसती आपण ।।२।।
तुझ्या देसी चाली कोण । म्हणे हकीम खानी होन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय तयास ।।४।।

१२९११०७

उभे सहजची बाहेर । यात्रा समुदाय थोर ।।१।।
बोलावीले त्या वीप्रासी । देती होन तो खर्चासी २।।
हात कमरेसी लावीला । होन काढोनीया दील्हा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वाटे नवल वीप्रास ।।४।।

१२९११०८

घाली दीर्घ दंडवत । आश्रु नयनी वाहात ।।१।।
धन्य म्हणे चीदंबरा । कलयुगी आवतारा ।।२।।
कळा न कळे कोणासी । उघड प्रत्यय दावीसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । वीप्र पुसे तो स्वामीस ।।४।।

१२९११०९

आमुचे देसी चाली जाण । आसे हकीम खानी होन ।।१।।
तोची काढोनीया दील्हा । उघड प्रत्यय दावीला ।।२।।
तुझी कळा जाणे कोण । म्हणसी गरीब ब्राम्हण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तया करीतसे स्थीर ।।४।।

१२९११०

स्वामी म्हणती ब्रम्हणासी । सांगु नये हे कोणासी ।।१।।
कळा ईश्वराची जाण । मी तो गरीब ब्राम्हण ।।२।।
वीप्र जातो लोटांगणी । म्हणे आघटीत करणी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी वीश्वंभर ।।४।।

१२९१११

चीदंबर क्रपावंत । कळा दावी तो आनंत ।।१।।
नीत्य दावी चमत्कार । यात्रा मीळती आपार ।।२।।
जैसी ईछा आसे ज्यासी । तेची प्रात्प होय त्यासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९११२

नीत्य सांगतसे स्वप्नी । स्वामी द्रीष्टांती येवोनी ।।१।।
आज्ञा अयकता जाण । होय तयासी प्रसन्न ।।२।।
आज्ञा नायकता कोन्ही । प्रत्यय होय त्याची क्षणी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी आवतार ।।४।।

१२९११३

चरीत्र १६४

चीदंबरराया आनाथाच्यानाथा । तुझे हाती सत्ता सर्व आसे ।।१।।
क्षणेमाजी करीसी रंकाचा तु राव । नेणे ब्रम्हदेव करणी तुझी ।।२।।
आनंत आपार तुझी आसे कळा । दावीसी तु डोळा सर्वालागी ।।३।।
दास म्हणे कीर्ती आनंत आपार । वेदा आगोचर न बोलवे ।।४।।

१२९११४

क्रपा करोनीया घेतले पदरी । लीला नानापरी दावीयली ।।१।।
काढीले बाहीरी लीला प्रगट करी । व्हावे श्रीष्टीवरी प्रगट बा ।।२।।
बारा वर्षावरी जन्मभुमीकेसी । बळे तु आणीसी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे चीत्ती वाटतसे लाज । आंतरीचे गुज ठावे तुम्हा ।।४।।

१२९११५

नसे प्रीय मज तुझवीण काही । त्रुणवत् पाही वाटे सर्व ।।१।।
वोवाळीला देहे तुझ्या पायावरुनी । ईछा काय मनी ठावे तुम्हा ।।२।।
कोठवरी आता बोलोनी दावावे । सर्व तुम्हा ठावे मायबाप ।।३।।
दास म्हणे कीती करुणा भाकवीसी । वेळ का लावीसी चीदंबरा ।।४।।

१२९११६

जीवलग कोण सांगे तुजवीण । जालो उदासीन सर्वापरी ।।१।।
द्रव्य दारा सुत बंधु भगीणी पाही । अर्पीयले पाई सर्व तुझ्या ।।२।।
तुजवीण प्रीय नेणे मी आणीक । आंतरीचे देख जाणसी तु ।।३।।
दास म्हणे करी क्रपा दीनावरी । यावे बा झडकरी चीदंबरा ।।४।।

१२९११७

आवतार क्रती करीसी प्रगट । आनाथासी भेट देई देवा ।।१।।
येउ दे करुणा मज आनाथाची । माउली दीनाची म्हणवीसी ।।२।।
सांभाळी सांभाळी ब्रीद वीश्वंभरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।३।।
दास म्हणे कीती करवीसी धावा । येउ दे कणवा चीदंबरा ।।४।।

१२९११८

नलगे सांगणे तुम्हासी ईश्वरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।१।।
आवतार क्रत्य करणे आसे तुम्हा । वेळ सर्वोत्तमा लाउ नये ।।२।।
कोठवरी अंत घ्यावा बा आनंता । नीवारी हे चींता चीदंबर ।।३।।
दास म्हणे होसी माय मजलागी । वीनंती सलगी करतो देवा ।।४।।

१२९११९

कळा आघटीत न कळे कोन्हासी । बोलोनी दावीसी चीदंबरा ।।१।।
उघड प्रत्यय दावीयला नयनी । नायकीले कानी ऐसे कोठे ।।२।।
सरले आयुष नवे तु घालीसी । कळा तुझी ऐसी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे मज दावीले बोलुन । वाचवीला प्राण चीदंबरा ।।४।।

१२९१२०

बोलीला मजसी चीदंबरराया । दावीले सखया उघड द्रीष्टी ।।१।।
तुजसाठी जीव देवोनी वाचवीले । ठेवोनी घेतले बळे तुम्ही ।।२।।
आभयदान दील्हे आणीक नानापरी । नीववी आंतरी वेगी आता ।।३।।
दास म्हणे होई प्रगट वेगेसी । बैसलो उपवासी तुजसाटी ।।४।।

१२९१२१

यावे दीनानाथा स्वामी तु समर्था । चींतीलीया आर्था पावे वेगी ।।१।।
यावे सर्वेश्वरा दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा प्रगट व्हावे ।।२।।
पाहातो मी वाट च्यातकाचे परी । लक्ष चीदंबरा धरोनीया ।।३।।
दास म्हणे वेळ न करी सर्वथा । पावे बा समर्था चीदंबरा ।।४।।

१२९१२२

आनाथाची माय होसी वीश्वपती । वर्णवी बा कीर्ती आखंडीत ।।१।।
तुजवीण प्रीय नेणे मी आणीक । दावी बा कौतुक वेगी आता ।।२।।
न करी उसीर यावे बा सत्वर । धावा कोठवर करवीसी ।।३।।
दास म्हणे कीर्ती वर्णवी वेगेसी । चीदंबरा ऐसी प्रार्थना हे ।।४।।

१२९१२३

येउदे करुणा स्वामी क्रपाघना । पुरवी वासना चीदंबरा ।।१।।
यावे बा दयाळा स्वामी वीश्वपाळा । दावी रुप डोळा चीदंबरा ।।२।।
यावे दयानीधी पावे मज आधी । न करी आवधी स्वामीराजा ।।३।।
दास म्हणे यावे वीश्वाच्या जनका । ब्रम्हंडनायका चीदंबरा ।।४।।

१२९१२४

चरीत्र १६५

चीदंबरा क्रपाघना । स्वामी पतीतपावना ।।१।।
यावे जीवीच्या जीवना । माझी पुरवी वासना ।।२।।
दावी रुप तु सगुणा । स्वामी आवतारपुर्णा ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९१२५

वाट पाहातो नीसीदीनी । दया येउ द्यावी मनी ।।१।।
होसी आनाथ जननी । दावी रुप तु नयनी ।।२।।
वेगी येई बा धावोनी । चीदंबरा चक्रपाणी ।।३।।
दास म्हणे सर्वगता । दावी चरण आनंता ।।४।।

१२९१२६

यावे देवाचीया देवा । चीदंबरा सदासीवा ।।१।।
दावी दावी रुप तु सगुण । माझे नीववी हे मन ।।२।।
यावे दीनाच्या दयाळा । प्रार्थीतो मी वेळोवेळा ।।३।।
होसी दासाचा जीव्हाळा । चीदंबरा घननीळा ।।४।।

१२९१२७

करुणा येउ दे दीनाची । माय होसी आनाथाची ।।१।।
वाट पाहु कोठवरी । दया येउ दे आंतरी ।।२।।
करुणावंत म्हणवीसी । काय जाले माझेवीसी ।।३।।
कती वाट पाहावीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।४।।
दास म्हणे चीदंबरा । दया आनाथासी करा ।।५।।

१२९१२८

यावे यावे सर्वगता । चीदंबरा बा आनंता ।।१।।
वाट पाहतो नीसीदीनी । का हो न येसी आझुनी ।।२।।
ब्रीद रक्षी आता जनी । दावी आवतार करुनी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९१२९

ब्राम्हण आला दुरदेसी । करी वीनंती स्वामीसी ।।१।।
द्यावे नीरोप मजसी । जाणे वेंकटगीरीसी ।।२।।
जवळी नसे खर्चायासी । करी वीनंती स्वामीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । म्हणे मी गरीब आपार ।।४।।

१२९१३०

करी वीनंती ब्राम्हण । तुम्ही आवतारपुर्ण ।।१।।
करुणा येउदे ईश्वरा । स्वामीराया चीदंबरा ।।२।।
तुम्हा कोण ते कठीण । खर्च द्यावयासी जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी दीनावर ।।४।।

१२९१३१

चीदंबरे क्रपाकरुन । तया ब्राम्हणासी जाण ।।१।।
खर्चा रुपय दील्हे दोन । यावे म्हणती यात्रा करुन ।।२।।
नीघे ब्राम्हण वेगीसी । जाय वेंकटगीरीसी ।।३।।
दास म्हणे. चीदंबर । वीप्र खर्च करी थोर ।।४।।

१२९१३२

दोन रुपय ब्राम्हणासी । दील्हे होते खर्चायासी ।।१।।
नीत्य येक मोडीतसे । उद्या दोन जैसे तैसे ।।२।।
नवल करीतो ब्राम्हण । चीदंबर कळा पुर्ण ।।३।।
दास म्हणे वीप्र जाण । दक्षीण यात्रा आला करुन ।।४।।

१२९१३३

आला स्वामी दर्षनास्सी । वीप्र चीदंबरापास्सी ।।१।।
सांगे सर्व वर्तमान । म्हणे आवतार पुर्ण ।।२।।
दोन रुपय खर्चा जाण । आलो यात्रा सर्व करुन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।४।।

१२९१३४

चीदंबरा स्वामीराजा । आसे लौकीक हा तुझा ।।१।।
कीर्ती करवीसी वर्णन । का हो लाजवीसी मन ।।२।।
प्रत्यय दावीसी बहुत । आता घेउ नये आंत ।।३।।
दास येतो लोटांगणी । चीदंबरा ये धावोनी ।।४।।

१२९१३५

चरीत्र १६६

चीदंबरा होसी माय आनाथासी । वेळ का लावीसी स्वामीराया ।।१।।
येउ दे करुणा मज पतीताची । पावन ब्रीदाची लज्या रक्षी ।।२।।
करीतो मी धावा सर्वकाळ देवा । न येची कणवा कैसा तुम्हा ।।३।।
दास म्हणे मी तो आन्याई आपार । पावन आवतार तुझा देवा ।।४।।

१२९१३६

यावे वीश्वंभरा दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा चीदंबरा ।।१।।
दावी नीजरुप वेगी वीश्वपती । वर्णवी बा कीर्ती आखंडीत ।।२।।
बोलील्या आक्षरा सत्य करुनी दावी । प्रत्यय ह्रदई जागाचीया ।।३।।
दास म्हणे तुम्हा प्रगट होणे सत्य । आवतार क्रत्य करुनी दावी ।।४।।

१२९११३७

नानारीती देवा दावीसी प्रत्यय । लेखा तो न होय वेदादीका ।।१।।
काय मी पामर वर्णु जाय कीर्ती । जेथे वेडावती आठरा साही ।।२।।
करणे चीदंबरा आसे हे तुम्हासी । बळे बोलवीसी स्वामीराया ।।३।।
दास म्हणे करी सत्य हे आक्षर । नीववी आंतर चीदंबरा ।।४।।

१२९११३८

येउ द्यावी दया माझी देवराया । जाउ नेदी वाया धावा करुनी ।।१।।
न लगे सांगणे तुम्हासी ईश्वरा । का हो चीदंबरा वेळ केला ।।२।।
झुरतसे जीव येउ द्यावी कीव । वेगी घाली धाव चीदंबरा ।।३।।
दास म्हणे होसी करुणेची माता । वेळ का भगवंता चीदंबरा ।।४।।

१२९११३९

येउ दे करुणा माझी क्रपाघना । दावी बा सगुणा रुप डोळा ।।१।।
आंतरीचे गुज जाणसी ईश्वरा । कीती चीदंबरा बोलुनी दाउ ।।२।।
कीती वेळ तरी राहीला आजोनी । उराला नयनी प्राण माझा ।।३।।
दास म्हणे करी आवतार प्रगट । देई मज भेट चीदंबरा ।।४।।

१२९१४०

सांभाळी सांभाळी आपुली ब्रीदावळी । तुज ऐसा बळी दुजा नाही ।।१।।
आनंत ब्रम्हांडी तुझी येक सत्ता । जीव तु नीर्मीता आनंत हे ।।२।।
तुझ्या सत्तेवीण न हालेची त्रण । झुरतसे प्राण तुजसाठी ।।३।।
दास म्हणे होसी प्रतापे आगळा । येउ दे कळवळा चीदंबरा ।।४।।

१२९१४१

सहज लीला दावी स्वामी नीत्य नवी । बळे शक्ती द्यावी कामीकासी ।।१।।
ईश्वराची सेवा करीती जे कोन्ही । ब्राम्हणभोजनी यज्ञामाजी ।।२।।
रात्रंदीवस कष्ट करीता सीणती । शक्तीहीन होती आचेतन ।।३।।
न हाले हात पाय उठवेना जाण । बैसला ठीकाण न सोडीती ।।४।।
दास म्हणे स्वामी येती तीकडोन । पडले शक्तीहीन दाहावीस ।।५।।

१२९१४२

न उठवे त्यासी सीणले हात पाये । बोलावया नये शब्द शक्ती ।।१।।
पाहाती स्वामीकडे मन होय वेडे । उठोनीया पुढे न येववे ।।२।।
हासोनीया स्वामी पुसती तयासी । सीण हा तुम्हासी जाला बहुत ।।३।।
दास म्हणे वीप्र जोडोनीया हात । वीनंती करीत स्वामीपुढे ।।४।।

१२९१४३

म्हणती स्वामीलागी जाले शक्तीहीन । उठवेना जाण आम्हासी ते ।।१।।
स्वामी म्हणती शक्ती देतो हा ईश्वर । पाहाती द्रीष्टीभर क्रपा करुनी ।।२।।
त्याची वेळे त्यासी येती शक्ती फार । नवल चीदंबर दावीतसे ।।३।।
दास म्हणे वीप्र उठती झडकरी । येवोनी सत्वरी वीनवीती ।।४।।

१२९१४४

चीदंबराप्रती करीती वीनंती । नवल श्रीपती दावीतसे ।।१।।
धावोनीया हांडे आसती थोर थोर । घेवोनी डोईवर जाती वेगी ।।२।।
पाहाती लाहान थोर पुसती वीच्यार । दावी चमत्कार स्वामीराव ।।३।।
दास म्हणे नीत्य दावीतसे कीर्ती । परब्रम्ह मुर्ती चीदंबर ।।४।।

१२९१४५

बळीयामाजी बळ गीता बोले देख । दावी ते कौतुक द्रीष्टीपुढे ।।१।।
उघड प्रत्यय दावीतसे जनी । पाहाती नयनी लाहान थोर ।।२।।
कलयुगी आवतार सगुण चीदंबर । भेटी जाली थोर भाग्य त्याचे ।।३।।
दास म्हणे नामे उत्धरी जीवासी । देखीला द्रीष्टीसी चीदंबर ।।४।।

१२९१४६

चरीत्र १६७

चीदंबरा क्रपाघना । माझी येउ दे करुणा ।।१।।
रक्षी रक्षी ब्रीद आता । व्हावे प्रगट आनंता ।।२।।
वाट पाहु कोठवरी । देवा झुरतो आंतरी ।।३।।
दास म्हणे वीश्वपती । प्रगट दावी तुझी मुर्ती ।।४।।

१२९१४७

जन्मभुमीसी आणीले । चीत्त माझे लाजवीले ।।१।।
बहुता व्हावी सुखप्राप्ती । तुझी वर्णवी बा कीर्ती ।।२।।
वाट पाहातो नीसीदीनी । काहो न येसी आझोनी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९१४८

करुणावंत म्हणवीसी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
यावे वीश्वाच्या जनका । स्वामी ब्रम्हांडनायका ।।२।।
तुजवीण वाटे सीण । मज न पडे चईन ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९१४९

आस नसे आणीकाची । ईछा तुझीया पायाची ।।२।।
कीती देउ परीहार । माझे जाणसी आंतर ।।२।।
तुजवीण प्रीय काही । मज नसे लोकीतीही ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चीदंबरा बा सगुणा ।।४।।

१२९१५०

देई देई क्रपादान । माझे नीववी हे मन ।।१।।
करी प्रगट आवतार । कलयुगी चीदंबर ।।२।।
सुख देई बहुतासी । क्रपावंत माय होसी ।।३।।
दासा दील्हे आभयदान । वेगी दावी बा चरण ।।४।।

१२९१५१

वीप्र दरीद्र तो जाण । आठवी तुझे बा चरण ।।१।।
आला दर्षणा लागुन । स्वामी जाले त्या प्रसन्न ।।२।।
करी वीनंती स्वामीसी । माझे आंतर जाणसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी वीप्रावर ।।४।।

१२९१५२

बोलावीले ब्राम्हणासी । देती प्रसाद तयासी ।।१।।
येक पंचपात्र जाण । दील्ही दाळ ते बांधुन ।।२।।
स्वामी सांगती तयासी । दाळ न्यावे हे घरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्रालागी हर्ष थोर ।।४।।

१२९१५३

आला वीप्र तो घरासी । दाळ ठेवी देवापासी ।।१।।
होती गाठोडी बांधीली । यथासांग पुजा केली ।।२।।
मंत्रपुस्प ते करुन । पाहे गाठोडी सोडुन ।।३।।
जाले दाळीचे ते होन । वीप्रालागी हर्ष पुर्ण ।।४।।
दास म्हणे चीदंबर । नीत्य दावी चमत्कार ।।५।।

१२९१५४

वीप्र म्हणे चीदंबरा । स्वामी क्रपेच्या सागरा ।।१।।
तुझा प्रताप आगळा । उघड दावीयला डोळा ।।२।।
कलयुगी आवतार । सत्य स्वामी चीदंबर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । मार्ग लावी बहुतास ।।४।।

१२९१५५

क्रपावंत आवतार । स्वामी माझा चीदंबर ।।१।।
वेद शास्त्र ते पुराणी । कधी नायकीचे कानी ।।२।।
तेची द्रीष्टीने दावीसी । आंत न कळे कोणासी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । पुर्णब्रम्ह आवतारा ।।४।।

१२९१५६

नीत्य करीतो वीनंती । होसी करुणेची मुर्ती ।।१।।
आज्ञेप्रमाणे बा जाण । आलो गंगा उतरोन ।।२।।
पुढे आज्ञा करणे कैसी । वेगी सांगे रुषीकेसी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । दावी प्रत्यय जगास ।।४।।

१२९१५७

चीदंबरराया पतीतपावना । पावे मज दीना ऐशावेळे ।।१।।
रक्षी ब्रीदावळी वीश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका स्वामीराया ।।२।।
नये वेळ करु व्हावे बा प्रगट । आनाथासी भेट देई देवा ।।३।।
दास म्हणे यावे दीनाच्या दयाळा । दावी रुप डोळा चीदंबरा ।।४।।

१२९१५८

येउ दे करुणा क्रपेच्या नीधाना । पुरवी वासना चीदंबरा ।।१।।
क्रपावंत माता होसी बा आनंता । वेळ भगवंता लावीसी का ।।२।।
कोठवरी धावा करवीसी देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।३।।
दास म्हणे यावे चीदंबरा वेगी । आवतार जगी कळवी तुझा ।।४।।

१२९१५९

यावे करुणापती पावे दीनाप्रती । ऐके बा वीनंती चीदंबरा ।।१।।
प्रगट आवतार जाला कलीयुगी । कळवावे जगी प्रखर हे ।।२।।
केले समाधान दील्हे आभयदान । न येसी आझोन काय म्हणोनी ।।३।।
दास म्हणे होसी क्रपावंत धणी । आवतार करणी प्रगट करी ।।४।।

१२९१६०

चीदंबरा पासी आला दर्षणासी । वीप्र दुरदेसी दरीद्री तो ।।१।।
चीदंबरराया करी मज दया । जात आसे वाया दारीद्र्याने ।।२।।
करीतो प्रार्थना ब्राम्हण तो जाण । दारीद्रा पासोन सोडवी बा ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतो प्रार्थना । चीदंबरा करुणा आली त्याची ।।४।।

१२९११६१

चीदंबर त्यासी बोलतसे जाण । जालो मी प्रसन्न तुजलागी ।।१।।
न करावी चींता संसाराची जाण । नीश्चय धरोन राही चीती ।।२।।
करी वर्तणुक आज्ञेवरुनी आता । नीवारी हे चींता सर्व तेणे ।।३।।
दास म्हणे वीप्र हर्षला आंतरी । वारंवार करी नमस्कार ।।४।।

१२९११६२

स्वामी म्हणती त्यासी मुहुर्त पाहोन । देतो बोलाउन नीरोप तो ।।१।।
राहीला ब्राम्हण जवळी काही दीवस । बोलावीले त्यास स्वामीराये ।।२।।
दील्हे पाच होन्न खर्चासी ते जाण । बोले क्रपा करुन चीदंबर ।।३।।
दास म्हणे स्वामी सांगती तयासी । लागेल खर्चासी खर्ची सुखे ।।४।।

१२९११६३

देवोनी नीरोप वीप्र गेला घरा । सुखे चीदंबरा आठवीत ।।१।।
खर्च करी होन नीत्य तो ब्राम्हण । न सरति होन पांच तैसे ।।२।।
वीप्र चमत्कार पाहातसे नीत्य । आवतारक्रत्य म्हणतसे ।।३।।
दास म्हणे पुर्णब्रम्ह आवतार । स्वामी चीदंबर कलयुगी ।।४।।

१२९१६४

येउ दे करुणा पतीतपावना । पावे मज दीना चीदंबरा ।।१।।
आनाथाची माय दावी आता पाये । माझेवीसी काय जाले आता ।।२।।
यावे करुणाघना पतीतपावना । पावे मज दीना ऐशा वेळे ।।३।।
दास म्हणे वेगी व्हावे बा प्रगट । चीदंबरा भेट देई मज ।।४।।

१२९१६५

यावे बा दयाळा स्वामी घननीळा । दावी रुप डोळा चीदंबरा ।।१।।
येउ दे करुणा मज पतीताची । पावन ब्रीदाची लज्या रक्षी ।।२।।
करीता वीनंती स्वामी क्रपामुर्ती । येउ द्यावी चीती दया माझी ।।३।।
दास म्हणे करी क्रपा दीनावरी । यावे बा झडकरी चीदंबरा ।।४।।

१२९१६६

यावे सर्वगता स्वामी क्रपावंता । नीवारी हे चींता चीदंबरा ।।१।।
दावी चरणकमळ नीवारी तळमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।२।।
यावे बा श्रीधरा दीनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।३।।
दास म्हणे देई आनाथासी भेटी । आवतार श्रीष्टी कळवी तुझा ।।४।।

१२९१६७

यावे करुणापती पावे दीनाप्रती । आवतार कीर्ती वर्णवी बा ।।१।।
न करी उसीर यावे बा सत्वर । कोठवरी धीर धरु आता ।।२।।
दावी नीजरुप नीवारी भवताप । आवतारप्रताप प्रगट करी ।।३।।
दास म्हणे दावी चरण ईश्वरा । नये चीदंबरा वेळ करु ।।४।।

१२९१६८

चरीत्र १६९

चीदंबरा क्रपानीधी । दावी रुप तुझे आधी ।।१।।
होसी आनाथाची माय । तुझे कोमळ ह्रदय ।।२।।
वाट पाहु कोठवरी । दया येउ दे आंतरी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९१६९

धावे पावे वेगी आता । चीदंबरा प्राणनाथा ।।१।।
करुणा येउ दे दीनाची । लज्या रक्षी हे ब्रीदाची ।।२।।
नीत्य करीतो प्रार्थना । यावे क्रपेच्या नीधाना ।।३।।
दास म्हणे वीश्वपती । चीदंबरा ये श्रीपती ।।४।।

१२९१७०

धावा करीतो नीसीदीनी । वेगी येई बा धावोनी ।।१।।
क्रपांवत म्हणवीसी । काय जाले माझेवीसी ।।२।।
रक्षी रक्षी ब्रीदावळी । दावी रुप चेंद्रमौळी ।।३।।
दास म्हणे क्रपाघना । माझी पुरवी वासना ।।४।।

१२९१७१

नीत्य करीतो वीनंती । होसी क्रपेची तु मुर्ती ।।१।।
करुणा येउ दे ईश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।२।।
तुजवीण प्रीयकरा । नेणे देव मी दुसरा ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । आवतार प्रगट करा ।।४।।

१२९१७२

कीती पाहावीसी वाट । देई आनाथासी भेट ।।१।।
करुणावंत म्हणवीसी । स्वामी वेळ का लावीसी ।।२।।
रक्षी रक्षी ब्रीद आता । चीदंबरा बा समर्था ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९१७३

वेगी यावे बा श्रीधरा । मज दीनाच्या कैवारा ।।१।।
कलयुगी आवतारा । पुर्णब्रम्ह चीदंबरा ।।२।।
दावी रुप तु सगुणा । चीदंबरा मन मोहना ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।४।।

१२९१७४

चरीत्र १७०

ब्राम्हण येक दुर देसी । आला स्वामीचे भेटीसी ।।१।।
करी वीनंती स्वामीसी । आन्नवस्त्र द्या मजसी ।।२।।
स्वामी जाले त्या प्रसन्न । म्हणती तुझे व्रथपण ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । वीप्रालागी सुख थोरा ।।४।।

१२९१७५

स्वामी म्हणती वीप्रासी । कीती खर्च लागे तुजसी ।।१।।
पुत्रकांता आसे घरी । येक ब्राम्हण चाकरी ।।२।।
चार आसो हे मनुष । कोन्ही येती समयास ।।३।।
म्हणे चीदंबर दास । देती नीरोप वीप्रास ।।४।।

१२९१७६

बोलाउन तो ब्राम्हण । सन्मुख बैसवीला जाण ।।१।।
तांदुळ दील्ही ते पाईली । आल्या ब्राम्हणासी घाली ।।२।।
ठेवी तांदुळ भरुन । पुजा करीत जावी जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी वीप्रावर ।।४।।

१२९१७७

नीत्य तांदुळ काडीत । आल्या ब्राम्हणासी देत ।।१।।
परी न सरती जाण । आसे पाईली भरोन ।।२।।
आल्या ब्राम्हाणासी आन्न । नीत्य करी संतर्पण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कळा दावी तो वीचीत्र ।।४।।

१२९१७८

पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चीदंबर ।।१।।
कळा दावी नानापरी । दीन आनाथासी तारी ।।२।।
आसे पतीतपावन । दीन रक्षीतसे जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । धणी आसे त्रैलोक्यास ।।४।।

१२९१७९

चीदंबरा करी क्रपा आनाथासी । दावी रुषीकेसी पाय तुझे ।।१।।
करीतो प्रार्थना क्रपेच्या नीधाना । पावे मज दीना ऐशावेळे ।।२।।
दावी नीज रुप नीवारी भवताप । होसी मायबाप चीदंबरा ।।३।।
दास म्हणे माझी येउ दे करुणा । जीवीच्या जीवना भेटी द्यावी ।।४।।

१२९१८०

यावे वीश्वपाळा दावी रुप डोळा । येउ दे कळवळा माझा देवा ।।१।।
यावे सर्वगता स्वामी क्रपावंता । नीवारी हे चींता चीदंबरा ।।२।।
यावे सर्वेश्वरा दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा प्रगट व्हावे ।।३।।
पावे दासालागी चीदंबरा वेगी । आवतार जगी कळवी तुझा ।।४।।

१२९२८१

यावे देवराया करी मज दया । जाउ नेदी वाया धावा करुनी ।।१।।
यावे दीनानाथा स्वामी तु समर्था । चींतीलीया आर्था पावे वेगी ।।२।।
यावे वीश्वपती पावे दीनाप्रती । नीववावे चीती चीदंबरा ।।३।।
पावे दास दीना पतीतपावना । येउ दे करुणा चीदंबरा ।।४।।

१२९१८२

यावे क्रपाघना पुरवी वासना । स्वामी त्रीनयना चीदंबरा ।।१।।
यावे दयानीधी पावे मज आधी । न करी आवधी चीदंबरा ।।२।।
नये वेळ करु कीती धीर धरु । आज्ञान लेकरु बाळ तुझे ।।३।।
दास म्हणे यावे आनाथाच्या वेळे । पुरवी डोहळे चीदंबरा ।।४।।

१२९१८३

यावे दीनासाटी स्वामी जगजेटी । देई मज भेटी चीदंबरा ।।१।।
तुजवीण प्रीय नेणे मी आणीक । आंतरीचे देख जाणसी तु ।।२।।
कोठवरी आंत घेसी बा आनंता । का हो भगवंता वेळ केला ।।३।।
दास म्हणे कीती करवीसी धावा । येउ दे कणवा चीदंबरा ।।४।।

१२९१८४

आनाथ तो दीन गरीब ब्राम्हण । दर्षणासी जाण आला आसे ।।१।।
चींताक्रांत बहुत दरीद्रे पीडीला । वीनंती स्वामीला करीतसे ।।२।।
चीदंबरराया करी मज दया । दरीद्र सखया व्यापीयले ।।३।।
दास म्हणे करी प्रार्थना ब्राम्हण । करुणा आली जाण चीदंबरा ।।४।।

१२९१८६

म्हणे वीप्रलागी चीदंबर जाण । ऐसे हे भाषण बोलु नये ।।१।।
सभाग्य तु होसी समर्थ ब्राम्हण । दरीद्र ते जाण स्वप्नी नाही ।।२।।
मुहुर्त पाहोंनी नीरोप तुजसी । देतो जावयासी घरालागी ।।३।।
दास म्हणे वीप्रा हर्षतो आंतरी । चरण नमस्कारी वारंवार ।।४।।

१२९१८७

मुहुर्त पाहुन वीप्र बोलावीला । नारेळ तयाला दीधला येक ।।१।।
जावे म्हणती घरा नारेळ घेवोनी । ठेवावा पुजोनी देवापासी ।।२।।
वीप्र करी चींता आपुले आंतरा । कैसी चीदंबरा करुणा नये ।।३।।
दास म्हणे कळा दावी वीश्वंभर । परी चीदंबर कळो नेदी ।।४।।

१२९१८७

वीप्र म्हणे स्वामी केली म्या वीनंती । करुणा तुझे चीती न ये कैसी ।।१।।
नारेळ घेवोनी पुजा ते करावी । भोजन समई काय करु ।।२।।
हासोनीया त्यासी बोले चीदंबर । प्रसन्न ईश्वर जाला तुज ।।३।।
दास म्हणे वीप्र हासे तो चीतात । स्वामीसी ते मात न बोलवे ।।४।।

१२९१८८

स्वामी म्हणती त्यासी जावोनीया घरी । आनंदाभीतरी पुजा करी ।।१।।
दील्हे आसे तुज माहाफळ आता । नीवारेल चींता येणे तुझे ।।२।।
साष्टांग नमोन नीघे तो ब्राम्हण । आला त्वरेकरुन घरालागी ।।३।।
दास म्हणे पुजा करी नारेळाची । चींता हे वीप्राची न जाय ते ।।४।।

१२९१८९

दुसरे दीवसी गेला पुजा करावया । नारेळ दो ठाया उकललासे ।।१।।
हात लावोनीया पाहु जाता जाण । नारेळ भरोन नीघती होन्न ।।२।।
हर्ष ब्रम्हणासी बहुत आंतरा । धन्य चीदंबरा कळा तुझी ।।३।।
पुर्णआवतार कलयुगी सगुण । स्वामी ब्रम्हपुर्ण चीदंबर ।।४।।
दास म्हणे वीप्र आनंदेकरुन । करी संतर्पण नीत्य नवे ।।५।।

१२९१९०

चीदंबरा क्रपाघना । दावी रुप तु सगुणा ।।१।।
वाट पाहातो नीसीदीनी । दया येउ द्यावी मनी ।।२।।
होसी पतीतपावन । ब्रीद करावे जतन ।।३।।
दास म्हणे करुणाकरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९११९१

वेगी यावे सर्वेश्वरा । दीनजनाच्या कैवारा ।।१।।
कीती वाट पाहावीसी । तुज दया न ये कैसी ।।२।।
करुणावंत म्हणवीसी । काय जाले माझेवीसी ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । दावी चरण चीदंबरा ।।४।।

१२९११९२

तुजवीण चीदंबरा । नेणे देव मी दुसरा ।।१।।
आनंत ब्रम्हांडात पाही । तुजवीण दुजे नाही ।।२।।
परी आवडी सगुणाची । स्वामी तुझीया चरणाची ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । साक्ष माझीया आंतरा ।।४।।

१२९११९३

पीपीलीका ब्रम्हयात्सी । आंतर सर्वाचे जाणत्सी ।।१।।
नलगे सांगणे तुजत्सी । आंत कोठवरी घेसी ।।२।।
रक्षी रक्षी ब्रीद आता । दावी रुप भगवंता ।।३।।
दासाचीया प्राणेश्वरा । सगुण भेटी चीदंबरा ।।४।।

१२९११४

करुणावंत माय होत्सी । नलगे सांगणे तुजत्सी ।।१।।
वाट पाहातो नीसीदीनी । भुक लागली नयेनी ।।२।।
आंत घेसी कोठवरी । जालो उदास आंतरी ।।३।।
दास म्हणे वीश्वंभरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९११५

तैलंग देसीचा ब्राम्हण । आला दर्षणात्सी जाण ।।१।।
करी वीनंती स्वामीसी । माझे आंतर जाणत्सी ।।२।।
स्वामी म्हणती तयात्सी । दावी बोलुन मजत्सी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी पुसती वीप्रास ।।४।।

१२९११६

वीप्र म्हणे तो स्वामीसी । नये बोलता मजसी ।।१।।
लाज वाटतसे चीती । चीदंबरा बा श्रीपती ।।२।।
त्याचे जाणोनी आंतर । बोलतसे चीदंबर ।।३।।
येतो तुझीया घरासी । स्वामी बोलीले वीप्रासी ।।४।।
दास म्हणे चीदंबर । ब्राम्हणासी हर्ष थोर ।।५।।

१२९११७

गेला नीघोनी घरासी । सांगे आपुले कांतेसी ।।१।।
दील्हे स्वामीनी वचन । तुझे घरी येतो जाण ।।२।।
वाट पाहे आट दीवस । स्वांमी न येती घरास ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी यासी चमत्कार ।।४।।

१४९११८

वीप्र चीती उदासीन । स्वामी न येती म्हणुन ।।१।।
स्वप्न जाले ते वीप्रासी । स्वामी आले द्रीष्टांतासी ।।२।।
म्हणती जाले आठ दीवस । आलो तुझीया घरास ।।३।।
माझी पुजा न करीसी । वरी उकरडा घालीसी ।।४।।
दास म्हणे चीदंबर । नवल ब्राम्हणासी थोर ।।५।।

१२९११९

प्राथःकाळी तो उठोन । काढी उकरडा झाडोन ।।१।।
पडे द्रीष्टी औदुंबर । व्रक्ष दीसतसे थोर ।।२।।
वीप्र बोलावी ब्राम्हणा । करी अभीषेक जाणा ।।३।।
ब्राम्हण रुद्र ते म्हणता । व्रक्ष चालला वाढता ।।४।।
दास म्हणे चीदंबर । व्रक्ष जाला पुरुष थोर ।।५।। १२९२००

यात्रा मीळे सभोवती । चमत्कार पाहु येती ।।१।।
केले ब्राम्हण भोजन । नैवेद्य आणीयला जाण ।।२।।
नैवेद्य ठेवी व्रक्षापुढे । स्वामी दीसती नीवाडे ।।३।।
जाला आनंद वीप्रासी । द्रीष्टी देखीले स्वामीसी ।।४।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी आवतार ।।५।। १२९२०१

चरित्र १७२

चीदबंरा होसी करुणेची माता । नीवारी हे चींता भवदुःख ।।१।।
दावी चरणकमळ नीवारी तळमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।२।।
येउ दे करुणा पतीतपावना । आवतार सगुणा रुप दावी ।।३।।
दास म्हणे यावे वीश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका चीदंबरा ।।४।।

तुजवीण प्रीय नेणे माझ्या जीवा । जाणसी तु देवा आंतरीचे ॥१॥
नाही मज कोन्ही ब्रम्हांडभुवनी । न येसी आझोनी काय म्हणोनी ॥२॥
कोठवरी आंत घेसी बा आनंता । काहो प्राणनाथा वेळ केला ॥३॥
दास म्हणे यावे जीवीच्या जीवना । क्रपेच्या नीधाना चीदंबरा ॥४॥

१२९२०३

कोठवरी धीर धरवीसी तरी । दावी डोळेभरी रुप तुझे ॥१॥
देहे जाला क्षीण कंठी उरला प्राण । दावी बा चरण चीदंबरा ॥२॥
दीन म्हणवीतो पतीताची रासी । पावन तुम्हासी नाम साजे ॥३॥
पतीतपावन ब्रीद करी जतन । दास म्हणे शरण आलो देवा ॥४॥

१२९२०४

यावे करुणापती पावे दीनाप्रती । नीववावे चीती चीदंबरा ॥१॥
करुणावंत धणी तुची त्रीभुवनी । आवतार करणी प्रगट करी ॥२॥
येउ द्यावी दया माझी देवराया । जाउ नेदी वाया धावा करुनी ॥३॥
सांभाळी सांभाळी आपुली ब्रीदावळी । दास तळमळी चीदंबरा ॥४॥

१२९२०५

यावे बा श्रीधरा दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा चीदंबरा ।।१।।
यावे सर्वगता स्वामी क्रपावंता । तुझे हाती सता सर्व आसे ।।२।।
प्रीय नेणे कोन्ही तुजवीण त्रीभुवनी । दावी रुप नयनी चीदंबरा ।।३।।
यावे वीश्वंभरा दासाच्या कैवारा । कलयुगी आवतारा प्रगट व्हावे ।।४।।

१२९२०५

धावा करीतसे दुर देसी जाण । तैलंग ब्राम्हण भक्त आसे ।।१।।
न देखीला कधी द्रीष्टी चीदंबर । नीश्चय नीर्धार भक्ती करी ।।२।।
आंतरी ते आशा म्हणे भेटी व्हावी । चींता त्याचे जीवी लागलीसे ।।३।।
दास म्हणे वीप्र न सांगे कोणासी । आंतर जाणसी चीदंबरा ।।४।।

१२९२०७

नीत्य उठोनीया झुरतसे मनी । पाहावा नयनी ईश्वर हा ।।१।।
करीतसे धावा येकांती बैसोनी । चींतीतसे ध्यानी चीदंबर ।।२।।
आंतरी उदास न सांगे कोणास । धरोनीया आस वाट पाहे ।।३।।
दास म्हणे दया आली ईश्वरासी । चीदंबर त्यासी प्रगट होये ।।४।।

१२९२०८

त्रीकाल तो पुजा करी ईश्वराची । वाट देवाजीची पाहातसे ।।१।।
पंचेउषःकाळी करुनीया स्नान । देउळासी जाण जाता जाला ।।२।।
जाता देवापासी न दीसे ईश्वर । प्रगट चीदंबर बैसलासी ।।३।।
दास म्हणे वीप्र बोले बा तयासी । कोण बैसलासी म्हणे तेथे ।।४।।

१२९२०९

हासोनीया बोले त्यासी चीदंबर । आलो मी सत्वर तुजसाटी ।।१।।
भेटी तु ईछीसी वर्ष जाले येक । नोळखसी देख कैसा मज ।।२।।
सावध होवोनी ब्राम्हण अंतरी । जाय चरणावरी लोटांगणी ।।३।।
दास म्हणे क्रपा करी चीदंबर । नीववी आंतर ब्रम्हाणाचे ।।४।।

१२९२१०

सग्दद होवोनी वीप्र लोटांगणी । मीठी घाली चरणी प्रेमभावे ।।१।।
चीदंबरे त्यासी उठवोनी जाण । दील्हे आळींगण ऐक्यभावे ।।२।।
बैसवीला जाण सन्मुख त्या वेळे । पुरवी डोहोळे आंतरीचे ।।३।।
दास म्हणे त्याचे करुनी समाधान । चीदंबर जाण गुप्त होय ।।४।।

१२९२११

दावीली हे लीला आधटीत जाण । आवतार पुर्ण कलयुगी ।।१।।
बहुता भक्तासी देत आसे भेटी । दयावंत पोटी मायबापा ।।२।।
जननी जनक आसे ब्रम्हांडासी । सगुण द्रीष्टीसी देखीला तो ।।३।।
दास म्हणे कळा आनंत आपार । वेदा आगोचर स्वामी माझा ।।४।।

१२९२१२

चरित्र १७३

चीदंबरा करुणापती । दावी रुप दीनाप्रती ।।१।।
येई येई वीश्वंभरा । स्वामी क्रपेच्या सागरा ।।२।।
वाट पाहातो नीसीदीनी । वेगी येई बा धावोनी ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चीदंबरा बा सगुणा ।।४।।

१२९२१३

करुणावंत म्हणवीसी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
तुजवीण प्राणेश्वरा । देव नेणे मी दुसरा ।।२।।
माझे जाणसी आंतर । कीती देउ परीहार ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९२१४

रक्षी रक्षी ब्रीदावळी । दावी रुप चेंद्रमौळी ।।१।।
होसी पतीतपावन । ब्रीद करावे जतन ।।२।।
यावे दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा ।।३।।
दास म्हणे प्राणपती । चीदंबरा ये श्रीपती ।।४।।

१२९२१५

तुजवीण देव कोन्ही । दुजा नेणे त्रीभुवनी ।।१।।
येई येई जगन्नाथा । चीदंबरा बा समर्था ।।२।।
वेळ करु नये आता । तुझे हाती सर्व सता ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।४।।

१२९२१६

दावी दावी रुप सगुण । माझे नीववी हे मन ।।१।।
तारी तारी दीनालागी । चीदंबरा यावे वेगी ।।२।।
धावा करीतो नीसीदीनी । दया येउ द्यावी मनी ।।३।।
दास येतो लोटांगणी । चीदंबरा शुळपाणी ।।४।।

१२९२१७

दुरदेसीचा ब्राम्हण । आला दर्षणासी जाण ।।१।।
करी वीनंती स्वामीसी । द्यावी मुर्ती हे पुजेसी ।।२।।
माझी वुपासनामुर्ती । स्वामीराया तु गणपती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे वीप्रासी उत्तर ।।४।।

१२९२१८

मी तो गरीव ब्राम्हण । नसे मुर्तीगार जाण ।।१।।
धातु पाषाणाचे मुर्ती । हे का न मीळे तुजप्रती ।।२।।
मुर्ती देउ मी कोटुन । आग्रह करु नये जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । हे तो न माने वीप्रास ।।४।।

१२९२१९

ब्राम्हण स्वामीसी बोलत । मुर्ती द्यावी आपुलया हात ।।१।।
ईछा माझी हे पुरवावी । क्रपादान मज देई ।।२।।
करुणा आली ईश्वरासी । जाले प्रसन्न वीप्रासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे ब्राम्हणा उत्तर ।।४।।

१२९२२०

मुहुर्त पाहोनीया जाण । तुज घेतो बोलाउन ।।१।।
देतो प्रसाद तुजसी । जावे आपुल्या घरासी ।।२।।
मुहुर्त पाहुनीया जाण । बोलावीला तो ब्राम्हण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दील्हे नारेळ वीप्रास ।।४।। १२९२२१

ब्राम्हण बोलावोनी जाण । स्वामी सांगे क्रपाकरुन ।।१।।
दील्हा नारेळ तुजसी । ठेवी आपुल्या पुजेसी ।।२।।
यात नीघेल गणपती । पुजा करी येथास्थीती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । हर्ष ब्राम्हणासी थोर ।।४।। १२९२२२
ब्राम्हण जावोनीया घरासी । पुजु जाता नारेळासी ।।१।।
पुजा करु जाता जाण । नारेळ गेला उकलोन ।।२।।
त्यांत नीघे तो गणपती । दीव्य चतुर्भुज मुर्ती ।।३।।
जाला आनंद तो थोर । करी पुजेचा संभार ।।४।।
वाद्य वाजताती व्दारी । आनंदेसी पुजा करी ।।५।।
वीप्रमेळा तो बहुत । पुजा करी आनंदात ।।६।।
करी ब्राम्हण भोजन । जाला ईश्वर प्रसन्न ।।७।।
धन्य म्हणती चीदंबर । कलयुगी आवतार ।।८।।
म्हणे चीदंबर दास । दावी प्रत्यय वीप्रास ।।९।। १२९२२३

दावी चीदंबरा सगुण तुझे रुप । नीवारी भवताप मायबाप ।।१।।
पाहातो मी वाट च्यातकाचे परी । नीववी आंतरी स्वामीराया ।।२।।
दावी चरणकमळ नीवारी तळमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माये । चीदंबरा पाये दावी आता ।।४।।

१२९२२४

यावे बा श्रीधरा दीनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।१।।
करुणेची माता होसी बा आनंता । नीवारी हे चींता भवदुःख ।।२।।
नये वेळ करु कीती धीर धरु । आज्ञान लेकरु बाळ तुझे ।।३।।
दास म्हणे यावे दीनाच्या कैवारा । ब्रीद चीदंबरा जतन करी ।।४।।

१२९२२५

सखा जीवलग तुजवीण कोन्ही । नाही त्रीभुवनी स्वामीराया ।।१।।
माता पीता बंधु भगीनी आप्त जाण । तुझेची चरण चीदंबरा ।।२।।
देउ परीहार कोठवरी तरी । साक्ष तु आंतरी आहेसी बा ।।३।।
दास म्हणे यावे आनाथाच्या वेळे । पुरवी डोहळे चीदंबरा ।।४।।

१२९२२६

स्त्रीया पुत्र धन देह्यासहीत जाण । केले समर्पण तुझे पाई ।।१।।
प्रीय तुजवीण नसे मज कोन्ही । ब्रम्हांडभुवनी चीदंबरा ।।२।।
नेणे दुजा देव ब्रम्हा वीष्णु सीव । तुझेची वैभव दीसे सर्व ।।३।।
दास म्हणे प्रीती तुझ्या स्वरुपाची । ईतर आणीकाची नसे मज ।।४।।

१२९२२७

तुजवीण जीव माझा उदासीन । भासते वमन द्रीश्य सर्व ।।१।।
कोठवरी आंत घेसी बा आझोनी । उरला नयनी प्राण माझा ।।२।।
बोलतसे वर जाणसी आंतर । लौकीक वीच्यार दावी जना ।।३।।
दास म्हणे जाणे आंतरीचे कोण । स्वामी तुजवीण चीदंबरा ।।४।।

१२९२२८

यावे करुणाघना पतीतपावना । पावे मज दीना ऐशा वेळे ।।१।।
पाटवीले देवा मज दुरदेसी । ठेवोनी उपवासी स्वामीराया ।।२।।
कोणते कठीण तुम्हा भेटी देता । वेळ का लावीता स्वामीराजा ।।३।।
दास म्हणे यावे आनाथाच्या वेळे । सगुण सावळे रुप दावी ।।४।।

१२९२२९

आंद्र देशामाजी तैलंग ब्राम्हण । करीतसे ध्यान तुझे देवा ।।१।।
ब्राम्हणाची ईछा व्हावी मज भेटी । आशा धरोनी पोटी बैसलासे ।।२।।
नीत्य उठोनीया भाकीतो करुणा । भेटी मज दीना देई म्हणे ।।३।।
दास म्हणे वीप्र करीतसे चींता । चीदंबरा आता यावे म्हणे ।।४।।

१२९२३०

नीत्य उठोनीया बैसावे येकांती । चीदंबरमुर्ती आठवीतो ।।१।।
होवोनी उदास सर्वावरी जाण । बैसला ब्राम्हण नीराहारी ।।२।।
मध्यरात्रीवेळे रडे आक्रंदोनी । दावी रुप नयनी म्हणे देवा ।।३।।
दास म्हणे तेथे प्रगट होवोनी । दावी रुप नयनी वीप्रालागी ।।४।।

१२९२३१

बैसलासे वीप्र डोळे तो झाकोनी । आठवी ध्यानीमनी चीदंबर ।।१।।
प्रगट ईश्वर जाले त्या वेळेसी । बळे ब्राम्हणासी हाक मारी ।।२।।
बैसला येकांती रात्र ते आंधार । प्रभा ते भास्कर उगवे जैसा ।।३।।
दास म्हणे नेत्र उघडे ते ब्राम्हण । प्रकाश तो जाण दीसे सर्व ।।४।।

१२९२३२

म्हणे चीदंबर तया ब्राम्हणासी । आलो मी भेटीसी तुझ्या आता ।।१।।
वीप्र म्हणे मज न दीसे ते रुप । प्रकाष आमोप भरला दीसे ।।२।।
सगुण भेटे मज येवोनी ईश्वरा । नेत्री चीदंबरा रुप दावी ।।३।।
दास म्हणे जाला सगुण चीदंबर । आनंद तो थोर ब्राम्हणासी ।।४।। १२९२३३

धावोनीया चरणी धालीतसे मीठी । आनंद तो पोटी न समाये ।।१।।
नीववीले मन तया ब्राम्हणाचे । बोलोनीया वाचे वर दील्हा ।।२।।
आक्षई आवीनाष दील्हे तुज सुख । नीवारीले दुःख जन्ममरण ।।३।।
दास म्हणे काये जाले माझ्यावेळे । झाकोनीया डोळे बैसलासी ।।४।। १२९२३४

चरित्र १७५

चीदंबरा बा श्रीरंगा । स्वामी आक्षई आभंगा ।।१।।
आज्ञा तुझी हे प्रमाण । गंगातीरी आलो जाण ।।२।।
आभंग ठेवावे म्हणोन । आज्ञा केली हे स्वामीन ।।३।।
आज्ञावरुनीया पाही । ठेवीयले बाभुळ गावी ।।४।।
आभंग ठेवीले ज्या घरी । क्रपा करी तयावरी ।।५।।
नलगे सांगणे स्वामीसी । ब्रीद जतन करीसी ।।६।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।७।। १२९२३५

चीदंबरा करुणापती । दया येउ द्यावी चीती ।।१।।
तुजवीण प्राणेश्वरा । जीव वेंधतसे वारा ।।२।।
कैसी दया नये तुम्हा । का हो वेळ पुरषोतमा ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९२३६

करुणावंत मायबापा । करी आनाथासी क्रपा ।।१।।
तुजवीण उदासीन । मज न पडे चईन ।।२।।
करुणावंत माय होसी । काय जाले मजवीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । दया येउ दे ईश्वरा ।।४।।

१२९२३७

तुजवीण उदासीन । वेगी दावी बा चरण ।।१।।
होसी क्रपावंत माय । तुझे कोमळ ह्रदय ।।२।।
वाट पाहु कोठवरी । का हो वेळ केला हारी ।।३।।
दासाच्या प्राणेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९२३८

यावे यावे वीश्वपती । चीदंबरा क्रुपामुर्ती ।।१।।
कीती वाट पाहावीसी । काय जाले बा तुजसी ।।२।।
प्रीय भक्त तुज कोन्ही । तेणे घेतले ठेउनी ।।३।।
वीसर दासाचा पडला । चीदंबरा बा तुजला ।।४।।

१२९२३९

भक्त धावा करीता जाण । त्यासी दील्हे बा दर्षण ।।१।।
मी तो पतीताची रास । म्हणुनी जालासी उदास ।।२।।
ब्रीद करावे जतन । नाम पतीतपावन ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । भेटी देई चीदंबरा ।।४।।

१२९२४०

भक्तराज तो ब्राम्हण । गंगातीरी होता जाण ।।१।।
नीत्य करीतसे धावा । चीदंबरा माहादेवा ।।२।।
देई भेटी आनाथासी । चिदंबरा ऋषिकेशि ।।३।।
पावे दास पतीतासी । चिदंबरा या वेळेसी ।।४।।

१२९२४१

ब्राम्हण करितसे धावा । म्हणे भेठ माहादेवा ।।१।।
करुणा आली ईश्वरासी । चिदंबरा बा तुजसी ।।२।।
जाला ईश्वर प्रगट । दील्ही ब्राम्हणासी भेट ।।३।।
दास म्हणे चिदंबर । प्रगट जाला लिंगाकार ।।४।।

१२९२४२

वीप्र पाहे डोळेभरुन । चीदंबर तो सगुण ।।१।।
करि वीनंति स्वामिसी । आक्षय राहावे या देसी ।।२।।
बोलतसे चिदंबर । मी तो होतो लिंगाकार ।।३।।
दास म्हणे चिदंबर । प्रगट दावी चमत्कार ।।४।।

१२९२४३

जाला ईश्वर प्रगट । विप्रालागि देउनि भेट ।।१।।
यात्रा मिळालीसे दाटी । लाहानथोर पाहा द्रुष्टी ।।२।।
धन्य म्हणति चिदंबरा । कळा दाविसी ईश्वरा ।।३।।
म्हणे चिदंबर दास । दावि प्रत्यय जगास ।।४।।

१२९२४४

चिदंबरा स्वामिराजा । आंत न कळे कोन्हा तुझा ।।१।।
उघड दाविसी तु कळा । होसी ब्रम्हीचा पुतळा ।।२।।
पावे मज आनाथासी । चिदंबरा या वेळेसी ।।३।।
दास म्हणे स्वामीराया । करि आनाथासी दया ।।४।।

१२९२४५

चरित्र १७६

यावे चीदंबरा दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा प्रगट व्हावे ।।१।।
यावे दीनानथा पावे आनथासी । दया तुज कैसी न ये माझी ।।२।।
यावे सर्वगता स्वामी क्रपावंता । नीवारी हे चींता चीदंबरा ।।३।।
दास म्हणे यावे वीश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका स्वामीराया ।।४।।

१२९२४६

यावे बा दयाळा स्वामी वीश्वपाळा । दावी रुप डोळा चीदंबरा ।।१।।
यावे देवराया करी मज दया । जाउ नेदी वाया धावा करुनी ।।२।।
यावे प्राणनाथा पावे मज आता । तुझे हाती सता सर्व आसे ।।३।।
यावे चीदंबरा दासाच्या कैवारा । ब्रीद वीश्वंभरा रक्षी आता ।।४।।

१२९२४७

यावे प्राणपती पावे दीनाप्रती । वर्णवी बा कीर्ती आखंडीत ।।१।।
यावे यज्ञेश्वरा स्वामी परात्परा । ब्रम्ह नीर्वीकारा सगुण व्हावे ।।२।।
यावे करुणापती दीनाच्या दयाळा । स्वामी वीश्वपाळा रुप दावी ।।३।।
दास म्हणे यावे क्रपेच्या सागरा । नीववी आंतरा स्वामीराया ।।४।।

१२९२४८

करीतो प्रार्थना क्रपेच्या नीधाना । आवतार सगुणा रुप दावी ।।१।।
न करीता वेळ यावे जगन्नाथा । तुझे हाती सता सर्व आसे ।।२।।
यावे बा श्रीधरा आनंत आपारा । प्रगट चीदंबरा रुप दावी ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माये । करुणा कैसी न ये माझेवीसी ।।४।।

१२९२४९

यावे दयानीधी पावे मज आधी । न करी आवधी चीदंबरा ।।१।।
यावे बा दयाळा स्वामी धननीळा । येउ दे कळवळा माझा देवा ।।२।।
करुणेची माता होसी बा आनंता । वेळ भगवंता लाउ नये ।।३।।
पावे दासालागी चीदंबरा वेगी । आवतार जगी प्रगट करी ।।४।।

१२९२५०

यावे दीनानाथा पावे आनाथासी । वेळ का लावीसी चीदंबरा ।।१।।
न करी उसीर यावे बा सत्वर । कोठवर धीर धरवीसी ।।२।।
कंठी उरला प्राण दावी बा चरण । नीववी हे मन स्वामीराया ।।३।।
पावे दास दीना क्रपेच्या नीधाना । आवतारसगुणा चीदंबरा ।।४।।
१२९२५१

ब्राम्हण तो आला स्वामी दर्षणासी । जाणे आसे त्यासी रामेश्वरा ।।१।।
करितो विनंती चिदंबरालागी । आज्ञा ध्यावि वेगी स्वामिराया ।।२।।
म्हणे तो स्वामीसी नसे बा खर्चासी । विनंति पायासी याजसाठी ।।३।।
दास म्हणे स्वामि म्हणती विप्रासी । चिंता खर्चाविसी करु नको ।।४।।
१२९२५२

बोलाविला विप्र निरोपासी जाण । होता तो ब्राम्हण भक्तराज ।।१।।
क्रपा करुनी त्यासी दिल्हे ते खर्चासी । सांगे ब्राम्हणासी चीदंबर ।।२।।
दोन रुपय देतो तुज खर्चायासी । यात्रा आनंदेसी करुन यावे ।।३।।
दास म्हणे विप्र विच्यारी चितासी । रुपय खर्चासी दिल्हे दोन ।।४।।
१२९२५३

चिदंबर म्हणति तया ब्राम्हणासी । कल्पना चितासी घेउ नये ।।१।।
देउन आभयदान निरोप तो दिल्हा । ब्राम्हण चालिला आनंदेसी ।।२।।
निघोनि ब्राम्हण दोन मजलि जाय । खर्च करिता हे रुपया येक ।।३।।
चिदंबर दास म्हणे हा आवतार । दावी चमत्कार आघटीत ।।४।।

१२९२५४

आणिक दुसरे दिवसी विप्र तो वाटेसी । सोडवी गाटोडीसी रुपया तो ।।१।।
पाहु जाता तेथे रुपय आसति दोन । आश्चर्य ब्राम्हण करितसे ।।२।।
धन्य चिदंबरा कलयुगी आवतारा । कळा विश्वंभरा आघटित ।।३।।
दास म्हणे कळा दावि चिदंबर । नलगे आंतपार ब्रम्हादीका ।।४।।

१२९२५५

यात्रा करुनी आला ब्राम्हण तो जाण । रुपय ते दोन न सरती ।।१।।
वर्षभर खर्च केला तो यात्रेसी । रुपय आपणापासी जैसे तैसे ।।२।।
चिदंबर दावी नाना चमत्कार । कलयुगी आवतार स्वामी माझा ।।३।।
दास म्हणे आसे धनी त्रैलोक्यासी । पावन पतितासी चिदंबर ।।४।।

१२९२५६

चरित्र १७७

चीदंबरा करुणाघना । स्वामी यज्ञनारायणा ।।१।।
दावी दावी रुप सगुण । माझे नीववी हे मन ।।२।।
कीती करुणा भाकवीसी । तुज दया न ये कैसी ।।३।।
करुणावंत माय होसी । का हो नीष्टुर जालासी ।।४।।
दासाचीया प्राणनाथा । चिदंबरा यावे आता ।।५।।

१२९२५७
वीनवीतो वारंवार । दावी चरण सकुमार ।।१।।
यावे जीवीच्या जीवना । चीदंबरा बा चीद्घना ।।२।।
तुजवीण प्रीय काही । मी तो नेणे लोकी तीही ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९२५८

वाट पाहातो नीसीदीनी । वेगी येई वा धावोनी ।।१।।
चीदंबरा चक्रपाणी । भुक लागली नयनी ।।२।।
यावे करुणेच्या राया । चीदंबरा बा सखया ।।३।।
मी तो पतीताची रास । म्हणवीतो तुझा दास ।।४।।

१२९२५९

आशा पुरवी मनाची । भेटी देई चरणाची ।।१।।
लज्या रक्षी हे ब्रीदाची । आशा नको ईतराची ।।२।।
तुजवीण प्रीत देवा । दुजी नको माझ्या जीवा ।।३।।
ईतुके देई क्रपादान । चीदंबरा दास शरण ।।४।।

१२९२६०

यावे स्वामी सर्वगता । चीदंबरा बा आनंता ।।१।।
वेळ लाउ नये आता । दावी रुप प्राणनाथा ।।२।।
तुजसाठी झुरे जीव । माझी येउ द्यावी कीव ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९२६१

धावा करीतो नीर्वाणी । वीप्र होता बंदीखानी ।।१।।
आठवी चीदंबर चरण । बंद सोडवी येथुन ।।२।।
नीत्य करीतसे धावा । मज सोडवावे देवा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे द्रीष्टांती वीच्यार ।।४।।

१२९२६२

स्वप्नी येउनी ईश्वर । बोले स्वामी चीदंबर ।।१।।
तुज सोडवीतो जाण । चींता न करी येथुन ।।२।।
नीर्भय आसावे बा चीती । सांगीतले त्या द्रीष्टांती ।।३।।
दास म्हणे तो ब्राम्हण । बैसे जाग्रत होउन ।।४।।

१२९२६३

वीप्र वीच्यारी चीतासी । स्वप्न जाले हे मजसी ।।१।।
सत्य मीथ्य कोण जाणे । चीदंबराचे करणे ।।२।।
माझे मनी नीजध्यास । जाला स्वप्नामाजी भास ।।३।।
चीदंबरा दास म्हणे । वीप्र वीच्यारी तो मने ।।४।।

१२९२६४-A

करी कल्पना चीतासी । जाले स्वप्न दुसरे दीवसी ।।१।।
कल्पना घेउ नये चीती । स्वामी सांगती द्रीष्टांती ।।२।।
राहे धरोनी वीश्वासा । सोडवीतो आटा दीवसा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । प्रत्यय दावीतसे थोर ।।४।।

१२९२६४-ए

नीश्चय जाला ब्राम्हणासी । ध्यान करीतो मानसी ।।१।।
चीदंबरावीण काही । दुजाभाव नेणे पाही ।।२।।
बुत्धीदाता चीदंबर । उघड दावी चमत्कार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करुणा आली देवाजीस ।।४।।

१२९२६५

बळे बोलावीले जाण । जाला धणी तो प्रसन्न ।।१।।
म्हणे चुक जाली जाण । दील्हे वस्त्र ते भुषण ।।२।।
आणीक सांगे सुभेदारी । जाले आनंदेसी स्वारी ।।३।।
धन्य म्हणे चीदंबरा । कळा दावीली ईश्वरा ।।४।।
दास म्हणे चीदंबर । त्रैलोक्यासी सुत्रधार ।।५।।

१२९२६७

चरित्र १७८

चीदंबरा यावे आनाथाच्या काजा । लौकीक हा तुझा रक्षी आता ।।१।।
रक्षी ब्रीदावळी स्वामी चेंद्रमौळी । दीनासी सांभाळी ऐशावेळे ।।२।।
यावे बा दयाळा स्वामी वीश्वपाळा । दावी रुप डोळा चीदंबरा ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माये । माझीवीसी काय जाले तुज ।।४।।

यावॆ सर्वगता स्वामी प्राणनाथा । तुझॆ हाती सता सर्व आसॆ ।।१।।
यावॆ जगदोत्धारा दीनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा रुप दावी ।।२।।
कोठवरी चीत लाजवीसी माझॆ । उतरी हॆ वोझॆ कल्पनॆचॆ ।।३।।
दास म्हणॆ रक्षी ब्रीद वीश्वंभरा । प्रगट चीदंबरा व्हावॆ वॆगी ।।४।।

१२९२६९

यावॆ क्रपावंता नीवारी हॆ चींता । भॆटी भगवंता दॆई मज ।।१।।
यावॆ बा श्रीपती स्वामी करुणामुर्ती । कळा तुझॆ हाती सर्व आसॆ ।।२।।
यावॆ करुणाघना पतीतपावना । पावॆ मज दीना ऐशावॆळॆ ।।३।।
दास म्हणॆ होसी क्रपॆचा सागर । यावॆ बा सत्वर चीदंबर ।।४।।

१२९२७०

सांभाळी सांभाळी आपुली ब्रीदावळी । तुज ऐसा बळी दुजा नाही ।।१।।
रक्षी रक्षी रक्षी मज आनाथासी । नीद्रा तुज कैसी आली दॆवा ।।२।।
व्हावॆ बा जाग्रत दीनाच्या दयाळा । दावी धननीळा रुप तुझॆ ।।३।।
दास म्हणॆ कीती करवीसी धावा । दॆवाचीया दॆवा चीदंबरा ।।४।।

१२९२७१

कोठवरी आंत घेसी बा आनंता । नीवारी हे चींता चीदंबरा ।।१।।
नये वेळ करु कीती धीर धरु । आज्ञान लेकरु बाळ तुझे ।।२।।
यावे क्रपाघना पतीतपावना । पावे मज दीना स्वामीराया ।।३।।
दास म्हणे यावे आनाथाच्या वेळे । सगुण सावळे रुप दावी ।।४।।

१२९२७२

कावेरीतीरीचा ब्राम्हण तो जाण । भक्तराज पुर्ण भावीक तो ।।१।।
नीत्य करीतसे भजन कीर्तन । चीदंबरावीण देव नेणे ।।२।।
ब्राम्हण समुदाय आसे बरोबरी । कीर्ती त्याची भारी जाली आसे ।।३।।
दास म्हणे येती दर्षणासी लोक । यात्रा दाटी देख भरतसे ।।४।।

१२९२७३

कळले वर्तमान फीरंग्यासी जाण । पाठवी ब्राम्हण पाहावया ।।१।।
कैसी त्याची भक्ती पाहावी म्हणुन । पाटवी ब्राम्हण परीक्षेसी ।।२।।
ब्राम्हण येवोनी पुसती तयासी । प्राप्ती बा तुजसी कैसी जाली ।।३।।
दास म्हणे वीप्र बोलतसे जाण । चीदंबरावीण नेणे काही ।।४।।

१२९२७४

जावोनी ब्राम्हण सांगे वर्तमान । बोलावीले जाण फीरंग्याने ।।१।।
बोले भक्तराज नसे आम्हा काज । फीरंग्याने आज प्राण ध्यावा ।।२।।
पाटवीले त्यासी कावेरी तीरासी । नेवोनीया फासी द्यावी तेथे ।।३।।
दास म्हणे क्रपा आली चीदंबरा । दीनाचा कैवारा धावतसे ।।४।।

१२९२७५

फीरंग्यासी तेथे जावोनी द्रीष्टांती । सांगे तयाप्रती समजोनी ।।१।।
भक्त आसे माझा बोलु नये कोन्ही । नाही तरी जनी सीक्षा लावी ।।२।।
पाहोनीया स्वन्प जाला तो जाग्रत । न मानी उन्मत्त म्हणे मीथ्या ।।३।।
दास म्हणे चीती न धरी वीश्वास । सीक्षा बा तयास दावी देवा ।।४।।

१२९२७६

स्वन्प मीथ्या म्हणोनी दीवस आला प्रहर । दावी चमत्कार त्याचीवेळे ।।१।।
येवोनीया तेथे उभे दोन पुरुष । पाहाता द्रीष्टीस घाबरला ।।२।।
मार होती त्यासी दोहीकडोनी जाण । न दीसे द्रीष्टीने दुजयासी ।।३।।
दास म्हणे ऐसा दावोनी प्रत्यये । वंदीतसे पाये फीरंगी तो ।।४।।

१२७२७७

येवोनी फीरंगी होय पादाक्रांत । चीदंबरभक्त म्हणे सत्य ।।१।।
जाली मज सीक्षा शरण आलो तुज । सोडवावे मज आनाथासी ।।२।।
ब्राम्हण तो म्हणे चीदंबरराया । आनाथासी दया करी आता ।।३।।
जाले त्यासी सुख येतो लोटांगणी । दावीली करणी फीरंग्यासी ।।४।।
चीदंबर धणी आसे त्रैलोक्यासी । दास पतीतासी पावन तो ।।५।।

१२९२७८

चरीत्र १७९

करुणा येउ दे ईश्वरा । दावी चरण चीदंबरा ।।१।।
जीव जाला कासावीस । वाट पाहु कीती दीवस ।।२।।
नीत्य झुरतसे पोटी । दया येउ दे जगजेटी ।।३।।
दास म्हणे पुरवी आस । चीदंबरा धरीली कास ।।४।।

१२९२७९

वाट पाहतो नीसीदीनी । प्राण उरला नयनी ।।१।।
होसी त्रैलोक्याचा धणी । का हो न येसी आझोनी ।।२।।
दावी आघटीत करणी । वेगी प्रगट व्हावे जनी ।।३।।
दास येतो लोटांगणी । चिदंबरा चक्रपाणी ।।४।।

माझी येउ दे करुणा । स्वामी पतीतपावना ।।१।।
दावी रुप तु सगुणा । माझ्या जीवीच्या जीवना ।।२।।
स्वामी क्रुपेच्या नीधाना । माझी पुरवी वासना ।।३।।
दासाचीया जीवप्राणा । चीदंबरा ये चीद्घना ।।४।।

१२९२८१

वेगी यावे सर्वेश्वरा । दीनबंधु चीदंबरा ।।१।।
स्वामीराया प्रीयकरा । दावी रुप वीश्वंभरा ।।२।।
आनाथासी दया करा । स्वामी क्रुपेच्या सागरा ।।३।।
दासाचीया प्राणेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९२८२

होसी आनाथासी माय । तुझे कोमळ ह्रदय ।।१।।
वेगी दावी आता पाय । तुज सांगणे ते काय ।।२।।
आता वेळ लाउ नये । करी नीवांत ह्रदये ।।३।।
दासालागी व्हावे साह्य । चीदंबरा बापमाय ।।४।।

१२९२८७

चीदंबरा तुजवीण । मज न पडे चईन ।।१।।
वेगी दावी बा चरण । तुज आलो मी शरण ।।२।।
होसी पतीतपावन । दावी रुप तुझे सगुण ।।३।।
दासालागी जीवप्राण । चीदंबरा ब्रम्हपुर्ण ।।४।।

१२९२८४

दुरदेसीचा ब्राम्हण । आला दरशनालागुन ।।१।।
करी वीनंती स्वामीसी । म्हणे ईछा पुरवीसी ।।२।।
सीवसांभ गौरीहारा । रुप दावी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे तो ब्राम्हण । आसे भक्तराज पुर्ण ।।४।।

१२९२८५

चीदंबरापुडे जाण । वीप्र भावे लोटांगण ।।१।।
चीदंबरा स्वामीराजा । हेत पुरवी तो माझा ।।२।।
शडभुज रुप दावी । माझे मन हे नीववी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।।

१२९२८६

ब्राम्हणासी क्रपाकरुन । सांगे चिदंबर जाण ।।१।।
ईश्वर भेटेल तुजसी । परि न सांगे कोणासी ।।२।।
विप्र जोडितसे कर । म्हणे तुझा आज्ञाधार ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वर । नीववि विप्राचे आंतर ।।४।।

१२९२८७

स्वामी सांगे ब्राम्हणासी । जावे आपुल्या बीर्हाडासी ।।१।।
रात्री ईश्वर तुजसी । भेट देतो निश्चयेसी ।।२।।
वीप्र ऐकोनी वचन । नीघे साष्टांग नमन ।।३।।
दास म्हणे चिदंबर । आसे भक्त प्रियकर ।।४।।

१२९२८८

वीप्र बीर्हाडासी येत । रात्री बैसला येकांत ।।१।।
रात्र जालि दोन प्रहर । दावी रुप चिदंबर ।।२।।
शिवसांब रुप धरि । नंदिवर करी स्वारी ।।३।।
पडे प्रकाश तो जाण । ब्राम्हण पाहे द्रुष्टीभरुण ।।४।।
दास म्हणे चीदंबर । लिलाधारी हा ईश्वर ।।५।।

१२९२८९

जाले दर्षण विप्रासी । शिव गुत्प त्या वेळेसी ।।१।।
आनंद ब्राम्हणासी जाण । जाले मनोरथ पुर्ण ।।२।।
प्राथःकाळि तो उठोन । आला स्वामिपासि जाण ।।३।।
वीप्र जाय लोटांगणी । म्हणे आघटित करणी ।।४।।
धन्य होसी चिदंबरा । दासाचिया प्रीयकरा ।।५।।

१२९२९०

चरित्र १८०

चिदंबरा दावी रुप तुझे सगुण । नीववी हे मन मायबापा ।।१।।
सांभाळी सांभाळी ब्रीद ईस्वंभरा । प्रगट चिदंबरा व्हावे वेगी ।।२।।
कोटवरी धावा करवीसी देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।३।।
दास म्हणे दावी चरण द्रीष्टीसी । आवतार श्रीष्टीसी कळवी तुझा ।।४।।

१२९२९१

नको नको नको वेळ करु आता । दावी प्राणनाथा रुप तुझे ।।१।।
देई देई देई क्रपादान मज । शरण आलो तुज स्वामीराया ।।२।।
तारी तारी तारी मज दीनालागी । आवतार जगी कळवी तुझा ।।३।।
दास म्हणे दील्हे आभयदान मज । आनाथाचे काज करी देवा ।।४।।

दावी दावी दावी नीज रुप डोळा । येउ दे कळवळा माझा देवा ॥१॥
रक्षी रक्षी रक्षी ब्रीदावळी आता । स्वामी प्राणनाथा चीदंबरा ॥२॥
करी करी करी सार्थक जन्माचे । नाम देई वाचे नीरंतर ॥३॥
पावे दास दीना पतीतपावना । यावे बा सगुणा चिदंबरा ॥४॥

१२९२९३

देई देई देई भेटी आनाथासी । क्रपावंत होसी माय जगी ॥१॥
येई येई येई आनाथाच्या वेळे । पुरवी डोहोळे चिदंबरा ॥२॥
पाहे पाहे पाहे क्रुपाद्रीष्टी मज । शरण आलो तुज वीश्वनाथा ॥३॥
पावे दासालागी चीदंबरा वेगी । आवतार जगी प्रगट करी ॥४॥

१२९२९४

यावे यावे यावे दीनाच्या कैवारा । सगुण चिदंबरा रुप दावी ॥१॥
कीती कीती कीती आंत घेसी तरी । येउ दे आंतरी दया माझी ॥२॥
नाही नाही नाही प्रीय तुजवीण । देई क्रुपादान भेटी मज ॥३॥
साहे साहे साहे आपराध कोटी । दावी रुप द्रीष्टी दासलागी ॥४॥

१२९२९५

विप्र दुरदेसी हारिव्दारापासी । ध्यान आर्हीर्णीसी करितसे ।।१।।
चिदंबराविण प्रिय नेणे काही । ईछीतसे पाही भेटी मनी ।।२।।
पंचगौड आसे देसी ब्राम्हण । नाम त्याचे जाण चतुर्भुज ।।३।।
दास म्हणे धावा करितसे चिती । नाम आठवी प्रिति चिदंबर ।।४।।

१२९२९६

भाविक ब्राम्हण भक्तराज पुर्ण । मध्यरात्री जाण धावा करी ।।१।।
नीशिदिनि नाम आठवीतो चिता ! चिदंबरी प्रिति आनुपम्य ।।२।।
नीत्य धावा करी वैराग्य ते भारी । निद्रा डोळेभरि न घे कधी ।।३।।
दास म्हणे ऐसा प्रिय भक्तराज । स्वामिराया मज भेट देई ।।४।।

१२९२९७

येउ दे करुणा क्रपेच्या नीधाना । पावे मज दिना चिदंबरा ।।१।।
मध्यरात्रि बैसे भागिरथितटि । बैसे वाळवंटी रांत्रदिवस ।।२।।
येके दिवसि पाहे मध्यरात्र जाण । प्रकाश तो पुर्ण शशीचंद्र ।।३।।
दास म्हणे तया वेळि चिदंबर । दावी चमत्कार भक्तालागी ।।४।।

१२९२९८

प्रगट ब्राम्हण आला तयापासी । विप्र पुसे त्यासी कोटुनी आले ।।१।।
म्हणे तो ब्राम्हण गुर्लोहोसुर जाण । आलो मी तेथुनि यात्रेलागी ।।२।।
पुसे वर्तमान विप्र हो तयासी । वोळखि मजसी सांग काही ।।३।।
दास म्हणे पुसे भक्तराज खुण । पाहिलासी जाण वोळखसी ।।४।।
१२९२९९

सांगतो ब्राम्हण भजनाचि खुण । वाट पाहे जाण म्हणे तुझी ।।१।।
बोलुनीया ऐसे निघे लागवेगी । वीप्र मागे मागे हाका मारि ।।२।।
बोले तो ब्राम्हण मागे येवु नये । धावोनीया पाहे विप्र जाय ।।३।।
दास म्हणे बळे जात आसे पाई । काटा मोडे पाई थोर त्याचा ।।४।।
१२९३००

बैसोनिया खाली पाहे ब्राम्हणासी । गुत्प या टायासी जाला तेव्हा ।।१।।
पाहे प्राथकाळी ग्राम दोन च्यारि । शोध तिळभरि न लगे त्याचा ।।२।।
कळले नीश्चयासी होता चिदंबर । घातलासे थोर भ्रम तेणे ।।३।।
दास म्हणे आला भेटीसी तो जाण । सांग वर्तमान सर्वातेहि ।।४।।
१२९३०१

चीदंबरा क्रपाघना । यावे जीवीच्या जीवना ।।१।।
तुजवीण उदासीन । मज न पडे चईन ।।२।।
वेगी दावी बा चरण । माझे नीववी हे मन ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९३०२

करुणावंत माय होसी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
यावे जीवीच्या जीवना । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।२।।
वाट पाहातो नीसीदीनी । वेगी येई बा धावोनी ।।३।।
होसी दासाची जननी । चीदंबरा त्रीशुळपाणी ।।४।।

१२९३०३

यावे यावे बा श्रीधरा । दीन जनाच्या कैवारा ।।१।।
यावे प्राण प्रीयकरा । स्वामीराया चीदंबरा ।।२।।
कीती पाहावीसी वाट । देई आनाथासी भेट ।।३।।
रक्षी रक्षी दासालागी । चीदंबरा यावे वेगी ।।४।।

१२७३०४

यावे यावे बा दयाळा । चीदंबरा वीश्वपाळा ।।१।।
दावी रुप घननीळा । करी आनंद सोहळा ।।२।।
यावे प्राण प्रीयकरा । चीदंबरा वीश्वंभरा ।।३।।
पावे दास आनाथासी । चीदंबरा या वेळेसी ।।४।।

१२९३०५

यावे स्वामी सर्वगता । चीदंबरा बा आनंता ।।१।।
नीवारी हे भवचींता । भेटी देई भगवंता ।।२।।
वेगी यावे चीदंबरा । तेव्हा आनंदे दसरा ।।३।।
दास म्हणे वीश्वंभरा । सगुण भेटी चीदंबरा ।।४।।

१२९३०६

भक्तराज तो ब्राम्हण । आला दर्शनालागुन ।।१।।
कुरुक्षेत्राजवळी गाव । गुलाबसींग जन्मनाव ।।२।।
पंचगौंड तो ब्राम्हण । आला स्वामीपासी जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी तयावर ।।४।।

१२९३०७

आसे दसर्याचा दीवस । स्वामी बोलावी तयास ।।१।।
सीधा ध्यावा म्हणती त्यास । आसे मर्यादा तुम्हास ।।२।।
बोले ब्राम्हण स्वामीसी । घेईन प्रसाद पंत्कीसी ।।३।।
साहा महीन्याचे वाटेसी । आलो स्वामी पायापासी ।।४।।
म्हणे चीदंबर दास । भक्ती बहुत वीप्रास ।।५।।

• १२९३०८

स्वामी म्हणती त्यासी जाण । हींदुस्तानी तु ब्राम्हण ।।१।।
आमुचे पंत्कीसी जेवीसी । जातीबाहेर पडसी ।।२।।
बोले स्वामीसी ब्राम्हण । नसे यातीसी कारण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । म्हणती भक्तराज थोर ।।४।।

१२९३०९

वीजयादशमीचे दीवसी । करी भोजन पंक्तीसी ।।१।।
सीमा उलन्धनालागी । चीदंबर नीघती वेगी ।।२।।
भक्तराज तो ब्राम्हण । चाले समागमे जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । यात्रा दाटी बरोबर ।।४।।

१२९३१०

भक्तराज बरोबरी । वीप्र वीच्यारी आंतरी ।।१।।
पायातळीचे माती जाण । ध्यावा प्रसाद आपण ।।२।।
मुष्टीभरोनी म्रुतीका । वीप्र घेत आसे देखा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । बांधीयले ते पदरास ।।४।।

१२९३११

आनीका घेउनी हातासी । भक्षुनी लावी तो आंगासी ।।१।।
रात्री आला तो घरासी । पाहे म्रतीका पदरासी ।।२।।
आपुले चिती वीच्यारीत । म्हणे ठेवीन पुजेत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावीतसे चमत्कार ।।४।।

१२१३१२

पाहे गाटोडी सोडुन । कोरे कुंकु जाले जाण ।।१।।
धन्य म्हणे चीदंबरा । कळा तुझी वीश्वंभरा ।।२।।
पुर्णब्रम्ह आवतार । सत्य म्हणे चीदंबर ।।३।।
म्हणे चीदंबरदास । दावी प्रत्यय भक्तास ।।४।।

१२१३१३

चीदंबरराया करी मज दया । दावी बा सखया सगुण रुप ।।१।।
नीवारी नीवारी संकट नानापरी । दावी डोळेभरी रुप आता ।।२।।
येउ दे करुणा क्रपेच्या नीधाना । पावे मज दीना ऐशावेळे ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेची तु माता । चीदंबरा आता न करी वेळ ।।४।।

१२१३१४

रक्षी रक्षी रक्षी ब्रीद हे आपुले । दावी बा पाउले चीदंबरा ।।१।।
यावे यावे यावे दीनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा रुप दावी ।।२।।
तारी तारी तारी मज दीनालागी । आवतार जगी प्रगट करी ।।३।।
दास म्हणे देई क्रपा आभयदान । व्हावे बा प्रसन्न चीदंबरा ।।४।।

१२१३१५

सांभाळी सांभाळी आपुली ब्रीदावळी । दावी चंद्रमौळी रुप डोळा ।।१।।
नको नको नको वेळ करु आता । रक्षी भगवंता आनाथासी ।।२।।
पावे पावे पावे मज दीनालागी । आवतार जगी कळवी तुझा ।।३।।
न लगे सांगणे तुम्हासी ईश्वरा । परी चीदंबरा त्वरा करी ।।४।।
दास म्हणे होसी क्रपेचा सागर । नीववी आंतर माझे देवा ।।५।।

१२९३१६

आनाथ मी दीन आलो तुज शरण । दावी बा चरण चीदंबरा ।।१।।
तुजवीण प्रीय नेणे माझ्या जीवा । जाणसी तु देवा आंतरीते ।।२।।
कोठवरी आंत घेसी बा आनंता । नीवारी हे चींता भवदुःख ।।३।।
दास म्हणे कीती करवीसी धावा । देवाचीया देवा पावे आता ।।४।।

१२९३१७

नाही तुजवीण प्रीय मज जनी । ब्रम्हांडभुवनी चीदंबरा ।।१।।
दील्हे आभयदान नीववीले मन । केले समाधान चीत माझे ।।२।।
करी चीदंबरा सांगीतली खुण । ठेवीसी नीर्वाण कोठवरी ।।३।।
दास म्हणे नको लाजउ बा चीती । ब्रीद हे श्रीपती जतन करी ।।४।।

१२९३१८

हिंदुत्सानि येक विप्र आला देख । होता तो भावीक भक्तराज ।।१।।
चीदंबरापासी आला दरुषणासी । विनंती स्वामिसी करितसे ।।२।।
दरीद्रे पिडीलो स्वामीराया बहुत । व्हावे क्रपावंत आनाथासी ।।३।।
दास म्हणे स्वामि बोलती तयासी । भाग्य उदयासी आले तुम्हा ।।४।।

१२९३१९

क्रपा करोनीया बोले चीदंबर । भाग्य तुझे थोर भाविक तु ।।१।।
मुहुर्त पाहुनि निरोप तुजसी । जावे आनंदेसी घरासी बा ।।२।।
पंचपात्र भरुनी दाळ दिल्ही त्यासी । बांधि पदरासी म्हणती स्वामी ।।३।।
दास म्हणे विप्र आनंदेकरुन । गाठोडी बांधोन नमितसे ।।४।।

१२९३२०

स्वामि म्हणती त्यासी न सोडी वाटेसी । जावोनी घरासी सोडी बापा ।।१।।
विप्र आनंदेसी करि नमस्कार । नीघे तो सत्वर घराकडे ।।२।।
येउनि ब्राम्हण आपुल्या घरासी । ठेवी देवार्यासी गाटोडी ते ।।३।।
दास म्हणे पुजा करि तो ब्राम्हण । जाला त्या प्रसन्न चिदंबर ।।४।।

१२९३२१

पुजा करुनिया गाठोडि सोडित । होन जाले त्यात दाळिचे ते ।।१।।
पाहोनीया विप्र हर्षयुक्त थोर । म्हणे चिदंबर पावला की ।।२।।
धन्य चीदंबरा कलयुगी आवतार । आलासी प्रखर श्रीषटीवरी ।।३।।
धन्य भाग्योदये दावीयले पाय । होसी बापमाय आनाथासी ।।४।।
दास म्हणे करी क्रपा दिनावरी । आनाथासि तारी स्वामि माझा ।।५।।

१२९३२२

आनंदेकरुन करी संतर्पण । ब्राम्हणभोजन आठा दिवसी ।।१।।
गुरुवारी करीत उपवास ब्राम्हण । खाय ते भोजन सांयकाळी ।।२।।
पहाती यात्रा जन येउनी थोरलाहान । दाळिचे ते होन जाले म्हणति ।।३।।
दास म्हणे थोर मागति वीप्रासि । द्यावा ती पुजेसी होन येक ।।४।।

१२९३२३

येक होन द्यावा म्हणति विप्रासी । दोन ते तुजसि देतो आम्ही ।।१।।
बोले तो ब्राम्हण न घडे मजसि । प्रसन्न दीनासि चिदंबर ।।२।।
पुर्णब्रम्ह जाला कलयुगि आवतार । प्रगट चीदंबर श्रीष्टीवरी ।।३।।
दास म्हणे लीला दावि चीदंबर । आनंत आपार कळा ज्याची ।।४।।

१२९३२४

चरित्र १८३

चिदंबरा करुणापति । दया येउ द्यावी चिती ।।१।।
क्रपावंत माय होसी । कैसा निष्टुर जालासी ।।२।।
पतितपावन तु होसी । काय झाले माझेविसी ।।३।।
पावे दास आनाथासी । चिदंबरा या वेळेसी ।।४।।

१२९३२५

यावे यावे करुणाकरा । दिनबंधु चिदंबरा ।।१।।
दावी दावी सगुण रुप । निवारि हा भवताप ।।२।।
वाट पाहातो निसीदिनि । भुक लागली नयनि ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । ब्रीद रक्षि चिदंबरा ।।४।।

१२९३२६

यावे जीवीच्या जीवना । चिदंबरा मनमोहोना ।।१।।
नित्य करितो प्रार्थना । माझी येउ दे करुणा ।।२।।
प्राण उरला डोळ्यासी । कोठवरी आंत घेसी ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । वेगी यावे चिदंबरा ।।४।।

१२९३२७

करुणा येउ दे दिनाचि । माय होसी आनाथाची ।।१।।
रक्षी रक्षी ब्रीद आता । चिदंबरा प्राणनाथा ।।२।।
तुजवीण जालो दिन । मज न पडे चेईन ।।३।।
माझे आंतर जाणसी । कोठवरि आंत घेसी ।।४।।
दास म्हणे चिदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।५।।

१२९३२८

धावे पावे करुणाघना । चिदंबरा बा सगुणा ।।१।।
वाट पाहु कोठवरि । दया येउ दे आंतरी ।।२।।
वेळ करु नये आता । चिदंबरा क्रपावंता ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । दावी रुप चिदंबरा ।।४।।

१२९३२९

यावे देव देवोत्तमा । चिदंबरा पुरषोत्तमा ।।१।।
तुझा आगाध महीमा । प्रगट करी सर्वोत्तमा ।।२।।
देई श्रुत्ध भक्तीप्रेमा । चिदंबरा आत्मारामा ।।३।।
दासाचीया मनोरमा । जालि बोलायाची सीमा ।।४।।

१२९३३०

कोन्ही आणीले निर्वाणी । धावा करितसे वनि ।।१।।
त्याचे संकटि पावसी । माझे वेळे का आळसी ।।२।।
रक्षी रक्षी ब्रीद आता । चिदंबरा प्राणनाथा ।।३।।
दास पतित आन्याई । परि जडलासे पाई ।।४।।

१२९३३१

आंत्येज होता आरण्यात । रात्री जाला भयाभित ।।१।।
व्याघ्र फिरे आरण्यात । आला जवळी पाहात ।।२।।
धावा करी तये वेळी । जीव बहुत तळमळी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । नाम जपतसे सार ।।४।।

१२९३३२

आसे जातीचा माहार । चिती आठवी चिदंबर ।।१।।
धावा करितसे वनी । व्याघ्र देखोनि नयनी ।।२।।
म्हणे सोडवी ईश्वरा । स्वामिराया चिदंबरा ।।३।।
दास म्हणे चिदंबर । त्यासी दावी चमत्कार ।।४।।

१२९३३३

व्याघ्र पाहुनी नयनी । उभा तठस्त ते स्थानी ।।१।।
आंत्येज करितसे धावा । पावे देवाचिया देवा ।।२।।
व्याघ्र घेउ पाहे प्राण । मज सोडवी येथुन ।।३।।
दास म्हणे चिदंबर । धावे संकटी सत्वर ।।४।।

१२९३३४

व्याघ्र पाहुनि नयनी । जाय मागे तो फिरुनि ।।१।।
हर्षयुक्त आंत्योज्यासी । करी भजन आनंदेसी ।।२।।
धन्य म्हणे चिदंबरा । पुर्णब्रम्ह आवतारा ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । कीर्ति तुझी दिगंतरा ।।४।।

१२९३३५

चिदंबरा स्वामिराजा । धावा करितो मि तुझा ।।१।।
नाम घेता तु धावसी । आंत्यज्यासी सोडविसी ।।२।।
दिन म्हणवितो तुझा । का हो विसर तो माझा ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । बटा न लावी ब्रिदास ।।४।।

१२९३३६

क्रपावंत माय होसी । कैसा बाळा वीसरलासी ।।१।।
का हो त्यागीयले मज । काय नीद्रा आली तुज ।।२।।
करि आनाथाचे काज । ब्रीदा येत आसे लाज ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे जाग्रत ईश्वरा ।।४।।

१२९३३७

नित्य करितो मि धावा । तारी आनाथ या जीवा ।।१।।
दावि पाउले केशवा । चिदंबरा सदाशीवा ।।२।।
तारि तारि मज दिना । स्वामि पतितपावना ।।३।।
दास म्हणे प्राणपति । चिदंबरा ये श्रीपती ।।४।।

१२९३३८

करुणावंत तुचि धणी । मज येक त्रीभुवनि ।।१।।
वाट पाहातो ईश्वरा । प्रगट व्हावे चिदंबरा ।।२।।
तुजविण माझे कोण । करिल बा संरक्षण ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । स्वामि पुरवावी आस ।।४।।

१२९३३९

धावे पावे करुणाघना । चिदंबरा ब्रम्हपुर्णा ।।१।।
वेगी यावे करुणाकरा । स्वामि क्रपेच्या सागरा ।।२।।
होसी आनाथासी माय । वेगी दावी आता पाय ।।३।।
येउ दे दासासी करुणा । चिदंबरा ये सगुणा ।।४।।

१२९३४०

चरीत्र १८४

चीदंबरभक्त शुध्द सत्वगुणी । दॆव कॆला रुणी भक्तीबळॆ ।।१।।
पुर्ण सद्‌गुरुभक्त वीशई वीरक्त । आसॆ दॆहातीत ब्रम्हरुप ।।२।।
ऐसा यॆकनाथ न कळॆ ज्याचा आंत । व्रीती हॆ नीवांत चीदंबरी ।।३।।
दया क्षमा शांती आंगी तॊ स्वभाव । नाम वॆंकटराव साजॆ ज्यासी ।।४।।
आज्ञॆवरुनीया करणॆ वर्तुनुक । कल्याण तॆ दॆश आखंडीत ।।५।।

न लगॆ सांगणॆ सुज्ञासी लीहीनॆ । रक्षॊनी आसणॆ संवस्ताना ।।६।।
मर्यादा हॆ जैसी आसॆ दॆवाजीची । वर्तनुक तॆची करणॆ बापा ।।७।।
नसॆ तो वीयोग कदा भॆटीलागी । चीदंबर वॆगी आनीतसॆ ।।८।।
वीस्तार तो काय ल्याहावा आभंगी । सर्व आंतरंगी साक्ष तुम्हा ।।९।।
स्वस्त चीत करुनी राहावॆ स्वस्थाना । चीदंबर जाणा क्रपा करीतो ।।१०।।
आणीक आभंग लीहीलॆ आसती दोन । कळॆल त्याजवरुन गर्भ सर्व ।।११।।
ईकडील चींता न करावी काही । करणॆ आसॆ पाही चीदंबरा ।।१२।।
नीवांत राहावॆ पादुका धरुनी । आवतार करणी प्रगट होती ।।१३।।
चीदंबर भॆटी करील सत्वरी । नीवांत आंतरी आसावॆ बा ।।१४।।
दास म्हणॆ आसॆ कलयुगी आवतार । प्रगट चीदंबर होत आसॆ ।।१५।।

१२९३४१

चीदंबरभक्त पंचायतन । तुम्हा साष्टांग नमन ।।१।।
वारंवार हे वीनंती । नीश्चय आसो द्यावा चिती ।।२।।
पाच सात तुम्ही देख । आसे त्या आवरण ते येक ।।३।।
नीश्चय आसावा निर्धार । नलगे लिहीणे विस्तार ।।४।।
श्रीच्या पादुका चर्मि जाण । पाटविला तो येथुन ।।५।।
भजन करावे निर्मळ । पाटविले ते करताळ ।।६।।
दास म्हणे चिदंबर । वेगि पाटवा उत्तर ।।७।। १२९३४२

करुणावंत धणि तुची त्रीभुवनि । आवतार करणी प्रगट करी ।।१।।
चिदंबरा वेळ लावो नये आता । तुझे हाती सता सर्व आसे ।।२।।
तुजवीन प्रीय नेणे माझ्या जीवा । जाणसी तु देवा आंतरीचे ।।३।।
दास म्हणे कीती घेसी देवा आंत । येई बा धावत चीदंबरा ।।४।। १२९३४३

यावे देवराया करि मज दया । जावो नेदी वाया नाम घेता ।।१।।
रक्षी दिना लागी चिदंबरा वेगी । आवतार जगी कळवि तुझा ।।२।।
पाहातो मि वाट सीनले नयन । दावी बा चरण चिदंबरा ।।३।।
यावे करुणापति स्वामि क्रपामुर्ति । वर्णावी बा किर्ती आखंडीत ।।४।।
दास म्हणे दावी प्रताप ईश्वरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।५।। १२९३४४

दावी दावी दावी रुप तुझे सगुण । निववि हे मन चिदंबरा ।।१।।
देई देई देई आनाथासी भेटी । दया येउ दे पोटी मायबापा ।।२।।
तारि तारि तारि मज आनाथासी । रुप ऋषीकेशि दावि तुझे ।।३।।
यावे सर्वगता स्वामी प्राणनाथा । वेळ बा समर्था लावो नये ।।४।।
दास म्हणे करि दया दिनावरि । दावी डोळेभरी रुप सगुण ।।५।।

१२९३४५

नये वेळ करु जीविच्या जीवना । दावी बा सगुणारुप तुझे ।।१।।
पावे दिनालागी चीदंबरा वेगी । आवतार जगी प्रगट करि ।।२।।
करीतो वीनंती स्वामि क्रपाघना । पुरवि वासना चिदंबरा ।।३।।
दास म्हणे दावी रुप तयेवेळे । निववावे डोळे चिदंबरा ।।४।।

१२९३४६

सोडवी सोडवी चीताची वासना । क्रपेच्या नीधाना चिदंबरा ।।१।।
साहे साहे साहे आपराध माझे । नाम घेता तुझे चिदंबरा ।।२।।
पावे पावे पावे ऐसीया वेळेसी । दया तुज कैसी न ये माझी ।।३।।
दास म्हणे दावी चरण मजसी । शरण आलो तुजसी चिदंबरा ।।४।।

१२९३४७

नको नको नको वेळ लाउ आता । स्वामि क्रपावंता चिदंबरा ।।१।।
करितो मी धावा सर्वकाळ देवा । येउ दे कणवा माझा काही ।।२।।
देई क्रपादान निववी हे मन । दावी बा चरण चिदंबर ।।३।।
दास म्हणे माझी पुरवावी आस । शरण तुम्हास आलो देवा ।।४।।

१२९३४८

चिदंबरापासी तैलंग ब्राम्हण । आला आसे जाण दर्षनासी ।।१।।
भक्तराज थोर निर्धार जयाचा । नाम जपे वाचा चिदंबरा ।।२।।
नीश्चय जयाचा आसे आज्ञाधार । द्रुष्टांत वीचार पाहोनिया ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चिदंबर । निरोप सत्वर देतो म्हणे ।।४।।

१२९३४९

त्या नेत्रे देखता बोलवोनि जाण । म्हणति भक्त पुर्ण निर्धारी हा ।।१।।
आज्ञेवरुनी करा म्हणती वर्तनुक । दावीसी कौतुक नवल परि ।।२।।
द्रष्टांती सांगती राहावे येथे स्वस्थ । लोकाचे देखत जावे म्हणती ।।३।।
दास म्हणे हे तो न कळे कोणासी । जवळील तयासी निंदीताती ।।४।।

१२९३५०

येकुलता येक मायॆ तो बापासी । कुंटुब घरासी व्दादश वर्षे ।।१।।
व्रध्द मातापीता वाट तॆ पाहती । सुखी तॆ आसति आपुलॆ घरी ।।२।।
निरोप धाडीती पुत्रालागी जाण । कांतॆलागी न्हान आलॆ आसॆ ।।३।।
दास म्हणॆ स्वामि नीरोप न दॆती । नीश्चय तॊ चीती द्रुढ त्याच्या ।।४।।

१२९३५१

आज्ञा जैसी आसॆ वर्तनॆ तयासी । आठ वर्ष यासी टॆवीयॆलॆ ।।१।।
स्वामि तॆ अद्रुश्य जाल्यावरी जाण । होता तो ब्राम्हण तीन वर्षे ।।२।।
त्यावरि हो आज्ञा जाली द्रुष्टांतीसी । जावॆ बा घरासी म्हणती स्वामी ।।३।।
दास म्हणॆ विप्र निघॆ आनंदॆसी । चिदंबर त्यासी क्रपा करी ।।४।।

१२९३५२

चिदंबरॆ त्याचे कॆलॆ समाधान । जालॆ त्या प्रसन्न आनुभव प्राप्ती ।।१।।
निश्चय तयाचा द्रुढ दॆखुनिया । करितसॆ दया चिदंबर ।।२।।
पुर्णब्रम्ह स्वामि आवतार जाला । स्वरुप तयाला दाखवीलॆ ।।३।।
दास म्हणॆ ऐसा भक्तप्रीयकर । स्वामी चिदंबर कलयुगी ।।४।।

१२९३५३

करुणा येउ दे ईश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।१।।
वेळ न करीता यावे । दीनालागी सांभाळावे ।।२।।
वाट पाहातो ईश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।३।।
दास म्हणे सर्वगता । नीवारी हे भवचींता ।।४।।

१२९३५४

यावे यावे दीनानाथा । चीदंबरा बा समर्था ।।१।।
तुजवीण उदासीन । मज न पडे चेईन ।।२।।
जीव माझा तळमळी । वेगी येवोनी सांभाळी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । दया क्षमेच्या सागरा ।।४।।

१२९३५५

करुणावंत माय होसी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
कीती वाट पाहावीसी । तुज दया न ये कैसी ।।२।।
धावा करीतो सर्वकाळ । कैसा म्हणवीसी दयाळ ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९३५६

आनाथाचा होसी नाथ । मज करावे सनाथ ।।१।।
कोठवरी घेसी आंत । वेगी येई बा धावत ।।२।।
तुजवीण प्राणेश्वरा । वाटे लटीका पसारा ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चीदंबरा बा चीद्‌घना ।।४।।

१२९३५७

वेळ न करीता यावे । हाकारीतो तुझ्या नावे ।।१।।
कोठवरी धरु धीर । कैसा जालासी बधीर ।।२।।
का हो धावा नायकसी । तुज गती जाली कैसी ।।३।।
पावे दास पतीतासी । चीदंबरा पावन होसी ।।४।।

१२९३५८

नाही नाही मज कोन्ही । तुजवीण त्रीभुवनी ।।१।।
सांभाळावे मज दीना । स्वामी पतीतपावना ।।२।।
यावे जीवीच्या जीवना । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । दावी चरण चीदंबरा ।।४।।

१२९३५९

दीन आनाथ परदेसी । तुजवीण मी उदासी ।।१।।
माझे आंतर जाणसी । आंत कोठवरी घेसी ।।२।।
तुजवीण उपवासी । जीव माझा कासावीसी ।।३।।
चीदंबरा दासावीसी । का हो नीष्टुर जालासी ।।४।।

१२९३६०

शुद्र आडला नीर्वाणी । धावा करीतसे वनी ।।१।।
होता नीजेला ठायासी । सर्प आला त्याजपासी ।।२।।
माहा आजगर थोर । आला त्याचीया समोर ।।३।।
दास म्हणे कंप भारी । धावा करी चीदंबरी ।।४।।

१२९३६१

येता देखोनी जवळी । जीव त्याचा तळमळी ।।१।।
भयाभीत तो होउनी । धावा करीतो नीर्वाणी ।।२।।
धावे पावे चीदंबरा । प्राण वाचवी ईश्वरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । तेथे दावी चमत्कार ।।४।।

१२९३६२

शुद्र धाबरा होवुन । हाक फोडीतसे जाण ।।१।।
धावे म्हणता चीदंबरा । सर्प फीरे तो माघारा ।।२।।
शुद्राजवळी येवोनी । गेला आजगर फीरोनी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामीभय ते काळास ।।४।।

१२९३६३

शुद्र उठोनी चालीला । स्वामी दर्षणासी आला ।।१।।
धन्य म्हणे चीदंबरा । धाक तुझा आजगरा ।।२।।
धावा करीताची तुझा । प्राण वाचवीला माझा ।।३।।
शुद्र येतो लोटांगणी । जन पाहाती नयनी ।।४।।
कीर्ती तुझी दीगंतरा । दास म्हणे चीदंबरा ।।५।।

१२९३६४

चरीत्र १८६

चीदंबरा होसी करुणेची माता । तुझे हाती सता सर्व आसे ।।१।।
होसी सुत्रधारि त्रैलोक्याचा धणी । आघटीत करणी चीदंबरा ।।२।।
तुजवीण प्रीय नसे बा आणीक । जाणसी तु देख आंतरीचे ।।३।।
दास म्हणे माझी येउ दे करुणा । पुरवी वासना चीदंबरा ।।४।।

१२९३६५

दावी नीजरुप निवारि भवताप । होसि मायबाप चीदंबरा ।।१।।
येउ दे करुणा मज पतीताची । पावन ब्रीदाची लज्या रक्षी ।।२।।
आनाथाचा नाथ म्हणवीसी देवा । येउ दे कणवा माझा काही ।।३।।
दास म्हणे होसि दयेचा सागर । नीववी आंतर चीदंबर ।।४।।

१२९३६८

यावे सर्वेश्वरा दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा चीदंबरा ।।१।।
न करीता वेळ यावे जगनाथा । नुपेक्षीसी सर्वथा मायबापा ।।२।।
तुजवीण दीन जालो बा दयाळा । येउ दे कळवळा माझा देवा ।।३।।
दास म्हणे दावि चरण चीदंबरा । आनाथासी करा दया आता ।।४।।

१२९३६७

चीदंबरा करीसी आज्ञेचा पाईक । दावीसी कौतुक स्वामीराया ।।१।।
उघड प्रताप करुणी दावीसी । वेळ का लावीसी प्रगठावया ।।२।।
देहे जाला क्षीण कंठी उरला प्राण । ब्रीद करी जतन चीदंबरा ।।३।।
दास म्हणे देई आनाथासी भेटी । दया येउ दे पोटी स्वामीराया ।।४।।

१२७३६८

येउ द्यावी दया स्वामी क्रपाघना । पुरवी वासना चीदंबरा ।।१।।
करीतो मी धावा सर्वकाळ देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।२।।
दावी चरणकमळ कंठी उरला प्राण । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।३।।
दास म्हणे देई मज क्रपादान । दावी बा सगुण रुप तुझे ।।४।।

१२९३६९

यावे सर्वगता स्वामी क्रपावंता । नीवारी हे चींता चीदंबरा ।।१।।
सापडला हाती जरी चींतामणी । चींता आंथःकर्णी राहे कैसी ।।२।।
तैश्यापरी स्वामी सगुणब्रम्ह तुम्ही । देखीयले आम्ही चीदंबरा ।।३।।
आझोनि या चींता दासाचे कपाळी । कैसी ब्रीदावळी राहे येणे ।।४।।

१२९३७०

यावे दीनानाथा सर्वज्ञाच्या राया । जाउ नेदी वाया ब्रीद आता ।।१।।
नये वेळ करु स्वामी वीश्वंभरा । दीनाच्या कैवारा प्रगट व्हावे ।।२।।
भाकीतो करुणा पतीतपावना । पावे मज दीना ऐशावेळे ।।३।।
दास म्हणे देई क्रपा आभयदान । दावी बा चरण चीदंबरा ।।४।।

१२९३७१

करीतसे धावा गरीब ब्राम्हण । पीडीलासे जाण दरीद्रे तो ।।१।।
तैलंग देसीचा अंध तो ब्राम्हण । चीदंबरावीण देव नेणे ।।२।।
कुटुंबवत्सल वयदीक ब्राम्हण । नीराश्रय जाण नये गांवी ।।३।।
दास म्हणे होता भक्तराजपुर्ण । न घे कदा आन्न शुद्राचे ते ।।४।।

१२९३७२

आग्नहोत्र घरी आंगी शुत्धभाव । नेणे दुजा देवा तिहीलोकी ।।१।।
चीदंबर ध्यान करी नीरंतर । नीवांत आंतर आसे ज्याचे ।।२।।
न घे प्रतीग्रह आणीक यातीचे । श्वभाव जयाचा नीर्मळ पै ।।३।।
दास म्हणे चीती आठवी चीदंबर । पीडीलासे फार दरीद्रे तो ।।४।।

१२९३७३

आली ते करुणा चीदंबरालागी । प्रत्यय दावी जगी उघड तो ।।१।।
येउनी द्रीष्टांती दील्हे रुपये दोन । सांगे त्यासी जाण चीदंबर ।।२।।
आल्या ब्राम्हणासी देत जावे आन्न । आग्नीसेवा करुन राहे सुखे ।।३।।
दास म्हणे वीप्र जालो तो जाग्रत । रुपये हातात प्रत्यक्ष ते ।।४।।

१२९३७४

आनंदला ब्राम्हण करी संतर्पण । न सरति जाण रुपये कदा ।।१।।
दावी चीदंबर उघड चमत्कार । कलयुगि आवतार श्वामी माझा ।।२।।
आगाध हैं किर्ती दावी नीत्य नवी । जाणति आनुभवी प्रत्ययेसी ।।३।।
दास म्हणे कीर्ती वेदा न वर्णवे । तीर्थे वर्णु जाय मुर्ख मी तो ।।४।।

१२९३७५

सद्गुरु सेवन सदभावे करुण । होय ब्रम्हज्ञान प्राप्त त्यासी ।।१।।
सद्गुरुवीतरीक्त ब्रम्हज्ञानप्रात्पी । नव्हे बा कल्पांती सत्य जाणा ।।२।।
आच्यार्य ते जाण उपासना पुर्ण । सांगे तो श्रीक्रष्ण आर्जुनासी ।।३।।
यालागी हो बापा सद्गुरु सेवन । होय आत्मज्ञान प्रात्पी येणे ।।४।।
चीदंबर दास सांगे कासीदासा । घरुनी भरवसा सेवा कीजे ।।५।।

१२९३७६

वायो सुत मारुती । तुझी आगाध हे कीर्ती ।।१।।
पराक्रम आसे भारी । लंका दहन ते करी ।।२।।
धाक रावणासी जाण । त्याचे जाळीले वदन ।।३।।
नीर्दाळीले राक्षसासी । सामर्थे आपुले दावीसी ।।४।।
रामचंद्रा सुखी केले । सीतेलागी तोषवीले ।।५।।
होसी ईश्वर आवतारा । स्वामी आक्रावा तु रुद्र ।।६।।

चीदंबरे क्रपा केली । तुम्ही प्रीथी वीस्तापीली ।।७।।
राजा होसी पांडरीचा । रक्षी लौकीक ब्रीदाचा ।।८।।
दीन पतीत आज्ञान । स्वामी होसी तु पावन ।।९।।
वसवी आपुला तु गाव । हेची तुम्हासी वैभव ।।१०।।
चीदंबरा दास म्हणे । आपराध क्षमा करणे ।।११।।

१२९३७७

चरीत्र १८६-A

चिदंबरा करुणापती । दया येउ द्यावी चीती ।।१।।
माय होसी आनाथाची । लज्या रक्षी हे ब्रीदाची ।।२।।
तुजवीण प्राणेश्वरा । नेणे देव मी दुसरा ।।३।।
दासाचीया प्रीयकरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९३७८

चीदंबरा तुजवरुनी । देहे केला वोवाळणी ।।१।।
दया येउ द्यावी मनी । दावी रुप तु नयनी ।।२।।
तुझी आगाध करणी । ब्रीद रक्षी आता जनी ।।३।।
दास येतो लोटांगणि । चीदंबरा ये धावोनी ।।४।।

१२९३७९

माझी येउ दे करुणा । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।१।।
दावी रुप तु सगुणा । माझी पुरवी वासना ।।२।।
नीत्य करीतो प्रार्थना । स्वामी ऐके वीज्ञापना ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चीदंबरा बा चीद्घना ।।४।।

१२९३८०

चीदंबरा तुजवीण । मज न पडे चईन ।।१।।
नीत्य झुरतसे मन । वेगी दावी वा चरण ।।२।।
माझे जीवलग कोण । श्वामीराया तुजवीण ।।३।।
दासा आझेचे प्रमाण । चीदंबरा होय प्रसन्न ।।४।।

१२९३८१

तुझे नाम येक सार । जीवी धरले चीदंबर ।।१।।
माझे नीववी आंतर । आंत घेसी कोठवर ।।२।।
कीती देउ परीहार । कैसा जालासी नीष्टुर ।।३।।
दास तुझा मी कींकर । चीदंबरा ये सत्वर ।।४।।

१२९३८२

वेगी यावे सर्वेश्वरा । दीनबंधु चीदंबरा ।।१।।
दया आनाथासी करा । दावी चरण ईश्वरा ।।२।।
श्वामी आनंत आपारा । प्रगट आवतार करा ।।३।।
दासाचीया प्रीयकरा । भेटी देई चीदंबरा ।।४।।

१२९३८३

वीप्र होता दुरदेसी । आवडी चीदंबरापासी ।।१।।
होता भक्तराज पुर्ण । करी स्वामीचे भजन ।।२।।
चीदंबरावीण काही । त्यासी प्रीयकर नाही ।।३।।
दास म्हणे धावा करी । शुत्धभाव तो आंतरी ।।४।।

१२९३८४

भीक्षा मागुनी खातसे । आंगी भक्तीज्ञान आसे ।।१।।
आलीया ब्राम्हणासी आन्न । नीत्य देत आसे जाण ।।२।।
चीदंबरा स्वामीराया । म्हणे येउ दे माझी दया ।।३।।
दास म्हणे तो ब्राम्हण । नीत्य धावा करी जाण ।।४।।

१२९३८५

येके दीवसी रात्री जाण । वीप्र.करीतो रुदन ।।१।।
भीक्षा मागु कोठवरी । जाला उदास आंतरी ।।२।।
म्हणे धावे चीदंबरा । दया येउ दे ईश्वरा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९३८६

श्वामी द्रीष्टांती येउन । बोले ब्राम्हणासी जाण ।।१।।
चींता काही करु नये । भीक्षालागी जाउ नये ।।२।।
भीक्षा देतो मी तुजसी । बांधी तांदुळ पदरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी वीप्रावर ।।४।।

१२९३८७

तांदुळ दील्हे च्यार सेर । गुप्त जाला चीदंबर ।।१।।
वीप्र आला ज्याग्रतेसी । तांदुळ देखीले पदरासी ।।२।।
हर्ष ब्राम्हणासी बहुत । सांगे सर्वासी व्रतांत ।।३।।
चीदंबर आवतार । करणी याची हे आपार ।।४।।
वीप्र करी संतर्पण । तांदुळ न सरती जाण ।।५।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा आवतार ।।६।।

१२९३६६

चरीत्र १८७

चीदंबरा दावी चरण दीनासी । क्रपावंत होसी माय जगी ।।१।।
यावे दीनानाथा आनाथाच्या काजा । लौकीक हा तुझा रक्षी आता ।।२।।
दावी चरणकमळ वीश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका स्वामीराया ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेची तु माता । चीदंबरा आता प्रगट व्हावे ।।४।।

१२९३८९

चीदंबरा चीत करी माझे स्थीर । नीववी आंतर श्वामीराया ।।१।।
यावे सर्वगता स्वामी क्रपावंता । नीवारी हे चींता भवदुःख ।।२।।
यावे दीनानाथा श्वामी तु समर्था । चींतीलीया आर्था पावे वेगी ।।३।।
दास म्हणे यावे जीवीच्या जीवना । श्वामी ब्रम्हपुर्णा चीदंबरा ।।४।।

१२९३९०

यावे करुणापती पावे दीनाप्रती । वर्णवी बा कीर्ती आखंडीत ।।१।।
यावे वीश्वनाथा पावे आनाथासी । दावी रीषीकेसी चरण तुझे ।।२।।
चीदंबरा देई क्रपा आभयदान । नीववी हे मन स्वामीराया ।।३।।
दास म्हणे करी व्रती हे नीवांत । दावी सर्वगत रुप तुझे ।।४।।

१२९३९१

वीश्वामाजी येक होसी वीश्वंभर । नाम चीदंबर साजे तुम्हा ।।१।।
आनंतब्रम्हांड करीसी नीर्माण । न लगता क्षण स्वामीराया ।।२।।
न कळे तुझा अंत ब्रम्हादीकालागी । आवतार जगी प्रगट तु ।।३।।
पावे चीदंबरा दास आनाथासी । कैवारी म्हणवीसी मायबापा ।।४।।

१२९३९२

ईछामात्रे करुनी ब्रम्हांड नीर्मीसी । काय माझेवीसी जाले तुम्हा ।।१।।
कोठवरी आंत घेसी बा आनंता । ब्रीद भगवंता जतन करी ।।२।।
नये करु वेळ श्वामी क्रपाघना । आवतार सगुणा प्रगट व्हावे ।।३।।
चीदंबरा यावे दासाचीया वेळे । सगुण सावळे रुप दावी ।।४।।

१२९३९३

करुणावंत धणी तुची त्रीभुवनी । दावी रुप नयेनी चीदंबरा ।।१।।
येउ द्यावी दया मज पतीताची । पावन ब्रीदाची लज्या रक्षी ।।२।।
यावे दयानीधी पावे मज आधी । न करी आवधी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे होसी माय आनाथाची । दया तुज कैसी न ये माझी ।।४।।

१२९३९४

यावे बा श्रीधरा आनंता आपारा । दीनाच्या कैवारा प्रगट व्हावे ।।१।।
यावे करुणापती पावे दीनाप्रती । नीववावे चीती चीदंबरा ।।२।।
यावे बा दयाळा स्वामी वीश्वपाळा । दावी रुप डोळा स्वामीराया ।।३।।
दास म्हणे करी दया दीनावरी । यावे बा झडकरी चीदंबरा ।।४।।

१२९३९५

ब्राम्हण तो येक तैलंग देसीचा । शुत्धभाव त्याचा देवापासी ।।१।।
करीतसे धावा आपुल्या गावासी । न ये स्वामीपासी भेटीलागी ।।२।।
सत्य आवतार आसे चीदंबर । होईल गोचर मज येथे ।।३।।
दास म्हणे नीत्य करीतो प्रार्थना । भेटी दे सगुणा चीदंबरा ।।४।।

१२९३९५

प्रेमयुक्त भक्त वीषई वीरक्त । धावा तो करी मध्यरात्री ।।१।।
आश्रुपात नयेनी रडे आक्रंदोनी । दावी रुप नयनी चीदंबरा ।।२।।
त्यागीयेले आन्न मांडीले नीर्वाण । गेला जरी प्राण जावो म्हणे ।।३।।
दास म्हणे करुणा आली चीदंबरा । दीनाच्या कैवारा धावतसे ।।४।।

१२९३९७

पडीला आचेतन व्याकुळतो प्राण । प्रगट सगुण तयेवेळी ।।१।।
उभा चीदंबर ब्राम्हणासमोर । प्राकाश मंदीर उजळले ।।२।।
म्हणे वीप्रालागी आलो मी भेटीसी । नीद्रा तुज कैसी आली आसे ।।३।।
दास म्हणे वीप्र उघडी नेत्रद्वार । देखीला समोर चीदंबर ।।४।।

१२९३९८

हर्षयुक्त मनी जाय लोटांगणी । मीटी घाली जरणी ब्राम्हण तो ।।१।।
उटवोनी त्यासी दील्हे आळींगण । केले ब्रम्हज्ञान प्राप्तत्यासी ।।२।।
ईछा होती मनी केले समाधान । जाला त्या प्रसन्न चीदंबर ।।३।।
दास म्हणे आसे क्रपावंत धणी । आवतार जनी चीदंबर ।।४।।

१२९३९९

चरीत्र १८८

चीदंबरा मायबापा । करी आनाथासी क्रपा ।।१।।
वसवीसी सप्तद्वीपा । करी भक्तीमार्ग सोपा ।।२।।
पतीतपावन ईश्वरा । दीनबंधू सर्वेश्वरा ।।३।।
दासाचीया प्रीयकरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९४००

यावे ईश्वाचा जनका । स्वामी ब्रम्हांडनायका ।।१।।
तुजवीण जालो दीन । वेगी येई बा धावोन ।।२।।
धावे पावे बा ईश्वंभरा । दीन जनाच्या कैवारा ।।३।।
क्रपावंत तुची धणी । दासा रुप दावी नैनी ।।४।।

१२९४०१

यावे दीनाच्या दयाळा । चीदंबरा ईश्वपाळा ।।१।।
दावी रुप घननीळा । करी आनंद सोहोळा ।।२।।
क्रपावंत होसी आता । दीनालागी तु रक्षीता ।।३।।
दासाचीया प्राणनाथा । चीदंबरा ये समर्था ।।४।।

१२९४०२

यावे सर्वज्ञाच्याराया । चीदंबरा प्राणप्रीया ।।१।।
रक्षी दीन रंकालागी । कळवी आवतार जगी ।।२।।
स्वामी ब्रम्हांडनायका । तीही लोकी तुझा डंका ।।३।।
चीदंबरा पुर्णब्रम्हा । दासाचीया प्रीयोतमा ।।४।।

१२९४०३

यावे यावे सर्वगता । चीदंबरा बा आनंता ।।१।।
यावे देवदेवोत्तमा । तुझा आगाध महीमा ।।२।।
कीर्ती वर्णवी ईश्वरा । स्वामीराया दीगंतरा ।।३।।
दास वीनवी याजसाटी । चीदंबरा देई भेटी ।।४।।

१२९४०४

धावे पावे करुणाघना । स्वामी पतीतपावना ।।१।।
यावे जीवीच्या जीवना । चीदंबरा मन मोहना ।।२।।
वाट पाहतो नीसीदीनी । वेगी यावे बा धावोनी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । दावी चरण ईश्वरा ।।४।।

१२९४०५

नीत्य करीतो वीनंती । दया येउ द्यावी चीती ।।१।।
होसी करुणेची माता । दीनालागी पावे आता ।।२।।
सांभाळावी ब्रीदावळी । दावी रुप चंद्रमौळी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९४०६

ब्राम्हण आला दुरदेसी । होता श्रीरंगपटणवासी ।।१।।
करी वीनंती स्वामीसी । आन्न ने मिळे खावयासी ।।२।।
तुझे आटवीतो चरण । कैसा जालासी कठीण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । क्रपा आली स्वामीस ।।४।।

१२९४०७

स्वामी म्हणती तयासी । चींता नकरी मानसी ।।१।।
देतो नीरोप तुजसी । जावे आनंदे घरासी ।।२।।
वीप्र वीनवीतो जाण । करी दरिद्रनाशन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।।

१२९४०८

बोलावीला तो ब्राम्हण । दील्हे सेरभर धान्य ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । गाट न सोडी वाटेसी ।।२।।
घरि घेउनिया जावे । पुजा करुनीया सोडावे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी वीप्रावर ।।४।।

१२९४०९

ब्राम्हण जाउनीया घरासी । पुजुन सोडी गाटोडीसी ।।१।।
सोडुन पाहाताची जाण । जाले शुत्ध ते कांचन ।।२।।
जाला आनंद ब्राम्हणा । वाटी वीप्रासी दक्षणा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी नाना चमत्कार ।।४।।

१२७४०९

चरित्र १८९

चीदंबरा होसी आनाथाची माय । दीनालागी पाय दावी आता ।।१।।
आन्याई आपराधी पडीलो पदरि । स्वामीराया करी पावन तु ।।२।।
पतीत पतीत त्रीवाच्या पतित । तुझे हाती हीत सर्व देवा ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेचा सागर । कलयुगी आवतार स्वामीराया ।।४।।

१२९४११

न कळे ते हीत माझे मज देवा । आनाथ या जीवा तारीसी तु ।।१।।
क्षणभंगुर हा नासीवंत देह । नाटवती पाय तुझे देवा ।।२।।
वीशयालागीकरुनी गुंतलो संसारी । नाटवी आंतरी तुज कधी ।।३।।
चीदंबरा दास पतीताची रास । पावन तुम्हास नाम साजे ।।४।।

१२९४१२

बाळ पण गेले खेळता आयुष्य । जातो ही नाश न कळे बा ।।१।।
तारुण्याचे भरी हे अंहकार थोर । डोळ्यावरी घुर आला आसे ।।२।।
वेड वीषयाचे माकड गारोड्याचे । रक्षी बायकोचे मनोगत ।।३।।
चीदंबर दास म्हणे वीषयाने । न चुके ते जाणे कुंभपाकी ।।४।।

१२९४१३

नाहि क्षणभर आवकाश काही । वेल तो पाही भेंडियाचा ।।१।।
न कळे मुर्खासी जातो मी नर्कासी । जाण न ये त्यासी काही केल्या ।।२।।
संसाराचे कामे गुंतलासे फार । करि येरझार जन्ममरण ।।३।।
चीदंबरा दासा तुची सोडवीसी । आवतार तु होसी पावन बा ।।४।।

१२९४१४

तारुण्ये देहासी चढे आहंभाव । नाटवे तो देव गुरु काही ।।१।।
संसाराचे कामे भुल पडलिसे । जाले वेडेपीसे वीषयाचे ।।२।।
क्षणभरि जरि जाला आवकाश । मांडी सावकाश सोकाटिचा ।।३।।
चीदंबर दास म्हणे. . . ..।।४।।

१२९४१५

आयुष्य जाले क्षीण आले वृध्धपण । नेत्र जाले हीन बधीरा कानी ।।१।।
गळीत हातपाय कंप तो खोकला । मागे देवाजीला मरण मग ।।२।।
हासताती रांडा न पुसती पोर । पाणी तांब्याभर न दे कोन्ही ।।३।।
चिदंबरा दास म्हणे गेल्या प्राण । भोगीतो पतन यमपुरी ।।४।।

१२९४१६

सोडवी सोडवी मज चीदंबरा । आनाथासी करा दया आता ।।१।।
आनाथ मी दीन पडीलो पदरी । ब्रीद जतन करि पावन तुझे ।।२।।
पावन आवतार जालासे कलयुगी । प्रगट व्हावे जगी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे होसी क्रपावंत धणि । आघटीत करणी तुझी देवा ।।४।।

१२९४१७

पतीत आन्याई शुद्र दुराच्यारि । आवीचारे करि कर्मे नाना ।।१।।
आसे ज्यार चोर उन्मत पै थोर । वाट मारि फार हात्यारि तो ।।२।।
येके दिवसी स्वामी जाताती वाटेसी । वीप्र समुदायासी पाहात ।।३।।
दास म्हणे होते त्यांचे बरोबर । सिपाई ते थोर दहाविस ।।४।।

१२९४१८

आले सॆ दोनसॆ मिळोनिया चोर । होता तो सरदार दुरगावी ।।१।।
वॆडीलॆ चोराणी यात्रा समुदायॆसी । स्वामि म्हणती त्यासी न्यावॆ सर्व ।।२।।
आधि यात्रा सर्व लुठोनिया नॆती । घॆवुनि पळती चार तॆव्हा ।।३।।
दास म्हणॆ आलॆ स्वामि त्या गावासी । चोर सरदारासी भॆट जालि ।।४।।

१२९४१९

झाला शरणांगत बांधोनीया हात । म्हणॆ मी पतित आन्याई बा ।।१।।
वस्तभाव तॆही दिल्हा तॆ आनोनी । जाती लोटांगणी चोर सर्व ।।२।।
स्वामी म्हणति त्यासी प्रायश्चित काही । पुढॆ भक्त पाही होसील तु ।।३।।
दास म्हणॆ प्रत्यय जाला त्या चोरासी । पडॆ दुसरॆ दिवसी करागृही ।।४।।

१२९४२०

पालॆगिर होता यॆक किलॆदार । धरियला चोर तॆणॆ तॆथॆ ।।१।।
तोडोनिया हात घतला किल्यात । स्वामी सोडवीत तॆथुनीया ।।२।।
लावीलॆ भक्तीसी थोर पतीतासी । पावन स्वामीसी नाम साजॆ ।।३।।
लावीतसॆ भक्ती ज्यार चोरालागी । आवतार जगी चीदंबरा ।।४।।
दास म्हणॆ ऐसा कलयुगी आवतार । सगुण चीदंबर प्रगट जनी ।।५।।

१२९४२१

चीदंबरा स्वामीराजा । हेत पुरवी तु माझा ।।१।।
तुजवीण उदासीन । होय व्याकुळ तो प्राण ।।२।।
दया न ये का ईश्वरा । स्वामीराया चीदंबरा ।।३।।
दासाचीया प्रीयकरा । प्रगट व्हावे ईश्वंभरा ।।४।।

१२९४२२

कीती करवीसी धावा । चीदंबरा सदासीवा ।।१।।
कैसा नीष्टुर जालासी । क्रपावंत म्हणवीसी ।।२।।
वाट पाहतो नीसीदीनी । का हो न येसी आझुनी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । ब्रीद रक्षी चीदंबरा ।।४।।

१२९४२३

मी तो आन्याई आपार । तुझे पावन आवतार ।।१।।
रक्षी रक्षी ब्रीद आता । चीदंबरा क्रपावंता ।।२।।
तुजवीण मज कोन्ही । प्रीय नसे त्रीभुवनी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । तुजवीण मी उदास ।।४।।

१२९४२४

स्वामी जालो आती दीन । मज न पडे चईन ।।१।।
तळमळी माझा जीव । देवा येउ द्यावी कीव ।।२।।
तुज ऐसा क्रपावंत । दुजा नसे ब्रम्हांडात ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९४२५

यावे यावे वीश्वपती । चिदंबरा तु श्रीपती ।।१।।
तुझी वर्णवी बा कीर्ती । रक्षी मज दीनाप्रती ।।२।।
करुणावंत तुची माता । आनंत ब्रम्हांडे पाहाता ।।३।।
दासाचीया प्राणनाथा । चीदंबरा ये समर्था ।।४।।

१२९४२६

दुरदेशीचा परदेसी । आला स्वामिचे भेटीसी ।।१।।
तया न घडे दरुशन । यात्रा दाटी बहुत जान ।।२।।
तोही न सांगे कोणासी । पाहे दुरोनी स्वामीसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाणे सर्वाचे आंतर ।।४।।

१२९४२७

येके दीवसी स्वामीनी । नाम त्याचे ते सांगुनी ।।१।।
त्यासी जवळी बोलावीले । बहुत समाधान केले ।।२।।
स्वामी पुसती तयासी । काय ईछा हे चीतासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९४२८

आसे भावीक तो जाण । काही न दावी बोलुन ।।१।।
आंतरसाक्षी चीदंबर । जाणे सर्वाचे आंतर ।।२।।
धणी आसे क्रपावंत । कळा आघटीत दावीत ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाले प्रसन्न तयास ।।४।।

१२९४२९

देती नीरोप तो जाण । त्यासी होउनी प्रसन्न ।।१।।
दाळ दीधली हारबर्याची । म्हणती बेगमी जन्माची ।।२।।
दाळ दीधली आधसेर । जाली क्रपा हे आपार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । देती नीरोप सत्वर ।।४।।

१२९४३०

आसे भावीक परदेसी । स्वामी सांगती तयासी ।।१।।
बांधी दाळीची गाटोंडी । घरी जाउनीया सोडी ।।२।।
आज्ञा म्हणोनीया जाण । करि साष्टांग नमन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आला आपुल्या घरास ।।४।।

१२९४३१

घरि जाउनी परदेसी । सोडुन पाहे गाटोडीसी ।।१।।
जाले दालीचे ते होन । चीदंबरी कळापुर्ण ।।२।।
पुर्णब्रम्ह आवतार । दावी नाना चमत्कार ।।३।।
म्हणे चीदंबर दास । तारी दीन आनाथास ।।४।।

१२९४३२

चरीत्र १९१

चीदंबरा चीत करी माझे स्थीर । वाट पाहु कोठवर मायबापा ।।१।।
देई क्रपादान दावी रुप सगुण । व्हावे बा प्रसन्न आनाथासी ।।२।।
दावी चरणकमळ नीवारी तळमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।३।।
दास म्हणे यावे जीवीच्या जीवना । पुरवी वासना चीदंबरा ।।४।।

१२९४३३

आनाथ मी दीन शरण आलो तुज । रक्षी माझी लाज चीदंबरा ।।१।।
भेटी व्हावी तुज हेची माझी लाज । आणीक ते काज नसे बापा ।।२।।
भक्त केले जैसे सत्य करुनी दावी । लज्या हे रक्षावी ब्रीदाची बा ।।३।।
दास म्हणे तुज न मागे आणीक । आवतार कौतुक प्रगट करी ।।४।।

१२९४३४

यावे सर्वेश्वरा दिनाच्या कैवारा । आनंत आपारा सगुण व्हावे ।।१।।
देई सगुण भेटी दया येउ दे पोटी । आवतार कोटी प्रगट करी ।।२।।
कोण रक्षी मज स्वामि तुजविण । कैवारि तो कोण आनाथाचा ।।३।।
चिदंबरा दासा प्रिय ते आणीक । तुजवीण देख नसे देवा ।।४।।

१२९४३५

चीदंबरा तुची प्रीयकर मज । आंतरीचे गुज ठावे तुम्हा ।।१।।
तुजवीण कोण जाणेल जीवन । निवारिल कोण दुःख माझे ।।२।।
कोणापासी मागु ईछेचे भातुके । कोण कवतुके बुझावील ।।३।।
दास म्हणे होसी प्राणाचा तु प्राण । नीववी हे मन चिदंबरा ।।४।।

१२९४३६

यावे करुणाघना पतीतपावना । आवतार सगुणा चीदंबरा ।।१।।
यावे दीनानाथा पावे मज आता । तुझे हाती सता सर्व आसे ।।२।।
पावे वीश्वंभरा दिनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा रुप दावी ।।३।।
दास म्हणे करि दया दिनावरी । निववि आंतरी मायबापा ।।४।।

१२९४३७

यावे करुणाघना पतीतपावना । पावे मज दीना चिदंबरा ।।१।।
यावे यज्ञेश्वरा स्वामी परात्परा । प्रगट चिदंबरा रुप दावी ।।२।।
यावे दयानीधी पावे मज आधी । सहज समाधी देई मज ।।३।।
चिदंबरा दास तुजवीन उदास । बटा हा ब्रीदास न लावी बा ।।४।।

१२९४३८

यावे पुर्णब्रम्हा स्वामी आत्मारामा । जीवीच्या वीश्रामा चीदंबरा ।।१।।
न येउदे बा दुराशा चीतासी । चरण आनाथासी दावी तुझे ।।२।।
प्रार्थीतो दयाळा तुम्हा चीदंबरा । बोलोनि ईश्वरा दाउ कीती ।।३।।
दास म्हणे होसी माय दीनालागी । चिदंबरा वेगी यावे आता ।।४।।

१२९४३९

येकांति बैसोन करितसे ध्यान । तैलंग ब्राम्हण दुरदेसी ।।१।।
म्हणे चिदंबरा देई मज भेटी । आवतार श्रुष्टी करि तुझा ।।२।।
दुरदेसी तुझा आवतार जाला । करणी आयकीला लौकीक बा ।।३।।
दास म्हणे ऐसा विप्र धावा करी । आठवी अंतरी चिदंबर ।।४।।

१२९४४०

न घे आन्नपाणी बैसला नीर्वाणी । चींती ध्यानी मनी चीदंबर ।।१।।
करुणा भाकीत बैसला ब्राम्हण । करितसे ध्यान रात्रंदीवस ।।२।।
चीदंबरा रक्षी ब्रीद हे आपुले । दावी बा पाउले आनाथासी ।।३।।
दास म्हणे विप्र करीतसे धावा । भेटी माहादेवा देई म्हणे ।।४।।

१२९४४१

देखोनी सद्भाव वीप्राचा नीर्धार । भेटी त्यासी देत चीदंबर ।।१।।
प्रगट आवतार जाला आसे । व्दार उघडी त्यासी म्हणत आसे ।।२।।
वीप्र म्हणे कोण आलासी या वेळे । मजसी न कळे कोण होसी ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । केलासे नीर्धार कोणासाटी ।।४।।

१२९४४२

धावोनी ब्राम्हण उघडीलॆ व्दार । टॆवी चरणावर मस्तक तो ।।१।।
चीदंबरराया भेटी दील्ही मज । नोळखीलॆ तुज दॆवा म्हणुनी ।।२।।
चतुर्भुज रुप दावी चीदंबर । नीववीलॆ आंतर ब्राम्हणाचॆ ।।३।।
दास दावी आवतार कळा । ब्रम्हिचा पुतळा चिदंबर ।।४।।

१२९४४३

चरीत्र १९२

चीदंबरा करुणापती । दया यॆउ द्यावी चीती ।।१।।
होसी करुणॆची माता । वॆळ लावीसी का आता ।।२।।
दावी चरण आनंता । पाई ठेवीन मि माथा ।।३।।
दासालागी पावॆ आता । चिदंबरा क्रपावंता ।।४।।

१२९४४४

नीत्य करितो प्रार्थना । माझी पुरवी वासना ।।१।।
यावॆ जीवीच्या जीवना । चिदंबरा बा सगुणा ।।२।।
धावॆ पावॆ वॆगी आता । दावी रुप भगवंता ।।३।।
दास वीनवीतो दॆवा । चीदंबरा यॆ कॆशवा ।।४।।

१२९४४५

नको नको वेळ करु । कोटवरी धीर धरु ।।१।।
दावी दावी रुप सगुण । माझे नीववी हे मन ।।२।।
देई देई क्रपादान । ब्रीद करावे जतन ।।३।।
तारी तारी दासालागी । चीदंबरा यावे वेगी ।।४।।

१२९४४६

येई येई माझे आई । चीदंबरे वीठाबाई ।।१।।
कीती लावीसी तु वेळ । तळमळी तुझे बाळ ।।२।।
माता होसी तु दयाळ । तुझे ह्रदय कोमळ ।।३।।
तुझे आंगी सताबळ । दास दीन रंक दुर्बळ ।।४।।

१२९४४७

चीदंबरा तुजपासी । पार नसे सामर्थ्यासी ।।१।।
काय जाले माझेवीसी । मी तो पातकाची रासी ।।२।।
पावन आवतार होसी । ब्रीद बांधोनी आलासी ।।३।।
काय जाले बा तुजसी । दासाचा आंत का पाहसी ।।४।।

१२९४४८

कीती वाट पाहावीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।१।।
प्राण उरला डोळ्यासी । तुज दया न ये कैसी ।।२।।
क्रपावंत म्हणवीसी । का हो ब्रीद गमावीसी ।।३।।
पावे दास आनाथासी । चीदंबरा या वेळेसी ।।४।।

१२९४४९

ब्राम्हण धावा करीतसे । तुझी भेटी त्यासी नसे ।।१।।
होता दरीद्रे पीडीला । आटवीतो बा तुजला ।।२।।
नीत्य करीतो चींतन । चीदंबरा ये धावोन ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । यावे क्रपेच्या सागरा ।।४।।

१२९४५०

ब्राम्हण होता कासावीसी । करुणा आली बा तुजसी ।।१।।
त्याचे संकटी धावसि । प्रसाद नारळ तु देसी ।।२।।
तया नारळामाझारी । रत्ने नीघती परोपरी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कळा आपार ईश्वरा ।।४।।

१२९४५१

ब्राम्हण आनंदेसी जाण । नीत्य करी संतर्पण ।।१।।
दैवत नेणे दुजे जाण । येका चीदंबरावीण ।।२।।
नीत्य कीर्तन भजन । झाला ईश्वर प्रसन्न।।३।।
दास म्हणे गुंडीधारी । चीदंबर श्रीष्टीवरी ।।४।।

१२९४५२

कळा दावी नानापरी । दीन आनाथासी तारी ।।१।।
भक्ती मुक्तीचा हा दाता । दीनालागी पावे आता ।।२।।
पतीतपावन ईश्वर । कलयुगी चीदंबर ।।३।।
दास म्हणे सताधारी । लीला दावी नानापरी ।।४।।

१२९४५३

पुर्णब्रम्ह आवतारा । कलयुगी चीदंबरा ।।१।।
स्वामी आनंत आपारा । दीन बंधु सर्वेश्वरा ।।२।।
यावे दीनाच्या कैवारा । स्वामी क्रपेच्या सागरा ।।३।।
दासाचीया प्रीयकरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९४५४

चिदंबरा यावे दीनाच्या कैवारा । वेळ वीश्वंभरा लावो नये ।।१।।
पतीतपावन ब्रीद करी जतन । दावी बा चरण चिदंबरा ।।२।।
यावे दीनानाथा पावे मज आता । भेटी भगवंता देई मज ।।३।।
दास दीनालागी दावी नीजरुप । आवतार प्रताप प्रगट करी ।।४।।

१२९४५५

आन्याई आन्याई पतीत दुराच्यारी । घेतले पदरी चीदंबरा ।।१।।
कामी क्रोधी लोभी म्हणवीतो तुझा । आंगीकार माझा केला देवा ।।२।।
कोठवरी देवा लावीसी हे चींता । भेटी हे भगवंता दई मज ।।३।।
दास म्हणे रक्षी ब्रीद वीश्वंभरा । प्रगट चीदंबरा व्हावे आता ।।४।।

१२९४५६

यावे करुणापती पावे दीनाप्रती । नीववावे चीती चीदंबरा ।।१।।
यावे करुणाघना पतितपावना । पावे मज दीना ऐशावेळे ।।२।।
करीतो मी धावा सर्वकाळ देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।३।।
दास म्हणे दावी चरणकमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।४।।

१२९४५७

दावी नीजरुप नीवारी भवताप । होसी मायबाप आनाथासी ।।१।।
यावे सर्वेश्वरा स्वामी चीदंबरा । नीववी आंतरा स्वामीराया ।।२।।
न करी उसीर यावे बा सत्वर । जाले हे आधीर मन माझे ।।३।।
दास म्हणे कीती करवीसी धावा । देवाचीया देवा चीदंबरा ।।४।।

१२९४५८

यावे बा दयाळा स्वामी वीश्वपाळा । दावी रुप डोळा चीदंबरा ।।१।।
तुजवीण माझा झुरतसे जीव । चीदंबरा कीव येउ दे काही ।।२।।
करीतो मी धावा सर्वकाळ देवा । येउ दे कणवा मायबापा ।।३।।
दास म्हणे देई भेटी आनाथासी । क्रपावंत होसी माय जगी ।।४।।

१२९४५९

यावे बा श्रीधरा आनंत आपारा । आनाथासी करा दया आता ।।१।।
तुजवीण प्रीय नेणे मी आणीक । दावी मज मुख चीदंबरा ।।२।।
कोठवरी आंत घेसी बा आनंता । नीवारी हे चींता चीदंबरा ।।३।।
दास म्हणे देई क्रपा आभयदान । व्हावे बा प्रसन्न स्वामीराया ।।४।।

१२९४६०

आनाथाचा नाथ म्हणती तुम्हा देवा । स्वामीराया कैसी दया न ये ।।१।।
करुणेची माता होसी भगवंता । माझेवेळे आता काय जाले ।।२।।
नायकसी धावा देवाचीया देवा । ब्रीद सदासीवा राहे कैसे ।।३।।
कासावीस जीव होत तुजसाठी । दया तुज पोटी न ये कैसी ।।४।।

१२९४६१

धावा करीतसे तैलंग ब्राम्हण । चीदंबरावीण क्षीण जाला ।।१।।
म्हणे चीदंबरा पावे मजलागी । लग्न करि वेगी माझे देवा ।।२।।
नसे मज काही द्रव्ये ते लग्नासी । मागु कोणापासी सांगे देवा ।।३।।
दास म्हणे कीर्ती वर्णीतो ब्राम्हण । आवतार पुर्ण चीदंबर ।।४।।

१२९४६२

भक्तराज पुर्ण आसे तो ब्राम्हण । चीदंबर चरण आठवीतो ।।१।।
लग्नाकरीता घरिलि वासना । न मागतो कोन्हा द्रव्य काही ।।२।।
सांगतसे त्यासी चीदंबर स्वप्नी । द्रव्य तुजलागोन देववीतो ।।३।।
दास म्हणे सांगे द्रुष्टांती ईश्वर् । प्रगट चीदंबर लीला दावी ।।४।।

१२९४६३

आठा दीवसाचे वाटेवरि जाण । होता तो ब्राम्हण सावकार ।।१।।
स्वप्न दिल्हे तेव्हा जावे त्याजपासी । द्रव्य तो तुजसी देईल बापा ।।२।।
चीदंबरे मज पाटवीले जाणे । नीरोप सांगणे तयालागी ।।३।।
दास म्हणे देवे स्वप्न दिल्हे त्यासी । येईल तुजपासी भक्त माझा ।।४।।

१२९४६४

जावोनी ब्राम्हण त्याचीया घरासी । भेटी होता त्यासी कळली खुन ।।१।।
म्हणे चीदंबरे दील्हे मज स्वप्न । देतो लग्न करुन तुझे आता ।।२।।
वीप्रालागी द्रव्य दिल्हे ते लग्नासी । कळा दावी ऐसी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे वीप्र नीघे आनंदेसी । येउनी घरासी लग्न केले ।।४।।

१२९४६५

चरीत्र १९४

यावे यावे चीदंबरा । दीन जनाच्या कैवारा ।।१।।
रक्षी रक्षी ब्रीदावळी । दावी रुप चेंद्रमौळी ।।२।।
यावे जीवीच्या जीवना । चीदंबरा बा सगुणा ।।३।।
दासाचीया जीवप्राणा । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।४।।

१२९४६६

येई येई आंतरंगा । चीदंबरा बा श्रीरंगा ।।१।।
तुजवीण उदासीन । मज न पडे चेईन ।।२।।
माझे आंतर जाणसी । स्वामि वेळ का लावीसी ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । दावी रुप सर्वेश्वरा ।।४।।

१२९४६७

तुजवीण चीदंबरा । देव नेणे मि दुसरा ।।१।।
जीव माझा कासावीसी । आंत कोठवरी घेसी ।।२।।
करुणावंत म्हणवीसी । काय झाले माझेवीसी ।।३।।
पावे दास पतीतासी । चीदंबरा पावन होसी ।।४।।

१२९४६८

धावे पावे वीश्वनाथा । चीदंबरा बा समर्था ।।१।।
पावे चींतीलीया आर्था । ब्रीद जाउ नेदी व्रथा ।।२।।
करुणा येउ दे दीनाची । माये होसी आनाथाची ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९४६९

धावे पावे गौरीहारा । प्राणप्रीया चीदंबरा ।।१।।
तीही देवाच्या ईश्वरा । दावी रुप प्राणेश्वरा ।।२।।
दावी दावी चरणकमळ । म्हणवीतो तुझे बाळ ।।३।।
दास म्हणे सर्वगता । चीदंबरा बा आनंता ।।४।।

१२९४७०

नाही नाही मज कोन्ही । तुजवीण त्रीभुवनी ।।१।।
काहो वीसर पडीला । काय जाले बा तुजला ।।२।।
कीती पाहावीसी वाट । कैसा जालासी निक्रुष्ट ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । ब्रिद रक्षी चीदंबरा ।।४।।

१२९४७१

श्रुद्र आडीला नीर्वाणी । धावा करीतसे वनी ।।१।।
रोगे पीडीला बहुत । जीव कासावीस होत ।।२।।
कोणी नसे त्या जवळी । जीव बहुत तळमळी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी दीनावर ।।४।।

१२९४७२

पुत्र कांता ते आसोनी । जवळी न येती ते कोन्ही ।।१।।
धावा करीतसे देवा । रक्षी आनाथ या जीवा ।।२।।
पोटावाटे वाहे पाणी । प्राण उरला नयनी ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । धावा म्हणे चीदंबरा ।।४।।

१२९४७३

चीदंबरा करुणाघना । पावे पावे मज दीना ।।१।।
कलयुगी आवतारा । स्वन्पी सांगसी नीर्धारा ।।२।।
स्वन्प जाले त्या श्रुद्रासी । स्वामी सांगसी तयासी ।।३।।
दास म्हणे झाडपाला । त्यासी स्वन्पी दाखवीला ।।४।।

१२९४७४

जाग्रत होउनीया जाण । पाहे झाड वोळखोन ।।१।।
पाला घेउनीया जाण । श्रुद्र पीतसे वाटोन ।।२।।
शुध्ध जालि त्याची काया । चीदंबरे केली दया ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कळा दावी हे ईश्वर ।।४।।

१२९४७५

ऐसा क्रपावंत धणी । दुजा नसे त्रीभुवनी ।।१।।
आला शुद्र दर्शनासी । लोटांगण स्वामीपासी ।।२।।
म्हणे वाचवीला प्राण । चीदंबरा आलो शरण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी म्हणे भक्त थोर ।।४।।

१२९४७६

चरित्र १९५

चीदंबरा बरे आले तुझ्या चीता । उपाये आनंता न चले तेथे ।।१।।
आतःकर्णी काय ठावे आसे तुम्हा । का हो पुरषोतमा सांडी केली ।।२।।
काय माझा भोग न सरे आझुनी । धावा करिता नयनी प्राण उरला ।।३।।
दास म्हणे माझा शोकलासे कंठ । चीदंबरा भेट न देसी का ।।४।।

१२९४७७

कासयासी मज लावीले भक्तीसी । नीष्टुर जालासी मायबापा ।।१।।
कोठवरी दुःख देसी या जीवासी । होय कासावीसी नीत्य देवा ।।२।।
कैसा नीष्टुर जालासी पतीतपावना । दुःख माझ्या मना देसी कीती ।।३।।
दास म्हणे स्वामी केला आंगीकार । आंत कोठवर घेसी आता ।।४।।

१२९४७८

तळमळी जीव येउ द्यावी कीव । नुरवी देहभाव चीदंबरा ।।१।।
दुःख वाटे मज बहुत ईश्वरा । मानवाच्या व्दारा फीरवीसी का ।।२।।
मानव संसारि दुःख परोपरि । त्याचे दारोदारी लावीसी का ।।३।।
चीदंबरा दास केला कासयासी । मरण देहासी वाटे बरे ।।४।।

१२९४७९

संसारिका जना जावोनी मागणे । याहुनी मरणे बरे देवा ।।१।।
भक्ती तुझी करणे दुजी नसे आस । धीग या देहास आग लागो ।।२।।
नको नको देवा ठेउ या देह्यासी । येउनी जनमासि काय केले ।।३।।
दास म्हणे तुजवीण दुजी नसे आस । घातीले जन्मास कासयासी ।।४।।

१२९४८०

पापी मी चांडाळ आसे भाग्यहीन । जालो आसे दीन मानवाचा ।।१।।
जळो जळो देह जन्मा येणे काय । सीणवीली माय व्यर्थ देवा ।।२।।
कासयासी जन्म दिल्हा त्वा मजसी । बटा हा तुजसी लावीतसे ।।३।।
दास म्हणे व्यर्थ जन्म दिल्हा जाण । याहुनी पाषाण केले बरे ।।४।।

१२९४८१

नाही मज भक्ती नाही मज ज्ञान । आभागी आज्ञान जन्मा आलो ।।१।।
तुजवीण आशा घरणे मानवाची । ऐशा च्यांडाळाची भक्ती काय ।।२।।
सीनवीली माता व्यर्थची आनंता । जालो मी मागता मानवाचा ।।३।।
दास म्हणे काय लावीले भक्तीसी । चीदंबरा कैसी दया न ये बा ।।४।।
१२९४८२

आला तो ब्राम्हण चीदंबरापासी । गळीत कुष्ट त्यासी होते जाण ।।१।।
येउनीया पुढे देखिले स्वामीसी । मिटि चरणासी घाली बळे ।।२।।
रागे येवुनीया मारीती तयासी । स्पर्ष चरणासी केला म्हणोनि ।।३।।
दास म्हणे त्यासी मारीती वस्तुनी । परीतो चरणी पडे तैसा ।।४।।
१२९४८३

मिळोनी ब्राम्हण चहुकडोनी जाण । घेतले वोठोन बळे त्यासी ।।१।।
हर्ष मानी चीती बहुत ब्राम्हण । भाग्योदयो जाण म्हणे माझा ।।२।।
मारीले स्वामीनी सरला माझा भोग । गेला आसे रोग सर्व माझा ।।३।।
दास म्हणे हर्ष मानोनीया चीता । करुणा भगवंता आली त्याची ।।४।।
१२९४८४

घातला दवडोन बाहेरी ब्राम्हण । राहे तो जावोन बीर्याडासी ।।१।।
आसे तीन प्रहर वीप्र तो उपवासी । स्वामिनी बा त्यासी बोलावीले ।।२।।
यावे भोजनासी ऐकताची जाण । आनंदेकरोन विप्र आला ।।३।।
दास म्हणे क्रपा करि चीदंबर । पंक्ती बरोबर बैसवीले ।।४।।

१२९४८५

पुसती स्वामी त्यासी राग आला काय । मारीले बा पाहे बहुत तुज ।।१।।
विप्र म्हणे धन्य भाग्य उदयले । स्वामीचे लागले हात मज ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी आला मज राग । गेला तुझा रोग सुखे वर्तणे ।।३।।
दास म्हणे शुत्ध झाली त्याची काया । चीदंबरराया कळा तुझी ।।४।।

१२९४८६

भोजन करोनी उटीला ब्राम्हण । आरोग्य ते जाण काया जाली ।।१।।
गळीत कुष्ट गेला असे तेचक्षणी । आघटीत करणी चीदंबरा ।।२।।
आवतार सगुण जाला चीदंबर । आनंत आपार लीला दावी ।।३।।
दास म्हणे आसे आनाथाची माय । कोमळ ह्रदय बहुत जाण ।।४।।

१२९४८७

चरीत्र १९६

चीदंबरा क्रपानीधी । सगुण रुप दावी आधी ।।१।।
कीती वेळ तु लावीसी । धावा तो हा नायकसी ।।२।।
क्रपावंत म्हणवीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।३।।
दास आनाथ परदेसी । तुझे व्दारी उपवासी ।।४।।

१२९४८८

करुणावंत तुची माय । दावी आनाथासी पाय ।।१।।
तुजवीण उदासीन । मज न पडे चेईन ।।२।।
जीव होत कासावीसी । काहो ब्रीद गमावीसी ।।३।।
पावे दास पतीतासी । चीदंबरा पावन होसी ।।४।।

१२९४८९

वेळ करु न ये आता । चीदंबरा प्राणनाथा ।।१।।
तुझे हाती सर्वसता । चीदंबरा बा समर्था ।।२।।
दिनालागी पावे आता । ब्रीद जाउ नेदी व्रथा ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । दावी रुप वीश्वंभरा ।।४।।

१२९४९०

येई जीवीच्या जीवना । चीदंबरा बा सगुणा ।।१।।
माझी पुरवी वासना । स्वामी आवतारपुर्णा ।।२।।
कीती पाहावीसी वाट । देई आनाथासी भेट ।।३।।
दावी दासासी कौतुक । लीलाधारी तु नाटक ।।४।।

१२९४९१

तुजवीण देव कोन्ही । मी तो नेणे त्रीभुवनी ।।१।।
दया येउ द्यावी मनी । होसी आनाथ जननी ।।२।।
धावा करीतो नीर्वाणी । दावी रुप तु नयनी ।।३।।
दास येतो लोटांगणी । चीदंबरा ये धावोनी ।।४।।

१२९४९२

धावे पावे देवराया । चीदंबरा प्राणप्रीया ।।१।।
दावी रुप तु सखया । ब्रीद जाउ नेदी वाया ।।२।।
नलगे सांगणे तुम्हासी । क्रपावंत माय होसी ।।३।।
पावे दास आनाथासी । चीदंबरा या वेळेसी ।।४।।

१२९४९३

शुद्र होता दुरदेसी । पुत्र नसे त्याचे वंशी ।।१।।
कीर्ती आयकोनीया जाण । आठवी चीदंबर चरण ।।२।।
नीसीदीनी करीतसे धावा । म्हणे पावे मज देवा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । होती संपती घरास ।।४।।

१२९४९४

चीदंबरावीण कोन्ही । दुजा देव नेणे मनी ।।१।।
म्हणे सत्य आवतार । श्रीष्टीवरी चीदंबर ।।२।।
पुत्र जालीया मजसी । जाईन त्याच्या दर्षणासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सांगुन घेतला नवस ।।४।।

१२९४९५

परी आसे द्रव्यवान । जाले पुत्र ते संतान ।।१।।
धन्य म्हणे चीदंबरा । कलयुगी आवतारा ।।२।।
मागुण घेतले नवस । त्यासी जाले बहुत दिवस ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पाचा वर्षाचा कुमार ।।४।।

१२९४९६

आसे प्रपंची वेव्हार । घरी संपत्ती ते फार ।।१।।
त्यासी न बणे ते काही । यात्रेलागी जाणे पाही ।।२।।
त्यासी जाला तो द्रुष्टांत । परि नायकेची मात ।।३।।
दास म्हणे चीदंबर । सांगे द्रुष्टांती वीचार ।।४।।

१२९४९७

जाले द्रुष्टांत बहुत । परि ते न धरी मनात ।।१।।
पुत्रालागी दुखणे आले । मलमुत्र बंध जाले ।।२।।
रात्र जाली प्रहर दोन । गेला नीघोन तो प्राण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । शुद्र आठवी चीतास ।।४।।

१२९४९८

चीदंबरे क्षोभ केला । तेव्हा आठवी चीताला ।।१।।
नवस घेतला मागोण । जालो आन्याई मि जाण ।।२।।
नवसा जाले बहुत दीवस । मिळे आन्याय बक्षीस ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करुणा भाकीतो देवास ।।४।।

१२९४९९

धावे पावे चीदंबरा । पुत्र उटवी ईश्वरा ।।१।।
उद्या नीघतो भेटीसी । जीव येउ दे बाळासी ।।२।।
ऐसे म्हणाताची जाण । बाळ बैसले उठोन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रत्यय ईश्वर ।।४।।

१२९५००

दावी चमत्कार त्यासी । जाले आश्चीर्य सर्वासी ।।१।।
धन्य म्हणती चीदंबर । कलयुगी आवतार ।।२।।
करि यात्रेची तयारी । पुत्र घेउनी बरोबरी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । मार्गी सांभाळी ईश्वर ।।४।।

१२९५०१

आला चिदंबरापासी । स्वामी पुसती तयासी ।।१।।
काय जाले बाळासी । क्षीण बहुत शरीरासी ।।२।।
शुद्र लजीत होउन । सांगे सर्व वर्तमान ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बोले हासोनी ईश्वर ।।४।।

१२९५०२

शुद्र म्हणे मी आन्याई । क्षमा केली माझे आई ।।१।।
होसी पतीतपावन । मज दीले पुत्र दान ।।२।।
मी तो आन्याई आपार । स्वामी क्रपेचे सागर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पतीतपावन ईश्वर ।।४।।

१२९५०३

टेउन घेतले तयासी । नीत्य भोजन पंक्तीसी ।।१।।
येक मास तो टेवीला । दील्हा नीरोप त्याला ।।२।।
यात्रा करुनी आनंदेसी । आला आपुल्या घरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । चीती आठवी नीरंतर ।।४।।

१२९५०४

चरित्र १९७

कासयासी मज जन्म दिल्हा तरी । चीत पायावरी नाही तुझ्या ।।१।।
कासयासी मज दिल्हा तरि देह । न दावीसी पाय चिदंबरा ।।२।।
कासयासी मज घातले संसारी । लक्ष चीदंबरी न मीळेची बा ।।३।।
दास म्हणे माझा देह जळो आता । स्वामी प्राणनाथा तुजवीण ।।४।।

१२९५०५

यावे चीदंबरा दीनाच्या कैवारा । आनाथासी करा दया आता ।।१।।
यावे करुणापती पावे दीनाप्रती । निववावे चीती चीदंबरा ।।२।।
यावे बा दयाळा स्वामी वीश्वपाळा । दावी रुप डोळा चीदंबरा ।।३।।
यावे दास म्हणे वीश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका चीदंबरा ।।४।।

१२९५०६

दावी चरणकमळ नीवारी तळमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।१।।
नको वेळ करु कीती धीर धरु । आज्ञान लेकरु वाट पाहे ।।२।।
मातेवीण बाळ उदास ते होय । हुरुहुरु पाहे चहुकडे ।।३।।
तैसी गती आसे दास आनाथासी । चीदंबरा कैसी दया न ये ।।४।।

१२९५०७

कोठवरी आंत घेसी बा आनंता । का हो क्रपावंता वेळ केला ।।१।।
यावे दीनानाथा पावे आनाथासी । क्रपावंत होसी माय तुची ।।२।।
तुजवीण प्रीय नेणे मी आणीक । ब्रम्हांडात देख स्वामीराया ।।३।।
दास म्हणे होसी आनाथासी माये । करुणा कैसी न ये चीदंबरा ।।४।।

१२९५०८

नेणे मी आणीक प्रीय तुजवीण । दावी बा चरण चीदंबरा ।।१।।
करीतो प्रार्थना क्रपेच्या नीधाना । दावी मज दीना रुप तुझे ।।२।।
कोठवरी वाट पाहावीसी देवा । येउ दे कणवा माझा काही ।।३।।
चीदंबरा दास तुजवीण उदास । धीरउ जीवास कोठवरी ।।४।।

१२९५०९

न पडे चईन माझीया जीवासी । जालो मी उदासी सर्वावरी ।।१।।
जाणसी आंतर होसी वीश्वंभर । आंत कोठवर घेसी माझा ।।२।।
का हो चीदंबरा धरली नीष्टुरता । कोटे गेली सता तुझी देवा ।।३।।
चीदंबरा दास तुझा कासावीसी । काहो गमावीसी ब्रीद आता ।।४।।

१२९५१०

सर्वावरी देवा जालो उदासीन । न पडे चईन तुजवीण ।।१।।
बोलतसे देवा जनाचेसारीखे । आपुले परिखे नावडे ते ।।२।।
झुरतसे चीती बोले संपादनी । काय म़ाझे मनी ठावे तुज ।।३।।
म्हणवीतो दास लाज वाटे चीती । चीदंबरा कीती वाट पाहु ।।४।।

१२९५११

हीन याती आसे आंत्यज जातीचा । भाव आसे त्याचा शुध्ध बहुत ।।१।।
चीदंबरावीण प्रीय नसे काही । झुरतसे पाही आंतरी तो ।।२।।
कधी चीदंबर पावेल मजसी । भेटी आनाथासी देई देवा ।।३।।
दास म्हणे धावा करीतसे देवा । ठावे ते आंतर देवाजीसी ।।४।।
१२९५१२

म्हणे चीदंबरा होसी क्रपावंत । कीती घेसी आंत माझा देवा ।।१।।
लाजतसे मनी आसे हीनयाती । भेटी मजप्रती कैसी देसी ।।२।।
आसे मी पतीत जातीचा माहार । सोवळे ते फार तुझे देवा ।।३।।
दास म्हणे क्रपा आसे चीदंबरा । दिनाच्या कैवारा धावतसे ।।४।।
१२९५१३

मध्येरात्री बैसे आंतेज उटोन । रडे आक्रंदोन धावा करी ।।१।।
जाला चीदंबर तेथे बा प्रगट । द्यावयासी भेट आलो म्हणे ।।२।।
प्रकाश पडला मध्यरात्री जाण । जात लोटांगण आंतज तो ।।३।।
दास म्हणे भाग्य आले उदयासी । चीदंबर त्यासी बोलतसे ।।४।।
१२९५१४

बोलॆ चीदंबर भक्तराज होसी । ईछा तॆ तुजसी सांगॆ काय ।।१।।
बोलॆ आनामीक भक्तराज जाण । ईछा तुजविण नसॆ काही ।।२।।
सर्व सुख आसॆ तुझीया चरणी । ठॆवी नीसीदीनी लक्षपाई ।।३।।
दास म्हणॆ क्रपा करि चिदंबर । नीववी आंतर भक्ताचॆ तो ।।४।।

१२९५१५

भेटतॆ दॆवोन नीववी आंतर । गुप्त चीदंबर जाला तॆव्हा ।।१।।
बैसला तॆ ठाई आत्यंज तॊ भक्त । यात्रा दाटी मीळत दर्षनातॆ ।।२।।
बहुताचे कार्य होतसॆ ते टाई । चीदंबरा दावी लीला ऐसी ।।३।।
दास म्हणॆ जाला आवतार सगुण । स्वामी ब्रम्हपुर्ण चीदंबर ।।४।।

१२९५१६

चरीत्र १९८

चीदंबर नामी रंगॆ मन । तॆची त्रीवॆणीचे श्नान ।।१।।
आनुभव चीतव्रती । आंगी दया क्षमा शांती ।।२।।
मन जालीया उन्मन । नित्य दिवाचासन ।।३।।
दासा चीदंबर चिती । रिद्दि सीद्दि वॊवाळीती ।।४।।

१२९५१७

रंजे संसार वीषयासी । तेची नर्कचर्तुदसी ।।१।।
वीषयासी वीटे मन । शुद्द बोलीजे ते श्रवन ।।२।।
जन्ममरण आमंगळ । चुकवी तेची बा मंगळ ।।३।।
दास चीदंबर चरणी । आनुभवदिप नीरंजनी ।।४।।

१२९५१८

ज्ञानदीप जो उजळी । तेची जाण दीपावळी ।।१।।
बैसे आवीनाश पदा । तेची जाण प्रतीपदा ।।२।।
शुध्दभाव भक्ती निज । तेची जाण भाउबीज ।।३।।
चीदंबर चरणी रंगे दास । ब्रम्हानंद तो चीतास ।।४।।

१२९५१९

नामी रंगे सदा मन । आनंदे कीर्तने भजन ।।१।।
होता संताचे दर्शन । दसरा दीवाळी तो सण ।।२।।
जन्म दुःख नीवारीले । तृप्त भोजन ते जाले ।।३।।
क्रपा केली चीदंबरे । दासा आनंद गजरे ।।४।।

१२९५२०

भक्ती वैरागय तो ज्ञान । तोची त्रीवोणीचे स्नान ।।१।।
चर्म प्रक्षाळीलो वरी । दुःख कल्पना आंतरी ।।२।।
स्नान करुणीया काय । मनसंकल्प न जाय ।।३।।
दास दिनासी तारीलो । चीदंबरा उध्दरीलो ।।४।।

१२९५२१

पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चीदंबर ।।१।।
आसो पतीतपावन । नामे उद्धरिती जन ।।२।।
निश्चय धरिताची मनी । प्रत्यय दावी तत्क्षणी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसो क्रपेचा सागर ।।४।।

१२९५२२

आला दर्शना ब्राम्हण । होता दिपवाळी सण ।।१।।
म्हणे वीप्र तो स्वामीसी । माझे घर दुरदेसी ।।२।।
परी दरिद्र तो जाण । आला दिपावाळी सन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसो क्रपेचा सागर ।।४।।

१२९५२३

स्वामी म्हणती वीप्रासी । देतो नीरोप घरासी ।।१।।
येथे राहे आनंदेसी । न घे कल्पना चीतासी ।।२।।
तुज मुहुर्त पाहुन । देतो नीरोप तो जाण ।।३।।
चीदंबर दास म्हणे । विप्र राहे आनंदाने ।।४।।

१२९५२४

कार्तीक शुध्ध पंचमीस । दिला नीरोप वीप्रास ।।१।।
दिल्ही खीचडी बांधोन । घरी आलातो ब्राम्हण ।।२।।
जाली कुटुंबासी भेटी । सांगे आनंदेसी गोष्टी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कांता पुसती पतीस ।।४।।

१२९५२५

कांता पुसे ते पतीस । काय आणीले आम्हास ।।१।।
मुलालेकरा लागोनी । दील्हा प्रसाद स्वामीनी ।।२।।
कांता पाहे ते सोडुनी । जाले खीचडीचे सोने ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला आनंद आपार ।।४।।

१२९५२६

विप्र सांगे वर्तमान । होता दीपवाळी सन ।।१।।
वीनवीले म्या स्वामीसी । आली करुणा तयासी ।।२।।
सगुण ब्रम्ह चीदंबर । तेणे नीववीले आंतर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२९५२७

चरीत्र १९९

चीदंबरराया दावी नीजरुप । आवतार प्रताप प्रकट करी ।।१।।
येउ दे करुणा वीश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका स्वामीराया ।।२।।
कोटवरी आंत घेसी बा श्रीधरा । का हो चीदंबरा वेळ केला ।।३।।
दास म्हणे यावे देवाचीया देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।४।।

१२९५२८

नसे आंतपार तुझ्या सामर्थ्यासी । ब्रम्हांड नीर्मीसी क्षणामाजी ।।१।।
काय जाले देवा माझीया वेळेसी । बटा का लावीसी ब्रीदासी बा ।।२।।
पतीतपावन धरीला आवतार । होसी तु उदार स्वामीराया ।।३।।
क्षणेमाजी करिसी राइचा पर्वत । कळा आघटीत स्वामीराया ।।४।।
दास वाट पाहे धरुनीया आशा । ब्रम्हांडीच्या खाशा वेगी यावे ।।५।।

यावे बा आनंता स्वामी क्रपावंतां । वेळ भगवंता लावो नये ।।१।।
पाहातसे वाट चातकाचे परी । येउ दे आंतरी दया माझी ।।२।।
करुणावंत धणी तुची त्रीभुवनी । यावे बा धावोनी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे करि क्रपा दिनावरि । यावे बा झडकरी चीदंबरा ।।४।।

१२९५३०

तुजवीण जीव होय कासावीसी । कैसा वीसरलासी मज देवा ।।१।।
काय म्हणोनिया आभयदान दिल्हे । आता का लावीले झुरणी मज ।।२।।
व्याकुळ तो प्राण होय तुजवीण । जालासी कठीन कैसा देवा ।।३।।
दास म्हणे ब्रीद रक्षी वीश्वंभरा । भेटी चीदंबरा देई मज ।।४।।

१२९५३१

कोण माझे देवा जीवलग तुजवीण । आंतरिचे कोण जाणतसे ।।१।।
कोणा पुढे देवा करुणा भाकावी । ईछा माझी पुरवी कोण ऐसा ।।२।।
तुजविन नसे दुजा ब्रम्हांडात । पुरविसी हेत तुची माझा ।।३।।
चिदंबरा दास म्हणवी तुझे दीन । ब्रीद करी जतन मायबापा ।।४।।

१२९५३२

आनाथाची माय होसी चीदंबरा । दिनाच्या कैवारा धावसी तु ।।१।।
काय माझेवीसी जाले बा तुजसी । नीष्टुर जालासी काय म्हणोनी ।।२।।
तुज ऐसा दयाळ दुजानसे कोन्ही । ब्रम्हांडभुवनी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे करुणा येउ दे दिनाची । लज्या हे ब्रीदाची रक्षी देवा ।।४।।
१२९५३३

आडीला नीर्वाणी विप्र हींदुस्थानी । दिलीचे मैदानी घर त्याचे ।।१।।
कीर्ती ऐकोनीया धावा करि मनी । दावी बा करणी चीदंबरा ।।२।।
आधी द्रव्यवान मग जाला दरिद्रि । झुरे तो आंतरि रात्रंदिवस ।।३।।
दास म्हणे आठवी चीदंबरालागी । आवतार जगी जाला म्हणोनी ।।४।।
१२९५३४

वीप्र धावा करि नित्य उटोनीया । चीदंबरराया पावे म्हणे ।।१।।
आसे दुरदेश नसे मज टावा । कोण देसी देवा आहेसी तु ।।२।।
पाहावे नयनी इछा आसे मनी । नायकीले कानी गाव कोन ।।३।।
दास म्हणे जाला तयासी द्रुष्टांत । स्वन्पी सांगे मात चीदंबर ।।४।।
१२९५३५

करणाटक प्रांती गाव गुर्लहुसुर । सांगे चीदंबर स्वन्पी ऐसे ।।१।।
यावे त्या गावासी सांगे ब्राम्हणासी । प्रसन्न तुजसी होतो तेथे ।।२।।
पाहुनीया स्वन्प आला जागृतीसी । नीगे तो वेगेसी प्रातःकाळी ।।३।।
दास म्हणे हार्ष बहुत वीप्रासी । म्हणे आनाथासी क्रपा केली ।।४।।

१२९५३६

आला तो ब्राम्हण चीदंबरापासी । भेटी आनंदेसी दील्ही त्यासी ।।१।।
पुसे वर्तमान स्वामीराव त्यासी । सांगे आनंदेसी स्वन्प ऐसे ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी कोन्हा सांगु नये । जाला तो प्रत्यय तुज बापा ।।३।।
दास म्हणे त्यासी स्वामि टेवी येक मास । आनंदे वीप्रास बोले नीत्य ।।४।।

१२९५३७

आनंदे निरोप दील्हा ब्राम्हणासी । वाट ते खर्चासी रुपय दाहा ।।१।।
दोन सेर खीचडी दिल्ही ते बांधोनी । प्रसाद घेउनी जावे घरी ।।२।।
गेला तो घरासी जाले ते सुवर्ण । कळले वर्तमान यात्रा आली ।।३।।
सांगुनी धाडीले येतो दर्शनासी । स्वामीनी तयासी नीवारीले ।।४।।
दास म्हणे स्वामी सांगे चीदंबर । द्रष्टांत वीच्यार पाहुन यावे ।।५।।

१२९५३८

चरित्र २००

स्वामी जेड न पुजागोड । देवाभक्त नव्हे दोड ।।१।।
आसे आनंत आपराधी । स्वामी होसी क्रपानीधी ।।२।।
होसी पतीतपावन । ब्रीद करावे जतन ।।३।।
आम्ही आन्याई आपार । पावन तुझा आवतार ।।४।।
घडली दासाची संगती । कळे तैसी करी गती ।।५।।

१२९५३९

चीदंबरा स्वामीराजा । वेध लागलासे तुझा ।।१।।
दावी दावी रुप सगुण । माझे नीववी हे मन ।।२।।
रक्षी रक्षी ब्रीदावळी । जीव माझा तळमळी ।।३।।
दास म्हणे वीश्वंभरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९५४०

वीनवीत नानापरी । दया येउ दे आंतरी ।।१।।
करुणावंत तुची माता । चीदंबरा बा आनंता ।।२।।
तुजवीन जालोदीन । वेगी दावी बा चरण ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।४।।

तुजवीण प्रीय काही । मज त्रीभुवनी नाही ।।१।।
जीव झुरे तुजसाटी । दया येउ द्यावी पोटी ।।२।।
आनंत आपराधांच्या कोटी । स्वामी घतील्या त्वा पोटी ।।३।।
दासा घेतले पदरी । आता वेळ कोठवरि ।।४।।

१२९५४२

तळमळी माझाजीव । देवा येउद्यावी कीव ।।१।।
क्रपावंता मायबापा । भक्तीमार्ग करी सोपा ।।२।।
देई देई भेटी मज । स्वामी शरण आलो तुज ।।३।।
चीदंबरा दास म्हणे । ब्रीद जतन करणे ।।४।।

१२९५४३

कीती करवीसी धावा । पावे देवाचीया देवा ।।१।।
तारी तारी मज दिना । स्वामी पतितपावना ।।२।।
स्वामी जीवलग प्राणा । माझी येउ दे करुणा ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । आनाथासी दया करा ।।४।।

१२९५४४

तुजवीण चीदंबरा । जालो उदास आंतरा ।।१।।
क्रपावंत म्हणवीसी । कीती वाट पाहावीसी ।।२।।
दील्हे क्रपा आभयदान । का हो न येसी आझुन ।।३।।
दासाचीया प्राणनाथा । चीदंबरा ये समर्था ।।४।।

१२९५४५

आला कासीचा ब्राम्हण । स्वामी दरषनालागुण ।।१।।
करि स्वामिसी वीनंती । होसी क्रपेची तु मुर्ती ।।२।।
आसे दिन मी पतित । दरिद्रे पिडिलो बहुत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी विप्रावर ।।४।।

१२९५४६

स्वामी म्हणती ब्राम्हणासी । आलासी तु दुरदेसी ।।१।।
ईश्वर करील समाधान । मी तो गरीब ब्राम्हण ।।२।।
वीप्र म्हणे तु ईश्वर । कलयुगी आवतार ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करी समाधान फार ।।४।।

१२९५४७

स्वामी म्हणती तयास । राहावीती चार दीवस ।।१।।
त्यासी घेतले ठेउन । नीत्य पंक्तीसी भोजन ।।२।।
ठेवीयले दोन मास । देती नीरोप वीप्रास ।।३।।
म्हणे चीदंबर दास । त्याची पुरवीती आस ।।४।।

१२९५४८

मुहुर्त पाहुनीया जाण । बोलवीला तो ब्राम्हण ।।१।।
नीरोप देती क्रपाकरुण । त्यासी दील्हे पांच होन ।।२।।
स्वामी म्हणती तयासी । जावे आनंदे घरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।।

१२९५४९

स्वामी सांगती वीप्रासी । खर्च दील्हा हा तुजसी ।।१।।
संवशय सोडुनिया जाण । हाव्य कव्य करी लग्न ।।२।।
आल्या ब्राम्हणासी आन्न । नीत्य करी संतर्पण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाले प्रसन्न वीप्रास ।।४।।

१२९५५०

आनंदे करुनीया जाण । घरासी गेला ब्राम्हण ।।१।।
नीत्य खर्च करीतसे । परी होन जैसे तैसे ।।२।।
चीदंबरी कळा जाण । कदा न सरति होन ।।३।।
दास म्हणे वीस्वंभर । स्वामी दीनासी उदार ।।४।।

१२९५५१

चरीत्र २०१

यावे करुणाघना जीवीच्या जीवना । स्वामी ब्रम्हपुर्णा चीदंबरा ।।१।।
तुजवीण प्रीय नसे माझ्या जीवा । जाणसी तु देवा आंतरीचे ।।२।।
न मागे तुजसी आणीक मी काही । बोलतसे पाहि लोकाच्यारी ।।३।।
दास म्हणे करि नीवांत हे मन । देई क्रपादान चीदंबरा ।।४।।

१२९५५२

तळमळि जीव देवा तुजविन । जीवलग कोण सांगे माझे ।।१।।
नाहि मज कोन्हि देवा त्रीभुवनि । साक्ष आंतःकरणी आहेसी तु ।।२।।
देह गेहे जीव केला वोवाळनि । स्वामि तुजवरुनी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे दावी रुप तुझे सगुण । निववि हे मन चिदंबरा ।।४।।

१२९५५३

करितो प्रार्थना क्रपेच्या नीधाना । आवतार सगुणा रुप दावी ।।१।।
येउ द्यावि दया माझी देवराया । जाउ नेदि वाया धावा करुनी ।।२।।
आनाथाचि माय दावी आता पाय । कोमळ ह्रदय तुझे देवा ।।३।।
दास म्हणे माझी पुरवावी आस । तुजविण उदास वाटे देवा ।।४।।

१२९५५४

काय करु देवा देह स्वभावासी । प्रीती हे जीवासि सगुणाची ।।१।।
कामि क्रोधी लोभि आसे दुराच्यारी । नीस्काम आंतरि जालो नाही ।।२।।
न घे तुझे नाम कधि चिदंबरा । बोलोनि ईश्वरा दाविसि तु ।।३।।
दास म्हणे मि तो पतीताची रासी । पावन तुम्हासि नाम साजे ।।४।।

१२९५५५

पतीत पामर आंन्यायाची रास । नाटवि तुम्हास कधि देवा ।।१।।
कामिक हे भक्ती मज पतिताचि । पावन ब्रीदाचि लज्जा रक्षि ।।२।।
नीस्काम भक्तिने न घे कधि नाम । आसे मि आधम पापरुपी ।।३।।
दांभिख मी दास म्हणवीतो तुझा । आंगीकार माझा केला तुम्ही ।।४।।

१२९५५६

आंगिकारावरि निस्काम न करा । बटा चिदंबरा कोणाकडे ।।१।।
पोटिच्या बाळासी न सीकवी माता । निमित्य हे माथा देति जन ।।२।।
न लगे सांगणे तुम्हासि ईश्वरा । बळे भक्त करा पतितासी ।।३।।
चिदंबरा होसी दासाची माउली । क्रपेची साउलि करिसी बळे ।।४।।

१२९५५७

हिनयाती शुद्र आला दर्शणासी । चीदंबरापासी दासीपुत्र ।।१।।
नव्हे त्या दर्षण करि उपोषण । पडला आचेतन सात दिवस ।।२।।
नसे कोन्हा ठावे पडिला येकांती । कोण दिनाप्रती पुसे तेथे ।।३।।
दास म्हणे स्वामि क्रपावंत धनि । साक्ष त्रीभुवनि जाणतसे ।।४।।

१२९५५८

बोलाविला तेव्हा स्वामीनी ब्राम्हण । पात्र ते वाढुन पाटविती ।।१।।
बैसला येकांति सांगती विप्रासी । खोलि ते पागेसी घोड्याजवळि ।।२।।
तेथे बसलासे घालावे भोजन । आणी बोलाउन दर्शनासी ।।३।।
दास म्हणे स्वामी माग म्हणती त्यासी । देतो मी तुजसि मागसी ते ।।४।।

१२९५५९

बळे माग म्हणति न मागे तो काही । म्हणे प्रिय नाहि चरणाविन ।।१।।
बहुताप्राकारे मध्येस्छी घालोन । पुसति नेउन येकांतासी ।।२।।
परि तो न मागे चरणाविन काही । लाहानथोर पाही ऐकताची ।।३।।
चीदंबर त्यासी पुसे पंधरा दिवस । दास म्हणे त्यास ईछा नाही ।।४।।

१२९५६०

चीदंबर त्यासी म्हणतसे जाण । कुटुंबाचे कोण चालविल ।।१।।
शुद्र म्हणे सर्व काळजी तुम्हासी । नसे बा मजसी कारण ते ।।२।।
चिदंबर त्यासी क्रपा ते करुणी । वैराग्य ते मनी संचरवी ।।३।।
दास म्हणे शुद्र मागे माधोकरी । लक्ष चिदंबरि सर्वकाळ ।।४।।

१२९५६१

जवळी होते काहि देउळ बाधीले । स्वन्पी सांगीतले स्वामीराये ।।१।।
बळे पतितासी नीस्काम करीसी । काय माझेविसी जाले देवा ।।२।।
चिदंबरा होसी माता मजलागी । भक्ती देई वेगि निस्काम ते ।।३।।
दास म्हणे होसी उदाराचा राणा । स्वामी ब्रम्हपुर्णा चिदंबरा ।।४।।

१२९५६२

चरित्र २०२

यावे यावे बा श्रीधरा । स्वामीराया चिदंबरा ।।१।।
तुजविण उदासीन । मज न पडे चईन ।।२।।
वाट पाहातो नीसीदिनी । प्राण उरला नयनि ।।३।।
दास येतो लोटांगणी । चीदंबरा ये धावोनी ।।४।।

१२९५६३

करुणावंत म्हणविसी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
जीवमाझा कासाविसी । तुज दया न ये कैसी ।।२।।
क्रपावंत तुचि माता । दावी चरण आनंता ।।३।।
दासालागी पावे आता । चीदंबरा बा समर्था ।।४।।

१२९५६४

दिनानाथ परदेसी । तुझे व्दारि उपवासी ।।१।।
कैसा नीष्टुर जालासी । चिदंबरा माझेवीसी ।।२।।
आसे आन्याई पतीत । तुझे हाती सर्व हीत ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । पावन तु चीदंबरा ।।४।।

१२९५६५

मज देउनि भरवसा । बाहेर काढिले जगधीशा ।।१।।
आंत घेसी कोठवरि । धावा करितो नीराहारी ।।२।।
काहो नीष्टुर जालासी । चीदंबरा या वेळेसी ।।३।।
दास आनाथ परदेसी । दावी चरण दिनासी ।।४।।

१२९५६६

तुजवीण चीदंबरा । जालो उदास संसारा ।।१।।
आग लागो या देहासी । जन्म दिल्हा कासयासी ।।२।।
करि जन्माचे सार्थक । चिदंबरा दावि मुख ।।३।।
दास म्हणवी तुझा रंक । दावी आवतार कौतुक ।।४।।

१२९५६७

कीति देउ परिहार । माझे जाणसी आंतर ।।१।।
धावा करु कोटवर । दावि चरण सकुमार ।।२।।
दयावंत म्हणवीसी । दावी रुप रुषिकेसी ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चिदंबरा ।।४।।

१२९५६८

तैलंग देसीचा ब्राम्हण । आला दर्शणालागुण ।।१।।
करि प्रार्थना स्वामीसी । माझे आंतर जाणसी ।।२।।
पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चिदंबर ।।३।।
म्हणे चिदंबरदास । बोले वीप्र तो स्वामीस ।।४।।

१२९५६९

आशा धरुनीया जाण । आला दर्शणालागुण ।।१।।
पुत्र येकुलता येक । त्याचे लग्न नसे देख ।।२।।
लग्नालागी द्रंव्य काही । मज न मीळे ते पाही ।।३।।
म्हणे चिदंबरदास । आलि करुणा स्वामिस ।।४।।

१२९५७०

स्वामि म्हणति विप्रासी । चिंता न करि चीतासी ।।१।।
लग्न करितो ईश्वर । मन आसु ध्यावे स्थीर ।।२।।
देतो निरोप तुजसी । वेगी जावे त्वा घरासी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । दावी कौतुक ईश्वर ।।४।।

१२९५७१

बोलावीलें ब्राम्हणासी । दिल्हा निरोप त्वरेसी ।।१।।
प्रसाद दिल्हा माहाफळ । वीप्रासी तें तळमळ ।।२।।
स्वामी म्हणति तयासी । लग्न करि आनंदेसी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । न ये तयासी विश्वास ।।४।।

१२९५७२

स्वामी म्हणति विप्रासी । दिल्हा नारेळ तुजसी ।।१।।
धरि गेल्यावरि जाण । करि फळाचे पुजन ।।२।।
लग्न करितो ईश्वर । चिति आसु दे नीर्धार ।।३।।
म्हणे चिदंबरदास । जाला भरवसा विप्रास ।।४।।

१२९५७३

गेला ब्राम्हण घरासी । पुजी नारेळ भावेसी ।।१।।
पुजा केल्यावरि जाण । गेला नारेळ उकलोन ।।२।।
त्यात तीनसे ते होन । पाहे विप्र तो मोजुन ।।३।।
धन्य म्हणे चिदंबरा । कळा तुझी हे ईश्वरा ।।४।।
दास म्हणे चिदंबर । लिलाधारी आवतार ।।५।।

१२९५७४

आनाथ मि दीन करितो प्रार्थना । क्रपेच्या निधाना चीदंबरा ।।१।।
यावे सर्वगता स्वामी प्राणनाथा । वेळ बा समर्था लावो नये ।।२।।
पतित पतित त्रिवाचा पतित । तुझे हाती हीत सर्व आसे ।।३।।
पावे दासालागी चीदंबरा वेगी । आवतार जगी सत्य करि ।।४।।

१२९५७५

आन्याई आपराधी पडीलो पदरी । येउ दे आंतरि दया आता ।।१।।
नाही मज कोन्ही तारख त्रीभुवनी । पावन तु जनि आवतार ।।२।।
सत्य हे प्रतीज्ञा तुझी सर्वेश्वरा । आभय चिदंबरा दिल्हे मज ।।३।।
दास म्हणे किती वाट पाहावीसी । वेळ का लाविसी मायबापा ।।४।।

१२९५७६

का हो चिदंबरा सांडीयले मज । करुणा न ये तुज कैसी देवा ।।१।।
करितो मि धावा सर्वकाळ देवा । येउ दे कणवा माझा काही ।।२।।
आनाथाची माय होसी चिदंबरा । येउ दे ईश्वरा दया काही ।।३।।
दास म्हणे मि तो पतीताची रासी । पावन तुम्हासी नाम साजे ।।४।।

१२९५७७

भुकेला तो मागे आंन्न बा पोटासी । खावे बा मजसी न म्हणे आन्न ।।१।।
पाणी म्हणे काय मजसी बा प्यावे । तान्हेला धावे पाणी पाहात ।।२।।
तैसे बा तम्हासी धुंडीतो ईश्वरा । करुणा चीदंबरा येउ दे माझी ।।३।।
दास म्हणे होसी आनाथ जननी । न येसी धावोनी कैसा वेगी ।।४।।

१२९५७८

भुकेला धावत आन्नासाठी जाण । न नीवारी आन्न त्यासी काही ।।१।।
सीध होउनीया पात्री आसे आन्न । करावे भोजन लागे आपना ।।२।।
नेमी ना नीवारी आन्न ते कोणासी । परीक्षेजासी आगत्य बा ।।३।।
चीदंबरा दास तुझा उपवासी । वेळ का लावीसी भोजनासी ।।४।।

१२९५७९

पडीलो उपवासी तुझिया व्दारासी । दया तुज कैसी न ये देवा ।।१।।
आनदाता होसी ब्रम्हांडभुवनासी । रंक उपवासी व्दारी तुझ्या ।।२।।
हे काय भुषण चीदंबरराया । जाउ नेदी वाया ब्रीद आता ।।३।।
न लगे सांगणे तुम्हा वीश्वंभरा । बळे चीदंबरा क्रपा दासा ।।४।।

१२९५८०

ब्राम्हण तो आला स्वामि दर्शनासी । वीकल्पि आवीश्वासी आभक्त तो ।।१।।
क्रपा करिती स्वामि बळे तयावरी । परितो न धरि भाव चीती ।।२।।
प्रसन्न होवोनी दिल्हा तो प्रसाद । कळा हे आगाध दावीतसे ।।३।।
दास म्हणे दिल्ही प्रसाद सुपारि । चिदंबर करि बाण त्याचा ।।४।।

१२९५८१

कुंकु लावोनीया सुपारिसी जाण । प्रसन्न होउन दिल्ही त्यासी ।।१।।
घेउनी ब्राम्हण सुपारि हातात । ठेवी बटव्यात तमाखुच्या ।।२।।
निघोनी ब्राम्हण जाये तो वाटेसी । रात्री मुकामासी राहीला तो ।।३।।
दास म्हणे तेथे बैसोनि ब्राम्हण । तमाखु ते पान खात आसे ।।४।।

१२९५८२

प्रसाद सुपारी घेउनी हातासी । धालि आडकित्यासी चांडाळ तो ।।१।।
न फुटे सुपारि बळे फोडीतसे । बळ दावीतसे आपुले तो ।।२।।
न फुटे बळाने बोलावी दुसर्यासी । मिळवी चौघासी ब्राम्हण तो ।।३।।
दास म्हणे ऐसे सीनले ते गव्हार । दावी चीदंबर कळा तेथे ।।४।।

१२९५८३

बळॆ फोडु जाता मोडीला आडाकीता । नवल वाटॆ चिता चौघाचीया ।।१।।
फोडीति दगडानॆ न फुटॆ तॆ कदा । भोगिति आपदा दुर्जन तॆ ।।२।।
सीणॊनि राहिलॆ बोट तॆ फुटलॆ । वीन्घ वोडवलॆ म्हणुनी उगॆ ।।३।।
दास म्हणॆ रात्री सांगॆ चीदंबर । द्रष्टांति वीचार ब्राम्हणासी ।।४।।

१२९५८४

स्वान्पी यॆउनीया सांगॆ चीदंबर । घाव आंगावर कॆलॆ माझ्या ।।१।।
प्रसाद तुजसी दिल्हा याजसाटि । आंध तुझी द्रुष्टि जाली कैसी ।।२।।
जागृत होउनी म्हणॆ त्राहॆ त्राहॆ । क्षमा हॆ आन्याय करि दॆवा ।।३।।
दास म्हणॆ दावी प्रत्यय चिदंबर । जाला तो ईश्वर सपारीचा ।।४।।

१२९५८५

उठॆ प्रातःकाळी मॆळवि ब्राम्हण । करितो पुजन भक्तिकरुणी ।।१।।
आन्याई बहुत म्हणति लाहान थोर । क्षमा चीदंबर करितसॆ ।।२।।
करुणि पुजन ब्राम्हण भोजन । भक्तिसी दुर्जन लावीयलॆ ।।३।।
दास म्हणॆ ऐसा पतीतपावन । आवतारसगुण चिदंबर ।।४।।

१२९५८६

चरीत्र २०४

चीदंबरा दावी चरण । तुज आलो मि शरण ।।१।।
होसी पतितपावन । ब्रीद करि बा जतन ।।२।।
दावि दावि रुप सगुण । माझे नीववी हे मन ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९५८७

दिन रंक तुझे व्दारी । रांत्रदिवस धावा करि ।।१।।
दया न येची आंतरि । तुज काय जाले तरि ।।२।।
वाट पाहु कोठवरि । दावी रुप डोळेभरि ।।३।।
दास उदास आंतरि । चिदंबरा ये लौकरि ।।४।।

१२९५८८

वेगि यावे करुणाकरा । स्वामिराया चिदंबरा ।।१।।
यावे दिनाच्या कैवारा । दिनोधारा चीदंबरा ।।२।।
यावे आनंत आपारा । कलयुगी आवतारा ।।३।।
दासाचीया प्रीयकरा । पुर्णब्रम्ह चीदंबरा ।।४।।

१२९५८९

याचे याचे सर्वोतमा । चीदंबरा पुर्णब्रम्हा ।।१।।
माझ्या जीवीच्या वीश्रामा । तुझा आगाध महिमा ।।२।।
चिदंबरा आत्मारामा । वेगी याचे पुर्णकामा ।।३।।
दासाचीया मनोधर्मा । दावि रुप प्रियोतमा ।।४।।

१२९५९०

माझी येउ दे करुणा । स्वामि जिवाच्या जीवना ।।१।।
दावी रुप तु सगुणा । चिदंबरा ब्रम्हपुर्णा ।।२।।
दावी रुप सर्वेश्वरा । आनाथासी दया करा ।।३।।
होसी दिनालागी माय । वेगी दावि आता पाय ।।४।।
याचे दासाच्या जीवना । चिदंबरा बा चिद्घना ।।५।।

१२९५९१

वेगी याचे करुणापति । चिदंबरा बा श्रीपति ।।१।।
विनवितो वांरवार । दावि चरण सकुमार ।।२।।
स्वामि निववि मजला । आलो शरण तुजला ।।३।।
दासाचीया आंतरंगा । चिदंबरा ये श्रीरंगा ।।४।।

१२९५९२

तैलंग देसीचा ब्राम्हण तो येक । दर्शनासी देख स्वामीपासी ।।१।।
आसे भक्तराज भावीक ब्राम्हण । घेतले टेवोनी जवळी त्यासी ।।२।।
चीदंबर म्हणे तया वीप्रालागी । नीरोप मि वेगि देतो तुज ।।३।।
दास म्हणे देती प्रसाद तयासी । द्राक्ष येक त्यासी हाति दिल्हे ।।४।।

१२९५९३

घेउनी प्रसाद वीप्र बिर्हाडासी । ठेवी देवापासी द्राक्ष तेची ।।१।।
देवपुजा करिता पाहो जाता जाण । होत आसे बाण द्रीष्टीपुढे ।।२।।
पाहोनी ब्राम्हण आश्चीर्य ते करि । द्राक्ष दिसेवरी आर्ध तैसे ।।३।।
दास म्हणे दावी लिला चीदंबर । पाहाती लाहान थोर यात्राजन ।।४।।

१२९५९४

जाला आसे बाण तेचीवेळे सिध्द । कळा हे आगाध दावीतसे ।।१।।
राहीलीसे खुण द्राक्षाची कींचीत । विप्रा लावी हात तये स्थानी ।।२।।
नीघोनिया पाणी द्रांक्षाचे ते जाण । मसुरे प्रमाण खाच तेथे ।।३।।
दास म्हणे सर्व होउनीया बाण । मस्तकी ते खुण राहीलीसे ।।४।।

१२९५९५

नवल करिती लाहानथोर । लीला दावी चीदंबर ।।१।।
विप्र पुजीतसे बाण । रुद्र आभीसेक जाण ।।२।।
लघुरुद्र तो करुण । करि ब्राम्हणभोजन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारि तो आवतार ।।४।।

१२९५९६

पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चीदंबर ।।१।।
लिला दावी नाना परि । द्रष्टी पाहती नरनारि ।।२।।
आसे पतितपावन । चीदंबर तो सगुण ।।३।।
दास म्हणे चिदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९५९७

चरित्र २०५

यावे चीदंबरा क्रपेच्या सागरा । जडजीवउधारा रुप दावी ।।१।।
जालो उदासी देवा तुजवीण । न पडे चईन मज काही ।।२।।
देवु परिहार कोठवरि आता । जाणसी आनंता आंतरिचे ।।३।।
दास म्हणे होसी माय आनाथासी । वेळ का लावीसी चीदंबरा ।।४।।

१२९५९८

न करि उसीर यावे बा सत्वर । जाले बा आधीर मन माझे ।।१।।
क्रपावंत माय चीदंबरा तुची । आशा आणीकाची नको मज ।।२।।
त्रैलोक्याचा दाता तुची बा आनंता । तुझे हाति सत्ता सर्व आसे ।।३।।
दास म्हणे त्रैलोक्याचा धणी । आघटीत करणी चिदंबरा ।।४।।

१२९५९९

पुर्ण आवतार जाला कलयुगी । चिदंबर जगी प्रगटला ।।१।।
करुणावंत धणी आनाथ दिनासी । क्रपावंत जैसी माय बाळा ।।२।।
पतितपावन कलयुगी आवतार । करितो वुध्धार आनाथाचा ।।३।।
दास म्हणे करि क्रपा दिनावरि । दावि डोळेभरि रुप आता ।।४।।

१२९६००

येउ दे करुणा मज पतिताची । पावन ब्रीदची लज्या रक्षी ।।१।।
न लगे सांगणे तुम्हासी ईश्वरा । प्रगट चीदंबरा होणे तुम्हा ।।२।।
करणे आगत्य आवतारक्रत्य । वर्तविसी सत्य आझेवरुनि ।।३।।
दास म्हणे होसी क्रपावंत धणी । दावी रुप नयनी चीदंबरा ।।४।।

१२९६०१

यावे सर्वगता स्वामि क्रपावंता । निवारि हे चींता भवदुःख ।।१।।
त्रैलोक्याचा दाता होसी चीदंबरा । स्वामी चराचरा वर्तवीसी ।।२।।
सत्येविण तुझा न हलेची पान । करि नीर्माण ब्रम्हांड हे ।।३।।
दास म्हणे काय तुम्हासी कठीण । द्यावया दर्षण चीदंबरा ।।४।।

१२९६०२

यावे वीश्वपती पावे दिनाप्रती । वर्णवी बा किर्ति आखंडीत ।।१।।
यावे बा दयाळा स्वामि वीश्वपाळा । दावि रुप डोळा आनाथासी ।।२।।
करितो प्रार्थना क्रपेच्या नीधाना । पावे मज दिना ऐशावेळे ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेची तु माता । चिदंबरा आता न करि वेळ ।।४।।

१२९६०३

आवतार चरित्र दावी चीदंबर । कळा हे विचीत्र उघड जनी ।।१।।
माहासर्प थोर होता आजगर । धरिलेसे व्दार विप्राचे ते ।।२।।
न हाले तेथुन बैसे प्रहर तीन । आले त्या वाटेने चीदंबर ।।३।।
दास म्हणे यात्रा बहुत आसे दाटी । स्वामि म्हणती भेटी ईछी सर्प ।।४।।

१२९६०४

बैसलासे सर्प वाट तो पाहात । स्वामि आकस्मात आले तेथे ।।१।।
देखुनीया सर्प फडी उभारोनी । चरण पाहुनी नमस्कारि ।।२।।
वेटाळे काढोनी जाला दंडप्राय । लक्षुनिया पाय पडिला स्वस्थ ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चीदंबर । भक्तराज थोर उठे म्हणती ।।४।।

१२९६०५

आणविती दुध वेगी चीदंबर । टेवीले समोर सर्पाचीया ।।१।।
प्यावे म्हणती आपा सर्प आज्ञा मानी । सर्प वाटीभरुणी दुध प्याला ।।२।।
आज्ञा दिल्ही त्यासी दुध प्याल्यावर । सांगे चीदंबर गोष्टी त्यासी ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलती तयासी । न पडे द्रुष्टीसी जनाचीया ।।४।।

१२९६०६

स्वामि म्हणति त्यासी कलयुगीचे जन । एकांती जाउनी बैसावे बा ।।१।।
होईल सुटीका वेगी आता जाण । चुकले तुझे वीन्घ जन्ममरण ।।२।।
चुकवील्या तुझ्या चौर्यासीच्या खेपा । सुखे जावे बापा ऐकांतासी ।।३।।
दास म्हणे आज्ञा देती चीदंबर । नीघे आजगर आरंण्यासी ।।४।।

१२९६०७

चिदंबर दावी लीला नानापरि । जाला सृष्टीवरि आवतार ।।१।।
आनाथाचा नाथ पतितपावन । आवतार सगुण लिला दावी ।।२।।
आगाध हे कीर्ती न वर्णवे वेदा । देता आक्षइपदा भजनमात्रे ।।३।।
दास म्हणे आसे क्रपावंत धणी । पतीतालागुनि उध्धरितो ।।४।।

१२९६०८

चरित्र २०६

चीदंबरा प्राणनाथा । वेगि यावे बा समर्था ।।१।।
पावे चिंतिलिया आर्था । वेळ न करि सर्वथा ।।२।।
पार नसे सामर्थ्यासी । स्वामि वेळ का लाविसी ।।३।।
पावे दास आनाथासी । वाट पाहे उपवासी ।।४।।

१२९६०९

दिनरंक तुझे व्दारि । धावा करितो निराहारि ।।१।।
दया येउ दे आंतरि । चिदंबरा बा श्रीहरी ।।२।।
बाट पाहु कोठवरि । तुज काय जालेतरि ।।३।।
दास आनाथ पदरि । ब्रीद जतन ते करि ।।४।।

१२९६१०

चिदंबरा तुजविण । माझा व्याकुळ तो प्राण ।।१।।
होसी पतितपावन । कैसा जालासी कठिन ।।२।।
क्रपावंत तुजऐसा । दुजा नसे जगदिशा ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । प्रसन्न व्हावे चिदंबरा ।।४।।

१२९६११

नाहि नाहि बा चइन । चिदंबरा तुजविन ।।१।।
नित्य झुरतसे मनि । दावि रुप तु नयनी ।।२।।
माझी येउ दे करुणा । स्वामि क्रपेच्या निधाना ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।४।।

१२९६१२

सांभाळावे दिनालागि । कळवि आवतार जगि ।।१।।
पावन ब्रीद जतन करि । दावी रुप डोळेभरि ।।२।।
नको नको वेळ लावु । वाट कोठवरि पाहु ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चिदंबरा ।।४।।

१२९६१३

यावे यावे दिनानाथा । चिदंबरा बा समर्था ।।१।।
पावे पावे आनाथासी । चिदंबरा रुषिकेसी ।।२।।
धावे पावे वेगि आता । स्वामि त्रैलोकीच्या नाथा ।।३।।
दास दिन पाहे वाट । चिदंबरा देई भेट ।।४।।

१२९६१४

बरे आले तुज्या मना । चिदंबरा नारायणा ।।१।।
बळे बाहेर काठीले । स्वामि भिक्षेसी लावीले ।।२।।
मजल चालोनीया जावे । भिक्षा मागुनिया खावे ।।३।।
जाला प्रसन्न दासासी । हेच वुचित तुम्हासी ।।४।।

१२९६१५

बरोबरी ते ब्राम्हण । थोर दाविले भुषण ।।१।।
बरे हासविता जन । किति लाजविसी मन ।।२।।
मज काय पतितासी । तुमचे भुषण तुम्हासी ।।३।।
चिदंबरा दासा दिन । तुझे वागवि निशान ।।४।।

१२९६१६

भोगमुर्ति संगे देसी । संस्थान वाढविसि ।।१।।
तुम्हा करणे बा जैसे । तेचि केले आनयासे ।।२।।
पतितासी कोण पुसे । वाया बोलण्याचे पिसे ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । भुषण तुमचे तुम्हास ।।४।।

१२९६१७

जे जे द्रिष्टीसी दाविसी । तेचि पाहु आनंदेसी ।।१।।
तुझे देखूनी चरण । माझे नीवाले हे मन ।।२।।
बळे बोलविसि देवा । दिल्हा आनंद या जीवा ।।३।।
चिदंबरा तुम्ही दास । बळे लाविला भक्तिस ।।४।।

१२९६१८

चिदंबरा स्वामिराजा । हेत पुरविसी माझा ।।१।।
चिति आसे भरवसा । भेटि देसी जगदिशा ।।२।।
आसे स्थिर माझे मन । तुम्ही दिल्हे आभयदान ।।३।।
दास दिन रंकालागि । प्रसन्न जालासि या जगि ।।४।।

१२९६१९

दिन रंक आडीले जाण । होता गरिब ब्राम्हण ।।१।।
लग्न नवते पुत्राचे । चरण आठवि स्वामिचे ।।२।।
म्हणे चिदंबरराया । ब्रीद जाउ नेदि वाया ।।३।।
दास म्हणे चिदंबर । सांगे द्रुष्टांति विचार ।।४।।

१२९६२०

विप्र चिंता करि जाण । कन्या शोध करिल कोण ।।१।।
जावे लागे दुरदेसी । वधु पाहावि पुत्रासी ।।२।।
संकट देखुनिया जाण । चिदंबरे दिल्हे स्वप्न ।।३।।
म्हणे चिदंबर दास । स्वप्नी सांगति तयास ।।४।।

१२९६२१

सांगे स्वप्नी चिदंबर । जावु नये त्वा बाहेर ।।१।।
निश्चय आसा घ्यावा मनी । चिति कल्पना सांडोनी ।।२।।
लग्न होते नीश्चयेसी । वधु येतसे घरासी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । विप्र आला ज्यागृतिस ।।४।।

१२९६२२

राहे निश्चयें धरुण । घरि आपुल्या ब्राम्हण ।।१।।
नित्य चिंता करितसें । लग्नतिथ जवळि आसें ।।२।।
विप्र तळमळि फार । कैसें करिल चिदंबर ।।३।।
विप्र येवुनि देवुळासि । सांगे दास आनाथासि ।।४।।

१२९६२३

करि प्रार्थना देवास । तळमळ ब्राम्हणास ।।१।।
तिथ वुरलि च्यार दिवस । कन्या आलि त्या वेळेस ।।२।।
त्याचि गावामाजी जाण । होता समर्थ ब्राम्हण ।।३।।
द्रव्य न घेता तो जाण । कन्या दिल्हि लग्नकरुण ।।४।।
दास म्हणे चिदंबर । लिला दावी हे आपार ।।५।।

१२९६२४

लग्न जाले आनंदेसी । वाटे नवल विप्रासि ।।१।।
धन्य म्हणे चीदंबरा । तुझी कळा हे ईश्वरा ।।२।।
आसें आन्याई पतित । तुम्हा बोलिलो बहुत ।।३।।
क्षमा करि हे आन्याय । दासा तुचि बापमाय ।।४।।

१२९६२५

होसी मायबाप धनि । विप्र येतो लोटांगणि ।।१।।
क्षमा करिसि आन्याय । तुझे कोमळ ह्रदय ।।२।।
पतितपावन हे ब्रीद । कळा दाविसि आगाध ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माय होसि आनाथास ।।४।।

१२९६२६

चरित्र २०७

चिदंबरा किति लाविसि तु वेळ । निवारि तळमळ मायबापा ।।१।।
पाहातो मि वाट च्यातकाचे परि । वुदास आंतरि होउनिया ।।२।।
कृपाबळे करुणी निववि आंतर । दावि सकुमार रुप डोळा ।।३।।
दास म्हणे यावे दिनाच्या कैवारा । रक्षि चिदंबरा ब्रिद आता ।।४।।

१२९६२७

चिदंबरा होसि करुणेचि माता । दावि क्रपावंता रुप तुझे ।।१।।
पाहातो मि वाट देवा सर्वकाळ । निवारि तळमळ मायबापा ।।२।।
जालो कासाविस्स बहुत ईश्वरा । दावि चिदंबरा चरण द्रिष्टी ।।३।।
दास म्हणे देई क्रपा आभयदान । चित समाधान करि माझे ।।४।।

१२९६२८

येउ दे करुणा स्वामि क्रपाघना । पावे मज दिना ऐशावेळे ।।१।।
दावि निज रुप निवारि भवताप । आवतार प्रताप प्रगट करि ।।२।।
करुणावंत धनि तुचि त्रीभुवनि । येई बा धावोनि वेगि आता ।।३।।
चीदंबरा दास तुजवीण उदास । दावी आनाथास रुप तुझे ।।४।।

१२९६२९

करितो मि धावा सर्वकाळ देवा । येवु दे कणवा माझाकाही ।।१।।
सांभाळि सांभाळी आपुलि ब्रिदावळी । दावी चंद्रमौळि चरण द्रिष्टी ।।२।।
आनाथाचा नाथ ब्रीद करि सत्य । आवतारक्रत्य दावि डोळा ।।३।।
दास म्हणे प्राण उरलासे कंटी । यावे जगजेटी कैवारिया ।।४।।

१२९६३०

यावे देवराया आनाथाच्या वेळे । सगुण सावळे रुप दावी ।।१।।
नये वेळ करु आनाथाच्या नाथा । तुझे हाति सता सर्व आसे ।।२।।
यावे बा दयाळा स्वामि विश्वपाळा । आघटित कळा तुझी देवा ।।३।।
दास म्हणे किति आंत घेसी आझोनि । येई बा धावोनि कैवारिया ।।४।।

१२९६३१

गांजिताति वैरि कामक्रोध फार । निवांत आंतर होवो नेदि ।।१।।
कैवारिया धणि तुज ऐसा शिरि । गांजिताती वैरी पाहासि काय ।।२।।
रक्षी ब्रीद आता स्वामि प्राणनाथा । नुपेक्षि सर्वथा चिदंबरा ।।३।।
दास म्हणे किति वाट पाहाविसी । दया तुज कैसी न ये देवा ।।४।।

१२९६३२

नको नको नको दुर धरु आता । ब्रीद प्राणनाथा जाईल तुझे ।।१।।
रक्षि रक्षि रक्षि ब्रिद विश्वंभरा । प्रगट चिदंबरा व्हावे वेगि ।।२।।
पाहे पाहे पाहे क्रपाद्रिष्टि वेगि । आवतार जगि कळवितो बा ।।३।।
दावि दावि दावि दासालागि पाय । तुचि बापमाय चिदंबरा ।।४।।

१२९६३३

तारि तारि तारि आनाथ पदरि । दावी डोळेभरि रुप आता ।।१।।
साहे साहे साहे आपराधाच्या कोटी । दया येउ दे पोटी चीदंबरा ।।२।।
करि करि करि आनाथाचे साहे । ब्रिद जावु पाहे चिदंबरा ।।३।।
यावे यावे यावे दासाच्या कैवारा । प्रगट चिदंबरा व्हावे वेगि ।।४।।

१२९६३४

काविरितिरिचा ब्राम्हण तो येक । आला आसे देख स्वामिपासी ।।१।।
कुटुंबसहित आला दर्षणासी । संतती तयासी नवति पोटी ।।२।।
करितो प्रार्थना स्वामिलागी जाण । देई पुत्रदान मज येक ।।३।।
दास म्हणे करुणा आलि ईश्वरासी । चिदंबर त्यासी बोलतसे ।।४।।

१२९६३५

विप्रकांता करि विनंती ते जाण । दवडी वांजपण चिदंबरा ।।१।।
चोवीस वर्ष जाले माझीया न्हानासी । वांज हे मजसी म्हणति जेन।।२।।
कपाळिचा डाग काढी स्वामिराजा । हेत पुरवी माझा स्वामिराजा ।।३।।
दास म्हणे करुणा भाकी स्वामीलागि । चिदंबरा वेगि पाव मज ।।४।।

१२९६३६

विप्रकांतेलागि बोले चिदंबर । चिंता तिळभर करु नये ।।१।।
वीस वर्ष जाले तुझीया न्हानासी । पंचविसावे वर्ष पुत्र देतो ।।२।।
हर्षयुक्त मनि जालि विप्रकांता । आभय आनंता दिल्हे आता ।।३।।
दास म्हणे जाला प्रसन्न ईश्वर । पाहे चिदंबर क्रपाद्रिष्टी ।।४।।

१२९६३७

देवोनि निरोप तया उभयेतासी । नारेळ तयासी दिल्हा येक ।।१।।
जाला आसे पुत्र तया ब्राम्हणासी । आला दर्षणासी घेवुनिया ।।२।।
आनंदेसी वीप्र वाटी ते साखर । ठेवुनि कुमर स्वामिपुढे ।।३।।
दास म्हणे लिला दावी चिदंबर । आनंत आपार नित्यनवी ।।४।।

१२९६३८

चरित्र २०८

चिदंबरा क्रपाघना । माझी पुरवी वासना ।।१।।
देई देई क्रपादान । माझे निववि हे मन ।।२।।
देई संतसंग सदा । चुकवि हा भवभाधा ।।३।।
दास न मागे ते काहि । सगुण भेटी तुझी देई ।।४।।

१२९६३९

दावि चरणकमळ । माझी नीवारि तळमळ ।।१।।
तुझे म्हणवीतो बाळ । माता होसी तु दयाळ ।।२।।
तुजवीण उदासिन । मज न पडे चईन ।।३।।
दास म्हणे पांडुरंगा । चिदंबरा ये श्रीरंगा ।।४।।

१२९६४०

यावे यावे विश्वपति । दावि रुप दिनाप्रती ।।१।।
होसि करुणेचि माता । चिदंबरा बा आनंता ।।२।।
निवारि हे भवचिंता । चिदंबरा क्रपावंता ।।३।।
दास म्हणे क्रपाघना । चिदंबरा ये चीद्घना ।।४।।

१२९६४१

चिदंबरा आंतरंगा । मिळवावे संतसंगा ।।१।।
संतचरणिचि रज । मज लागता सहज ।।२।।
हरे आंतरिचा सिण । चित होय समाधान ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९६४२

तुज न मागे मि आणिक । मज देई आत्मसुख ।।१।।
जन्मदुःख हे निवारि । देई आनंद आंतरि ।।२।।
ब्रम्हानंद दे आक्षई । ठेवि निवांत ह्रदई ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । भक्तिप्रेम दे ईश्वरा ।।४।।

१२९६४३

प्रीयकर तुजवीण । मज न वाटे बा आन्न ।।१।।
माझे आंतर जाणसी । कैसा नीष्टुर जालासी ।।२।।
क्रपावंत म्हणविसी । का हो दीना उपेक्षिसी ।।३।।
तारि दास पतितासी । चिदंबरा पावन होसी ।।४।।

१२९६४४

विप्र आला दर्षणासी । नव्हते संतान तयासी ।।१।।
पुत्र ईछा ते धरुन । आला स्वामिसि शरण ।।२।।
कांता आसे बरोबर । विस वर्ष नाही पोर ।।३।।
दास म्हणे चिदंबर । क्रपा करि दिनावर ।।४।।

१२९६४५

विप्रकांता विनविति । करि स्वामिसि विनंती ।।१।।
फेडी माझे वांजपण । चिदंबरा आले शरण ।।२।।
क्रपावंत तुचि येक । मज दावि पुत्रमुख ।।३।।
आसे पावन आवतार । दास म्हणे चिदंबर ।।४।।

१२९६४६

जालो विप्रासि प्रसन्न। स्वामि बोलो वरदान ।।१।।
पुत्र देतो मि तुजसि । दिल्हा प्रसाद तियेसी ।।२।।
निरोप देवुनिया जाण । सांगितलि येक खुण ।।३।।
आला ब्राम्हण समयासी । घालि भोजन तयासी ।।४।।
म्हणे चिदंबर दास । नेम सांगती विप्रास ।।५।।

१२९६४७

आज्ञोप्रमाणे ब्राम्हण । करि वर्तनुक जाण ।।१।।
पुत्र जाला बा तयासि । वेगि न ये दर्शनासी ।।२।।
तया सांगती द्रुष्टांत । का रे जालासी वुन्मत्त ।।३।।
दास म्हणे चिदंबर । लिलाधारी हा ईश्वर ।।४।।

१२९६४८

विप्र आला दर्षणासी । संगे घेवुनि पुत्रासि ।।१।।
भयभित तो चितासि । करि विनंति स्वामिसी ।।२।।
आसे आन्याई बहुत । सांगे द्रष्टांति मात ।।३।।
विप्र येतो लोटांगणी । यात्रा पाहति नयनी ।।४।।
दास म्हणे चिदंबर । आसे क्रपेचा सागर ।।५।।

१२९६४९

चरित्र २०९

चिदंबरा यावे दिनाच्या कैवारा । वेळ विश्वंभरा लावो नये ।।१।।
कासाविसी माझा होत आसे जीव । स्वामिराया किव येवु दे काहि ।।२।।
सर्वकाळ तुझा करितसे धावा । देवाचीया देवा पावे आता ।।३।।
दास म्हणे दावि आवतार प्रगट । आनाथासी भेट वेगि देवा ।।४।।

१२९६५०

यावे सर्वेश्वरा आनंत आपारा । प्रगट चिदंबरा व्हावे वेगी ।।१।।
न करि उसीर यावे बा सत्वर । जाले हे आधीर मन माझे ।।२।।
यावे सर्वगता स्वामि क्रपावंता । निवारि हे चिंता चिदंबरा ।।३।।
दास म्हणे दावि चरण द्रिष्टीसी । आवतार श्रीष्टिसि कळवि तुझा ।।४।।

१२९६५१

सर्वकाळ चिंता वाहातसे पोटी । देई मज भेटी चीदंबरा ।।१।।
झुरतसे मनी दावि रुप नयनि । हिंडे राणनीवनी तुजसाटी ।।२।।
सोडोनीया गाव हिंडे देशोदेसी । दया तुज कैसि न ये माझी ।।३।।
चिदंबरा दास होवुनि वुदास । तुजविण त्रास आला जीवा ।।४।।

१२९६५२

काय म्हणोनिया सांडी केलि माझी । कोटे गोलि तुझी दया देवा ।।१।।
झुरतसे पोटी प्राण वुरला कंठी । न कळे सेवटी काय करिसी ।।२।।
रक्षी ब्रीद आता स्वामि प्राणनाथा । तुझे हाति सता सर्व आसे ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माय । चिदंबरा पाय दावि आता ।।४।।

१२९६५३

यावे बा श्रीधरा दीनाच्या कैवारा । कलयुगि आवतारा प्रगट व्हावे ।।१।।
तुजविण जीव पडिला झुरनि । न येसि आझुनि मायबापा ।।२।।
काहो देवराया राग त्वा धरिला । करुणा तुजला न ये माझी ।।३।।
दास म्हणे किति लाविसि तु वेळ । होसि तु दयाळ मायबापा ।।४।।

१२९६५४

यावे क्रपाघना पतितपावना । पुरवि वासना आधी देवा ।।१।।
यावे दिनानाथा पावे आनाथासी । क्रपावंत होसि तुची येक ।।२।।
तुचि येक धणि होसि त्रिभुवनि । आघटीत करणि तुझी देवा ।।३।।
दास म्हणे दावि आवतार प्रताप । निवारि भवताप चिदंबरा ।।४।।

१२९६५५

व्रुध तो ब्राम्हण आला दर्शणासी । वर्ष त्यासी ऐसी जाले आसे ।।१।।
चिति ते वासना लग्न करुणि ध्यावे । लज्जीत स्वभावे न बोलवे ।।२।।
स्वामि म्हणति त्यासि काय ईछा मनि । विप्र स्तब्द मनि न बोलवे ।।३।।
दास म्हणे बळे पुसे चिदंबर । लिला आवतार स्वामि माझा ।।४।।

१२९६५६

पुसे ब्राम्हणासी श्वमुखे ईश्वर । बळे चिदंबर प्रसन्न तो ।।१।।
लज्या सांडोनिया बोलावे म्हणति । विप्र लाजे चिति न बोलवे ।।२।।
बोले चिदंबर देतो लग्न करुण । निवांत हे मन आसु ध्यावे ।।३।।
दास म्हणे बोले विप्र तो हासोनि । साक्ष आंतकरणी होसि देवा ।।४।।

१२९६५७

चिदंबर म्हणति लग्न करुणी ध्यावे । आनंदेसी जावे नीरोप हा ।।१।।
हासोनिया वीप्र म्हणे निरोप दिल्हा । द्रव्य ते लग्नाला पाहिजे बा ।।२।।
द्रव्यविण कैसे करुणि ध्यावे लग्न । जालो मी प्रसन्न म्हणे देव ।।३।।
दास म्हणे त्यासी बोलाउन जवळ । देत आसे दाळ चिदंबर ।।४।।

१२९६५८

चिदंबर बोलॆ विप्रालागि जाण । प्रसाद बांधोन न्यावा घरी ।।१।।
दाळ हारभर्याचि दिली सॆर यॆक । याचॆ जाले दॆख होन सर्व ।।२।।
बांधोनिया दाळ दिल्हि तॆ विप्रासी । खर्चि हॆ लग्नासी म्हणती दॆव ।।३।।
दास म्हणॆ विप्र घरासि जावोनि । पाहॆ तो सोडोनि दाळ तॆव्हा ।।४।।

१२९६५९

विप्र पाहो जाता जालॆ आसति होन । आनंदॆसी लग्न करितसॆ ।।१।।
लग्न करुणिया दंपत्यसहित । दर्षणासि यॆत स्वामिचिया ।।२।।
जातो लोटांगणि विप्र तो समोर । वुटवी चिदंबर हात धरुणी ।।३।।
दास म्हणॆ लिला दावि विश्वपति । क्रपॆचि हॆ मुर्ति चिदंबरा ।।४।।

१२९६६०

टॆवोनि ब्राम्हण जवळि यॆक मास । निरोप दॆती त्यास चिदंबर ।।१।।
वस्त्रॆतॆ भुषण दिल्हॆ उभयॆतासी । पुजी आनंदॆसी दंपत्यासी ।।२।।
चिदंबर करि दंपत्यपुजन । आंगॆ तो वर्तोन दावी दॆव ।।३।।
दास म्हणॆ दावि आवतार चरित्र । वर्तती पवित्र दॆखोनिया ।।४।।

१२९६६१

चरित्र २१०

चीदंबरा क्रपानिधि । दावि रुप तुझे आधी ।।१।।
यावे यावे दिनानाथा । दावि चरण समर्था ।।२।।
वेळ न करिता यावे । ब्रीद जतन करावे ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चिदंबरा ।।४।।

१२९६६२

पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चिदंबर ।।१।।
पार नसे सामर्थ्यासी । रक्षी दिन आनाथासी ।।२।।
क्रपाद्रिष्टी पाहाताची । होय मृत्येका सोन्याची ।।३।।
करि पाषाणाचा परिस । कल्पवृक्ष बाभुळिस ।।४।।
दास म्हणे चीदंबर । दावी लिला हे आपार ।।५।।

१२९६६३

आनंतब्रम्हांड निर्माण । करि न लगता क्षण ।।१।।
आसे पतीतपावन । कलीयुगी ते सगुण ।।२।।
ज्याचे सत्य करु जाण । वर्ततसे तो पावन ।।३।।
दास म्हणे चिदंबर । तोची द्रिष्टीसी गोचर ।।४।।

१२९६६४

सतामात्र वर्तवित । आनंत ब्रम्हांड चालित ।।१।।
त्रैलोक्यासी सुत्रधारि । चिदंबर चराचरी ।।२।।
तोचि जालासे सगुण । कलयुगी ब्रम्हपुर्ण ।।३।।
पुर्णब्रम्ह आवतार । दास म्हणे चिदंबर ।।४।।

१२९६६५

क्रपावंत तुचि धणी । मज येक त्रीभुवनी ।।१।।
दावि दावि रुप सगुण । बाळ तुझे मि आज्ञान ।।२।।
तुजविण प्रिय काही । मि तो नेणे लोकि तिही ।।३।।
दास म्हणे विश्वंभरा । भेट देई चीदंबरा ।।४।।

१२९६६६

चिदंबरा क्रपाघना । दावी रुप तु सगुणा ।।१।।
होसी पतितपावन । ब्रिद करावे जतन ।।२।।
करुणावंत म्हणविसि । काय जाले माझे विसी ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । बटा न लावि ब्रिदास ।।४।।

१२९६६७

विप्र विकल्पी दुर्जन । आला कापट्येधरुन ।।१।।
आसे देविवुपासक । छळावया आला देख ।।२।।
येवुन स्वामिचिया पुढे । वुभा राहे तो निवाडे ।।३।।
दास म्हणे चिदंबर । लिलाधारि हा ईश्वरा ।।४।।

१२९६६८

विप्र जावुनि बिल्हांडासी । बैसे देवपुजनासी ।।१।।
मानस पुजा करितसे । साक्षात्कार त्यासी आसे ।।२।।
देवी बैसवि सन्मुख । पुज्या करितसे देख ।।३।।
म्हणे चिदंबर दास । प्रत्यय दावि त्या विप्रास ।।४।।

१२९६६९

विप्र करि मानसपुजा । देवि पाहे आष्टभुज्या ।।१।।
तेथे येवुन चिदंबर । उभा राहे त्या समोर ।।२।।
लात मारुनि देसी । दिसे सन्मुख विप्रासी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । नवल वाटे ब्राम्हणास ।।४।।

१२९६७०

विप्र म्हणे काय करु । किति मन हे आवरु ।।१।।
लात मारुन येकिकडे । चिदंबर येतो पुढे ।।२।।
देवि येकिकडे राहे । तेथे करु मी काय ।।३।।
दास म्हणे चिदंबर । उभा राहे त्या समोर ।।४।।

१२९६७१

ब्राम्हण लज्जित होवुन । प्रत्यय पाहे दिवस तीन ।।१।।
शरण आला चिदंबरा । म्हणे धन्य तु ईश्वरा ।।२।।
प्रत्यय दाविला मजसि । पतितपावन तु होसी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । विप्रा म्हणे भक्तथोर ।।४।।

१२९६७२

चरित्र २११

चिदंबरराया होसी क्रपावंत । ठेवि बा निवांत मन माझे ।।१।।
निवांत हे चित ठेवी तुझे पाई । क्रपादान देई ईतके मज ।।२।।
न सोसवे दुःख कल्पनेचे मज । शरण आलो तुज याजसाटी ।।३।।
दास म्हणे तुम्ही दिल्हे आभयदान । वेळ का आझुन लावीयला ।।४।।

१२९६७३

करितो प्रार्थना पावे मज दिना । येउ दे करुणा चिदंबरा ।।१।।
आनाथाचि माय होसी बा आनंता । वेळ भगवंता लावो नये ।।२।।
कंठि उरला प्राण करुणा भाकिता । न ये तुझ्या चीता द्रव माझा ।।३।।
दास म्हणे कैसा जालासि कठिन । दावि बा चरण चिदंबरा ।।४।।

१२९६७४

झुरतसे चिती सर्वकाळ देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।१।।
नको वेळ करु आनाथाचे आई । येवु दे ह्रदई दया माझी ।।२।।
तुजवीण माझे जीवलग कोण । जाणति चरण तुझे देवा ।।३।।
दास म्हणे किति आंत घेसी आझुनि । दावि रुप नयनि चिदंबरा ।।४।।

१२९६७५

यावे बा श्रीधरा आनाथाच्या काजा । म्हणवितो तुझा दिनरंक ।।१।।
काहि तरि दया येउ दे ह्रदई । नको बा निर्दय होवु देवा ।।२।।
तुज ऐसा दयाळ नसे त्रीभुवनि । होसी तु जननि आनाथाची ।।३।।
दास म्हणे मि तो म्हणवि तुझे बाळ । नीवारि तळमळ चिदंबरा ।।४।।

१२९६७६

तळमळी जीव येवु दे माझी कीव । तुजवीण देव नेणे दुजा ।।१।।
आंतरिचा भाव तुज आसे ठावा । बोलोनिया देवा दावु कीती ।।२।।
क्रपेची तु माता होसी बा आनंता । चिदंबरा आता वेळ कीती ।।३।।
दास म्हणे वाट पाहातो निसीदिनी । येई बा धावोनि कैवारिया ।।४।।

१२९६७७

कैवारि दिनाचा वेद बोले याचा । लौकीक ब्रीदाचा गर्जतसे ।।१।।
आडीलीया कोणी पावे तो निर्वाणी । गर्जति पुराणि पवाडे हे ।।२।।
दिनरंक पडीलो तुझीया ब्दारासी । दया तुज कैसी न ये देवा ।।३।।
चिदंबरा दास म्हणवि तुझा रंक । रक्षिसि लौकिक ब्रीदाचा तु ।।४।।

१२९६७८

आवतार चरित्र वुघड दाविसी । निर्वाणि पावसि चिदंबरा ।।१।।
ब्राम्हणतो होता येक दुरदेसी । व्यापिला तयासी रोग बहुत ।।२।।
औषध वुपाय द्रव्य खर्चियले । प्रयत्न सरले सर्व त्याचे ।।३।।
दास म्हणे सर्व सरला वुपाय । चिदंबरपाय आठवितो ।।४।।

१२९६७९

रोगे व्यापियला ब्राम्हण बहुत । न पुसति आप्त स्त्रियापुत्र ।।१।।
न येति जवळ त्यागिले सर्वाणी । आठवितो मनि चिदंबरा ।।२।।
रात्रंदिवस करि धावा तो आंतरि । नये त्या बाहेर बोलावया ।।३।।
दास म्हणे विप्र चिदंबरा लिन । नाटवितो जाण देव दुजा ।।४।।

१२९६८०

धावे पावे म्हणे विप्र त्या वेळेसी । नवस देवासि मामितला ।।१।।
होता मज देवा आराम देहासी । येतो पायापासि सिघ्र तुझ्या ।।२।।
पिंड समर्पिला तुझीया चरणी । येवु द्यावी मनि दया आता ।।३।।
दास म्हणे त्यासी द्रुष्टांति ईश्वर । सांगे चिदंबर येवुनिया ।।४।।

१२९६८१

द्रुष्टांति विप्रासी सांगे चिदंबर । चिंता तिळभर करु नये ।।१।।
आरोग्य करितो तुजसी मि जाण । दर्षणालागुण यावे वेगी ।।२।।
ऐसा हा द्रष्टांत जाला ब्राम्हणासी । आला जाग्रतेसि तयेवेळे ।।३।।
दास म्हणे जाला भरवसा चीतासी । वुटे आनंदेसि विप्र तेव्हा ।।४।।

१२९६८२

वुटे प्राथःकाळि पाहे तो शरिर । होता तो जर्जर गाळीत कुष्टी ।।१।।
दिव्य जालि काया नसे रोग काहि । आनंदेसि पाहि निवे विप्र ।।२।।
आला स्वामिपासि जाय लोटांगण । सांगे वर्तमान जाले तेही ।।३।।
बोले चिदंबर भक्ति तुझी थोर । पावला ईश्वर दास म्हणे ।।४।।

१२९६८३

चरित्र २१२

चिदंबरा मायबापा । करि आनाथासी क्रपा ।।१।।
वेगी दावी चरण । हारे आंतरिचा सीण ।।२।।
तुजवीण उदासीन । मज न पडे चईन ।।३।।
आंतर जाणसी दासाचे । करी सार्थक जन्माचे ।।४।।

१२९६८४

तुज ऐसा दुजा कोन्ही । देव नसे त्रीभुवनी ।।१।।
व्यापक तु चराचरी । आनंतब्रम्हांडाभीतरी ।।२।।
होसी पतीतपावन । कलयुगी तु सगुण ।।३।।
होसी दासाचे जीवन । चीदंबरा ये धावोन ।।४।।

१२९६८५

चिदंबरा क्रपानिधी । देई सहज समाधी ।।१।।
मन करि बा उन्मन । वृति स्वरुपि निमग्न ।।२।।
आंगि देइ शांति सुख । चिदंबरा दावि मुख ।।३।।
आशा पुरवि दासाचि । लज्जा रक्षि हे ब्रिदाची ।।४।।

१२९६८६

देई देई भक्तिप्रेमा । चिदंबरा पुरुषोतमा ।।१।।
प्रिय तुजविण काहि । नको माझिया ह्रदई ।।२।।
देई प्रेमळ भजन । दावि रुप तुझे सगुण ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९६८७

काम क्रोध हे निवारि । नित्य गांजिताति वैरि ।।१।।
लोभ दंभ दुर करि । श्रुध्धभाव दे आंतरि ।।२।।
आंगि प्रेमाचे पाझर । देई साधुचा सेजार ।।३।।
दास तुझा मि कींकर । चिदंबरा ये सत्वर ।।४।।

१२९६८८

तुजविण प्रियकर । नको देवु बा ईतर ।।१।।
जन्मदुःख हे निवारि । पडलो तुझीया पदरि ।।२।।
तुम्ही केला आंगिकार । तैसे मन करि स्थिर ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । ठेवी निवांत इश्वरा ।।४।।

१२९६८९

ब्रम्हहत्या ब्राम्हणासी । होता समंध पाठिसी ।।१।।
आला स्वामिच्या दर्षणा । नित्य करितो प्रार्थना ।।२।।
त्यासि बोले चिदंबर । व्हावे आइोचा निर्धार ।।३।।
म्हणे चिदंबर दास । स्वामि बोलति विप्रास ।।४।।

१२९६९०

बोले चिदंबर त्यासी । द्रंव्यलोभ का धरिसी ।।१।।
आसे समंध पाठिसी । द्रंव्य ध्यावे ज्याचे त्यासी ।।२।।
त्याचे दिल्याविन धण । सुटिका नसे तुझी जाण ।।३।।
म्हणे चिदंबर दास । स्वामि सांगे ब्राम्हणास ।।४।।

१२९६९१

बोले विप्रतो स्वामिसी । नसे द्रंव्य मजपासी ।।१।।
स्वामि म्हणताति जाण । लाटिके न करि भाषण ।।२।।
द्रंव्य टेविले पुरुण । देवखोलिमाजी जाण ।।३।।
विप्र लज्जीत चितास । म्हणे चिदंबर दास ।।४।।

१२९६९२

स्वामी बोलता विप्रासी । आला समंध आंगासी ।।१।।
बोले कर तो जोडोन । विप्र आसे हा दुर्जन ।।२।।
लटिके करितो भाषण । समक्ष स्वामिपुढे जाण ।।३।।
म्हणे चिदंबर दास । समंध विनवि स्वामिस ।।४।।

१२९६९३

बोले समंध स्वामिसि । जाले दर्षण मजसी ।।१।।
स्वामिराया चिदंबरा । माझा वुध्धार तो करा ।।२।।
ऐसे बोलोनिया जाण । गेला समंध निघोन ।।३।।
दास म्हणे चिदंबर । सांगे विप्रासि प्रखर ।।४।।

१२९६९४

स्वामि सांगति विप्रासी । द्रव्य खर्च तु करिसी ।।१।।
तरिच सुटका ते जाण । आज्ञा म्हणे तो ब्राम्हण ।।२।।
द्रंव्य खर्चुनिया जाण । स्वामि करवि संतर्पण ।।३।।
गेला समंध विप्राचा । वुध्धार केला राक्षसाचा ।।४।।

१२९६९५

चरित्र २१३

चिदंबरा देई आनाथासि भेटि । दया येउ दे पोटी मायबापा ।।१।।
कलयुगि आवतार कळवि जगासि । भ्रम माईकासि पडो नेदी ।।२।।
चिदंबरा जरि वोळखि तु देसी । तरिच मानवासि कळे देवा ।।३।।
दास म्हणे होसि पावन आवतार । कळवि हे प्रखर सर्वजना ।।४।।

१२९६९६

करितो प्रार्थना येवु दे करुणा । क्रपेच्या निधाना चिदंबरा ।।१।।
यावे करुणापति पावे दिनाप्रति । आवतारक्रति प्रगट करिं ।।२।।
तुजविण जालो चिति वुदासीन । दावि बा चरण चिदंबर ।।३।।
दास म्हणे होसि क्रपेचि तु माता । वेळ भगवंता लावु नये ।।४।।

१२९६९७

यावे विश्वपति दिनाच्या कैवारा । दावि चिदंबरा रुप तुझे ।।१।।
यावे सर्वगता पावे मज आता । निवारि हे चिंता चिदंबरा ।।२।।
यावे बा दयाळा स्वामि घननिळा । येवु दे कळवळा माझा देवा ।।३।।
करितो मि धावा दिनरंक ब्दारि । दावि डोळेभरि रुप तुझे ।।४।।

१२९६९८

नाहि मज कोणि तुजविण ईश्वरा । का हो चिदंबरा वेळ केला ।।१।।
कोठे गेली तुझी सता माझेवेळे । झाकोनिया डोळे बैसलासी ।।२।।
वुघडी नेत्रब्दार निववि आंतर । जाला आसे थोर सिण देवा ।।३।।
चिदंबरा दास म्हणवि तुझा रंक । देई मज येक क्रपादान ।।४।।

१२९६९९

सुख बहुतासि व्हावे चिदंबरा । यासाटि ईश्वरा विनविले ।।१।।
बहुत जिवालागी उध्धार करणे । यासाटि धरणे तुझ्या ब्दारि ।।२।।
आभयदान दिल्हे मज चिदंबरा । वेळ विश्वंभरा लावो नये ।।३।।
दास पतितासि जालासि पावन । वुध्दरावे जन क्रपाद्रीष्टी ।।४।।

१२९७००

आनाथ दिनाच्या कैवारालागोनी । आवतार जनि तुझा देवा ।।१।।
पतितपावन आवतार कलयुगि । प्रगट व्हावे वेगि चिदंबरा ।।२।।
करितसे धावा कंटि वुरला प्राण । जालासि कठिण काय म्हणोनि ।।३।।
दास म्हणे रक्षी ब्रीद हे आपुले । दावी बा पावुले चिदंबरा ।।४।।

१२९७०१

करितो विनंति करुणेच्या पति । येवु ध्यावि चिति दया माझी ।।१।।
श्रुद्र दिनरंक होता दुरदेसी । शितज्वर त्यासि तिन वरषे ।।२।।
बहुत व्यापिले शरिर क्षिण जाले । द्रंव्य खर्च केले बहुत तेणे ।।३।।
दास म्हणे काहि न चले वुपाय । चिदंबर पाय आटविता ।।४।।

१२९७०२

बहुताचि म्हणे केले देवधर्म । व्यापिले रोगाणे आधिकचि ।।१।।
श्रुद्र म्हणे देव नसे श्रुष्टिवर । बौध्य आवतार सर्व जाले ।।२।।
देव दगडाचे श्रुष्टिवरि जाण । आवतार सगुण चिदंबर ।।३।।
दास म्हणे श्रुद्र निश्चय करि येक । आटवितो देख चिदंबरा ।।४।।

१२९७०३

न चाले ते आन्न कंठि वुरला प्राण । चिदंबर चरण आठवीतो ।।१।।
पावे चिदंबरा मज आनाथासि । लौकिक श्रुष्टिसि आसे तुझा ।।२।।
पावे मजलागि येतो दरषणासि । द्रुष्टांत तयासि जाला तेव्हा ।।३।।
दास म्हणे स्वाप्नि सांगे चिदंबर । यावे बा सत्वर दर्षणासी ।।४।।

१२९७०४

सांगे घरि त्यासी जातो दरषणासी । मृत्ये हा वाटेसी तरि बरे ।।१।।
घरिचा सुखि होता नीघाला त्वरित । पुत्रालागि घेत समागमे ।।२।।
आला स्वामिपासि घालि लोटांगण । देति आभयदान चिदंबर ।।३।।
दास म्हणे त्यासी बोले चिदंबर । यावे बा सत्वर भोजनासि ।।४।।

१२९७०५

आंबाड्याचिभाजी भाकरी त्या दोन । तलतो हासुन वाढविति ।।१।
ध्यावा तो प्रसाद म्हणति आनंदेसी । आरोग्य तुजसी होते येणे ।।२।।
घेवुनि प्रसाद गेला ब्रील्हाडासी । गेले तेची दिवसि सीतज्वर ।।३।।
दास म्हणे लिला दावि चिदंबर । कलयुगि आवतार स्वामि माझा ।।४।।

१२९७०६

चिदंबरा स्वामिराया । करि आनाथासि दया ।।१।।
सांभाळावे मज दिना । स्वामि पतितपावना ।।२।।
चित्त माझे वुदासिन । दिन जालो तुजविन ।।३।।
पावे दास आनाथासी । चिदंबरा या वेळेसी ।।४।।

१२९७०७

विनवितो वांरवार । कैसा जालासी कठोर ।।१।।
क्रपावंत म्हणवीसि । तुज दया न ये कैसी ।।२।।
किति वाट पाहाविसि । का हो ब्रिद गमाविसि ।।३।।
चिदंबरा दास शरण । जतन करि देवपण ।।४।।

१२९७०८

नित्य करितो विनंति । चिदंबरा बा श्रीपती ।।१।।
माझा धावा नायकसि । काय जाले बा तुजसि ।।२।।
सामर्थ्यासी नसे पार । होसि पावन आवतार ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । ब्रिद जतन ते करा ।।४।।

१२९७०९

करुणावंत तुचि धणि । होसी आनाथजननि ।।१।।
प्राण वुरला नयनी । का हो न येसी आझोनि ।।२।।
धावा करितो निर्वाणी । दावि रुप तुझे नयनि ।।३।।
दास पडिलासे वनि । चिदंबरा ये धावोनि ।।४।।

१२९७१०

धावे पावे वेगी आता । चिदंबरा प्राणनाथा ।।१।।
तुझे हाति सर्वसता । वेळ न करि आनंता ।।२।।
निवारि हे भवचिंता । चिदंबरा क्रपावंता ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चिदंबरा ।।४।।

१२९७११

नाहि नाहि मज कोन्ही । तुजविण त्रीभुवनी ।।१।।
तुजसाटि झुरे प्राण । चिदंबरा तुझी आन ।।२।।
वाट पाहातो निसिदिनि । दया येवु द्यावी मनि ।।३।।
होसी दासासि जननि । रक्षी लौकिक तु जनी ।।४।।

१२९७१२

गरिब विप्र दुरदेसि । नाहि दर्षण तयासी ।।१।।
आवतार चिदंबर । ऐसे किर्ति ऐकिलिसे फार ।।२।।
विप्र आठवितो मनि । भाव सात्विक धरुनी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । तेचि आवडी देवास ।।४।।

१२९७१३

चिदंबर ध्यानिमनि । विप्र चिंति आपुले स्थानि ।।१।।
नित्य करितसे धावा । रुप दावि सदाशिवा ।।२।।
करुणावंत म्हणविसि । दावी रुप आनाथासि ।।३।।
म्हणे चिदंबर दास । ध्यान लागले विप्रास ।।४।।

१२९७१४

करि ब्राम्हण विनंति । स्वामि आनाथा रक्षीति ।।१।।
पुरवावी माझी आस । दावि रुप आनाथास ।।२।।
आपंग मि सर्वापरि । ईछा माझी पुर्ण करि ।।३।।
म्हणे चिदंबर दास । निजध्यास ब्राम्हणास ।।४।।

१२९७१५

चिदंबर ब्राम्हणासी । रात्री सांगे द्रुंष्टातासि ।।१।।
वुध्या दिवस माध्यान्हासी । येतो तुझीया भेटीसि ।।२।।
प्रातःकाळि तो वुटुन । ब्राम्हण सांगतसे स्वप्न ।।३।।
दास म्हणे चिदंबर । दावि प्रत्यय ईश्वर ।।४।।

१२९७१६

दिवस येता दोन प्रहर । प्रगटले चिदंबर ।।१।।
ब्राम्हणासी हाकमारी । गुंडि धरुनि आले करि ।।२।।
भेट देवुनि ब्राम्हणा । केले समाधान जाणा ।।३।।
तांदुळ दिल्हे दोन सेर । गुप्त जाले चिदंबर ।।४।।
दास म्हणे लिलाधारी । चिदंबर श्रीष्टीवरि ।।५।।

१२९७१७

चरित्र २१५

चिदंबरा क्रपा केलि आनाथासी । लंगोटी सर्वासी दिल्ही देवा ।।१।।
भाग्य वुदयासी आनंद चितासी । वैराग्य भाग्यासि पार नाहि ।।२।।
प्रसन्न तु होसी आपुल्या भक्तासी । बळे भाग्ये देसी वैराग्याचि ।।३।।
दास म्हणे होसी क्रपावंत धणि । आघटीत करणि चिदंबरा ।।४।।

१२९७१८

चिदंबरा देसी वैराग्याचे सोंग । तैसे आंतरंग करि देवा ।।१।।
आंतरि वैराग्य देई ज्ञानभाग्य । कल्पनांतरंग वुटो नेदी ।।२।।
ज्ञान विज्ञानेसी ज्ञेय आनुभव । त्रीपुटि हे वाव करि देवा ।।३।।
दास म्हणे देई देवा शांतिसुख । दावि तुझे मुख चिदंबरा ।।४।।

१२९७१९

देई चिदंबरा शुध्ध प्रेमभक्ति । वीषई विरक्ति देई देवा ।।१।।
देई शुध्धभाव कल्पना हे वाव । सर्वाभुति देव दावि मज ।।२।।
तुजविण प्रिय नको चराचरि । नीवांत आंतरि ठेवि देवा ।।३।।
दास म्हणे करि क्रपा दिनावरि । चिदंबरा तारि आनाथासि ।।४।।

१२९७२०

वैराग्ये ज्ञानेसि देई प्रेमभाक्ति । दावि सगुण मुर्ति तुझी देवा ।।१।।
निंदा व्देष चिति वुटोनेदि कदा । नाम देई सदा मुखि तुझे ।।२।।
आनंद चितासी देई निरंतर । दुरि आंहकार करि माझा ।।३।।
चिदंबरा दास म्हणवि तुझे दिन । दावि बा चरण वेगि आता ।।४।।

१२९७२१

भाकितो करुणा क्रपेच्या निधाना । पावे मज दिना ऐशावेळे ।।१।।
आनाथाचा नाथ होसि चिदंबरा । येवु दे ईश्वरा करुणा माझी ।।२।।
आपंग आनाथ पडिलोसे ब्दारी । ममता कोण करी तुजवीण ।।३।।
चिदंबरा दास म्हणवी तुझा रंक । दावि बा कौतुक आवताराचे ।।४।।

१२९७२२

आवतार सगुण जालासि कलयुगि । सत्य कळवी जगी चिदंबरा ।।१।।
दिल्हे आभयदान जालासि प्रसन्न । सत्य मानि कोण बोलुजाता ।।२।।
वुघड प्रत्यय दाविसि जगासि । सत्य हे सर्वासि कळे तेव्हा ।।३।।
दास म्हणे वेगि व्हावे बा प्रगट । चिदंबरा भेट देई देवा ।।४।।

१२९७२३

आज्ञेवरुनि देवा काढिले बाहेरि । जाणे श्रीष्टीवरि दुरदेसि ।।१।।
जाणेलागे देवा क्षेत्रोक्षेत्रालागि । किर्ती तुझि जागि वर्णविसि ।।२।।
दावी बा प्रत्यय तुझा चिदंबरा । आवतार ईश्वरा प्रगट करि ।।३।।
दास म्हणे तुम्हा नलगे सांगावे । वत्सापाठि धावे धेनु बळे ।।४।।

१२९७२४

आघटित कळा दावि चिदंबर । ब्राम्हण तो थोर होता येक ।।१।।
शास्त्रज्ञ पंडीत होता तो वित्पन्न । दरिद्रेकरुण पिडिलासे ।।२।।
करितसे भक्ति विषई विरक्ति । आठवितो चिति चिदंबरा ।।३।।
दास म्हणे करि प्रेमळ भजन । चिदंबराविण देव नेणे ।।४।।

१२९७२५

पोटि कन्यापुत्र करणे मुंजलग्न । चिंता तो सोडुन बैसलासे ।।१।।
म्हणे माझी चिंता चिदंबरालागि । आवतार जगि ईश्वर हा ।।२।।
चिदंबर त्यासी दावि चमत्कार । रुप धरि थोर सरदाराचे ।।३।।
दास म्हणे गेला त्यचिया गावासि । वुतरे घरापासि सेजारि तो ।।४।।

१२९७२६

बोलावोनी विप्र जवळि बैसविला । पुसे बा तयाला वर्तमान ।।१।।
बोले तो ब्राम्हण आलेति कोठुन । चिदंबराकडुन आलो म्हणे ।।२।।
जातो वुध्योगासि आम्ही दुरदेसी । सहज तुम्हासि भेटी जाली ।।३।।
दास म्हणे बोले चिदंबर जाण । भ्रम तो घालुन ब्राम्हणासी ।।४।।

१२९७२७

चिदंबरे दिल्हे म्हणे मज स्वप्न । द्रंव्य तुजलागुण देवविले ।।१।।
सहश्र ते होन दिल्हे ब्राम्हणासि । आला तो घरासी घेवोनिया ।।२।।
बोलावुतो गेला तया भोजनासि। नसे त्या ठायासि कोन्ही येक ।।३।।
विप्र म्हणे कळा केलि चिदंबरा । ठकवोनी ईश्वरा गेलासि तु ।।४।।
दास म्हणे ऐसा लिलाधारि जाण । आवतार सगुण चिदंबर ।।५।।

१२९७२९

चरित्र २१६

चिदंबरा स्वामिराजा । हेत पुरविसि माझा ।।१।।
तुजवीण प्रियकर । देव नेणे मि ईतर ।।२।।
आसे पतित आन्याई । स्वामि जडिलो तुझे पाई ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माझी पुरवावि आस ।।४।।

१२९७२९

तुजवीण मि वुदास । जावु शरण कोणास ।।१।।
होसि पतितपावन । आवतार तु सगुण ।।२।।
तुजविण सांगे कोण । माझा जीवलग प्राण ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । यावे दिनाच्या कैवारा ।।४।।

१२९७३०

यावे यावे सर्वगता । चिदंबरा प्राणनाथा ।।१।।
तुजवीण मजकोणि । नाहि ब्रम्हंडभूवनी ।।२।।
होसि आनाथजननि । का हो देसि मोकलोनि ।।३।।
दास येतो लोटांगणि । चिदंबरा ये धावुनि ।।४।।

१२९७३१

धावे पावे वेगी आता । चिदंबरा बा समर्था ।।१।।
नित्य करितो विनंति । दया येउ द्यावि चिति ।।२।।
होसि करुणेचि माता । वेळ लाविसि का आता ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । बटा न लावि ब्रीदास ।।४।।

१२९७३२

करुणा येवुदे दिनाचि । माय होसी आनाथाचि ।।१।।
आशा नको मानवाचि । देई तुझिया चरणाचि ।।२।।
करि पतितवुध्धार । होसि क्रपेचा सागर ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । दावि रुप विश्वंभरा ।।४।।

१२९७३३

दावि दावि रुप सगुण । माझे निववि हे मन ।।१।।
देई देई क्रपादान । चितकरि समाधान ।।२।।
तुजविण वुदासिन । मज न पडे चईन ।।३।।
चिदंबरा दावि चरण । दास म्हणे आलो शरण ।।४।।

१२९७३४

दुरदेसिचा ब्राम्हण । आला दर्षणालागुण ।।१।।
करि विनंति स्वामिसि । दरिद्रे व्यापिले मजसि ।।२।।
आसे आग्नहोत्र घरि । नित्य जावे कोनाव्दारि ।।३।।
दास म्हणे चिदंबर । क्रपा करि दिनावर ।।४।।

१२९७३५

दरिद्रे पिडिले बहुत । विप्र स्वामिसी विनवित ।।१।।
मूले लेकरे ते जाण । न मीळे माध्यान्हीसि आन्न ।।२।।
लंग्न मुंज तेये कैचे । संकट पडिले पोटाचे ।।३।।
दास म्हणे चिदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९७३६

क्रपा आलि ईश्वरासि । बोलाविले ब्राम्हणासि ।।१।।
प्रसन्न जाला चिदंबर । दाळ दिल्ही सेरभर ।।२।।
लंग्न मुंज करुणि घ्यावे । स्वामि बोलति स्वभावे ।।३।।
म्हणे चिदंबर दास । जाले प्रसन्न विप्रास ।।४।।

१२९७३७

विप्रालागि म्हणति स्वामि । तुज दाल दिली आम्ही ।।१।।
न्यावि घरासी बांधोनि । सोडी पुजा ते करोणि ।।२।।
आनंद जाला ब्राम्हणासी । गेला आपुल्या घरासी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । डाळ पुजी देव्हार्यास ।।४।।

१२९७३८

दुसरे दिवसि तो ब्राम्हण । पाहे गाटोडी सोडुन ।।१।।
होन जाले त्या दाळिचे । ऐसे करणे स्वामिचे ।।२।।
दावि आघटित करणि । प्रगट आवतार जनि ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । लिलानाटकि ईश्वरा ।।४।।

१२९७३९

चरित्र २१७

चिदंबरा दावि रुप तुझे सगुण । निववि हे मन मायबापा ।।१।।
येवु दे करुणा मज पतिताची । पावन ब्रिदाची लज्जा रक्षी ।।२।।
न करिता वेळ यावे जगन्नाथा । तुझ्या हाति सता सर्व आसे ।।३।।
दास म्हणे होसी त्रैलोक्याचा धणी । आघटीत करणी तुझी देवा ।।४।।

१२९७४०

यावे बा दयाळा स्वामि घननिळा । दावि रुप डोळा चिदंबरा ।।१।।
यावे दिनानाथा पावे आनाथासि । दया तुज कैसी न ये माझि ।।२।।
यावे सर्वेश्वरा आनंत आपारा । प्रगट चिदंबरा रुप दावि ।।३।।
दास म्हणे यावे वेगि चिदंबरा । दिनाच्या कैवारा प्रगट व्हावे ।।४।।

१२९७४१

चिदंबरराया करि मज दया । जावुनेदि वाया धावा करुणी ।।१।।
यावे करुणापति पावे दिनाप्रति । वर्णवि बा कीर्ती आखंडित ।।२।।
यावे सर्वगता स्वामि क्रपावंता । नीवारि हे चिंता चिदंबरा ।।३।।
पावे दासालागि चिदंबरा वेगी । आवतार जगी कळवि तुझा ।।४।।

१२९७४२

धावे पावे आता जीविच्या जीवना। रुप दावि सगुणा चिदंबरा ।।१।।
होत असे जीव माझा कासाविस । दावि आनाथासि चरण द्रुष्टी ।।२।।
तळमळि जीव येवु द्यावि किव । तुजुविण देव नेणे दुजा ।।३।।
दास म्हणे साक्ष आहेसि आंतरि । यावे बा झडकरि चिदंबरा ।।४।।

१२९७४३

राम आवतारि होवुनि वान्नेर । फिरलो झाडावर वनांतरि ।।१।।
खावुन झाडपाला केलि बा चाकरि । सिळा डोई वरि वाहातसे ।।२।।
ब्राम्हण जालासी कलयुगामाझारि । भिक दारोदारि मागवीसी ।।३।।
दास म्हणे बरे केले चिदंबरा । भेटि विश्वंभरा न देसि का ।।४।।

१२९७४४

पोट भरितसे मागुनिया भिक । देशावरि देख हिंडविसी ।।१।।
तरि चिदंबरा दया नये तुम्हा । भेटी पुरुषोतमा न देसी तु ।।२।।
न मागे तुजसी आणीक मी काही । भेटीवीन नाहि प्रीय मज ।।३।।
दास म्हणे तुझी लज्जा आसे तुज । कोण पुसे मज रंकालागी ।।४।।

१२९७४५

आलि दर्षणासि ब्राम्हणाची कांता । भरतार नवता तिजलागॊनि ।।१।।
आसॆ वृधपण शरिर जालॆ क्षीण । भिक्षा तॆ मागुन पोट भरि ।।२।।
रॊग जालातिसी गॆला पाय यॆक । पाईनॆ तॆ दॆख न चालवॆ ।।३।।
दास म्हणॆ आटवि चिदंबर चरण । घेतसॆ मागुण नवस तॆथॆ ।।४।।

१२९७४६

आटवि चिदंबर सर्वकाळ चिति । म्हणॆ कायगति माझी दॆवा ।।१।।
नसॆ मज कोन्ही न दॆति तॆ पाणि । आन्न त कॊटॊनि मिळॆ दॆवा ।।२।।
चिदंबरा दॆई शक्ति हातपाई । प्राण माझॆ दॆहि आसॆ जवरि ।।३।।
दास म्हणॆ आणिक न मागॆ तॆ काही । बैसलिया ठाई दॆव दॆता ।।४।।

१२९७४७

चिदंबरालागि नवस मागॆ दॆख । म्हणॆ रुपया यॆक वाहीन तुज ।।१।।
करि दॆवराया श्रुध्ध माझी काया । जाईन मागावया गावामाजी ।।२।।
चिदंबर म्हणॆ हॆ काय मागणॆ । द्रष्टांति सांगणॆ नित्य तिसि ।।३।।
दास म्हणॆ ईछा होय दॆवा ऐसी । न यॆतॆ चितासि दॆव दॆता ।।४।।

१२९७४८

दुसरे देवसि जाले शरिर चांगले । आनंदेसी चाले भीक्षेलागी ।।१।।
पोटते भरोणी राहे आनंदेसी । पैसा दुकानासि मागतसे ।।२।।
ऐसे करोनिया केला रुपया येक । आणीतसे देख देवापासी ।।३।।
दास म्हणे आलि चिदंबरापासी । सांगे स्वामिपासी वर्तमान ।।४।।

१२९७४९

करुणी दंडवत वैसलिसे पुढे । पुसति निवाडे चिदंबर ।।१।।
खुर्दा रुपयाचा स्वामिपुढे ठेवी । नवस आपुला घेई चिदंबरा ।।२।।
आनंदे ईश्वर रुपया घेत आसे । फुकातो न पुसे लक्षावधी ।।३।।
दास म्हणे आसे भक्तिचा भुकेला । देव वस्य जाला भाविकासी ।।४।।

१२९७५०

बळे देति कोणि लक्षावधी आनुनी । न पाहे फिरोनि तयाकडे ।।१।।
निस्काम भक्तिचि प्रिति देवाजीसी । दिल्हा ब्राम्हणासी रुपया तो ।।२।।
देवोनि निरोप तया बाईलागी । म्हणती थोर जगि भक्ति तुझी ।।३।।
दास म्हणे आसे क्रपेचा सागर । स्वामि चिदंबर भक्तप्रिय ।।४।।

१२९७५१

चिदंबरा मायबापा । करि दिनावरि क्रपा ।।१।।
वाट पाहाविसि कीति । होसि करुणेचि मुर्ति ।।२।।
दया येउ दे इश्वरा । दावि रुप चिदंबरा ।।३।।
दासाचिया प्राणेश्वरा । प्रगट व्हावे गौरिहारा ।।४।।

१२९७५२

करुणावंत स्वामिराजा । दिन म्हणवितो तुझा ।।१।।
कैसा निष्टुर जालासि । चिदंबरा या वेळेसि ।।२।।
करुणावंत तुचि येक । आनंत ब्रम्हांडात देख ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९७५३

दावि दावि रुप सगुण । तुज आलो मि शरण ।।१।।
तुजविण माझ्या जीवा । चैन न पडे केशवा ।।२।।
वाट पाहातो निसीदीनी । प्राण उरला नयनी ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । दावि रुप आनाथास ।।४।।

१२९७५४

यावे यावे बा दयाळा । चिदंबरा वीश्वपाळा ।।१।।
दावी रुप धननीळा । प्राण वुरलासे डोळा ।।२।।
माझा येवुदे कळवळा । प्रार्थीतो मि वेळोवेळा ।।३।।
होसि दासाचा जीव्हाळा । चिदंबर बा दयाळा ।।४।।

१२९७५५

यावे विश्वाच्या जनका । स्वामी ब्रम्हांडनायेका ।।१।।
कोठवरि वाटपाहु । देवा वेळ नये लावु ।।२।।
सिन जालासे आंतरी । दावि रुप डोळेभरि ।।३।।
दास म्हणे स्वामिराजा । रक्षी लौकीक हा तुझा ।।४।।

१२९७५६

तुजविण चिदंबरा । देव नेणे मि दुसरा ।।१।।
जाणे माझीया आंतरा । स्वामि क्रपेच्या सागरा ।।२।।
तुजविण वुदासीन । मज न पडे चईन ।।३।।
दास म्हणे सर्वगता । चिदंबरा भेटे आता ।।४।।

१२९७५७

करुणावंत माझे आई । चिदंबरे सीवाबाई ।।१।।
तुजविण कोणी नाही । जीवलग लोकी तीही ।।२।।
तुज न मागे मी काहि । येक वेळ भेटी देई ।।३।।
यावे दासाच्या जीवना । चिदंबरा बा चिद्घना ।।४।।

१२९७५८

विप्र तैलंग देसीचा । श्रुध्धभाव आसे त्याचा ।।१।।
चिदंबराविण काहि । दुजा देव नेणे पाही ।।२।।
नित्य करितसे ध्यान । म्हणे घडावे दर्शण ।।३।।
दास म्हणे चिदंबर । आसे भक्त प्रियकर ।।४।।

१२९७५९

विप्र म्हणे चिदंबरा । कीर्ती ऐकिलि ईश्वरा ।।१।।
व्यापक तु चराचरा । साक्ष माझीया आंतरा ।।२।।
आवतार तु कलयुगी । भेटी देई दिनालागी ।।३।।
दास म्हणे तो ब्राम्हण । धावा करि नित्य जाण ।।४।।

१२९७६०

विप्र करुणा भाकीत । धावे पावे देवा म्हणत ।।१।।
देह जाला माझा क्षिण । वृध्ध गरिब मि जाण ।।२।।
आवतार तु कलयुगी । भेटी देई मजलागी ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । आलि करुणा ईश्वरा ।।४।।

१२९७६१

पहिल्या प्रहर रात्रेसी । चिदंबर भेटे त्यासी ।।१।।
वृध्ध होवुनि ब्राम्हण । विप्रापुढे वुभा जाण ।।२।।
त्यासि प्रसाद दे फळ । गुप्त होय त्याची वेळ ।।३।।
आश्चिर्य करितो ब्राम्हण । स्वामि गेले त्वरा करुण ।।४।।
दास म्हणे चिदंबर । निववि विप्राचे आंतर ।।५।।

१२९७६२

चरित्र २१९

चीदंबरा करी दया आनाथासी । दावी रुषीकेसी चरण द्रीष्टी ।।१।।
यावे सर्वेश्वरा दीनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा रुप दावी ।।२।।
यावे वीश्वपती पावे दीनाप्रती । वर्णवी बा कीर्ती आखंडीत ।।३।।
दास म्हणे दावी रुप तुझे सगुण । नीववी हे मन चीदंबरा ।।४।।

यावे क्रपाधना पावे मज दीना । पुरवी वासना माझी देवा ।।१।।
करीतो प्रार्थना क्रपेचा नीधाना । स्वामि ब्रम्हपुर्णा चीदंबरा ।।२।।
नेणे तुजवीण प्रीय मी आणीक । जानसी तु देख आंतरीचे ।।३।।
दास म्हणे होसी माय आनाथाची । लज्या हे ब्रीदाची रक्षीसी तु ।।४।।

१२९७६४

करुणावंत धनि तुची त्रीभुवनी । आगाध करणी तुझी देवा ।।१।।
पतीत मी पापी करीतसे धावा । न येची कणवा कैसा माझा ।।२।।
पतीतपावन तुझी ब्रीदावळी । का हो चंद्रमौळी वेळ केला ।।३।।
दास म्हणे दावी चरण ईश्वरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।४।।

१२९७६५

नये वेळ करु चिदंबरा आता । भेटि भगवंता देई मज ।।१।।
पावे दिनालागी स्वामिराया वेगी । किर्ति तुझी जगी वर्णवी बा ।।२।।
सांभाळि सांभाळी ब्रीद हे आपुले । दावी बा पावुले आनाथासी ।।३।।
दास म्हणे करि क्रपा येक वेळ । नीवारि तळमळ मायबापा ।।४।।

१२९७६६

दावि निजरुप निवारि भवताप । आवतार प्रताप प्रगट करि ।।१।।
करितो मी धावा सर्वकाळ देवा । आनाथ या जीवा रक्षी आता ।।२।।
यावे बा दयाळा स्वामि वीश्वपाळा । वुरला जीव डोळा रुप दावी ।।३।।
दास म्हणे करि दया दीनावरि । यावे बा झडकरि चिदंबरा ।।४।।

१२९७६७

कोठवरी आंत घेसी चिदंबरा । करुणा ईश्वरा येवु दे काही ।।१।।
कठिण जालासी काय म्हणुनि देवा । नायकसी धावा माझा देवा ।।२।।
करुणेचा पति होसी वीश्वंभरा । का हो चिदंबरा निष्टुर तु ।।३।।
दास म्हणे होसी दयाळ दिनासी । दया तुज कैसी न ये माझी ।।४।।

१२९७६८

कवतुक आघटीत दावी चिदंबर । कलयुगी आवतार स्वामि माझा ।।१।।
आविंद तो येक आला दरशणासी । विनंति स्वामिसी करितसे ।।२।।
कुटुंब बहुत आसे माहाराजा । योगक्षेम माझा न चले काही ।।३।।
दास म्हणे बोले चिदंबर त्यासी । चिंता हे मानसी करु नये ।।४।।

१२९७६९

भाविक तो होता याति मुसन्नमान । करितसे ध्यान चिदंबर ।।१।।
चिदंबर ध्यानि चिदंबर मनि । याति हो का कोन्ही प्रीय देवा ।।२।।
चिदंबर त्यासी जालासी प्रसन्न । पतितपावन स्वामि माझा ।।३।।
दास म्हणे आसे क्रपेचा सागर । कलयुगी आवतार चिदंबर ।।४।।

१२९७७०

बोलाविले जाण निरोपालागुण । धालि मुसन्मान दंडवत ।।१।।
पुसती स्वामित्यासी घरिच्या कुटुंबासी । खर्च तो पोटासी कीति लागे ।।२।
पायलिचा खर्चे सांगतसे जाण । दिल्हे ते मोजुन त्याचवेळे ।।३।।
दास म्हणे त्यासी सांगे चिदंबर । खर्च याजवर करि सुखे ।।४।।

१२९७७१

नीघे आनंदासी साष्टांग नमुन । जाले त्या प्रसन्न चिदंबर ।।१।।
स्वामी सांगे त्यासी ठेवि पाटीभरुण । घ्यावे ते मोजुन लागेल तैसे ।।२।।
जावुनीया घरी टेवि तो पाटीत । खर्च नित्य करितो न सरती ।।३।।
दास म्हणे लिला दावी वीश्वंभर । स्वामि चीदंबर कलयुगी ।।४।।

१२९७७२

चरित्र २२०

पतितपावन स्वामि चिदंबर । दावि चमत्कार नित्य नवे ।।१।।
आटरा प्रगट यातीमध्ये केले भक्त । विषई विरक्त सत्वगुणी ।।२।।
पुरवोनी आशा करितो नैराश्य । स्वामी जगदीश चीदंबर ।।३।।
दास म्हणे आसे क्रपेची ही माता । ज्याचे हाती सता त्रैलोक्याची ।।४।।

१२९७७३

चीदंबरा सर्वेश्वरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।१।।
दावि आवतार करणि । ब्रिद रक्षी आता जनी ।।२।।
नित्य करितो विनंती । देवा करवि जयंती ।।३।।
दास शरण तुजप्रती । तुझी वर्णवि बा कीर्ति ।।४।।

१२९७७४

तुम्हा नलगे सांगणे । लागे ब्रिद रक्षणे ।।१।।
तुम्हा करणे आगत्य । जगि आवतार क्रत्य ।।२।।
बळे स्वामि तु सांगसी । पतितासी भक्ति देसी ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । करणे आगत्य तुम्हास ।।४।।

१२९७७५

होसी त्रैलोक्याचा दाता । चिदंबरा बा आनंता ।।१।।
तुझ्या हाति सर्वसता । वेळ लाविसी का आता ।।२।।
वेगि यावे सर्वगता । चिदंबरा प्राणनाथा ।।३।।
यावे दासाच्या कैवारा । स्वामिराया चिदंबरा ।।४।।

१२९७७६

वाट पाहु कोठवरि । देवा झुरतो आंतरि ।।१।।
क्रपाकरि दिनावरि । दावि रुप डोळेभरि ।।२।।
चिंता निवारि ईश्वरा । भेटी देई चिदंबरा ।।३।।
पावे दास दिनालागी । चिदंबरा या कलयुगी ।।४।।

१२९७७७

चैईन न पडे माझ्या जीवा । दावी पावुले केशवा ।।१।।
जीव माझा वुदासीन । चिदंबरा तुजविण ।।२।।
चिंतालागलि मजसी । ठावे तुझीया पायासी ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । दावि रुप चिदंबरा ।।४।।

१२९७७८

करि आवतारक्रति । किर्ती वर्णवी बा क्षिति ।।१।।
दावि प्रत्यय जगासी । लावि आपुल्या भक्तिसी ।।२।।
करि पतित उध्धार । कळवि जनासी आवतार ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१२९७७९

करुणावंत मायबापा । करि आनाथासि क्रपा ।।१।।
तुजविण विश्वपति । देव नेणे त्रीजगति ।।२।।
माझे जाणसी आंतर । नलगे सांगणे विस्तार ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । करणे आगत्य स्वामिस ।।४।।

१२९७८०

ब्राम्हण येक दुरदेसी । पुत्र नवता तयासी ।।१।।
घरि संपदा बहुत । पुत्रालागि तो झुरत ।।२।।
किर्ति ऐकोनिया जाणा । आला स्वामिच्या दर्षणा ।।३।।
म्हणे चिदंबर दास । करि विनंति स्वामिस ।।४।।

१२९७८१

करि साष्टांग नमन । विप्र स्वामिपुढे जाण ।।१।।
स्वामिराया चीदंबरा । दया आनाथासी करा ।।२।।
नाही पुत्र ते संतति । कांता चोविस वर्ष न्हाती ।।३।।
म्हणे चिदंबर दास । आली करुणा स्वामीस ।।४।।

१२९७८२

स्वामि म्हणति तयासी । देतो पुत्र मि तुजसी ।।१।।
घ्यावे देवासी मागुण । करि ब्राम्हणभोजन ।।२।।
तेणे घेतले मागुण । करितो सहश्रभोजन ।।३।।
दास म्हणे चिदंबर । क्रपा करि विप्रावर ।।४।।

१२९७८३

बोलाविले भोजनासी । दिल्हा नीरोप विप्रासी ।।१।।
दिल्हा प्रसाद नारेळ । म्हणति होते पुत्रफळ ।।२।।
आनंद तो ब्राम्हणासी । गेला आपुल्या घरासी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । जाला पुत्र त्या विप्रास ।।४।।

१२९७८४

पुत्र घेवुनिया जाणा । आला स्वामिच्या दर्षणा ।।१।।
तेथे करि संतर्पण । जाला ईश्वर प्रसन्न ।।२।।
नाम ठेवोनि स्वामिपासी । दिल्हा निरोप तयासी ।।३।।
ब्राम्हण आनंदेकरुण । करी चिदंबर भजन ।।४।।
म्हणे चिदंबर दास । पुत्र दिल्हे बहुतास ।।५।।

१२९७८५

चरित्र २२१

चिदंबरा करि दया आनाथासी । पावन तु होसी मायबापा ।।१।।
कळवळा बहुत तुजसी ईश्वरा । प्रगट चिदंबरा दाविसि तु ।।२।।
प्रियकर तुची बाळालागि माता । रुप भगवंता दावी मज ।।३।।
दास म्हणे किती लाविसि तु वेळ । निवारि तळमळ स्वामिराया ।।४।।

१२९७८६

यावे बा दयाळा स्वामि विश्वपाळा । न धरि कांटाळा पतिताचा ।।१।।
पावन तु होसी गर्जे ब्रिदावळी । का हो चंद्रमौळी वेळ केला ।।२।।
यावे वीश्वपती पावे दिनाप्रती । वर्णवी बा कीर्ति आखंडीत ।।३।।
दास म्हणे करि क्रपा आनाथासी । चरण द्रिष्टीसी लावि देवा ।।४।।

१२९७८७

याचे बा श्रीधरा दिनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा प्रगट व्हावे ।।१।।
करितो विनंति स्वामि करुणापति । येवु द्यावि चिति दया माझी ।।२।।
दावि चरणकमळ निवारि तळमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।३।।
दास म्हणे होसी पतितपावन । ब्रीद करि जतन चिदंबरा ।।४।।

१२९७८८

कोठवरी आंत घेसी बा आनंता । नीवारी हे चींता चिदंबरा ।।१।।
क्रपावंत धणि तुचि त्रीभुवनि । आवतार करणि आघटित ।।२।।
क्षणेमाजी करीसी राईचा पर्वत । न कळे तुझा आंत ब्रम्हादीका ।।३।।
पाषाणाचा परिस करुणी दावीसी । दास म्हणे ऐसि कळा तुझी ।।४।।

१२९७८९

तुजविण प्रिय नेणे मि आनंता । आंतरिचे आता जाणसी तु ।।१।।
जन्मोजन्मी तुचि देसि मज भक्ती । याचिवेळे गति कैसि जाली ।।२।।
भक्त म्हणवीसी भेटी का न देसी । कोठवरि घेसी आंत माझा ।।३।।
चिदंबरा जैसा भक्त केला दास । तैसि आनाथास भेटी देई ।।४।।

१२९७९०

भाकितो करुणा क्रपेच्या निधाना । पावे मज दीना ऐशावेळे ।।१।।
न करिता वेळ यावे जगन्नाथा । तुझे हाति सत्ता सर्व आसे ।।२।।
काहो वेळ करिसी चीदंबरराया । जावु नेदी वाया धावा करुणी ।।३।।
दास म्हणे तुम्हा न लगे सांगणे । ब्रिद हे रक्षणे लागे देवा ।।४।।

१२९७९१

ब्राम्हण तो येक तैलंग देसीचा । भावार्थ तयाचा श्रुध्ध जाण ।।१।।
आसे भक्तराज नेमक ब्राम्हण । चिदंबराविण देव नेणे ।।२।।
करि संतर्पण प्रतिवर्षी जाण । साहित्य मागुणि आणितसे ।।३।।
दास म्हणे त्यासी साह्य चिदंबर । किर्ति देशावर चहुकडे ।।४।।

१२९७९२

तया गावामाजी छळकबुधी जाण । होता तो ब्राम्हण येक तेथे ।।१।।
गरीब तो विप्र कार्य त्याचे जाण । बळे व्देष करुण नासो पाहे ।।२।।
प्रयोजन त्याचे होते शंभराचे । आमंत्रण त्याचे दिल्हे आसे ।।३।।
दास म्हणे त्यासी न कळता जाण । व्देषे तो ब्राम्हण कपट करि ।।४।।

१२९७९३

काफ्टयेकरुणी विप्र तो गावात । आमंत्रणे देत सर्वालागी ।।१।।
समयासी विप्र बोलवि सर्वासी । म्हणे भोजनासी यावे वेगी ।।२।।
सेंभर पात्राचे केले होते आन्न । मिळाले ते जाण पाचशते ।।३।।
दास म्हणे विप्र चींता करितसे । चिदंबरा कैसे होइल आता ।।४।।

१२९७९४

संकट विप्रासी पडिले बहुत । फजीति कार्यात केलि देवे ।।१।।
न सांगता सर्व आले ते गाविचे । काफ्टये कोणाचे न कळे देवा ।।२।।
न सांगता त्यासी आमंत्रण दिल्हे । पाहिजे रक्षीले ब्रीद आता ।।३।।
दास म्हणे त्यासी चिदंबर साह्ये । दुर्जन ते काय करि तेथे ।।४।।

१२९७९५

बैसले पंक्तिसी पाचसे ब्राम्हण । स्वंयपाक तो जाण सेंभराचा ।।१।।
वुटिले ब्राम्हण भोजन करुनी । राहिल ते आन्न जैसे तैसे ।।२।।
से दोनसे आणीक होवोनि भोजन । तृप्त जाले जाण विप्रसर्व ।।३।।
चिदंबर कळा दावि हे आपार । नलगे आंतपार दास म्हणे ।।४।।

१२९७९६

चरित्र २२२

चीदंबरा तुजवीण । जीव माझा उदासीन ।।१।।
मज चईन पडेना । हुरु हुरु माझ्या मना ।।२।।
तुज न येची करुणा । स्वामि नीष्टुर नीर्गुणा ।।३।।
दासाचीया जीवप्राणा । चीदंबरा ये सगुणा ।।४।।

१२९७९७

नको नको वेळ करु । बाळ तुझे मी लेकरु ।।१।।
माता होसी तु दयाळा । मारीसी का आपुले बाळा ।।२।।
बाळहात्या घेता सीरी । तुज कोण पुसे तरी ।।३।।
चीदंबरा दास बाळ । वेगी करी बा सांभाळ ।।४।।

१२९७९८

दावी दावी रुप सगुन । देहे जाला माझा क्षीन ।।१।।
वाट पाहातो सर्वकाळ । जीवा लागली तळमळ ।।२।।
कैसा नीष्टुर जालासी । चीदंबरा रुषी केसी ।।३।।
पावे दास आनाथासी । क्रपावंत माय होसी ।।४।।

१२९७९९

तुज ऐसा देव कोन्ही । नसे ब्रम्हांडभुवनी ।।१।।
आनंतब्रम्हांडनीर्मीता । चीदंबरा तुझी सता ।।२।।
वेळ लावीसी का आता । मायबाप क्रपावंता ।।३।।
दासाचीया प्राणनाथा । दावि रुप तु समर्था ।।४।।

१२९८००

करुणावंते माझे आई । चीदंबरे सीवाबाई ।।१।।
तुजवीण प्रीय नाही । स्वामिराया लोकीतीही ।।२।।
माझे जाणसी आंतर । कोठवरी धरु धीर ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । दावी रुप आनाथास ।।४।।

१२९८०१

सत्य करी ब्रीदावळी । दावी रुप वनमाळी ।।१।।
सत्यभक्त करुनी दावी । भक्तीमार्ग जगा लावि ।।२।।
पतीतासी भक्तकरी । कीर्ती तुझी श्रीष्टीवरी ।।३।।
चीदंबरा दास म्हणे । आवतार प्रगट करणे ।।४।।

१२९८०२

दक्षण देशीचा ब्राम्हण । आला दर्षणालागुण ।।१।।
कांता पुत्र बरोबर । सात वर्षाचा कुमार ।।२।।
जन्मताचि वाचा नाहि । संकट वुभयतासी पाहि ।।३।।
म्हणे चिदंबर दास । करिति विनंती स्वामिस ।।४।।

१२९८०३

विप्रकांता त्या पुत्रासी । घेवुन आलि स्वामिपासी ।।१।।
आडवि पडे स्वामिपासी । वाचा मागे त्या बाळासी ।।२।।
स्वामि म्हणती वुटे बाई । चिंता करु नये काहि ।।३।।
दास म्हणे चिदंबर । क्रपा करी बाळावर ।।४।।

१२९८०४

विप्रकांतेलागि जाण । स्वामि बोलति हासुन ।।१।।
औषध सांगतो तुजसी । सार पाजी या बाळासि ।।२।।
होते ब्राम्हणभोजन । न्यावे सार त्वा मागुन ।।३।।
सार पाजी सात दिवस । वाचा येति या बाळास ।।४।।
दास म्हणे चिदंबर । लिलाधारि हा ईश्वर ।।५।।

१२९८०५

विप्रकांता त्या बाळास । सार पाजी सात दिवस ।।१।।
तिसरे दीवसी बाळ काहि । म्हणे मातेलागि आई ।।२।।
साता दिवसी तो कुमार । बोलु लागला प्रखर ।।३।।
दास म्हणे चिदंबर । जाला प्रगट ईश्वर ।।४।।

१२९८०६

आनंद जाला त्या विप्रासी । करी विनंति स्वामिसि ।।१।।
वृतबंध या पुत्राचे । सांगा कोणत्या वर्षाचे ।।२।।
स्वामि सांगति तयासि । मुंज करि नववे वर्षि ।।३।।
दास म्हणे चिदंबर । देती निरोप सत्वर ।।४।।

१२९८०७

चरित्र २२३

चिदंबराराया करी मज दया । जावु नेदि वाया नाम घेता ।।१।।
पतितपावन नाम साजे तुम्हा । काहो पुरुषोतमा वेळ केला ।।२।।
पाहातो मी वाट चातकाचे परि । निववि आंतरि स्वामिराया ।।३।।
दास म्हणे माय दिनालागि । चिदंबरा वेगी प्रगटावे ।।४।।

१२९८०८

न करिता वेळ यावे बा श्रीधरा । दिनाच्या कैवारा स्वामिराया ।।१।।
दावि निजरुप निवारि भवताप । होसि मायबाप आनाथासि ।।२।।
येवु दे करुणा पतितपावना । क्रुंपेच्या निधाना चिदंबरा ।।३।।
दास म्हणे यावे जीविच्या जीवना । आवतार सगुणा पुर्णब्रम्हा ।।४।।
१२९८०९

यावे बा दयाळा स्वामि विश्वपाळा । दावि रुप डोळा चिदंबरा ।।१।।
तुजविण प्रिय नेणे माझ्याजीवा । जाणसी तु देवा आंतरीचे ।।२।।
साक्षरुप होसी आनंत जीवासि । काय माझेविसी झाले देवा ।।३।।
दास म्हणे किती लावीसी तु वेळ । निवारी तळमळ मायबापा ।।४।।
१२९८१०

यावे करुणापति पावे दिनाप्रति । निववावे चिति चिदंबरा ।।१।।
कोठवरी आंत घेसी बा आनंता । वेळ क्रपावंता लावो नये ।।२।।
रक्षि ब्रिदावळि स्वामि चंद्रमौळी । दिनासि सांभाळी ऐशावेळे ।।३।।
दास म्हणे करि सांभाळ दिनाचा । लौकीक ब्रीदाचा रक्षी आता ।।४।।
१२९८११

यावे सर्वगता स्वामि क्रपावंता । निवारी हे चिंता चिदंबरा ।।१।।
करितो प्रार्थना स्वामी ब्रम्हपुर्णा । आवतार सगुणा प्रगट व्हावे ।।२।।
कोठवरी धावा करवीसी देवा । येउ दे कणवा माझा काही ।।३।।
दास म्हणे मायबाप तुची येक । दावी बा कवतुक आवताराचे ।।४।।

१२९८१२

सांभाळी सांभाळी ब्रीद हे आपुले । दावी बा पाउले चीदंबरा ।।१।।
करुणावंत धणी तुची त्रीभुवनी । आवतार करणी प्रगट करी ।।२।।
यावे दीनानाथा पावे आनाथासी । दावी रुषीकेसी रुप तुझे ।।३।।
दास म्हणे करुणा येउ दे दीनाची । माय आनाथाची म्हणवीसी ।।४।।

१२९८१३

यावे बा श्रीधरा दीनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा रुप दावी ।।१।।
न करिता वेळ यावे जगन्नाथा । तुझे हाती सता सर्व आसे ।।२।।
दावी चरणकमळ नीवारी तळमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।३।।
दास म्हणे करी आवतार प्रगट । आनाथासी भेट करीं देवा ।।४।।

१२९८१४

ब्राम्हणतो येक आला दर्षनासी । वीनंति स्वामिसी करीतसे ।।१।।
चीदंबरा मज दरिद्रे पीडीले । कुटुंब राहीले दुरदेसी ।।२।।
आलो पायापासी करीतो प्रार्थना । येउ दे करुणा माझी देवा ।।३।।
दास म्हणे करुणा आली ईश्वरासी । चिदंबर त्यासी बोलतसे ।।४।।

१२९८१५

बोलावीला विप्र नीरोपाच्या वेळे । दिल्ही माहाफळे दोन त्यासी ।।१।।
विप्र म्हणे पुजा करीन तुमची । ईछा हे मनाची पुरवावी ।।२।।
स्वामि म्हणती त्यासी आहे मी तुजपासी । येईल प्रत्ययासी घरी गेल्या ।।३।।
दास म्हणे विप्र आनंदेकरुन । नीरोप घेउन गेला घरी ।।४।।

१२९८१६

विप्रतो घरासी जाताक्षणी जाण । करि सतंर्पण दुसरे दिवसी ।।१।।
चिदंबर त्यासी प्रत्यय दावीत । पुज्या करुजात नारळाची ।।२।।
उकलोनी नारेळ होता दोनभाक । होन लागवेग भरले त्यात ।।३।।
दास म्हणे हर्ष ब्राम्हणासी थोर । म्हणे चिदंबर लीला दावी ।।४।।

१२९८१७

परब्रम्हपुर्ती आवतार सगुण । दरीद्र वीछीन करवीले माझे ।।१।।
परि येक ईछा पुजावा ईश्वर । देतो चीदंबर म्हणतसे ।।२।।
तेची क्षणी जाण दुसर्या नारळ्यात । नीघे आकस्मात ईश्वर तो ।।३।।
स्पटीकाचे लिंग शाळुंकासहीत । नीघे नारेळात तेचीक्षणी ।।४।।
दास म्हणे वीप्र आनंदेकरुन । पुजीतसे जाण चीदंबरा ।।५।।

१२९८१८

चरीत्र २२४

चीदंबरा स्वामीराया । ब्रीद रक्षी बा सखया ।।१।।
मी तो पतीत आवगुणी । वीषय चींतीतसे मनी ।।२।।
सोडवावे मज देवा । चीदंबरा बा केषवा ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । धावे पावे चीदंबरा ।।४।।

१२९८१९

काम क्रोध नागवीती । वीषय लोभ धरी चीती ।।१।।
ऐसा पतित च्यांडाळ । स्वामी करी तु सांभाळ ।।२।।
वीषय काढी चीतीतुन । मन करी बा उन्मन ।।३।।
दासा देई क्रपादान । चीदंबरा आलो शरण ।।४।।

१२९८२०

आसे पतित मी खळ । चीत नसे बा नीर्मळ ।।१।।
पींड पोसुनीया जाणा । वीषय चींतीतसे मना ।।२।।
क्रपा करुनी आवरीसी । मी तो पतीताची रासी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । सोडवीसी तु ईश्वरा ।।४।।

१२९८२१

संग देई सजनासी । माझी वीनंती परीयेसी ।।१।।
दारोदारी का फीरवीसी । तुज दया न ये कैसी ।।२।।
दीन आनाथ परदेसी । हींडवीसी देशोदेसी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । काय जाले सामर्थ्यास ।।४।।

१२९८२२

दीन म्हणवीतो तुझा । चीदंबरा माहाराजा ।।१।।
हेत पुरवी तु माझा । जन्मा आलो कोण्याकाजा ।।२।।
करी जन्माचे सार्थक । चीदंबरा दावी मुख ।।३।।
दासा देई आत्मसुख । दावी आवतार कौतुक ।।४।।

१२९८२३

आवतार तु सगुण । होसी पतीतपावन ।।१।।
तमोगुणी शुद्रालागी । भक्ती लावीसी तु जगी ।।२।।
शुद्र येक दुरदेसी । आला स्वामी दर्षनासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । करी वीनंती स्वामिस ।।४।।

१२९८२४

शुद्र करीतो प्रार्थना । माझी येउ दे करुणा ।।१।।
तारी मज दीनालागी । तुझा आवतार जगी ।।२।।
आसे कुटुंब बहुत । माझे न पीके ते सेत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९८२५

स्वामि म्हणती शुद्रासी । मज कैसा विसरलासी ।।१।।
माझे करावे चींतन । तुज न बाधी ते वीन्घ ।।२।।
सेत करीसी तु जाण । घ्यावी वाटणी मागुन ।।३।।
म्हणे चीदंबर दास । समाधान जाले त्यास ।।४।।

१२९८२६

देती नीरोप तयासी । स्वामी नेती येकांतासी ।।१।।
पैसा दिल्हा त्यासी येक । पुजा करी त्याची देख ।।२।।
गेला आपुल्या घरासी । बहुत आनंद चीतासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपाकरी दीनावर ।।४।।

१२९८२७

चीदंबर नामेकरुन । शुद्र करी नीत्य भजन ।।१।।
पैसा पुजीतो भावेसी । भाग्य आले साहा महीन्यासी ।।२।।
करी ब्राम्हण भोजन । प्रती वर्षा संतर्पण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करीतो पतित उधार ।।४।।

१२९८२८

प्रतिवरुष दरषनासी । येत आसे स्वामिपासी ।।१।।
सांगे यात्रेलागी जाणे । क्रपा केली ते स्वामीने ।।२।।
घरी संतती संपती । मज दावीली प्रचीती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी कौतुक आपार ।।४।।

१२९८२९

पतित आन्याई पडिलो पदरि । येवु दे आंतरी दया माझी ।।१।।
पतितपावन होसि चिदंबरा । कलयुगि आवतारा स्वामीराया ।।२।।
नित्य वुटोनिया करितो प्रार्थना । न ये तुझ्या मना कायकीजे ।।३।।
दास म्हणे मि तो पतिताची रासी । पावन तुम्हासी नामसाजे ।।४।।

१२९८३०

यावे सर्वेश्वरा दिनाच्या कैवारा । प्रगट चिदंबरा व्हावे वेगि ।।१।।
नये वेळ करु जिविच्या जिवना । क्रपेच्या निधाना चिदंबरा ।।२।।
यावे दिनानाथा पावे मज आता । तुझे हाती सता सर्व आसे ।।३।।
दास म्हणे होसी क्रपावंत धणी । आघटीत करणी तुझी देवा ।।४।।

१२९८३१

करितो विनंति स्वामि करुणापति । येउ ध्यावि चिती दया माझी ।।१।।
पतित आधम शरण आलो तुज । आनाथाचे काज करी देवा ।।२।।
दिल्हे आभयदान निवविले मन । जालो नेत्रहीन वाट पाहता ।।३।।
दास म्हणे माझा देह जाला क्षीण । दावि बा चरण चिदंबरा ।।४।।

१२९८३२

चिदंबरराया करी मज दया । जावुनेदि वाया नाम घेता ।।१।।
नाहि मज कोन्हि प्रीय त्रीभुवनी । साक्ष आंतः करणी आहेसी बा ।।२।।
कोठवरी आंत घेसी चिदंबरा । आनंत आपारा स्वामिराया ।।३।।
दास म्हणे दावि सगुण तुझे रुप । आवतार प्रताप प्रगट करी ।।४।।

१२९८३३

करितो मी धावा देवाचीया देवा । आनाथ या जीवा रक्षि आता ।।१।।
यावे करुणाघना पुरवावी वासना । आवतार सगुणा चिदंबरा ।।२।।
दाखवि तु पाय आनाथाचि माय । सांगणे ते काय तुज देवा ।।३।।
दास म्हणे किति देवु परिहार । यावे बा सत्वर क्रपानिधी ।।४।।

१२९८३४

चीदंबरराया पावे दीनालागी । आवतार जगी कळवी तुझा ।।१।।
आनाथाचा नाथ होसी वीश्वपती । वर्णवी बा कीर्ती आखंडीत ।।२।।
न करीता वेळ दावी चरणकमळ । आज्ञान मी बाळ चीदंबरा ।।३।।
दास म्हणे तारी मज आनाथासी । पावन तु होसी चीदंबरा ।।४।।

१२९८३५

यावे पुर्णब्रम्हा स्वामि सर्वोतमा । आगाध महीमा तुझा देवा ।।१।।
यावे सर्वगता स्वामि क्रपावंता । नीवारी हे चींता चीदंबरा ।।२।।
पावे दीनालागी चीदंबरराया । दावी बा सखया पाय तुझे ।।३।।
दास म्हणे होसी माय करुणेची । ईछा हे मनाची पुरवावी ।।४।।

१२९८३६

बाळवेश होते स्वामी चीदंबर । लीला हे आपार दावीतसे ।।१।।
मल्हार दीक्षीत होते तीर्थरुप । दावी तो प्रताप चीदंबर ।।२।।
गांवात ते होती पुजा गजगौरी । वीनंती तो करी देशपांड्या ।।३।।
दीक्षीतासी म्हणत पुजा सांगावया । द्यावा स्वामीराया ब्राम्हण तो ।।४।।
दास म्हणे दीक्षीत चीदंबरालागी । पाटवीती वेगी पुजेसी ते ।।५।।

१२९८३७

पुज्या सांगावया जाती चीदंबर । वय ते उमर सात वरुष ।।१।।
प्राणप्रीतीष्टेची पुज्या ते करुन । आक्षता ते जाण टाकीयेली ।।२।।
नीघती त्वरेकरुन चीदंबर जाण । सजीव होउन हाती फिरे ।।३।।
दास म्हणे हाती मृतीकेचा जाण । सजीव करुन फीरवी स्वामी ।।४।।

१२९८३८

मृतीकेचा हाती सजीव होवुन । फीरतसे जाण माजघरि ।।१।।
फिरतो घरात चहुकडे हाती । आश्चीर्य करिति घरिचे सर्व ।।२।।
सांगावया आले दिक्षीताजवळ । नवल करिति सर्व लाहानथोर ।।३।।
दास म्हणे दिक्षीत हासोनिया चीती । जवळी बोलाविति स्वामिलागी ।।४।।

१२९८३९

काय चिदंबरा दाविसी तु ख्याती । मृतिकेचा हाती सजीव करिसी ।।१।।
गुत्परुपी राहावे बाळपणि आता । आमचे मागे सता प्रगट करि ।।२।।
हातिसि बैसवी आपुल्या स्थळासी । दीक्षीत पिता करि आज्ञा ऐसी ।।३।।
चिदंबर तेथे जावुनिया जाण । हाती स्थीर करुणी बैसविला ।।४।।
दास म्हणे लीला बाळपणि ऐसी । दावी रुषीकेसी चिदंबर ।।५।।

१२९८४०

चरित्र २२६

चीदंबरा तुजवीण । मज सांभाळील कोण ।।१।।
क्रपावंत माय जाण । तुजवीण माझे कोण ।।२।।
मायबाप कुळस्वामीनि । चीदंबरा तुची धणी ।।३।।
दास म्हणे स्वामीराजा । हेत पुरवी तो माझा ।।४।।

१२९८४१

चीदंबरा स्वामीराजा । तिहीलोकि डंका तुझा ।।१।।
होसी पतितपावन । आवतार तु सगुण ।।२।।
कळा आनंत आपार । वर्तवीसि चराचर ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । तीहि देवाच्या ईश्वरा ।।४।।

१२९८४२

होसी क्रपेची तु माता । चिदंबरा जंगन्नाथा ।।१।।
दावि दावि रुप आता । चरणी टेवीन मि माथा ।।२।।
वेगी यावे बा दयाळा । चिदंबरा वीश्वपाळा ।।३।।
दास म्हणे क्रपाघना । माझी पुरवी वासना ।।४।।

१२९४८३

यावे यावे सर्वगता । चीदंबरा प्राणनाथा ।।१।।
वाट पाहावीसी कीती । होसी करुणेची मुर्ती ।।२।।
करुणावंत तुची धणी । मज येक त्रीभुवनी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९८४४

यावे यावे सर्वेश्वरा । दीनबंधु चीदंबरा ।।१।।
नीत्य करीतो मी धावा । पावे देवाचीया देवा ।।२।।
होसी आनाथाची माय । तुझे कोमळ ह्रदय ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९८४५

करुणावंत म्हणवीसी । स्वामि वेळ का लावीसी ।।१।।
तुजवीण मी उदास । माझी पुरवावी आस ।।२।।
वीनवीतो वारंवार । माझे नीववी आंतर ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । दावी चरण चीदंबरा ।।४।।

१२९८४६

शुद्र आला दरशनासी । होता दरीद्री वीदेसी ।।१।।
करी वीनंती स्वामिसी । दीन आनाथ परदेसी ।।२।।
स्वामी आलो पायापासी । आंतर ठावे हे तुम्हासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी दीनावर ।।४।।

१२९८४७

स्वामी म्हणती तयासी । काय ईछा आहे तुजसी ।।१।।
शुद्र बोले तो स्वामीसी । माझे आंतर जाणसी ।।२।।
व्हावे लग्न स्वामीराजा । प्रपंच वाढवी तु माझा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी आभय देती त्यास ।।४।।

१२९८४८

स्वामी म्हणती तयासी । माझी आज्ञा तु आयकसी ।।१।।
तुझे होउनीया लग्न । देतो पुत्र ते संतान ।।२।।
गाडे बैल त्यैसी गाई । तुज होतील ते पाही ।।३।।
दास म्हणे चीदंबर । क्रपा करी तयावर ।।४।।

१२९८४९

आज्ञा सांगीतली त्यासी । जाउन यावे ते यात्रेसी ।।१।।
कुळस्वामी खंडेराव । तेथे ठेउनिया भाव ।।२।।
देवी यात्रा करुनी यावे । मग गावी आपुल्या जावे ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आज्ञा म्हणे तो स्वामीस ।।४।।

१२९८५०

यात्रा करुनी घरासी । शुद्र गेला आनंदेसी ।।१।।
बळे बोलावोनी जाण । कन्या देउन जाले लग्न ।।२।।
जाली संतती संपती । चीदंबर दावी ख्याती ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आला स्वामीचे भेटीस ।।४।।

१२९८५१

चरीत्र २२७

चीदंबरराया करी मज दया । दावी बा सखया रुप तुझे ।।१।।
येवु द्यावी करुणा पतीतपावना । पावे मज दिना ऐशावेळे ।।२।।
यावे बा सत्वर जालो मी आधीर । वाट कोठवर पाहु आता ।।३।।
दास म्हणे कंटी वुरलासे प्राण । दावि बा चरण चिदंबरा ।।४।।

१२९८५२

नको नको नको दुरि धरु देवा । येवु दे कणवा माझा आता ।।१।।
दावि निजरुप स्वामि करुणापति । येवु द्यावि चिती दया माझी ।।२।।
यावे मायबापा चिदंबरा वेगी । आवतार जगि कळवी तुझा ।।३।।
दास म्हणे तारि चिदंबरा वेगी । तुजवीण जगि नेणे दुजे ।।४।।

१२९८५३

कोठवरी आता वाट पाहावीसी । दावी आनाथासी रुप डोळा ।।१।।
ऐकॆ बा विनंति स्वामी करुणापति । दावि सगुण मुर्ति तुझी दॆवा ।।२।।
धावॆ पावॆ आता स्वामि करुणाघना । पुरवी वासना माझी दॆवा ।।३।।
दास म्हणॆ दावी रुप तुझॆ सगुण । निववी हे मन चिदंबरा ।।४।।

१२९८५४

नित्य उठोनिया करितो मि धावा । न यॆसी तु दॆवा स्वप्नी माझ्या ।।१।।
न व्हावॆ निष्टुर करुणॆचॆ राया । दावि बा सखया रुप सगुण ।।२।।
यावॆ दिनानाथा पावॆ आनाथासी । क्रपावंत होसी मायबापा ।।३।।
दास म्हणॆ किति आंत घेसी आझुनि । यावॆ बा धावॊनि चिदंबरा ।।४।।

१२९८५५

तुजविण प्रिय नॆणॆ तिहीलोकी । स्वामि आवलोकी क्रपाद्रिष्टी ।।१।।
चिदंबरा किति दॆवु परीहार । जाणसी आंतर माझॆ दॆवा ।।२।।
आनाथ मि दिन आलॊ तुज शरण । दावि बा चरण चिदंबरा ।।३।।
दास म्हणॆ यावॆ दिनाच्या कैवारा । कलयुगि आवतारा चिदंबरा ।।४।।

१२९८५६

यावे विश्वघना स्वामी तु चिद्घना । आवतार पुर्ण चिदंबरा ।।१।।
यावे सर्वोतमा स्वामि आत्मारामा । आगाध महिमा तुझा देवा ।।२।।
यावे दयानिधि पावे मज आधि । न करि आवधी चिदंबरा ।।३।।
वुतरि भवनदि नीवारि वुपाधि । चुकवी आधिव्याधी जन्ममरण ।।४।।
दास म्हणे होसी त्रैलोक्याचा नाथ । करावे सनाथ चिदंबरा ।।५।।

१२९८५७

गरिब ब्राम्हण कोकनस्त जाण । कुटंब घेवुन आला आसे ।।१।।
आला स्वामिपासी भाविक तो जाण । भक्तराज पुर्ण विप्र होता ।।२।।
साष्टांग नमन करुनि स्वामिसी । विनंति पायासी करितसे ।।३।।
दास म्हणे स्वामि म्हणति तयासी । राहे आम्हापासी च्यार दिवस ।।४।।

१२९८५८

स्वामिचि हे सेवा घडावी मजसी । वीनवि स्वामिसी त्याचीलागी ।।१।।
बोले चिदंबर ब्राम्हणासी जाण । मुहुर्त पाहुन निरोप देतो ।।२।।
काय तुझी ईछा आसेल जे चिति । ईश्वर तुजप्रति पावतसे ।।३।।
हर्ष ब्राम्हणासी आनंद चीतासि । तुष्टला मजसि चिदंबर ।।४।।
दास म्हणे स्वामि क्रपावंत माय । कोमळ ह्रदय बहुतची ।।५।।

१२९८५९

बोलविला विप्र निरोपासी जाण । जाले त्या प्रसन चिदंबर ।।१।।
दिल्हा तो नारेळ ब्राम्हणालागोन । जाला त्याचा बाण वाटे जाता ।।२।।
विप्र चिंता करि दाविला प्रत्यय । देवुळ ते पाहे व्हावे लागे ।।३।।
दास म्हणे त्यासी द्रुष्टांती येवुन । सांगतसे जाण चिदंबर ।।४।।

१२९८६०

द्रुष्टांती येवुनि सांगे ब्राम्हणासी । चिंता का करिसी देवुळाची ।।१।।
च्यारि सहस्त्र रुपये द्रव्य देतो तुज । वुदईक काज करुनि देतो ।।२।।
प्राथःकाळ होता सावकार देख । आला आसे येक विप्राजवळी ।।३।।
दास म्हणे त्यासी द्रष्टांत तो जाला । च्यारी सहश्र याला द्रव्य ध्यावे ।।४।।

१२९८६१

येउनी ब्राम्हण बळे द्रव्य दीले । देवुळ बांधिले तेणे गावी ।।१।।
चिदंबरेश्वर नाम ते ठेवुन । यात्रा भरे जाण तये गावी ।।२।।
ब्राम्हणाचा हेत जाला आसे पुर्ण । आनंदे करुणि सेवा करि ।।३।।
दास म्हणे स्वामि पुर्ण आवतार । लिला चिदंबर करितसे ।।४।।

१२९८६२

करुणा येउ दे ईश्वरा । भेटी देई चीदंबरा ।।१।।
तुजवीण प्राणनाथा। चईन न पडे बा आता ।।२।।
कीती धावा करवीसी । कैसा निष्टुर जालासी ।।३।।
पावे दास पतितासी । चीदंबरा रुषीकेसी ।।४।।

१२९८६३

यावे यावे सर्वेश्वरा । दीन जनाच्या कैवारा ।।१।।
यावे क्रपेच्या सागरा । स्वामिराया चिदंबरा ।।२।।
नीत्य करीतो वीनंती । दया येउ द्यावी चीती ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । दावी रुप आनाथास ।।४।।

१२९८६४

यावे यावे क्रपाघना । चीदंबरा बा सगुणा ।।१।।
नाही नाही मज कोन्ही । तुजवीण त्रीभुवनी ।।२।।
होसी ब्रम्हांडनायेक । चीदंबरा दावी मुख ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । आवतार प्रगट करा ।।४।।

१२९८६५

करुणावंत माय होसी । कैसा नीष्टुर जालासी ।।१।।
होसी पतीतपावन । ब्रीद करी बा जतन ।।२।।
कोठवरी वाट पाहु । स्वामी वेळ नये लाउ ।।३।।
दास म्हणे सर्वगता । चीदंबरा यावे आता ।।४।।

१२९८६६

वाट पाहावीसी कीती । दया न ये तुझे चीती ।।१।।
नीत्य करीतो मी धावा । पावे देवाचीया देवा ।।२।।
तारि आनाथ या जीवा । चीदंबरा सदासीवा ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगटँ व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९८६७

यावे यावे बा दयाळा । चीदंबरा वीश्वपाळा ।।१।।
दावी रुप तुझे डोळा । माझा येउ दे कळवळा ।।२।।
प्रार्थीतो मी वेळोवेळा । होसी भाक्तिचा जीव्हाळा ।।३।।
दास म्हणे क्रपाघना । चीदंबरा ये चीद्घना ।।४।।

१२९८६८

आला तैलंग ब्राम्हण । होता भक्तराज जाण ।।१।।
जाली भेटी ते स्वामीसी । करी वीनंती पायासी ।।२।।
चीदंबरा स्वामीराजा । हेत पुरवी तु माझा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वामी पुसती वीप्रास ।।४।।

१२९८६९

ब्राम्हण म्हणे तो स्वामीसी । दरीद्रे पीडीले मजसी ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । आज्ञा माझी आयकसी ।।२।।
वेगी जावे त्वा घरासी । देतो नीरुप तुजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी वीश्वंभर ।।४।।

१२९८७०

बोलावोनी ब्राम्हणासी । दील्हा नारेळ तयासी ।।१।।
आज्ञा घेउनीया जाण । आला घरासी ब्राम्हण ।।२।।
पुजा करी नारळ्याची । जाली मुर्ती ते वीस्णुची ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे ईश्वर ।।४।।

१२९८७१

नारेळ उकलोनी जाण । मुर्ती नीघे फळातुन ।।१।।
आध्यी नारळ्यात जाण । होन जाले ते भरुन ।।२।।
द्रीष्टी पाहाताची जाणा । हार्ष न माय ब्राम्हणा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । पुरवी ब्राम्हणाची आस ।।४।।

१२९८७२

मिळवीले ते ब्राम्हण । मुर्ती दावी त्यालागुन ।।१।।
म्हणती आवतारपुर्ण । चीदंबर तो सगुण ।।२।।
वेदघोष ते करीती । चीदंबर नामे पुजा होती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । कलयुगी हा ईश्वर ।।४।।

१२९८७३

जाला आनंद वीप्रासी । लोक येती दर्षनासी ।।१।।
कलयुगी आवतार । जाला म्हणती चीदंबर ।।२।।
करी ब्राम्हण भोजन । आनंदेसी वीप्र जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । लीला करीसी वीश्वंभरा ।।४।।

१२९८७४

चरित्र २२९

चिदंबरराया येउ दे माझी करुणा । पावे मज दिना ऐशा वेळे ।।१।।
नको वेळ करु क्रुपेच्या निधाना । जीवलग प्राणा स्वामीराया ।।२।।
पाहातो मि वाट च्यातकाचे परि । घालीतसे फेरि चिदाकासी ।।३।।
दास म्हणे देई येक वेळ भेटी । दया येउ दे पोटी मायबापा ।।४।।

१२९८७५

पतीत मी पापी आसे दुराच्यारी । वुभा तुझ्या व्दारी चिदंबरा ।।१।।
पतीतपावन नामसाजे तुम्हा । दावि पुरुषोतमा चरण द्रुष्टी ।।२।।
जीव तळमळी तुजसाटी देवा । येवु दे कणवा मझा काही ।।३।।
दास म्हणे किती करवीसी धावा । देवाचिया देवा चीदंबरा ।।४।।

१२९८७६

यावे सर्वेश्वरा दीनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा रुपदावी ।।१।।
करुणावंत धणि तुचि त्रीभुवनी । आवतार करणी कळवी जगा ।।२।।
करितो विनंति कोण्या काजासाटी । काय माझे पोटी ठावे तुम्हा ।।३।।
दास म्हणे किती वाट पाहावीसी । वेळ का लावीसी चीदंबरा ।।४।।

१२९८७७

यावॆ सर्वगता स्वामि क्रपावंता । वॆळ भगवंता लावोनयॆ ।।१।।
यावॆ प्राणनाथा चीदंबरा आता । तुझॆ हाती सता सर्व आसॆ ।।२।।
नयॆ वॆळ करु क्रपॆच्या निधाना । पावॆ मज दीना स्वामीराया ।।३।।
दास म्हणॆ होसी माय आनाथासी । दया तुज कैसी न यॆ माझी ।।४।।

१२९८७८

दिनाहुनि दिन रंकाहुनि रंक । मागतसॆ भीक तुमचॆ व्दारी ।।१।।
दॆई मज भीक दावि दॆवा मुख । दॆई आत्मसुख निरंतर ।।२।।
प्रिय मज नाही तुजवीण आणीक । जाणसी तु दॆख आंतरीचॆ ।।३।।
दास म्हणॆ किती लावीसी तु वॆळ । दावी चरणकमळ चिदंबरा ।।४।।

१२९८७९

यावॆ करुणापति पावॆ दिनाप्रती । नीववावॆ चिति चिदंबरा ।।१।।
सांभाळी सांभाळी आपुली ब्रीदावळी । दावी चंद्रमौळी रुप तुझॆ ।।२।।
नको वॆळ करु प्राण वुरला कंटी । आनाथासी भॆटी दॆई दॆवा ।।३।।
दास म्हणॆ करी क्रपा दीनावरी । दावी डोळॆभरी रुप दॆवा ।।४।।

१२९८८०

गरिब ब्राम्हण कावेरि तीरासी । चिदंबरापासी लक्ष त्याचे ।।१।।
कुटुंबवस्थळ होता तो ब्राम्हण । पुत्राचे ते लग्न करणे आसे ।।२।।
आसे द्रव्यहिन चिंता करि फार । आठवी चिदंबर सर्वकाळ ।।३।।
दास म्हणे विप्र चिदंबराविण । दैवत ते जाण दुजे काहि ।।४।।

१२९८८१

विप्र म्हणे मज चिंता कासयासी । साहे तो मजसी चिदंबर ।।१।।
चिंता हे लग्नाची आसे ते स्वामीसी । सांगे सोयर्‍यासी वर्तमान ।।२।।
हासोनी सोयरा बोले तो विप्रासी । कैसे समयासी द्रव्य मिळे ।।३।।
दास म्हणे विप्र सांगतसे जाण । क्रपेचा निधान स्वामी माझा ।।४।।

१२९८८२

विप्र म्हणे वाट पाहीन आठ दिवस । कन्या हे दुसर्‍यास देईन मग ।।१।।
बरे म्हणेनिया ब्राम्हण तो जाण । करितसे ध्यान देवाजीचे ।।२।।
साहा दिवस होता चिंता ब्राम्हणासी । चिदंबरा कैसी वेळ केली ।।३।।
दास म्हणे स्वप्नी चिदंबर आले । होन त्यासी दिल्हे दोनसे ते ।।४।।

१२९८८३

हार्ष ब्राम्हणासी स्वप्नामाजी जाण । घेवुनिया होन पदरि बांधी ।।१।।
स्वप्नी चिदंबर बोलॆ ब्राम्हणासी । लग्न आनंदॆसी करी बापा ।।२।।
सद्गदित विप्र घाली लोटांगण । आश्रुपात जाण वाहाताती ।।३।।
दास म्हणॆ जाला जाग्रत ब्राम्हण । सांगतसॆ स्वप्न कांतॆलागी ।।४।।

१२९८८४

उठोनिया जाता वस्त्र ते झाडीलॆ । गाटोडॆ पाहीलॆ पदरि त्याच्या ।।१।।
पाहाताची होन नवल करि चीती । दिल्हे माझ्या हाति स्वप्नी द्रव्य ।।२।।
जाग्रतीसी सत्य स्वप्न करि सत्य । आवतार क्रत्य आघटीत ।।३।।
दास म्हणॆ ऐसा स्वामी चीदंबर । चुकवी यॆरझार चौर्हासीची ।।४।।

१२९८८५

आनंदॆ करुण करि संतर्पण । सोयरा यॆवुन हातजोडी ।।१।।
धन्य चिदंबर कलयुगी आवतार । भक्त तुम्ही थोर निर्धाराचॆ ।।२।।
करा आंगिकार माझीयॆ कन्यॆचा । बोलीलो मी वाचा क्षमाकरा ।।३।।
दास म्हणॆ लग्न करि आनंदानॆ । पुर्णब्रम्ह म्हणॆ चीदंबर ।।४।।

१२९८८६

चरीत्र २३०

वेगियावे सर्वगता । चिदंबरा बा आनंता ।।१।।
निवारि हे भवचिंता । दावी रुप भगवंता ।।२।।
यावे जिविच्या जिवना । चिदंबरा मनमोहना ।।३।।
दास म्हणे वीश्वंभरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९८८७

तुजवीण माझ्या जीवा । चैन नसे बा केशवा ।।१।।
तुजवीण देशधडी । लागलो मी झाडोझाडी ।।२।।
राहातो आरंन्य डोंगरी । तुज पाहु कोठेतरि ।।३।।
दास उदास आंतरी । चीदंबरा ये झडकरि ।।४।।

१२९८८७

कोठवरी वाट पाहु । स्वामि वेळ नये लावु ।।१।।
हिंडतो मी देशांतरा । दावि रुप चिदंबरा ।।२।।
देशोदेशी तुजसाटी । करीतो मी आटाआटी ।।३।।
दासालागी देई भेटी । चिदंबरा जगजेटी ।।४।।

१२९८८८

कीर्ती तुझी दिगंतरा । स्वामिराया चिदंबरा ।।१।।
दावि प्रत्यय ईश्वरा । हिंडतो मी देशांतरा ।।२।।
ब्रीद करि बा जतन । दावी रुप तुझे सगुण ।।३।।
दास म्हणवि तुझे दिन । चिदंबरा ये धावुन ।।४।।

१२९८८९

जावु तरि कोण्या देसी । स्वामिराया हींडविसी ।।१।।
तुझ्या दर्षणालागुण । चित माझे वुदासीन ।।२।।
हिंडविसी कोठवरी । स्वामी देशदेशांतरि ।।३।।
दासा पुसे तरि कोण । चिदंबरा तुजवीण ।।४।।

१२९८९०

कीती देश हिंडविसी । तुज दया न ये कैसी ।।१।।
काय तुम्हासी कठीण । मज द्यावया दर्षण ।।२।।
का बा जालासी कठीण । होसी पतितपावन ।।३।।
दास तुझे म्हणवि दिन । चीदंबरा तु सगुण ।।४।।

१२९८९१

विप्र येक दुरदेसी । लक्ष चीदंबरापासी ।।१।।
देव नेणे तो आणीक । आसे ब्राम्हण भाविक ।।२।।
म्हणे जाईन दर्षण । पाहिन स्वामिसी सगुण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । प्रिती बहुत तयास ।।४।।

१२९८९२

जाला आवतार सगुण । चिदंबर ब्रम्हपुर्ण ।।१।।
भक्तराज तो ब्राम्हण । म्हणे जाईन लोटांगण ।।२।।
ईछा धरिलिसे तेणे । चिदंबरासी घरी नेणे ।।३।।
दास म्हणे भक्त थोर । इछा धरीलीसे फार ।।४।।

१२९८९३

ब्राम्हण येतो लोटांगणी । आपुल्या गावाचे पासुनि ।।१।।
वाट दिड महिन्याची । आसे घाट डोंगराची ।।२।।
तेथुन येतो लोटांगणी । बरोबरी नसे कोन्ही ।।३।।
दास म्हणे चिदंबर । सांभाळीता ईश्वंभर ।।४।।

१२९८९४

गावगावीचे बिगारि । बळे येति बरोबरी ।।१।।
ब्राम्हण दुधतो पिवोनी । येत आसे लोटांगणी ।।२।।
साही त्या करि चीदंबर । दुत्भी गाय बरोबर ।।३।।
दास म्हणे चिदंबर । आसे रक्षीता ईश्वर ।।४।।

१२९८९५

आला ब्राम्हण तो जाण । गुर्लहुसुरालागुण ।।१।।
होता तयासी दर्षण । चिदंबर तो प्रसन्न ।।२।।
म्हणे मागे वरदान । विप्र म्हणे करि लग्न ।।३।।
बोले हासुनि चिदंबर । म्हणे माग आणीक वर ।।४।।
द्यावी संतती संपती । पुरली कामना हेची ।।५।।
दास म्हणे चीदंबर । सध्या दावी चमत्कार ।।६।।

१२९८९६

लग्न दिल्हे त्याचे करुन । दिल्ही दाळ ते बांधुन ।।१।।
जाले दाळीचे ते होन । आनंद विप्रालागी पुर्ण ।।२।।
चीती कामना धरीली । चिदंबरे पुरवीली ।।३।।
दास म्हणे चिदंबर । लीला दावी हे आपार ।।४।।

१२९८९७

चरीत्र २३१

तुजवीण जीव जाला वुदासीन । फिरतो राणोराण चीदंबरा ।।१।।
आरण्य डोंगरि राहातो ईश्वरा । भेटी चीदंबरा न देसी तु ।।२।।
न पडे चईन जालो वुदासीन । कंटी वुरला प्राण धावा करिता ।।३।।
दास म्हणे वेगी येई बा धावोनी । पाडस मी वनी बाळ तुझे ।।४।।

१२९८९८

बाळ येकुलते फीरतसे वनी । कळवळोनि जननी धावे पाटी ।।१।।
तया परि येई चिदंबरे आई । भेटी मज देई आनाथासी ।।२।।
पडीलेसे वनी पाडस चुकोनी । पाटी ते हारणी धुंडी त्यासी ।।३।।
तयापरि दास म्हणवि तुझे बाळ । माता तु दयाळ चिदंबरा ।।४।।

१२९८९९

पक्षिणीचे पीले आसती झाडावरी । चींता कोण करि त्याची देवा ।।१।।
चाराचुंचीमाजी घेवुनि पक्षीनि । येतसे धावोनी पिलापासी ।।२।।
तयापरि धाव घाली चीदंबरा । येवोनि ईश्वरा भेटी देई ।।३।।
दास म्हणे मि तो रंक तुझे दिन । नाहि तुजविण प्रिय जगी ।।४।।

१२९९००

गाय वछापाटी धावतसे जैसी । वुडी धालि तैसी चीदंबरा ।।१।।
जालो वुदासीन नावडे ते आन्न । व्याकुळ तो प्राण तुजसाटी ।।२।।
चिदंबरे आई प्रीय दुजे नाही । साक्ष तु ह्रदई आहेसी बा ।।३।।
दास म्हणे नको वेळ लावु आता । स्वामि क्रपावंता चीदंबरा ।।४।।

१२९९०१

कासवीच्या बाळासी नसे स्तनपान । पाहता द्रीष्टीभरे पुष्टी त्यासी ।।१।।
तयापरि क्रपाद्रष्टी पाहे मज । ईछिले ते काज करि देवा ।।२।।
क्रौंचपक्षी करी स्मरण बाळाचे । समाधान त्याचे देशांतरि ।।३।।
तयापरि दासा निववि ईश्वरा । भेटी चीदंबरा देई मज ।।४।।

१२९९०२

यावे करुणाघना पतितपावना । पावे मज दीना ऐशावेळे ।।१।।
न करि वुसीर यावे बा सत्वर । वाट कोठवर पाहावीसी ।।२।।
क्रपावंत धणी तुची त्रीभुवनी । आघटीत करणी तुझी देवा ।।३।।
चिदंबरा काय जाले दासावेळे । झाकीयले डोळे आझुनि कैसे ।।४।।

१२९९०३

यावे बा श्रीधरा दिनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा प्रगट व्हावे ।।१।।
करीतो प्रार्थना जीवीच्या जीवना । दावी मनमोहना रुप तुझे ।।२।।
यावे बा दयाळा स्वामी वीश्वपाळा । तुजविण जीव्हाळा कोण माझा ।।३।।
दास म्हणे कीती पाहावीसी वाट । देई मज भेट चिदंबरा ।।४।।

१२९९०४

चीदंबरस्वामी यात्रे सहीत जाण । संच्यारासी आपण जात होते ।।१।।
वाटे जाता तेथे पुडे चोर आले । यात्रेसी आडवीले आरण्यात ।।२।।
स्वामि तयालागी न बोलती काही । दोन च्यार पाही लुटीयले ।।३।।
दास म्हणे तेथे उभा चीदंबर । चोराचा सरदार मागे होता ।।४।।

१२९९०५

कळले वर्तमान आलातो धावोन । पाळेगार जाण सरदार तो ।।१।।
उभाराहे दुर साष्टांग नमोनी । आसे आंतःकरणी भयभीत ।।२।।
स्वामी म्हणती त्यासी जावे मागे फिरुण । कर्म ते भोगणे लागे तुज ।।३।।
दास म्हणे तेणे चोरासी दंडीले । फीरोनीया दिल्हे वास्तभाव ।।४।।

१२९९०६

परी स्वामी त्यासी न बोलता जाण । गेले ते नीघोन दुसरे गावी ।।१।।
चोराचा सरदार होता जयाटाई । त्याचा शत्रु पाही त्यावरी आला ।।२।।
बांधोनीया हाथ लुटुनी घेतले । तत्क्षणी नेले घरोनीया ।।३।।
दास म्हणे त्यासी प्रत्यय चीदंबर । दावी वरचेवर हातोहाती ।।४।।

१२९९०७

शन्मास पडीला बंधीखाणी जाण । चीदंबर चरण आठवीतो ।।१।।
आन्याई मी फार तुझा चीदंबरा । सीक्षा हे ईश्वरा केली मज ।।२।।
सोडवावे वेगी चीदंबरराया । पावन सखया नाम तुझे ।।३।।
पतीतपावन आसे चीदंबर । सोडवी सत्वर तयालागी ।।४।।
दास म्हणे ऐसा क्रपेचा सागर । लावीयेला चोर भक्तीसी तो ।।५।।

१२९९०८

चरित्र २३२

क्रपावंत चीदंबर । दया करी दीनावर ।।१।।
माहा आन्याई तो चोर । करी तयाचा उधार ।।२।।
आसे पावन आवतार । कलयुगी चीदंबर ।।३।।
दास म्हणवी तुझा रंक । दावी तयासी कौतुक ।।४।।

१२९९०९

चीदंबर लीलाधारी । आवतार श्रीष्टीवरी ।।१।।
नानापरी चमत्कार । ज्यासी नसे आंतपार ।।२।।
दावी कळा हे आधटीत । न कळे देवादीका आंत ।।३।।
दास म्हणे वीश्वंभर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९९१०

करुणावंत स्वामीराजा । हेत पुरवी तु माझा ।।१।।
तुजवीण दुजा कोण । माझे करील रक्षण ।।२।।
होसी आनाथाची माय । तुझे कोमळ ह्रदय ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९९११

माझे करुणेची आई । चीदंबरे सीवाबाई ।।१।।
वीनवीतो नानापरी । दया येउ दे आंतरी ।।२।।
तुझे म्हणवीतो दीन । ब्रीद करी बा जतन ।।३।।
होसी क्रपेची तु माता । दासालागी पावे आता ।।४।।

१२९९१२

यावे यावे सर्वेश्वरा । दीनबंधु चीदंबरा ।।१।।
करुणावंत म्हणवीसी । काय जाले माझेवीसी ।।२।।
कीती वाट पाहावीसी । कैसा नीष्टुर जालासी ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१२९९१३

करुणावंत तुची धणी । आनंत ब्रम्हांडभुवनी ।।१।।
वाट पाहातो नीसीदीनी । दया येवु द्यावी मनी ।।२।।
वेगि येइ बा धावोनी । चीदंबरा त्रीशुळपाणी ।।३।।
दास येतो लोटांगणी । दावी रुप तु नयनी ।।४।।

१२९९१४

वेळ करु नये आता । दावी चरण आनंता ।।१।।
तुची येक भवत्राता । आनंत ब्रम्हांडी पाहाता ।।२।।
कोठवरी आंत घेसी । करुणा न ये तुम्हासी ।।३।।
चीदंबर म्हणे दास । दावी रुप आनाथास ।।४।।

१२९९१५

विप्रकांता धावा करी । चीदंबरा ये श्रीहरी ।।१।।
पती गेला देशावरी । कदा न येताची घरी ।।२।।
येउनी स्वामीच्या दर्षणा । नीत्य करी ती प्रार्थना ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बळे घालीती बाहेर ।।४।।

१२९९१६

बाहेर घालीताची जाण । बळे येतसे फीरोन ।।१।।
आली करुणा स्वामीसी । प्रत्यय दावीती तीयेसी ।।२।।
पति तिचा दुरदेसी । आसे तुम्ही करुणा रासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । प्रत्यय दावीती त्यास ।।४।।

१२९९१७

स्वामी जाउनी द्रष्टांती । त्याच्या मित्रासी सांगती ।।१।।
परी तो नायकता जाण । पिडा दावीती दारुण ।।२।।
त्याच्या आथरुणातुनि रात्री । विंची नीघती भारी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । यावे म्हणती सत्वर ।।४।।

१२९९१८

धाक मानुनीया चीती । निघे तो दुर्मती ।।१।।
वाट सोडुनी गावाची । धरी आणीक देशाची ।।२।।
माहाचोर येउनी थोर । आढवे होती वाटेवर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । तेव्हा आला तो घरास ।।४।।

१२९९१९

हर्ष जाला त्या कांतेसी । दांपत्य आली स्वामीपासी ।।१।।
स्वामी स्वमुखेकरुण । सांगताती आभीमान ।।२।।
बहुत प्रयत्ने आणीला । निश्चय बाईचा देखीला ।।३।।
आणी येउनी वैसली । पुत्र मागावया आली ।।४।।
म्हणे चीदंबर दास । पुत्रदान दिल्हे तीस ।।५।।

१२९९२०

चरित्र २३३

चीदंबरा होसी आनंत आपार । कलयुगी आवतार सगुण तुझा ।।१।।
आज्ञा वीश्वंभरा तुझि हे प्रमान । वर्तनुक जाणसीची तु ।।२।।
होसी बुधीदाता सर्व जीवालागी.। तुजवीण जगी न हाले पान ।।३।।
दास म्हणे तुची वर्तवीसी मज । शरण आलो तुज चीदंबरा ।।४।।

१२९९२१

चीदंबरराया करी मज दया । तारीले तु मज या भवपुरी ।।१।।
आनंद चीतासी केला वीस्वंभरा । सगुण चीदंबरा भेटलासी ।।२।।
ठेवीसी तु तैसे मजसी ईश्वरा । तैसा चीदंबरा राहेन मी ।।३।।
दास म्हणे तुज न मागे आणीक । येक वेळ मुख दावी देवा ।।४।।

१२९९२२

चीदंबरराया प्रीय तु सखया । तुजविण वाया वाटतसे ।।१।।
दावीसी तु मुख तेव्हा मज सुख । नाहीतरि दुःख देवा मज ।।२।।
दील्हे आत्मसुख नीवारीले दुःख । पाहीन सगुणमुख ईतुकी ईछा ।।३।।
दास म्हणे माझा देह हा जोवरी । ईछा आंतरी सगुणाची ।।४।।

१२९९२३

नीववीले मन माझे चीदंबरा । सगुण आवतार स्वामीराया ।।१।।
ईछा हे भेटीची लावीली त्वा आशा । ब्रम्हांडाच्या खाशा पुरवीसी ।।२।।
प्रगट आवतार कळवी श्रृष्टीवरी । काढीले बाहेरी याचीलागी ।।३।।
चीदंबरा जैसी प्रगटीले बाहेर । प्रगट शृष्टीवर व्हावे वेगी ।।४।।

१२९९२४

आझोवरुनी देवा नीघालो बाहेर । आंत कोठवर ध्यावा आझुनी ।।१।।
सांडोनीया देश सतत जने । जाले आसे येणे स्वामीराया ।।२।।
आझुनीया दया तुज नये कैसी । कसवटी घेसी कोठवरी ।।३।।
दास म्हणे वहुत लागलीसे आशा । पुरवी जगदीशा चीदंबरा ।।४।।

१२९९२५

चीदंबरराया सांगीतले बहुत । देउनी द्रष्टांत मजलागी ।।१।।
प्रत्ययासी आले चिदंबरा काही । सागींतले ते पाही वेगी दावी ।।२।।
साराचे निजसार राहीले ईश्वरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।३।।
दास म्हणे न लगे सांगणे तुम्हासी । प्रगट तु होसी चीदंबरा ।।४।।

१२९९२६

चीदंबर आसे त्रैलोक्याचा धणी । आघटीत करणी दावीतसे ।।१।।
ब्राम्हण तो आला द्रवीड देसीचा । निश्चय तयाचा देवापाई ।।२।।
पुत्र कन्या बळ पाच सात मुले । दरीद्रे पीडीले ब्राम्हणासी ।।३।।
दास म्हणे चींता करीतसे फार । कधी चीदंबर क्रपाकरील ।।४।।

१२९९२७

चीदंबरावीण प्रीय नसे काही । आवतार महीमा सगुण जाला ।।१।।
ब्राम्हण आवतार जाला चीदंबर । कळवळा तो फार आमुचा त्यासी ।।२।।
आद्यापी का न ये दया स्वामीलागी । आवतार जगी जाला आसे ।।३।।
दास म्हणे वीप्र करी तो प्रार्थना । चीदंबरा करुणा आली त्याची ।।४।।
१२९९२८

जाउनी द्रष्टांती सांगती वीप्रासी । चींता बहुत करीसी प्रपंच्याची ।।१।।
दिल्हे पाच होन द्रष्टांती तयासी । आनंदेसी भजन करुनीया ।।२।।
मुंज लग्न करी नीत्य संतर्पण । आल्यासी ते आन्न देत जावे ।।३।।
दास म्हणे सांगे स्वप्नी चीदंबर । आनंद आपार ब्राम्हणासी ।।४।।
१२९९२९

ब्राम्हण आला ज्याग्रतेसी जाण । आनंदे करुन श्वप्न सांगे ।।१।।
कांतेलागे हर्ष जाला तो आंतरा । क्रपा चीदंबरा आली म्हणे ।।२।।
पाहु जाता परी आसती पाच होन । आश्चीर्य करुण पाहातसे ।।३।।
दास म्हणे सत्य करी तो स्वप्नासी । उधड ज्याग्रतीसी दावीतसे ।।४।।
१२९९३०

करुनीया पुजा खर्च करी जाण । न सरते होन जैसे तैसे ।।१।।
खर्चीतसे च्यार ठेवीतसे येक । पाहु जाता देख पाच आसती ।।२।।
आनंदे करुण करी मुंज लग्न । आलीयासी आन्न देत आसे ।।३।।
दास म्हणे स्वामी ब्रम्हांडनायक । लीला दावी देख चीदंबर ।।४।।

१२९९३१

चरित्र २३४

सुनलो साई तुमरी राह तोभी देख । पुकारु कोनकु तुम बीना ।।१।।
बतोवो तु येक ऐसा नाही कोई । तुम बीना साई कोन बडो ।।२।।
आस मेरी मनकी पुरन करी कोन । प्रभु तुमबीन चीदंबरा ।।३।।
दास दीन तुम्हारो भयो साई रंक । बतलावो मुख येकबार ।।४।।

१२९९३२

चीदंबरा क्रपानीधी । आता न करी आवधी ।।१।।
दुर करी हे वुपाधी । तुझे रुप दावी आधी ।।२।।
वाट पाहातो नीसीदीनी । वेगी येई बा धावोनी ।।३।।
दास येतो लोटांगणी । चीदंबरा त्रीशुळपाणी ।।४।।

१२९९३३

यावे करुणेच्या राया । चिदंबरा प्राणप्रीया ।।१।।
तुजवीण प्रीयकरा । नेणे देव मि दुसरा ।।२।।
माझे जाणसी आंतर । वाट पाहु कोठवर ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९९३४

धावे पावे करुणाघना । स्वामी पतीतपावना ।।१।।
यावे जीवीच्या जीवना । चिदंबरा बा सगुणा ।।२।।
नीत्य करीतो प्रार्थना । माझी येवु दे करुणा ।।३।।
दासाचीया जीवप्राणा । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।४।।

१२९९३५

सांभाळावे दिनालागी । चीदंबरा यावे वेगी ।।१।।
माय होसी आनाथाची । लज्जा रक्षीसी ब्रीदाची ।।२।।
वाट पाहु कोठवरि । दया येउ दे आंतरी ।।३।।
दास म्हणे सर्वगता । तुझे हाती सर्वसता ।।४।।

१२९९३६

वीनवीतो वांरवार । दावी चरण सकुमार ।।१।।
होसी क्रपेचा सागर । माझे नीववी आंतर ।।२।।
क्रपावंत तुची धणी । मज येक त्रीभुवनी ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१२९९३७

सांभाळावे दीनालागी । कळवि आवतार जगी ।।१।।
नित्य करितो वीनंती । दया येवु द्यावी चीती ।।२।।
सांभाळावे मज दिना । स्वामी पतीतपावना ।।३।।
दासाचीया प्राणपती । चिदंबरा ये श्रीपती ।।४।।

१२९९३८

ब्राम्हण आडीला बहुत । पडीला होता आरण्यात ।।१।।
गेली सोबत नीघोन । वाट न कळे ते जाण ।।२।।
विप्र करीतसे धावा । पावे देवाचीया देवा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९९३९

विप्र म्हणे चिदंबरा । करुणा येउदे ईश्वरा ।।१।।
कलयुगी आवतार । सगुण जाला चीदंबर ।।२।।
दावीसी प्रत्यय जगासी । पावे मज आनाथासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । उघड दावी चमत्कार ।।४।।

१२९९४०

जाला वृध्ध तो ब्राम्हण । आला वीप्रापासी जाण ।।१।।
मार्ग दावीतो म्हणोन । गावापासी आणीला जाण ।।२।।
जावे म्हणतसे त्यासी । गुप्त जाला त्या ठायासी ।।३।।
दास म्हणे ब्राम्हणासी । विप्र धुंडी त्या ठायासी ।।४।।

१२९९४१

विप्र म्हणे चीदंबरा । भेटी दिल्ही त्वा ईश्वरा ।।१।।
परि भ्रांती हे घालोन । गुप्त जालासी तु जाण ।।२।।
तुज देखील्या वाचुन । मि तो न सेवी बा आन्न ।।३।।
म्हणे चीदंबर दास । स्वप्नी सांगती वीप्रास ।।४।।

१२९९४२

स्वामी येवुनी द्रष्टांती । विप्रालागी सांगती ।।१।।
भेटी दील्ही तुज जाण । वुध्या घे आता आन्न ।।२।।
आग्रह करु न ये आता । रक्षीलासी प्राण जाता ।।३।।
दास म्हणे चीदंबर । वीप्रालागि करि स्थिर ।।४।।

१२९९४३

चरित्र २३५

पद हींदुस्थानी । बुध्धी करो निस्काम चिदंबर ।।धृ।।
कर्म ना जानो धर्म ना जानो । जानो तेरो येक नाम चीदंबर-- बुधी ।।१।।
तीर्थ ना जानो साई बर्त ना जानो । मनमो बसत हय काम चिदंबर--- बुधी ।।२।।
ग्यान न जानो ध्यान न जाणो । मांगत तुमारो धाम चिदंबर--- बुधी ।।३।।
पतित वुधारण पुरणब्रम्ह । तारे दास राज्याराम चिदंबर---- बुधी ।।४।।

१२९९४४

चीदंबरराया काम क्रोध दोन्ही । छळीती दाटोनी हाटी ऐसे ।।१।।
सोडवी ईश्वरा यापासोनी मज । शरण आलो तुज चीदंबरा ।।२।।
गांजीले वैर्यानी शीरी तु आसोनी । ब्रीद चक्रपाणि राहे कैसे ।।३।।
दास म्हणे जैसा केला आंगिकार । निववि आंतर तैसे देवा ।।४।।

१२९९४५

विषय न सुटे बहुत आनिवार । धावे वांरवार मन तेथे ।।१।।
सोडवी सोडवी करुणेच्याराया । जावु नेदि वाया चीदंबरा ।।२।।
येवु दे करुणा आनाथाच्या नाथा । तुझे हाती सता सर्व आसे ।।३।।
दास म्हणे होसी पतीतपावन । दावी बा चरण चीदंबरा ।।४।।

१२९९४६

सोडवी सोडवी देहआंहकार । चित करि स्थीर चीदंबर ।।१।।
न सोसवे दुःख विषयाची जाचणी । आणिता मनी नाटोपती ।।२।।
क्रपेवीन तुझ्या चित नव्हे स्थिर । निश्चीत नीर्धारी कळो आले ।।३।।
दास म्हणे क्रपा करी चीदंबरा । तेव्हाची आंतरा सुख होय ।।४।।

१२९९४७

कल्पना चीताची चींतन विषय । दावीसी तु पाय कैसे देवा ।।१।।
कोण्यारिती तरि नाव ठेवु तुम्हा । साक्ष पुरुषोतमा माझी मज ।।२।।
परि नाम तुझे पतितपावन । बोलावया जाण आधार हा ।।३।।
चिदंबरा दास पतित हा खरा । पावन जतन करा ब्रिद तुम्ही ।।४।।

१२९९४८

नसे मज काहि आधार दुसरा । स्वामि चीदंबरा तुजवीण ।।१।।
नेणे जपतप नेणे आनुष्टान । आसे क्रियाहिन मतिमंद ।।२।।
जाणतसे देवा तुझे येक नाम । न सुटेची कामक्रोध देवा ।।३।।
दास दिन रंक तुझा चीदंबरा । पावन ईश्वरा व्हावे वेगी ।।४।।

१२९९४९

कोणे देशी ब्राम्हण होता जाण । देषपांडेपण होते त्यासी ।।१।।
ऐकोनि आवतार जाला चिदंबर । करितो विच्यार दर्षणाचा ।।२।।
येकुलता येक पुत्र आसे त्यासी । निरोप पुत्रासी मागतसे ।।३।।
दास म्हणे पडे संकट तयासी । पीता दुरदेसी जातो म्हणोनी ।।४।।

१२९९५०

म्हणे पीत्यालागी पुत्र त्या वेळेसी । गावात तुम्हासी शत्रु आसती ।।१।।
जाणे दुरदेसी कैसा हा वीच्यार । रक्षील चीदंबर म्हणे पीता ।।२।।
निघे तो त्वरेसी आला स्वामीपासी । आनंद चीतासी हर्ष थोर ।।३।।
दास म्हणे क्रुपा करीतो चिदंबर । येक महीनाभर ठेवियले ।।४।।

१२९९५१

निरोप स्वामीसी मागे तो ब्राम्हण । घरची आठवन करोनीया ।।१।।
मागे पुत्रालागि चौघे ते मीळोन । हाकिमासी जाण सांगितले ।।२।।
दोन सहस्त्र रुपये ध्यावी गुणेगारा । बसवीली व्दारी चौकी त्याच्या ।।३।।
दास म्हणे पुत्र म्हणे चीदंबरा । कैसे तु ईश्वरा संकट दील्हे ।।४।।
१२९९५२

ब्राम्हण स्वामीपासी नीरोप मागता । स्वामी म्हणती आता स्छिर राहे ।१।।
जावोनीया येतो राहे आठ दीवस । खुण बा तयास सांगीतली ।।२।।
धरोनि स्वरुप वृध ब्राम्हणाचे । प्रगट गावि त्याचे गेले तेथे ।।३।।
दास म्हणे जावुनी सांगती हकिमासी । चीदंबर कैसी करील गती ।।४।।
१२९९५३

सांगोनी तयासी गुप्त तेथे होत । जाला भयभित हाकीम तो ।।१।।
सांगती ईश्वर आन्याय नसता । छळना करिता प्रत्यय हा ।।२।।
वुटविली चौकीतेची वेळी जाण । आश्चर्य करोनी राहाती सर्व ।।३।।
त्यावरी निरोप दिल्हा ब्राम्हणासी । आला तो घरासी दास म्हणे ।।४।।
१२९९५४

धरि येता जाण कळले वर्तमान । बोलीले ते खुण आठवलि ।।१।।
धन्य चिदंबरा सांगीतले तेथे । तेचि दिवसी येथे प्रगट जाला ।।२।।
आवतार लिला आघटीत जाण । होसी ब्रम्हपुर्ण चीदंबरा ।।३।।
दास म्हणे ऐसे प्रत्यय बहुत । दावीतसे नित्य चीदंबर ।।४।।

१२९९५५

चरित्र २३६
।। हिंदुस्थानी आभंग ।।

शुध करो मेरो मन चिदंबर । देही नीछावर तुमरे वुपर ।।१।।
कामना ये मेरि दुर कीजे साई । प्रेम मेरि देही भक्ती दिजे ।।२।।
दुरकरो साई कामक्रोध देही । तुमबीन नाही दुजो कोई ।।३।।
शरण आयो तुमकु दास मये पतित । पकरो मेरो हात चिदंबर ।।४।।

१२९९५६

पद हिंदु श्रुध करो आंथःकरन चिदंबर ।।धृ।।
पेहरत कौपिन चितत कमिन । वीषये करत हय ध्यान चिदंबर ।।१।।
बबुत लगावत जठा बठावत । आंग चढे आभिमान चिदंबर ।।२।।
पेहनत माला मुद्रा लगावे । नाहि मालुम कुच ग्यान चिदंबर ।।३।।
दास पतितकु तुम हो तारक । मुरख मय आग्यान चिदंबर ।।४।।

१२९९५७

चिदंबरा स्वामीराजा । श्रुधभाव करिमाझा ।।१।।
तुजवीण दुजे काही । दिसोनेदि लोकीतीही ।।२।।
करि क्रपा आनाथासी । दिनरंक मि परदेसी ।।३।।
मायबाप तु दासासी । चिदंबरा रुषीकेसी ।।४।।

१२९९५८

चौकी माझा कासावीसी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
किती वाट पाहावीसी । तुज दया न ये कैसी ।।२।।
दावि रुप रुषिकेसि । क्रपावंत माय होसी ।।३।।
पावे दास पतितासी । चिदंबरा या वेळेसी ।।४।।

१२९९५९

नये वेळ करु आता । चिदंबरा प्राणनाथा ।।१।।
तुझे हाती सर्वसता । रुप दावी मज आता ।।२।।
वेळ न करि सर्वथा । चिदंबरा बा समर्था ।।३।।
दास म्हणे स्वामीराया । करि आनाथासी दया ।।४।।

१२९९६०

जीवलग मज कोन्ही । नसे ब्रम्हांडभुवनी ।।१।।
तुची माझा प्रीयकर । आनंत ब्रम्हांडाभीतर ।।२।।
वेगि दावी बा चरण । चीदंबरा आलो शरण ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे चिदंबरा ।।४।।

१२९९६१

माझा बोबड्या बोलासी । चीत ध्यावे रुषीकेशी ।।१।।
बाळ तुझे मि आज्ञान । तुजवीण वुदासीन ।।२।।
देशोदेसी हिंडे जाण । मज न पडे चईन ।।३।।
दासा नावडे ते काही । चिदँबरा भेटी देई ।।४।।

१२९९६२

धावे पावे करुणाघना । स्वामी जीवीच्या जीवना ।।१।।
माझी पुरवी वासना । चीदंबरा ब्रम्हपुर्णा ।।२।।
विनवीतो वारंवार । दावी चरण सकुमार ।।३।।
दास विनवीतो कींकर । चिदंबरा ये सत्वर ।।४।।

१२९९६३

महेश्वरचा वाणी जाणा । आला स्वामीच्या दर्षणा ।।१।।
बापलेक दोघेजन । नव्हते पुत्राचे ते लग्न ।।२।।
आसे गरिबि पदरि । दरिद्रे पिडिलेसे भारी ।।३।।
म्हणे चिदंबर दास । करिति विनंती स्वामीस ।।४।।

१२९९६४

स्वामी पुढे येवुनी जाण । वुभयता लोटांगण ।।१।।
वुभे कर ते जोडुनि । करीती स्वामिसी वीनवनी ।।२।।
लग्न व्हावे या पुत्राचे । जावे दरिद्र आमुचे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।।

१२९९६५

स्वामी म्हणती तयासी । देतो नीरोप तुम्हासी ।।१।।
वेगी जावुनिया गावी । दुकानदारी करा नवी ।।२।।
ईश्वर होवुनी प्रसन्न । रुपय दिल्हे त्यासी दोन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । देती नीरोप सत्वर ।।४।।

१२९९६६

सीधा देवुनीया जाण । म्हणती जाताक्षणी होते लग्न ।।१।।
लग्न करुणी वेगीसी । यावे म्हणती दर्षनासी ।।२।।
गेले आनंदे घरासी । लग्न जाले त्याच वर्षी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । सावकारि आली त्यास ।।४।।

१२९९६७

थोर जाले दुकान । वाणी सांगे वर्तमान ।।१।।
क्रपा केली तु चीदंबरा । प्रत्यय दावीला ईश्वरा ।।२।।
भांडवल दोन रुपये । दील्हे मज स्वामीराये ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लिला दावि तो ईश्वर ।।४।।

१२९९६८

चरित्र २३७

पद हिंदुस्तानी
चरण बतलावो साई । तुमरे बीना चयन नाहि ।।१।।
काहा तोडी देखु राहा । तुमकु धुंडु तो बी काहा ।।२।।
जीव मेरो उदासीन । आखीया तैजहीन ।।३।।
दास कहे चिदंबर । करो पतित वुधार ।।४।।

१२९९६९

येवुदे करुणा क्रपेच्या नीधाना । आवतारपुर्णा चीदंबरा ।।१।।
क्रपेचि तु माता होसी दीनालागी । आवतार जगि कळवि तुझा ।।२।।
दावी सगुण रुप होसि मायबाप । प्रताप प्रगट करि आता ।।३।।
दास म्हणे देई आनाथासी भेटी । दया येवुदे पोटी चीदंबरा ।।४।।

१२९९७०

आनाथाची माय दावी आता पाय । कोमळ हृदय तुझे देवा ।।१।।
पावे दीनबंधु विश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका चिदंबरा ।।२।।
भाकीतो तुज रक्षी माझी लाज । आनाथाचे काज करि देवा ।।३।।
दास म्हणे रक्षी ब्रीद हे आपुले । दावि बा पावुले चीदंबरा ।।४।।

१२९९७१

सांभाळी सांभाळी आपुली ब्रीदावळी । दावी चंद्रमौळि रुप तुझे ।।१।।
येवु दे करुणा पतितपावना । क्रपेच्या नीधाना स्वामीराया ।।२।।
तुजवीण मज कोन्ही तीहीलोकी । स्वामि आवलोकी क्रपाद्रष्टी ।।३।।
दास म्हणे दावी चरणकमळ । निवारि तळमळ माझी देवा ।।४।।

१२९९७२

याचे देवराया करि मज दया । दावी बा सखया सगुण रुप ॥१॥
निवारी संकट देई मज भेट । आवतार प्रगट करि तुझा ॥२॥
कोठवरि आंत घेसी बा आनंता । नीवारि हे चिंता चिदंबरा ॥३॥
दास म्हणे करि क्रपा आनाथासी । पावन तु करि मायबापा ॥४॥

१२९९७३

याचे दीनानाथा पाचे आनाथासी । बटा हा ब्रीदासी लागो नेदि ॥१॥
याचे सर्वेश्वरा दिनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा स्वामीराया ॥२॥
दावि निजरुप निवारि भवताप । सांडी आता कोप मायबापा ॥३॥
दास म्हणे आंत ध्यावा तरि किती । स्वामी क्रपामुर्ती चीदंबरा ॥४॥

१२९९७४

केली त्वा चरित्र श्रृष्टीवरि बहुत । करणी आधटीत तुझी देवा ॥१॥
माझेवीसी काय जाले तरि तुम्हा । आंत पुरषोतमा किती घेसी ॥२॥
विनवीतो तुम्हा नानापरि देवा । न येचि कणवा कैसा माझा ॥३॥
दास म्हणे दावि प्रत्यय ईश्वरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ॥४॥

१२९९७५

आनाथ गरीब होती शुद्रकांता । ऐकीती वार्ता बहुत तेंने ।।१।।
कलयुगी आवतार जाला चीदंबर । पावे तो सत्वर नवस करिता ।।२।।
शुद्रकांता करिति नवस देवासी । पुत्र स्वामिपासी मागतसे ।।३।।
दास म्हणे मागे पुत्र जाला जरि । वाहीन पायावरि तुझे देवा ।।४।।
१२९९७६

वर्ष येक पुत्र चिदंबरे दिल्हा । प्रत्यय दावीला तात्काळची ।।१।।
हर्षजाला बहुत श्रुद्रकांतेलागी । आवतार जगि म्हणे सत्य ।।२।।
दिवसे दिवस पुत्र जाला आसे थोर । वर्ष जाले च्यार तयासी बा ।।३।।
दास म्हणे चिंता करि त्याची माता । घ्यावा लागे आता पुत्र हाची ।।४।।
१२९९७७

द्रष्टांती येवुन सांगे चिदंबर । घ्यावा तो कुमर आमचा आम्हा ।।१।।
जाग्रत होवुनी करिते प्रार्थना । येति मि दर्षना स्वामी तुझ्या ।।२।।
करुनी तयारि निघे ते त्वरेसी । आली स्वामिपासी घेवुनि पुत्र ।।३।।
दास म्हणे स्वामी साक्ष तु आंतरी । चिदंबर करि लीला तेथे ।।४।।
१२९९७८

बोलॆ चिदंबर शुद्राचॆ कांतॆसी । करुणा तुजसी जाली आसॆ ।।१।।
दुसरा पुत्र होईल तुजलागी जाण । तॆव्हा मि घेईन याजलागि ।।२।।
होईल त्याचॆ लग्न तॆव्हा घेईन यासी । जावॆ आनंदॆसी घरी आता ।।३।।
दास म्हणॆ दिल्हा निरोप तियॆसी । चिदंबर ऐसी लिला दावी ।।४।।

१२९९७९

चरित्र २३८

।। आभंग दिडकी चाल हिन्दु ।।

चित्त मॆरो वुदासीन । स्वामि बतावो चरण ।।१।।
राहा दॆखत तुमारि । बैट रहवो निराहारि ।।२।।
सगुण आवतार तुमारो । कॆतो रह्यो भोग मॆरॊ ।।३।।
दासवारि चरणोपर । मिल ज्याव चिदंबर ।।४।।

१२९९८०

सुर्यकन्या तु नर्मदा । पाहाता चुकॆ भवबाधा ।।१।।
रॆवा नाम साजतसॆ । पश्चमॆसी वाहतसॆ ।।२।।
श्नानॆ वुधरिसी जगा । जाति पातकॆ भवभंगा ।।३।।
चिदंबर दास म्हणॆ । तपालागी हॆचि स्थाणॆ ।।४।।

१२९९८१

तप करि तो शंकर । रेवातिरि निरंतर ।।१।।
ऐसा दिल्हा आसे वर । कंकर तितुके शंकर ।।२।।
देशोदेसी पुजास्थान । नेति नर्मदेचा बाण ।।३।।
दास म्हणे चिदंबर । लिलाधारी तो शंकर ।।४।।

१२९९८२

रेवातिरि तप करणे । ऐसे बोलति पुराणे ।।१।।
चिदंबर सिश्य कोनी । तप करि आझेवरुणि ।।२।।
रेवातिर थोर क्षेत्र । तपे करिती पवित्र ।।३।।
म्हणे चिदंबर दास । दंडवत नर्मदेस ।।४।।

१२९९८३

चीदंबरा करुणाघना । दावी रुप तु सगुणा ।।१।।
यावे जीवीच्या जीवना । चिदंबरा ब्रम्हपुर्णा ।।२।।
वाट पाहु कोठवरि । दया येवु दे आंतरी ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१२९९८४

यावे स्वामि सर्वगता । चिदंबरा प्राणनाथा ।।१।।
तुझे हाती सर्वसता । वेळ नकरि सर्वथा ।।२।।
तुजवीण प्राणेश्वरा । न पडे चईन ईश्वरा ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । आनाथासी दया करा ।।४।।

१२९९८५

ब्राम्हण तैलंग देसीचा । वेध लागला स्वामिचा ।।१।।
म्हणे आवातार पुर्ण । चिदंबरा तु सगुण ।।२।।
देई आनाथासी भेटी । आशा धरीलीसे पोटी ।।३।।
दास म्हणे तो ब्राम्हण । होता भक्तराज पुर्ण ।।४।।

१२९९८६

नित्य करितसे धावा । दावि चरण सदासीवा ।।१।।
रुप दाविसी सगुण । तेव्हा घेईन मि आन्न ।।२।।
निश्चय पाहुनि विप्राचा । देव आसे भाविकाचा ।।३।।
दास म्हणे चीदंबर । आसे क्रपेचा सागर ।।४।।

१२९९८७

विप्र करि तो नीर्षण । स्वामि देईल दर्षण ।।१।।
आसे निर्धार विप्रासी । स्वामि भेटेल मजसी ।।२।।
भक्तराज तो भावीक । स्वामी भेटी देतो देख ।।३।।
म्हणे चिदंबर दास । दावी प्रत्यय तयास ।।४।।

१२९९८८

रात्री जावुनीया देख । स्वामि प्रगटे प्रत्यक्ष ।।१।।
जाग्रत करुनी तयासी । भेटी दील्ही त्या विप्रासी ।।२।।
केले बहुत समाधान । दिल्हे शंभर ते होन ।।३।।
दास म्हणे चिदंबर । दावि नाना चमत्कार ।।४।।

१२९९८९

प्रातःकाळी तो ब्राम्हण । सांगे सर्व वर्तमान ।।१।।
मिळे ब्राम्हण मंडळि । कितेक करिती राडोळी ।।२।।
म्हणे भेटी कैसी दिल्ही । खुण पाहीजे दाविली ।।३।।
म्हणे चिदंबर दास । वीप्र पुसती तयास ।।४।।

१२९९९०

विप्र म्हणे ब्राम्हणासी । खुण दावीतो तुम्हासी ।।१।।
मि तो वुत्पन्न भजेनी । दिल्हे द्रव्य ते स्वामीनी ।।२।।
दावी ब्राम्हणासी होन । विप्र करिति नमन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीलाधारि हा ईश्वर ।।४।।

१२९९९१

चरित्र २३१

पद हिंदुस्थानी......स्थीर करो मेरो मन चिदंबर ।।धृ।।
आग्या दिनी आयो परदेस । केतेक रहे तो भि दिन ।।१।।
थके हात पाव नहि सुख देही । काया हो रही छीन चिदंबर ।।२।।
चित वुदासीन नहि मुज चयन । मन करो वुन्मन चिदंबर ।।३।।
राहा देखु काहालो प्रभु दीजे धीर । साई दिखलाव चरण ।।४।।
दास कहे मुज आस मीलनकि । लाग रहे नयन चिदंबर ।।५।।

१२९९९२

चिदंबरराया यावे वेगी आता । वेळ प्राणनाथा लाउ नये ।।१।।
आइोवरुणि स्वामि आलो दुरदेसी । कीती वेळ करीसी चीदंबरा ।।२।।
पाहातसे वाट च्यातकाचे परि । निववी आंतरि चिदंबरा ।।३।।
दास म्हणे यावे दीनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा चीदंबरा ।।४।।

१२९९९३

याचे करुणाघना पतितपावना । पुरवि वासना माझी देवा ।।१।।
न पडे चईन जालो वुदासीन । दावी बा चरण चीदंबरा ।।२।।
करीतो प्रार्थना पावे मज दिना । क्रपेच्या नीधाना स्वामीराया ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माय । चीदंबरा पाय दावी आता ।।४।।
१२९९९४

याचे सर्वगता स्वामि क्रपावंता । निवारि हे चिंता चीदंबरा ।।१।।
कोठवरी आंत घेसी देवराया । आनाथासि दया करी आता ।।२।।
सांभाळी सांभाळी ब्रीद वनमाळी । दावी चंद्रमौळी रुप तुझे ।।३।।
दास म्हणे होसी त्रयमोत्री आवतार । लीला हे आपार तुझी देवा ।।४।।
१२९९९५

नित्य वुठोनीया करितो मि धावा । देवाचीया देवा पावे आता ।।१।।
याचे दिनानाथा पावे आनाथासी । वेळ का लावीसी मायबापा ।।२।।
निवारी तळमळ दावी चरणकमळ । म्हणवीतो बाळ तुझे देवा ।।३।।
दास म्हणे करि आनाथासीं दया । दावी बा सखया चरण द्रीष्टी ।।४।।
१२९९९६

यावे विश्वंभरा दिनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा रुप दावी ।।१।।
करितो विनंती यावे करुणापति । वर्णबि बा कीर्ती आखंडीत ।।२।।
सांभाळी दिनासी पतितपावना । येवुदे करुणा माझि देवा ।।३।।
दास म्हणे करि दया दिनावरि । दावी डोळेभरि रुप तुझे ।।४।।

१२९९९७

विप्र दुरदेसी आला दर्षणासी । विनंती स्वामीसी करितसे ।।१।।
दरिद्रे पीडीले मजसी ईश्वरा । आनाथासि दया करा काही ।।२।।
कुटुंबवछळ आसे चिदंबरा । तुजवीण आसरा दुजानाहि ।।३।।
जाणसी आंतर वीश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका दास म्हणे ।।४।।

१२९९९८

चिदंबर त्यासी बोले क्रपा करुण । भक्तराज पुर्ण म्हणवीता ।।१।।
प्रपंच्याची चींता करणे कासयासी । ईश्वर सर्वासि आन्नदाता ।।२।।
भक्तराज तुम्ही थोर ते आसोनी । व्यर्थ चिंता मनि वाहावी का ।।३।।
दास म्हणे बोले स्वामी पुरुषोतम । वाहातो योगक्षेम चीदंबर ।।४।।

१२९९९९

बोलाविला विप्र निरोपासी जाण । दिल्हे सेर दोन जोंधळे ते ।।१।।
बांधोनीया गाटी न सोडी वाटेसी । स्वामी म्हणती त्यासी न्यावे घरि ।।२।।
योगक्षेम सुखे करावा आपुला । ईश्वर तुजला पावलासे ।।३।।
दास म्हणे विप्र निघे आनंदेसी । गेला तो घरासि त्वरा करुनी ।।४।।

१३००००

घरी जावुनिया गाठोडी सोडीली । जोंधळ्याचे जाले मोती सर्व ।।१।।
आनंद विप्रासी जाला आसे फार । धन्य चिदंबर म्हणतसे ।।२।।
कलयुगी आवतार आसे ब्रम्हपुर्ण । आघटीत जाण लीला दावी ।।३।।
दास म्हणे विप्र सद्‌गद होवुनी । आला तो फिरोनि स्वामीपासि ।।४।।

१३०००१

सद्‌गद होवुन घालि लोटांगण । नयनि वाही जाण प्रेमजळ ।।१।।
सांगे वर्तमान सर्वही स्वामीसी । स्वामी म्हणती त्यासी गुप्त राहे ।।२।।
भक्तराज थोर आहेसी तु जाण । ईश्वर प्रसन्न जाला तुज ।।३।।
दास म्हणे त्यासी निरोप सत्वर । देती चीदंबर तेची दिवसी ।।४।।

१३०००२

चरित्र २४०

।। आभंग हीन्दुस्तानी ।।

प्रभुजी काहा तुमरो मनमो । नाम धरते दुनीयामो ।।१।।
लोक कहे ते पेट भरने । बाहेर नीकले देश फीरने ।।२।।
कैसी नावे तुमकु लाज । बाहेर काढे कवने काज ।।३।।
दास कहे चीदंबर । साच करो आवतार ।।४।।

१३०००३

दया न येची ईश्वरा । स्वामीराया चीदंबरा ।।१।।
बळे बाहेर काडीता । काहो ब्रीद गमावीता ।।२।।
हींडवीता गावोगाव । लोक ठेवीताती नाव ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । ब्रीद जतन ते करा ।।४।।

१३०००४

हिंडवीता देशोदेसी । चीदंबरा रुषीकेसी ।।१।।
कीर्ती आपुली वर्णवीता । आपकीर्ती का करवीता ।।२।।
गावोगावे नींदीताती । पोटभरी आले म्हणती ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । ब्रीद जातो वीश्वंभरा ।।४।।

१३०००५

बाहेर काडीले कासया । स्वामी चीदंबरराया ।।१।।
आवतार प्रगट करणे । कीर्ती देशोदेशी जाणे ।।२।।
येकीकडे ते राहीले । बळे नाम ठेववीले ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । हे का उचीत ईश्वरा ।।४।।

१३०००६

चीदंबरा स्वामीराजा । रक्षी लौकीक हा तुझा ।।१।।
नीत्य करीतो प्रार्थना । माझी न ये का करुणा ।।२।।
रक्षी ब्रीद हे आपुले । दावी दीनासी पाउले ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । प्रगट आवतार करा ।।४।।

१३०००७

येईल तुमच्या वीच्यारा । तैसे कराल ईश्वरा ।।१।।
येथे न चले कोणाचे । देवादीका ब्रम्हयाचे ।।२।।
चीदंबरा वीश्वनाथा । तुमचे हाती सर्व सता ।।३।।
न लगे सांगणे दासासी । कोण पुसे पतितासी ।।४।।

१९०००८

बळे येसी नाळवीता । चीदंबरा तुझी सता ।।१।।
ब्राम्हण क्रोधि आसे फार । बळे करीसी तु उत्धार ।।२।।
ब्राम्हण आपुल्या घरासी । आसे चीदंबरापासी ।।३।।
दास म्हणे नींदा करी । आसे पापी दुराच्यारी ।।४।।

१३०००९

राहाणे स्वामीच्या गावात । वीप्र कुटुंबासहीत ।।१।।
कधी न ये दरशनासी । नींदाकरी जनापासी ।।२।।
स्वामी पतितपावन । आवतार तु सगुण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करी पंतीत उत्धार ।।४।।

१३००१०

दरशण दुर्लभ यात्रेसी । भाषण कैचे त्या लोकासी ।।१।।
ब्राम्हण देखुनी नींदक । त्याचे घरी जाती देख ।।२।।
क्रपा करुनी तयासी । भाषन करीती आनंदेसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दयेक्षमेचा सागर ।।४।।

१३००११

माग म्हणती ब्राम्हणासी । काय ईछा हे तुजसी ।।१।।
ब्राम्हण म्हणे स्वामीराजा । येक हेत आसे माझा ।।२।।
मज देई पुत्रदान । स्वामी पुरवि वस्त्रआन्न ।।३।।
म्हणे चीदंबर दास । क्रपा केली त्या वीप्रास ।।४।।

१३००१२

आन्नवस्त्र पुरवीती । सीदा बांधोनीया देती ।।१।।
पुत्र जाला त्या वीप्रासी । पावन स्वामि पतितासी ।।२।।
नींदक लावीला भक्तीसी । पस्च्यातापा जाला त्यासी ।।३।।
दास पतित मी खरा । पावन सत्य चीदंबरा ।।४।।

१३००१३

चरित्र २४१

।।पद हींदुस्तानी ।। दीन दयाल माहाराज चीदंबर ।।धृ।।
नही मुज कोई बाप न माई । देई दीनी तुमरे काज चीदंबर ।।१।।
काहे नीष्टुर भय तुम प्रभुजी । राखो ब्रीरद की लाज चीदंबर ।।२।।
नाही मागु तुमसे कछु धन मुगती । कीजो आपनो काज चीदंबरा ।।३।।
बीनती दास की कलजुग आय । दीन जनो के काज चीदंबर ।।४।।

आभंग हींदु
बहुत दीन भय न दीनॆ मीलाप । काहेकॊ कलाप तुमरॆ मनमो ।।१।।
आनाथ मय दिन आयो तुमकु शरण । बतलावो चरण चिदंबर ।।२।।
लीनो आवतार कलजुग साई । बतलावो दिखलाई यॆकबार ।।३।।
दास कहॆ प्रभु बतावो । सगुण चिदंबर ।।४।।

१३००१५

यॆवु दॆ करुणा मज पतिताची । लज्या हॆ ब्रीदाची रक्षी आता ।।१।।
दावी रुप सगुण नीववी हे मन । करि समाधान चित माझॆ ।।२।।
पाहातो मी वाट दॆवा नीसीदीनी । यॆवु द्यावी मनी दया माझी ।।३।।
दास म्हणॆ होसी माय आनाथासी । वॆळ का लावीसी चीदंबरा ।।४।।

१३००१६

यॆउ द्यावी दया माझी दॆवराया । दावी बा सखया चरण द्रिष्टी ।।१।।
तुजविण चईन न पडॆ जीवासी । आंतर जाणसी मायबापा ।।२।।
न लगॆ सांगणॆ तुम्हा वीश्वंभरा । कलयुगी आवतारा स्वामीराया ।।३।।
दास म्हणॆ होसी पतितपावन । दावि रुप सगुण चीदंबरा ।।४।।

१३००१७

नको नको नको वेळ करु आता । स्वामि प्राणनाथा चिदंबरा ।।१।।
देई देई भेटी तुझी सगुण । नीनवी हे मन मायबापा ।।२।।
तारी तारी तारी मज पतितासी । पावन ब्रीदासी जतन करि ।।३।।
पावे पावे पावे दास दिनालागि । प्रगट व्हावे जगि चिदंबरा ।।४।।

१३००१८

यावे यावे यावे स्वामी करुणाघना । जीवीच्या जीवना चीदंबरा ।।१।।
दावि दावि दावि सगुण तुझी मुर्ति । वर्णवी बा किर्ती आखंडीत ।।२।।
प्रगट आवतार करि या जगात । करणी आघटीत व्हावी देवा ।।३।।
दास म्हणे होसी आवतार तु पुर्ण । निववी हे मन स्वामीराया ।।४।।

१३००१९

चिदंबरा पासी आला येक रुसी । भाषण स्वामिसी करितसे ।।१।।
म्हणे स्वामिलागि आवतार पुर्ण । पाहावे चरण म्हणोनि आलो ।।२।।
येकांती भाषण करितसे जाण । वुभा कर जोडुन स्वामी पुढे ।।३।।
दास म्हणे जाले भाषण दोघाचे । न कळे तयाचे वर्म कोणा ।।४।।

१३००२०

करुनि नमन नीघाला बाहेर । आनंदेसी थोर रुषेश्वर ।।१।।
स्वामीनी तयासी धाडीला प्रसाद । भोजन करुनि सीध्ध जाला आसे ।।२।।
मागता निरोप करवीला मुकाम । दाटलासी प्रेम भक्ती करुणी ।।३।।
दास म्हणे कळा न कळे कोणासी । दावीतो द्रिष्टीसी चीदंबर ।।४।।

१३००२१

प्रत्ययासी आला थोर रुषेश्वरा । धन्य चिदंबर म्हणतसे ।।१।।
बळे निरोप देता न जायतो कदा । राहातसे सदा आरण्यात ।।२।।
पुर्ण आवतार जाला चीदंबर । सांडुनि ईश्वर जावु कोटे ।।३।।
दास म्हणे राहे स्वामी चरणापासी । न जायतो रुषी दुरि कोठे ।।४।।

१३००२२

नित्य ध्यान करी चीती रुषीश्वर । नाम चीदंबर जपे सदा ।।१।।
चिदंबरावीण देव नेणे दुजा । दुर माहाराजा धाडु नये ।।२।।
नित्य वुटोनीया प्रार्थना तो करी । चिदंबरा व्दारि ठेवी मज ।।३।।
दास म्हणे आसे भक्तराज पुर्ण । चिदंबर जाण क्रपाकरि ।।४।।

१३००२३

राहे स्वामीपासी आरन्यात जाण । करितो भजन गुप्तरुपे ।।१।।
खात आसे दाणे आथवा झाडपाला । नोळखाति त्याला जन कोणी ।।२।।
राहे वुदासीन वस्त्र नसे जवळी । रक्षी चंद्रमौळी चीदंबर ।।३।।
दास म्हणे जाला पुर्ण भक्तराज । चिदंबरे काज करुणी दिल्हे ।।४।।

१३००२४

चरित्र २४२

पद हीदुस्तानी दिजो क्रपादान चीदंबर ।।धृ।।
देश बीदेस फिरत आयो । आबलो न खुले काम चिदंबर ।।१।।
कलजुग तुमने धरे आवतार । राखो आपनो मान चिदंबर ।।२।।
किर्त बढावो प्रगट आवो । काहे धरो गुमान चिदंबर ।।३।।
दास पतित के प्रभु चिदंबर । दुर करो आभीमान चीदंबर ।।४।।

१३००२५

प्रभु बतावो चरण । आयो तुमकु सरन ।।१।।
बालक तुमारो परदेसी । तुमे भुल पडी कैसी ।।२।।
राहा देखु नीसीदीनी । तुमे निंद केव गुरानि ।।३।।
दास तुम्हारो पुकारे । चिदंबर ठाडो व्दारे ।।४।।

यावे यावे विश्वपाळा । चिदंबरा घननीळा ।।१।।
माझा येवुदे कळवळा । सगुण रुप दावी डोळा ।।२।।
नित्य पाहातो मि वाट । देई आनाथासी भेट ।।३।।
दासालागि तुचि माता । चिदंबरा यावे आता ।।४।।

१३००२७

नित्य करितो मि धावा । पावे देवाचिया देवा ।।१।।
रक्षी आनाथ या जीवा । चिदंबरा सदासीवा ।।२।।
तुजवीण प्राणेश्वरा । देव नेणे मी दुसरा ।।३।।
दास म्हणे सर्वगता । चिदंबरा ये समर्था ।।४।।

१३००२८

वेगी यावे वीश्वंभरा । दिन जनाच्या कैवारा ।।१।।
यावे आनंत आपारा । स्वामि क्रपेच्या सागरा ।।२।।
दावि दावि रुप सगुण । माझे निववि हे मन ।।३।।
पावे दास आनाथासी । चिदंबरा या वेळेसी ।।४।।

१३००२९

यावे यावे विश्वनाथा । चीदंबरा क्रपावंता ।।१।।
निवारी हे भवचींता । दावी चरण आनंता ।।२।।
वेळ लावो नये आता । तुझे हाती सर्व सता ।।३।।
दासाचीया प्राणनाथा । चिदंबरा प्रगटे आता ।।।४।।

१३००३०

नित्य करीतो विनंती । दया येवु द्यावि चीती ।।१।।
होसी क्रपेची तु मोर्ती । जाला आवतार क्षीती ।।२।।
तिही लोकी तुझी ख्याती । दावी रुप दीनाप्रती ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१३००३१

द्राविड देसिचा ब्राम्हण । नित्य करितसे ध्यान ।।१।।
ईछा मानसी बहुत । भेटी द्यावी ते सांक्षात ।।२।।
पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चीदंबर ।।३।।
दास म्हणे ब्राम्हणासि । ईछा बहुत भेटीसी ।।४।।

१३००३२

कलयुगी आवतार । सत्य जाला चीदंबर ।।१।।
विप्र म्हणे मज भेटी । देईल ईश्वर सेवटी ।।२।।
नित्य करितसे ध्यान । आन्न न घे भेटीवीन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रत्यय ईश्वर ।।४।।

१३००३३

रात्री येवुनि द्रष्टांती । चिदंबर क्रपामोर्ती ।।१।।
वुठविले विप्रालागी । म्हणे मि आलो भेटीलागी ।।२।।
बोले चीदंबर त्यासी । काय ईछा हे मानसी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । देती विप्रालागी वर ।।४।।

१३००३४

वीप्रालागी त्या प्रसन्न । जाला चिदंबर जाण ।।१।।
विप्र म्हणे स्वामीलागी । प्रिय नाही दुजे जगी ।।२।।
ईछा होईल मजसी । भेटी द्यावी त्या वेळेसी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । आभय दिले विप्रास ।।४।।

१३००३५

चरित्र २४३

।।पद हिंदु ।। काहे भये कटोर चिदंबर ।।धृ।।
पापी ज्यानके छोड दियो साई । नाम तुमारो वुदार चिदंबर ।।१।।
छिनका पामेरि आवत घेरि । लीला आपरंपार चिदंबर ।।२।।
रेवातीरे आयो महेसर । दुर रह्यो केदार चीदंबर ।।३।।
दास पतितकु पावन तुमहि । बच राखे समार चिदंबर ।।४।।

१३००३६

आभंग हिंदु
मलराहि काया चिदंबर मेरि । आवत हे घेरि बहुत साई ।।१।।
पड रह्यो प्रभु नावत बैटनकु । काहा भयो तुमकु मेरे बरवत ।।२।।
कामि क्रोधि पापी पतित ज्यानके । दियो हे छोडके तुमने साई ।।३।।
दास कहे ब्रीद पावन तुम्हारो । काहा गयो मेरो लाज तुमकु ।।४।।

१३००३७

गळीत जाली काया चिदंबरा आता । फिरति भगवंता डोळे माझे ।।१।।
भोंडवेति फार राहिलो पडोन । होतसे वमन क्षणक्षणा ।।२।।
का हो स्वामी राग धरियला मनी । ब्रिद तुमचे जनी राहे कैसे ।।३।।
चिदंबरराया नलगे सांगणे । दासासी रक्षीणे लागे तुम्हा ।।४।।

नाही मज कोन्ही देवा त्रीभुवनी । देह तुम्हच्या चरणी आर्पियला ।।१।।
कळे तैसे ठेवा स्वामी चीदंबरा । ब्रीद जतन करा प्रभु आपुले ।।२।।
कोठवर आंत घेसी वीश्वनाथा । गेली तुमची सता कोठे देवा ।।३।।
दास म्हणे होसी माय आनाथासि । चिदंबरा कैसी दया न ये ।।४।।

१३००३९

यावे स्वामीराजा आनाथाच्या काजा । नेणे देव दुजा तुम्हावीण ।।१।।
येवु द्यावी दया माझी वीश्वपति । तीहीलोकी ख्याती प्रगट करा ।।२।।
कलयुगी आवतार जाला विश्वंभरा । कळवी चिदंबरा प्रगट जगि ।।३।।
दास म्हणे करि क्रपा दिनावरि । दावि डोळेभरि रुप देवा ।।४।।

१३००४०

न पडे चईन स्वामी तुम्हाविन । देह जाला क्षिण माझा देवा ।।१।।
करितो मी धावा स्वामी सर्वकाळ । निवारि तळमळ चिदंबरा ।।२।।
करीतो प्रार्थना येवु द्यावी करुणा । पावे मज दीना ऐशावेळे ।।३।।
दास म्हणे करा आवतार प्रगट । देई मज भेट चिदंबरा ।।४।।

१३००४१

धावे पावे आता त्रैलोकिच्या नाथा । जावु नेदि वृथा ब्रीद आपुले ।।१।।
आवतार जाला स्वामी श्रृष्टीवरि । कळवी चराचरी मात ऐसी ।।२।।
यासाटी प्रार्थना करितो ईश्वरा । प्रगट चिदंबरा व्हावे वेगी ।।३।।
दास म्हणे तुम्हा न लगे सांगणे । ब्रीद हे रक्षणे लागे देवा ।।४।।

१३००४२

बारा मल्हाराचा आलातो ब्राम्हण । स्वामी पासी जाण दर्शनासी ।।१।।
करितो प्रार्थना स्वामीलागी जाण । आवतार पुर्ण जाला स्वामी ।।२।।
दरिद्रे करोनी पीडीलो ईश्वरा । रक्षी चीदंबरा आनाथासी ।।३।।
दास म्हणे विप्र विनविता जाण । जाला त्या प्रसन्न चिदंबरा ।।४।।

१३००४३

बोलावोनि विप्र जवळी बैसविला । सांगति तयाला विचारते ।।१।।
दरिद्रा पासोनी सोडावितो तुज । आनाथाचे काज करित जावे ।।२।।
आल्या ब्राम्हणासी देत जावे आन्न । देतो तुज धन ईश्वरतो ।।३।।
दास म्हणे जाला आनंद विप्रासी । वुभा स्वामिपासी कर जोडोनी ।।४।।

१३००४४

येक सेर खिचडी देति विप्रालागी । जावे म्हणति वेगि गावासीते ।।१।।
सोडु नये कदा वोटेने खिचडी । घरी जावुनि सोडी गाठोडीते ।।२।।
आज्ञा म्हणोनीया निघेतो ब्राम्हण । घरि आला जाण सुखरुप ।।३।।
दास म्हणे पुजा करि देवापासी । सोडी गाठोडीसी ब्राम्हण तो ।।४।। १३००४५

सोडोनि पाहाता गाठ खिचडीची । विट सवर्णाची जाली आसे ।।१।।
हर्ष ब्राम्हणासी न माय आंतरी । वांरवार करि नमस्कार ।।२।।
धन्य चिदंबरा कलयुगि आवतारा । आघटीत ईश्वरा कळा तुझी ।।३।।
दास म्हणे ऐसा स्वामि लीला धारि । सगुण श्रीष्टीवरि चिदंबर ।।४।। १३००४६

चरित्र २४४

गुजराती भाषेचे आभंग
।।पद मारवाडे देशीचे ।। साई चिदंबर ऐसो काई करि छो ।।धृ।।
म्हे तो थारो बाळ कछो । म्हाने थे किंव भुलो छो ।।१।।
देशो देशी मेल्यो छो । जमसो आगे राउ छो ।।२।।
सरगुन आवतार । थेतो लकर आये छो ।।३।।
म्हनो मोकल देशी । ब्रीद कैसो रह्यो छो ।।४।।
दास थानो गुला छो । बानि आपनि राखि छो ।।५।। १३००४७

पुर्णब्रम्ह चिदंबरा । स्वामी वोंकारेश्वरा ।।१।।
दया आनाथासी करा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।२।।
कलयुगी आवतार । ब्रीद जतन ते करा ।।३।।
दासाचीया प्राणेश्वरा । सगुण भेटे विश्वंभरा ।।४।।

१३००४८

दावी दावी बा चरण । तुज आलो मि शरण ।।१।।
दया येवुदे दिनाची । लज्या रक्षी हे ब्रीदाची ।।२।।
देई देई क्रपादान । माझे निववि हे मन ।।३।।
दास म्हणे विश्वंभरा । दावी रुप चिदंबरा ।।४।।

१३००४९

यावे यावे विश्वपति । दावी सगुण तुझी मुर्ती ।।१।।
विनवितो वारंवार । दावि चरण सकुमार ।।२।।
माय होसी आनाथासी । स्वामी वेळ का लावीसी ।।३।।
दास म्हणे तुजवीण । चिदंबरा झुरे प्राण ।।४।।

१३००५०

सांभाळावे मज दिना । स्वामी पतितपावना ।।१।।
यावे जीवीच्या जीवना । चिदंबरा बा सगुणा ।।२।।
नित्य करितो प्रार्थना । माझी येवु दे करुणा ।।३।।
दास म्हणे सर्वगता । चिदंबरा यावे आता ।।४।।

१३००५१

करुणावंत म्हणवीसी । स्वामी वेळ का लावीसी ।।१।।
काय जाले माझेवीसी । चिदंबरा रुषीकेसी ।।२।।
कैसा निष्टुर जालासी । का हो ब्रीद गमाविसी ।।३।।
दास आनाथ परदेसी । भेटी देई बा तयासी ।।४।।

१३००५२

यावे देवदेवोतमा । चिदंबरा पुरुषोतमा ।।१।।
यावे जीवीच्या वीश्रामा । चिदंबरा पुर्णकामा ।।२।।
पुर्णब्रम्ह आत्मारामा । तुझा आगाध महीमा ।।३।।
दासाचीया मनोधर्मा । चिदंबरा परब्रम्हा ।।४।।

१३००५३

श्रुद्र आसे बहु दिन । आला दर्षणा लागुन ।।१।।
स्वामी पुढे लोटांगण । जात आसे भावेकरुण ।।२।।
स्वामी म्हणति तयासी । बोले काय तु मागसी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।।

१३००५४

शुद्र भाविक तो थोर । ऐसे म्हणति चिदंबर ।।१।।
स्वामी पतितपावन । वुधड दाविति वर्तुन ।।२।।
शुद्रालागी बोलविती । पटका येक त्यासी देती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी प्रताप ईश्वर ।।४।।

१३००५५

सांगे चिदंबर त्यासी । वेगी जावे राज्यापासी ।।१।।
होतो प्रसन्न तुजसी । आले भाग्य वुदयासी ।।२।।
शुद्र निघे हर्षेकरुण । आला धन्यापासी जाण ।।३।।
दास म्हणे चीदंबर । बुधिदाता हा ईश्वर ।।४।।

१३००५६

त्यासी देखताची जाण । जाला धनी तो प्रसन्न ।।१।।
आला चिदंबराकडुन । दिल्हा जरिपटका जाण ।।२।।
पागा दिल्ही सरकारि । दिल्ही फौजची सरदारि ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।। १३००५७

चरीत्र २४५

पद हिंदु
प्रभु चिदंबर वुदास तुम बिन । बतलावो चरण साई मुजे ।।१।।
देखत मय राहा तुम्हारि सब दिना । मनकी भावना तुम जानो ।।२।।
गल रहि काया मेरि बिश्वनाथ । सता तुमारे हात तिनलोक ।।३।।
दास कहे ब्रीद समालो आपने । वुध्धार करने लागे तुमकु ।।४।। १३००५८

शरण आयो तुमकु चिदंबर ।।धृ।।
दिन आनाथ कि राखो लाज । तुम वुदार चिदंबर ।।१।।
देव न जानो तुम बिन कोई । ये मनको निरधार चिदंबर ।।२।।
तुमहि माता तुम हि पिता । तुम हि वुतारो पार चिदंबर ।।३।।
दास के प्रभु पुरनब्रम्ह । कलजुग भयो आवतार चिदंबर ।।४।।
१३००५९

यावे चीदंबरा दिनाच्या कैवारा । आनाथासी करा दया आता ।।१।।
नका वेळ लावु किति वाट पाहु । परिहार देवु कोठवरी ।।२।।
यावे वीश्वनाथा पावे मज आता । वेळ बा सर्वथा नये करु ।।३।।
दास म्हणे माझा सिनालासे जीव । येवु द्यावि किव चिदंबरा ।।४।।

१३००६०

देई देई देई आनाथासि भेटी । येवु द्यावी पोटी दया माझी ।।१।।
नाहि नाहि नाहि आसरा तुजवीण । दावि बा चरण चिदंबरा ।।२।।
पावे पावे पावे मज दिनालागि । आवतार जगी प्रगट करि ।।३।।
चिदंबरा रक्षी ब्रीद हे आपुले । दावी बा पावुले दासालागी ।।४।।

१३००६१

यावे चिदंबरा आनाथाच्या नाथा । लौकीक हा तुझा रक्षी देवा ।।१।।
पतीतपावन कलयुगी आवतार । कळवी हे प्रखर श्रीष्टीवरि ।।२।।
यासाटी प्रार्थना करितो विश्वंभरा । रुप चीदंबरा दावि आता ।।३।।
दास म्हणे करि आनाथासी दाया । ब्रिद स्वामिराया रक्षी आपुले ।।४।।

१३००६२

यावे करुणाघना क्रपेच्या नीधाना । आवतार सगुणा चिदंबरा ।।१।।
करीतो विनंती स्वामि तुम्हाप्रती । आवतारक्रति प्रगट करि ।।२।।
धावे पावे आता स्वामि प्राणनाथा । तुझ्या हाती सता सर्व आसे ।।३।।
दास म्हणे किति आळवावे तुम्हा । स्वामि पुरषोत्तमा चीदंबरा ।।४।।

१३००६३

यावे सर्वगता त्रैलोकिच्या नाथा । स्वामी तु समर्था चिदंबरा ।।१।।
देई क्रपादान निववी हे मन । दावि बा सगुणा रुप तुझे ।।२।।
तुज ऐसा कोन्ही दयाळु या जनी । ब्रम्हांडभुवनि नसे देवा ।।३।।
दास म्हणे स्वामी जिवीच्या जीवना । यावे ब्रम्हपुर्णा चीदंबरा ।।४।।

१३००६४

ब्राम्हण तो येक स्वामिच्या गावात । आसे तेथे सहीत कुटुंबासी ।।१।।
नसे काहि भक्ति आसे तो उन्मत । स्वामि क्रपावंत सर्वावरि ।।२।।
विप्र तो बसे दुकानात । धंदा आसे करित कापडाचा ।।३।।
दास म्हणे कधि न जाय दर्शणा । नमस्कार जाणा महाव्दारि ।।४।।

१३००६५

येके दिवसि विप्र रात्री दुकानात । दिप तो लावित होता तेथे ।।१।।
दिप लावोनिया ठेवी दुकानात । रात्री आंधारात घरी जाणे ।।२।।
न सापडे जोडा पाय त्या वेळेसी । सर्प पायरिसी बैसलासे ।।३।।
चिदंबर दास म्हणे काळसर्प । ज्याचा आसे दर्प त्रैलोक्यासी ।।४।।

१३००६६

विप्र जातावेळे पाय सर्पावरि । सर्प दंश करि क्रोधे फिरुनि ।।१।।
रक्ताचिते धार लागलि पायासी । घेरी ब्राम्हणासी आलि तेथे ।।२।।
चौघे मिळुनि त्यासी नेले स्वामिपासी । बुरबुडा तोंडासी आला तेव्हा ।।३।।
दास म्हणे नेला स्वामिपासि जाण । पाहे क्रपाकरुण चीदंबर ।।४।।

१३००६७

आलीया ब्राम्हण स्वामि पुसति जाण । सर्पमंत्र कोण जाणतसे ।।१।।
नये म्हणती कोन्हि स्वामि म्हणती त्यासी । सांगतो तुम्हसी मंत्र म्हणे ।।२।।
उतरला उतरला सर्प त्रीवाचे म्हणवोनी । ब्राम्हण त्या क्षणी सावध जाला ।।३।।
आश्चर्य करीती सर्व लाहानथोर । सहज चीदंबर लिला दावि ।।४।।
दास म्हणे वीप्र सावध होवोनी । जाय लोटांगणी स्वामिपुडे ।।५।।

१३००६८

||पद हिदु || काढो मनको भ्रम चिदंबर ||धृ||
आशा त्रष्णा निकसत नाहि । दुर करो सब काम चिदंबर ||१||
मद मच्छर घेरत चित । किजो साई निसकाम चिदंबर ||२||
दया दिजो छमा दिजो । दिजो भक्तिप्रेम चिदंबर ||३||
दास जनोंके तुमहि साई । आविनास दिजो धाम चिदंबर ||४||

१३००६९

आभंग हिदु
पुर्णब्रम्ह चीदंबर । व्हासे निकसे वोंकार ||१||
तीन लोकके आधार । चलावत चराचर ||२||
आग्याबिन न हिलत पवन । वोहि स्थिर करे मन ||३||
कहे दास चीदंबर । भावे मिले छो वोंकार ||४|| १३००७०

मांधाता तो वोंकार । त्यासी वाहिला कुमार ||१||
ब्राम्हण आसे पाराशर । मातापिता तोषवी फार ||२||
महा भक्तराज थोर । त्याणि दिल्हा बरोबर ||३||
दास म्हणे चीदंबरा । तुझी कळा हे ईश्वरा ||४||

१३००७१

चिदंबरा पुर्णाब्रम्हा । दावी रुप सर्वोतमा ।।१।।
तुझा आगाध महिमा । स्वामि जिवीच्या विश्रामा ।।२।।
माझी येउ दे करुणा । चिदंबरा बा सगुणा ।।३।।
दास म्हणे विश्वंभरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१३००७२

जेजे करणे आसे तुम्हा । तेची करसी पुरषोत्तमा ।।१।।
येथे न चले वुपाय । मानव रंक तेथे काय ।।२।।
देवादिक सीनताती । मानवाची कोण गती ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । कळा आघटीत ईश्वरा ।।४।।

१३००७३-अ

चिदंबरा वीश्वपति । तुझि वर्णवि बा किर्ति ।।१।।
पाठविले देशावर । करि प्रगट आवतार ।।२।।
पाटविसी दुरदेसी । स्वामि बद्रिकेदारासी ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । करणि तुझी हे ईश्वरा ।।४।।

१३००७३-ब

पाठवुनी दुरदेसी । कळा आपुलि दाविसी ।।१।।
मज पतीताचे हाती जाण । करिसी मेरुचे ते मान ।।२।।
कळा दाविसी आपुली । ऐसी आघटीत चाली ।।३।।
दास म्हणे चिदंबरा । लिला तुझी विश्वंभरा ।।४।।

१३००७४

आम्हा पतितासी जाण । बळे जालासी पावन ।।१।।
खळालागी भक्ति देसी । श्रीष्टीमाजी हिंडविसि ।।२।।
प्रताप दाविसी आपुला । आवतार पुर्ण जाला ।।३।।
चिदंबर म्हणे दास । बळे कळविसी जगास ।।४।।

१३००७५

गावामाजी तो ब्राम्हण । होता स्वामीपासी जाण ।।१।।
गेला आपुल्या घरासी । रात्री प्रथम प्रहरासी ।।२।।
थोर सर्प आजगर । बैसे दाराचे समोर ।।३।।
म्हणे चीदंबर दास । कंप सुटला विप्रास ।।४।।

१३००७६

भय सुटले विप्रासी । व्दाहि दिलि त्या सर्पासी ।।१।।
चिदंबरी सता जाण । सर्प न हाले तेथोन ।।२।।
होता पसरला जाण । तैसा राहिला पडोन ।।३।।
म्हणे चिदंबर दास । न पडे वेटाळे सर्पास ।।४।।

१३००७७

दोन दिवस तो जाण । सर्प न हाले तेथोन ।।१।।
लोक येवुनि पाहाति । गलबल करिती ।।२।।
काटी लाविती दुरुन । परि न हालेची जाण ।।३।।
म्हणे चीदंबर दास । येउनी सांगती स्वामीस ।।४।।

१३००७८

स्वामि म्हणति विप्रासि । सर्प राहिला वुपवासी ।।१।।
दुध पाजी वाटी भरि । व्दाहि मोकळी ते करि ।।२।।
सर्प दुध तो पिवुन । गेला आरण्यात जाण ।।३।।
दास म्हणे चिदंबर । वर्तवीत चराचर ।।४।।

१३००७९

चरित्र २४७

।। पद हिंदुस्था ।।   प्रभु चिदंबर मिलो येक बार ।।धृ।।
काचकि जैसी बरत हय । वैसो जरत दिन रात आंतर ।। १।। प्रभु ची ...
क्रपा करके जल बरसावो । तुम पतित वुधार चिदंबर ।।२।।
दिन आनाथ के नाथ काहावो । कलजुग भय आवतार ।।३।।
दास कहे साई भय सरगुण । वुतारो भवनदि पार।।४।। प्रभु ची...   १३००८०

।।भुपाळि हिंदुस्छनि चाल ।। जागीये चिदंबर प्रभु वोंकार ।।धृ।।
भई भुनसार देव वोंकार । करत तुमारि पुकार चिदंबर ।।१।। ज्यागि....
ब्रम्हा विष्णु शिव तिस्टत हय । दिजो दरसन येक बार चिदंबर ।।२।। ज्यागि...
एक हात लिये झारि । लच्छमि ठाडी ब्दार चीदंबर ।।३।। ज्यागि..
नारद तुंबर सनकादिक । मुनी जन करे पुकार ।।४।। ज्यागि ..
दास भक्तजन गावत सुस्वर । ताल म्रंदग वुटे झनकार ।।५।। ज्यागि..
वुटे चिदंबर दासकु मिलत । भये आनंद आपार प्रभुजी ।।६।। ज्यागि.. १३००८१

भई वो प्रभात वुटे चिदंबर । नारद तुंबर भक्त थाडे ।।१।।
साजय मंजीरे प्रेमल भजन । करत हय कीर्तन छोटे बाल ।।२।।
सतार सारांगी बाजे मधुरवाणी । मन कु वुन्मनि मिल रहि ।।३।।
दासनकु प्रसन्न भये चिदंबर । आभयदान वर दिने सबकु ।।४।।   १३००८२

कोठवरि धावा करवीसी देवा । वोंकार तु शिवा चिदंबरा ।।१।।
ऐकें बा विनंती करुणेच्या पति । येउ द्यावी चीति दया माझी ।।२।।
पतितपावना कलयुगी आवतार । कळवि प्रखर श्रीष्टीमाजी ।।३।।
दास म्हणे देई सगुण तुझी भेटी । निववावे पोटी मायबापा ।।४।।

१३००८३

यावे बा दयाळा स्वामि घननिळा । दावि रुप डोळा चीदंबरा ।।१।।
यावे सर्वेश्वरा दिनाच्या कैवारा । दावि चिदंबरा चरण द्रीष्टी ।।२।।
यावे दीनानाथा पावे मज आता । तुझे हाति सता सर्व आसे ।।३।।
दास म्हणे क्रपा करी दीनावरी । यावे बा झडकरि चिदंबरा ।।४।।

१९००८४

नये वेळ करु करुणेच्या राया । दावी बा सखया रुप सगुण ।।१।।
सर्वकाळ देवा चीति उदासीन । न पडे चईन तुजविन ।।२।।
कधी चीदंबरा पाहिन तुजसी । डोहळे जीवासी वारंवार ।।३।।
जाणसी आंतर माझे चीदंबरा । तुजविण दुजा देव नेणे ।।४।।
दास म्हणे होसी क्रपेचा सागर । येई बा सत्वर चिदंबरा ।।५।।

१३००८५

सकंल्प विकल्प सोडोनीया जाण । करि ब्रम्हार्पण सुखे बापा ।।१।।
भोत्का तो भोजन स्वयेची आपण । सोडी आंहपण संकल्पाचे ।।२।।
देता देवविता कर्ता करवीता । चिदंबरी सत्ता येक जाण ।।३।।
दास म्हणे सोडी सकंल्पाचे मुळ । ब्रम्ह हे समुळ स्वये होसी ।।४।।

१३००८६

सांडोनी कल्पना राहे बा नीवांत । ब्रम्ह सर्वगत स्वस्वरुपी ।।१।।
वायाची कल्पना देह आंहपणा । संकल्प सोडुनी राहे सुखे ।।२।।
कोनाचे ते आन्न आणीले कोण । वायाची बंधन घेसी माथा ।।३।।
दास म्हणे येक रुप चीदंबर । सोडी आंहकार देहभाव ।।४।।

१३००८७

येक गावि होता शुद्र भक्तराज । करी कामकाज सेतामाजी ।।१।।
घरि सेळ्या मेंढ्या आसती बैल गायी । व्याघ्र तया ठाई आला सेति ।।२।।
काट्याचा गराडा होता त्या मेंढ्यासी । रात्री त्या ठायासी राहाने सदा ।।३।।
दास म्हणे शुद्र चीदंबरावीण । दैवत तो जाण नेणे दुजे ।।४।।

१३००८८

व्याघ्र आला राती बोभाट तो जाला । शुद्र तो ठाकला वुभा तेथे ।।१।।
हाती आसे काटी रेघ ते वोंढिली । व्दाहि ते घातलि व्याघ्रालागी ।।२।।
चिदंबरनामें करुनि व्दाहि देत । व्याघ्र न ये आत रेघेचीया ।।३।।
दास म्हणे व्याघ्र वुभा त्या ठायासी । च्यारी प्रहर निसि निघोन गेलि ।।४।।

१३००८९

आरुणोदय जाला शुद्र तो वुटीला । व्याघ्र तो ठायाला बैसलासे ।।१।।
सुर्योद्‍य होता गेला तो निघोन । व्याघ्र तो जावुन आरण्यात ।।२।।
चिदंबरि सता आसे आघठित । वुघड प्रचित दावितसे ।।३।।
दास म्हणे ऐसा प्रताप प्रभुचा । वर्णीता वाचा सिनले वेद ।।४।।

१३००९०

चरित्र २४८

काहेकु लागी बेर चिदंबर ।।धृ।।
देखत राहा भाकत करुणा । काहालो पकडु धीर चीदंबर ।।१।।
भक्त जनोंके काजकु दवडे । मय तो पापी कींकर चिदंबर ।।२।।
पावन ब्रिद करि वो सत्य । कलजुगी भये आवतार चीदंबर ।।३।।
दास दिन के काजकु दवरो । साई तु हो वुदार चीदंबर ।।४।।

दवरो दवरो चिदंबर । रहा देखु मय चीदंबर ।।१।।
नही भक्ती मेरी परि । करके छोटे मन करि ।।२।।
संग दिजे संत भक्त । वे होते जी बीरत्क ।।३।।
दास कहे चिदंबर । पावन तुमारो आवतार ।।४।।

१३००९२

चीदंबरा प्राणेश्वरा । तुझी कळा हे ईश्वरा ।।१।।
आंत घेसी कोठवरी । देहे क्षीणयेला जरी ।।२।।
हे का बरे दीसे तुम्हा । उचीत नव्हे पुरषोतमा ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । ब्रीद रक्षी वीश्वंभरा ।।४।।

१३००९३

आवतार कलयुगी । कळावया श्रीष्टीलागी ।।१।।
देशोदेसी पाटवीसी । कीर्ती आपुली वर्णवीसी ।।२।।
मज पुसे तरी कोण । तुझ्या प्रत्ययावाचुन ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । दावी प्रत्यय ईश्वरा ।।४।।

१३००९४

हिंडवीसी देषोदेसी । गुप्त रुपे तु राहासी ।।१।।
कोन्ही नोळखे बा तुम्हा । कोण पुसे आम्हा ।।२।।
प्रगट प्रत्यय दावीसी । तेव्हा कळेल जगासी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१३००९५

काय सांगणे बा तुम्हा । चीदंबरा सर्वोत्तमा ।।१।।
आवतार प्रगट करीसी । ब्रीद आपुले रक्षीसी ।।२।।
तरी आंत कीती घेसी । प्राण उरला डोळ्यासी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । करा कळेल तुम्हास ।।४।।

१३००९६

दुरदेसी मुसलमान । आला दर्षनालागुन ।।१।।
स्वामी म्हणती तयासी । का रे आला दुरदेसी ।।२।।
म्हणे आलो दर्षनासी जाण । जाला आवतार सगुण ।।३।।
कीर्ती तो आयकुन । आलो पाहावया चरण ।।४।।

१३००९७

स्वामी म्हणती तयासी । काय ईछा हे तुजसी ।।१।।
म्हणे आवीद तो जाण । न मीळे वस्त्र तीही आन्न ।।२।।
घरी कुटुंब बहुत । म्हणुनी आलो शरणागत ।।३।।
दास म्हणे चीदंबर । जाला प्रसन्न ईश्वर ।।४।।

१३००९८

बोलावोनी आवीदासी । म्हणती भक्तराज होसी ।।१।।
धान्य आनवीलो तुजसाटी । घरी जाउन सोडि गाटी ।।२।।
दील्हे जोंधळे पाईली । आपुले हाथी गाठ घाली ।।३।।
म्हणे चीदंबर दास । दील्हा नीरोप तयास ।।४।।

१३००९९

स्वामी म्हणताती जाण । धान्य ठेवी हे पुजुन ।।१।।
नीत्य ध्यावया शेर । लागेल काडी वर्चेवर ।।२।।
आज्ञा म्हणोनीया जाण । घरी पोहोचला येउन ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी नित्य चमत्कार ।।४।।

१३०१००

आवीधं जाउनी घरासी । पुजी धान्य ते वेळेसी ।।१।।
काढीतसे तीन सेर । नीत्य खर्च वर्चेवर ।।२।।
परी धान्य ते न सरे । लोक पाहातातीं सारे ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे आपार ।।४।।

१३०१०१

चरित्र २४९

पद हिंदु ।। केत्तो लेसी आंत चिदंबर ।। धृ
ध्यान करहु निसीदिन साई । काहे करत हय घात चीदंबर ।।१।।
तुम बिन नहि प्रित आवरकी । केतो लगावो धीर चीदंबर ।।२।।
कलजुग मो थारो भय आवतार । किजो भवनदि पार चीदंबर ।।३।।
दास कहे मय तो दिन आनाथ । किजो ब्रिदकु थार चिदंबर ।।४।।

१३०१०२

चिदंबर साई दिजो क्रपादान । भयो उदासीन मन मारो ।।१।।
किर्त यह तुम्हारि भई तीनलोक । मेरे बिरया भिक लागे कैसी ।।२।।
काहा गया तेरि सामर्थे सीध्धी । केव किनि आवधि मेरे बखत ।।३।।
दास कहे साई चीदंबर धनी । आगाध करणी प्रगट करो ।।४।।

१३०१०३

कोठवरी आंत घेसी बा आनंता । स्वामी क्रपावंता चिदंबरा ।।१।।
पावे दिनालागि ऐसीया वेळेसी । स्वामीराया कैसी दया न ये ।।२।।
पाहातो मि वाट स्वामी रांत्रदिवस । दया हे तुम्हास न ये कैसी ।।३।।
दास म्हणे होसी क्रपेचि तु माता । तुझे हाती सता सर्व आसे ।।४।।

१३०१०४

चिदंबरा करि आनाथासी दया । दावी बा सखया रुप तुझे ।।१।।
करितो मि धावा स्वामि करुणाघना । पुरवी वासना मायबापा ।।२।।
निवारी निवारी संकट ईश्वरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगि ।।३।।
दास म्हणे होसी पावन आवतार । करि हे प्रखर श्रीष्टीलागी ।।४।।

१३०१०५

प्रताप आपुला न कळे कोणाला । प्रार्थितो स्वामिला याचीलागी ।।१।।
भाकितो करुणा विश्वाच्या जनका । ब्रम्हांडनायका प्रगट व्हावे ।।२।।
न लगे सांगणे तुम्हासी ईश्वरा । कलयुगी आवतारा स्वामिराया ।।३।।
दास म्हणे होसी क्रपावंत धणी । आघटीत करणी चीदंबरा ।।४।।

१३०१०६

पाहावीसी वाट कोठवरी देवा । आनाथ या जीवा रक्षीता तु ।।१।।
पतितपावन ब्रीद करि जतन । दावि बा चरण चीदंबरा ।।२।।
करुणेची माता होसी बा आनंता । तुझे हाती सता सर्व आसे ।।३।।
दास म्हणे किर्ती वर्णवीसी देवा । प्रत्यय दाखवा तैसा जगा ।।४।।

१३०१०७

यावे दयानिधि पावे मज आधि । न करि आवधी चिदंबरा ।।१।।
यावे बा दयाळा स्वामी वीश्वपाळा । दावी रुप डोळा चिदंबरा ।।२।।
यावे सर्वगता स्वामि क्रपावंता । नीवारी हे चींता चिदंबरा ।।३।।
दास म्हणे स्वामि लावो न ये वेळ । निवारि तळमळ मायबापा ।।४।।

१३०१०८

चिदंबरापासी आला दर्शनासी । होता परदेसी शेहरकर ।।१।।
आवरंगाबादेसी होते त्याचे घर । पावन आवतार ऐकुन आला ।।२।।
स्वामि पुसति त्यासी काय ईछा मनी । आलासे दुरुनि कोन्या काजा ।।३।।
दास म्हणे बोले गौरवुनि देव । उघडले दैव त्याचे जाण ।।४।।

१३०१०९

साष्टांग नमोनी उभा कर जोडोनी । सब्दावे करोनि बोलतसे ।।१।।
चिदंबरराया दिल्हे आसे धन । संततीवाचुनी वाया दीसे ।।२।।
द्यावे पुत्रदान आलो स्वामि शरण । आवतार सगुण प्रगट तुम्ही ।।३।।
दास म्हणे स्वामि जालेती प्रसन्न । देती वरदान तयालागी ।।४।।

१३०११०

मुहुर्त पाहुनी निरोप दिल्हा त्यासी । म्हणती पुत्रासी घेवुन यावे ।।१।।
होतो तुज कुमार याची संवत्सरा । पुढल्या वर्षाभरा घेवुन यावे ।।२।।
आनंदे करुनी नीघाला परदेसी । जाला त्याची वर्षी पुत्र त्यासी ।।३।।
दास म्हणे कळा दावि चिदंबर । वांझेलागी पुत्र दिल्हा जाण ।।४।।

१३०१११

होता सावकार घराचा तो सधन । जाले त्या प्रसन्न चिदंबर ।।१।।
सहश्रावधी करि ब्राम्हणभोजन । पुत्रासी घेवुन आला आसे ।।२।।
जाय लोटांगणि स्वामिपुढे जाण । म्हणे ईछा पुर्ण केलि देवा ।।३।।
दास म्हणे लीला दावी चीदंबर । आनंत आपार कळा त्याची ।।४।।

१३०११२

चरित्र २५०

पद हिंदु   चिदंबर दिजो क्रपादान ।।धृ।।
लिजो मुज गोदमे हिरदे लगायो । मंत्र कह दिजो कान ।।१।।
ढीगा बैटी दोनो छोकरि । आभरण मोती कान चिदंबर ।।२।।
नारेल प्रसाद उपर सक्कर । खाय पेट भरके जान चिदंबर ।।३।।
दास कहे प्रभु आनंद किनो । मन करो वुनमन चिदंबर ।।४।।

१३००१३

अभंग हिंदु
चिदंबर माहाराज । किजे आनाथ के काज ।।१।।
बैटायके माडीपर । कहे कानमे मंतर ।।२।।
दिई नारेळ सकर । मयने खाई पेटभर ।।३।।
मोडी दोनो ढिगा हाती । वुनके आंगभर मोती ।।४।।
दास कहे चिदंबर । प्रसन्न भये दिनोपर ।।५।।

१३०११४

क्रपावंत तुची धणी । मज येक त्रीभुवनी ।।१।।
तुझी आगाध करणी । चिदंबरा चक्रपाणी ।।२।।
मज निववीले मनी । रुप दावीले नयनी ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माय होसी आनाथास ।।४।। १३०११५

याचे याचे सर्वगता । चिदंबरा प्राणनाथा ।।१।।
वेळ लावो नये आता । दावी चरण आनंता ।।२।।
होसी क्रपेची तु माता । तुझे हाती सर्व सता ।।३।।
दास म्हणे बा श्रीधरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१३०११६

यावे दिनाच्या दयाळा । चिदंबरा वीश्वपाळा ।।१।।
दावी रुप घननीळा । प्रार्थीतो मि वेळोवेळा ।।२।।
नीत्य करितो प्रार्थना । दावि रुप तु सगुणा ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । प्रगट व्हावे वीश्वंभरा ।।४।।

१३०११७

करुणावंते माझे आई । आनाथासी भेटी देई ।।१।।
वाट पाहातो नीसीदीनी । प्राण वुरला नयनी ।।२।।
तुजवीण प्राणेश्वरा । नेणे देव मि दुसरा ।।३।।
दासाचिये प्रीयकरा । प्रगट व्हावे चीदंबरा ।।४।।

१३०११८

दावी चरण सकुमार । माझे निववी आंतर ।।१।।
करुणावंत तुची धनी । दावी आगाध करणी ।।२।।
हिंडविसी कोठवरी । स्वामि देशदेशांतरि ।।३।।
येवुदे दासाची करुणा । चीदंबरा क्रपाघना ।।४।।

१३०११९

चिदंबरापासी येक । विप्र आला आसे देख ।।१।।
करि वीनंती स्वामिसी । देवा कीती हींडवीसी ।।२।।
चीदंबर म्हणे त्यासी । सुखी राहे मजपासी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । क्रपाकरि भक्तावर ।।४।।

१३०१२०

क्रपा केलि ब्राम्हणासी । लग्न करुनि दिल्हे त्यासी ।।१।।
दिल्हे बांधोनीया घर । सेत दिल्हे पाईनभर ।।२।।
प्रपंच खर्च चालविति । वस्त्र भुषणे त्या देती ।।३।।
दास म्हणे चिदंबर । क्रपा करि विप्रावर ।।४।।

१३०१२१

तीघे पुत्र दील्हे त्यासी । नीत्य लावीले आभ्यासी ।।१।।
प्रत्यय दावीला वीप्रासी । आला होता दुरदेसी ।।२।।
क्रपाकरुनी तयाप्रती । दील्ही संतती संपती ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी हे आपार ।।४।।

१३०१२२

ब्राम्हण लावीला भक्तीसी । कळा दावीयेली ऐसी ।।१।।
कलयुगी आवतार । पुर्णब्रम्ह चीदंबर ।।२।।
नवे घालुनी प्रारब्द । कळा दावीली आघाध ।।३।।
दास म्हणे चीदंबर । लीला दावी तो आपार ।।४।।

१३०१२३

चरीत्र २५१

पद हींदु काहे किनो धीर चीदंबर ।।धृ।।
तुमबिन मेरो जीवलग कोन । कोनकु आवे पिर चीदंबर. ।।१।।
तीन लोकके तुम ही साई । किसे नमावु सीर चीदंबर ।।२।।
भुको प्यासो निरखत तुमकु । कोन खीलावे खिर चिदंबर ।।३।।
दास कहे प्रभु चित्त वुदासीन । मन भयो मेरो आधिर चिदंबर ।।४।।

१३०१२४

अभंग हींदु
कहालो चिदंबर राहा देखो तोरि । आस करो पुरि मेरी साई ।।१।।
चवदा भुवन तुमरि फिरत गवहि । मेरे बिरया भई भुल कैसी ।।२।।
आनाथ के नाथ साई आयो शरण । थिर करो मन मेरो प्रभु ।।३।।
दास कहे प्रभु नई मज चईन । बतलावो चरन येक बार ।।४।।

१३०१२५

यावे सर्वेश्वरा दिनाच्या कैवारा । कलयुगी आवतारा प्रगट व्हावे ।।१।।
यावे करुणाघना पतितपावना । पुरवी वासना चीदंबरा ।।२।।
पाहावीसी वाट देवा कोठवरी । दावी डोळेभरी रुप आता ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाचि माय । कोमळ ह्रदय तुझे देवा ।।४।।

१३०१२६

यावे बा दयाळा स्वामि विश्वपति । वर्णवी बा कीर्ती आखंडीत ।।१।।
न करी वुसीर यावे बा सत्वर । जाले बा आधीर मन माझे ।।२।।
करुणावंत धनि तुची त्रीभुवनि । आघटीत करणी तुजी देवा ।।३।।
दास म्हणे करि क्रपा आनाथासी । आवतार श्रीष्टीसी कळवि तुझा ।।४।।

न करीता वेळ यावे जगन्नाथा । तुझे हाती सत्ता सर्व आसे ।।१।।
घावे पावे आता त्रैलोकिच्या नाथा । जावो नेदि वृधा धावा करुनि ।।२।।
जालो मि उदास स्वामि तुजविन । न पडे चईन चीदंबरा ।।३।।
दास म्हणे माझी येवुदे करुणा । आवतार सगुणा स्वामीराया ।।४।।
१३०१२८

करितो प्रार्थना स्वामि सर्वगता । निवारि हे चिंता चिदंबरा ।।१।।
निवारि नीवारि स्वामी भवताप । आवतारप्रताप प्रगट करि ।।२।।
करुणावंत धनि तुचि त्रीभुवनी । आगाध करणी तुझी देवा ।।३।।
दास म्हणे कीती पाहावीसी वाट । देई आता भेट चीदंबरा ।।४।।
१३०१२९

सांभाळी सांभाळी आपुलि ब्रिदावळि । दावि चेंद्रमौळी रुप डोळा ।।१।।
करितो विनंती स्वामि करुणामुर्ति । येउ द्यावी चीती दया माझी ।।२।।
न करि वुसीर विश्वाच्या जनका । ब्रम्हंडनायका चीदंबरा ।।३।।
दास म्हणे वाट पाहातो नीसीदीनी । आवतार करणि कळवी देवा ।।४।।
१३०१३०

द्रावीड ब्राम्हण आला दर्षनासी । होता स्वामिपासि काहि दीवस ।।१।।
कुटुंब राहिले आसे दुरदेसी । विनंती स्वामिसी करितसे ।।२।।
कुटुंबाची वार्ता नसे स्वामिराया । जाणसि सखया आंतरिचे ।।३।।
दास म्हणे स्वामी म्हणति विप्रालागी । जावुनीया वेगी यावे आता ।।४।।

१३०१३१

म्हणति ब्राम्हणासी जावे त्वा घरासी । यावे कुटुंबासी घेवोनिया ।।१।।
विनवितो विप्र नजाय येथोनी । कुटुंब आनोनि देई येथे ।।२।।
हासोनिया स्वामि बोलति त्या वेळे । बोले भक्तिबळे ब्राम्हण हा ।।३।।
दास म्हणे वीप्र राहीला जवळि । आसे तो नीर्मळ भक्तराज ।।४।।

१३०१३२

ब्राम्हण तो येक घेवुनि घोडे मनुष्य । गेला तो घरास विप्राचिया ।।१।।
सांगे वर्तमान कुटुंबासी जाण । पत्र तो वाचुन दावीतसे ।।२।।
पाटवीला खर्च पंचविस होन । मुलेबाळे जाण घेवुनी यावे ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । ब्रम्हीचा पुतळा स्वामि माझा ।।४।।

१३०१३३

घेवोनिया आला विप्रकुटुंबासी । ठेवीले घरासी गावामाजी ।।१।।
जाली आसे भेट विप्राची ते जाण । पुसे वर्तमान कुटुंबासी ।।२।।
बोले विप्रकांता मज पाटविले । पत्र ते धाडीले तुम्ही आपुले ।।३।।
दास म्हणे विप्र नवल करि चीती । चिदंबर क्रती दावीतसे ।।४।। १३०१३४

पुसे कांतेलागी कोटे घोडे मुनुष्य । दावी तो द्रुष्टी विप्र मज ।।१।।
पाहु जाता कांता घोडे ब्राम्हणासी । न पडे द्रुष्टीसी धुंडाळीता ।।२।।
नवल करिती वुभयता जाण । आला तो म्हणे स्वामिपासि ।।३।।
आणीले कुटुंब चिदंबरराया । कळा हे सखया आघटीत ।।४।।
दास म्हणे लीला दावि चीदंबर । आनंत आपार कळा त्याची ।।५।। १३०१३५

चरीत्र २५२

पद हिंदु

काहालो पकडो धीर चिदंबर ।।धृ।।
थके हातपाव गल रहि काया । आखियन बहत हे नीर चिदंबर ।।१।।
नहि विध्या नहि खरचन दाम । तुमकु नहि मेरि पिर ।।२।।
नित्य प्रनावत करुणा भाकत । आय मिलो मेरे बिर ।।३।।
दास जनोंके मातापिता तुम । मन करो प्रभुजी थीर ।।४।। १३०१३६

आभंग हिंदु
गल रहि मेरि काया । तुमकु कैसी नावे दया ।।१।।
काहा तोडी देखु राहा । तुमकु धुंडु तो भी काहा ।।२।।
केसे भुल गये साई । तुमकु पिर मेरि नई ।।३।।
दास दिनोंके कैवारि । चिदंबर प्रित भारि ।।४।।

१३०१३७

यावे विश्वाच्या जनका । स्वामि ब्रम्हांडनायका ।।१।।
वाट पाहातो निसीदीनी । भुक लागलि नयनी ।।२।।
करुणावंत तुची धनी । मज येक त्रीभुवनि ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । भेट देई चिदंबरा ।।४।।

१३०१३८

होसी क्रुपेची तु माता । चीदंबरा प्राणनाथा ।।१।।
विनवितो वारंवार । दावि चरण सकुमार ।।२।।
धावे पावे वेगि आता । ब्रिद रक्षि जगन्नाथा ।।३।।
दास म्हणे यावे वेगी । पावे दिन जनालागि ।।४।।

१३०१३९-A

सांभाळावे ब्रिद आता । वेळ न करि आनंता ।।१।।
धावे पावे सर्वेश्वरा । दिनबंधु चिदंबरा ।।२।।
करुणावंत म्हणविसी । काय जाले माझेविसी ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । बटा न लावि ब्रिदास ।।४।।

१३०१३९-ए

नाहि नाहि मज कोन्ही । तुजवीण त्रीभुवनि ।।१।।
कीती देवु परिहार । माझे जाणसी आंतर ।।२।।
धावा करु कोठवरि । दया येवुदे आंतरि ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । वेगि यावे चिदंबरा ।।४।।

१३०१४०

यावे यावे विश्वपती । चिदंबरा क्रपामोर्ति ।।१।।
वेळ न करिता यावे । ब्रिद जतन करावे ।।२।।
दयावंत तुची येक । आनंत ब्रम्हांडनायेक ।।३।।
चिदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१३०१४१

स्वामी भेटीलागी जाण । आला परदेसी ब्राम्हण ।।१।।
आसे भाविक तो जाण । स्वामि पुढे लोटांगण ।।२।।
स्वामि म्हणती तयासी । काय ईछा आहे तुजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । पुसे विप्रासी वीच्यार ।।४।।

१३०१४२

विप्र म्हणे स्वामिलागि । आवतार तु कलयुगि ।।१।।
ऐसे ऐकुनिया जाण । आलो स्वामिसी शरण ।।२।।
आसे कुटुंबवछळ । माझा करि प्रतीपाळ ।।३।।
दास म्हणे चिदंबर । वीप्र वुभा जोडुनि कर ।।४।।

१३०१४३

स्वामि म्हणति तयासी । चिंता न करी मानसी ।।१।।
देतो निरोप तुजसी । घरि जावे आनंदेसी ।।२।।
योग क्षेम चालविता । चीदंबरा भवत्राता ।।३।।
दास म्हणे चिदंबर । आसे क्रपेच्या सागर ।।४।।

१३०१४४

देति निरोप विप्रासी । रुपय तिन दिल्हे त्यासी ।।१।।
दोन रुपय खर्चकरि । राहे आनंदेसी घरी ।।२।।
ऐसे विप्रासी सांगति । जाला आनंद त्याप्रति ।।३।।
चिदंबर दास म्हणे । आघटित स्वामिचे करणे ।।४।।

१३०१४५

ब्राम्हण गेला आपुले घरि । रुपये दोन खर्च करि ।।१।।
दुसरे दिवसी पाहातसे । रुपये तीन जैसे तैसे ।।२।।
कदा न सरति जाण । चिदंबर त्या प्रसन्न ।।३।।
दास म्हणे चिदंबर । दावि नाना चमत्कार ।।४।।

१३०१४६

चरित्र २५३

पद हींदु काहे किनो मन वुदास चीदंबर ।।धृ।।
दिनो सपनो नाहि समजे कछु । तुमसो मेरि आस चिद. ।।१।।
आरथ मनकु समजत नाहि । राखो आपने पास चिद . ।।२।।
नहि मुज भक्ती नहि मुज ग्यान । मन मो लग रहि आस चिद .।।३।।
दिन आनाथ के साई तुमही । मय तो तुमारो दास चीद. ।।४।।

१३०१४७

अभंग हिंदु
बतलावो चरण चिदंबर साई । तुम बिन नाहि जीवलग कोई ।।१।।
ज्यानो मरे मन कि आस माहाराज । लिनो कोने काज आवतार ।।२।।
कोन ज्याने आरथ सपने को साई । तुम बिन नाहि प्रिती मनकु ।।३।।
दास कहे मेरि आस पुर्ण करो । जलम वुधारो प्रभुजी आब ।।४।।

१३०१४८

नये वेळ करु दिनाच्या दयाळा । प्राण वुरला डोळा चिदंबरा ।।१।।
पतितपावन कलयुगि आवतार । आंत कोठवर ध्यावा आझुनि ।।२।।
करुणावंत तुम्ही म्हणवितो देवा । न येचि कणवा कैसा माझा ।।३।।
दास म्हणे माझी पुरवावि आस । भेटी आनाथास देई देवा ।।४।।

१३०१४९

नाही मज आशा ईतर जनाची । आस चरणाची तुझी देवा ।।१।।
न धरि मि चाड रंक मानवाची । आशा ही मनाची पुरवि कोण ।।२।।
तुम्हा ऐसा धनी नसे त्रिभुवनी । नीववीले मनी आभयदाने ।।३।।
दास म्हणे किति पाहाविसी वाट । देई मज भेट चिदंबरा ।।४।।

पाहातो मि वाट देवा सर्वकाळ । लागलि तळमळ तुजसाठि ।।१।।
न पडे चईन चित वुदासीन । दावि बा चरण चिदंबरा ।।२।।
येवु दे करुणा मज पतिताची । पावन ब्रीदाची लज्या रक्षी ।।३।।
दास म्हणे करुणा येउ दे ईश्वरा । भेटी चीदंबरा देई मज ।।४।।

१३०१५१

चिदंबरा होसी दीनाचा कैवारि । माझेविसी तरि काय जाले ।।१।।
कोण्या काजासाटी पाटविले देसी । आंत किति घेसी चीदंबरा ।।२।।
काय वुणे जाले सामर्थ्यासि तुम्हा । काहो पुरषोतमा वेळ केला ।।३।।
दास म्हणे रक्षी ब्रिद विश्वंभरा । भेटी चीदंबरा देई मज ।।४।।

१३०१५२

न करिता वेळ यावे विश्वनाथा । स्वामि तु समर्था चिदंबरा ।।१।।
प्रगट आवतार जाला कलयुगी । सत्य कळवि जगि मायबापा ।।२।।
क्षणेमाजी करसी ब्रम्हांडवुभारा । प्रणव वोंकारापासोनीया ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय जगासी । आवतारा आलासी चिदंबरा ।।४।।

१३०१५३

आला तो ब्राम्हण स्वामि दर्षनासी । बद्रिकाश्रमासी घर त्याचे ।।१।।
बद्रीकेदाराचा होता तो पुजारि । आला गंगोतरि घेवुनीया ।।२।।
चिदंबरापुढे घाली नमस्कार । स्वामि म्हणती थोर भक्तराज ।।३।।
दास म्हणे त्यासी करुनि सन्मान । घेतले ठेवोनि च्यारि दिवस ।।४।।
१३०१५४

रामेश्वरालागी पाटविला जाण । खर्चासी देवुन स्वामिराये ।।१।।
रामेश्वर यात्रा करुनिया आला । ठेवोनी घेतला येक मास ।।२।।
करितो प्रार्थना विप्र स्वामिलागि । आज्ञा मज वेगि द्यावि आता ।।३।।
दास म्हणे बोले चिदंबर त्यासी । इछा हे चीतासी काय सांगे ।।४।।
१३०१५५

विप्र म्हणे स्वामि लग्न जाले नाहि । किर्ति ऐकोनि पाहि आलो येथे ।।१।।
पाहिजे ते द्रव्य लग्नालागि फार । जातिचा विचार कठिन आम्हा ।।२।।
बोले चिदंबर चिंता तु न करि । जावुनि लग्न करि सुखे आता ।।३।।
दास म्हणे देति नीरोप विप्रासी । खिचडी दिल्हे त्यासी सेर येक ।।४।।
१३०१५६

दिल्हे विप्रालागि कुंकु ते खिचडि । बांधोनि गाटोडी आपुल्या हाति ।।१।।
न सोडी वाटेसी सांगीतले त्यासी । जावुनि घरासी लग्न करि ।।२।।
विप्र आनंदेसी गेला तो सत्वर । जाले ते भंगार घरि जाता ।।३।।
विप्र आनंदेसी करुनिया लग्न । म्हणे यावे फिरुन दर्शनासी ।।४।।
जाला तो द्रुष्टांत तया ब्राम्हणासी । यावे दर्शनासी आज्ञेवरुनी ।।५।।
दास म्हणे धाडी पत्र तो लीहोन । घ्यावे बोलावोन चीदंबरा ।।६।।

१३०१५७

चरित्र २५४

पद हिंदु

करणी आपार चिदंबर ।।धृ।।
रंकको राव कर बतलावे । नहि लगे छन यकबार चिदंबर ।।१।।
माटी को सुंनो देखत किनो । प्रभुजि पतित वुध्धार चीदंबर ।।२।।
थुवर करत कलप बीरखा । चिंतत भये आकार चीदंबर ।।३।।
दास जनोके प्रेम ये सुनके । चरनन दिनो थार चिदंबर ।।४।।

१३०१५८

अभंग हिंदु

साई तुमारो मय दिन । मुजे बतावो चरन ।।१।।
तुम बिन नहि आस । कोन जाने भुक प्यास ।।२।।
राहा देखो रातदिन । कोन छुडावे बंधन ।।३।।
दास दिन आयो सरन । चिदंबर ब्रम्हपुर्ण ।।४।।

१३०१५९

चीदंबर माहाराजा । शुध्धभाव करि माझा ।।१।।
नित्य करितो प्रार्थना । दावी रुप तु सगुणा ।।२।।
किति वाट पाहाविसी । चिदंबरा रुषिकेशी ।।३।।
तारि दास आनाथासी । क्रपावंत माय होसी ।।४।।

१३०१६०

करुणावंत स्वामिराया । माझी येउ द्यावि दया ।।१।।
तुजऐसा क्रपावंत । दुजा नसे ब्रम्हांडात ।।२।।
तुझाविण प्रियकरा । चईन न पडे ईश्वरा ।।३।।
दासाचीया प्राणेश्वरा । दावि रुप चीदंबरा ।।४।।

१३०१६१

नाहि नाहि मज चईन । स्वामिराया तुजविन ।।१।।
दावि दावि रुप सगुण । माझे निववि हे मन ।।२।।
तारि तारि दिनालागि । कळवि आवतार जगी ।।३।।
पावे पावे दासालागी । चीदंबरा यावे वेगी ।।४।।

१३०१६२

नको नको वेळ करु । कोठवरी धिर धरु ।।१।।
दावि दावि रुप सगुण । तुज आलो मि शरण ।।२।।
विनवितो वांरवार । माझे निववि आंतर ।।३।।
दास म्हणे सर्वगता । चीदंबरा यावे आता ।।४।।

१३०१६३

करुणावंत माय होसी । पावे दिन आनाथासी ।।१।।
वाट पाहु कोठवरी । दया येउ दे आंतरी ।।२।।
किति पाहाविसी वाट । देई आनाथासी भेट ।।३।।
दास म्हणे सर्वेश्वरा । प्रगट व्हावे चिदंबरा ।।४।।

१३०१६४

द्रावीड देसीचा ब्राम्हण । आला दर्शनासी जान ।।१।।
करि विनंति स्वामीसी । तुझी मुर्ति दे पुजेसी ।।२।।
निश्चय आसे तुझे पाई । साक्ष आहेसी ह्रदई ।।३।।
दास म्हणे चीदंबर । करि विप्रासि वुत्तर ।।४।।

१३०१६५

चिदंबर विप्रालागि । म्हणे होसी राजयोगी ।।१।।
भक्तराया तु ब्राम्हण । काय मागसी हे दान ।।२।।
म्हणे विप्र तो स्वामिसी । मज प्रिय तुचि होसी ।।३।।
दास म्हणे चिदंबर । क्रपा करि विप्रावर ।।४।।

१३०१६६

जाले प्रसन्न विप्रासी । देती निरोप तयासी ।।१।।
दिल्हा नारेळ प्रसाद । कळा दाविति आगाध ।।२।।
दिल्हा निरोप विप्रासी । जावे म्हणति घरासी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी नाना चमत्कार ।।४।।

१३०१६७

गेला घरासी ब्राम्हण । पुजी नारेळ तो जाण ।।१।।
दुसरे दिवसी पुजुजाता । न दिसे नारेळ पाहता ।।२।।
स्फटिकाचा तो ईश्वर । द्रिष्टि देखिला समोर ।।३।।
करि नवल चितासी । बोलाविले ब्राम्हणासी ।।४।।
दास म्हणे चिदंबर । दावि कौतुक ईश्वर ।।५।। १३०१६८

आभिषेक पुजा करिता । लिंग वाढे त्या देखता ।।१।।
आक्रा आंगुळीप्रमाण । पिंडीसहित जाला बाण ।।२।।
लिला दावी नानापरि । आवतार श्रीष्टीवरि ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाले प्रसन्न विप्रास ।।४।। १३०१६९

चरित्र २५५

कब लो देखु वाट चिदंबर ।।धृ।।
तेज के आन्न गल रहे प्राण । जलम जलम कि गाट चिद. ।।१।।
तुमबिन मुजकु आवर न भावे । कर रहे जीकी साट चिद. ।।२।।
पतित हु पापी नहि भक्तिग्यान । कुलहिन ज्यातको नाट चिद. ।।३।।
दास पतितकि छिन भई काया । पकड न च्याहत खाट चिद. ।।४।। १३०१७०

अभंग हींदुस्थानी
काहा तोडी राहा देखु स्वामिराजा । राखे मेरि लज्या चिदंबर ।।१।।
चित वुदासीन न पडे चयन । तुम्हारे काज आन्नत्याग किनो ।।२।।
कैसी नावे दया प्रभु साई तुमकु । कोन पतितकु वुधारत ।।३।।
दास कहे ब्रिद पावन तुम्हारो । भोग रह्यो मेरो काहालो स्वामि ।।४।।
१३०१७१

।।पत्र।।

आनंत आपार ब्रम्ह निर्विकार । स्वामि चिदंबर सगुण ब्रम्ह ।।१।।
कलयुगि जाला पुर्ण आवतार । आगम्य विच्यार वेदादिका ।।२।।
न कळे ब्रम्हादिका आनंत ह्या कळा । ब्रम्हीचा पुतळा स्वामी माझा ।।३।।
तयाचिया कुसि इंद्राचा आवतार । स्वामि दिवाकर नाम साजे ।।४।।
दया क्षमा आंगी क्रपेचा सागर । दिन जनावर बहुता परि ।।५।।
तयाचिया चरणि साष्टांग नमन । प्रेमभावे करुण वारंवार ।।६।।
क्रपा करुणि स्वामि निरोप दिल्यावर । आलो करविर क्षेत्रालागी ।।७।।
किल्यामाजी होतो येक मास जाण । आच्यार्य संस्छाना तेरा दिवस ।।८।।
त्यावुपरि आलो श्रीपाद स्छळासी । नरसिंहवाडीसी क्रष्णातिरि ।।९।।
कासिकर स्वामि तेणे आग्रह करुणी । घेतले ठेवोनी आठ दिवस ।।१०।।
तयावरि आलो सांगलिसी जाण । होतो तया स्छाना तिन रात्री ।।११।।

दोन दिवस होते मुकाम मिरजेसी । क्षेत्र पंढरिसी आलो मग ।।१२।।
संत सज्जनाची जाली आसे भेटी । त्याणी ज्ञानगोष्टी प्रछ्या केल्या ।।१३।।
चीदंबरे त्याचे केले समाधान । भजन किर्तन गरुडपारि ।।१४।।
चिति होते जावे वाई पुण्यावरुणी । देहु आळंदि करुनि जनस्छाना ।।१५।।
आज्ञा हे द्रष्टांती जाली ते रात्रीसी । निट वुत्तरेसी जावे म्हणोनी ।।१६।।
पांडुरंगपासी आवतार दिवसी । वुतरलो नावेसी चंद्रभागा ।।१७।।
किले नगरासी होतो तीन दिवस । आलो निधिवास क्षेत्रालागी ।।१८।।
प्रवरा तीरासी मोहनी राजापासी । आठ दहा दिवस मी नीधते जाले ।।१९।।
वृध्ध गंगेतीरी जन्म भुमिकेसी । बाभुळगांवासी आठ दिवस ।।२०।।
क्षेत्र पुण्यस्तंभी होतो तीन दिवस । फिरोनी ग्रामास बाभुळगांवी ।।२१।।
होते बरोबर आभंग सवालक्ष । ठेवि या स्छळास आज्ञा जाली ।।२२।।
आभंग ठेवोनि आलो येवल्यावरुनी । विजया दशमि करुनि मालेगावी ।।२३।।
चिदंबर जयंति केलि चोपड्यास । होतो यकविस दिवस तयाठाई ।।२४।।
विध्यांद्रि पर्वत वुतरोनी घाट । आलो धुळकोट मुकामासी ।।२५।।
मंडळी आलि बा पुत्रा स्त्रि सहित । जालि त्या गावात भेटी त्याची ।।२६।।
महेश्वरि आलो नर्मदा तीरास । होतो आठ दिवस तया ठाई ।।२७।।
तेथुनिया पुढे आलो ईंदुरासी । तात्या दिवानासी भेट जाली ।।२८।।
चिदंबरभक्त भाग्योदय आसे । त्याणि ठेवीलेसे आग्रह करुनी ।।२९।।
आज्ञा हे प्रभुची निघावे सत्वर । केले म्या वत्तर त्याचेपुढे ।।३०।।

बहुत लोभ त्यांचा ठेवीले सहा दिवस । वुध्या मुकामास जातो पुढे ।।३१।।
जाले ते वर्तमान निवेदिले चरणी । पुढे आज्ञेवरुनि वर्तनुक ।।३२।।
बद्रीकेदारासी जावोनिया यावे । द्रुष्टांताचे भावे आज्ञा ऐसी ।।३३।।
पक्ष आथवा मास हस्तनापुरास । कासी प्रयागास यावे मग ।।३४।।
न कळे हे आज्ञा कोन वेळे कैसी । सीधांत पत्रासी लिहीता नये ।।३५।।
क्रौंच पक्षी जैसे जाति दुरदेसी । स्मरणे बाळासी तृप्ती होय ।।३६।।
पहावे चरण द्रिष्टी ऐसा मनोदय । न चले उपाय आज्ञेपुडे ।।३७।।
तयापरि स्वामि करिता स्मरण । लिहीने कारण नलगे येथे ।।३८।।
ब्राम्हण मंडळि सर्व लहानथोर । चरणी नमस्कार दंडवत ।।३९।।
सत्रासे चव्हेचाल मार्गसिर्ष चौथी । वध्य त्रयोदसि पत्र लिहीले ।।४०।।
दास राजाराम लोटांगण चरणि । चिदंबर करणी आघटीत ।।४१।।

Very important letter . It discloses the orders of His holiness Lord Chidambar to keep the Abhangs at Babulgoan Ganga .

धावे पावे आता स्वामि प्राणनाथा । तुझे हाति सता सर्व आसे ।।१।।
यावे देवराया करि मज दया । जावु नेदि वाया धावा करुनी ।।२।।
सांभाळी सांभाळी आपुली ब्रिदावळी । दावी चंद्रमौळि रुप डोळा ।।३।।
दास म्हणे करी क्रपा येकवेळ । निवारि तळमळ चिदंबरा ।।४।। १३०१७२

याबे सर्वगता स्वामि क्रपावंता । निवारि हे चींता चिदंबरा ।।१।।
ऐकॆ बा विनंती स्वामि करुणापति । दावि सगुणमुर्ती तुझी दॆवा ।।२।।
न करिता वॆळ यावॆ बा श्रीधरा । क्रपॆच्या सागरा स्वामिराया ।।३।।
दास म्हणॆ होसी माय आनाथासी । वॆळ का लावीसी स्वामीराजा ।।४।।

१३०१७३

करुणावंत स्वामि दावि नीजरुप । निवारि भवताप चीदंबरा ।।१।।
यॆउ दे करुणा क्रपॆच्या निधाना । आवतार सगुणा स्वामिराया ।।२।।
नित्य वुठोनिया करितो प्रार्थना । पावॆ मज दीना ऐशावॆळॆ ।।३।।
दास म्हणॆ कीती लावीसी वुसीर । जालॆ हे आधीर मन माझॆ ।।४।।

१३०१७४

करुणॆची माता होसी बा आनंता । किति भगवंता वाट पाहु ।।१।।
निवारि निवारि संकट ईश्वरा । भेटी चिदंबरा दॆई मज ।।२।।
पाहातो मी वाट दिवसरात्र पाही । यॆवु दे ह्रदई दया माझी ।।३।।
दास म्हणॆ मज न पडॆ चईन । निववि हे मन स्वामिराजा ।।४।।

१३०१७५

दिल्हे आभयदान निवविले मन । केले समाधान चित देवा ।।१।।
आभयदानाचि लाविलिसे आशा । वाट जगदिशा पाहु कीती ।।२।।
आज वुद्या म्हणता बहुत दिवस जाले । दावी बा पावुले वेगी आता ।।३।।
चिदंबरदास धरोनीया आस । करोनी वुपवास वाट पाहे ।।४।।

१३०१७६

गोदावरी तीरी चिदंबरभक्त । ब्राम्हण विरक्त बहुत आसे ।।१।।
घडावे दर्षन करितो निर्षन । त्यागोनिया आन्न वाट पाहे ।।२।।
चिति वुदासीन करितसे ध्यान । दावी बा चरण चीदंबरा ।।३।।
दास म्हणे करुणा आली ब्राम्हणाची । दावी द्रष्टांताची प्रचीती ते ।।४।।

१३०१७७

येवोनि द्रुष्टांती सांगे चीदंबर । वाट कोठवर पाहासी म्हणसी ।।१।।
वीप्र बोले स्वामि देह वोवाळुनी । जन्म ते घेवोनी पाहीन मी ।।२।।
दुरवरि पाहा स्वामिराजा आता । निमित्य हे माथा तुमच्या देवा ।।३।।
दास म्हणे स्वामि सगुण आवतार । ब्रिद चीदंबर रक्षीतसे ।।४।।

१३०१७८

ज्याग्रत होवुनी पाहे तो ब्राम्हण । चिदंबर सगुण पुढे उभा ।।१।।
आनंद विप्रासी सग्दद होवुन । जाय लोटांगण स्वामिपुढे ।।२।।
चिदंबर वुटवी धरोनिया हाती । आळींगण देती ब्राम्हणासी ।।३।।
दास म्हणे भाग्य आनंत जन्मीचे । चिदंबर वाचे बोलतसे ।।४।। १३०१२९

म्हणती ब्राम्हणासी चिदंबर जाण । जालो प्रसन्न तुजलागी ।।१।।
माग म्हणति काहि ईछा आसेल मनी । देतो याच क्षणी तुजलागी ।।२।।
विप्र बोले स्वामि वुत्तम तुजविण । दुजे नसे आन मागु काई ।।३।।
घडावे दर्शन आपुले आखंडीत । ईछा हे मनात ईतकि स्वामी ।।४।।
दास म्हणे बोले चिदंबर त्यासी । आसे तुजपासी सदोदीत ।।५।। १३०१८०

चरित्र २५६

पद हिदुं ।। कोन खबर लो मेरि तुम बिन ।। धृ।।
आशा तृष्ण कोन पुरावे । कोनकु जावु शरन तुमबिन ।।१।।
त्रीभुवन प्रभुजी कोन चलावे । कोनको करु मय ध्यान तुमबिन ।।२।।
कोन पतितकी राखे लाज । कोन करे मेरे काज तुमबिन ।।३।।
चिदंबर साई दासके प्रभु । आस पुरावे कोन तुमबिन ।।४।। १३०१८१

साई बतावो चरन । आयो तुमकु सरन ।।१।।
तुम बिन प्रिय कोई । मुजे तिन लोकमे नहि ।।२।।
मेरे मनको साक्षी कोन । कहो साई तुमबिन ।।३।।
दास राहा देखे तुमारि । पुरन आस करो मेरि ।।४।।

१३०१८२

यावे दिनाच्या दयाळा । चिदंबरा विश्वपाळा ।।१।।
दावि रुप तुझे डोळा । माझा येउ दे कळवळा ।।२।।
विनवितो वेळोवेळा । करि आनंद सोहळा ।।३।।
होसि दासाचा जीव्हाळा । चिदंबरा घननीळा ।।४।।

१३०१८३

यावे यावे विश्वपती । माझी पुरवि मनोवृती ।।१।।
करुणा येवु दे दिनाची । माय होसी आनाथाची ।।२।।
वाट पाहातो नीसीदिनी । भुक लागली नयनी ।।३।।
दास म्हणे करुणाकरा । भेट देई चीदंबरा ।।४।।

१३०१८४

विनवितो वारंवार । माझे निववि आंतर ।।१।।
वाट पाहु कोठवर । होसी क्रपेचा सागर ।।२।।
करुणावंत म्हणविसी । काय जाले माझेविसी ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । दावी चरण ईश्वरा ।।४।।

१३०१८५

चिदंबरा विश्वपति । दया येवु द्यावी चीती ।।१।।
होसी करुणेची मुर्ती। तुझी वर्णवि बा कीर्ती ।।२।।
माय होसी आनाथासी । स्वामी वेळ का लावीसी ।।३।।
चीदंबरा म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१३०१८६

धावे पावे वेगी आता । चिदंबरा प्राणनाथा ।।१।।
होसी करुणेची माता । तुझे हाती सर्व सता ।।२।।
वाट पाहावीसी कीती । दया येवु द्यावी चीती ।।३।।
दास म्हणे प्राणेश्वरा । दावी रुप चीदंबरा ।।४।।

१३०१८७

ब्राम्हण द्राविड देसीचा । शुध्धभाव हो तयाचा ।।१।।
आला स्वामि दर्शणासी । करी विनंती स्वामिसी ।।२।।
माझी पुरवावी आशा । चीदंबरा जगदिशा ।।३।।
म्हणे चीदंबर दास । विप्र विनवी स्वामीस ।।४।।

१३०१८८

स्वामी म्हणती विप्रासी । काय ईछा आहे तुजसी ।।१।।
आसे सांभभक्त जाणा । त्याची भेटीची वासना ।।२।।
सिवसांभ गौरिहार । व्हावा द्रिष्टीसी गोचर ।।३।।
दास म्हणे चीदंबर । ईछा पुरवितो ईश्वर ।।४।।

१३०१८९

स्वामी म्हणती तयासी । ईश्वर भेटतो तुजसी ।।१।।
मी तो गरीब ब्राम्हण । येथे भावची प्रमाण ।।२।।
जावे आपुल्या बिर्हाडासी । ईश्वर भेटेल तुजसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । रात्री दावी चमत्कार ।।४।।

१३०१९०

जाले ब्राम्हणासी श्वप्न । भेटी आले त्रिनयन ।।१।।
ब्राम्हण ज्याग्रत होवुन । आला बाहेर वुठोन ।।२।।
नंदीसहीत ईश्वर । येता देखिले समोर ।।३।।
प्रकाश पडीलासे जाण । गेला त्याचे जवळुन ।।४।।
झाकीले विप्राचे नयन । भयभित आंतकरण ।।५।।
स्वारि गेली ते नीघोन । विप्रे वुघडीले नयन ।।६।।
मग वुमजला चीती । होती हो ईश्वरपार्वती ।।७।।
दास म्हणे चीदंबर । निव़वी विप्राचे आंतर ।।८।।

१३०१९१

चरित्र २५७

पद हिंदुस्छानी - नाम जपे निसिदिन चीदंबर ।।धृ।।
नाममाहातम हरे सब बिघन । काहे करत हे दिन चीदंबर ।।१।।
दुर देस मे लाय परदेस । काह बतावत बीघन चिदंबर ।।२।।
लिनो आवतार काहे के काज । काहे ब्रिद चरन चिदंबर ।।३।।
दास कहे प्रभु पतित वुधारन । दुर करो बिघन चीदंबर ।।४।।

१३०१९२

आभंग हिंदुस्छानी -
नहि मुजको ईसाई तुम बिन । दुर करो बिघन चीदंबर ।।१।।
निशिदिन तुमरो करत हे ध्यान । बतलावो विघ्न काहे काजे ।।२।।
राखो बिरद आपने चिदंबर साई । तुमबिन नहि आवर चित ।।३।।
दास कहे किनको आधार तुमबिन । बतलावो चरन चीदंबर ।।४।।

१३०१९३

यावे सर्वेश्वरा दिनाच्या कैवारा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।१।।
न करि वुसीर दिनाच्या दयाळा । येवु दे कळवळा चीदंबरा ।।२।।
नाहि नाहि नाहि प्रिय तुजविण । येई बा धावोनी चिदंबरा ।।३।।
दास म्हणे सारी द्रुष्ट हे प्ररब्ध । कळा हे आगाध प्रगट करि ।।४।।

१३०१९४

चिदंबरा करि दया दिनावरि । दावि डोळेभरि रुप सगुण ।।१।।
निवारी निवारी संकट ईश्वरा । भेटी चिदंबरा देई मज ।।२।।
पावे पावे पावे दिन आनाथासी । क्रपावंत होसी मायबापा ।।३।।
दास दिनालागी रुप दावी आता । स्वामि क्रपावंता चीदंबरा ।।४।।

१३०१९५

तुजविण प्रिय नेणे मि आणीक । जाणसी तु देख आंतरिचे ।।१।।
नलगे परिहार देणे बा तुजसी । आंतर जाणसी त्रैलोक्याचे ।।२।।
भाकीतो करुणा न ये तुज्या मना । ब्रिद नारायणा रक्षी आता ।।३।।
दास म्हणे होसी आनाथाची माय । कोमळ ह्रदय तुझे देवा ।।४।।

१३०१९६

करुणावंत धनी तुची त्रीभुवनी । आवतार करणी प्रगट करी ।।१।।
नको वेळ करु आनाथाचे आई । क्रपादान देई भेटी मज ।।२।।
पाहातो मी वाट बैसोनि नीकट । आनाथासी भेट देई देवा ।।३।।
दास म्हणे करि क्रपा येक वेळ । निवारि तळमळ स्वामिराया ।।४।।

१३०१९७

यावे सर्वेश्वरा स्वामि चीदंबरा । आनाथासी करा दया आता ।।१।।
सांभाळी सांभाळी ब्रिद विश्वपति । वर्णवी बा किर्ति आखंडीत ।।२।।
पतितपावन आवतार कलयुगी । कळवावे जगी प्रखर देवा ।।३।।
दास म्हणे तुम्हा नलगे सांगणे । प्रगट बा होणे चीदंबरा ।।४।।

१३०१९८

समुद्र तिरिचा आला तो ब्राम्हण । घाटाखाले जाण घर त्याचे ।।१।।
कुटुंब घेवुन आला स्वामिपासी । विनंती पायासि करितसे ।।२।।
म्हणे स्वामिराया करि मज दया । कुटुंब सखया रक्षी आता ।।३।।
दास म्हणे स्वामी बोलती विप्रासी । चिंता हे मनासी करु नये ।।४।।

१३०१९९

बोलविला विप्र क्रपा केलि त्यासी । जोंधळे पदरासी बांधीयेले ।।१।।
च्यार सेर धान्य दिल्हे ते बांधोनी । निरोप देवोनी धाडीताती ।।२।।
पाटविला घरि कुटुंबसहीत । जोंधळे पदरात बांधुन दिल्हे ।।३।।
दास म्हणे गेला ब्राम्हण घरासी । पुजी देवापासी जोंधळे ते ।।४।।

१३०२००

दुसरे दिवसी विप्र सोडोनी पाहात । जोंधाळ्याचे होत मोती सर्व ।।१।।
देखोनी ब्राम्हण हर्ष जाला बहुत । जवळि बोलवीत कुटुंबासी ।।२।।
आश्चर्य ते चीती नवल करीती । जोंधळ्याचे मोती केले देवा ।।३।।
धन्य चीदंबरा कलयुगी आवतारा । दासाच्या कैवारा प्रगट होसी ।।४।।

१३०२०१

द्रष्टांती येवुन सांगती वीप्रासी । न सांगे कोणासी प्रत्यय हा ।।१।।
भाग्य तुझे थोर होसी भक्तराज । चिदंबरे काज पुर्ण केले ।।२।।
विप्र आनंदेसी सांगे कुटुंबासी । न सांगे कोणासी आज्ञा ऐसी ।।३।।
दास म्हणे लिला दावि चीदंबर । कलयुगी आवतार चीदंबर ।।४।। १३०२०२

चरित्र २५८

पद हिंदुस्छनी तुम बिन चित वुदास चीदंबर ।।धृ।।
नहि मुज बहन मुज नहि भाई । तुमसो मेरि आस चीदंबर ।।१।।
तीनलोक मे कोन वुधारे । तुमरि पकरि कास चीदंबर ।।२।।
पावन नाम साजे तुमकु । रह्यो चरण के पास चीदंबर ।।३।।
दास जनोकु प्रित पियारि । दुजो नाये सास चीदंबर ।।४।। १३०२०३

अभंग हिंदूस्थानी
साई बतावो चरन । तुम बिन वुदासीन ।।१।।
मातपिता बहनभाई । तुम बिन दुजो नहि ।।२।।
देव गुरु कुल साई । तुमही तिनलोकमाहि ।।३।।
दास कहे चिदंबर । व्यापक रहे चराचर ।।४।। १३०२०४

चिदंबरा प्राणनाथा । सगुण रुप दावी आता ।।१।।
वाट पाहातो नीसीदीनी । दया येवु द्यावी मनी ।।२।।
करुणावंत म्हणवीसी । काय जाले माझेवीसी ।।३।।
चीदंबर म्हणे दास । माझी पुरवावी आस ।।४।।

१३०२०५

वाट पाहु कोठवरि । जालो वुदास आंतरि ।।१।।
दावि रुप डोळेभरि । चिदंबरा नरहरि ।।२।।
व्यापक तु चराचरि । दिन आनाथासी तारि ।।३।।
दास आनाथ पदरि । प्रगट आवतार करि ।।४।।

१३०२०६

वेळ करु न ये आता । चिदंबरा बा आनंता ।।१।।
तुझे हाती सर्व सता । वेळ न करी सर्वथा ।।२।।
दुजा नाही बा आसरा । तुजविण चिदंबरा ।।३।।
दासाचीया प्रीयकरा । दावी चरण ईश्वरा ।।४।।

१३०२०७

याचे याचे करुणाघना । स्वामि पतितपावना ।।१।।
दावि रुप तु सगुणा । माझी पुरवि वासना ।।२।।
वेळ न करिता याचे । दिनालागि सांभाळावे ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । दया आनाथासी करा ।।४।।

१३०२०८

माय होसी आनाथासी । दावि रुप रुषीकेसी ।।१।।
तुज दया नये कैसी । आंत कोठवरी घेसी ।।२।।
वेळ करु न ये आता । भेटी देई भगवंता ।।३।।
दास म्हणे चीदंबरा । व्हावे प्रगट ईश्वरा ।।४।।

१३०२०९

विप्र आला दर्शनासी । करि विनंती स्वामीसी ।।१।।
दरिद्रे बहुत पीडीले । चरण स्वामीचे देखीले ।।२।।
जाला आनंद तो चीता । भेटी जाली भगवंता ।।३।।
दास म्हणे चीदंबर । त्यासी म्हणती भक्त थोर ।।४।।

१३०२१०

ब्राम्हण घेतला ठेवोन । करि पंक्तिसी भोजन ।।१।।
ठेवियला आठ दिवस । देती नीरोप तयास ।।२।।
दीली दाल येक सेर । कुंकु देती हातावर ।।३।।
चीदंबर दास म्हणे । आघटीत देवाचे करणे ।।४।।

१३०२११

स्वामी म्हणती विप्रासी । दाळ न सोडी वाटेसी ।।१।।
धरि नेवुनीया जाण । पुजा करि भावेकरुन ।।२।।
खुण कळलि विप्रास । गेला आनंदे घरास ।।३।।
दास म्हणे चिदंबर । कळा दावीतो ईश्वर ।।४।।

१३०२१२

ब्राम्हण जावुनी घरासी । पुजा करि आनंदेसी ।।१।।
गाठ पाहीली सोडुन । जाले दाळीचे ते होन ।।२।।
जाला आनंद विप्रासी । लिला दावि रुषीकेसी ।।३।।
दास म्हणे चीदंबर । दावी नाना चमत्कार ।।४।।

१३०२१३

चरित्र २५९

पद हींदुस्थानी.............दरसन कि मुज आस चिदंबर ।।धृ।।
आवर न भावे कुछ मेरे मन । आय रह्यो परदेस चीदंबर ।।१।।
जीत देखुवत देखत तुमकु । नहि मुजे देश विदेश चीदंबर ।।२।।
दुनया फिरत बडे बडे तिरथ । किरत वर्णत वाके पास चीदंबर ।।३।।
आस पुरावो शरनमे आयो । चरन बलहारि दास चीदंबर ।।४।।

१३०२१४

अभंग हींदुस्थानी
चिदंबर प्रभु आयो तुमकु शरन । बतलावो चरन आनाथकु ।।१।।
पतितपावन नाम तुमकु साजे । ब्रीरदावलि गाजे तीन लोक ।।२।।
तुम ऐसो साई चवदा भुवन नहि । मनुख मेरि देही बरुणुका हालो ।।३।।
फट गई जीभ सहसर मुख । व्हा दास मुरख बरने कैसो ।।४।।

१३०२१५

सर्वाठाई आसे स्वामि चीदंबर । श्रीष्टीवरि थोर क्षेत्र नाना ।।१।।
आणीले चीदंबरा वुज्जन नगरि । आवंतीकापुरि नाम साजे ।।२।।
बारा जोतलिंग दैवत हे थोर । महंकाळेश्वर वुज्जनीचा ।।३।।
दास म्हणे शरण महंकाळेश्वरा । भेटी चिदंबरा करुन देई ।।४।।

१३०२१६

काळाचा नियंता महंकाळेश्वर । न लगे आंतपार देवादिका ।।१।।
आनंतब्रम्हांड चालवी जो काळ । वंदिजे त्रिकाळ महंकाळ ।।२।।
महंकाळेश्वरा तुझे नाम घेता । कळावरि सता चाले त्याची ।।३।।
चिदंबर दास आलो म्हणे शरण । दावि बा चरण आनाथासी ।।४।।

१३०२१७

सक्रंमण दिवस मार्गसिर्ष पौष । सरला क्षयमास येथुनीया ।।१।।
पुण्यशिळ राजा विक्रम नगरि । आलो क्षीप्रातीरि तेची दिवसी ।।२।।
मुका तो केला राम मंदिरासी । क्षिरसागर तटासी तीर्थाजवळि ।।३।।
दास म्हणे स्वामी आलो वुतरायण । दावी बा चरण चीदंबरा ।।४।।

१३०२१८

येवुदे करुणा आझूनि तरि माझी । ब्रिदावळि तुझी रक्षी देवा ।।१।।
करितो प्रार्थना क्रपेच्या निधाना । आवतार सगुणा चिदंबरा ।।२।।
करुणेचि माता होसी बा आनंता । का हो क्रपावंता वेळ केला ।।३।।
दास म्हणे किती आंत घेसी आझुनी । दावी रुप नयनी चीदंबरा ।।४।।

१३०२१९

वुज्जनि नगराहुन आला तो ब्राम्हण । दर्शनालागुन स्वामिचीया ।।१।।
करितो प्रार्थना चीदंबरालागी । आवतार जगि प्रगट तुझा ।।२।।
मज आनाथासी पावे स्वामिराया । देई बा सखया पुत्रदान ।।३।।
दास म्हणे विप्र जोडोनीया कर । वुभा तो समोर स्वामिपुढे ।।४।।
१३०२२०

ऐकोनि विप्राचे बोल करुणेचे । ह्रदय स्वामिचे कळवळले ।।१।।
प्रसन्न होवुनि बोले चीदंबर । देतो हा ईश्वर पुत्र तुज ।।२।।
किति व्हावे पुत्र सांगे तु मजसी । चिंता का करिसी पुत्राविसी ।।३।।
दास म्हणे भाग्य आले उदयासी । चिदंबर त्यासी क्रपा करि ।।४।।
१३०२२१

येक मास विप्र घेतला ठेवोनी । मुहुर्त पाहुनी बोलविला ।।१।।
प्रसाद नारेळ देवोनीया त्यासी । बोले आनंदेसी चिदंबर ।।२।।
चौघे पुत्र होती तुजलागि देख । भोगिसी तु सुख संततिचे ।।३।।
दास म्हणे दिल्हा निरोप विप्रासी । गेला आनंदेसी आपुल्या घरि ।।४।।
१३०२२२

घरि येवुनिया सांगे कुटुंबासी । प्रसन्न आपणासी देव जाला ।।१।।
मागवया गेलो येक पुत्रदान । देतो चौघेजण म्हणे देव ।।२।।
प्रसन्न तो जाला धनि चिदंबर । कलयुगि आवतार प्रगट आसे ।।३।।
दास म्हणे जाले पुत्र त्या विप्रासी । आला दर्शनासी चौथे वर्षि ।।४।।

१३०२२३

येवुनीया माहाव्दारि घालि लोटांगण । सांगे वर्तमान आनंदाचे ।।१।।
स्वामि म्हणति त्यासी भक्तराज थोर । प्रसन्न ईश्वर जाला तुज ।।२।।
संतती संपति दिल्हि बा तुजसी । जावे आनंदासी घरि आपुल्या ।।३।।
दास म्हणे लिला करि चिदंबर । कलयुगि आवतार स्वामि माझा ।।४।।

१३०२२४

चरित्र २६०

लिहिले---पद हिंदु............लगहि मेरे मन चिदंबर ।।धृ।।
भक्त जनोकि किरत सुनके । लाज आवत मेरे मन चिदंबर ।।१।।
भक्त कल्हावो तुमने मुजकु । परचित मानत कोन चिदंबर ।।२।।
पुरणब्रम्ह कलजुग आये । किरत किनो बरवान चिदंबर ।।३।।
दास कहे भक्त किजो साच । प्रभु बतावो चरन चिदंबर ।।४।।

१३०२२५

अभंग हिंदुस्थानी
देखो राहा निसदिन । प्रभु बतावो चरन ।।१।।
आवतार तुम सरगुन । किरत करावो बखान ।।२।।
नीकसे देस मय बिदेस । साई पुरावो तुम आस ।।३।।
मय तो पतित कि रास । सत्य करो चीदंबर दास ।।४।।

१३०२२६

चिदंबर स्वामीराजा । हेत पुरवि तु माझा ।।१।।
दावि चरण ईश्वरा । स्वामिराया चिदंबरा ।।२।।
दया आनाथासी करा । पुर्णब्रम्ह आवतारा ।।३।।
दासाचीया प्रीयकरा । प्रगट व्हावे चिदंबरा ।।४।।

१३०२२७

धावे पावे दयार्णवा । तारि तारि भवार्णवा ।।१।।
स्वामि देवाचीया देवा । माझा येवुदे कणवा ।।२।।
चिदंबरा सदाशिवा । तारि आनाथ या जीवा ।।३।।
दासा चरण दाखवा । चिदंबरा महादेवा ।।४।।

१३०२२८

चिदंबरे माझे आई । रुप आनाथासी दावी ।।१।।
क्षिण जालि माझी देही । दया येवु दे ह्रदई ।।२।।
तुझा आवतार कळवी । माझी वीनंती परिसावी ।।३।।
दास न मागे ते काही । येक वेळ रुप दावी ।।४।।

१३०२२९

रक्षि रक्षि ब्रिद आता । चिदंबरा क्रपावंता ।।१।।
निवारि हे भवचिंता । तुझे हाती सर्व सत्ता ।।२।।
वेळ लावीसी का आता । चिदंबरा सर्वगता ।।३।।
दासालागि पावे आता । दावी चरण बा आता ।।४।।

१३०२३०

श्रीनगरचा ब्राम्हण । आला दर्शनासी जाण ।।१।।
करि विनंती स्वामिसी । मज ठेवी पायापासी ।।२।।
पुर्णब्रम्ह आवतार । कलयुगी चीदंबर ।।३।।
दास म्हणे तो ब्राम्हण । स्वामिपुढे लोटांगण ।।४।।

१३०२३१

स्वामि म्हणति विप्रासी । येतो तुझीया घरासी ।।१।।
चिंता न करि तु काहि । मज भक्ति प्रिय पाही ।।२।।
देतो नीरोप तुजसी । वेगी जावे त्वा गावासी ।।३।।
म्हणे चीदंबर दास । जाला आनंद विप्रास ।।४।।

१३०२३२

बोलविले ब्राम्हणासी । नारेळ कुंकु देति त्यासी ।।१।।
तांदुळ देती दोन सेर । विप्र करि नमस्कार ।।२।।
आला नीघोनि गावासी । निजध्यास ब्राम्हणासी ।।३।।
घरि येतो चीदंबर । दास म्हणे हर्ष थोर ।।४।।

१३०२३३

जाला द्रुष्टांत तयासी । स्वामी आलेति घरासी ।।१।।
म्हणति विप्रालागी जाण । वेगि बोलवी ब्राम्हण ।।२।।
आभीषेक पुजा करि । औदुंबर तुझे व्दारि ।।३।।
दास म्हणे चिदंबर । प्रगट दावी औदुंबर ।।४।।

१३०२३४

ब्राम्हण जाग्रत होवुन । आला बाहेर तो जाण ।।१।।
आंगणामाजी औदुंबर । वृक्ष निघलासे थोर ।।२।।
नवल जाले त्या विप्रासी । बोलविले ब्राम्हणासी ।।३।।
करिती पुजा आभीषेक । वृक्ष वाढतसे देख ।।४।।
पुजा जालि दोन प्रहर । वृक्ष जाला पुरुषभर ।।५।।
दास म्हणे चिदंबर । यात्रा मिळती आपार ।।६।।

१३०२३५

चरित्र २६१

पद हिंदुस्तानी ।। मन करो वुन्मन चिदंबर ।।धृ।।
किने साई बहुत के काज । मेरे बिरया केव लाज चिदंबर ।।१।।
पतित कु पावन ब्रिद तुमारो । बोझ भयो काहा मेरो चीदंबर ।।२।।
पुरनब्रम्ह भयो आवतार । काहा लोप कहु धीर चिदंबर ।।३।।
चरनकमलपर दास बलहारि । आस पुरन करो मेरी चीदंबर ।।४।।

१३०२३६

अभंग हिंदुस्थानी
सावरो सुंदर रुप मनोहर । थाडे रहे व्दार भक्तन काजे ।।१।।
आये भक्तजन प्रभु के दर्शन । बोले हास्यवदन चीदंबर ।।२।।
सफेत ये घोति लगावे विभुति । भक्तजन साती पंडत बहुत ।।३।।
दास आयो शरण प्रभु थाडे ध्दार । कलजुग आवतार साई मेरा ।।४।।

१३०२३७

पुरन आवतार साई चीदंबर । करित हे वुधार पतीतको ।।१।।
हास के कहे बात काहा घरव्दार । कोन काज दुर आयो इतने ।।२।।
पुछेत बिचार प्रपंच वेव्हारे । पुछे लडका बाल कुटुंबकु ।।३।।
दास कहे आस पुरावे मनकी । आनाथ दिनकी चीदंबर ।।४।।

१३०२३८

दिनके दयाल प्रभु चिदंबर । पतितवुधार साई मेरो ।।१।।
बुलावे नजीक करत समाधान । आमृतबचन बाती बोले ।।२।।
मातापिता ऐसे करत माया मोहो । काहालग कहो बखानये ।।३।।
दास कहे बेद करत बखान । हो रहे मौन बाच्या जीनकी ।।४।।

१३०२३९

पतित मय पापी तुमकु आये शरण । दुर करो मरनजन्म फेरे ।।१।।
नहि मुज कोई तारक तुमबिण । बिसय बासना दुर करो ।।२।।
बुध्धी करो स्थीर साई चिदंबर । भयो आवतार कलयुग ।।३।।
दास कहे प्रभु बतलावो चरन । मन करो वुनमन चिदंबर ।।४।।

१३०२४०

यावे सर्वगता स्वामि क्रपावंता । निवारि हे चिंता चिदंबरा ।।१।।
यावे बा दयाळा स्वामि विश्वपाळा । दावि रुप डोळा चिदंबरा ।।२।।
यावे विश्वपती दावी सगुणमुर्ती । वर्णवि बा कीर्ती आखंडीत ।।३।।
दास म्हणे यावे दीनाच्या कैवारा । कलयुगि आवतारा स्वामीराया ।।४।।

१३०२४१

यावे करुणाघना पतितपावना । आवतारसगुणा चीदंबरा ।।१।।
यावे ब्रम्हपुर्णा जीवीच्या जीवना । पुरवि वासना चीदंबरा ।।२।।
करितो प्रार्थना पावे मज दिना । येवु दे करुणा स्वामिराया ।।३।।
दास म्हणे यावे क्रपेच्या सागरा । प्रगट चीदंबरा व्हावे वेगी ।।४।।

१३०२४२

ब्रम्हरुप आसे आपला आपण । मना मनपण नुरे तेथे ।।१।।
ज्ञाता ज्ञान ज्ञेय त्रीपुटीचा लय । समाधान होय तेचि प्राप्ती ।।२।।
संधिजे संधान मधे आसे कोन । आनुभवाचि खुण नमन जाले ।।३।।
दास म्हणे आंगे तोचि चिदंबर । आनंत आपार बाह्यांतरी ।।४।।

१३०२४३

श्रुत्ध सत्वगुणि भक्ति । सदा विषई वीरक्ति ।।१।।
सांडुन देह आभिमान । ज्ञाता ज्ञेय ज्याचे मन ।।२।।
नाम साजे ज्यासी दत्त । वृत्ती स्वरुपि निवांत ।।३।।
संतपाईचि वाहाण । त्याची आसे रजकण ।।४।।
आठव नाठव सांडुनि । सदा भोगिजे उन्मनी ।।५।।
आठव सांडुनिया दुजा । पाई जडलो माहाराजा ।।६।।
न ये स्मरणा स्मरण । दोहि अंगेचि आपण ।।७।।
सत्तावीण प्रीय काहि । दुजे नसे लोकी तीहि ।।८।।
म्हणे चिदंबर दास । आसे शरण पायास ।।९।।

१३०२४४

सांडुनि रजतम दोन्हि । भक्ति आसे सत्व गुणी ।।१।।
सर्वाठाई आत्माराम । नाम तेचि सखाराम ।।२।।
कर्म धर्म करुनि जाण । सदा आसावे कल्याण ।।३।।
सदा स्वरुपि स्मरण । वृत्ति व्हावि लागे लिन ।।४।।
तेचि भवसींधुतरण । त्यासि नसे जन्ममरण ।।५।।
होई मनाचे उन्मन । ऐसे करावे साधन ।।६।।
शब्दज्ञान नये कामा । मिळणि व्हावि पुरषोत्तमा ।।७।।
सुज्ञालागि काय फार । नलगे ल्याहावा विस्तार ।।८।।
खरे नाणे पदरासि । तेव्हा सुख या जिवासि ।।९।।
गुरुभक्त केशवपंत । सांगता कळेल वृतांत ।।१०।।
पुर्ण सीवभक्त अया । याचि येउ द्यावि दया ।।११।।
चिदंबर दास पाई । लिहिलि विनंती परिसावि ।।१२।।

१३०२४५

गंगातिराहुनि आला तो ब्राम्हण । भक्तराज पुर्ण आसे थोर ।।१।।
चिदंबरापासी आला दर्शनासी । राहे स्वामिपासी काही दीवस ।।२।।
नित्य वुठोनिया जावे दर्शनासी । विनंती स्वामिसी करितसे ।।३।।
दास म्हणे विप्र करितो प्रार्थना । येउ दे करुणा स्वामिराया ।।४।।

१३०२४६

म्हणे स्वामिराया करि मज दया । निरोप सखया देई मज ।।१।।
गरिब ब्राम्हण नसे माझे लग्न । व्हावे बा प्रसन्न चिदंबरा ।।२।।
स्वामि म्हणति त्यासी न करि बा चींता । लग्न होते जाता घरासी तु ।।३।।
दास म्हणे दावी प्रत्यय ईश्वर । प्रगट चिदंबर बोलतसे ।।४।।

१३०२४७

म्हणती विप्रालागि देतो मी नीरोप । जावे सुखरुप घरासी ते ।।१।।
विप्र म्हणे लग्न करावे ते कैसे । दरिद्रि मि आसे द्रव्यहिन ।।२।।
चिदंबर म्हणे न करि तु चींता । ईश्वराची सता आघटीत ।।३।।
दास म्हणे विप्र घरोनी भरवसा । स्वामि जगदिशा प्रसन्न तु ।।४।।

१३०२४८

कुंकु ते नारेळ दिल्हे ब्राम्हणासी । गेला आनंदेसी घरालागि ।।१।।
गावामाजी होता सावकर येक । तयालागि देख स्वप्न दिल्हे ।।२।।
करुनीया द्यावे ब्राम्हणाचे लग्न । प्रातःकाळी जाण बोलावुनी ।।३।।
दास म्हणे दावी चीदंबर कळा । आनंदसोहळा ब्राम्हणाःसी ।।४।।

१३०२४९

सावकार वुठे त्याची वेळॆ जाण । बोलावी ब्राम्हण त्वराकरुणी ।।१।।
दिल्हे लग्न करुनि आनंदेसि जाण । आला तो ब्राम्हण स्वामिपासी ।।२।।
लग्न जाले म्हणोनि जाय लोटांगणी । आघटीत करणी चीदंबरा ।।३।।
दास म्हणे कळा दावि चीदंबर । लिला हे आपार नित्य नवि ।।४।। १३०२५०

चरित्र २६२

पद हिंदुंस्छानि -०- नहि तुम बिन चयन चिदंबर -०- ।।धृ।।
देखत तुमारि राहा दिनरात । काहे लगावे देर चिदंबर ।।१।।
चित वुदासी फिरत हु देस । काहे आयो मेरो त्रास चिदंबर ।।२।।
दिन आनाथके तुम हो साई । तिन लोक देगा हि चीदंबर ।।३।।
धरे आवतार दास के काज । राखो ब्रिद कि लाज चिदंबर ।।४।। १३०२५१

अभंग दवरो दवरो स्वामिराज्य । दिन आनाथ के काज ।।१।।
नहि मुजे भक्तिप्रेम । येक ज्यानो तुमारो नाम ।।२।।
मातापिता बहनभाई । तुमबिना दुजो नाहि ।।३।।
चिदंबर माहाराज्या । आवतार दासन काज्या ।।४।। १३०२५२

बिध्या नहि ग्यान भक्ति । नहि बिशय बिरक्ति ।।१।।
नहि खरचन दाम । येक हिरदे तुमारो नाम ।।२।।
ऐसो पतित मय दिन । आयो तुमकु शरण ।।३।।
दास कहे चिदंबर । साई लज्या रखनहार ।।४।।

१३०२५३

काहालो बोलके बतलावु । नहि तुमबिन कोवु ।।१।।
तुमारे नामको आधार । तुमही वुतारो भवपार ।।२।।
देव गुरू तुमबिन । नहि चवदा भुवन ।।३।।
दास कहे चीदंबर । कला तुम्हरि आपार ।।४।।

१३०२५४

तुम बिना मेरो कोन । साई दुजो राखे मान ।।१।।
जीव भाव तनमन । किनो तुमे आर्पन ।।२।।
तुम बिना दुजी प्रीती । मुजे नाहि त्रीजगती ।।३।।
दास कहे चीदंबर । कलजुग भयो आवतार ।।४।।

१३०२५५

कोन वुतारे भवपार । तुमबिन चिदंबर ।।१।।
बोहत पतित वुधारे । दिन थाडे तुमारे व्दारे ।।२।।
मेरी करुना कैसी नहि । कठोर भये तुम साई ।।३।।
दास कहे चीदंबर । प्रगट करो आवतार ।।४।।

१३०२५६

देखत राहा नीसदिन । नाम तुमारो पावन ।।१।।
काहा भयो मेरे बिरया । तुमकु कैसी नावे दया ।।२।।
दयाल आवतार तुमारो । कहालो भोग तो भी मेरो ।।३।।
कहे चिदंबर दास । तुम्हारे पाव मेरी आस ।।४।।

१३०२५७

दुर देस को ब्राम्हण । आयो साई के दर्शन ।।१।।
वाकु पुछे चिदंबर । आयो काहेके खातर ।।२।।
करे बिनंति वो विप्र । मय तो बोहोत दरिद्र ।।३।।
चिदंबर दास कहे । प्रभु प्रसन्न वाकु भये ।।४।।

१३०२५८

स्वामि बुलावे विप्रकु । जलदि ज्यावो आपने घरकु ।।१।।
करे विनंति ब्राम्हण । ज्यानो मेरा आतंकरण ।।२।।
दिनानाथ आनाथके । साई साच तिन लोकके ।।३।।
दास पतित के धनी । आपनी बतावे करनी ।।४।।

१३०२५९

प्रसन्न भये चिदंबर । खिचडी दिनी येक सेर ।।१।।
घरे ज्याके छोडना । आवर किसेकु न कहना ।।२।।
बिप्र करे नमस्कार । आये पोहचे आपने घर ।।३।।
दास कहे चिदंबर । लिलाधारी विश्वंभर ।।४।।

१३०२६०

गाट छोडत ब्राम्हण । भई खिचडी सुवर्ण ।।१।।
नहि आनंदकु पार । धन्य कहे चिदंबर ।।२।।
कलजुग आवतार । पुरनब्रम्ह चिदंबर ।।३।।
दास कहे दिनानाथ । लीला बतावे आघटीत ।।४।।

१३०२६१

चरीत्र २६३

पद लीहीले

पदहिंदुस्छनी -०- काहे कु दिनो जलम चिदंबर -०- ।।धृ।।
नाहि भक्ति ग्यान नहि तेरो प्रेम । जलम आयो आधम चिदंबर ।।१।।
देखत कामि करे वाको ध्यान । चिंतत बिशय काम चिदंबर ।।२।।
संत कल्हावत धरे आभिमान । ब्रिति नहि निसकाम चिदंबर ।।३।।
दास दिनोके तुम साहाकारि । झुट करो बिधी के छम चिदंबर ।।४।। १३०२६२

अभंग हिंदुस्छानी
चिदंबर प्रभु मेरि तुमबिन । आयेगि करुना किसकु साई ।।१।।
आनाथ मय दिन कल्हावु नुर । कोन करी मेरो आंगीकार ।।२।।
पतितपावन तुम्हारो आवतार । कबलो पकडे धीर मिलन काजे ।।३।।
दास आनाथकी चींता कोन करे । पतित वुधारे बहोत तुमने ।।४।। १३०२६३

चिदंबर साई किने बोहोत काज । आनाथ की लाज राखो मेरी ।।१।।
नहि मेरो कोई तीन लोकमाहि । दयाल तुम साई आंतर ज्यानो ।।२।।
काहालो बतावु बोलके वुपर । साखि हो भितर प्रभु तुमहि ।।३।।
दास आये सरन बतलावो चरन । चुके जन्ममरण प्रताप सो ।।४।। १३०२६४

चिदंबर प्रभु नहि मुज चयन । बतावो सरगुन रुप तुम्हारो ।।१।।
गौब्या निबछा गई छोडकर । निमित कोन पर आयो वाको ।।२।।
हत्था माथेपर वैसी आई तुमारे । आवतार कोण काजे ।।३।।
दास पतित की चिंता हाय तुमकु । बोल नो काहे कु बहुत साई ।।४।।

१३०२६५

लडका छोडकर गई वा किमया । किसे आवे दया कहो प्रभु ।।१।।
वैसी भई गति प्रभु तुम बिन । किसे तो भि करुना आवे मेरि ।।२।।
काहा तोडि राहा देखे दिनरात । वुदास ये चित तुम बिना ।।३।।
दास कहे मय तो पतित चंडाल । पावन दयाल चीदंबर ।।४।।

१३०२६६

नहि मातापिता मुजे बहेनभाई । नहि सगा साई तुमबिना ।।१।।
कुल दैवत गुरु तुमहि चीदंबर । पावन आवतार कलजुगमो ।।२।।
बतलावो चरण साई येक बिर्या । राखो आपनि किरपा बचनकि ।।३।।
दास थाडो व्दार पन्हया लेकर । साई चीदंबर आवो जलदि ।।४।।

१३०२६७

कहालो आंत लेहो साई चीदंबर । कब लो पकडे धीर भुकोप्यासो ।।१।।
कैसि दया नहि तुमकु मेरि साई । तुम बिन नाहि पावन दुजो ।।२।।
राखो बिरद आपणो कलजुग आवतार । साची जगभितर प्रगट करो ।।३।।
दास कहे प्रभु बतलावो चरन । आंध भये नयन राहा देखत ।।४।।

१३०२६८

ब्राम्हणको लडका आठ बरस को । साई के दरस को छंद लागो ।।१।।
मा बाप छोडके निकरो जत्रासंग । हो गयो नीसंग दर्शन काजे ।।२।।
पुछे जनलोक काहा तेरे मा बाप । लडका आपरुप बोले वुनसे ।।३।।
मातापिता मेरो चिदंबर येक । दर्शन ज्यावे देख दास कहे ।।४।।

१३०२६९

जत्रावाले कोई माया बहोत करत । चिदंबर देत बुधी वुनकु ।।१।।
तिन मजल गयो जत्रा के संगात । च्यार घडी रात लडका सोवे ।।२।।
आये चिदंबर वुठावे बालक । दुसरे कु देख न दिखे प्रभु ।।३।।
दास कहे लडका लिनो माडीपर । पुछे चीदंबर बात वाकु ।।४।।

१३०२७०

राहा देख तेरी मातापीता घरे । ज्यावो पिछे फिरे प्रभातकु ।।१।।
नारेल प्रसाद पेडे वो सकर । दिने चीदंबर वुटीपा ।।२।।
वुठे चिदंबर बालक पुकारे । देखत हे सबेरे जत्रालोक ।।३।।
दास कहे प्रभु लिला बतावत । आचरज करत जत्रा सारि ।।४।।
१३०२७१

पुछत बालकसे जत्रा जन लोक । बालक कहे देख मिले साई ।।१।।
बतावो सबकु नारेल सकर पेडे । जत्रा पाव पडे छोटे बडे ।।२।।
प्रभातकु लडका देख रसोवत । पिछे भेज देत जत्रावाले ।।३।।
दास कहे माता पिता मिले घर । कहते चिदंबर पुरनब्रम्ह ।।४।।
१३०२७२

चरीत्र २६४

अभंग हींदुस्थानी
कब लो देखु राहा चिदंबर । मेरी बिरया भई राज कैसी ।।१।।
मनावत तुमकु बारा बरस भये । आब लोके बना आवे चीदंबर ।।२।।
दियो तुमने बचन मुजेकु हय बरवसा । काहे जगदिशा आबेरकीनी ।।३।।
दास कहे बिरद संबालो आपनो । आनाथकु दिनो वचन प्रभु ।।४।। १३०२७३

प्रगट होना चीदंबर । कलजुग मो आवतार ।।१।।
जलदि चेत साईराज्य । दवरो आनाथ के काज्य ।।२।।
देखत राहा निसिदिनी । आखिया नींदके वगुरानी ।।३।।
दास कहे ज्याग्रत होना । ब्रिद जतन करना ।।४।।

१३०२७४

दिन आनाथ परदेसी । तुम्हे दया नावे कैसी ।।१।।
नित करत पुकार । थाडे रहेके तुमारो ब्दार ।।२।।
पतितपावन आवतार । तिन लोक मे वुदार ।।३।।
दास कहे चीदंबर । साई मिलना येक बार ।।४।।

१३०२७५

किसे आवेगि करुना । चिदंबर तुम बिना ।।१।।
मय तो तुमारो कींकर । साई कल्हावे वुदार ।।२।।
राहा देखु काहा तोडी । तोडो कल्पनाकी बेडी ।।३।।
जनम जनम तुमारो दास । साई न करो वुदास ।।४।।

१३०२७६

कबलो भाकु तो भी करुना । पुरन करो ये वासना ।।१।।
खान ज्यादा मय तो तुम्हारो । आपनॆ ब्रिद जतन करो ।।२।।
कलजुग मो आवतार । साजत नाम चीदंबर ।।३।।
दास बिनंती बारबार । किरत बढावो आपार ।।४।।

१३०२७७

पुरनब्रम्ह आवतार । लिला तुम्हरि आपार ।।१।।
जनम जनम संग आयो । आपकॆ बिरया काहा भयो ।।२।।
भुको प्यासो भाकीत करुना । राखो बिरद आपना ।।३।।
चिद्दंबर माहाराज । दवरो दास दिनो के काज ।।४।।

१३०७७८

किरत बरनत पुरान । वॆद करत हाय बखान ।।१।।
प्राट भयॆ भक्तजन । नाम तुमारो पावन ।।२।।
मिलना साई यॆक बार । किजो पतित वुधार ।।३।।
चिदंबर चरनोपर । दास भयो निछावर ।।४।।

१३०२७९

दुर देस को बम्हन । आयो स्वामि के दर्सन ।।१।।
करे स्वामिकु विनंती । तुम्हारो आवतार धरती ।।२।।
बहोत दिनके दयाल । छनमे करत हय न्याहाल ।।३।।
दास कहे चिदंबर । पुछे बीप्रकु विचार ।।४।।

१३०२८०

बिप्र स्वामिसे कहत । घरे दरिद्र बोहोत ।।१।।
मय तो कुटुंबबछल । साई तुम हो दयाल ।।२।।
स्वामि कहत बिप्रकु । भाग बडो हय तुमकु ।।३।।
दास कहे चिदंबर । लिला करे बिसंभर ।।४।।

१३०२८१

दीयो नीरोप वा भकत । च्यार होन दिये हात ।।१।।
लगे वुतनो खर्च करना । ब्याहा काज बस्ते नाना ।।२।।
होन घरना पुज्यामे । बरकत देत स्वामि वुसीसे ।।३।।
कहे चिदंबर दास । सबकी पुरावत आस ।।४।।

१३०२८२

विप्र आया आपनें घरें । मन मानें खर्च करें ।।१।।
होन च्यार रहत वैसें । कला बतावत ऐसें ।।२।।
पुरनब्रम्ह चिदंबर । लिला वुनकि आपार ।।३।।
दास चरन को बलहारि । राहा देंखत तुम्हारी ।।४।। १३०२८३

चरीत्र २६५

चिदंबर प्रभु लिनो आवतार । पतित वुध्धार करनें काज ।।१।।
आनाथ के नाथ पतितपावन । आवतार सरगुन कलजुगमाही ।।२।।
दिनें आभयदान भयें बहुत दिन । करुना भाकत प्रान नेंत्र आयो ।।३।।
दास कहे राहा देंखु कबलो तो भी । मिलज्याव आभी चीदंबर ।।४।।
१३०२८४

आनाथ मय दिन आयो तुमकु सरन । बतलावो चरन चीदंबर ।।१।।
नहि मुजें चयन चित वुदासीन । लग रह्यो मन दर्शन काजें ।।२।।
चिदंबर प्रभु भत्कसें आबेंर । बतलावो सुंदर रुप सगुन ।।३।।
दास कहें साई काहालो पकडो धीर । मन यो आधीर भयो मेंरें ।।४।।
१३०२८५

छिन भई काया प्रभु चीदंबर । केव भये कठोर मेरे बिरया ।।१।।
पतित च्यांडाल पड रह्यो व्दारे । पतित वुध्धारे बोहोत तुमने ।।२।।
जतन करो ब्रिद पतितपावन । बतलावो चरण आनाथकु ।।३।।
दास कहे कोन तारे तुमबिन । करो समाधान मेरे प्रभु ।।४।।

१३०२८६

नहि मुजे बिध्या नहि दख धन । काया भई छिन मेरि साई ।।१।।
निकारो बाहेर तिर्थ बरत । राखो आपनि लाज चीदंबर ।।२।।
पतित मय पापि आयो तुमकु सरन । बतलावो चरन चिदंबर ।।३।।
दास कहे वारी तुमारे चरन पर । देहे निछावर करके हारि ।।४।।

१३०२८७

आनाथ जनोके तुम हो कैबारि । मेरे बिरया करि कटिन माया ।।१।।
मत करो वुदास स्वामि चीदंबर । निकारो बाहेर काहे काज ।।२।।
काहा तोडी आस लेहो चीदंबर । कलजुग आवतार सत्य किजो ।।३।।
दास कहे तुमकु लाज ये बिरदकी । काहे बोलनेकी गरज हामकु ।।४।।

१३०२८८

आपार हो कला तुमरि चीदंबर । कलजुग आवतार प्रगट भये ।।१।।
रिध्धी सीध्धी ब्दारे भरत हय पानी । आगाध करनि तुमरि ये ।।२।।
मेरे बिरया काहासे लाईये बिपत । कैसी भई गत तुमकु प्रभु ।।३।।
दास दिन भयो किरत बखानत । केव रहे निव चिंता चिदंबर ।।४।।

१३०२८९

थक रहे हातपाव गल रही काया । नावे तुमकु दया कैसी मेरी ।।१।।
आग्या तुमने करि बाहेर निकारो । फजीती केव करो आनाथकी ।।२।।
विप्र ये मंडली संगात ये दिनी । नहि खर्चियानि जतावर ।।३।।
किसे मो पसारे साई तुमारो दास । पुर्ण करो आस चीदंबर ।।४।।

१३०२९०

बारा बरस बिप्र आंध हातो यक । दरसनकु देख आयो हातो ।।१।।
करत बिनंती हातो भक्तराज । आनाथ के काज करो प्रभु ।।२।।
भोजन करे नित स्वामि के पंगत । स्वामि बैटा रहत ढींगा लेके ।।३।।
दास कहे प्रभु दिन के दयाल । बहोत क्रपाल चिदंबर ।।४।।

१३०२९१

येक दिन बैटे फराल करनेकु । बुलावे वुसीकु चीदंबर ।।१।।
हातो सावन मास माखि भई बोहत । स्वामि वुसे कहत समालियो ।।२।।
हासे वो बम्हन मय तो नेत्रहीन । माखीर छन कोन तुम बिना ।।३।।
दास कहे किरपा आई चिदंबर । बोलत वुदार प्रिती करके ।।४।।

१३०२९२

विनोद करके बोले चीदंबर । सामर्थ आपार आंग जीनके ।।१।।
बिप्रकु कहत नहि तुज दिखत । हात फिरवत पिटपरसे ।।२।।
छन मे नेत्र सो देखन लागे बिप्र । बतावे बिचीत्र कला ऐसी ।।३।।
दास कहे करे आचरज ब्राम्हन । आवतारपुरन चिदंबर ।।४।।

१३०२९३

वुटे वो बिप्र फराल करके । चरन स्वामि के पकडन लागे ।।१।।
ज्यात लोटांगन स्वामि के सामने । हात पकड वुने वुटा लिये ।।२।।
कर जोडे बिप्र कहे पुरनब्रम्ह । पतित आधम तारो मुजे ।।३।।
दास कहे प्रभु चीदंबर धनी । आघट करनि बतावत ।।४।।

१३०२९४

चरीत्र २६६

पद हिंदुस्छा ०- मेरे चीत चिदंबर आवर दुजो नाही ।।धृ०।।
मातापिता सबहि। गोत वोहि बहनभाई ।।१।।
चराचर सबहि ब्यापो । चिदकाशमाहि ।।२।।
देवि देव पंचभुत । चवदा लोक वोहि ।।३।।
दास चरनकमल वारि । गात हय बधाई ।।४।।

१३०२९५

जलदि बतावो चरन । तुमकु आयो मय सरन ।।१।।
माया मोह दुर करो । खाना ज्यातद मय तुमारो ।।२।।
व्यापक तुमहि चराचर । मुजे दिजे ये चिन्हार ।।३।।
दास कहे चीदंबर । कलजुग तुम्हारो आवतार ।।४।।

१३०२९६

दया छमा दिजो साई । तुमहि तिन लोकमाहि ।।१।।
लग रह्यो मेरो मन । साई बतावो चरन ।।२।।
चित मेरो उदासीन । प्रभु तुमे देखोबीन ।।३।।
चिदंबर दास दिन । रुप बतावो सरगुन ।।४।।

१३०२९७

काहा तोडी देखु राहा । तुमकु भयो तो भी काहा ।।१।।
पतितपावन आवतार । कलजुग चिदंबर ।।२।।
न चले बेद को बखान । काहा बरनु मय आग्यान ।।३।।
दास कहे चिदंबर । कला बतावे आपार ।।४।।

१३०२९८

दिन रंक तेरे ब्दारे । थाडे रहके पुकारे ।।१।।
रुप बतावो सरगुन । ईतनो दिजो क्रपादान ।।२।।
चिदंबर तुमबिन । मुजे न पडे चयन ।।३।।
दास कहे चीदंबर । करो हो दिन को वुधार ।।४।।

१३०२९९

छवो शात्रे वे पुरान । करते तुमारे बखान ।।१।।
मेरे बिरया काहा भयो । पराक्रम काहा गयो ।।२।।
बिरद समालो आपनो । आर्ज आनाथकी मानो ।।३।।
दास कह्यो आयो सरन । साई बतावो चरन ।।४।।

१३०३००

दिन रंक मय पतित । तुमारे हाथ मेरे हित ।।१।।
पावन भयो आवतार । कलजुग चिदंबर ।।२।।
किरत बखानत च्यारो । काहालो भोग रह्यो मेरो ।।३।।
दास कहे चिदंबर । करो प्रगट आवतार ।।४।।

१३०३०१

आयो तैलंग ब्राम्हण । हातो भक्तराज पुरन ।।१।।
करे स्वामि से बिनंती । भयो आवतार क्षिती ।।२।।
दरिद्र दुर करो मेरो । नाम लेत रह्यो तुमारो ।।३।।
दास कहे चीदंबर । लिला बतावे आपार ।।४।।

१३०३०२

स्वामि बुलावे बिप्रकु । कहे जाना आपने घरकु ।।१।।
देई चनाकि ये दाल । पको येक सेर भर ।।२।।
घर ज्याके पुज्या करना । तबहि गटडी छोडना ।।३।।
दास कहे चीदंबर । बोले बीप्रसे वीचार ।।४।।

१३०३०३

भये आनंद बिप्रकु । गयो आपने घरकु ।।१।।
पुजा करके देखे दाल । भये होन सेरभर ।।२।।
भयो आनंद बम्हन । कहे आवतारपुरन ।।३।।
दास कहे चिदंबर । करे क्रपा दिनपर ।।४।। १३०३०४

करे होम हावन दान । नित्य बीप्रकु भोजन ।।१।।
नित्य चीदंबरध्यान । करे किरत बखान ।।२।।
लिला बतावे आपार । प्रभु मेरो चिदंबर ।।३।।
दास दिन बलहारि । आस पुरन करो मेरि ।।४।। १३०३०५

चरीत्र २६७

पदहिंदु । मेरे मन भावे येक चिदंबर ।।धृ०।।
देह गेह छणभंगुर । नासवंत सबही जीतने आकार ।।१।।
पाच पंचीसा त्रीगुन माया । मुल सबनको येक ॐकार ।।२।।
पिंडके देह कहत हे च्यार । नाचत तबहि जैसि जलगार ।।३।।
दासकु भावे येक आवीनास । दुजि नहि प्रभु तुम बिन आस ।।४।। १३०३०६

सावरो सुंदर रुप मनोहार । देखो चीदंबर पुरनब्रम्ह ॥१॥
देखत चरनकमल हारे भुकप्यास । पुरावत आस मन कि सबहि ॥२॥
जैसी करे मया लडके वुपर प्यार । करत वुदार माया बैसी ॥३॥
दास कहे मातापिता चीदंबर । बतावे आपार सुखसोहला ॥४॥

१३०३०७

आनाथ दिनकि पुरावत आस । केव भये वुदास मेरे विरया ॥१॥
नित वुटकर तुमकु मनावत । राहा मय देखत दिनरात ॥२॥
नहि मुजे दुजी तुमबिन आस । कोन भुकप्यास ज्याने मेरि ॥३॥
दास कहे प्रभु चीदंबरधनी । बतलाव करनि आवतारकी ॥४॥

१३०३०८

चीदंबर धरे कलजुग आवतार । आनंत आपार कला जीनकी ॥१॥
छन मे करत हय राई को पर्वत । कला बतावत आपनी ऐसी ॥२॥
आनाथ के नाथ साई हय वुदार । पावन आवतार कलजुगमे ॥३॥
दासके प्रभु मेरो कब बिसर । मनावे किंकर नित तुमकु ॥४॥

१३०३०९

देकत हु बाट सब दिन तुमारि । पुरन करो मेरि आस प्रभु ।।१।।
न भावे मुजकु ज्यात्रा देवतीर्थ । लग रहि प्रित तुमारे पाव ।।२।।
बाहेर भीतर नहि मुजे प्यारो । ज्यानत हो मेरो आंतर सबही ।।३।।
दास कहे प्रभु आवतार सरगुन । बतलावो चरन चिदंबर ।।४।।

१३०३१०

गल रहि काया चीदंबर साई । दया तुमकु नाहि कैसी मेरी ।।१।।
तुम ऐसे दयाल नहि त्रिभुवन । मेरो कर्महीन काहा किजे ।।२।।
नहि तुमकु बोल प्रभु हो दयाल । करत हो समाल आनाथको ।।३।।
दास कहे मय तो आन्याई बोहोत । पकरो तुमने हाथ कीरपा कीन्ही ।।४।।

१३०३११

चिदंबर प्रभु कर पकडे जैसे । दरसन दिजो वैसे आनाथकु ।।१।।
पतित मय पापि बहोत आन्याई । दया तुमकु आई मेरे प्रभु ।।२।।
आबके बहोलगा वो आबर दरसनकु । बटा लगे किनकु कहो प्रभु ।।३।।
दास पतितकु तुम भये पावन । आवतार सरगुन पावन करो ।।४।।

१३०३१२

पतितके काजे लिनो आवतार । कर दीये वुदार बहोतके ।।१।।
गनिका येक हाति करनाटक देस । हो रहि वुदास कोडी भई ।।२।।
सब आंग सफेत हो रह्यो गनिका को । ध्यान चिदंबर को कीरत सुनके ।।३।।
दास कहे दरसनहि देखे साई । भक्ति मनमाही करत गनीका ।।४।।

१३०३१३

गौके गोबर सो जगावो लिपत । धुप बतावत आट दिनकु ।।१।।
करत वुपवास दिन सोमवार । लगावे आंगभर आंगारा वो ।।२।।
आंगारा कलावे गौके गोमित्र । लगावे सरिर भरके सबर ।।३।।
दास कहे नाम जप चिदंबर । कर रहि निर्धार येकभाव ।।४।।

१३०३१४

नित्य वुटकर गनिका करत ध्यान । आवतारपुरन चिदंबर ।।१।।
गयो कुष्टरोग शुध्ध भई काया । चिदंबर दया करे ऐसी ।।२।।
चालिस दिन मे गनीका भलि भई । दरसन कु आई आनंदसे ।।३।।
दास कहे प्रभु बुलावे गनीकाकु । बर्तमान वाकु पुसत सबरे ।।४।।

१३०३१५

गनिका लुटावे धन माल आपनो । दानधर्म किनो गहेने पा ।।१।।
बनावे हर जस्स नाम चीदंबर । आनंद आपार किरत गावे ।।२।।
भई भक्तराज गनीका करे भजन । पतितकु पावन चिदंबर ।।३।।
दास कहे लिला बतलावे आपार । कलजुग आवतार लिने प्रभु ।।४।।

१३०३१६

चरीत्र २६८

पद हिंदु   तुम बिन ज्याने कोन मन कि ।।धृ।।
देस छोड परदेसमे आयो । आस करु साई कहो तो भी किनकी ।।१।।
देत रहा सबकु चवदा भुवन मे । आस कर कैसि मनुखके घराकि ।।२।।
तिन लोकके चीदंबर दाता । लाज न आवे भक्तजनोकि ।।३।।
दास कल्हावो रंक तुमारो । मरे तो भी आस न करे किनकी ।।४।।

१३०३१७

आभंग हि. ।छोटे। चिदंबर तुमबिन । मुजे न पडे चयन ।।१।।
निसीदिन देखु राहा । तुम भये तो भी काहा ।।२।।
दिन रंक थाडे व्दार । चरण बतावो सकुमार ।।३।।
दास चरन पर वारि । आस पुरण करो मेरि ।।४।।

१३०३१८

नित करत बिनंती । साई तुम क्रपामुर्ती ।।१।।
थक रहे हातपाव । दुर रह्यो मेरो गाव ।।२।।
तुमे करुना नावे कैसी । साई मत करो वुदासी ।।३।।
दास तुमकु सरन । मुजे बतावो चरन ।।४।।
१३०३१९

मयतो पतित हु दिन । नाम तुमारे पावन ।।१।।
रहे चीतमे उदास । लगी दरसन की आस ।।२।।
चीदंबर माहाराज । राखो आनाथकी लाज ।।३।।
दास तुमारो हे रंक । साई मीलो मांगेध भिक ।।४।।
१३०३२०

राहा देखत तुमारी । पुरन आस करो मेरी ।।१।।
तीन लोकके तुम नाथ । करे बिनंती आनाथ ।।२।।
तुम बीना दुजो कोई । नही तीन लोकामाही ।।३।।
दास कहे चीदंबर । भये कलजुग आवतार ।।४।।
१३०३२१

चिदंबर माहाराज । किजो आनाथके काज ।।१।।
दिन आनाथ मय रंक । दिजो प्रेम भक्तीभिक ।।२।।
रुप बतावो मुजकु । आयो सरन तुमकु ।।३।।
कहे चीदंबर दास । तुमबीन मय उदास ।।४।।

१३०३२२

दिनरात राहा देखु । दया न आवे तुमकु ।।१।।
मेरे बिरया काहा भयो । तुमारो ब्रिद काहा गयो ।।२।।
साई चीदंबर प्रभु । मेरी दया नावे कभु ।।३।।
दास भयो रंक दीन । तुमकु पुछे तो बी कोन ।।४।।

१३०३२३

साई दरसनकु देख । बुढो बिप्र आयो येक ।।१।।
आसि बरस की वुमर । वाकु पुछे चिदंबर ।।२।।
बिप्र काहा मगता आयो । बुढो मनमे लज्यायो ।।३।।
दास कहे चिदंबर । साखी हिरदे भितर ।।४।।

१३०३२४

ब्याहा करना तेरे मनमे । चित्त लज्यावे लोकनमे ।।१।।
बिप्र कहे साची कहि । सबरि उमर मेरी गई ।।२।।
कहत चिदंबरधनी । ब्याहा होये देवकरनी ।।३।।
कहे चिदंबर दास । पुरन करे विप्रआस ।।४।। १३०३२५

कहे विप्रसे भगवान । इतनि कहि मेरि मान ।।१।।
गाव तीन कोसपर । ज्याना विप्रके वो घर ।।२।।
बेटि तेरि मुजे देना । मेरो निरोप कह देना ।।३।।
दास कहे चीदंबर । वुढो गयो विप्रघर ।।४।। १३०३२६

लडकि हाती दुखनाईत । प्रान गयो बिप्र ज्यात ।।१।।
कहे निरोप पितासे । देई कहत वुटावो ईसे ।।२।।
विप्र आयो फिरकर । विभुती देत चीदंबर ।।३।।
बुढो जाके लगावत । लडकी वुठके बैठत ।।४।।
आचरज भये सबरे गांव । कर गयो वाको ब्याह ।।५।।
दास कहे चिदंबर । आघटीत करे चमत्कार ।।६।। १३०३२७

राखो आपनी लाज चीदंबर ।।धृ।।   पद हींदुस्थानी
क्षणीक ये काया जम लेजावे । जब तिमरकु बाज चिदंबर ।।१।।
भक्ति को भुखन माला मुद्रा । वुपर दिनो साज चिदंबर ।।२।।
दया छमा दिजो आतम ग्यान । किजो आनाथ के काज चिदंबर ।।३।।
दास कहे प्रभु दुर करो माया । जब धुई च्यामर व्याज चिदंबर ।।४।।
१३०३२८

आभंग बडे चाल -चिदंबर साई दवडो मेरे काज । आनाथकी लाज राखो प्रभु ।।१।।
दुर देस साई लेके आये मुजकु । जावु किसके घरकु बेट काजे ।।२।।
बम्हन मंडलि कदाई संगात । काहे लज्यावत मनमाहि ।।३।।
दास कहे प्रभु कलजुग आवतार । पेट के खातर किरत वरनु ।।४।। १३०३२९

काहा तुमारो गयो सामर्थ प्रभुजी । पेटकि कालजी लगी हमकु ।।१।।
आनंतब्रम्हांड करनेकु सामर्थ । न पुरावो आर्थ भक्तजनके ।।२।।
या मे काहा वुचीत साई आयो तुमकु । लगावो हामकु चींता वृथा ।।३।।
दास कहे प्रभु बिरद करो जतन । ब्रिती ये नीमग्न किजो प्रभु ।।४।।
१३०३३०

काहा तोडी राहा देखु साई तेरि । आस पुरन मेरि किजो जलदि ।।१।।
नहि तो भि ब्रिद ज्यायेवो तुम्हारो । काहा लगे मेरो आंत लेना ।।२।।
पतितपावन लिनो आवतार । केव पडो बिसर मेरो आबके ।।३।।
दास कहे प्रभु काहा तोडी कहना । ब्रिद समालना आपनो साई ।।४।।

१३०३३१

आनाथ के नाथ तुम हो चिदंबर । लिनो आवतार कलजुगमाहि ।।१।।
किरत आपनी करावो बखान। लज्यावत मन काहे काजे ।।२।।
प्रचित देखेबिना पुछे तो भि कोन । आवतार सगुण कैसो कहे ।।३।।
दास कहे मेरो चित लज्यावत । बखान सुनत हासत लोक ।।४।।

१३०३३२

कहा गयो तुमारो प्रभु देवपन । हासावत जन काहे काजे ।।१।।
काहेकु करावो वर्नन ये किरति । काहेकु जगती फिरावत ।।२।।
आपकिर्ति काजे परदेस भेजत । भुके केव मारत बिप्र आपने ।।३।।
दास कहे लाज कैसि नावे तुमकु । काहे भेजो हामकु चिदंबर ।।४।।

१३०३३३

पिता जीनको भयो राज्य तीन लोकके । बेटा मांगे वाको घर घर भिक ।।१।।
बटा लगे वाकु दुनया सब हासत । बिरद गमावत काहे प्रभु ।।२।।
ये काहा वुचित तुमकु चिदंबर । कलजुग आवतार काहे लिनो ।।३।।
दास कहे मय तो दिन रंक तेरो । कहा गयो तेरो प्रभु यामे ।।४।।
१३०३३४

आयो बिप्र येक साई दरसनकु । ज्यात होतो जत्राकु रामेश्वर के ।।१।।
प्रभु चिदंबर ठाडे होते व्दारे । बिनंति वो करे बिप्र चिंदबरको ।।२।।
नहि खर्चि नजिक ज्यात हु जत्राकु । मय साईकु पुछन आयो ।।३।।
दास कहे प्रभु बोले हासकर । खर्ची को बिचार करनो काहे ।।४।।
१३०३३५

बुलावे बिप्रकु खर्चि दो रुपय । आपने हात देवे चिदंबर ।।१।।
रोज येक रुपीया खर्च करत आवो । जत्रा करके आवो दछनकि ।।२।।
करे दंडवत बिप्र आनंदसे । निकरो जलदिसे वोहि घडी ।।३।।
दास कहे रुपिया येक खर्च करत । दुसरे दिन देखत दोनो वैसे ।।४।।
१३०३३६

जत्रा करके आयो बरस भयो यक । दोनो रुपिया देख रहत वैसे ।।१।।
आचरज करत बिप्र आपने मन । कब देखु चरन प्रभु तुमारे ।।२।।
आवतार कलजुगमे पुर्ण चिदंबर । कला ये आपार बतावत ।।३।।
दास कहे ध्यान करवो बम्हन । कब देखु चरन धुनलागि ।।४।। १३०३३७

दछन यात्रा करके ब्राम्हन आवत । लोटांगन ज्यात प्रभु आगे ।।१।।
धन्य चिदंबर कला ये तुम्हारी । जत्रा भई मेरि आनंदसे ।।२।।
आवतार कलावत साई । तिन लोकमाही किरत बरने ।।३।।
दास कहे कला तुम्हरि ये साई । मेरे बिरया भई गति कैसी ।।४।।
१३०३३८

चरीत्र २७०

पद हिंद- काहे चिदंबर देस पटायो ।।धृ।।
बिप्रकी मांदी संग दिन्ही मेरे । घर घर वुनकु भिक लगायो ।।१।।
वो कारकुन संग खदायो । वुनकु प्रभुजी पाव चलायो ।।२।।
नहि वोडनकु थंड बजत हय । न मिले धोती लंगोट लगायो ।।३।।
दासकी बिनती सुनो चिदंबर । यामे काहा तुमकु भुषण आयो ।।४।।
१३०३३९

चिदंबर कीरपा हामे । किरत बढाई दुनयामे ।।१।।
भोग मुर्ती घोडेपर । छत्र च्यामर वुपर ।।२।।
नंगे शस्त्र आगे चले । भक्त बखानत भले ।।३।।
दास कहे चिदंबर । झेंडा ध्वजा चले भार ।।४।।

१३०३४०

स्वारि चले चीदंबर । विप्र मंडलिके भार ।।१।।
झांज ढोलकि मंजीरे । प्रेम भजन लगत प्यारे ।।२।।
बिना सतार मुरलि । भजन करत स्वारि चलि ।।३।।
दास कहे चिदंबर । लिला बताये आपार ।।४।।

१३०३४१

चिदंबर आवतार । चले तिर्थ हारिव्दार ।।१।।
लोक आचरज करत । ऐसि न देखे मुरत ।।२।।
कलजुग आवतार । चले सीका ये कठार ।।३।।
दास कहे बरने चिदंबर । किरत बखाने आपार ।।४।।

१३०३४२

चिदंबर माहाराज । करत आनाथके काज ।।१।।
स्वारि चलि देसावर । करत पतित वुधार ।।२।।
प्रेमभजन देस भाखा । नित्य नया करे लीखा ।।३।।
आभंग पद भाषा प्यारि । संगे लिखे ब्रम्हचारि ।।४।।
दास कहे मय पतित । साई कीरत बखावत ।।५।।

१३०३४३

स्वारि ज्यात गावोगाव । देखन आवत समुदाव ।।१।।
संतभक्त ये मिलते । नाना बिचार पुछते ।।२।।
वुनकि करे खातरजमा । चिदंबर बतावे महीमा ।।३।।
दास कहे चिदंबर । पुरनब्रम्ह आवतार ।।४।।

१३०३४४

दरकुछ चले स्वारि । करते आचरज नरनारि ।।१।।
आनंद करत भक्तजन । ऐसे नहि सुने कान ।।२।।
लिला करत चिदंबर । किरत बर्नत आपार ।।३।।
हिरदे साईके पन्हवे । दास बाधे आगे ज्यावे ।।४।।

१३०३४५

विप्र आयो दरसन काज । वुसे पुछत माहाराज ॥१॥
कोन आर्थ तेरे मन । दिजो कहे पुत्रदान ॥२॥
कहत साई चिदंबर । तेरो निश्चये निर्धार ॥३॥
दास कहे चिदंबर । किरपा बोहोत दीनोपर ॥४॥

१३०३४६

शुभ घडि देखकर । बुलावे बिप्र चिदंबर ॥१॥
दिनो प्रसाद फल दोन । घरे आये वो ब्राम्हण ॥२॥
पुजा करे नारेलकि । पुरे कामना मनोकि ॥३॥
कहे चिदंबर दास । पुरन करे प्रभु आस ॥४॥

१३०३४७

बरस भयो पुज्या करन । बेटा भयो सुलछन ॥१॥
भयो आनंद बिप्रकु । आयो स्वामि के दरसनकु ॥२॥
सकर बाटत जत्राकु । हारस बोहोत बम्हनकु ॥३॥
कहे पुरन आवतार । कलजुग चिदंबर ॥४॥
दास कहे चिदंबर । लिलाधारि बिसंभर ॥५॥

१३०३४८

करे ब्राम्हनभोजन । बिप्र रह्यो आठ दिन ।।१।।
दिन्हो निरोप साईने । बिप्र घर गयो आपने ।।२।।
करो जत्राको भोजन । चिदंबरकु आरपन ।।३।।
दास कहे चिदंबर । लिला बतावे आपार ।।४।। १३०३४९

चरीत्र २७१

पद हि -o- काह खदायो देस चिदंबर ।।धृ।।
पेटकि चिंता न मिले रोटि । न मिले वोढनखेस... चिदंबर ।।१।।
संग दिने बम्हन पाव चलावत । न मिले बासकु भेस.. चिदंबर ।।२।।
नहि मुजे भक्ति संत कल्हावो । काहेकु दिनो भेस... चिदंबर ।।३।।
करुना नावे दास मनावत । मोहडे आवत फेस...चिदंबर ।।४।। १३०३५०

आहि -o- काहेकु भेजते साई परदेस । नहि मुजे आस तुमबिना ।।१।।
चित लग रह्यो तुम हो चिदाकास । रहे आसपास भरपुर ।।२।।
आंदरबाहेर व्यापक तुमहि । तिर्थ देखे ताहि फत्तर पानि ।।३।।
दास कहे सब माहि चिदंबर । भर रह्यो आपार पार नहि ।।४।।
१३०३५१

निकरे आंगुष्टसे गंगा सबरे तिर्थ । न ज्याने आरथ वाको कोई ।।१।।
प्रभु चिदंबरनाम कहत बानी । पापि भये मुनिरुषेसर ।।२।।
नाम लेत वाके पाव पडे तिर्थ । पाप वुनको ज्यात संत मिले ।।३।।
दास ज्याने येक नाम चिदंबर । पतित वुधार कहते बिरया ।।४।।

१३०३५२

नाम येक ज्यानो चिदंबरसार । आवर बिचार न ज्यानो मय ।।१।।
आबिनास येक चिदंबर धनी । आवर करनि मायारुप ।।२।।
नासिवंत दिखे जीतनो आकार । प्रनव ॐकार मुलमाया ।।३।।
दास कहे रुपनाम नहि जहा । शांति सुख ताहा आविनास ।।४।।

१३०३५३

चिदंबरप्रभु ज्यानो आतःकरन । बोलना बचन काहा तोडी ।।१।।
दिजो भक्तिप्रेम बैरागसहित । कामनाविरहित मन करो ।।२।।
कामक्रोध दुर करो चिदंबर । आनुभव बिचार ग्यान दिज्यो ।।३।।
दास कहे मन करना उन्मन । आयो तुम सरन चिदंबर ।।४।।

१३०३५४

नहि सुख साई तुमबिना कहि । तिनलोकमाहि बिचार वो ।।१।।
चित कि चेतना नहि तुमबिना । पुरावो बासना तुहि सबरि ।।२।।
न हालत पान बिरखा को तुमबिन । न चले पवन आग्याविना ।।३।।
दास कहे सता तुमारि आपार । मिलो चिदंबर आनाथकु ।।४।।

१३०३५५

चिदंबर साई कला आघटित । किर्त बखावत च्यारो आटरा ।।१।।
थक रहे छे वो न भये बरनन । फटे जीभा बदन सहसरमुख ।।२।।
आनंतआपार प्रभु तुमारि कला । न चले गलबला च्यारोमो होस ।।३।।
दास कहे मयतो आग्यान पतित । किर्त बखावत कैसी बने ।।४।।

१३०३५६

आये बिप्र येक कबिला लेकर । मुक वो बधीर लडका येक ।।१।।
न हेति बाच्या वाकु जलमत मुको । दर्सन साईको लेनो आयो ।।२।।
करत बिनंति प्रभु आवतार । यकलो कुवर दियो तुमने ।।३।।
दास कहे बिप्र कर रह्यो बिनंति । बरनत हे कीर्ती जनजत्रा ।।४।।

१३०३५७

चिदंबर प्रभु प्रसन्न बिप्रकु । बुलवे भोजनकु लडका लेके ।।१।।
बारा बरसकु मुको बिप्र कुवर । बाच्या चिदंबर देत छनमे ।।२।।
लगे पडावन वेदके आछर । कला चिदंबर बतावत ।।३।।
दास कहे भयो आनंद बिप्रकु । ज्यात हे प्रभुकु लोटांगन ।।४।।

१३०३५८

लेकर निरोप बिप्र ज्याय घरे । आनंदसे करे भजनपुज्या ।।१।।
करे संतरपन बिप्रकु भोजन । किरत बरनन दिनरात ।।२।।
आचरज करत जन लोक सबरे । प्रभु आवतरे कलजुगमे ।।३।।
दास कहे लिला बतावे आपार । साई चिदंबर कलजुगमे ।।४।।

१३०३५९

नित वुटकर करतहु बिनंति । बरनत हु किरति दिनरात ।।१।।
कैसि नावे दया तुमकु चिदंबर । पावन आवतार पतितकु ।।२।।
काहा तोडी राहा देखु मय तुमारि । न मिलो छनभरि सपने कभु ।।३।।
दास कहे ब्रिद तुम्हारो पावन । बतावो चरन चीदंबर ।।४।।

१३०३६०

पद हींदुस्थानी...... म्हातो थारो कंगाल चिदंबर ।।धृ।।
कामि क्रोधी पतित आग्यान । तुम्हारो कल्हावत बाल... चिदंबर. ।।१।।
नित वुट तुमकु करुना भाकत । न कहो कभु येक स्वाल.. चिदंबर ।।२।।
किरत बखावत संत कल्हावत । वुपर मुद्रा माल चिदंबर ।।३।।
दास कहे प्रभु भये आवतार । दुर करो मेरो काल चिदंबर ।।४।।

१३०३६१

आभंग हिदुछानि चाल दिडकी
चिदंबर मय तो थारो बाल । मातापिता तुम दयाल ।।१।।
वुमर नित रवावे काल । जलदी करना समाल ।।२।।
न कहो सपने यक सवाल । काहे करत बेहाल ।।३।।
दास जिनो आजकाल । ब्रिद आपनो समाल ।।४।। १३०३६२

साई राहा देखु तोरि । कैसि करुना नावे मेरि ।।१।।
चिदंबर माहाराज्या । दवडो आनाथ के काज्या ।।२।।
आखियापर रह्यो जीव । मेरि कैसि नावे किव ।।३।।
दास कहे सुनो आरजि । ईतने वुपर थाकि मरजी ।।४।।

१३०३६३

चिदंबर साई प्रभु । मेरे सपने नावे कभु ।।१।।
पेट बांधके भजन । करत हु रात दिन ।।२।।
साई पतितपावन । आपनो ब्रिद करो जतन ।।३।।
दास कहे चिदंबर । प्रभु कबलो पकडु धीर ।।४।।

१३०३६४

किरपा करो येक बार । मेरो चित करो स्थिर ।।१।।
नहि तुम बिना कोई । तिन लोक मुजे साई ।।२।।
प्रिति दिजो जरन कि । सुनो आरजि दिनोकि ।।३।।
कहे चिदंबर दास । नहि तुमबिन आस ।।४।।

१३०३६५

दिजो तुम्हारो चिंतन । साई आयो मय सरन ।।१।।
मुजे आस नहि आवर । दरसन दिजो येक बार ।।२।।
आस पुरवो ईतनी । राखो बिरदकि बानी ।।३।।
दास कहे चिदंबर । सत्त करो आवतार ।।४।।

१३०३६६

मातापिता तुम हि धनि । आपनि बतावो करनी ।।१।।
कलजुग आवतार । प्रगट करो श्रीष्टीपर ।।२।।
हाम तो आनाथ हु दिन । तुम बीना पुछे कोन ।।३।।
कहे दास चिदंबर । कला तुमारि आपार ।।४।।

१३०३६७

येक दरिद्रि ब्राम्हन । आयो साईके दरसन ।।१।।
करे बिनंति बोहोत । प्रभु दुर करो बिपत ।।२।।
बोले साई बिसंबर । चिंता न करे तिलभर ।।३।।
कहे चिदंबर दास । साई पुरन करो आस ।।४।।

१३०३६८

राखो बिप्र येक मास । भोजन करत साईपास ।।१।।
करि बिनंति साईकु । प्रभु सिका दिजे मुजकु ।।२।।
हासके बोले चिदंबर । चित केव नहि स्थिर ।।३।।
दास कहे चिदंबर । लिला प्रभुकि बिचित्र ।।४।।

१३०३६९

साई बुलावे बम्हन । च्यावर दियो सेर तिन ।।१।।
प्रभु कहे ज्यावो घर । भाग्य आयेगा आपार ।।२।।
गयो घरकु बम्हन । रहे आनंदसे मन ।।३।।
कहे चिदंबर दास । गठया रखे देवपास ।।४।। १३०३७०

पुज्या करके छोड देखो । भयो सुबरन च्यावरको ।।१।।
भयो आनंद आपार । कहे धन्य चिदंबर ।।२।।
आवतार ब्रम्हपुरन । विप्र करत बरनन ।।३।।
दास कहे चिदंबर । लिला बतावे आपार ।।४।। १३०३७१

चरित्र २७३

नाम बिना नाहि सार चिदंबर ।।धृ।। पद हींदुस्थानी
परबनी तिरथ ग्रहन कासी । नाम लेत वुध्धार चिदंबर ।।१।।
च्यारो वेद आटरा पुराण । वुनको ये हो नीरधार चिदंबर ।।२।।
ब्यास शुक नारद सनक सनंदन । येहि करत पुकार चिदंबर ।।३।।
दास कहे तिनो देवके वचन । नाम जपत हारिहार चिदंबर ।।४।।
१३०३७२

अ.हि.बडे चाल
चिदंबर साई देखे तुमारे चरन । नावे मेरे मन आवर कछु ।।१।।
पुरनब्रम्ह देखो आवतार सरगुन । नावे मेरे मन तिरथ कासी ।।२।।
गंगा भागिरथि निकरि चरनसे । देखो नजरसे वोहि प्रभु ।।३।।
दास कहे मेरि पुरन भई आस । लगत वुदास आवर सबहि ।।४।।

१३०३७३

तिनलोक जिनके करत हय ध्यान । देखो भगवान चिदंबर ।।१।।
सता जिनकि ऐसि बिचरे चराचर । वोहि चिदंबर सगुन मिले ।।२।।
पुरन भई आस सबहि मेरे मनकी । आग्या ये प्रभुकि तिरथ जाना ।।३।।
दास कहे ज्याहा भेजे चिदंबर । हाम ज्यावे वुदर आनंदसे ।।४।।

१३०३७४

जहा भेजो ताहा जाना ये निरधार । संग चिदंबर चले प्रभु ।।१।।
आपार ये कला प्रभु बतावत । हात जोडे आवत आगे जम ।।२।।
आग्याबिन जिनके न चले पवन । आवतार सरगुन चिदंबर ।।३।।
दास कहे लिला बतावे भक्तनकु । मुजे पतितकु पावन वो ।।४।।

१३०३७५

मयऐसो पतित नहि तीन लोक । पावन भयो देख चिदंबर ।।१।।
पतित दिनको साहे करे प्रभु । नहि देखु कभु देव ऐसो ।।२।।
किरपा करे बोहोत दिन रंकोपर । प्रभु चिदंबर दयालवो ।।३।।
दास कहे मय तो आनाथ हु दिन । करे समाधान चिदंबर ।।४।।

१३०३७६

कलजुग भयो आवतार पावन । प्रभु या सरगुण चिदंबर ।।१।।
आनाथ दिनको करे प्रतिपाल । साई ये दयाल चिदंबर ।।२।।
बतावत राहा पकडके हात । लिला बतावत आनाथकु ।।३।।
दास कहे प्रभु चिदंबर धनि । बतावे करनि आघटित ।।४।।

१३०३७७

प्रभु चिदंबर बतावो चरन । लग रह्यो मन मेरो साई ।।१।।
न पडे बिसर चित मेरो वुदास । लगरहि आस हिरदेमाहि ।।२।।
काहालो बतावु बोलके बचन । साखि आतःकरन तुमहि प्रभु ।।३।।
दास कहे ज्यानो तुम हि चिदंबर । बचन करार किनो तुमने ।।४।।

१३०३७८

परिछा देखनकु कासि के ब्राम्हन । आये च्यारोजन पंडत बडे ॥१॥
किरत सुनि बोहोत पुरनआवतार । भयो चिदंबर कलजुगमे ॥२॥
बम्हन च्यारो बेदि पढे छबे शास्त्र । बोलत विचित्र प्रभु आगे ॥३॥
दास कहे वुनसे बोले चिदंबर । बेद शास्त्र बिच्यार मय नहि ॥४॥

१३०३७९

विनोद करके बोले चिदंबर । खेलके संसार गमा दियो ॥१॥
आपने बचन पिता पढावते । आब आवि बाते आवुतना ॥२॥
बिप्र कहत ऐसेजी न बोलो ये बात । दरसन बतावत ज्यात्रा सबहि ॥३॥
दास कहे बिप्र परिछा दैव करत । लिला बतावत चिदंबर ॥४॥

१३०३८०

बैठे चिदंबर हात मे च्यार केला । बतावत लिला तु आपनि ॥१॥
दरसन करने आवत बिप्रकांता येक । कनीया वाके देख लडका नंगो ॥२॥
प्रभु चिदंबर बालक बुलावे । प्रसाद खिलावे केला च्यारो ॥३॥
दास कहे लडका बोले च्यारो बेद । कला ये आगाद बतावत ॥४॥

१३०३८१

आचरज देखके बम्हन कासी के । चरन प्रभुके पकडन लागे ।।१।।
छमा करो साई आन्याय हामारे । आवतार घरे कलजुगमाहि ।।२।।
पुरन आवतार प्रभु चिदंबर । बिप्र बारोबार लोटांगण ।।३।।
दास कहे लिला प्रभु तुमारि ऐसि । मेरे भकत कैसि धिरज किनि ।।४।।

१३०३८२

चरित्र २७४

।।शुभं भवतु ।।

-ooo- इति समाप्त -ooo-

।। जय चिदंबर ।।

।। औदुंबरनिवासी भक्ताभिमानी ।।
।। राजाधिराज श्री शिव चिदंबरेश्वर महाराज की जय ।।



|| SHRI CHIDAMBAR RAJARAM BHAKTA NIVAS ||

Constructed under Supervision of Chidambar Seva Samithi, Chikodi in the year 1994-95.